# गुलशने इब्राहिमी



मध्ययुगीन महाराष्ट्राचा इतिहास-१

हे पुस्तक प्रताधिकारमुक्त असून महाराष्ट्र राज्य शासनातर्फ़े विनामूल्य ई प्रत वितरित करण्यात आली आहे.

ई साहित्य प्रतिष्ठान मराठी भाषा आणि मराठी साहित्याबरोबरच मराठी परंपरा, इतिहास आणि संस्कृतीचा जास्तीत जास्त प्रचार आणि प्रसार व्हावा यासाठी काम करते.

गुलशने इब्राहिमी हे पुस्तक शिवशाहीच्या आधीच्या महाराष्ट्राचे, त्यातल्या राज्यकारभाराचे वर्णन करणारा एक महत्त्वाचा दस्त ऐवज आहे. प्रत्येक मराठी इतिहासाच्या अभ्यासकाने हे पुस्तक वाचावे आणि संग्रही ठेवून पुन्हा पुन्हा वाचावे.

ई साहित्य प्रतिष्ठान हे पुस्तक उपलब्ध करून देणाऱ्या शासकीय संस्थांचे आभारी आहे.

ई साहित्य प्रतिष्ठान
www.esahity.com
esahity@gmail.com

www.esahity.com

esahity@gmail.com

# गुलशने इब्राहिमी

## मध्ययुगीन महाराष्ट्राचा इतिहास

# गुलशने इब्राहिमी

म.रा.सा.सं.मं. ग्रंथालय
प्र/१४०/२
मंत्रालय

फरिश्तालिखित

'गुलशन-ई-इब्राहिमी'

या ग्रंथाचा अनुवाद

: अनुवादक :

कॅ. डॉ. भ. ग. कुंटे

महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई

प्रथमावृत्ती :
मे, १९८२
(शके १९०४)

* * *

© प्रकाशकाधीन

* * *

प्रकाशक :
सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

* * *

मुद्रक :
य. श्री. रणदिवे,
महाराष्ट्र सहकारी मुद्रणालय,
९१५/१, शिवाजीनगर,
फर्ग्युसन कॉलेज रोड,
पुणे-४११ ००४.

* * *

मूल्य : साठ रुपये

# निवेदन

फरिश्त्याचा 'गुल्शन-ई-इब्राहिमी' हा ग्रंथ म्हणजे मध्ययुगीन महाराष्ट्र-कर्नाटकाचा अस्सल साधनांनी युक्त असा इतिहास आहे.

फरिश्ता हा कास्पियन समुद्राच्या किनाऱ्यावर अस्माबाद येथे सन १५७० च्या सुमारास जन्मला. आपल्या देशाचा त्याग करून तो हिंदुस्थानात आला व अहमदनगरला राहिला. तेथील राज्यक्रांतीत भाग न घेता तो विजापूरच्या आदिलशाही सुलतानाच्या आश्रयाला गेला. विजापूरच्या सुलतानाचा इतिहास त्याने १५९६ मध्ये पुरा केला. विजापूर दरबारचा एक मुत्सद्दी म्हणून फरिश्ता जहांगीर बादशहाकडे गेला होता. सन १६२६ च्या सुमारास तो मृत्यु पावला.

अशा या इतिहासकाराने बहामनी घराणे, अहमदनगरची निजामशाही, विजापूरची आदिलशाही, वऱ्हाडची इमादशाही, बीदरची बरीदशाही, गोवळकोंड्याची कुतुबशाही अशा शाह्यांच्या इतिहासाबरोबरच खानदेशच्या फारुकी घरण्याचा इतिहासही ( इ. स. १३८२ ते १६०१ ) लिहिला आहे. शिवाय गुजराथचे सुलतान, मोगल आणि इतर राजवटी यांचा अनुषंगाने उल्लेखही यात आला आहे. देवगिरीच्या यादवांच्या साम्राज्याचा नाश झाल्यापासून म्हणजे साधारण १३१८ पासून मध्ययुगीन कालखंडाला सुरुवात झाली असे आपण गृहीत धरले तर साधारण १६८७ पर्यंत म्हणजे औरंगजेबाने विजापूर आणि गोवळकोंडा ही राज्ये जिंकीपर्यंतचा काळ म्हणजे मध्ययुगीन काळ. त्याचाच हा इतिहास.

बहामनी राज्यकर्त्यांप्रमाणेच बहामनीनंतर झालेल्या शाह्यांचे सुल्तान, विशेषतः अहमदनगर आणि विजापूर या शाह्यांचे सुलतान, वाङ्मयाचे उपासक आणि विद्वानांचे आश्रयदाते होते. या दोन्ही शाह्यांच्या दरबारी अनेक हिंदुस्थानी आणि परकी विद्वान आश्रयाला होते. सुप्रसिद्ध इतिहासकार फरिश्ता हा प्रथम अहमदनगरच्या दरबारात होता. नंतर तो विजापूर दरबारात गेला. तेथे त्याने प्रस्तुत 'गुल्शन-ई-इब्राहिमी' म्हणजेच हिंदुस्थानातील मुसलमानी सत्तेचा उदय हा ग्रंथ लिहिला.

मध्ययुगीन इतिहासाचा कालखंड जवळ जवळ साडेतीनशे वर्षांपेक्षा अधिक कालावधीवर पसरलेला आहे. या कालखंडाने अनेक राजवटी पाहिल्या. सिंहासनासाठी झालेली युद्धे आणि रक्तपातही पाहिले. हा सारा कालखंड युद्धांनी भरलेला होता. या युद्धांना धर्माचे बंधन नव्हते, म्हणजे ही युद्धे मुसलमान-मुसलमानात झाली, हिंदु-मुसलमानात झाली, तसेच हिंदु-हिंदूत झाली. युद्धाबरोबर मनुष्यहानी, वित्तहानी व मालमत्तेची हानी आलीच. शाह्यांच्या अमलानंतर मोगल कालखंड आला. तरी युद्धाच्या स्वरूपात मूलग्राही फरक पडला नाही.

अशा या महत्त्वपूर्ण कालखंडाचा इतिहास फरिश्ताने लिहिला आहे व डॉ. भ. ग. कुंटे यांनी त्याला मराठी साज चढविला आहे. मूळ ग्रंथाबरोबर शाह्यांच्या वंशावळी, वंशवृक्ष, घटनांची कालसूची, तळटीपासूची दिल्यामुळे ग्रंथाची उपयुक्तता वाढलेली आहे.

ग्रंथाची संकल्पना होऊन प्रत्यक्ष ग्रंथ वाचकांच्या हाती पडेपर्यंत एक दशक उलटून गेले याची मंडळाला जाणीव आहे. हा मध्ययुगीन इतिहास असल्याने मजकुरात काही कालबाह्यता होणार नाही, तरी पण संकल्प आणि सिद्धी यात कमीत कमी अंतर असावे हे मंडळाला मान्य आहे आणि ते आचरणात आणण्याचा मंडळ सतत प्रयत्न करील.

महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतर अद्ययावत् सामग्रीचा उपयोग करून व गेल्या काही वर्षांत इतिहासविषयक उजेडात आलेली नवी साधने लक्षात घेऊन आधुनिक इतिहासरचनेच्या तत्त्वानुसार महाराष्ट्राचा एक प्रमाणभूत व सलग सांस्कृतिक व राजकीय इतिहास निर्माण करण्याचा संकल्प इतिहास:समितीने सोडला आहेच. आधुनिक तसेच समकालीन इतिहासावर अनेक ग्रंथ काढण्याचा मंडळाचा संकल्प आहे. तो यशस्वी करण्यासाठी वाचक सहकार्य करतील अशी आशा आहे.

१ मे, १९८२
महाराष्ट्र दिन
मंत्रालय, मुंबई–४०० ०३२.

**सुरेन्द्र बारलिंगे,**
अध्यक्ष
महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ.

# गुलशने इब्राहिमी

## ( मध्ययुगीन महाराष्ट्राचा इतिहास )

# अनुक्रमणिका


पृष्ठ-क्रमांक

**ग्रंथसूची :** १–२

**मध्ययुगीन महाराष्ट्रातील निरनिराळ्या राज्यांत राज्यावर आलेल्या सुलतानांची नावे आणि त्यांच्या घराण्याचा वंशवृक्ष :** ३–१२

बहमनी सुलतानांची वंशावळ – ( ३–४ ), अहमदनगरच्या निजामशाही सुलतानांची वंशावळ – ( ५–६ ), विजापूरच्या आदिलशाही घराण्याची वंशावळ – ( ७ ), वऱ्हाडच्या इमादशाही घराण्याची वंशावळ – ( ८ ), बिदरच्या बरीदशाही घराण्याची वंशावळ – ( ८–९ ), गोवळकोंड्याच्या कुतुबशाही घराण्याची वंशावळ – ( ९–१० ), खानदेशच्या फारुकी घराण्याची वंशावळ – ( ११–१२ )

**मध्ययुगीन कालखंडातील घटनांची कालसूची** १३–१६

**लेखकाचे निवेदन :** १–४८

प्रास्ताविक – ( १ ), मध्ययुगीन कालखंडाचे महत्त्व – ( १ ), बहमनींचा उदय – ( २ ), परदेशी आणि दक्षिणी वाद – ( २ ), चौदावे आणि सतरावे शतक यांमधील साम्य – ( ४ ), विजयनगरचा यक्ष प्रश्न – ( ५ ), विजयनगर आणि पाच शाह्या – ( ५ ), विजापूर आणि अहमदनगर– ( ७ ), अहमदनगर आणि वऱ्हाड व विजापूर आणि वऱ्हाड– ( ८ ), पाच शाह्यांतील गोवळकोंडा आणि बिदर यांचे स्थान–(१०), अहमदनगर आणि गुजरात–(१२), अहमदनगर आणि खानदेश–( १३ ), विजयनगर आणि अहमदनगर–(१४), मुसलमानी राजवटी आणि त्यांचे सुलतान– (१५), वारसाहक्कांची युद्धे–एक स्थायी भाव–(१५), सुलतानांची स्वभावचित्रे – (१९), हुमायूनशहा बहमनी-(१९), मूर्तजा निजामशहा-(२०), शम्सुद्दीन बहमनी-(२०),

दुसरा बुरहाण निजामशहा – (२१), अमीरअली बरीद- (२२), अली आदिलशहा–(२२), पुनश्च मूर्तजा निजामशहा– (२२), मध्ययुगीन कालखंड आणि पोर्तुगीज — (२३), मध्ययुगीन कालखंड : समाज, राज्यव्यवस्था, संस्कृती, वाङ्मय वगैरे–(२४), राज्य कारभार : बहमनी सुलतान-(२६), राज्याची विभागणी – (२६), गावानच्या सुधारणा–(२६), जहागिरी पद्धती– (२७), परदेशी मुसलमान– (२७), मुलकी अधिकारी–(२८), अहमदनगर : राज्यकारभार–(२८), विजापूर : राज्यकारभार– (३०), मध्ययुगीन कालखंड-परदेशी प्रवाशांची वर्णने–बार्थेमा–(३२), मोगल राज्यकारभार–(३४), मध्ययुगीन कालखंड : कला आणि वाङ्मय–बहमनी– (३७), अहमदनगर, विजापूर आणि इतर शाखा–(३९), मोगल : कला, समाज व्यवस्था, वाङ्मय आणि शिल्प–(४१)

**फरिश्त्याची जीवनरेखा :** ४९–५२

**फरिश्ताकृत प्रस्तावना :** ५३–५५

**गुलशने इब्राहिमी पुस्तकाची अनुक्रमणिका** ५६–६३
**( आवश्यक तेवढीच ) मूळ पृष्ठक्रमांक देऊन—**

पुस्तक दुसरे, प्रकरण तिसरे : दक्षिणेमधील सुलतानांचा इतिहास ५६

पुस्तक तिसरे, भाग तिसरा : निजामशाही ह्या नावाने प्रसिद्ध असलेल्या अहमदनगरच्या सुलतानांच्या घराण्याचा इतिहास ६४–७१

पुस्तक तिसरे, भाग दुसरा : आदिलशहा ह्या नावाने माहीत असलेल्या विजापूरच्या सुलतानांचा इतिहास ७१–७५

पुस्तक तिसरे, प्रकरण तिसरे, भाग पाचवा : इमादशाही या नावाने प्रसिद्ध असलेल्या वऱ्हाडच्या सुलतानांचा इतिहास ७५–७६

पुस्तक तिसरे, प्रकरण तिसरे, भाग सहावा : बरीदशाही या नावाने प्रसिद्ध असलेल्या बिदरच्या सुलतानांचा इतिहास ७६–७७

पुस्तक तिसरे, प्रकरण तिसरे, भाग चौथा : कुतुबशाही या नावाने ओळखल्या जाणाऱ्या गोवळकोंड्याच्या सुलतानांचा इतिहास ७७–८०

पुस्तक चौथे, प्रकरण सहावे : खानदेशच्या सुलतानांचा इतिहास ८०–८३

**पुस्तक दुसरे, भाग पहिला :** ८५–२७९

अल्लाउद्दीन हसन गंगू बहमनी– ( ८५–९६ )

प्रकरण दुसरे : महमदशहा बहमनी पहिला– ( ९६–१२० ), मुजाहिदशहा बहमनी – ( १२०–१३० ), दाऊदशहा बहमनी– १३०–१३२

महमूदशहा बहमनी पहिला-( १३२-१३८ ), गियासुद्दीनशहा बहमनी (१३८-१४०), शम्सउद्दीन बहमनी-( १४०-१४४ ), फिरोजशहा बहमनी- ( १४४-१७० ), अहमदशहा वली-बहमनी-( १७०-१८६ ), अल्लाउद्दीन शहा बहमनी दुसरा- ( १८६-२०८ ), हुमायूनशहा जालीम बहमनी- ( २०८-२१७ ), निजामशहा बहमनी-( २१७-२२५ ), महमद-शहा बहमनी दुसरा-( २२५-२५४ ), महमूदशहा बहमनी दुसरा-( २५४-२७६ ), अहमदशहा बहमनी दुसरा-(२७७), अल्लाउद्दीनशहा बहमनी दुसरा-( २७७-२७८ ), वलीऊल्ला-शहा बहमनी-(२७८), कलिमउल्लाशहा बहमनी-(२७८-२७९)

**पुस्तक तिसरे, प्रकरण तिसरे**

**अहमदनगरच्या निजामशाही घराण्याचा इतिहास** २७९-३७४

मलिक अहमद निजामशहा-( २७९-२९४ ), बुरहाण निजाम-शहा पहिला- ( २९५-३१३ ), हुसेन निजामशहा पहिला- ( ३१३-३२२ ), मूर्तजा निजामशहा ऊर्फ दिवाणा अथवा वेडा निजामशहा- ( ३२२-३३९ ), मिरान हुसेन निजामशहा- ( ३३९-३४३ ), इस्माईल निजामशहा- ( ३४३-३४७ ), बुरहाण निजामशहा दुसरा-( ३४७-३५१ ), इब्राहिम निजाम-शहा- ( ३५१-३५४ ), अहमदशहा ताहिरचा मुलगा- ( ३५४-३६३ ), बहादूर निजामशहा-( ३६३-३६९ ), मूर्तजा निजामशहा दुसरा-( ३६९-३७४ )

**पुस्तक तिसरे, प्रकरण तिसरे :**

**आदिलशहा या नावाने माहीत असलेल्या विजापूरच्या सुलतानांचा इतिहास** ३७५-५१०

युसुफ आदिलशहा-( ३७५-३९५ ), इस्माईल आदिलशहा- ( ३९५-४२७ ), मल्लू आदिलशहा-( ४२७-४३१ ), इब्राहिम आदिलशहा पहिला- ( ४३१-४५६ ), अली आदिलशहा- ( ४५७-४७८ ), इब्राहिम आदिलशहा दुसरा-( ४७८-५१० )

**पुस्तक चौथे, प्रकरण चाथे :**

**खानदेशाच्या फारुकी घराण्याचा इतिहास** ५११-५३८

मलिक राजा फारुकी-( ५११-५१४ ), नसीरखान फारुकी- (५१४-५२० ), मिरान आदिलखान फारुकी- (५२० ),

मिरान मुबारकखान फारुकी–( ५२० ), मिरान धुनी ऊर्फ आदिलखान फारुकी पहिला– ( ५२१–५२२ ), दाऊदखान फारुकी– ( ५२२ ), आदिलखान फारुकी दुसरा ऊर्फ आजम हुमायून– ( ५२३–५२६ ), मिरान महमदखान फारुकी ऊर्फ मिरान महमदशहा–( ५२६–५२८ ), मिरान मुबारकखान फारुकी– ( ५२९–५३१ ), मिरान महमदखान फारूकी–(५३१–५३३), राजा अलीखान फारुकी- ( ५३३–५३६ ), बहादूरखान फारुकी ( ५३६–५३८ ).

**पुस्तक पाचवे, प्रकरण पाचवे :**

**वऱ्हाडच्या इमादशाही घराण्याचा इतिहास** ५३९–५४३

फत्तेउल्ला इमादउल्मुल्क– ( ५३९ ), अल्लाउद्दीन इमादशहा– ( ५३९–५४१ ), दर्या इमादशहा– ( ५४१ ), बुरहाण इमादशहा–( ५४१ ), तुफालखान– ( ५४२–५४३ )

**बिदरच्या बरीदशाही घराण्याचा इतिहास** ५४४–५४७

कासीम बरीद– (५४४), अमीर बरीद– (५४४), अली बरीदशहा– (५४५), इब्राहिम बरीदशहा– (५४६), कासीम बरीदशहा दुसरा– (५४६), मिर्जा अली बरीदशहा– (५४७), अमीर बरीदशहा दुसरा– (५४७)

**गोवळकोंड्याच्या कुतुबशाही घराण्याचा इतिहास** ५४८–५५६

सुलतान कुली कुतुबशहा– ( ५४८ ), जमशीद कुतुबशहा– (५५०–५५१ ), इब्राहिम कुतुबशहा– (५५१–५५५), महमद कुली कुतुबशहा– (५५५–५५६)

**टीपा :**

**मूळ ग्रंथातील तळटीपा व भर घातलेल्या तळटीपा** ५५७-६९३

**सूची** ६९५–७५२

---

## गुलशने इब्राहिमी : मध्ययुगीन महाराष्ट्राचा इतिहास.

## ग्रंथसूची

A Forgotten Empire by Sewell, London 1900.

Ahmadnagarchi Nizamshahi, a Marathi translation by Dr. B. G. Kunte of Burhan-i-Masir's English translation by Lieut. Col. Woolesley Haig, 1962.

Akbar - nama of Abul Fazl, in Elliot and Dowson, Vol. VI.

Akbar -nama of Faizi Sirhindi, in Elliot and Dowson. Vol. VI.

Antiquities of Bidar, by Yazdani, 1914.

Architecture of Bijapur, by Meadows Taylor and Fergusson.

Aspects of Muslim Administration, by R. S. Tripathi.

Bahamanis of the Deccan, by Prof. Sherwani, Hyderabad 1953.

Bahamani Rajyacha Itihas, a Marathi translation by Dr. B. G.

Kunte of Burhan-i-Masir's English translation by Major King 1966. Cambridge History of India. Vol. III 1928 and Vol. IV 1937. Early Muslim Expansion in South India by N. Venkata ramanayya.

History of Gujrath, by Commissariat, Vol. I 1938, and Vol. II 1957.

History of Vijayanagar, by B. S. Rao.

Mahmud Gawan, the Great Bahamani Wazir by Prof. Sherwani, Allahabad, 1972.

Mediaeval India Under Muhammadan Rule by Lane Poole S 1902.

The Portuguese in India, by Danvers, 1894.

Sources of Vijayanagar History, Madras 1909.

South India and her Muhammadan Invadors by S. K. Aiyangar, Oxford University Press, 1921.

Studies in Muslim Political Thought and Administration by Prof. Sherwani, Lahore 1945.

Tabakati-Akbari of Nizamuddin Ahmad in Elliot and Dowson, Vol. V, also Bibliotheca Indica Series, A. S. of B. text and translation.

Tarikhi-Firozshahi of Ziauddin Barni in Elliot and Dowson, Vol. III also Bibliotheca Indica Series of the A. S. of B. Calcutta 1962.

# गुलशने इब्राहिमी

## मध्ययुगीन महाराष्ट्रातील निरनिराळ्या राज्यात राज्यावर आलेल्या सुलतानांची नावे आणि त्यांच्या घराण्याचा वंशवृक्ष

१) दक्षिणेकडील बहमनी राजघराणे
२) अहमदनगरचे निजामशाही घराणे
३) विजापूरचे आदिलशाही घराणे
४) वऱ्हाडचे इमादशाही घराणे
५) गोवळकोंड्याचे कुतुबशाही घराणे
६) बिदरचे बरीदशाही घराणे
७) खानदेशचे फारुकी घराणे


## बहमनी सुलतानांची वंशावळ

### राज्यारोहणाची तारीख

| हिजरी | | इ. स. |
|---|---|---|
| ७४८ | अल्लाउद्दीन बहमन शहा | १३४७ |
| ७५९ | महमद पहिला | १३५८ |
| ७७६ | मुजाहिद | १३७५ |
| ७७९ | दाऊद | १३७८ |
| ७८० | महमूद | १३७८ |
| ७९९ | गियासुद्दीन | १३९७ |
| ७९९ | शम्सुद्दीन | १३९७ |
| ८०० | ताजुद्दीन फिरोज | १३९७ |
| ८२५ | अहमद, वली | १४२२ |
| ८३९ | अलाउद्दीन अहमद | १४३६ |
| ८६२ | हुमायून जालीम | १४५८ |
| ८६५ | निजाम | १४६१ |
| ८६७ | महमद तिसरा, लष्करी | १४६३ |
| ८८७ | महमूद | १४८२ |
| ९२४ | अहमद | १५१८ |
| ९२७ | अलाउद्द्दीन | १५२१ |
| ९२८ | वलीउल्ला | १५२२ |
| ९३१ | कलीमुल्ला | १५२५ |
| ९४४ | बहमनी घराण्याचा शेवट | १५३८ |

## दक्षिणेतील बहमनी घराण्याचा वंशवृक्ष

कंसातील आकडे गादीवर आल्याचा क्रम दर्शवितात




× याचा उल्लेख चुकीने महमद दुसरा म्हणून केला जातो
* हिचा विवाह फिरोजबरोबर झाला.
+ हिचा विवाह अहमदबरोबर झाला.

# अहमदनगरच्या निजामशाही सुलतानांची वंशावळ.

## राज्यारोहणाची तारीख

| हिजरी | | इ. स. |
|---|---|---|
| ८९५ | अहमद निजामशहा | १४९० |
| ९१५ | बुरहाण निजामशहा पहिला | १५०९ |
| ९६० | हुसेन निजामशहा पहिला | १५५३ |
| ९७३ | मुर्तजा निजामशहा पहिला | १५६५ |
| ९९६ | हुसेन निजामशहा दुसरा | १५८८ |
| ९९७ | इस्माईल निजामशहा | १५८९ |
| ९९९ | बुरहाण निजामशहा दुसरा | १५९१ |
| १००२ | इब्राहीम निजामशहा | १५९५ |
| १००२ | अहमद | १५९५ |
| १००३ | बहादूर निजामशहा | १५९५ |
| १००७ | मुर्तजा निजामशहा दुसरा | १५९९ |
| १०४१ | हुसेन निजामशहा तिसरा | १६३१ |
| १०४३ | निजामशाही घराण्याचा शेवट | १६३३ |

## अहमदनगरच्या निजामशाही घराण्याचा वंशवृक्ष

कंसातील आकडे गादीवर आल्याचा क्रम दर्शवितात.

- १ अहमद निजामशहा
  - २ बुरहाण निजामशहा पहिला
    - ३ हुसेन निजामशहा पहिला
      - ४ मूर्तजा निजाम शहा पहिला
        - ५ हुसेन निजाम शहा दुसरा
      - ७ बुरहाण निजाम शहा दुसरा
        - ६ इस्माईल निजामशहा
        - ८ इब्राहीम निजामशहा
          - ९ बहादूर निजामशहा
      - चांद सुलतान०
    - अबदुल कादीर
    - शहा अली
      - १० मूर्तजा निजाम शहा दुसरा
        - ११ हुसेन निजामशहा तिसरा
    - शहा हैदर
    - महमद खुदाबंदा×
    - हसन
      - हुसेन

× इब्राहीम निजामशहाच्या (८) मृत्यूनंतर अहमदनगर मधील एका पक्षाने खुदाबंदाचा मुलगा म्हणून शहा ताहीरच्या अहमद या मुलाला गादीवर बसविले. ही लबाडी उघडकीस आल्यावर अहमदला पदच्युत करण्यात आले. त्याची कारकिर्द काही महिनेच झाली.

० हिचा विवाह पहिल्या अलि आदिलशहा बरोबर झाला.

## विजापूरच्या आदिलशाही घराण्याची वंशावळ.

### राज्यारोहणाची तारीख

| हिजरी | | इ. स. |
|---|---|---|
| ८९५ | युसूफ आदिलशहा | १४९० |
| ९१६ | इस्माईल आदिलशहा | १५१० |
| ९४१ | मल्लू आदिलशहा | १५३४ |
| ९४१ | इब्राहीम आदिलशहा पहिला | १५३४ |
| ९६५ | अलि आदिलशहा पहिला | १५५८ |
| ९८८ | इब्राहीम आदिलशहा दुसरा | १५८० |
| १०३७ | महमद आदिलशहा | १६२७ |
| १०६७ | अलि आदिल शहा दुसरा | १६५६ |
| १०८३ | शिकंदर आदिल शहा | १६७२ |
| १०९७ | आदिलशाही घराण्याची अखेर | १६८६ |

## विजापूरच्या आदिलशाही घराण्याचा वंशवृक्ष

कंसातील आकडे गादीवर आल्याचा क्रम दर्शवितात

- (१) युसुफ आदिलशहा
  - (२) इस्माईल आदिलशहा
    - (३) मल्लू आदिलशहा
    - (४) इब्राहीम आदिलशहा पहिला
      - इस्माईल
      - (५) अलि आदिलशहा पहिला
      - तहमास्प
        - (६) इब्राहीम आदिलशहा दुसरा
          - दरविश
          - सुलेमान
          - (७) महमद शहा
            - (८) अलि आदिलशहा दुसरा
              - (९) शिकंदर आदिलशहा
      - अहमद
    - अब्दुल्ला*
    - आलि उर्फ अल्लू ** अथवा अन्नू

* हा गोव्याला पळून जातो.

** ह्याला आंधळा केले जाते.

## वऱ्हाडच्या इमादशाही घराण्याची वंशावळ.

### राज्यारोहणाची तारीख

| हिजरी | | इ. स. |
|---|---|---|
| ८९५ | फतेउल्ला इमादशहा | १४९० |
| ९१६ | अलाउद्दीन इमादशहा | १५१० |
| ९३७ | दर्या इमादशहा | १५२९ |
| ९६९ | बुरहाण इमादशहा<br>तुफालखान | १५६१ |
| ९८२ | इमादशाही घराण्याचा शेवट | १५७४ |

## वऱ्हाडच्या इमादशाही घराण्याचा वंशवृक्ष.

कंसातील आकडे गादीवर आल्याचा क्रम दर्शवितात

१) फतेउल्ला इमादशहा ×

२) अलाउद्दीन इमादशहा

३) दर्या इमादशहा

४) बुरहाण इमादशहा — दौलतशहाबेगम०

× हा विजयनगरचा एक ब्राम्हण असून त्याचा मुसलमान म्हणून सांभाळ करण्यात आला.

० हिचा विवाह अहमदनगरचा पहिला हुसेन निजामशहा याच्या बरोबर झाला.

## बिदरच्या बरीदशाही घराण्याची वंशावळ.

### राज्यारोहणाची तारीख

| हिजरी | | इ. स. |
|---|---|---|
| ८९४ | अमीरकासीम बरीद | १४८७ |
| ९११ | अमीर अली बरीद | १५०५ |
| ९४९ | अली बरीदशहा पहिला | १५४२ |
| ९८७ | इब्राहीम बरीदशहा | १५७९ |
| ९९४ | कासीम बरीदशहा दुसरा | १५८६ |
| ९९९ | अमीर बरीदशहा | १५८९ |
| १०१० | मिरजाअली बरीदशहा | १६०१ |
| १०१८ | अली बरीदशहा दुसरा | १६०९ |
| १०२८ | बरीदशाही घराण्याचा शेवट | १६१९ |

## बिदरच्या बरीदशाही घराण्याचा वंशवृक्ष

कंसातील आकडे गादीवर आल्याचा क्रम दर्शवितात

(१) अमीर कासीम बरीद

- (२) अमीर अलीबरीद
  - (३) अली बरीदशहा पहिला
    - (४) इब्राहीम बरीद
      - (५) कासीम बरीदशहा दुसरा
      - (६) अमीर बरीद शहा
      - (७) मिर्जा अली बरीदशहा
        - (८) अली बरीदशहा दुसरा
  - खान जहान*
- खानजहान

* हा वऱ्हाडात पळून गेला.

## गोवळकोंडयाच्या कुतुबशाही घराण्याची वंशावळ

### राज्यारोहणाची तारीख

| हिज्री | | इ. स |
|---|---|---|
| ९१८ | सुलतान कुली कुतुबशहा | १५१२ |
| ९५० | जमशीद कुतुबशहा | १५४३ |
| ९५७ | सुभानकुली कुतुबशहा | १५५० |
| ९७७ | इब्राहीम कुतुबशहा | १५५० |
| ९८८ | महमदकुली कुतुबशहा | १५८० |
| १०२० | महमद कुतुबशहा | १६१२ |
| १०३५ | अब्दुल्ला कुतुबशहा | १६२६ |
| १०८३ | अबुलहसन कुतुबशहा | १६७२ |
| १०९८ | कुतुबशाही घराण्याचा शेवट | १६८७ |

## गोवळकोंड्याच्या कुतुबशाही घराण्याचा वंशवृक्ष

कंसातील आकडे गादीवर आल्याचा क्रम दर्शवितात.

- १) सुलतान कुली कुतुबशहा
  - हैदरकुली
  - कुतुबुद्दीन
  - २) जमशीद कुतुबशहा
    - ३) सुभान कुली कुतुबशहा
  - अबदुलकरीम
  - दौलतखान
    - अबदुल कादीर
    - हुसेनकुली
    - ५) महमदकुली कुतुबशहा
      - यातबक्ष बेगम
        - ७) अबदुल्ला कुतुबशहा
          - +८) अबुलहसन कुतुबशहा = मुलगी
    - महमद अमीन
      - ६) महमद कुतुबशहा
  - ४) इब्राहीम कुतुबशहा

---

+ अबुलहसनचा जन्म राजघराण्यात झाला असे म्हणतात पण त्याचे घराणे कोणते याचा मात्र कुठेही उल्लेख नाही.

## खानदेशच्या फारुकी घराण्याची वंशावळ

### राज्यारोहणाची तारीख

| हिजरी | | इ. स |
|---|---|---|
| ७८४ | राजा अहमद मलिकराजा | १३८२ |
| ८०१ | नसीरखान | १३९९ |
| ८४० | आदिलखान पहिला | १४३७ |
| ८४४ | मुबारकखान | १४४१ |
| ८६१ | आदिलखान दुसरा | १४५७ |
| ९०९ | दाऊदखान | १५०३ |
| ९१४ | गझनीखान | १५०८ |
| ९१४ | हसनखान | १५०८ |
| ९१४ | आलमखान | १५०८ |
| ९१४ | आदिलखान तिसरा | १५०९ |
| ९२६ | मिरान महमदशहा पहिला | १५२० |
| ९४१ | अहमदशाहा | १५३५ |
| ९४१ | मुबारकशहा पहिला | १५३५ |
| ९७३ | महमदशहा दुसरा | १५६६ |
| ९८४ | हसनशहा | १५७६–७७ |
| ९८५ | आदिलशहा चौथा उर्फ राजा अलीखान | १५७७–७८ |
| १००६ | बहादूरशहा उर्फ कद्रखान | १५९७ |
| १००९ | फारुकी घराण्याचा शेवट | १६०१ |

## खानदेशच्या फारुकी घराण्याचा वंशवृक्ष

कंसातील आकडे गादीवर आल्याचा क्रम दर्शवितात

- ऐन उद्दीन महमद ख्वाजा जहान
  - (१) राजा अहमद उर्फ मलिक राजा
    - २) नसीरखान
      - ३) आदिलखान पहिला
        - ४) मुबारकखान पहिला (चौकंडा)
          - ५) आदिलखान (ऐना) दुसरा
          - ६) दाऊदखान
            - ७) गझनीखान
            - खानजहान
          - ८) हसनखान
    - हसनखान उर्फ मलिक इफ्तिकार
      - गझनीखान
        - केसरखान
          - अहसनखान
            - १०) आदिलखान तिसरा (आलमखान)*
              - ११) मिरान महमदशहा पहिला ॰
                - १२) अहमदशहा
              - १३) मुबारकशहा दुसरा
                - १४) महमदशहा दुसरा
                  - १५) हसनशहा
                - १६) आदिलशहा चौथा (राजाअलीखान)
                  - १७) बहादूरशहा (कद्रखान)

* हा आलमखान आणि अहमदनगरच्या अहमदशहाने पाठिंबा दिलेला आलमखान हे वेगळे होते. क्रमांक (९) या ठिकाणी हा उपरा आलमखान अभिप्रेत आहे.

॰ ह्याला गुजरातचा सुलतान म्हणून राज्याभिषेक झालेला होता.

## मध्ययुगीन कालखंडातील घटनांची कालसूची

१३४६ दौलताबाद येथे बंड आणि इस्माईल मुख याची सुलतान म्हणून द्वाही.
१३४७ अल्लाउद्दीन बहमनशहा याची दक्षिणेचा सुलतान म्हणून द्वाही.
१३५३ महमद आलम, अली लछीन आणि फक्रुद्दीन मुहूरदार यांचे सागर येथे बंड.
१३५८ बहमनशहा याचा मृत्यू आणि महमद याचे पहिला महमदशहा बहमनी म्हणून राज्यारोहण.
१३६२ पहिल्या महमदशहा बहमनीची तेलंगणावर पुन्हा स्वारी. दौलताबाद येथे बहरामखान माजिंदराणी याचे बंड.
१३६६ पहिल्या महमदशहा बहमनीची विजयनगरवर स्वारी आणि त्याने केलेला पहिला बुक्क याचा पराभव.
१३६६ बहरामखान माजिंदराणी याच्या बंडाचा विमोड.
१३६७ गुलबर्गा येथील मोठ्या मशिदीची बांधणी पूर्ण.
१३७० खानदेशचा मलिक राजा याने केलेली स्वातंत्र्याची घोषणा.
१३७५ पहिल्या महमदशहा बहमनीचा मृत्यू आणि मुजाहिद बहमनीचे राज्यारोहण.
१३७८ मुजाहिदचा खून आणि दाऊद बहमनीचे राज्यारोहण.
१३७८ दाऊदचा खून आणि महमूदशहा बहमनीचे राज्यारोहण.
१३८० अदोनी येथे दुसऱ्या हरिहराचा पुतण्या चेनप्पा याच्याकडून बहमनींचा पराभव.
१३९६ सागर येथे बहाउद्दीन याचे बंड.
१३९७ महमूदशहाचा मृत्यू आणि गियासुद्दीन बहमनी याचे राज्यारोहण.
१३९७ गियासुद्दीनची पदच्युति आणि शम्सुद्दीनचे राज्यारोहण.
१३९७ शम्सुद्दीनची पदच्युति आणि फिरोजशहा बहमनीचे राज्यारोहण.
१३९९ विजयनगरचा दुसरा हरिहर आणि खेडल्याचा नरसिंग यांचे दक्षिणेवर आक्रमण.
१३९९ मलिक अहमदचा मृत्यू आणि नसीरखान फारुकीचे राज्यारोहण.
१४०७ फिरोजशहा बहमनीची विजयनगरवर स्वारी.
१४१८ फिरोजशहा बहमनीचे विजयनगरवर आक्रमण आणि त्याचा पराभव.
१४२२ अहमदखान बहमनीचे बंड, फिरोजशहाची पदच्युति आणि अहमदशहा बहमनीचे राज्यारोहण. फिरोजचा मृत्यू.
१४२४ अहमदशहाकडून राजधानीचे गुलबर्ग्याहून बिदर येथे स्थलांतर.
१४२६ अहमद बहमनीचा वऱ्हाडमधील माहूर आणि कलम यावर पुन्हा ताबा. त्याचा एलिचपूर येथे मुक्काम.

१४२९ खेडल्याच्या राजाकडून खंडणी गोळा करण्यासाठी अहमद बहमनीची चाल. खेडल्याच्या किल्ल्याला वेढा घालून बसलेल्या माळव्याच्या होशंगवर हल्ला न करता त्याने घेतलेली माघार, होशंगने केलेला त्याचा पाठलाग, त्याच्यावर हल्ला आणि अहमदने त्याचा केलेला पराभव.

१४३० दक्षिण आणि गुजरातमधील युद्ध. गुजरातच्या जफरखानाने दक्षिणच्या फौजांचा केलेला पराभव.

१४३४ माळवा आणि बहमनी याजमधील युद्ध.

१४३६ अहमद बहमनीचा मृत्यू आणि अलाउद्दीन अहमदचे राज्यारोहण.

१४३६ अलाउद्दीनशहाचा भाऊ महमद याचे बंड.

१४३६ अलाउद्दीन अहमद बहमनीचा कोकणवर कबजा.

१४३८ खानदेशच्या नसीरखानाची वऱ्हाडवर स्वारी आणि त्याचा दक्षिणेच्या फौजांकडून पराभव.

१४४१ पहिल्या आदिलखानाचा मृत्यू आणि मुबारकखान फारुकीचे राज्यारोहण.

१४४३–४४ विजयनगरच्या दुसऱ्या देवरायाचे दक्षिणेवर आक्रमण आणि त्याला घ्यावी लागलेली माघार.

१४४७ चाकण येथे दक्षिणी मुसलमानांची परदेशी मुसलमानांनी केलेली कत्तल आणि कोकणच्या स्वारीत परदेशी मुसलमानांचा झालेला पराभव.

१४५५ तेलंगणात जलालखान आणि सिकंदरखान यांचे बंड.

१४५६ माळव्याच्या पहिल्या महमूदचे दक्षिणेवर आक्रमण आणि माघार.

१४५७ खानदेशमध्ये मिरान मुबारकखान फारुकी याचा मृत्यू आणि दुसऱ्या आदिलखानाचे राज्यारोहण.

१४५८ अलाउद्दीन अहमदचा मृत्यू आणि हुमायून बहमनीचे राज्यारोहण. जलालखान आणि सिकंदरखान यांच्या बंडाचा मोड.

१४६१ हुमायून बहमनीचा मृत्यू आणि निजामशहा बहमनीचे राज्यारोहण.

१४६२ माळव्याच्या पहिल्या महमूदची दक्षिणेवर स्वारी आणि दक्षिणेच्या निजामशहाच्या मदतीसाठी गुजरातच्या महमूद बेगाडाचे आगमन.

१४६३ माळव्याच्या पहिल्या महमूदचे पुन्हा दक्षिणेवर आक्रमण परन्तु गुजरातच्या महमूद बेगाडाने त्याला घ्यावयास लावलेली माघार.

१४६३ निजामशहा बहमनीचा मृत्यू आणि तिसरा महमद याचे राज्यारोहण.

१४६६ ख्वाजा जहान तुर्क याचा खून.

१४६६ महमूद गावानची मुख्य वजीर म्हणून नेमणूक.

१४६७–७१ महमदशहाचे वर्चस्व पुन्हा स्थापन करण्यासाठी महमूद गावानची कोकणात चाल.

१४७० मलिक हसनची ओरिसावर स्वारी आणि राजमहेन्द्रीचा पाडाव.

१४७१ गोवा बहमनींच्या राज्यात सामील.

१४७२ कोकणांत बहमनींचे वर्चस्व स्थापन केल्यानंतर महमूद गावानचे बिदर येथे आगमन.

१४७३ बेळगांव काबीज आणि परकेताची पदच्युति.

१४८१ महमूद गावानचा खून.

१४८२ तिसऱ्या महमदशहाचा मृत्यू आणि महमूद बहमनीचे राज्यारोहण.

१४९० अहमदनगरचा अहमद निजाम–उल्–मुल्क, विजापूरचा युसूफ आदिलखान आणि वऱ्हाडचा फतेउल्ला इमाद–उल्–मुल्क यांची स्वातंत्र्याची घोषणा.

१४९१ कोकणांत बहादूर गिलानीचे बंड.

१४९४ अहमदनगर शहराची स्थापना.

१४९५ दस्तुर दिनारचा युसूफ आदिल, कुतुब-उल्-मुल्क, कदमखान आणि जहांगीरखान यांजकडून पराभव.

१४९९ मलिक अहमदकडून अंतूरच्या किल्ल्याचा पाडाव आणि बागलाण आणि गाळणा येथील राजांचा पराभव.

१५०३ खानदेशमध्ये दुसऱ्या आदिलखानाचा मृत्यू आणि दाउदखानाचे राज्यारोहण.

१५०४ युसुफ आदिलशहाचा विजापूरमध्ये शिया पंथ स्थापण्याचा प्रयत्न आणि राज्यातून त्याची झालेली हकालपट्टी.

१५०७ खानदेशच्या सिंहासनाबाबत गुजरात आणि अहमदनगर यांच्यामध्ये युद्ध.

१५०८ खानदेशमध्ये दाउदचा मृत्यू आणि गजनीखानाचे राज्यारोहण. गजनीखानाचा मृत्यू आणि गुजरातच्या महमूद बेगाडाकडून तिसऱ्या आदिलखानाची राज्यावर स्थापना.

१५०९ अहमदनगरमध्ये अहमद निजामशहाचा मृत्यू आणि त्याचा मुलगा पहिला बुरहाण निजामशहा याचे राज्यारोहण.

१५१० फतेउल्ला इमाद–उल्–मुल्क याचा मृत्यू.

१५१० युसुफ आदिलशहा याचा मृत्यू आणि त्याचा मुलगा इस्माईल आदिलशहा याचे विजापूर येथे राज्यारोहण.

१५१२ तेलंगणामध्ये सुलतान कुली कुतुब–उल्–मुल्क याची स्वातंत्र्याची घोषणा.

१५१३ इस्माईल आदिलशहाकडून शियापंथाची पुन्हा स्थापना.

१५१८ बिदर येथे महमूदशहा याचा मृत्यू आणि अहमदशहा बहमनी याचे राज्यारोहण.

१५१८ पहिल्या बुरहाण निजामशहाची वऱ्हाडवर स्वारी आणि त्याने केलेला पाथरीचा पाडाव.

१५२० शहा ताहीर याचे हिंदुस्तानमध्ये आगमन.

१५२० खानदेशमध्ये आदिलखानाचा मृत्यू आणि मिरान महमद याचे राज्यारोहण.

१५२१ अहमदचा मृत्यू आणि अलाउद्दीनशहा बहमनी याचे राज्यारोहण.

१५२५ अमीर अली बरीद, महमूदशहा बहमनी, पहिला बुरहाण निजामशहा आणि सुलतान कुली कुतुबशहा यांचे विजापूरवर आक्रमण.
इस्माईल आदिलशहाकडून त्यांचा पराभव.

१५२५ वलीउल्ला याची पदच्युति आणि कलीम उल्ला याचे राज्यारोहण.

१५२७ अलाउद्दीन इमादशहाकडून पाथरीचा पाडाव.

१५२७ पहिला बुरहाण निजामशहा आणि अली बरीदशहा यांचे वऱ्हाडवर आक्रमण आणि तेथून अलाउद्दीन इमादशहाची हकालपट्टी. इमादशहाकडून गुजरातच्या बहादूरकडे मदतीची याचना.

१५२८ गुजरातच्या बहादूरशहाची दक्षिणेवर स्वारी.

१५२९ अलाउद्दीन इमादशहाचा मृत्यू आणि दर्या इमादशहाचे राज्यारोहण.

१५३१ खानदेशच्या महमदशहाच्या मदतीने गुजरातच्या बहादूरशहाने मंडूचा केलेला पाडाव. बहादूरशहाकडून माळव्याचे राज्य खालसा.

१५३२ बुरहाण निजामशहा आणि इस्माईल आदिलशहा यांनी दक्षिणदेश परस्परांमध्ये वाटून घेण्याचा रचलेला कट.

१५३४ इस्माईलचा मृत्यू आणि मल्लू आदिलशहाचे राज्यारोहण.

१५३५ खानदेशमध्ये मिरान महमद याचा मृत्यू आणि मिरान मुबारक याचे राज्यारोहण.

१५४० बुरहाण निजामशहा आणि अमीर अली बरीद यांचे विजापूरवर आक्रमण.

१५४२ बिदर येथे अमीर अली बरीद याचा मृत्यू आणि अली बरीद शहा याचे राज्यारोहण.

१५४३ सुलतान कुली याचा खून आणि जमशीद कुतुब शहा याचे गोवळकोंडा येथे राज्यारोहण.

१५४३ जमशीद, बुरहाण निजामशहा, अली बरीदशहा आणि विजयनगरचा राजा यांचे विजापूरवर आक्रमण. त्यांचा झालेला पराभव.

१५४६ पहिल्या बुरहाण निजामशहाची विजापूरवर स्वारी. त्याचा झालेला पराभव.

१५४६–४७ शहा ताहीर याचा मृत्यू.

१५५२ पहिला बुरहाण निजामशहा आणि विजयनगरचा सदाशिवराय यांच्या मधील मैत्रीचा तह. अहमद नगर आणि विजापूर यांच्यामधील युद्ध.

## लेखकाचे निवेदन

### प्रास्ताविक

मध्ययुगीन महाराष्ट्राच्या इतिहासावर जी काही अस्सल फारशी साधने उपलब्ध आहेत त्यामध्ये आपल्याला **"गुल्शने इब्राहिमी"** चा फरिश्त्याच्या पुस्तकाचा उल्लेख करावा लागेल. फरिश्त्याच्या या पुस्तकात हिंदुस्थानात होऊन गेलेल्या सर्व मुसल्मानी राजवटींचा इतिहास दिलेला आहे. मूळ पुस्तक एकंदर ४ भागात प्रसिद्ध झालेले असून या पुस्तकाचा संपूर्ण अनुवाद मेजर ब्रिग्ज यांनी जवळजवळ १२५ वर्षांपूर्वी केलेला आहे. फरिश्त्याचा समकालीन सय्यद अली तबातबा याच्या आणि त्याचप्रमाणे रफिउद्दीन शिराजी याच्या अनुक्रमे **"बूरहाने मासिर"** व **"तजकरत उल्मुलुक"** या ग्रन्थांचाही उल्लेख मध्ययुगीन महाराष्ट्राच्या इतिहासाची अव्वल साधने म्हणून केला जाणे अवश्य आहे. वरील दोन्ही ग्रंथांची भाषांतरे इंग्रजीमधे उपलब्ध आहेत. या ग्रंथांचा उल्लेख करण्याचे कारण म्हणजे फरिश्त्याचा अनुवाद करताना या दोन्ही ग्रंथांचा उल्लेख जरुर त्या ठिकाणी केलेला आहे.

या पुस्तकात फरिश्त्याच्या चारही खंडांचा अनुवाद करण्यात आलेला नसून आजच्या महाराष्ट्राच्या इतिहासाशी मध्ययुगीन कालखंडात ज्या राजवटींचा संबंध येतो तेवढ्यापुरताच हा अनुवाद मर्यादित आहे. या राजवटी एकंदर सात आहेत. त्या म्हणजे (१) बहमनी घराणे (२) खानदेशचे फारुकी घराणे (३) अहमदनगरची निजामशाही (४) विजापूरची आदिलशाही (५) गोवळकोंड्याची कुतुबशाही (६) बिदरची बरीदशाही आणि (७) वऱ्हाडची इमादशाही. त्याशिवाय गुजराथचे सुलतान, मोगल आणि इतर राजवटी यांचा अनुषंगाने जेवढा उल्लेख येतो तेवढ्यापुरताच त्या त्या घटनांचा अनुवाद दिला आहे.

### मध्ययुगीन कालखंडाचे महत्त्व

महाराष्ट्राच्या इतिहासात मध्ययुगीन कालखंडाला अतिशय महत्त्व आहे. देवगिरीच्या यादवांच्या साम्राज्याचा नाश झाल्यापासून म्हणजे साधारण १३१८ पासून मध्ययुगीन कालखंडाला सुरवात झाली असे आपण गृहीत धरले तर साधारण १६८७ पर्यंत म्हणजे औरंगजेबाने विजापूर आणि गोवळकोंडा ही राज्ये जिंकीपर्यंतचा काळ असे मध्ययुगीन कालखंडाचे वर्णन करावे लागेल.

## बहमनींचा उदय

देवगिरीच्या यादवांचा नाश झाल्यावर महाराष्ट्रात काही काळ खिलजी घराणे आणि त्यानंतर तुघलक घराणे यांची अधिसत्ता होती. ही अधिसत्ता १३४७ पर्यंत टिकली. महाराष्ट्राच्या इतिहासाच्या दृष्टीने दिल्लीच्या या दोन राजवटींचा विचार करावयाचा झाल्यास या दोन्ही राजवटी लोकाभिमुख होत्या असे म्हणता येणार नाही. त्यांचा संबंध केवळ आपल्या सुभेदारांतर्फे जुलुम–जबरदस्तीचे राज्य करण्यापुरताच राहिला. या राजवटींमुळे महाराष्ट्रातील सर्वसामान्य जनतेचा फायदा होण्याऐवजी नुकसानच झाले असे म्हणावे लागेल. इ. स. १३४७ मध्ये दक्षिणेतील अमिरांनी बंड करून आपल्यामधील्च एका सरदाराला (हसन गंगू) राज्यपद दिले. हे वर्ष दक्षिणेच्या इतिहासांत महत्त्वाचे आहे. याचे कारण यावर्षी दक्षिणेत एका स्वतंत्र राज्याची स्थापना झाली. याचा अर्थ असा नव्हे की हे राज्य लोकांचे होते. येथील बहुसंख्य लोक हिंदूधर्माचे होते आणि आता जे राज्य निर्माण झाले होते त्याचे राज्यकर्ते मुसल्मान होते. हे नवीन झालेले बहमनी राज्य आणि त्या राज्याचे प्रजाजन यांच्यामधील संबंधाची चर्चा पुढे येईलच. या ठिकाणी एवढेच नमुद करणे जरूर आहे की, बहमनींच्या कालखंडात मुसलमानी आणि हिंदू संस्कृतींचा मिलाफ झाला असा जो दावा काही इतिहासकार मांडतात त्याला प्रत्यक्षांत काहीही पुरावा नाही. बहमनींचे राज्य १३४७ पासून खऱ्या अर्थाने १४८२ पर्यंत टिकले. जवळजवळ सर्व दक्षिण देश बहमनींच्या अंमलाखाली होता. आजच्या महाराष्ट्राचाही त्यामध्ये अर्थात समावेश होता. कोणत्याही राज्याची प्रगती ही त्या राज्यात जर स्थैर्य आणि शांतता असेल तरच होऊ शकते. बहमनींच्या जवळजवळ १५० वर्षांच्या कालखंडात असे स्थैर्य त्यांना कधीच लाभले नाही. कोणताही बहमनी सुलतान रक्तपात न होता अधिकारावर आला नाही. वारसा हक्काचे युद्ध हा जणु काही बहमनी घराण्याला शापच होता. बहमनींच्या राज्यात झालेल्या युद्धांची मोजदाद करावयाची झाल्यास त्यांची मर्यादा हाताच्या बोटावर मोजण्यापलीकडे निश्चितच होती. याचा अर्थ असा नव्हे की लष्करीदृष्ट्या बहमनींचे राज्य समर्थ होते. महमूद गावानचा कालखंड सोडल्यास बहमनींचे लष्करी सामर्थ्य कमकुवतच होते असे म्हणावे लागेल. किंबहुना बहमनींच्या कारकीर्दीत दोनतीन वेळा असा प्रसंग आला होता की, बहमनी सुलतानांना त्यांची राजधानी सोडून पळ काढावा लागला होता आणि शत्रूपासून बचाव करण्यासाठी दुसऱ्या राज्याकडे मदतीची याचना करावी लागली होती.

## परदेशी आणि दक्षिणी वाद

मध्ययुगीन महाराष्ट्र आणि बहमनी घराणे यांचा आणखी काही दृष्टिकोनातून विचार करणे जरूर आहे. राजकीय आणि लष्करीदृष्ट्या बहमनींचा काळ हा जरी अशांततेचा आणि अस्थैर्याचा ठरला तरी बहमनींच्या काळात दक्षिण हिंदुस्थानचा

परकीय देशांबरोबर जो संबंध आला त्यामुळे बहमनींच्या कालखंडाला फार मोठे महत्त्व प्राप्त झाले आहे. या कालखंडात परदेशी मुसलमानांची विशेषतः इराक, इराण, तुर्कस्तान येथील रहिवाशांची फार मोठ्या प्रमाणावर आवकजावक सुरू झाली. बहमनींचे बहुसंख्य वजीर आणि सेनापती हे परदेशी मुसलमान होते. या परिस्थितीतून आपल्याला दोन अर्थ काढता येतात. एक म्हणजे स्थानिक प्रजेने बहमनींना कोणतेही सहकार्य देण्याचे नाकारले, आणि म्हणून त्यांना परदेशी मुसलमानांच्या सहकार्यावर अवलंबून राहावे लागले. दुसरा अर्थ म्हणजे बहमनी सुलतान स्थानिक अधिकाऱ्यांबद्दल नेहमीच साशंक राहिले, आणि त्यामुळे त्यांनी स्थानिक अधिकाऱ्यांकडे पूर्णपणे दुर्लक्ष करून परदेशी मुसलमानांच्या भरतीवरच आपले लक्ष केंद्रित केले. हिंदू आणि मुसलमान यांच्यामधे असलेल्या असहकार्याचे हे बीज तत्कालीन परिस्थितीत मूळ धरून राहिले आणि २०० वर्षांनंतर महाराष्ट्रात स्थापन झालेल्या स्वराज्याच्या राजकारणात दृढमूल झाले. बहमनींच्या नाशानंतर दक्षिणेत ज्या पाच शाह्या निर्माण झाल्या त्यांच्या कारकिर्दीत हिंदू आणि मुसलमान यांच्यामधील विद्वेषाने अधिकच क्रूर स्वरूप धारण केले. त्याची परिणती दक्षिणेतल्या एकुलत्या एक परंतु वैभवसंपन्न अशा विजयनगरच्या हिंदू साम्राज्याच्या नाशात झाली. गोवळकोंडा, विजापूर आणि अहमदनगर या परस्परांशी सातत्याने भांडणाऱ्या तीन शाह्यांच्या सुलतानांनीं हिरिरीनें एकत्र येऊन विजयनगरच्या हिंदू साम्राज्याचा नाश करण्याचा चंग बांधला. याचाच अर्थ असा की, हिंदूंचे सहकार्य तत्कालीन राज्यकर्त्यांना नको होते इतकेच नव्हे तर हिंदूंच्या वैभवाची वाढती कमानदेखील त्यांना सहन होत नव्हती. वरील दृष्टिकोन हा सापेक्ष आहे असा आरोप केला जाण्याची शक्यता आहे. थोडयाफार अंशी हे जरी खरे असले तरी त्या काळातील हिंदू व मुसलमान यांच्यामधील संबंधाची चर्चा करतांना वरील दृष्टिकोन जरी सापेक्ष असला तरी पूर्णपणे वस्तुस्थितीनिरपेक्ष होता असे म्हणता येणार नाही. वरील दृष्टिकोन म्हणजे ह्या वादाला चालना देण्याचा प्रयत्न नसून तत्कालीन परिस्थितीचे अतिशय साकल्याने आणि बुद्धिनिष्ठेने केलेले विवेचन आहे. याचे कारण असे की, बहमनी राज्यकर्ते किंवा बहमनी राज्याची शकले झाल्यानंतर निर्माण झालेल्या शाह्यांचे सुल्तान यांनी राज्य करताना जो विशिष्ट दृष्टिकोन घेतला त्याचे सर्व दक्षिण हिंदुस्थानच्या आणि विशेषतः महाराष्ट्राच्या इतिहासावर अतिशय दूरगामी असे परिणाम झाले. त्याची चर्चा अनुषंगाने पुढे येईलच. बहमनींचे स्वकीयांकडे उपेक्षेने पहण्याचे धोरण आणि परदेशी मुसलमानांवर त्यांनी टाकलेला विश्वास आणि भिस्त यामुळे देखील बहमनींचे अंतर्गत राजकारण आणि राजकीय स्थैर्य यांच्यावर दूरगामी परिणाम झाले. मध्ययुगीन कालखंडात दक्षिणी आणि परदेशी हा कलहाचा एक नवीन पायंडा पडला. जितके नुकसान मध्ययुगीन महाराष्ट्राचे मुसलमान राज्यकर्ते आणि त्यांची स्थानिक प्रजा यांच्या

असहकार्याने झाले तितकेच किंबहुना पुढे अधिकच दक्षिणी–परदेशी वादामुळे झाले असे विधान केल्यास त्यात काहीही अतिशयोक्ती होणार नाही. बहमनींच्या काळात आणि त्यानंतर निर्माण झालेल्या शाह्यांच्या काळात परदेशी आणि दक्षिणी मुसलमान यांच्या मधील संघर्षामुळे अनेक वेळा कधी परदेशी तर कधी दक्षिणी मुसलमानांची अतिशय भयानक अशी कत्तल झाल्याचे आपल्याला आढळून येते. किंबहुना अशाच एका वादानें बहमनींचे साम्राज्य ऊर्जितावस्थेला आणणारा महमूद गावान याचा बळी पडला. मध्ययुगीन महाराष्ट्रातल्या मुसलमांनातील आपापसातल्या या संघर्षाकडे बघितले की पुष्कळदा असा विचार मनात येतो की, बहमनी सुलतान किंवा पुढे झालेल्या शाह्यांचे सुलतान यांच्यामधे थोडी जरी दूरदृष्टी, विवेक आणि सारासार बुध्दी असती तर दक्षिणेतल्या राजकारणाचा आणि तेथील परिस्थितीचा जो विचका उडाला तो सहज टाळता आला असता.

## १४ वे आणि १७ वे शतक यांमधील साम्य

दक्षिण हिंदुस्थानात मुसलमानी आक्रमण होण्याच्या अगोदर जी परिस्थिति होती तिची आणि मोगलांचे दक्षिणेवर आक्रमण होण्याचे अगोदर असलेली परिस्थिति ह्या दोन्हींची पुष्कळदा तुलना करावीशी वाटते. इ. स. १२९४ मधे अलाउद्दीन खिल्जीची दक्षिणेवर स्वारी झाली त्या वेळी दक्षिणेस देवगिरीचे यादव यांचे प्रबल साम्राज्य असून वरंगळचे काकतीय राजे आणि इतर अनेक लहानमोठी राज्ये दक्षिणेत सामावलेली होती. मुसलमानांची जी स्वारी झाली त्या स्वारीमधे भवितव्यात जो धोका अभिप्रेत होता त्याची जाणीव दक्षिणेमधील एकाही हिंदू राज्यकर्त्याला झाली नाही. आपल्या शेजारचे राज्य मुसलमानांनी घेतले पण आपले राज्य बचावले ह्या जाणीवेतच प्रत्येक हिंदूराजानें समाधान मानले. हाच धोका आपल्यावरही येणार आहे याची खंत वा क्षिती त्यांनी बाळगली नाही. पाठीमागील जवळजवळ २ हजार वर्षांचा काळ या राज्यांनी आपापसामधील कलहात घालविला होता. ह्या कालावधीत अनेक राजघराणी उदयास आली आणि अनेक राजघराण्यांचा क्षय झाला. तरीदेखील राजकीय स्थैर्य आणि सामाजिक शांतता ही पाहिजे असल्यास सर्वांचा ग्रास घेणारा शत्रू समोर उभा ठाकल्यानंतर आपापसातील मतभेद विसरून त्या शत्रूचा संहार एकत्र येऊन करणे हे चाणाक्यनीतीचे सूत्र तत्कालीन राज्यकर्त्यांना कसे उमजू शकले नाही याचेच आश्चर्य वाटते. मुसलमानांचा दक्षिणेत प्रथम प्रवेश झाल्यानंतर देवगिरीच्या यादवांबरोबर त्यांचा जो संघर्ष झाला त्या वेळी यादवांच्या मदतीला जर दक्षिण हिंदुस्थानामधील सर्व हिंदू राजे गेले असते तर मुसलमानांचा पराजय होऊन त्यांच्या पुढील संभाव्य आक्रमणाचा धोका टळला असता, इतकेच नव्हे तर मराठ्यांचे राज्य अस्तित्वात येईपर्यंतच्या पुढील ३५० वर्षांच्या काळात दक्षिणेची जी प्रचंड हानी झाली तीही टळली असती. परंतु तत्कालीन जे हिंदू राज्यकर्ते होते, त्यांना

या गोष्टीची जाणीव होऊ शकली नाही किंवा ही जाणीव होऊनदेखील काळाची पावले ओळखून त्याप्रमाणे वागणे त्यांना जमले नाही. यामुळे याचा परिणाम असा झाला की, देवगिरीचे मोठे हिंदू राज्य तर नाश पावलेच परंतु त्यानंतर दक्षिण हिंदुस्थानातील हिंदू राज्यांवर मुसलमानानी जे आक्रमण केले त्यामध्ये त्यांना मदत देण्याची व मार्गदर्शन करण्याची नामुष्कीची पाळी देवगिरीच्या हिंदू राजांवर आली. वर उल्लेख केल्याप्रमाणे उत्तरेच्या सुलतानांची सत्ता दक्षिणेत कधीच स्थिरावू शकली नाही.

## विजयनगरचा यक्षप्रश्न

१३४७ मध्ये दक्षिणेतील सरदारांनी बंड करून दिल्लीच्या सुलतानांची सत्ता नाकाम केली. या घटनेबरोबर आणखी एका महत्वाच्या गोष्टीचा याठिकाणी उल्लेख करणे आवश्यक आहे. ही गोष्ट म्हणजे विजयनगरच्या हिंदू राज्याची स्थापना आणि **बहमनी** बरोबरच त्या राज्याचे वाढत गेलेले सामर्थ्य व वैभव ही होय. या गोष्टीचा पुन्हा उल्लेख करण्याचे कारण असे की, विजयनगरचा १५६५ च्या तालिकोटच्या लढाईत मुसलमानांनी जो नाश केला त्याला कारण विजयनगरची राजनीती आणि तत्कालीन हिंदू राजांची उपेक्षा थोड्या–बहुत अंशी कारणीभूत ठरली. बहमनींच्या काळांत बहमनी सुलतानांचे आणि विजयनगरच्या सम्राटांचे अनेक वेळा संघर्षाचे प्रसंग आले. या संघर्षाचे मुसलमानी इतिहासकारांनी केलेले वर्णन हे अतिशयोक्तिपूर्ण आणि अतिशय भरमसाट असे आहे. बहमनींच्या वेळोवेळी विजयनगरवर झालेल्या स्वाऱ्यांत ठार मारल्या गेलेल्या हिंदू सैनिकांची फारशी इतिहासकारांनी दिलेल्या संख्येप्रमाणे गणती केली तर विजयनगरच्या राज्यात एक देखील हिंदू शिल्लक राहिला असता किंवा नाही याची शंका आहे. बहमनींचे राज्य हे मूलतः कमकुवत होते. गुजरात, माळवा आदि राज्यांच्या सुल्तानांकडून त्यांना अनेकदा पराभव पत्करावा लागला होता, आणि एका शत्रूपासून संरक्षण व बचाव करण्यासाठी त्यांना दुसऱ्या शत्रूची मदत घ्यावी लागली होती. अशा परिस्थितीत बहमनींनी विजयनगरचा मोड करण्यात पूर्णपणे यश मिळविले असे म्हणणे धाष्टर्याचे ठरेल. बहमनींच्या प्रतिकाराला तोंड देतांना विजयनगरने जर समकालीन हिंदू राजांबरोबर करार करून संरक्षणाची जर एक मजबूत फळी उभारली असती तर त्यांना बहमनींचा पराजय करता आला असता, इतकेच नव्हे तर बहमनींच्या मुलखात घुसून त्यांच्या चढाईखोर वृत्तीचा कायमचा बंदोबस्तही करता आला असता. अशा परिस्थितीत पंधराव्या शतकाच्या मध्याला जी परिस्थिती विजयनगर आणि हिंदू राजे यांच्या वृत्तीमुळे निर्माण झाली होती तिची तुलना मुसलमानांचे जे प्रथम आक्रमण दक्षिणेवर झाले त्या वेळी देवगिरीचे यादव आणि तत्कालीन राजे यांच्या वृत्तीमुळे निर्माण झालेल्या परिस्थितीशी केल्यास त्यामध्ये काहीही चूक होणार नाही.

## विजयनगर आणि पाच शाह्या

बहमनी राज्य विलयास गेल्यानंतर विजयनगरमध्ये अनेक वेळा सत्तापालट झाला.

त्यामुळे विजयनगरचे सामर्थ्य कोणत्याही प्रकारे कमी झाले असे मात्र म्हणता येणार नाही. परंतु विजयनगरच्या राजांनी दक्षिणेमध्ये नव्याने अस्तित्वात आलेल्या शाह्यांबरोबर जे धोरण ठेवले ते शहाणपणाचे होते किंवा नाही याबाबद मतभेदाला जागा आहे. विजयनगरच्या राजांना एक पूर्णपणे अलिप्ततावाद तरी स्वीकारता आला असता किंवा दक्षिणेमध्ये नव्याने निर्माण झालेल्या पाचही शाह्यांची एकजूट होण्याच्या अगोदर त्यांचा एकापाठोपाठ एक असा समूळ नाश तरी करता आला असता. विजयनगरचे सामर्थ्य तेवढे निश्चित होते यात काहीच शंका नाही. मुसलमानांनी दक्षिणेवर प्रथम आक्रमण केले त्या वेळी तेथील हिंदू राजांची युती होऊ न देता त्यांनी ज्याप्रमाणे वेळोवेळी निरनिराळ्या राज्यांवर स्वारी करून त्यांना नेस्तनाबूद केले तसेच चढाईचे धोरण स्वीकारून विजयनगरला दक्षिणेतील सर्व शाह्यांचा पूर्णपणे निःपात करता आला असता. परंतु विजयनगरचे धोरण तालिकोटच्या लढाईपर्यंत धरसोडीचे आणि गुंतागुंतीचे होते. दक्षिणेतील शाह्यांत आपापसांमध्ये जी भांडणे चालली होती त्यामधे हस्तक्षेप करण्याचे विजयनगरला काहीच कारण नव्हते. परस्परांमध्ये लढून या शाह्यांची शक्ती खच्ची झाली असती आणि विजयनगरचा कार्यभाग हा आपोआपच साध्य झाला असता. दक्षिणेमधील या शाह्यांच्या संघर्षात विजयनगरने नेहमीच विजापूरची बाजू का घ्यावी याचा उलगडा होत नाही. शाह्यांमध्ये चाललेल्या या संघर्षात अमूक एकाची बाजू रास्त होती असे आपल्याला म्हणता येणार नाही. याचा विचार पुढे होईलच. विजापूरला अहमदनगरच्या पाडावासाठी नेहमीच विजयनगरचे साहाय्य घ्यावे लागले. अनेक वेळा या आक्रमणामुळे अहमदनगरचा मुलूख उजाड झाला. अहमदनगरच्या सुलतानांच्या मनात विजयनगरबद्दल द्वेष आणि तेढ निर्माण झाली. कदाचित विजापूरच्या सुलतानांच्याही मनाला विजयनगरचे साहाय्य घेतल्याची खंत वाटली असावी. दक्षिणेमधील पाचही शाह्यांत ज्यांच्यामुळे इतिहास घडत होता त्या म्हणजे दोनच : एक अहमदनगरची निजामशाही व दोन विजापूरची आदिलशाही. अहमदनगरला शह म्हणून विजयनगरचे सामर्थ्यशाली अस्तित्व आवश्यक आहे याची विजापूरला जाणीव होती. अहमदनगरचे एकाकी सामर्थ्य विजयनगरचा पाडाव करण्यास अपुरे होते. अशा परिस्थितीत दक्षिणेतील शाह्यांना एकत्र आणून विजयनगरची वाढती सत्ता खच्ची करण्याचा एकच मार्ग अहमदनगरच्या सुलतानांना आढळला, आणि तो म्हणजे धर्माच्या आवाहनाखाली दक्षिणेतील शाह्यांना एकत्र आणणे हा होय. अहमदनगरच्या हुसेन निजामशहाने ते केले. वऱ्हाडशिवाय इतर सर्व शाह्या या धर्मयुद्धासाठी एकत्र झाल्या. तालिकोटच्या लढाईत विजयनगरच्या दुबळ्या लष्करी डावपेचामुळे मुसलमानांच्या एकजूटीला विजय मिळाला आणि अलाउद्दीन खिलजीच्या देवगिरीवरील मोहिमेनंतर जसे यादवांचे साम्राज्य धुळीला मिळाले त्याप्रमाणे विजयनगरचे साम्राज्य धुळीला मिळून त्यांचे वैभव विलयाला गेले. दक्षिणेच्या राजकीय पटलावर यानंतर विजयनगरला एकाद्या

हुकमी मोहऱ्याचे स्थान न राहता एका दुय्यम अशा प्याद्याचे स्थान प्राप्त झाले.

## विजापूर आणि अहमदनगर

विजयनगरच्या संदर्भात दक्षिणेतील पाच शाह्या आणि त्यांचे परस्परांबरोबरील संबंध आणि त्याचप्रमाणे त्यांचे आणि इतर शाह्यांचे संबंध कसे होते याविषयी थोडीफार चर्चा होणे आवश्यक आहे. विजापूर आणि अहमदनगर यांच्यामधील संबंध अहमदनगरच्या पडत्या काळातील शेवटची काही वर्षे सोडून दिल्यास कधीच मित्रत्वाचे नव्हते. जरी १४९० मध्ये युसुफ आदिलशाहा, मलिकअहमद निजामशाहा, आणि फतेउल्ला इमादउल्मुल्क यांनी एकाच वेळी स्वातंत्र्याची जाहीर घोषणा केली, तरी आपला हितचिंतक महमूद गावान याचा खून घडवून आणण्यात मलिकअहमदचा बाप मलिकहसन यांचा हात होता, ही गोष्ट युसुफ आदिलशाहा कधीच विसरला नाही. बहमनींच्या विसर्जनानंतर निर्माण झालेल्या पाच शाह्यांमध्ये विजापूर आणि अहमदनगर या शाह्याच प्रमुख होत्या. दोन्ही राज्यांतील प्रत्येक सुलतानाच्या कारकिर्दीत अहमदनगर आणि विजापूर यांच्यात संघर्ष झाला नाही असे एक वर्षही गेले नाही असे म्हटल्यास चालेल. सुरुवातीला युसुफ आदिलशहाने शिया धर्माचा स्विकार केला म्हणून मलिकअहमद निजामशहाने त्याच्याविरुद्ध बिदर, आणि गोवळकोंडा यांच्या बरोबर एकजूट करून युसुफ आदिलशहावर आपले राज्य सोडून जाण्याची पाळी आणली. बुरहाण निजामशहाच्या कारकिर्दीमध्ये पाथरीच्या प्रश्नावरून जेव्हा वऱ्हाड आणि अहमदनगर यांच्यामध्ये वैमनस्य उद्भवले, तेव्हा विजापूरने वऱ्हाडची बाजू घेऊन अहमदनगर बरोबर असलेले आपले वैर जगजाहीर केले. यानंतर दोहोमध्ये सोलापूरच्या प्रश्नावरून वैमनस्य उद्भवले आणि जवळ–जवळ पंधरावे शतक संपेतोपर्यंत हे वैर चालू राहिले. मूर्तजा निजामशहाच्या कारकिर्दीत आदिलशहाने वऱ्हाडच्या प्रश्नावरून अहमदनगरबरोबर तात्पुरती का होईना मैत्री केली. या मैत्रीचा उद्देश पूर्णपणे मतलबी होता. अहमदनगरने वऱ्हाड जिंकून घ्यावे आणि त्याबदली दक्षिणेकडील तितकाच मुलूख विजापूरने जिंकून घ्यावा, या अटीवर ही मैत्री आधारलेली होती. यापूर्वी तालिकोटच्या लढाईत या दोन्ही शाह्या एकत्र आल्या त्यादेखील स्वार्थापोटीच. याला उत्कृष्ट पुरावा म्हणजे तालिकोटच्या लढाईत विजयनगरच्या रामराजाचे प्राण हुसेन निजामशहाच्या हातून वाचविण्याचा प्रयत्न आदिलशहाने केला. युद्ध संपल्यानंतर तावडतोब अहमदनगर आणि विजापूर यांच्यामध्ये युद्धाला तोंड लागले. वऱ्हाडवरील स्वारीच्या वेळीदेखील असेच झाले. वऱ्हाडच्या तुफालखानाने आदिलशहाला द्रव्य आणि नजराणा यांची लालूच दाखविताच त्याने वऱ्हाडातून काढता पाय घेतला. दोन्ही राज्यांतील वैमनस्य इतक्या पराकोटीला पोहोचले होते की, अहमदनगरचा नाश करावा म्हणून अनेक वेळा विजापूरच्या आदिलशहांनी विजयनगरच्या हिंदू सम्राटांची मदत घेतली. मूर्तजा निजामशहाच्या कारकिर्दीनंतर गादीवर आलेले

सुलतान हे अल्पवयी, अपेशी आणि नालायक असल्यामुळे तेथील राजकारणाचा अतिशय बोजवारा उडाला. साहजिकच विजापूरच्या आदिलशहांना अहमदनगरच्या राजकारणात हस्तक्षेप करावयाची वारंवार संधी मिळाली. इब्राहीम निजामशहाच्या कारकिर्दीत परस्पर राज्यामधील विद्वेषाने इतके उग्र स्वरूप धारण केले की, दोन्ही राज्यात झालेल्या एका लढाईत इब्राहीम निजामशहा हा ठार झाला. दोन्ही राज्यां-मध्ये विवाहाच्या नात्याने अतिशय घनिष्ठ असे संबंध जोडले गेले असताना त्यांच्यामध्ये इतके वितुष्ट का यावे याचा सहजासहजी उलगडा होत नाही. आपापसात न लढता आणि विस्तारवादाच्या धोरणाचा अंगीकार न करता दोन्ही राज्ये जर का गुण्यागोविंदाने नांदली असती तर ती बलहीन आणि खिळखिळी न होता मोगलांच्या आक्रमणाला अतिशय सावधपणे आणि समर्थपणे तोंड देऊ शकली असती. दोन्ही राज्यांच्या स्थापनेनंतरच्या जवळ-जवळ पाऊणशे वर्षांच्या काळात दक्षिणेचे विभाजन अहमदनगर आणि विजापूर यांनी कसे करावे याबाबत दोन्ही राज्यांच्या सुलतानांच्या अनेक वेळा गाठी-भेटी झाल्या. या गाठीभेटीमधून केव्हाही कसलीच निष्पत्ती होऊ शकली नाही. त्यावरून वाटाघाटींचे राजकीय दृष्ट्या स्वरूप कसे पोकळ होते याची कल्पना येते. या वाटाघाटीपाठीमागे निव्वळ संधिसाधूपणा होता आणि दूरदर्शीपणाचा अभाव होता असे जर म्हटले तर त्यात काहीच चूक नाही. या वाटाघाटीमध्ये ठरलेल्या गोष्टींपैकी एकही प्रत्यक्षात आणण्याचे धाडस आणि सामर्थ्य या राजवटीतील एकाही सुलतानाने दाखविले नाही. साहजिकच मनात असा विचार येतो की, हे धाडस जर त्यांनी दाखविले असते तर दक्षिणेचा सारा नकाशाच बदलून गेला असता. इतकेच नव्हे तर दक्षिणेवर जेव्हा मोगलांची स्वारी झाली तेव्हा अतिशय खंबीरपणे लढून दोन्ही राज्यांनी मोगलांचा ओघ सुरवातीलाच थोपवून धरला असता. मोगल आक्रमणाला एकवटून तोंड द्यावे ही जाणीव या दोन्ही राज्यांच्या राजकर्त्यांना झाली, पण ती फार उशिरा. दोन्ही शाह्यांनी एकत्र होऊन मोगलांना प्रतिकार केला पण हा प्रतिकार समर्थांचा प्रतिकार नसून दुर्बलांचा प्रतिकार होता. मोगलांनी या प्रतिकारावर सहजासहजी मात केली. पहिल्या प्रथम त्यांनी वऱ्हाड ताब्यात घेतला. मोगलांबरोबर लढण्यात अहमद-नगरची शक्ती खिळखिळी झालेली होती. त्यामध्येच दरबारातील दुहीची भर पडली. परिणामी विजापूरकरांनी पाठविलेल्या मदतीचा कसलाही उपयोग झाला नाही. इ. सन १६०० मध्ये अहमदनगरचा पाडाव झाला आणि त्याबरोबरच अहमदनगरचे राज्य नामशेष झाल्यासारखे झाले.

## अहमदनगर आणि वऱ्हाड व विजापूर आणि वऱ्हाड

अहमदनगर आणि वऱ्हाड आणि त्याचप्रमाणे विजापूर आणि वऱ्हाड यामधील संबंधाचे स्वरूप पूर्णपणे वेगळे होते. तिन्ही राज्यांची स्थापना ही एकाच वेळी झाली

आणि तिन्ही सुलतानांत वऱ्हाडचा फतेउल्ला इमादुल्मुक हा वयाने, ज्ञानाने आणि कर्तृत्वाने अहमदनगर आणि विजापूर या राज्यांच्या सुलतानापेक्षा श्रेष्ठ होता यात काहीच संशय नाही. वऱ्हाड आणि विजापूर यांचे संबंध फत्तेउल्लाच्या हयातीपर्यंत अतिशय सलोख्याचे होते. परंतु या सलोख्याला पुढे अर्थात राजकारणाचे स्वरूप आले. कदाचित असे होण्याला कारण वऱ्हाडचे कमी होत गेलेले सामर्थ्य आणि वऱ्हाडच्या सुल्तानांची अकार्यक्षमताही कारणीभूत झाली असावी. तरीदेखील सोळाव्या शतकाच्या पहिल्या तीन–चार दशकांत अहमदनगरने जेव्हा–जेव्हा वऱ्हाडवर स्वारी केली तेव्हा–तेव्हा विजापूरच्या आदिलशहानी वऱ्हाडला मदत दिली. याच्या अगदी उलट असे स्वरूप अहमदनगर आणि वऱ्हाड याच्यामधील संबंधाचे होते. अहमदनगरच्या सुलतानांनी वऱ्हाडच्या सुलतानांकडे समानतेच्या भूमिकेवरून कधीच पाहिले नाही. फत्तेउल्ला इमादउल्मुल्क याचा मृत्यू झाल्यानंतर पाथरीच्या प्रश्नावरून दोन्ही राज्यांमध्ये अनेक वेळा लढाया झाल्या. या सर्व संघर्षांत जेव्हा–जेव्हा वऱ्हाडच्या इमादशहांना विजापूर अथवा गुजराथचे सुलतान यांची मदत मिळाली नाही तेव्हा–तेव्हा अहमदनगरचाच वरचष्मा राहिला. विजापूर आणि अहमदनगर यांच्यामध्ये अनेक वेळा लढाया झाल्या. या बहुतेक सर्व संघर्षांत अहमदनगरच्या पदरी जयाचे माप फारच थोड्या वेळा पडले. वऱ्हाड आणि अहमदनगर यांच्यामधील संघर्ष पाथरी हे ठिकाण अहमदनगरच्या ताब्यात आल्यावर संपला नाही. वर सांगितल्याप्रमाणे विजापूरच्या दृष्टीने वऱ्हाडची किंमत शून्य झाली आणि विजापूरने वऱ्हाडचे उदक अहमदनगरच्या सुलतानांच्या हातावर सोडले असे म्हणण्यास काहीच हरकत नाही. प्रत्यक्षात मात्र दोन्ही राज्यांतील संबंध उघड–उघड वितुष्टाचे असे कधीच झाले नाहीत. परंतु मूर्तजा निजामशहाने वऱ्हाड आपल्या राज्यात सामील करून घेण्यासाठी जेव्हा वऱ्हाडवर स्वारी केली तेव्हा विजापूरने अहमदनगरच्या या स्वारीत संपूर्ण सहकार्य दिले. अर्थात ज्या वेळी वऱ्हाड जिंकल्याने अहमदनगरचे सामर्थ्य वाढते अशी जाणीव झाली त्या वेळी विजापूरकरांनी वऱ्हाडातून काढता पाय घेतला. अहमदनगरच्या नंतर झालेल्या वऱ्हाडवरील आक्रमणाकडे आणि वऱ्हाडच्या झालेल्या पाडावाकडे विजापूरकरांनी पूर्णपणे दुर्लक्ष केले. विजापूरकरांचे हे धोरण म्हणजे तत्त्वच्युतीचे एक उत्कृष्ट उदाहरण आहे असे म्हणणेच योग्य ठरेल. या उलट अहमदनगरचे धोरण मात्र वऱ्हाडबाबत अतिशय उघड असे होते. अहमदनगरचा पवित्रा पहिल्यापासूनच आक्रमक असा होता. राज्यवृद्धी या दृष्टिकोनातून अहमदनगरने वऱ्हाडवर केलेले आक्रमण हे कदाचित दावगे वाटणार नाही. परंतु न्यायाच्या दृष्टीने पाहता हे आक्रमण निश्चितच निंद्य ठरेल. कारण समर्थांची आक्रमणशक्ती त्यांच्यासारखा तुल्यबल शत्रू भेटल्यावर बोथट ठरते. परंतु आपल्यापेक्षा दुर्बलावर आक्रमण करावयाचे झाल्यास समर्थांच्या या वृत्तीला दुहेरी धार चढते. याचाच

प्रत्यय आपल्याला वऱ्हाड आणि अहमदनगर यांच्या संबंधातून येतो. अहमदनगरला वऱ्हाडबद्दल वाटणारा हा विद्वेष अतिशय पराकोटीला गेलेला होता याचाच सडेतोड पुरावा म्हणजे वऱ्हाडमध्ये मूर्तजा निजामशहाने तुफालखानाचा पराभव केल्यानंतर वऱ्हाडच्या राजवंशातील एकही व्यक्ती जिवंत न ठेवण्याचा मूर्तजा निजामशहाने केलेला आटापिटा हा होय.

## पाच शाह्यांतील गोवळकोंडा आणि बिदर यांचे स्थान

बहमनीचे राज्य संपुष्टात आल्यानंतर निर्माण झालेल्या पाच राज्यांमध्ये बिदर आणि गोवळकोंडा या राज्यांच्या सुलतानांनी दक्षिणेतील राजकारणात ज्या तऱ्हेने भाग घेतला तो अतिशय विचित्र, आगळा, कधीकधी अतिशय निंद्य आणि पुष्कळदा नाट्यपूर्ण असा होता. बिदर आणि गोवळकोंडा या राज्यांच्या सुलतानांची अहमदनगर आणि विजापूर या राज्यांच्या सुलतानांबरोबर मैत्री होती असे आपल्याला कधीच म्हणता येणार नाही; वेळप्रसंगानुसार त्यांच्यामधील संबंध हे मित्रत्वाचे अगर शत्रुत्वाचे राहिले. बिदरच्या सुलतानांची बहमनी सुलतानांबरोबर झालेली वागणूकही अतिशय निंद्य अशी होती. महमूद गावानच्या खुनानंतर गादीवर आलेल्या सुलतानांची बूज अहमदनगर आणि विजापूर या राज्यांच्या सुलतानांनी न ठेवल्यामुळे बिदर राज्याचा संस्थापक कासीम बरीद आणि त्याचे वंशज यांचे चांगलेच फावले. त्यांनी मन मानेल तसा राज्यकारभार केला आणि नामधारी सुलतानांना विजापूर आणि अहमदनगर या राज्यांच्या सुलतानांना गैरवाजवी पत्रे लिहिण्यास भाग पाडून कधी विजापूर तर कधी अहमदनगर यांचा रोष ओढवून घेतला. या दोन राज्यांबरोबर बिदरच्या सुलतानांचे जे संघर्षाचे प्रसंग ओढविले त्यामध्ये अहमदनगर आणि विजापूर यांनी नेहमीच परस्पर विरोधी भूमिका स्वीकारल्या. या संघर्षात बिदरच्या सुलतानांवर बहुतेक वेळा पराभव होऊन त्यांच्यावर नामुष्कीची पाळी ओढवली. बिदरचे महत्व हे कासीम बरीद होता तोपर्यंत टिकले. त्याच्या वारसांनी नामधारी बहमनी सुलतानांची जवळ जवळ ससेहोलपट केली असे म्हटल्यास त्यात काहीच वावगे होणार नाही. दारू आणि स्त्रिया यांच्या नादात गुरफटून गेल्याने बिदरचे सुलतान अकार्यक्षम आणि कर्तृत्वहीन बनले. अहमदनगर आणि विजापूर येथील सुलतानांच्या दृष्टीने त्यांची किंमत शून्य होती. विजापूरशी झालेल्या एका संघर्षानंतर आदिलशहाने बिदरच्या अमीरअली बरीदला साखळदंडांनी बांधून तासनतास सूर्यप्रकाशात उभे करून त्याची धिंड काढली. इतकेच नव्हे तर दारूच्या धुंदीत आणि इमादशहाच्या समक्ष बरीदशहाचा उल्लेख 'कुत्रा' असा करून त्याची घोर अवहेलना केली. एकाच वेळी निर्माण झालेल्या शाह्यांचे सुलतान आपापसामध्ये वागताना किती नीच पातळीला जात असत याचे हे उत्कृष्ट उदाहरण आहे. या प्रसंगापासून बिदरची सद्दी संपली. ते जवळ जवळ विजापूरचे मांडलिक बनले. दक्षिणेच्या राजकारणात त्यांनी

घेतलेला भाग हा विजापूरकरांच्या मर्जीवर अवलंबून राहू लागला. दक्षिणेच्या राजकारणात मोगलांचे आगमन झाल्यानंतर जी काही उलथापालथ झाली त्यामध्ये बिदरच्या बरीदशहाचा नामनिर्देशही झाल्याचे आपल्याला आढळून येत नाही. १७व्या शतकाच्या सुरवातीला विजापूराने बिदरचे राज्य खालसा करून त्या राज्याचे स्वतंत्र अस्तित्व संपुष्टात आणले. गोवळकोंड्याच्या कुतुबशाही सुलतानांची स्थिती इतकी हलाखीची आणि दैन्यावस्थेची होती असे मात्र म्हणता येणार नाही. गोवळकोंड्याचा संस्थापक सुलतान कुली कुतुबशहा हा स्वतः समर्थ होता, आणि त्याने आपल्या सामर्थ्याच्या जोरावर गोवळकोंड्याच्या राज्याची वृद्धी घडवून आणली. त्याच्या हयातीपर्यंत गोवळकोंड्याचे राजकरण निश्चित असे होते आणि गोवळकोंड्याच्या अहमदनगर आणि विजापूर या राज्यांबरोबरील संबंधाला काहीतरी अर्थ होता. त्याच्या मृत्यूनंतर मात्र गोवळकोंड्याच्या या दोन्ही राज्यांबरोबरील संबंधांना अनिश्चित असे स्वरूप प्राप्त झाले. लोकसंख्या, आकार, वैभव आणि संपन्नता या दृष्टीने विचार केल्यास गोवळकोंडा राज्याची अहमदनगर आणि विजापूर यांच्या बरोबर तुलना करता आली असती इतकेच नव्हे तर या सर्व बाबतीत गोवळकोंड्याचे राज्य कदाचित या दोन्ही राज्यांपेक्षा वरचढ आणि श्रेष्ठ ठरले असते. कुली कुतुबशहाच्या मृत्यूनंतर गोवळकोंड्याच्या सुलतानांची वागणूक ही न समजण्यासारखी व न पटण्यासारखी वाटते. स्वतःच्या सामर्थ्याची जाणीव गोवळकोंड्याच्या सुलतानांना कधीच झाली नाही. साहजिकच अहमदनगर आणि विजापूर या राज्यांबरोबर त्यांनी संबंधाची जी परंपरा निर्माण केली ती समानतेच्या भूमिकेवरून कधीच केली नाही. विजापूर आणि अहमदनगर यांच्यामध्ये संघर्षाचे जे अनेक प्रसंग निर्माण झाले त्यामध्ये गोवळकोंड्याचे सुलतान हे कळत – न कळत ओढले गेले. गोवळकोंड्याच्या सुलतानांना सत्तेच्या समतोलाच्या तत्त्वाने पछाडले असावे असा भास त्यांच्या एकंदर राजकारणाचा अभ्यास केल्यावर मनात निर्माण होतो. अहमदनगरच्या बाजूने विजापूरकरांशी लढताना अगर विजापूरकरांच्या बाजूने अहमदनगरकरांशी लढताना दोहोपैकी एखाद्याचे पारडे जड होईल अशी भिती गोवळकोंड्याच्या सुलतानांना वाटल्यास ते बिनदिक्कत त्या पक्षाचा त्याग करून रणांगण सोडून जाण्यास मागेपुढे पाहात नसत. परिणामी अनेक वेळा विजापूर आणि अहमदनगर या राज्यांच्या सुलतानांकडून त्यांना जबरदस्त शासन करण्यात येत असे. त्यांचे हे दुटप्पी धोरण अहमदनगरवर मोगलांची स्वारी होईतोपर्यंत कायम टिकले. या दरम्यानच्या काळात अहमदनगर किंवा विजापूर येथील सुलतानांच्या तोडीसतोड असा सुलतान गोवळकोंड्यामध्ये निर्माण झाला नाही. अहमदनगरच्या मोगलांबरोबर झालेल्या संघर्षात विजापूरने जितक्या हिरिरीने भाग घेतला तितक्या हिरिरीने भाग गोवळकोंड्याच्या कुतुबशहांनी घेतला नाही ही विशेष नमूद करण्यासारखी गोष्ट आहे.

### अहमदनगर आणि गुजरात

हे झाले दक्षिणेतील पाच शाह्यांच्या आपापसातील संबंधाचे स्वरूप. या बरोबरच तत्कालीन अस्तित्वात असलेल्या गुजरात आणि खानदेश या मुसल्मानी राजवटी आणि विजयनगरचे हिंदू राज्य यांच्याबरोबर असलेल्या पाच शाह्यांच्या संबंधाचे स्वरूप कसे काय होते याबाबतचे थोडेसे समीक्षण उद्बोधक ठरेल. बहमनींच्या विसर्जनानंतर निर्माण झालेल्या पाच शाह्यांपैकी अहमदनगरचे गुजरात आणि खानदेश यांच्याबरोबर इतर शाह्यांपेक्षा अधिक संबंध आले. हे संबंध मित्रत्वाच्या नात्याचे नसून शत्रुत्वाचे होते असे त्यांचे वर्णन अधिक सयुक्तिक ठरेल. या संबंधांची चर्चा करताना विशेषतः गुजरात आणि अहमदनगर यांच्यामधील संबंधांचा शंभर दीडशे वर्षापूर्वीचा काळ साहजिकच डोळ्यापुढे येतो. बहमनी राज्याच्या स्थापनेनंतर गुजरातचे सुलतान आणि बहमनी यांचे संबंध शत्रुत्वाचे होते. एकदा तर वेळ अशी आली होती की, गुजरातच्या फौजांनी माहिमपर्यंत येऊन बहमनीच्या फौजांचा पराभव केला होता. कालांतराने ही परिस्थिती पालटली. गुजरात आणि बहमनी यांच्यामधील संबंधांना मित्रत्वाचे स्वरूप आले. इतकेच नव्हे तर गुजरातचे सुलतान बहमनींचे हितकर्ते ठरले. याचे प्रत्यंतर माळव्याच्या सुलतानांनी बहमनींवर स्वारी करून जेव्हा त्यांच्या राजधानीपर्यंत मजल मारली तेव्हा गुजरातचा सुलतान बहमनींच्या संरक्षणासाठी धावून आला, आणि त्याने बहमनींच्या राज्यावरील संकट टाळले त्यावेळी आले. महमूद गावानच्या मृत्यूपर्यंत हे संबंध मैत्रीचे राहिले. त्यानंतर बहमनींचे अस्तित्व जवळजवळ संपुष्टात आले आणि त्यामुळे गुजरातच्या सुल्तानांचा दृष्टिकोन बदलला आणि त्यांचे धोरण शत्रुत्वाचे झाले. बहादूर गिलानीच्या बंडाबाबत गुजरातच्या सुलतानांनी बहमनींना धारेवर धरले ही गोष्ट या बदलत्या धोरणाची साक्ष देते. कदाचित अहमदनगरचे राज्य भौगोलिक दृष्ट्या गुजरातच्या राज्याला अधिक जवळचे असल्यामुळे बहमनींबरोबरील शत्रुत्वाचा वारसा गुजरातच्या सुलतानांनी अहमदनगर बरोबरील संबंधात पुढे चालू ठेवला. गुजरातच्या सुलतानांनी अहमदनगरच्या सुलतानांना कधीच मानले नाही. इतकेच नव्हे तर अहमदनगरच्या सामर्थ्याची त्यांना कधीच भिती वाटली नाही. अहमदनगरच्या बाबतीत बोलायचे म्हटले तर अहमदनगरच्या सुलतानांचे धोरण गुजरातच्याबाबतीत पडखाऊपणाचे होते. याचा एकच दाखला पुरेसा आहे. गुजरातच्या बहादूर शहाने माळव्यावर स्वारी करून तेथे आपले प्रस्थान बसविले तेव्हा बुरहाण निजामशहाला गुजरातच्या सुलतानाच्या आपण बरोबरीचे आहोत हे जाहीर करण्याची इच्छा झाली. त्याने गुजरातच्या सुलतानाची भेट घेण्यासाठी जीवाचा एकच आटापिटा केला. आपला सल्लागार शहाताहीर याला त्याने बहादूर शहाकडे भेटीची विनंती करण्यासाठी रवाना केले. बहादूर शहाने बुरहाण निजामशहाला मानतेच्या भूमिकेवरुन मानण्याचे नाकारले. अशाही परिस्थितीत बुरहाण निजाम-

शहाने बहादूरशहाची भेट घेतली. बुरहाण निजामशहाचा अपमान होऊ नये म्हणून शहाताहीरने एक युक्ती केली. ती म्हणजे बुरहाण निजामशहा बहादूरशहाचे पुढे जाण्याचे अगोदर तो कुराणाची एक प्रत घेऊन दरबारात शिरला. ते पाहताच बहादूर शहा सिंहासनावरून खाली उतरला. शहाताहीर याने बहादूरशहा हा बुरहाण निजामशहाला सामोरा गेला अशी बुरहाण निजामशहाची खोटी समजूत करून दिली. बुरहाण निजामशहाने ते खरे मानले. सत्याचा हा केवढा विपर्यास आणि मनाची केवढी ही वंचना! बुरहाण निजामशहाच्या व्यक्तिमत्त्वाने यावेळी इतकी खोल पातळी गाठली होती की, बहादूरशहाकडून शहा ही पदवी घेण्यात त्याला कोणताच अपमान वाटला नाही. वरील प्रसंगातून अहमदनगर आणि गुजरात यांच्यामधील संबंधाचे खरे स्वरूप आपल्याला दिसून येते. गुजरातच्या सुलतानाच्या वर्तनात जेत्याचा उद्दामपणा होता. तर अहमदनगर सुलतानात दुर्बलाचा पडखाऊपणा होता. अहमदनगर आणि गुजरात यांच्यामधील शत्रुत्वाची ही परंपरा पुढेही टिकली.

## अहमदनगर आणि खानदेश

वऱ्हाड आणि खानदेश यांचे अहमदनगरबरोबर वैर होते या गोष्टीचा उल्लेख पूर्वी आलेला आहेच. वऱ्हाड आणि खानदेश या राज्यांच्या सुलतानांची अहमदनगर बरोबर एकेकट्याने किंवा एकत्र होऊन सामना देण्याइतकी ताकद नव्हती. वऱ्हाडबरोबर जसे अहमदनगरचे अनेक वेळा संघर्षाचे प्रसंग आले त्याचप्रमाणे खानदेशाचेही आले. त्याला कारणे खानदेशच्या वारसाबाबत अहमदनगरने केलेला हस्तक्षेप अथवा पुढे अहमदनगरच्या वऱ्हाड प्रांतात खानदेशच्या सुलतानांनी केलेली ढवळाढवळही होती. परंतु प्रत्येकवेळी खानदेशच्या सुलतानांना समोरासमोरच्या लढाईत अहमदनगरसमोर माघार घ्यावी लागली. एकदा तर असा प्रसंग आला की, अहमदनगरच्या सुलतानांनी खानदेशची राजधानी बुऱ्हाणपूरपर्यंत मजल मारून खानदेशच्या सुलतानांची ससेहोलपट केली. खानदेशच्या सुलतानांवर अशा तऱ्हेचा प्रसंग जेव्हा ओढवे,तेव्हा त्यांना गुजरातच्या सुलतानाकडे धाव घेणे भाग पडे. साहजिकच पुष्कळ वेळा आपल्याला अहमदनगरविरूद्ध गुजरात, खानदेश आणि वऱ्हाड किंवा गुजरात आणि खानदेश यांची युती झालेली दिसून येते. जेव्हा जेव्हा अहमदनगर आणि खानदेश यांच्या कलहात गुजरातने हस्तक्षेप केला तेव्हा तेव्हा अहमदनगरला नामुष्कीची माघार घ्यावी लागली. एकदा तर अशी वेळ आली की, गुजरातचे सैन्य वऱ्हाड आणि खानदेश आपल्या ताब्यात घेऊन न थांबता अहमदनगरच्या प्रदेशात ठाण देऊन बसले. परंतु पावसाळा ऐन मोक्यावर आल्याने आणि दक्षिणेमधील सुलतान आपल्याविरुद्ध एकी करतील या भितीने गुजरातच्या सुलतानांनी अहमदनगर आणि वऱ्हाड येथून मघार घेतली. मोगलांनी गुजरात घेतल्यावर अहमदनगर आणि गुजरात यांच्यामधील वैराची समाप्ती झाली. खानदेश अणि

अहमदनगर यांच्यामधील वैरभावाने कांही कालावधी सोडून दिल्यास गुजरातच्या पाडावा-नंतरच्या काळात अतिशय परीसीमा गाठली. खानदेशचा सुलतान राजा अलीखान याच्या कारकिर्दीत खानदेशावर मोगलांचा दबाव आला. राजा अलीखानाने काळाची पावले ओळखली आणि अकबराचे मांडलिकत्व पत्करले. नाइलाजाने का होईना मोगलांच्या अहमदनगरवरील स्वारीत राजा अलीखानाला भाग घ्यावा लागला. या स्वारीत एका लढाईच्या प्रसंगी राजा अलीखानाला मृत्यू यावा ही घटना दैवगती किती विचित्र असते हेच दाखवीत नाही का?

## विजयनगर आणि अहमदनगर

दक्षिणेतील शाह्या आणि विजयनगरचे हिंदू राज्य यांच्यामधील संबंधाचा उल्लेख यापूर्वी तालिकोटच्या लढाईच्या संदर्भात थोड्याफार अंशाने येऊन गेलेला आहेच. विजयनगरबरोबर सर्वांत अधिक संबंध आला तो तालिकोटच्या लढाईच्या अगोदर अहमदनगर आणि विजापूर यांचा. तालिकोटच्या लढाईत बिदर आणि गोवळकोंडा यांचा संबध आला तो केवळ लाक्षणिक अर्थाने. वऱ्हाडने या लढाईत भाग घेण्याचे नाकारले ते अहमदनगर बरोबरील शत्रुत्वाने. विजापूरचे तालिकोटच्या लढाईचा प्रसंग सोडून दिल्यास विजयनगरबरोबरील संबंध हे मैत्रीचे होते. अहमदनगरच्या तथाकथित वाढत्या सामर्थ्याच्या विरुद्ध विजापूरला विजयनगरबद्दल नेहमीच दिलासा वाटे. तालिकोटच्या लढाईच्या अगोदर दोन–तीन वेळा तरी असे प्रसंग आले की, विजयनगर आणि विजापूर यांच्या संयुक्त फौजांनी अहमदनगरपर्यंत धडक मारली. या संघर्षात गोवळकोंड्याच्या सुलतानांची भूमिका निव्वळ धरसोडीची होती. अहमद-नगरचे विजयनगरबरोबरील संबंध शत्रुत्वाचे आणि द्वेषमूलक होते. या संबंधांना अहमदनगरच्या हुसेन निजामशहाने वैयक्तिक स्वरूप दिले. विजापूर आणि विजयनगर यांच्या अहमदनगरबरोबर झालेल्या एका संघर्षात अहमदनगरचा पाडाव झाला. यानंतरच्या झालेल्या वाटाघाटीत हुसेन निजामशहा आणि विजयनगरचा रामराजा यांची गाठभेट झाली. या प्रसंगी रामराजाने आदरातिथ्याचा एक प्रकार म्हणून हुसेन निजामशहाला एक विडा आणि पान दिले. ते घेताना रामराजाच्या हाताचा स्पर्श हुसेननिजामशहाच्या हाताला झाला. एखाद्या अपवित्र आणि अमंगल वस्तूचा स्पर्श आपल्याला झाला आहे असे भासवून हुसेन निजामशहाने आपले हात धुण्यासाठी पानदान मागविले. याचा रामराजाला साहजिकच अपमान वाटला. त्याने असे उद्गार काढले की हुसेन निजामशहा हा जर माझा पाहुणा नसता तर त्याची मी गर्दनच उडविली असती. ही घटना रामराजा विसरला परंतु हुसेन निजामशहा विसरला नाही. त्याने विजयनगरचा नाश करण्याचे आणि अनुषंगाने रामराजाचा काटा काढण्याचे ठरविले. आपल्या कट्टया शत्रूबरोबर म्हणजे विजापूरबरोबर त्याने मित्रत्वाचा तह केला आणि

वऱ्हाडखेरीज सोडून इतर चार शाह्यांची युती त्याने विजयनगरविरुद्ध घडवून आणली. विजयनगरच्या हिंदू राजाचे वाढते सामर्थ्य हे या युतीपाठीमागील जसे एक महत्वाचे कारण होते त्याप्रमाणे हुसेन निजामशहाला रामराजाबद्दलचा आपला वैयक्तिक सूडही उगवून घ्यावयाचा होता. तालिकोटच्या लढाईत रामराजाला पकडून आगल्या-नंतर हुसेन निजामशहाने रामराजाचा शिरच्छेद केला एवढेच नव्हे तर त्याचे पेंढा भरलेले मस्तक सैन्यामधून मिरविले. यावरून हुसेन निजमशहाच्या मनात ठाण मांडून बसलेल्या द्वेषाची कल्पना येते. तालिकोटच्या लढाईनंतर मुसलमानांची सैन्ये विजयनगरवर चाल करून गेली आणि ६ महिनेपर्यंत लुटालूट, जाळपोळ, अनन्वित अत्याचार आणि भीषण कत्तली यांचा एक इतिहासच विजयी झालेल्या मुसलमानी सुलतानांनी उभा केला. या सर्व घटनापाठीमागील प्रेरक शक्ती ही हुसेन निजामशहाची होती, याबाबत दुमत असण्याचे काहीच कारण नाही. या पराभवानंतर विजयनगरचा जो ऱ्हास झाला त्यातून विजयनगरने कधीच डोके वर काढले नाही. दक्षिणेतील हिंदू आणि मुसलमान राजांनी सामोपचाराचे धोरण स्विकारून गुण्यागोविंदाने राज्य केले असते तर १६ व्या शतकाच्या अखेरीला दक्षिणेवर आलेल्या मोगलांच्या संकटाला त्यांना अधिक निर्धारपूर्वक तोंड देता आले असते यात काहीच शंका नाही. कदाचित जेव्हा मोगलांच्या पाशवी शक्तीपुढे अहमदनगर, विजापूर आणि गोवळकोंडा यांना माघार घ्यावी लागली तेव्हा हा विचार त्या राज्यांच्या सुलतानांच्या मनात निश्चितच आला असेल.

## मुसलमानी राजवटी आणि त्यांचे सुलतान

इतिहास हा जसा त्या त्या कालखंडात घडलेल्या घटनांनी बनविला जातो त्याचप्रमाणे इतिहासाच्या घडणीवर त्या त्या कालखंडात जे राजेरजवाडे होऊन गेलेले असतात त्यांच्या स्वभावाची आणि चारित्र्याची दाट छाया पडलेली असते. साहजिकच मध्ययुगीन महाराष्ट्राच्या इतिहासाचा मागोवा घेताना बहमनी राजवट आणि या राजवटीचे सुलतान, बहमनींच्या विघटनानंतर निर्माण झालेल्या पाच शाह्या आणि त्यांचे सुलतान आणि त्याचप्रमाणे तत्कालीन इतर राजवटी व त्यांचे सुलतान यांचा या अनुषंगाने थोडाफार विचार करणे हे क्रमप्राप्त ठरते. बहमनी आणि इतर सर्व शाह्या यांचा विचार करताना एक गोष्ट आपल्या नजरेत भरते ती अशी :

## वारसाहक्कांची युद्धे – एक स्थायीभाव

काही अपवाद सोडल्यास कोणताही सुलतान हा रक्तपाताशिवाय गादीवर आला नाही. दक्षिणेच्या राजकारणात ही गोष्ट नवी होती, आणि हा रक्तपाताचा वारसा दक्षिणेला दिल्लीच्या खिलजी आणि तुघलक घराण्यांकडून मिळाला. या गोष्टीला दोन कारणे संभवतात. एक म्हणजे राज्याच्या वारसाच्या मनात आपल्याला लवकरात लवकर

सिंहासन मिळावे ही इच्छा आणि त्यामुळे ते लवकर न मिळाल्यास त्यासाठी सिंहासनावर असलेल्या सुलतानाला ठार मारून ते मिळविण्याचा त्याचा प्रयत्न. दुसरे कारण म्हणजे सुलतानांना लाभलेले दीर्घायुष्य आणि त्यांनी आपल्या पाठीमागे ठेवलेले सिंहानाचे अनेक इच्छुक वारस. या वारसांनी स्वतःचा अधिकार सिंहासनावर सांगण्याच्या प्रयत्नांतून अनेक वेळा संघर्षाचे प्रसंग निर्माण होत. परिणामी बहमनी राज्याच्या स्थापनेपासून अहमदनगरच्या पाडावापर्यंतच्या २५० वर्षांच्या कालखंडात आपल्याला अनेक वेळा सिंहासनासाठी खून आणि रक्तपात झालेला दृष्टीस पडतो. याची अगदी ठळक उदाहरणे द्यावयाची झाल्यास पुढील देता येतील. पहिल्या महमदशहा बहमनीनंतर गादीवर आलेल्या मुजाहीदशहाचा खून झाला. त्याच्या पाठोपाठ आलेला दाऊदशहा हा देखील जेमतेम एकच वर्ष गादीवर टिकला. त्यानंतर १३९७ मध्ये गादीवर आलेल्या घियासुद्दीन बहमनीचा खून झाला. त्यांच्या पाठोपाठ गादीवर आलेल्या शम्सुद्दीन दाऊदचाही राज्याच्या अभिलाषेपायी खून झाला. त्यानंतर गादीवर आलेल्या फिरोजशहाने बराच काळपर्यंत राज्य केले. आपला मुलगा हसन याची त्याने वारस म्हणून नेमणूक केली. परंतु ही नेमणूक बाजूला सारून फिरोजशहाचा भाऊ अहमदशहा याने राज्य बळकाविले. महमुद गावानच्या मृत्यूनंतर बहमनींच्या विघटनातून निर्माण झालेल्या बरीदशाही राजकर्त्यांनी आपल्या राज्यलालसेपोटी बहमनी कुलातील अनेक राजपुरुषांचा बळी दिला. याची ठळक उदाहरणे म्हणजे अहमदशहा बहमनी चौथा, अलाउद्दीनशहा बहमनी, वलीउल्ला आणि कलीमुल्ला ही होत. या खुनांच्या सत्राचे दक्षिणेमधील राजकारणावर अतिशय दूरगामी असे परिणाम झाले. राज्यामधील पक्षोपपक्षांनी याचा फायदा घेऊन राज्यात अंदाधुंदी माजविली. विशेषतः दक्षिणी आणि परदेशी मुसलमान हा वाद यातूनच निर्माण झाला. किंबहुना बहमनी सुलतानांनी आपल्या स्वार्थासाठी या वादाला चालना दिली आणि त्यामुळे अनेक वेळा निरपराध लोकांच्या कत्तली घडून आल्या, आणि मोठमोठ्या मुत्सद्द्यांचे बळी पडले. चाकण येथे झालेली परदेशी मुसलमानांची कत्तल, ख्वाजा जहान तुर्क आणि महमूद गावान यांचे झालेले खून आणि पंधराव्या शतकाच्या अखेरीला बिदर येथे झालेल्या कत्तली ही वरील गोष्टींची ठळक उदाहरणे आहेत. वारसाहक्कासाठी ही जी युद्धे झाली त्याचे आणखी दोन परिणाम बहमनींच्या कालखंडात झाले. एक म्हणजे राज्यावर ज्यांना आपला अधिकार सांगता आला नाही अशा तथाकथित वारसांनी केलेली बंडे हा होय. अहमदशहा बहमनीने आपला भाऊ फिरोजशहा याच्या विरुद्ध बंड करूनच राज्य बळकाविले. अहमदशहाला आपला पुतण्या हसन याच्या बंडाचा बीमोड करूनच आपले राज्य टिकविणे भाग पडले. दुसऱ्या अलाउद्दीन महमदशहाच्या कारकिर्दीत राजपुत्र महमद याने बंडाचा झेंडा उभारला. वारंवार होणाऱ्या या बंडामुळे

बहमनींच्या राज्यावर परकीयांची आक्रमणे तर झालीच परंतु अंतर्गत सुव्यवस्था आणि शांतता यांनाही धोका निर्माण झाला. वारसाहक्कासाठी झालेल्या या रक्तपाताचा दुसरा परिणाम म्हणजे राज्यावर आलेला वारस हा थेट राजकुलातील (Direct Line) क्वचीच नसे. १५० वर्षांतील बहमनी राजवट जर तपासून बघितली तर कुलच्छेद होऊन गादीवर आलेल्या वारसांची अनेक उदाहरणे आपल्याला मिळतील. पहिला खंड पडला तो अलाउद्दीन मुजाहीदशहाच्या मृत्यूनंतर. दुसरा खंड पडला तो घियासुद्दीन आणि शम्सुद्दीन दाऊद यांच्या खुनानंतर. तिसरा खंड पडला तो फिरोजशहाच्या मृत्यूनंतर. कोणत्याही राजवटीच्या भरभराटीला आणि वैभवाला जर का थेट राजकुलातील वारस गादीवर आले तर अधिक तेज चढते. थेट राजवंशात नसलेला वारस हा उपरा ठरतो. सिंहासनाबद्दल जितके प्रेम त्याला वाटावयाला पाहिजे तितके त्याला वाटत नाही. राज्याची वृद्धी करण्याच्या ऐवजी आपली सत्ता कशी टिकविता येईल याकडेच त्याचे अधिक लक्ष राहाते. बहमनींच्या बाबतीत दिल्लीच्या सिंहासनासारखीच या गोष्टीची पुनरावृत्ती झाली. बहमनींचा कुलक्षय होण्याला ही गोष्ट कारणीभूत झाली असे विधान केल्यास त्यामध्ये काहीच वावगे ठरणार नाही. बहमनींची हीच परंपरा पुढे थोड्याफार अंशाने अहमदनगर, विजापूर आणि गोवळकोंडा या राज्यात चालू राहिली. अहमदनगरच्या राज्यात मूर्तजा निजामशहाच्या कारकिर्दीपर्यंत वारसासंबंधाने उघड–उघड युद्धे झाली नाहीत. परंतु बुरहाण निजामशहाचा गादीवरील हक्क बाजूला सारून त्याच्या राजाजी नावाच्या भावाला गादीवर आणण्याचा प्रयत्न दरबारातील काही मंडळींनी केला. विजापूरच्या सुलतानांनीही अहमदनगरच्या वारसाच्या बाबतीत ढवळाढवळ करण्याचे अनेक वेळा प्रयत्न केले. इतकेच नव्हे तर अधिकारावर असलेल्या सुलताना-विरुद्ध झगडणाऱ्या राजपुत्राला आपल्या दरबारात आसराही दिला. पुढे मूर्तजा निजामशहाला खुद्द त्याचा भाऊ बुरहाण निजामशहा याने आव्हान दिले. निजामशहाने या आव्हानाचा बीमोड करून आपल्या भावाला कैद केले. हाच बुरहाण कालांतराने दुसरा बुरहाण निजामशहा म्हणून गादीवर आला. अहमदनगरच्या वारसा हक्काच्या बाबतीत इतिहासातदेखील ज्याला तोड नाही अशी एक घटना मूर्तजा निजामशहाच्या कारकिर्दीत घडून आली. आपला मुलगा मिरानहुसेन हा आपल्या विरुद्ध कारस्थाने करीत आहे या संशयावरून मूर्तजा निजामशहाने त्याला जाळून ठार मारण्याचा अयशस्वी प्रयत्न केला. याचे प्रायश्चित्त लगोलग त्याला मिळाले. मिरान हुसेन याने आपल्या बापाचा त्याला खोलीत कोंडून जीव घेतला. यानंतर अहमदनगरच्या राजघराण्याला जणू काही वारसा हक्काच्या युद्धाचा शापच मिळाला. मिरानहुसेनची कारकिर्द फार काळ टिकली नाही. त्याचा खून झाला. त्याच्या चुलतभावाला गादीवर बसविण्यात आले. त्याचीही कारकीर्द फारच थोडा काळ टिकली. दुसरा बुरहाण

निजामशहा हा त्याचा बाप. त्याने अकबराची मदत घेऊन आपल्या मुलाविरुद्धच युद्ध पुकारले, आणि अहमदनगरची गादी बळकाविली. पाच–दहा वर्षांच्या कालावधीत घडलेल्या या विचित्र घटनांनी अहमदनगरचे सामर्थ्य खच्ची झाले, आणि मोगलांनी त्या राज्याचा स्वाहाकार केला. इतक्या प्रमाणात जरी नाही तरी थोड्याफार अंशी का होईना विजापूर आणि गोवळकोंडा या राज्यात वारसाहक्काबाबत संघर्ष घडून आले. युसुफ आदिलशहानंतर इस्माईल आदिलशहाला गादीवरून काढून दुसऱ्या राजपुत्राला गादीवर बसविण्याचा प्रयत्न कमालखान या सरदाराने केला. इस्माईल आदिलशहाच्या मृत्यूनंतर त्याचा थोरला मुलगा मल्लूखान याला गादीवर बसविण्यात आले. परंतु त्याचा खून होऊन त्याचा भाऊ इब्राहीम हा गादीवर आला. थेट राजकुलामध्ये विजापूरच्या आदिलशाही घराण्यात पडलेली ही पहिली मोड होती. अर्थात या घटनांनी विजापूरच्या राज्यात अहमदनगरइतके दुष्परिणाम झाले नाहीत याबद्दल शंकेला जागा नाही. अहमदनगर आणि विजापूर या राज्यांत एकापाठोपाठ एक तीन सुलतान त्या राज्यांच्या स्थापनेपासून सिंहासनावर आले परंतु या कालावधीत गोवळकोंड्याचा कुलीकुतुबशहा मात्र वयाच्या ९८ व्या वर्षी राज्य करीत होता. दीर्घायुष्य हे एक कधीकधी वरदान न ठरता शाप ठरते या गोष्टीची प्रचीती यावेळी आली. कुतुबशहाचा मुलगा जमशीद याची-ही वृद्धावस्था झालेली होती. आपण काहीही हालचाल न केल्यास आपल्याला राज्य मिळण्याची शक्यता कमी आहे याची जाणीव होऊन त्याने आपल्या बापाचा खून केला, आणि तो राज्यावर आला. जमशीदकुतुबशहालाही गादीवरून काढून त्याचा भाऊ हैदर याला गादीवर बसविण्याचे अयशस्वी प्रयत्न झाले. जमशीदने निर्माण केलेला वारसा त्याच्या मृत्यूनंतर पुढे चालू राहिला. त्याच्या मृत्यूनंतर त्याचा मुलगा सुभानकुली याला गादीवर बसविण्यात आले. परंतु थोड्याच अवधीत जमशीदचा भाऊ इब्राहीम याने आपल्या पुतण्याला पदच्युत करून गादी बळकाविली. बहमनी काय किंवा बहमनींच्या विघटनानंतर निर्माण झालेल्या पाच शाह्या काय, यांच्यामधील वारसाहक्काच्या या कलहामुळे झालेले घोर दुष्परिणाम इतिहासाला विदितच आहेत. या ठिकाणी मध्ययुगीन महाराष्ट्रातील मुसलमानी राजवटीतीलच केवळ या घटना सांगण्याचे कारण प्रस्तुत विषयाची व्याप्ती आणि मर्यादा हे होय. या संदर्भात एक गोष्ट नमूद करावीशी वाटते आणि ती ही की, बहमनी आणि त्यांच्या विघटनानंतर निर्माण झालेल्या पाच शाह्या यांना समकालीन असलेली ओरिसा, तेलंगण आणि विजयनगर ही हिंदू राज्येदेखील वारसा हक्काच्या युद्धाच्या या शापापासून मुक्त नव्हती. किंबहुना सामर्थ्याने अधिक असून देखील मुसलमानी राज्यांकडून त्यांचा पुष्कळ वेळा पराजय झाला याचे कारण वारसाहक्काच्या युद्धामुळे निर्माण झालेली राजकीय अशांतता आणि अनिश्चित परिस्थिती हे होते.

## सुलतानांची स्वभावचित्रे.

मध्ययुगीन हिंदुस्थानातील राजवटींविषयी चर्चा करताना त्या राज्यांचे सुलतान आणि त्यांची स्वभाववैशिष्ट्ये ही काही-काही बाबतीत अतिशय ठळकपणे नजरेसमोर उभी राहतात. बहमनी राज्याच्या स्थापनेपासून अहमदनगरच्या पाडावापर्यंतच्या २५० वर्षांच्या काळात मनुष्यस्वभावाचे अनेकविविध नमुने आपल्याला दिसून येतात. या नमुन्यात शौर्य, सहिष्णुता, क्रौर्य, मदांधता, स्त्रैणपणा वगैरे अनेक गुणावगुणांनी नटलेल्या सुलतानांची चरित्रे मध्ययुगीन कालखंडाच्या या इतिहासाने आपल्यासमोर उभी केली आहेत. त्यातील काही विशेष अशा स्वभावचित्रांचे समालोचन या ठिकाणी होणे जरूर वाटते.

## हुमायूनशहा बहमनी

बहमनींच्या काळात क्रूरपणाचा मूर्तिमंत पुतळा असे ज्याचे वर्णन करता येईल तो म्हणजे अलाउद्दीन हुमायूनशहा बहमनी हा होय. प्रत्यक्ष इतिहासकारांनीच त्याला जुल्मशहा ही पदवी त्याच्या क्रूरकृत्यामुळे बहाल केली. त्याची कारकीर्द जेमतेम तीन वर्षे झाली. परंतु या तीन वर्षांच्या कालावधीत त्याने माणुसकीला काळिमा आणणारी अनेक कृत्ये केली. त्याच्याविरुद्ध बंड करणाऱ्या त्याच्या हसन या धाकट्या भावाचा त्याने बिमोड केल्यानंतर आपल्या विरोधकांवर त्याने शस्त्र उगारले. शहरातील दोन हजार रक्षकांना त्याने ठार मारले, आणि शहराच्या कोतवालाला कैद करून प्रत्येक दिवशी त्याचा एकेक अवयव छाटण्याची त्याला शिक्षा दिली. राजपुत्र हसनविरुद्ध पाठविलेल्या सैन्याचा जेव्हा पहिल्याप्रथम पराजय झाला तेव्हा त्याने सैन्यातील अधिकाऱ्यांच्या बायका मुलांना पकडले आणि सैन्याने जय न मिळविल्यास त्या सर्वांना ठार मारण्याची धमकी दिली. परंतु त्याने अतिरेकीपणाची कमाल यानंतर केली. हसनचा पराभव झाल्यानंतर त्याला व त्याच्या अनुयायांना पकडून आणण्यात आले. हुमायूनने भर चौकात त्याला वाघाच्या तोंडी दिले. त्याच्या अनुयांयाची सर्वांसमक्ष कत्तल करण्यात आली. त्यांच्या स्त्रियांची भर चौकात विटंबना करण्यात आली. हुमायूनने शोधून काढलेल्या छळाच्या प्रकारात खंजिराने वारंवार भोसकणे, कुऱ्हाडीने तुकडे करणे, उकळते तेल किंवा पाणी अंगावर टाकून कातडी सोलणे हे अमानुष प्रकार होते. इतिहासामध्ये अशा तऱ्हेची उदाहरणे फारच क्वचित मिळतील. हुमायूनच्या या वागणुकीचे सर्वसामान्य प्रजाजनांवर आणि अमीरउमरावांवर झालेले परिणाम हे अतिशय दूरगामी होते. बहमनींच्या विघटनाला कारणीभूत झालेल्या अनेक गोष्टींमध्ये त्यांच्या सुल्तानांची बेताल आणि बेदरकार वागणूक कारणीभूत ठरली यात काहीच संशय नाही. या क्रूरपणाच्या जोडीला बहुतेक सर्व बहमनी सुलतानांनी मद्यपानाच्या दुर्गुणाची जोड दिली.

## शम्सुद्दीन बहमनी

या बाबतचे मोठे विदारक उदाहरण आपल्याला शम्सुद्दीन बहमनी तिसरा याच्या कारकिर्दीत दृष्टीस पडते. याच्या कारकिर्दीत बहमनींचे राज्य वैभवाच्या पराकोटीला पोहोचले होते. याला कारणीभूत बहमनींचा वजीर महमूद गावान हा होता. त्याचा उत्कर्ष त्याच्या बरोबरीच्या सरदार मंडळींना सहन झाला नाही आणि त्यांनी कपटाने त्याचा नाश करण्याचे ठरविले. एक खोटे पत्र त्यांनी महमूद गावानच्या नावे तयार करून सुलतान दारूच्या धुंदीत असताना ते त्याच्या पुढे ठेवले. दारूच्या नशेत आपण काय करीत आहोत याची जाणीव न राहून सुलतानाने महमूद गावानच्या खुनाची आज्ञा दिली. मदांध झालेल्या सुलतानाला महमूद गावानने दिलेला बचाव खोटा वाटला आणि सुलतानाच्या नजरेसमोर महमूद गावानचा शिरच्छेद करण्यात आला. दारूच्या नशेमुळे सुलतानाच्या क्रूर स्वभावाला एक तऱ्हेची वेगळीच धार चढली आणि त्यामुळे महमूद गावानचा हक-नाक बळी पडला. या घटनेचे इतिहासावर किती घोर परिणाम झाले हे सर्वश्रुत आहेच. बहमनींच्या पक्षपात्याला कदाचित बहमनींचा नाश झाल्याबद्दल वाईट वाटेल. परंतु उघड्या डोळ्यानी आपल्याला वैभवाच्या शिखरावर पोहोचविणाऱ्या आपल्या वजीराचा खून जे पाहू शकतात आणि सहन करू शकतात त्यांच्या राजवटींचा कुलक्षय होऊन ती राजवट मातीमोल झाली तर काळाने त्याला योग्य शासन दिले असेच म्हणावे लागेल. या क्रौर्याचा वारसा थोड्याफार प्रमाणात अहमदनगरच्या काही सुलतानांनी चालविला. विजापूर, गोवळकोंडा, बीदर, वऱ्हाड आणि खानदेश येथील सुलतान पुराव्याच्या अभावी या वर्गात बसत नाहीत असे विधान केल्यास ते चुकीचे ठरणार नाही. त्यांच्या हातून घडलेले प्रमाद हे वैयक्तिक स्वार्थ आणि मदांधता यांच्या पोटी नव्हते. त्यांच्या हातून झालेल्या कत्तली ह्या युद्धामुळे आणि प्रसंगोपात राजकीय जरुरीमुळे झालेल्या होत्या. अहमदनगरच्या मूर्तजा निजामशहाच्या बाबतीत मात्र तसे म्हणता येणार नाही.

## मूर्तजा निजामशहा

मूर्तजा निजामशहा हा क्रूर तर होताच. परंतु त्याच्या क्रूरपणात वेडेपणाची लहर होती. मूर्तजा निजामशहाच्या बाबतीत या बाबतचे एकच उदाहरण दिले तरी पुरेसे आहे. एकदा राजवाड्यातील सईस, डांग वगैरे खालच्या नोकरवर्गापैकी एक अनुचर जनानखान्यामधून बाहेर पडताना मूर्तजा निजामशहाने बघितला. त्याला काही वेगळाच संशय आला. त्याने वेडाच्या आणि रागाच्या लहरीत वरील प्रकारच्या सर्व अनुचरांची कत्तल करण्याचा हुकूम दिला. हुकमाबरोबर शेकडो सईस, डांग, दिवटे वगैरे अनुचरांची कत्तल करण्यात आली. आपला मुलगा मिरानहुसेन याच्याबाबत मूर्तजा निजामशहाची वागणूक कशी होती याचा उल्लेख वर आलेलाच आहे.

## दुसरा बुरहाण निजामशहा

जी गत मूर्तजा निजामशहाची तीच त्याचा भाऊ दुसरा बुरहाण निजामशहा याची. याला राज्य मिळाले ते त्याच्या वृद्धापकाळात. त्याच्या क्रूरवृत्तीने धारण केलेले रूप हे मात्र वेगळ्या प्रकारचे होते. दक्षिणी मुसलमानाविषयी द्वेष त्याच्या रोमारोमात भिनला होता. त्याच्या कारकिर्दीत चौलवर स्वारी करण्यात आली. स्वारीवर पाठविण्यात आलेले बहुतेक अधिकारी दक्षिणी मुसलमान होते. चौल येथील पोर्तुगीजांनी अहमदनगरच्या या स्वारीचा धुव्वा उडविला. इतकेच नव्हे तर दहा ते बारा हजार दक्षिणी मुसलमानांची कत्तल केली. बुरहाण निजामशहाला या गोष्टीचा अतिशय आनंद झाल्याचे फरिश्ता आणि सय्यदअली या इतिहासकारांनी नमूद केले आहे. बुरहाण निजामशहाने अहमदनगरमध्ये परदेशी मुसलमानांना भराभर बढत्या दिल्या. त्याने कोणत्याही प्रकारची मदत पराभूत झालेल्या सैन्याला न पाठविल्यामुळे निजामशाही सैन्याला मोठ्या नामुष्कीची माघार घ्यावी लागली. या वृत्तीचे परिणाम फारसे कांही चांगले झाले नाहीत. थोड्याच कालावधीत दुसऱ्या बुरहाण निजामशहाला मृत्यू आला. बहमनी सुलतान आणि बहमनींच्या विघटनानंतर निर्माण झालेल्या शाह्यांचे सुलतान यांच्याबाबतीत आणखी एका गोष्टीचा उल्लेख करणे क्रमप्राप्त वाटते. या सुलतानांच्या वर्तनातील क्रौर्य आणि मदांधता समजू शकतो. कदाचित काहींच्या बाबतीत विशिष्ट परिस्थितीमुळे त्यांना तसे वागावे लागले या भूमिकेतून त्याचे वर्तन क्षमेला पात्रही ठरेल. पण त्यांच्यापैकी बऱ्याच जणांच्या अंगी अनैसर्गिक वागणूक करण्याची जी वृत्ती दिसून येते ती निंद्य आणि गर्हणीय होती; इतकेच नव्हे तर त्या वागणुकीला मानवी शब्दकोशात क्षमा हा शब्द निश्चितच नाही. या अनैसर्गिक वर्तनाचा वारसा बहमनींनी दिल्लीच्या सुलतानांपासून घेतला असावा आणि त्यांनीच तो त्यांच्या वारसदार शाह्यांच्या सुलतानांना बहाल केला असावा. दिल्लीच्या सुलतानांचे आणि त्याचप्रमाणे बहमनी सुल्तानांचे त्यांच्या गुलामांबद्दल त्यांना वाटणारे प्रेम (?) हे सर्वश्रुतच आहे. या प्रेमाबद्दल उघडउघड असे त्यांच्या इतिहासकारांनी लिहिले नसले तरी त्यांनी ज्या हकीकती निवेदन केल्या आहेत त्यावरून हे प्रेम (?) सर्व सामान्य मानवी जीवनात बसणारे नसून अनैसर्गिक या सदरात मोडणारे होते याची इतिहासाच्या अभ्यासकाला सहज कल्पना येते. दिल्ली आणि बहमनी सुलतान यांच्या या अनैसर्गिक वागणुकीबद्दल लिहिताना तत्कालीन इतिहासकारांनी पुष्कळच संयम दाखविला. पण बहमनींच्या विभाजनानंतर निर्माण झालेल्या शाह्यांच्या सुलतानांबाबत लिहिताना मात्र त्यांनी लेखणीवरील हे तथाकथित निर्बंध पाळले नाहीत आणि अगदी प्रच्छन्न शब्दांत नोंद झालेल्या घटना कथन केल्या. या घटनांची काही उदाहरणे दिली तरी पुरेशी आहेत.

## अमीरअली बरीद.

अमीर अली बरीद या बीदरच्या सुलतानाच्या जनानखान्यात दोन अतिशय सुंदर गुलाम होते. फरिश्ता आणि सय्यदअली या मध्ययुगीन कालखंडाच्या इतिहासकारांनी अमीरअली आणि या दोन गुलामांच्या संबंधांचे रसभरित वर्णन केलेले आहे ते या ठिकाणी उद्धृत करणे औचित्याला धरून होणार नाही. अहमदनगरने जेव्हा बिदरवर हल्ला केला, तेव्हा अमीरअली बरीदने अली आदिलशहाकडे मदतीची याचना केली. अली आदिलशहाने मदत देण्याचे एका अटीवर मान्य केले आणि ही अट म्हणजे बरीदशहाने आपल्या ताब्यातील त्या दोन सुंदर गुलामांना अली आदिलशहाच्या स्वाधीन करावे. राज्य वाचविण्यासाठी बरीदशहाने ही विकारविलसित मागणी मान्य केली.

## अली आदिलशहा

युद्धानंतर अमीरअलीने वरील गुलामांची रवानगी आदिलशहाकडे केली. हा इतिहास वाचताना एका गोष्टीचे मोठे आश्चर्य वाटते आणि ती गोष्ट म्हणजे या गुलामांनादेखील आपल्या धन्याला म्हणजे बरीदशहाला सोडून जाण्याचे जिवावर आले ही होय. तरीदेखील त्यांच्या मर्जीविरुद्ध त्यांची आदिलशहाकडे पाठवणी करण्यात आली. सय्यद अली आणि फरिश्ता हे दोघेही असे सांगतात की, आदिलशहाच्या जनानखान्यात गेल्यावर आदिलशहाने या गुलामांबरोबर वेडेवाकडे आणि फाजिल वर्तन करण्यास सुरवात केली. आदिलशहाची लगट त्या गुलामांना आवडली नाही आणि त्यांच्यापैकी एकाने आदिलशहाच्या छातीत शस्त्र खुपसून त्याचा प्राण घेतला. जराजर्जर झालेल्या आणि जनान्यात स्त्रियांची वाण नसलेल्या एका सामर्थ्यशाली राज्याच्या सुलतानाचे हे लंपट वर्तन पाहिल्यानंतर त्याच्याबद्दल तिरस्कार वाटण्याऐवजी मनात अनुकंपा आणि कींव मात्र निर्माण होते. जी गोष्ट विजापूरच्या अली आदिलशहाची किंवा बिदरच्या अमीरअली बरीदची तीच किंबहुना त्याहूनही अश्लाघ्य कथा अहमनगरचा पहिला मूर्तजा निजामशहा याची.

## पुनश्च मूर्तजा निजामशहा

सय्यदअली आणि फरिश्ता त्याचा उल्लेख वेडा मूर्तजा निजामशहा असाच करतात. याचे दोन सुंदर गुलामांवर प्रेम बसले. एकाचे नाव साहिबखान आणि दुसऱ्याचे फत्तु ऊर्फ फत्तेशहा. साहिबखानाच्या नादाने मूर्तजा निजामशहा इतका चाळावला की त्याला जवळजवळ वेड लागल्यासारखे झाले. एखाद्या प्रेयसीने आपल्या प्रियकरावर रुसावे तदनुसार मूर्तजा निजामशहाकडून काही एक हट्ट पुरा न झाल्यामुळे साहिबखानाने अहमदनगर सोडले. त्याच्या पाठोपाठ रानोमाळ, गावोगाव मूर्तजा निजामशहा सैरावैरा पळत राहिला. आपल्या पूर्ण कबजांत मूर्तजा सापडला आहे याची जेव्हा साहिबखानाला

जाणीव झाली तेव्हा तर त्याने कहर केला. स्वतःला सुलतान समजून त्याने जहागिरी देण्यास सुरवात केली, राजधानीमध्ये कत्तली घडवून आणल्या आणि सर्वत्र हाहाःकार उडवून दिला. सरतेशेवटी युद्धाचा अवलंब करुन मूर्तजाचा मुख्य प्रधान सलाबतखान याने साहिबखानाचा वध करविला आणि हे मूर्तजाच्या मानगुटीवर बसलेले भूत गाडले. अर्थात मूर्तजाचा हा वेडा छंद मात्र सुटला नाही. वर उल्लेख केलेल्या फत्तेशहाच्या आता तो नादी लागला. जामदारखान्यामधील एका रत्नजडित कमरपट्ट्याची फत्तेशहाने केलेली मागणी पुरी करण्याची आज्ञा मूर्तजाने सलाबतखानाला दिली. उघड्या डोळ्यांनी राजवैभवाचा होत असलेला नाश सलाबतखानाला पाहवला नाही. त्याने खऱ्या कमरपट्ट्याऐवजी खोटा कमरपट्टा फत्तेशहाला दिला. त्याने मूर्तजाकडे जाऊन सलाबतखानाविरुद्ध तक्रार केली. मुर्तजाने आपल्या प्रिय पात्राची समजूत घातली आणि सलाबतखानाला समक्ष बोलावून त्याची हजेरी घेतली. इतकेच नव्हे तर संतापून जाऊन त्याने जामदारखान्यालाच आग लावून दिली. एका वैभवसंपन्न राज्याच्या सुलतानाची अनैसर्गिक कामवासनेच्या आहारी गेल्यामुळे झालेली विपन्नावस्था पाहिल्यानंतर विचित्र दैवगतीचे कौतुक वाटते.

## मध्ययुगीन कालखंड आणि पोर्तुगीज

मध्ययुगीन महाराष्ट्राच्या इतिहासातील शाह्यांचा आणि त्यांचे सुलतान यांचा परामर्श घेताना एका गोष्टीचा उल्लेख अटळ आहे आणि तो म्हणजे या कालखंडातील पोर्तुगीजांचे स्थान. हिंदुस्थानच्या पश्चिम किनाऱ्यावर पोर्तुगीजांचे आगमन झाले ते इतर युरोपीय लोकांप्रमाणे व्यापारी म्हणूनच. १४ व्या आणि १५ व्या शतकात आपले राज्य स्थापन करण्याचे दृष्टीने त्यांनी पाऊल उचलण्याचे टाळले. परंतु बहमनींच्या विनाशानंतर मात्र त्यांनी महाराष्ट्रातील राजकीय परिस्थितीचा अंदाज घेतला आणि आता आपल्याला प्रादेशिक वर्चस्व स्थापन करता येणे शक्य आहे अशी मनाशी खूणगाठ बांधली. आक्रमक राजकारणाचे डाव खेळण्यासाठी ज्या गुणावगुणांची आवश्यकता असते ते पोर्तुगीजाच्या अंगी पूर्णांशाने वसत होते. विश्वासघात करून शत्रूला नेस्तनाबूद करण्यात त्यांना कसलीच दिक्कत वाटत नसे. गुजरातच्या बहादूरशहाला वाटाघाटीसाठी बोलावून भर समुद्रात त्याला जलसमाधी देण्यात पोर्तुगीजांनी परिणामांची क्षिती केली नाही यावरून हे सहज सिद्ध होते. त्यांच्या अंगी धडाडी होती आणि शौर्यादी गुण वास करीत होते. आपला स्वार्थ साधण्यासाठी कसलाही धोका पत्करण्याची त्यांची तयारी होती. युसूफ आदिलशहाच्या कारकिर्दीत गोव्यावर त्यांनी मिळविलेला कबजा किंवा, दुसऱ्या बुरहाण निजामशहाच्या कारकिर्दीत अहमदनगरने चौलवर प्रचंड सैन्यानिशी केलेला हल्ला थोड्या सैन्यानिशी परतवून लावून अहमदनगरच्या १२००० वर सैनिकांना त्यांनी घातलेले कंठस्नान ह्या गोष्टी त्यांची धाडस आणि धोका घेण्याची तयारी दाखवितात. मनुष्यबळाची उणीव

त्यांनी युक्ती आणि अप्रतिम युद्धकौशल्य यांनी भरून काढली. दक्षिणेतील सुलतानांमधील दुहीचा फायदा त्यांनी आपली राजकारणी आणि प्रादेशिक महत्त्वाकांक्षा साधून घेण्यासाठी पुरेपूर उठविला. दक्षिणेमधील सुलतानांना पोर्तुगीजांचा पराभव कधीच करता आला नाही. इतके असूनही पोर्तुगीजांना राजकीय स्थैर्य असे कधीच लाभले नाही. याला दोन गोष्टी कारणीभूत झाल्या. एक म्हणजे पोर्तुगीजांबरोबर ज्या इतर युरोपीयसत्तांनी हिंदुस्थानात व्यापारासाठी प्रवेश केला त्यांच्याबरोबर स्पर्धेमध्ये पोर्तुगीजांचा टिकाव लागला नाही. दुसरी आणि महत्त्वाची गोष्ट म्हणजे स्थानिक लोकांचा पाठिंबा पोर्तुगीजांनी पूर्णपणे गमावला ही होय. हिंदुस्थानच्या पश्चिम किनाऱ्यावरील अनेक ठिकाणांवर त्यांनी हल्ले चढविले आणि तेथे जाळपोळ आणि अमानुष कत्तली केल्या. धर्मवेडाच्या पोटी त्यांनी सक्तीने आणि बळजबरीने लोकांना ख्रिश्चन धर्म स्विकारावयास लावला आणि हिंदू आणि मुसलमान या दोन्ही धर्मांच्या जनतेशी त्यांनी वैर निर्माण केले. परिणामी इंग्रजांना जे साधले त्याची परिपूर्ती करण्यात पोर्तुगीजांना अपयश आले आणि हिंदुस्थानच्या पश्चिम किनाऱ्यावरील काही ठिकाणे सोडल्यास पोर्तुगीज सत्तेची हिंदुस्थानातून पिछेहाट झाली. पोर्तुगीजांच्या अपयशाची मीमांसा करताना एका महत्त्वाच्या गोष्टीकडे आपल्याला दुर्लक्ष करून चालणार नाही. पोर्तुगीजांचे पाय हिंदुस्थानमध्ये स्थिरावले वा न स्थिरावले हा प्रश्न क्षणभर बाजूला ठेवल्यास एक गोष्ट निश्चित की, पोर्तुगीजांनी आपल्या धडाडीने असे दाखवून दिले की, वर्षानुवर्षे दक्षिणेत राज्य करणाऱ्या आणि तेथील स्थानिक प्रजेची पिळवणूक करणाऱ्या मुसलमान सत्ताधिशांची अस्मानी सुलतानी हा काही त्यांना मिळालेला अमरपट्टा नाही. साहस, मनाची तयारी आणि निश्चय यांची गाठ बांधून पाऊल टाकल्यास सत्तेची धुंदी चढलेल्या मदांधांचे गर्वहरण सहज करता येते याची प्रचीती पोर्तुगीज आणि दक्षिणेतील सुलतान यांच्यामधील कलहातून तेथील स्थानिक प्रजेला झाली. दक्षिणेमधील सोळाव्या शतकातील महाराष्ट्रामधील व इतरत्र झालेल्या प्रजेच्या उद्रेकांचे थोडेफार श्रेय पोर्तुगीजांना आहे असे विधान केल्यास त्यात काहीही अतिशयोक्ती होणार नाही.

## मध्ययुगीन कालखंड–समाज, राज्यव्यवस्था, संस्कृति, वाङ्मय, वगैरे.

मध्ययुगीन इतिहासाचा विशेषतः प्रस्तुत कालखंडातील इतिहासाचा अभ्यास करताना एक गोष्ट प्रामुख्याने नजरेस येते. ती म्हणजे या कालखंडाचे इतिहासकार फरिश्ता काय किंवा सय्यदअली काय- इतिहासाचे कथन करताना ऐतिहासिक घटनांवरच अधिक भर देतात. त्यांच्या लिखाणात तत्कालीन राज्यकारभार, समाजस्थिती, कला आणि वाङ्मय वगैरे बाबींचा फारच थोडा असा उल्लेख येतो. मध्ययुगीन कालखंडाच्या वरील दोनही इतिहासकारांच्या लिखाणात याबाबत स्वतंत्र असे विवेचन केलेले आढळत नाही. जे काही उल्लेख येतात ते केवळ अनुषंगाने. उदा. बहमनींच्या राज्यविस्तारा

विषयी माहिती देताना फरिश्ता किंवा सय्यदअली बहमनी राज्याचे पहिल्या सुल्तान महमदच्या कारकिर्दीत चार प्रांत होते असे सांगतात. त्यांची नावेही ते देतात. परंतु त्या राज्यात त्या प्रातांची पुढे कशी विभागणी झाली होती किंवा त्या प्रांतांचा वसूल काय होता या विषयी मात्र ते काहीच माहिती देत नाहीत. त्याचप्रमाणे सैन्याविषयी लिहिताना सैन्याची उजवी फळी अथवा डावी फळी याचा ते उल्लेख करतात. परंतु हे सैन्य किती होते, त्यांची शस्त्रे कोणती होती, या सैन्याची विभागणी कशी झाली होती याविषयी मात्र त्यांच्या लिखाणात काहीही उल्लेख आढळत नाही. आणखी काही उदा. द्यावयाची तर आपल्याला असे म्हणता येईल की मध्ययुगीन कालखंडात बहमनी कालीन किंवा शाह्यांच्या काळात वाङ्मयाची निर्मिती किती झाली, त्या काळी पत्रव्यवहार कसा केला जात असे, धार्मिक ग्रंथ कोणते लिहिले गेले याचा उल्लेख त्यांच्या लिखाणात आढळून येत नाही. फरिश्ता आणि सय्यदअली यांच्या लिखाणात **चप्नगीर, सरपर्दादार, वकील** आणि **पेशवा, वजीर** वगैरे अनेक अधिकाऱ्यांचे उल्लेख येतात. परंतु या अधिकाऱ्यांचे निश्चित काम काय होते या विषयी माहिती मात्र दोघांच्याही ग्रंथांत मिळत नाही. मुख्य प्रश्न पडतो तो तत्कालीन राजसत्तेचे स्वरूप काय असावे याबद्दल. त्यावेळी मंत्रिमंडळ असावे असे समजण्यास भरपूर वाव आहे. परंतु या मंत्रिमंडळाची व्याप्ती काय होती आणि त्याचे अधिकार काय होते ह्याविषयी दोघांच्याही लिखाणात स्पष्ट असे उल्लेख नाहीत. मध्ययुगीन इतिहासकारांच्या ग्रंथामधिल ही उणीव समकालीन इतर कागदपत्रे आणि या कालखंडात प्रवासाच्या निमित्ताने आलेले युरोपियन प्रवासी किंवा व्यापाराच्या निमित्ताने आलेले त्यांचे भाईबंद यानी लिहून ठेवलेले वृत्तांत यांनी बऱ्याच अंशी भरुन काढलेली आहे. या सर्व कागदपत्रातून किंवा प्रवाशांनी लिहिलेल्या ग्रंथांमधून तत्कालीन राज्यपद्धती, समाजस्थिती, कला आणि वाङ्मय यांची प्रगती, वास्तू आणि शिल्पशास्त्र यासंबंधीची भरपूर माहिती आपल्याला मिळते. हे लिखाण कोणते आणि हिंदुस्थानात आलेल्या कोणत्या प्रवाशांनी येथील परिस्थितीबद्दल माहिती दिली त्याचा उल्लेख पुढे येईलच. फरिश्ता आणि सय्यदअली यांचे ग्रंथ आणि त्याचप्रमाणे समकालीन साधनसामुग्री यावरून मध्ययुगीन महाराष्ट्रामधील राज्यव्यवस्था आणि समाजव्यवस्था याबद्दल जी माहिती मिळते तिचे परिशीलन पुढे केलेले आहे.

मुसलमानांची पहिली स्वारी दक्षिणेवर १२९४ मधे झाली. यादवांचे राज्य १३१८ मध्ये नष्ट पावले. त्यानंतर ३० वर्षे दिल्लीच्या सुलतानांची सत्ता दक्षिणेवर होती. १३४७ मध्ये दक्षिणेमध्ये बहमनींच्या स्वतंत्र राज्याची स्थापना झाली. मुसलमानांच्या या सत्तेचे दक्षिणेमधल्या आणि विशेषतः महाराष्ट्रामधील समाजस्थिती, आर्थिक स्थिती आणि संस्कृती यावर अतिशय दूरगामी असे परिणाम झाले. नवीन राज्यकर्त्यांचा दृष्टिकोन हा जेत्यांचा होता. त्यांची संस्कृती ही महाराष्ट्राला त्या काळापर्यंत परिचित असलेल्या

संस्कृतीपेक्षा अगदी वेगळी होती. साहजिकच दोन्ही संस्कृतीमध्ये संघर्ष निर्माण होणे क्रमप्राप्त होते. या संघर्षात येथील संस्कृतीनें परकीय संस्कृती आत्मसात करून आपले स्वत्व कायम ठेवले, ही विशेष उल्लेख करण्यासारखी गोष्ट आहे.

### राज्यकारभार–बहमनी सुलतान

बहमनी राजघराण्याची स्थापना जरी दौलताबाद येथे झाली असली तरी काही काळानंतर बहमनींनी आपली राजधानी महाराष्ट्राबाहेर गुलबर्गा येथे नेली. बहमनींचा अंमल सर्व दक्षिण किंवा सर्व महाराष्ट्र यावर पूर्णपणे कधीच नव्हता. बहमनींच्या काळात बहमनी राज्याचे जे विभाग पाडले होते त्यांचा राज्यकारभार हा ज्या अधिकाऱ्यांच्या हाती असे ते अधिकारी लष्करातील **मनसबदार** असत. बहमनी सुलतानांच्या सत्तेवर नियंत्रण असे कधीच नसे परंतु बहमनींच्या सरदारांची वृत्ती सुलतानांवर हुकमत गाजविण्याची तरी असे किंवा त्यांच्याविरुद्ध बंड करण्याची तरी. जेव्हा सुलतान हा कर्तबगार असे तेव्हा तो बंडखोर सरदारांना आवाक्यात ठेवी. तो दुर्बल असल्यास राज्यात अशांतता माजे. बहमनींच्या काळात वारसाबाबत सतत युद्धे होत असल्याचा उल्लेख वर आला आहेच. याचा परिणाम बहुतेक करून यादवी युद्धात होय असे. या गोष्टीमुळे बहमनींच्या प्रगतीत फार मोठा अडथळा निर्माण झाला यात काहीच संशय नाही.

### राज्याची विभागणी

बहमनींचे राज्य स्थापन होण्याचे अगोदर दिल्लीच्या सुलतानांनी दक्षिणेमध्ये जी राज्ययंत्रणा स्थापन केली होती तिच्यामध्ये फारसा बदल करण्याची जरुरी बहमनींना वाटली नाही. बहमनींनी आपल्या राज्याची विभागणी राज्यकारभाराच्या सोयीकरिता वेगवेगळया प्रांतांमध्ये केली आणि त्यावर **मसनद्–ई–अली, मजलीस–ई–अली, आजम–ई–हुमायून** आणि **मलीक नायब** हे अधिकारी नेमले. हे प्रांत म्हणजे दौलताबाद, वऱ्हाड, बीदर आणि गुलबर्गा हे होते. हे प्रांत महमदशहा पहिला याच्या कारकिर्दीत पाडण्यात आले. ही राज्यव्यवस्था जवळजवळ शंभर वर्षेपर्यंत टिकली.

### गावानच्या सुधारणा

प्रांतांची पुनर्रचना तिसऱ्यामहमदशहाच्या कारकिर्दीत महमूद गावान याने केली. या शंभर वर्षात बहमनींच्या ताब्यातील प्रदेशात बरीच भर पडली होती. त्यामुळे मूळच्या प्रांताचा विस्तार आवाक्याबाहेर गेलेला होता. प्रांतिक अधिकाऱ्यांच्या ताब्यामध्ये अधिक प्रदेश आल्यामुळे त्यांच्या सत्तेत वाजवीपेक्षा जास्त भर पडलेली होती. साहजिकच या प्रांतिक सुभेदारांची वृत्ती बंडखोरीकडे वळली होती. यामधून निर्माण होणारा धोका महमूद गावानने ओळखला, आणि प्रांतिक सुभेदारांची सत्ता कमी करून त्यांच्या वर्चस्वाला आळा घालण्याचे ठरविले. त्यानुसार बहमनी राज्याची विभागणी आता आठ

विभागांत करण्यात आली. हे विभाग म्हणजे गावील, माहूर, दौलताबाद, जुन्नर, विजापूर, अहसनाबादगुलबर्गा, राजमहेंद्री आणि वरंगळ हे होत. याशिवाय महमूद गावानने या प्रांतांवर **तरफदार** हे जे प्रांताधिकारी नेमले त्यांच्या अधिकारावर आणखी बंधने आणली. त्यांच्या ताब्यातील प्रदेशापैकी काही भाग नवीन सुधारणांप्रमाणे त्याने सुलतानाच्या अमलाखाली आणला (**खासा–ई–सुलतानी**). बहमनी राज्याची अशा तऱ्हेने नवी विभागणी झाल्यामुळे बहमनी राज्याच्या लष्करी संघटनेतही बदल करणे क्रमप्राप्त झाले. पूर्वी **तरफदारांची** सत्ता अनियंत्रित होती. कोणत्याही जागेवर ते आपले अधिकारी नेमू शकत असत. त्याचप्रमाणे त्यांना वाटेल तितक्या माणसांची ते लष्कर भरती करू शकत. महमूद गावानने बहमनींच्या लष्करी संघटनेत आमूलाग्र बदल केले. नवीन सुधारणांप्रमाणे प्रांतामधील फक्त एका किल्ल्याचा ताबा **तरफदाराकडे** ठेवण्यात आला तर बाकीच्या किल्ल्यांवरील किल्लेदारांच्या नेमणुका केंद्रिय सरकारकडून केल्या जाऊ लागल्या. त्याचप्रमाणे प्रत्येक **मनसबदार** किंवा **जहागिरदार** याच्यावर विशिष्ट संख्येने सैनिक ठेवण्याची सक्ती करण्यात आली. तितके सैनिक त्याने न ठेवल्यास जहागिरीच्या उत्पन्नाचा अतिरिक्त भाग त्याला परत करावा लागे. या सुधारणांमुळे तरफदार असंतुष्ट झाले आणि परिणामी महमूद गावानचा खून झाला.

## जहागिरी पद्धती

बहमनी सुलतान जहागिरीदाखल फारच क्वचित राज्यामधील जमिनी देत असत. ज्यावेळी अशी जमीन जहागिरीदाखल दिली जाई त्यावेळी जहागिरदाराच्या कार्यक्षेत्रापासून ती बऱ्याच दूर असे. जहागिरीचे अस्तित्व हे सुलतानाच्या मर्जीवर अवलंबून असे. जहागीर ही वंशपरंपरा कधीच दिली जात नसे, आणि जेव्हा ती दिली जाई ती एखाद्याने राज्याची बहुमोल सेवा केल्यास त्याचे बक्षीस म्हणूनच. अशा तऱ्हेने **जहागिरदारांच्या** अधिकारांचे स्वरूप हे दुहेरी असे. ज्या प्रदेशावर अथवा प्रांतावर त्याची नेमणुक होई त्याच्या कारभारासाठी ते सुलतानाला जबाबदार असत. याउलट त्यांच्या **जहागिरीवर** मात्र त्यांची संपूर्ण सत्ता चाले. **जहागिरी**प्रमाणेच बहमनींनी **मोकाशाची** पद्धती अनुकरणात आणली. ज्यावेळी एखाद्या व्यक्तिला मोकासादार नेमले जाई त्यावेळी त्याला दिलेल्या प्रदेशातील ( **परगणा** ) वसुलाची जबाबदारी त्याच्यावर असे. **जहागिरदाराप्रमाणेच मोकासदाराच्या** अधिकारांचे स्वरुप दुहेरी असे.

## परदेशी मुसलमान

बहमनींच्या राज्यकारभारात वर उल्लेख केल्याप्रमाणेच इराण, तुर्कस्तान आणि इतर अरब देश यामधून आलेल्या आणि त्याचप्रमाणे हबसाणातून आलेल्या व्यक्तींचा पुष्कळच भरणा होता. या व्यक्तींमधे खलफहसन बसरी, महमूद गावान, युसुफ आदिल,

सुलतान कुली आणि अमीर बरीद यांचा प्रामुख्याने उल्लेख करावा लागेल. बाहेरून आलेले मुसलमान आणि येथील मुसलमान यांच्यामध्ये उत्पन्न झालेल्या स्पर्धेमुळे बहमनींच्या राज्यात झालेल्या यादवी युद्धांचा उल्लेख वर आलेला आहेच. किंबहुना हे यादवी युद्धच बहमनींच्या नाशाला कारणीभूत झाले असे विधान केल्यास त्यात काहीच चूक होणार नाही. बहमनींच्या राज्यात हिंदूंना मोठ्या अधिकारांच्या जागा जवळ–जवळ नव्हत्याच. परदेशी मुसलमान आणि दक्षिणी मुसलमान यांच्यांतूनच या जागांवर भरती केली जाई. बहमनींच्या राजवटीच्या शेवटच्या वर्षांत ज्या एक–दोन हिंदू अधिकाऱ्यांची नावे आपल्याला आढळून येतात, त्यापैकी एक घराणे मुधोळच्या घोरपड्यांचे होते. मध्ययुगीन महाराष्ट्रात राज्यावर असलेले सरकार हे बहुसंख्य हिंदूंवर राज्य करणाऱ्या अल्पसंख्य मुसल्मानांचे होते असे विधान केल्यास ते योग्य ठरेल.

### मुलकी अधिकारी

मुलकी राज्यकारभारात बहमनींनी प्रचलित पद्धतीत फारसा बदल केला नाही. मुलकी राज्यकारभार ज्या **वतनदारांच्या** हाती असे ते म्हणजे **देशमुख, देशपांडे, देसाई, पाटील** आणि **कुलकर्णी** हे होत. त्यांच्याकडे जमिनीपासून येणाऱ्या कराची वसुली करण्याचे काम होते. या वतनदारांना जमिनी नांगरणीखाली आणण्याबाबत सरकार कडून मेहेनताना मिळे. महाराष्ट्रामध्ये जनतेला **वतनाचे** अतिशय वेड होते, आणि हे **वतन** सुरक्षित राखण्यासाठी कोठल्याही मर्यादेपर्यंत जाण्याला ते तयार होत. साहजिकच त्या काळच्या राज्यकर्त्यांनी आपली सत्ता अबाधित राहावी म्हणून या **वतनदारांचा** फार मोठ्या प्रमाणावर उपयोग करून घेतला. परिणामी मध्ययुगीन कालखंडात बहमनी राज्यकर्त्यांकडून त्याकाळच्या हिंदू समाजात आणि त्या समाजाच्या रुढ आर्थिक आणि सामाजिक स्थितीत ढवळाढवळ करण्याचे फारसे प्रयत्न झाले नाहीत.

१४८१ साली महमूद गावानच्या झालेल्या खुनानंतर बहमनी राज्याच्या विघटनास सुरुवात झाली. बहमनी राज्यातून अहमदनगर, विजापूर, वऱ्हाड, बीदर आणि गोवळकोंडा ही पाच राज्ये निर्माण झाली. त्याशिवाय बहमनींचे समकालीन असे खानदेशचे राज्य होते ते सहावे. वर उल्लेखिलेल्या पाचही शाह्यात बहमनींच्या काळी अस्तित्वात असलेली राजयंत्रणा थोड्याफार फरकाने पुढे चालू ठेवण्यात आली. फरिश्ता आणि सय्यदअली हे या शाह्यांच्या थोडेफार समकालीन असल्यामुळे या राज्ययंत्रणेची बरीचशी माहिती आपल्याला अप्रत्यक्षपणे त्यांच्याकडून मिळते.

### अहमदनगर : राज्यकारभार

बहामनी प्रमाणेच सुल्तान हा राज्यप्रमुख असून राज्यातील **वजीर** आणि **अमीर** राज्यकारभारात त्याला मदत करीत. सुल्तान आणि **वजीर** यांचे मिळून जे मंत्रिमंडळ बने त्याला **राखतखाना** असे म्हणत. या मंत्रीमंडळातील तीन मोठ्या अधिकाऱ्यांची

नावे मिळतात. ती म्हणजे **वकील** अथवा **पेशवा, वजीर** आणि **अमीर–ई–जुमला.** यांपैकी **वकील** अथवा **पेशवा** या अधिकाऱ्याकडे सर्वोच्च अधिकार होते. **वजीर** हा अधिकारी महसुलाच्या बाबीबाबत जबाबदार होता. **अमीर–ई–जुमला** म्हणजे त्या काळचा अर्थमंत्री. राज्यातील **परगणे** हे **मोकासा** किंवा **जहागिरी**दाखल **राखतखान्यातील** मंत्र्यांकडे सोपविलेले असत. या तिघांशिवाय इतर अधिकारी म्हणजे **सरशिलेदार, सरनोबत, अमीर–उल–उमरा,** मुख्य **नाईकवाडी** आणि **चिटणीस.** संबंध राज्याची विभागणी जिल्ह्यामध्ये करण्यात आलेली असून जिल्ह्याची विभागणी आणखी उपविभागात झालेली असे. या उपविभागाना **परगणा, कर्यात, सम्मत, महाल** आणि **तालुका** अशी नावे होती. अहमदनगर राज्याचा पश्चिम भाग हा डोंगराळ असून त्याचे **खोऱ्याप्रमाणे** भाग पाडलेले असत. त्यांना **खोरा, मुरा** आणि **मावळ** अशी नावे असत. राज्याच्या वसुलीची जबाबदारी **देशमुख** आणि **देशपांडे** या अधिकाऱ्यांवर असे. ते अमील या अधिकाऱ्याला जबाबदार असत.

**अमील** या अधिकाऱ्याकडे महसुलाशिवाय इतर अधिकार असत. पोलिस बंदोबस्त राखणे आणि **दिवाणी** खटल्यांचा निकाल देणे ही त्याची कामे असत. **दिवाणी** कज्जे चालविण्याचे काम हे **पंचायतीचे** असे. अहमदनगर राज्यात खालच्या पातळीवर बहुसंख्य अधिकारी हिंदू होते. परंतु मुख्य जागांवर मात्र मुसलमानांची नेमणूक केली जाई. अहमदनगर राज्यात नावाजलेले हिंदू अधिकारी म्हणजे कान्हू नरसी, अण्णेराव समल्या, तमल्या, भोपालराय आणि शहाजी अनंत हे होते. काही अपवाद सोडल्यास बहुतेक किल्लेदार हे मुसलमान असत. किल्ल्यांवरील शिबंदीमध्ये मराठे, कोळी आणि धनगर यांचा भरणा असे. जिल्ह्याचा प्रमुख म्हणून हिंदूंच्या नेमणुका झाल्याची एक दोन उदाहरणे आहेत. बहमनींनी **जहागिरदारीचे** जे तत्व अंमलात आणले होते तेच अहमदनगरच्या सुलतानांनी पुढे चालविले. राज्यांची उत्तम चाकरी बजाविलेल्या हिंदूंना सुलतानाकडून **राजा, नाईक** आणि **राव** ह्या पदव्या दिल्या जात. अहमदनगर राज्यातील सुप्रसिद्ध हिंदू सरदार म्हणून सिंदखेडचे जाधवराव आणि वेरूळचे मालोजी **राजे** भोसले यांचा उल्लेख या संदर्भात करता येईल.

राज्याचा सर्वांत मोठा भाग म्हणजे प्रांत. त्याला **अत्राफ** असे म्हणत. राज्यातील परगण्यांचा आकार हा निश्चित नसे. परंतु **परगण्याचा** आकार ठरविताना देशमुख वतनावर तो ठरविला जाई. कोकणामध्ये अशा भागाला **मामला** असे म्हणत. सुलतानाची जी कचेरी परगण्यात असे तिला **दिवाण–ई–परगणा** असे म्हणत. या कचेरीचा मुख्य अधिकारी **हवालदार** हा असे. त्याची नेमणूक ज्या **वजिराच्या मोकाशात** अगर **जहागिरीत** तो येई त्याच्या मर्जीवर अवलंबून असे. ज्यावेळी सुलतानाकडून **हवालदाराची** नेमणूक होई त्यावेळी त्याला **मोकासादार** असे म्हणत. **हवाल-**

**दाराच्या** कामात **मुजुमदार, मुश्रीफ** वगैरे अधिकारी त्याला मदत करीत. सुलतानाच्या कचेरीशिवाय प्रत्येक **परगण्याची** स्वतंत्र कचेरी असे. त्यामधील अधिकाऱ्यांमध्ये **वतनदार** किंवा **देशक** आणि **मिरासदार** यांचा समावेश होता. प्रत्येक **परगण्यामध्ये मजलीस** या नावाचे एक मंडळ असे. त्याचा मुख्य **काजी** हा असे. **मजलीसचे** काम स्थानिकबाबीसंबंधी निर्णय घेण्याचे असे. **परगण्याची** विभागणी मागे उल्लेख केल्याप्रमाणे **तर्फ, कर्यात** आणि **सम्मत** यामध्ये झालेली असे. तेथील कचेरीला **दिवाण–ई–ठाणा** असे म्हणत. त्याचा मुख्य **ठाणेदार** किंवा **हवालदार** हा असे. याची नेमणूक **मोकासादाराकडून** होई. त्याच्या मदतीला एक **कारकून** असे.

राज्यामधील कायद्याबाबतचे सर्वोच्च अधिकार सुलतानाकडे असत. सुलतानाच्या खालोखाल **काजी** अथवा मुख्य न्यायाधीश हा अधिकारी असे. त्याची नेमणूक सुलतानाकडून केली जाई आणि तो सुलतानाला जबाबदार असे. न्यायखात्यातील आणखी अधिकारी म्हणजे राज्यातील **वजीर** आणि **अमीर** हे होते. त्यांच्या ताब्यातील प्रदेशाबाबतचे सर्व न्यायाधिकार त्यांच्याकडे असत. पुष्कळसे कज्जे ते त्यांनी नेमलेल्या अधिकाऱ्यांकडे सोपवीत. ज्या कज्जांचा ते स्वतः फैसला करीत तेव्हा ते **मजलीसची** मदत घेत. **परगण्यावरही** न्यायदानासाठी **काजीची** नेमणूक सुलतानाकडून केली जाई. **काजीच्या** खालोखालचा अधिकारी म्हणजे **मोकाशी.** तो **वजीराला** जबाबदार असे. न्यायखात्याच्या सर्वात खालच्या थरावर ठाणा किंवा **तर्फ मजलीस** ही असे. तिचा मुख्य **ठाणादार** हा असे.

## विजापूर : राज्यकारभार

विजापूर राज्यामधील राज्यकारभार हा वर वर्णन केलेल्या अहमदनगरच्या राज्यकारभारापासून फारसा वेगळा नव्हता. याचे कारण दोन्ही राज्यांमध्ये बहमनींच्या राज्यकारभाराची परंपरा होती आणि दोन्ही राज्यांच्या सुलतानांना प्रचलित राज्य व्यवस्थेत बदल करण्याची जरुरी भासली नाही. विजापूर राज्याचा संस्थापक युसुफ आदिलशहा याने महमूद गावानने १४८१ मध्ये अमलात आणलेल्या सुधारणांचा आपल्या राज्यात पुन्हा अंमल चालू केला. बहमनींप्रमाणेच सुलतान हा राज्याचा मुख्य असून त्याला राज्यकारभारात **वकील** आणि **पेशवा, वजीर, अमीर–ई–जुमला, सरशिलेदार, सरनोवत, अमीर–उल–उमरा,** मुख्य **नाईकवाडी** आणि **चिटणीस** हे अधिकारी मदत करीत. मध्यवर्ती सरकारची विभागणी वेगवेगळ्या खात्यांत झालेली असून त्यांना **दिवाण** असे म्हणत. राज्यातील परगणे वा अधिकाऱ्यांकडे **मोकासा** किंवा **जहागीर** म्हणून लावून दिले जात. आदिलशाहीच्या पूर्वार्धात

**वकील** या मुद्द्याला फार मोठे मानाचे स्थान असे. नंतरच्या काळात मात्र **वजिराचा** हुद्दा हा मोठा मानला जाऊ लागला.

अहमदनगर राज्याप्रमाणेच राज्याची विभागणी जिल्ह्यांमध्ये आणि जिल्ह्यांची **तालुका, प्रांत** अथवा **देश** या विभागामध्ये झालेली असे. महसूल अधिकाऱ्यांचा मुख्य **अमील** नावाचा अधिकारी होता. दिवाणी खटले चालविण्यासाठी **पंचायती** असत. अमील या अधिकाऱ्याच्या वरच्या हुद्द्याचा अधिकारी **मोकासादार** हा असे. पुष्कळ वेळा **मोकासादार** हा मरेपर्यंत अधिकारावर राही. कधी–कधी हा अधिकार वंशपरंपरा चालत असे **मोकासादारावरचा** अधिकारी म्हणजे प्रांतिक **सुभेदार.** यालाच **सुभा** असे म्हणत. विजापूर राज्यात अहमदनगरपेक्षा अधिक हिंदू अधिकारी होते. त्याचप्रमाणे विजापूरच्या सैन्यातील मराठा घोडदळ हा एक खास विभाग होता. राज्यामध्ये अनेक हिंदू अधिकाऱ्यांना **जहागिरी** दिल्या गेल्या होत्या. त्यांमध्ये जावळीचे चंद्रराव मोरे, फलटणचे नाईक निंबाळकर, मालवाडीचे झुंजारराव घाटगे, जतचे डफळे, म्हसवडचे माने आणि कापशीचे घोरपडे यांचा उल्लेख करणे जरूर आहे.

अहमदनगरप्रमाणेच विजापूरराज्यात कायदा आणि न्यायखात्याबद्दलचे सर्वाधिकार सुलतानाकडे होते. खटल्याबाबत निकाल देताना पुष्कळदा समाजातील प्रतिष्ठित **शेटे** आणि **महाजन** यांचा सल्ला दरबाराकडून घेतला जात असे. कायदेखात्यात सुल-तानाच्या खालोखाल स्थान मुख्य न्यायाधीशाचे असे. त्याला **काजी** या नावाने संबोधित असत. केंद्रीय न्यायखात्याचे आणखी अधिकारी म्हणजे **वजीर** आणि **अमीर** हे होते. त्यांच्या ताब्यातील प्रदेशावर न्यायदानाच्या बाबतीत त्यांना सर्वाधिकार दिलेले असत. सर्वसाधारणपणे ते आपले अधिकार दुय्यम अधिकारी नेमून त्यांच्याकडे सोपवीत असत. ते स्वतः जेव्हा न्यायदान करीत तेव्हा ते **मजलीस**ची मदत घेत. **मजलीसने** दिलेला निर्णय अंतीम मानला जात असे. परगण्यामधिल सर्व सरकारी अधिकारी मिळून **दिवाण** बनत असे. **दिवाण**मधील महत्त्वाचे अधिकारी म्हणजे **काजी, मोकाशी** किंवा **हवाल-दार** आणि **मजलसी** किंवा **सभासद** हे असत. **मजलीस** मध्ये **देशमुख** आणि **देशपांडे** आणि इतर **वतनदार** आणि **मिरासदार** यांचा समावेश होता. **मजलीस**कडून दिल्या जाणाऱ्या निकालपत्राला **महजर** असे म्हणत. न्यायखात्यातील सर्वात कनिष्ठ अधिकारी म्हणजे **ठाणादार.** त्याचा अधिकार फक्त **दिवाणी कज्जा** पुरताच चाले.

अहमदनगर आणि विजापूर यांचा राज्यकारभार अशा रितीने चालत असे. बीदर वऱ्हाड, गोवळकोंडा आणि खानदेश या राज्यांचा कारभार याहून फारसा वेगळा नव्हता. वरील माहितीवरून आपल्याला असे दिसून येईल की, खेडे, **तालुका** आणि जिल्हा पातळीवर पूर्वीप्रमाणेच वरील शाह्यांच्या सुलतानांनी राज्यकारभार चालू ठेवला आणि

तो देखील स्थानिक लोकांच्या हातामधे. **ग्रामपंचायत, गोतसभा, महजर, वतनदार पाटील, कुलकर्णी, देशमुख** आणि **देशपांडे** याच्या अस्तित्वामुळे सुलतानांकडून आणि त्यांच्या केंद्रीय अधिकाऱ्यांकडून स्थानिक राज्यकारभारात होणाऱ्या हस्तक्षेपाला बराच आळा बसला. अर्थात याचा अर्थ असा नाही की या गोष्टींमुळे शाहयांच्या कारकिर्दीत सोळाव्या शतकांत समाजाची भौतिक प्रगती झाली. सतत चाललेली युध्दे आणि अशांततेचे वातावरण यामुळे व्यापार आणि उदीम यांची व्हावी तशी भरभराट होऊ शकली नाही. सर्व–सामान्य जनतेचे निर्वाहाचे प्रमुख साधन म्हणून शेतकी हा व्यवसायच राहिला. यामध्ये भर म्हणून अधून–मधून वरील शाह्यांच्या सुलतानांच्या धार्मिक अस्मानी सुलतानीचा तडाखा सर्वसामान्य जनतेला बसतच राहिला. परंतु कठोर वस्तुस्थितीची जाणीव, परकीयांची आक्रमणे, शेजारील राज्यांशी सतत कलह, शिया आणि सुन्नी पंथियांच्या कलहामधून वेळी अवेळी होणारा उद्रेक यामुळे बहुसंख्य हिंदू जनतेच्या विरुद्ध सातत्याने आक्रमक धोरण स्विकारण्याचे धारिष्ट तत्कालीन शाहयांच्या सुलतानांना झाले नाही.

**मध्ययुगीन कालखंड – परदेशी प्रवाशांची वर्णने – बार्थेमा :**

अहमदनगर, विजापूर आदि राज्यात असलेल्या परिस्थितीचे अतिशय उत्तम असे वर्णन हिंदुस्थानामध्ये त्या काळांत आलेल्या प्रवाशांनी दिलेले आहे. त्यातील कांही जणांनी दिलेली माहिती पुढे दिली आहे. बार्थेमा नांवाचा इटालियन प्रवासी १५०२ मध्ये विजापूरला भेट देऊन गेला. विजापूरच्या सुलतानाचे वर्णन तो बलाढ्य, उदार आणि श्रीमंत असे करतो. त्याच्या एकंदर सैन्यात २५,००० शिपाई असून त्यापैकी बहुतेक परदेशी असल्याचे तो सांगतो. सुलतानापाशी अनेक जहाजे असून तो ख्रिस्ती लोकांचा शत्रू असल्याचे वर्णन त्याने केले आहे. विजापूरला भेट देणारा दुसरा प्रवासी म्हणजे **बार्बोसा** हा होय. (१५०० ते १५१४) तो असे सांगतो की विजापूरचा सुलतान हा बराच काळ गोव्यात रहात असे. विजापूर राज्यांत मोठमोठी शहरे असून राज्याचा व्यापार फार मोठा होता, व त्यापासून बादशाहाला खूप उत्पन्न होत असे. बार्बोसा याने बीदरलाही भेट दिली. त्यावेळी बीदर येथे दुसरा महमूदशहा बहमनी हा नामधारी सुलतान होता. त्याच्याबाबत बार्बोसा असे सांगतो की या सुलतानाने आपले सारे राज्य आपल्या सरदारांत विभागले असून तो स्वतः राज्यकारभारात लक्ष न घालता चैनीमध्ये आपले आयुष्य घालवितो. हे सरदार जेव्हा–जेव्हा त्याला भेटावयास येतात तेव्हां त्याला देणग्या देतात. त्यांच्यापैकी एखाद्याने बंड केल्यास इतर जण त्याच्यावर चालून जाऊन त्याचा पाडाव करतात. प्रत्येकाजवळ पुष्कळ घोडेस्वार आणि उत्तम धनुर्धारी असून ते अरबी, फारशी आणि दक्षिणी भाषा बोलतात. दक्षिणी भाषा ही त्यांच्या देशातील भाषा आहे. बार्बोसाने सैन्यातील शिपायांच्या पोषाखांचे आणि त्यांच्या लढण्याच्या पद्धतीचे

अतिशय उत्कृष्ट असे वर्णन दिलेले आहे. बार्बोसाने विजापूर प्रमाणेच अहमदनगरलाही भेट दिली. अहमदनगर हे देशाच्या आतल्या भागात असून त्या राज्याचा फार मोठा विस्तार असल्याचे आणि राज्याचे मुख्यबंदर चेऊल असल्याचे तो सांगतो. त्याने चेऊलचे, तेथील लोकांचे आणि तेथील व्यापाराचे अतिशय उत्तम असे वर्णन दिलेले आहे.

## फ्रेडेरीक

सोळाव्या शतकाच्या अखेरीला फ्रेडेरीक या प्रवाशाने प्रथम अहमदनगरला भेट दिली (१५८६). अहमदनगरच्या सुलतानाजवळ दोन लक्ष सैनिक असून भारी तोफखाना असल्याचे वर्णन त्याने केले आहे. काही तोफा इतक्या प्रचंड होत्या की त्या मोडून मगच लढाईच्या मैदानात न्याव्या लागत. अहमदनगरचा पाडाव झाल्यानंतर १७ व्या शतकात विजापूर आणि गोवळकोंडा यांचा पाडाव होई पर्यंत अनेक परदेशी प्रवासी हिंदुस्थानात आले. त्यापैकी काहींनी अहमदनगर, विजापूर या राज्यांना भेट दिली. त्यांनी दिलेली हकीकत पुढे थोडक्यात दिली आहे.

## पायरार्ड

पायरार्ड हा फ्रेंच प्रवासी १६०१ ते १६०८ या दरम्यान हिंदुस्थानात होता. त्याने चेऊलला भेट दिली. चेऊलच्या अधिकाऱ्याला मलिक म्हणतात आणि तो मोगलांचा मांडलिक आहे असे पायरार्ड सांगतो. मलिकजवळ मोठ्या संख्येने हत्ती असल्याचे त्याने वर्णन केले आहे. मलिकच्या जेवणाचा थाट फार मोठा असल्याचे तो सांगतो. भोजन आटोपल्यावर मलिक हा मानवी जीवनाची अशाश्वतता आणि माणसांचा अधमपणा यावर विचार करून मगच निद्रेच्या आधीन होत असल्याचे तो सांगतो.

## मॅन्डेल्स्लो

१६३९ मध्ये फ्रेंच प्रवासी मॅन्डेल्स्लो याने विजापूरला भेट दिली. विजापूरचा सुलतान जरी मोगलांचा मांडलीक असला तरी तो एकावेळी दोन लक्ष सैन्य उभे करू शकत असल्याचे त्याने लिहिले आहे. त्याच्यापाशी फार मोठा तोफखाना असून त्यापैकी पितळेची एक तोफ एका इटालियन कारागिराने बनविलेली होती. विजापूर राज्यातून तऱ्हेतऱ्हेचा माल बाहेरच्या देशात जात असे. राज्यामध्ये प्रचलीत असलेले नाणे म्हणजे लारीन अथवा लारी असे असल्याचे तो सांगतो.

## टॅव्हर्नियर

१६४८ मध्ये टॅव्हर्नियर या प्रवाशाने विजापूरला भेट दिली. विजापूरची मोगलांबरोबर सारखी युद्धे चालू असून मोगलांना विजापूरवर मात करण्यात यश न मिळाल्याचे तो सांगतो. विजापूरमधील दोन मोठ्या बाजारपेठा म्हणजे रायबाग आणि वेंगुर्ला असल्याचे तो लिहितो.

### ओगिल्बि

विजापूरचा पाडाव होण्याचे आगोदर काही वर्षे ओगिल्बि याने विजापूरला भेट दिली. त्याने विजापूरकरांच्या सैन्याचे, त्यांच्या शस्त्रांचे आणि त्यांच्या युद्धपद्धतीचे फार सुंदर वर्णन केले आहे. विजापूरच्या बादशहाजवळ दोनशे तोफा असून एकावेळी दोन लक्ष सैन्य तो उभे करु शकत असल्याचे ओगिल्बिने लिहिले आहे. राजधानीमध्ये दिवाणी कज्जांचे काम कोतवालाकडे असून फौजदारी खटले सुलतान स्वत: निकालात काढीत असल्याचे तो सांगतो. गुन्हेगारांना अतिशय कडक शिक्षा देण्यात येतात असेही वर्णन त्याने केलेले आहे.

### मोगल राज्यकारभार

हे झाले बहमनी आणि त्यानंतरच्या शंभर वर्षाच्या कालखंडातील विजापूर, अहमदनगर आदि शाह्यांतील राज्यकारभाराचे वर्णन. इ. स. १६०० मध्ये अहमदनगर मोगलांनी ताब्यात घेतल्यावर त्यांच्या राज्यपद्धतीचा प्रभाव महाराष्ट्रावर पडला. १५७२ मध्ये महाराष्ट्राचा थोडासा भाग म्हणजे खानदेशातील त्यावेळचे सुलतानपूर आणि नंदूरबार हे जिल्हे मोगलांनी आपल्या साम्राज्यात समाविष्ट करुन घेतले. १५९६ मध्ये वऱ्हाड त्यांच्या ताब्यात आला. १६०० मध्ये अहमदनगरचा किल्ला आणि शहर त्यांनी जिंकले. १६०१ मध्ये खानदेशचे राज्य त्यांनी खालसा केले. अशा तऱ्हेने सतराव्या शतकाच्या सुरवातीला जवळ जवळ $\frac{1}{3}$ महाराष्ट्रावर मोगलांची सत्ता चालू झाली. फरिश्त्याने खानदेश आणि अहमदनगरच्या संदर्भात मोगल आक्रमणाची भरपूर माहिती दिली आहे. सहाजिकच मोगल राज्यकारभाराची थोडी फार माहिती या ठिकाणी करुन घेणे अवश्य आहे. मोगलांची राज्यपद्धती ही बहमनी आणि इतर शाह्या यांच्या राज्यपद्धतीपेक्षा उच्चप्रतीची होती. सतराव्या शतकाच्या सुरवातीपर्यंत वर उल्लेख केल्याप्रमाणे मोगलांच्या ताब्यातील आजच्या महाराष्ट्रातील महत्वाचे **सुभे** म्हणजे खानदेश आणि वऱ्हाड हे होत. **सुभ्याचा** प्रमुख **नायब सुभेदार** अथवा **सुभेदार** हा असे. **महसूलाच्या** बाबतीत **सुभेदाराला** मदत करण्यासाठी **दिवाण** हा अधिकारी असे आणि संरक्षणाच्या बाबतीत **बक्षी** हा अधिकारी असे. प्रत्येक प्रांताची विभागणी जिल्ह्यामध्ये झालेली असून या जिल्ह्यांना **सरकार** असे म्हणत. जिल्हयाचा प्रमुख **फौजदार** असे. **महसूलाच्या** बाबतीत मदत करण्यासाठी जिल्हयाच्या ठिकाणीही **महसूल** अधिकारी असत. प्रांताचा **दिवाण** आणि **सुभेदार** हे दर्जाने सारखे असत. जमीन **महसूलाच्या** बाबतीत मोगल हे अतिशय काटेकोर असत. जरी वरिष्ठ मोगल अधिकारी **महसूलाच्या** वसूलीबाबत देखरेख करीत तरी देखील वंशपरंपरेने चालत आलेल्या **पाटील, कुलकर्णी, देशमुख** आणि **देशपांडे** या **वतनदारांचा** ते भरपूर उपयोग करुन घेत. न्यायदानाचे काम हे तत्कालीन स्थित असलेल्या स्थानिक

संस्थेकडेच सोपविलेले होते. परंतु प्रत्येक प्रांतावर न्यायाचे काम **काजी** पाहात असे प्रांतामध्ये असलेल्या किल्ल्यांवर किल्लेदाराची नेमणूक ही मध्यवर्ती सरकारकडून केली जाई. हे अधिकारी **सुभेदाराला** जबाबदार असत.

मोगल सम्राटाचे स्थान राज्यकारभारांत सर्व सत्ताधिशासारखे असे. राज्याचे सर्वाधिकार त्याच्याकडे असत इतकेच नव्हे तर तो सेनाप्रमुखही असे. त्याच प्रमाणे न्यायखात्याचा तो वरीष्ठ असून कायदे करण्या बाबतचे उच्चाधिकार त्याच्याकडे असत. तात्विक दृष्ट्या त्याच्यावर धर्मानितीनियमाचे बंधन असे पण प्रत्यक्षात मात्र ही बंधनें तो केव्हाही झुगारुन देऊ शकत असे. बादशहाला मदत करण्यासाठी एक मंत्रीमंडळ असून त्याचा मुख्य **वजीर** हा असे. सर्व सामान्यपणे बादशहा आपल्या मंत्रीमंडळाचा सल्ला घेत असे, परंतु असा सल्ला घेण्याचे आणि घेतल्यास तो पाळण्याचे त्याच्यावर बंधन नसे.

राज्यकारभाराचे कामात बादशहाला आणखी मदत होत असे ती त्याच्या सरदार मंडळीची. दिल्ली सुलतानांच्या सरदारांप्रमाणे ही सरदारी परंपरागत नसे. सरदाराचा मृत्यु झाल्यावर त्याची सर्व मालमत्ता सरकार जमा होत असे. सहाजिकच सरदार मंडळीत आपल्या हयातीतच आपली सर्व मालमत्ता उधळून टाकण्याची वृत्ति बळावत असे. याचा परिणाम असा झाला की मोगलकालीन सरदार हे जुल्मी राजसत्तेला तोंड फोडणारे झाले नाहीत तर तिच्या समोर सतत नमून वागण्याची वृत्ती त्यांच्यामध्ये बळावली

मोगल कालीन शासनामधील अधिकारी हे दोन वर्गात मोडत. एक वर्ग परदेशी मुसलमानांचा व दुसरा एतद्देशीय मुसलमानांचा. प्रत्येक अधिकारी हा **मनसबदार** असे आणि सरकारला त्याच्या **मनसबीनुसार** सैन्य आदा करण्याचे त्याचे काम असे. **मनसब** ही १० पासून १०००० पर्यंत असे. प्रत्येक **मनसबदार** हा बादशहाला जबाबदार असे. **मनसबदाराकडे** फौज पुरवठा करण्याचे काम सोपविलेले असल्यामुळे सरकारला मोठ्या प्रमाणात राखीव सैन्य ठेवण्याची जरुरी भासत नसे. **मनसबदार** हे त्यांच्या जहागिरीच्या प्रमाणांत कधीच फौजफाटा ठेवीत नसत, त्यामुळे अधूनमधून खानेसुमारी करण्याची पद्धती व घोड्यांना **डाग** देण्याची प्रथा ही सुरु करण्यात आली. बहमनी आणि शाह्या यांच्या प्रमाणेच मोगल सैन्यात पायदळ, घोडदळ, तोफखाना आदींचा समावेश असे. मोगलांचे नाविक दलही सुसज्ज ठेवलेले असे. अर्थात् शस्त्रसज्जता आणि आक्रमक शक्ती याबाबत जसे बहमनी आणि शाह्या यांचे नाविक सामर्थ्य इंग्रज, पोर्तुगीज वा डच यांच्या बरोबर तुलना करतांना कोते पडले तीच गोष्ट मोगलाच्या नाविक सामर्थ्याबाबतही म्हणता येईल. अकबर आणि शहाजहान यांच्या कालखंडात मोगलांचा संरक्षण विभाग जितका कार्यक्षम होता तेवढी कार्यक्षमता पुढील कालखंडात राहिली नाही याबद्दल काहीच संशय नाही.

राज्यकारभाराची विभागणी खातेवार केलेली असे आणि प्रत्येक खात्याचा एक

प्रमुख असे. मध्ययुगीन कालखंडाच्या पूर्वार्धाबरोबर तुलना करताना मोगल कालीन खाते निहाय वाटणी ही निश्चित स्वरूपाची होती आणि त्याचप्रमाणे खातेप्रमुखाचे काम हे देखिल निश्चित आणि आखून दिलेले होते. हे खातेदार अधिकारी म्हणजे **खान–इ–सामान, दिवाण, काजी, मिर बक्षी, सद्र–उस् सद्र** आणि **मुहतसीब** हे होते. या सर्व अधिकाऱ्यातील जेष्ठ अधिकारी **वजीर** हा असून त्याचा इतर खात्यांवर ताबा चाले. या सर्व अधिकाऱ्यांकडे राज्याच्या वेगवेगळ्या खात्यांचा अधिकार सोपविलेला असे. या अधिकाऱ्यांशिवाय राज्याचे इतर दुय्यम अधिकारी म्हणजे **मीर आतीश, दारोगा, मीरमल, मुस्त्राउफी, नजीर–ई–बुयातृत, मुश्रीफ, मीरबहरी, वाकाईनवीस, मीरअर्ज मंजील, मीर तोजाक** वगैरे.

मोगलकालीन शहरातील पोलीस व्यवस्था ही अतिशय कार्यक्षम होती. पोलीस दलाचा प्रमुख **कोतवाल** नावाचा अधिकारी असे. त्याचे मुख्य काम शहरामध्ये शांतता राखण्याचे असे. शहरापेक्षा जास्त मोठ्या विभागावर फौजदार नावाचा अधिकारी नेमला जाई. हा अधिकारी बहुतेक करून लष्करी अधिकारी असे.

अकबराच्या काळात आणि पुढे जहांगीरच्या काळात राज्याची विभागणी सतरा प्रांतात झालेली होती. औरंगजेबाच्या काळात ही संख्या एकवीस झाली. प्रांताचा अधिकारी **सुभेदार, साहिब सुबा** अथवा **सिपाह सालार** या नावाने ओळखला जाई. त्याला **नजीम** असेही म्हणत. प्रांताचा राज्यकारभार हा केंद्रीय सरकाराप्रमाणेच चालत असे. सुभेदाराच्या हाताखाली **दिवाण, बक्षी, कोतवाल, फौजदार, काजी, सद्र, अमील, बिटीकची, पोतदार** आणि **वाकाईनवीस** हे अधिकारी असत.

मोगल कालीन न्यायदानाची पद्धत ही अतिशय सोपी होती. त्याकाळी लेखी असा कायदा नव्हता. कुराणाची वचने, **फतवे** आणि बादशहांचे **कानून** यांच्या आधारे न्यायदान केले जाई. न्यायदानाचे काम हे जलद व्हावे अशी मोगल बादशहांची सक्त ताकीद असे. या संदर्भात अकबराचे उद्गार हे ध्यानात ठेवण्या जोगे आहेत. तो एके ठिकाणी म्हणतो की "जर का माझ्या हातून अन्याय झाला तर मी माझ्या विरूद्ध फिर्याद दाखल करीन". न्याय खात्याचा प्रमुख हा **काजी** असे. प्रत्येक प्रांताच्या राजधानीत तो दुय्यम **काजींची** नेमणूक करी. त्याशिवाय न्यायखात्यात **मुफ्ती** आणि **मिरआदल** नावाचे अधिकारी असत. वरील प्रमाणे जरी न्यायखात्याची संघटना असली तरी न्यायाबाबतचे सर्व अधिकार बादशहाकडे असत. न्यायखात्याच्या अधिकाऱ्यांवर त्यांच्या वागणुकीबाबत अतिशय कडक बंधने असत. मोठ्या गुन्ह्यांबद्दल कडक शिक्षा दिली जात असे. देहांतशिक्षा दिली गेल्यास त्यासाठी बादशहाची अनुमती लागे.

मोगलांच्या महसूल पद्धतीचे दोन भाग होते. एक केंद्रीय आणि दुसरा प्रांतिक.

केंद्रीय आणि प्रांतिक सरकारांच्या उत्पन्नाच्या अनेक बाबी होत्या. केंद्रीय सरकारच्या उत्पन्नाची प्रमुख बाब म्हणजे जमीनी पासून मिळणारे उत्पन्न ही होती. जमीन महसुलाची पद्धत भक्कम पायावर आधारली जावी म्हणून अकबराने राजा तोडरमल यांची खास नेमणूक केली. त्याने सुचविलेल्या सुधारणा मोगलांनी दक्षिणेत जिंकून घेतलेल्या दक्षिणेतील प्रदेशालाही लागू केल्या. महसूलाच्या अंमलबजावणीसाठी मोगल साम्राज्याची विभागणी **सुभ्यामध्ये** केली होती. **सुभ्यांची** विभागणी **सरकारांत** आणि **सरकारांची परगण्यामध्ये** असे. जिल्ह्यातील महसूलाचा वसूल करण्यासाठी **अमलगुजार** नांवाचा अधिकारी असे. त्याला **मुकादम, पटवारी, कारकुन, कानुंगो** वगैरे अधिकारी वसूलाच्या कामांत मदत करीत असत. रयतेला त्रास न देता वसूल करण्यासंबंधी त्यांना सक्त हूकुम असत. सुरुवातीला ही व्यवस्था अतिशय कार्यक्षम होती. परंतु कालांतराने अधिकाऱ्यांमधील दिरंगाई आणि लाचलूचपत यामुळे ही व्यवस्था डबघाईला आली.

## मध्ययुगीन काळखंड–कला आणि वाङ्मय–बहमनी

बहमनी सम्राट आणि बहमनींच्या विघटना नंतर अस्तित्वात आलेल्या शाह्यांचे सुलतान हे त्यांच्या परीने कलेचे उपासक आणि वाङ्मयाचे भोक्ते होते. सहाजिकच त्यांच्या काळांत निर्माण झालेले वाङ्मय आणि कला कुसरीची कामे यांचा या ठिकाणी थोडक्यांत परामर्श घेतल्यास त्यामध्ये काहीही वावगे होणार नाही. मध्ययुगीन महाराष्ट्राच्या इतिहासाचा हा कालखंड पूर्वार्धासारखा समजला तर मध्ययुगीन महाराष्ट्राचा मोगल कालखंड उत्तरार्धासारखा समजावा लागेल. या दृष्टीकोनातून बघितल्यास मोगल कालखंडातील कलाकुसरीची कामे आणि वाङ्मयीन विकास यांचाही विचार करणे क्रमप्राप्त ठरेल.

बहमनींच्या कारकिर्दीत फारशी भाषेचा फार मोठा विकास झाला. फारशी लेखकांनी काव्य, चरित्रे, इतिहास, धर्म वगैरे विषयावर विद्वत्तापूर्ण लिखाण करुन वाङ्मयात फार मोठी भर टाकली. या लेखकापैकी नावाजलेले लेखक म्हणजे सुप्रसिद्ध अवलिया गेसू दराज बंदे नवाज याचा बाप शहा राजू कत्ताल, बुऱ्हाण उद्दीन गरीबशहा, सिराल ए जूनैदी आणि ऐनउद्दीन गंजउल् उल्म हे होते. शहाराजू कत्ताल याने लिहिलेला "**दिवाण**" हा फार नामांकीत असा ग्रंथ समजला जातो. सय्यद गेसू दराज हा १४२२ मध्ये गुलबर्गा येथे मरण पावला. याने लिहिलेल्या ग्रंथाची संख्या शंभर असून त्यापैकी बारा प्रसिद्ध झालेले आहेत. यापैकी बहुतेक ग्रंथ धर्मविषयक आहेत. बंदे नवाज हा एक फार मोठा कवीही होता. हे झाले बहमनींच्या कालखंडाच्या पूर्वार्धातील लेखक. बहमनींच्या कालखंडाच्या उत्तरार्धात झालेल्या लेखकांमध्ये मखदूम फकी अली आणि शहा बुद्दीन अहमद दौलताबादी या दोघांचा उल्लेख करावा लागेल. यापैकी

पहिल्याचा मृत्यू १४८२ मध्ये झाला. त्याच्या नावावर फारशी आणि अरबी भाषेतील अकरा ग्रंथ आहेत. दौलताबादी १८४५ मध्ये मरण पावला. त्याच्या नावावर "**बहरे मव्वाज**" हा सुप्रसिद्ध ग्रंथ आणि धर्मविषयक अनेक ग्रंथ आहेत. बहमनी सुल्तानांना काव्य आणि गद्य यांची अतिशय आवड होती. बहमनींचा इराण आणि मध्यआशियातील अनेक देशांशी सतत संपर्क होता. सहाजिकच इराण आणि इतर देशातील अनेक कवी आणि विद्वान यांनी बहमनींच्या दरबारात आश्रय घेतला. इराणचा सुप्रसिद्ध कवी ख्वाजा हाफीज याला दुसऱ्या महमदशहा बहमनीच्या कारकिर्दीत हिंदुस्थानात येण्याचे आमंत्रण दिले गेले होते. फिरोजशहा बहमनी हा स्वतः उत्तमपैकी कवी होता. त्याच्या दरबारात असलेला विद्वान लेखक म्हणजे मुल्ला दाऊद बीदरी हा होय. त्याने "**तोहफूत सलातीन**" हा उत्कृष्ट ग्रंथ लिहिला. बहमनींच्या दरबारातील आणखी एक कवी म्हणजे आजरी हा होय. त्याने बहमनी सुल्तानांचा इतिहास "**बहमन नामा**" या ग्रंथात लिहिला. काही काळ बहमनींच्या दरबारात राहिल्यानंतर तो पुढे इराणला गेला. बहमनी सुल्तानांचा सुप्रसिद्ध वजीर ख्वाजा महमूद गावान याने बीदर येथे मद्रासा म्हणजे महाविद्यालयाची स्थापना केली. या ठिकाणी इराण आणि इराक मधील विद्वानांना व्याख्याने देण्यासाठी बोलाविण्यात येई. महमूद गावान हा स्वतः विद्वान होता. त्याने बाहेरील जगाबरोबर सांस्कृतिक संबंध प्रस्थापित केले, इतकेच नव्हे तर इराण, तुर्कस्तान वगैरे देशांमधील विद्वानांबरोबर पत्रव्यवहार केला. मौलाना जामी शर्फुद्दीन अली, ख्वाजा उबेदुल्ला आणि जलालउद्दीन दवनी या विद्वान लेखकांबरोबर त्याचा सतत पत्रव्यवहार चालू असे. त्याशिवाय जगातील अनेक मुसलमानी राष्ट्रांच्या सुल्तानांबरोबर व त्याचप्रमाणे हिंदुस्थानातील मुसलमानी राज्यांच्या सुल्तानांबरोबरही त्याचा पत्रव्यवहार होता. यामध्ये विशेष उल्लेख तुर्कस्थानचा सुल्तान दुसरा महमद, गिलान, इजिप्त आणि इराक या देशांचे सुल्तान व गुजराथ, जौनपूर आणि माळवा या देशांचे राज्यकर्ते यांचा करावा लागेल. हा पत्रव्यवहार "**रियाजुल-इन्शा**" या नावाने प्रसिद्ध झाला आहे.

बहमनींच्या कारकिर्दीत दक्षिणी भाषेचा विकास झाला. परंतु बहमनी राज्यकर्ते या विकासाला कारणीभूत होते असे म्हणता येणार नाही. दक्षिणी भाषेतील वाङ्मयाची उत्पत्ती ही पुढील शाह्यांच्या काळांत झाली. यादवांचे राज्य नाहीसे होऊन त्या ठिकाणी नव्यानेच स्थापन झालेल्या बहमनी राज्याच्या पूर्वार्धात या संक्रमणाचे दूरगामी असे परिणाम दक्षिणी भाषेत निर्माण झालेल्या वाङ्मयावर झाले. याच काळांत मुसल्मान धर्मातील एका नवीन पंथाचा म्हणजे **सुफींचा** उदय झाला. **सुफींच्या** विचारसणीचा फार मोठा परिणाम बहमनींच्या बहुसंख्य प्रजेतील विचारवंतांच्या विचार-सरणीवर झाला. किंबहुना **सुफी** पंथीयांची विचार सरणी आणि हिंदूमधील भक्तिपंथ हे

जवळ–जवळ सारख्याच विचारसरणीचे होते असे म्हटल्यास त्यात काहीच हरकत नाही. १५ व्या शतकांत उदयास आलेल्या दत्तात्रय पंथाने आणि पुढील काळांत अस्तित्वात आलेल्या महानुभावांनी हिंदू आणि मुसलमान धर्मातील विचारसरणीचा समन्वय साधण्याचा प्रयत्न केला. परंतु वर सांगितल्याप्रमाणे बहमनी राज्यकर्त्यांनी मात्र लोकांची जी बोली भाषा होती तिचा विकास करण्यासाठी कोणतेही प्रयत्न केले नाहीत हे निर्विवाद. बहमनींच्या काळांत मराठी वाङ्मयाची जी उत्पत्ती झाली ती **भागवत** आणि **महानुभाव** पंथांच्या विचारवंतांकडूनच. यामध्ये समाजातील सर्व थरांचे लोक होते. या काळांमध्ये होऊन गेलेल्या **भागवत** पंथामधील प्रमुख संत म्हणजे नामदेव, गोरोबा, चोखामेळा, कान्होपात्रा आणि सावतामाळी हे होते.

बहमनी राज्यकर्ते हे कला आणि स्थापत्य यांचे आश्रयदाते होते. परंतु बहमनी कालीन शिल्प आणि वास्तू यांचे फारच थोडे अवशेष महाराष्ट्रामध्ये आहेत. प्राचीन महाराष्ट्राचे शिल्प म्हणजे **हेमाडपंती** देवळे, कोरीव लेणी, बुद्धकालीन स्तूप आणि काही डोंगरी किल्ले. कला कुसरीने नटलेले राजवाडे, भव्य आणि प्रचंड बांधकामे, मीनार वगैरे गोष्टी प्राचीन महाराष्ट्राला अवगत नव्हत्या. किंबहुना महाराष्ट्राची भूमी आणि महाराष्ट्राचे लोक याची पडछाया महाराष्ट्राच्या शिल्यावर पडली होती असे म्हटल्यास त्यांत काहीच वावगे होणार नाही. नवीन राज्यकर्त्यांनी त्यांच्या शिल्पाची कल्पना दक्षिणेमध्ये आणली आणि दक्षिणेचे आणि त्याबरोबरच महाराष्ट्राचेही सारे शिल्पच बदलून टाकले. या नवीन शिल्पांत प्रचंड **मनोरे** आणि **मीनार**, **कबरी** आणि **दर्गे**, भुईकोट **किल्ले**, **गढ्या**, व डोंगरी आणि सागरी **किल्ले** यांचा आपल्याला समावेश करावा लागेल. हे नवीन शिल्प म्हणजे हिंदू, फारशी आणि तुर्की शिल्पांचा समन्वय होते असे म्हटल्यास ते योग्यच ठरेल. विशेषतः नवीन राज्यकर्त्यांनी जे भुईकोट **किल्ले** बांधले ते या शिल्पाचे महाराष्ट्रातील उत्कृष्ट प्रतीक आहेत असे म्हणावे लागेल. बहमनींच्या काळचे किल्ले म्हणजे उद्गीर, औसा, नळदुर्ग, परंडा आणि कंधार हे होत. यापैकी परंडा, उद्गीर आणि औसा हे किल्ले महमूद गावानने तो बहमनींचा मुख्य वजीर असताना बांधले. बहमनींच्या दोन राजधान्या झाल्या. एक गुलबर्गा आणि दुसरी बिदर. सहाजिकच बहमनींचे सारे शिल्प–टोलेजंग राजवाडे, विविध तऱ्हेच्या कला कुसरीने नटलेल्या मशीदी, प्रचंड दगडात बांधलेले मनोरे आणि मीनार ही सारी महाराष्ट्रा बाहेर आहेत. वरील किल्ल्यांशिवाय महाराष्ट्रामध्ये असलेल्या बहमनी कालीन शिल्पामध्ये खुल्दाबाद येथील काही अवलीयांच्या कबरी आणि दौलताबाद येथील चांदमीनार यांचा उल्लेख करावा लागेल.

## अहमदनगर, विजापूर आणि इतर शाह्या

बहमनींप्रमाणेच त्यांच्या नंतर अस्तित्वात आलेल्या शाह्यांचे सुलतान हे शिल्प

आणि कलाकुसरीची कामे यांचे चाहते होते. अहमदनगरचा किल्ला, सलाबतखानाची **कबर** आणि **हश्त बिहश्त** आणि **फराहबाग** या दोन अहमदनगरमधील सुप्रसिद्ध बागा हे अहमदनगरच्या निजामशहांनी बांधलेल्या कलाकृतींचे आज उरलेले अवशेष आहेत. शेकडो वर्षे काळाचे धक्के सहन करीत ही शिल्पे आपल्या निर्माणकर्त्यांच्या वैभवाची साक्ष देतात. अहमदनगर प्रमाणेच विजापूरचे आणि गोवळकोंड्याचे सुल्तान कलेचे आश्रय-दाते होते. विजापूरच्या सुलतानांनी बांधलेल्या कलाकृती बहुतेक महाराष्ट्राबाहेर आहेत. त्यामध्ये विजापूरचा गोलगुंबझ आणि विजापूरचा किल्ला यांचा उल्लेख करावा लागेल.

बहमनी राज्यकर्त्यांप्रमाणेच बहमनीच्या नतर झालेल्या शाह्यांचे सुल्तान विशेषतः अहमदनगर आणि विजापूर या शाह्यांचे सुल्तान वाङ्मयाचे उपासक आणि विद्वानांचे आश्रयदाते होते. या दोन्ही शाह्यांच्या दरबारी अनेक हिंदुस्थानी आणि परकीय विद्वान आश्रयाला होते. सुप्रसिद्ध इतिहासकार फरिश्ता हा प्रथम अहमदनगरच्या दरबारांत चाकरीला होता. नंतर तो विजापूर दरबाराकडे गेला. तेथे त्याने आपला प्रस्तुत ग्रंथ **"गुलशने इब्राहीमी"** म्हणजेच हिंदूस्थानामधील मुसल्मानी सत्तेचा उदय हा लिहिला. त्याच प्रमाणे **"बुऱ्हाण-ई-मासीर"** या ग्रंथाचा कर्ता सय्यदअली तबात-बाई हा देखील अहमदनगरच्या सुलतानांचाच आश्रीत होता. वरील दोघाप्रमाणेच रफी उद्दीन शिराजी हा इतिहासकार शाह्यांच्या काळांत होऊन गेला. त्याने आपला ग्रंथ **"तजकरत - उल मुलुक"** हा १६०९ मध्ये लिहून पुरा केला. अहमदनगर आणि विजापूर या दोन राज्यांच्या पदरी असलेल्या कवींमध्ये मलीकइकुमी, जहुरी, मुल्ला हैदर आणि संजर-ई-काशी यांचा उल्लेख करणे आवश्यक आहे. विजापूरचा सुलतान दुसरा इब्राहीम आदिलशहा हा स्वतः उत्कृष्ट कवी होता. त्याने अनेक कवींना आपल्या दरबारी आश्रय दिला. परिणामी त्याच्या कारकिर्दीत दक्षिणी भाषेची भरभराट झाली.

पर्शियन भाषेइतके सुलतानांच्या दरबारात मराठी भाषेला मात्र उत्तेजन दिले गेले नाही ही गोष्ट निर्विवाद होती. तरी देखील राजाश्रयाशिवाय मराठी भाषेची या कालखंडात अतिशय भरभराट झाली. याकाळांत मराठी भाषेमध्ये जे लिखाण झाले त्या लिखाणाला हातभार महाराष्ट्रातील सर्व थरातील लोकांनी लावला. दत्तात्रय पंथाचे अनुयायी जनार्दन स्वामी हे अहमदनगरच्या सुलतानांच्या चाकरीत होते. त्यांनी काही कवने आणि अभंग लिहिले. परंतु मराठी वाङमयात या कालखंडात अपरंपार भर ज्यांनी टाकली ते म्हणजे एकनाथ. जनार्दन स्वामी हे एकनाथांचे गुरु. एकनाथांचा जन्म इ. स. १५४८ मध्ये झाला. एकनाथांनी स्फूर्ती घेतली ती ज्ञानेश्वरीपासून. त्यांनी पहिल्याप्रथम **भागवत पुराणाच्या** ११ व्या अध्यायावर टीकारुप ग्रंथ लिहिला. ज्ञानेश्वरी वगळता इतका समर्थ दुसरा ग्रंथ झाला नाही असे विधान केल्यास ते चूक ठरणार नाही. एकनाथांचे इतर लिखाण म्हणजे **'रुक्मिणी स्वयंवर', 'बालक्रीडा', 'प्रल्हादचरित्र', 'सुखशतक'**

'**स्वात्मसुख**', '**आनंदलहरी**', '**अनुभवानंद**', '**रामायण**' वगैरे. एकनाथांचे काही समकालीन जे लेखक होते त्यांचाही उल्लेख या ठिकाणी करणे अवश्य आहे. त्यांच्यामधील विठा रेणुकानंद, जनीजनार्दन आणि रामजनार्दन ह्या सर्व मंडळींनी भक्तिगीते रचली. त्या शिवाय अडाण्या कवी, कान्हो, नामा आणि निर्मलपाठक हे देखील एकनाथांचे समकालीन होते. त्याशिवाय बहिरा पिसा या अतिशय चमत्कारीक व्यक्तीमत्वाच्या लेखकाचा उल्लेख या ठिकाणी करणे जरुर आहे. याने गीतेच्या दहाव्या अध्यायावर टीकात्मक असा ग्रंथ लिहिला. एकनाथांच्या समकालीन विद्वानांमध्ये प्रामुख्याने ज्यांचा उल्लेख करावयाला पाहिजे ते म्हणजे दासोपंत. दासोपंतांचा जन्म १५५१ मध्ये झाला. त्यांचे वडील अहमदनगरच्या सुलतानांच्या चाकरीत होते. दासोपंतांचे लिखाण हे अमाप असून त्यांनी गीतेवर सहा टीका ग्रंथ लिहिलेले आहेत. दासोपंतांची इतर ग्रंथ संपत्ती म्हणजे '**पदार्णव वाक्यविवृत्ती**' आणि '**पंचीकरण**'. हा शेवटचा ग्रंथ दासोपंतांनी कापडावर लिहिला आणि म्हणून त्याला '**पासोडी**' असे म्हणतात.

मराठीं भाषेला जसा राजाश्रय मिळाला नाही तसाच संस्कृत भाषेलाही मिळाला नाही. याचा परिणाम असा झाला की दक्षिणेमध्ये संस्कृत भाषेचा ऱ्हास झाला. संस्कृतच्या व्यासंगासाठी प्रसिद्ध असलेली नांदेड, पैठण, पुणतांबा आणि नाशिक येथील कुटुंबे उत्तरेत बनारसकडे आणि दक्षिणेमध्ये कोकणांत राजाश्रयाभावी निघून गेली. तरी देखील वरील ठिकाणांचे धार्मिक संस्कृतीचे केंद्र असे जे स्थान होते ते मात्र या कालखंडात कायम टिकले. समानता आणि परमेश्वराची भक्ती या तत्वांवर आधारलेल्या **भागवत** धर्माचा या कालखंडात महाराष्ट्रातील सर्व वर्गांवर प्रभाव पडला. **भागवत** धर्माचे महत्व जरी समाजात वाढले तरी दक्षिणेमधील राजकीय परिस्थितीवर मात्र **भागवत** धर्माच्या विचारसरणीचा प्रभाव पडला नाही.

**मोगल : कला, समाजव्यवस्था, वाङ्मय आणि शिल्प.**

मागे सांगितल्याप्रमाणे महाराष्ट्राचा जवळ जवळ $\frac{1}{3}$ भाग मोगलांच्या ताब्यात अहमदनगरचा पाडाव झाल्यानंतर आला. मोगलकालीन राज्यव्यवस्था कशी होती याची चर्चा यापूर्वी आलेली आहेच. या ठिकाणी मोगलकालीन समाज व्यवस्था, मोगलकालखंडात निर्माण झालेले वाङ्मय आणि मोगलकालीन शिल्प याचा थोडक्यांत परामर्श घेतल्यास महाराष्ट्राच्या मध्ययुगीन कालखंडाच्या इतिहासाचे समालोचन पुरे केल्यागत होईल. विजापूर आणि गोवळकोंडा यांचा पाडाव १६८७ मध्ये होईतोपर्यंतचा कालखंड मध्ययुगीन महाराष्ट्राचा इतिहासाचा उत्तर कालखंड असे म्हटल्यास त्यात काहीच वावगे ठरणार नाही. सय्यद अलि, फरिश्ता आणि रफिउद्दीन शिराजी हे मध्ययुगीन महाराष्ट्राचे प्रमुख इतिहासकार. परंतु त्यांचा काळ अगोदर झाल्यामुळे मोगलकालीन समाजव्यवस्था, शिल्प अगर वाङ्मय यांचे फारच थोडे परिशिलन आपल्याला त्यांच्या लिखाणात दिसून

येते. सहाजिकच महाराष्ट्राच्या इतिहासाच्या मोगल कालखंडाविषयी वरील माहिती देताना या लेखकांचा थोडासा परंतु १७ व्या शतकातील लेखकांचा भरपूर उपयोग करणे क्रमप्राप्त ठरते. याठिकाणी आणखीही एक गोष्ट नमुद करावीशी वाटते आणि ती म्हणजे १५ व्या आणि १६ व्या शतकात विषेशतः सोळाव्या शतकांत शाह्यांना जे महत्व होते ते १७ व्या शतकात राहिले नाही. दक्षिणेतील तीन राज्ये म्हणजे विजापूर, गोवळकोंडा आणि बिदर ही केवळ नाममात्र राहिली इतकेच नव्हे तर त्यांनी जवळ-जवळ मोगलांचे मांडलिकत्व पत्करले. त्यामुळे १७ वे शतक म्हणजे मोगल सत्तेच्या महाराष्ट्रातील विकासाचे आणि भरभराटीचे. अर्थात यामध्ये मराठ्यांच्या सत्तेचा शिवछत्रपतिंच्या नेतृत्वाखाली झालेला उदय आणि स्वतंत्र मराठी राज्याची झालेली स्थापना याबद्दल चर्चा करण्याचे कटाक्षाने टाळले आहे. महाराष्ट्रातील समाजजीवन, वाङ्मय, शिल्पकला वगैरे संस्कृतीच्या अंगोपांगावर मोगल सत्तेचा जो प्रभाव पडला त्याचेच वर्णन याठिकाणी केले आहे.

सतराव्या शतकांत विजापूर आणि गोवळकोंडा या दोन शाह्यांच्या दरबारांत दक्षिणी उर्दूची अतिशय भरभराट झाली. अतिशय उच्च दर्जाचे असे वाङ्मय या भाषेत १७ व्या शतकांत निर्माण झाले. या वाङ्मयाच्या निर्मितीला दुसरा अली आदिलशहा, महमदकुली कुतुबशहा, नुसरती आणि इतर यांनी हातभार लावला. मोगलांची बोली भाषा ही उर्दू होती. दक्षिणी भाषेची ही जी प्रगति झालेली होती, त्याचा मोगल राज-कर्त्यावर अतिशय प्रभाव पडला. मोगलराजकर्ते हे स्वतः विद्वान आणि लेखक यांचे आश्रयदाते होते. त्यांच्या आश्रयाखाली हिंदुस्थानामध्ये अनेक विद्वान आणि लेखक-मंडळी उदयाला आली. महाराष्ट्राच्या दृष्टीने त्यामधील महत्वाचे लेखक म्हणजे मोगल-काळांत होऊन गेलेले पर्शियन इतिहासकार. यांच्या लिखाणातून महाराष्ट्राच्या इतिहासाचे अनेक उल्लेख आपल्याला मिळतात. या ऐतिहासिक ग्रंथामध्ये मुल्लादाऊद याच्या **'तारीखी अल्फी'**, अबुलफजल याच्या **'ऐनेअकबरी,'** आणि **'अकबरनामा'**, बदाउनीच्या **'मुंतखाबउत्तवारीख'**, निजामउद्दीन अहमद याच्या **'तबकाते अकबरी'** फैजी सरहिंदी याच्या **अकबरनामा'** त्याचप्रमाणे **'मासिरीजहांगिरी' 'इक्बाल-नामा जहांगिरी'** आणि **'जुब्दउत्तवारीख'** या ग्रंथांचा, त्याचप्रमाणे अब्दुल हमीद लाहोरी याच्या **'पादशाहानामा'**, महमद साहीब याच्या **'अमलसलीह'**, खाफीखान याच्या **'मुंतखाब-उल-लुबाब'**, मिरजा महमदखान करीम याच्या **'आलमगिरनामा'**, महमद साकी याच्या **'मासिरी आलमगिरी'**, सुजनराय खतरी याच्या **खुलासात उलतवारीख'**, भीमसेन सक्सेना याच्या **'नक्श्इ दिलकुशा'** आणि ईश्वरदास याच्या **'फतुहात-ई-आलमगिरी'** या ग्रंथाचा उल्लेख करावा लागेल. फारशी भाषेची मोगल कालखंडात जरी भरभराट झाली तरी संस्कृत आणि मराठी भाषेला मात्र मोगलांनी

उत्तेजन दिले नाही. या ठिकाणी मराठी भाषेच्या विकासाच्या संदर्भात एका गोष्टीचा उल्लेख करणे जरुर आहे. ही गोष्ट म्हणजे ज्या सतराव्या शतकांत मोगलांनी आपली सत्ता दक्षिणेत प्रस्थापित करण्याचे कसून प्रयत्न केले त्याच १७ व्या शतकांत मराठ्यांच्या राष्ट्रीयवादाचा उगम आणि विकास झाला. जवळ–जवळ तीनशे वर्षे प्रथम बहमनींच्या अमलाखाली आणि नंतर निर्माण झालेल्या पांच शाह्यांच्या अमलाखाली भरडून निघाल्या-मुळे महाराष्ट्रातील जनता ही गलीत धैर्य होऊन गेलेली होती. मराठ्यांच्या राष्ट्रीयवादाचा १७ व्या शतकांत हा जो उगम झाला त्याचा फार मोठा परिणाम मराठी वाङ्मयाच्या विकासावर झाला. या कालखंडात होऊन गेलेले तुकाराम आणि रामदास यांचा उल्लेख वाङ्मयाचे मेरुमणी म्हणून करावा लागेल. या दोहोंपैकी तुकाराम ह्याचे काव्य भक्तीपर अभंगांचे असून त्यामध्ये मानवी जीवनातील अनिश्चितता व मानवापुढे उभे असलेले प्रश्न यांचे प्रतिबींब आपल्याला सापडते. या दृष्टीने विचार केल्यास तुकारामाच्या भक्तीपर अभंगात आपल्याला त्याकाळच्या समाज जीवनाचे आणि समाजाचा घटक जो सर्वसाधारण माणूस त्याच्या पुढील समस्यांचे चित्रण आढळते. जीवनाच्या धकाधकीतून बाहेर पडण्याचा एकच मार्ग तुकारामांनी सांगितला आणि तो म्हणजे भक्ती. माणसाला जर मोक्षाचे साधन करावयाचे असेल तर तुकारामाच्या दृष्टीने आत्मीक बलाला शारीरीक बलावर विजय मिळविण्याची आवश्यकता होती. रामदासांचे काव्य देखील भक्तीरसाने ओथंबलेले होते. परंतु त्यांच्या काव्याची घडण ही अतिशय वेगळी होती. त्यांचा जीवनाकडे बघण्याचा दृष्टीकोन अधिक धडाडीचा आणि साहसपूर्ण होता. रामदासांच्या काव्याचा उद्देश जीवनातील बारीक सारीक गोष्टीत गुरफटून गेलेल्या व्यक्तीच्या मनांत आत्मीयतेची आणि राष्ट्रीयत्वाच्या भावनेची ज्योत प्रज्वलीत करण्याचा होता. रामदासांनी कर्मवादाचा आपला सिद्धांत इतक्या खणखणीत पणे सांगितला की, गलीतगात्र होऊन गेलेल्या मराठी माणसाच्या मनात कर्तृत्वाचा एक स्फुल्लिंग ठाव देऊन उठला. तुकारामाच्या अभंगानी जसे महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातील मराठी माणसाच्या मनात पडसाद उठविले तसेच रामदासांच्या दासबो-धातील ओव्यांनी मराठी माणसाच्या मनावर एक तऱ्हेची मोहिनी टाकली. या काल-खंडात मराठी भाषेची ज्यांनी अतिशय अनमोल अशी सेवा केली त्यामध्ये वामन पंडीत, रघुनाथ पंडीत आणि मुक्तेश्वर यांचा उल्लेख करावा लागेल.

मोगल कालखंडातील स्थापत्य आणि वास्तुविशेषांचे फारच थोडे अवशेष महाराष्ट्रात शिल्लक आहेत. याचे प्रमुख कारण म्हणजे मोगलांचे महाराष्ट्रातील १७ वे शतक हे जवळ–जवळ युद्धांच्या धामधुमीतच गेले. याचा परिणाम असा झाला की उत्तरेमध्ये याच कालखंडात अतिशय वैभवसंपन्न अशा कलाकृतींची निर्मिती झाली तर दक्षिणेत याच अवधीत नाव घेण्याजोग्या अशा फारच थोड्या कलाकृती निर्माण झाल्या. ज्याला मराठवाड्याची मोहना असे संबोधिता येईल त्या औरंगाबादशहराची निर्मिती,

ही मोगलांच्या काळांत झाली. या शहरामध्ये '**बीबीका मकबरा**,' '**पवन चक्की**,' '**जामेमशीद**,' '**शहागंजदर्गा**' या वास्तूंचे आज जे अवशेष शिल्लक आहेत ते आणि खुद्द औरंगाबाद शहराभोवती जी तटबंदी उभारण्यात आलेली आहे त्यावरून आपल्याला असे दिसते की आपल्या दक्षिणेच्या राजधानीला सर्वतोपरीनी सुंदर बनविण्यासाठी मोगलांनी फार काळजीपूर्वक प्रयत्न केले. मोगलकाळामध्ये दक्षिणेमध्ये ज्या काही कलाकृती निर्माण झाल्या त्या औरंगजेबाच्या काळांत. अकबर, जहांगीर किंवा शहाजहान यांच्या इतकी सौंदर्यदृष्टी औरंगजेबाला नव्हती. त्याच्या कारकिर्दीत निर्माण झालेल्या कलाकृतींचा दर्जा अस्सल मोगल काळात झालेल्या कलाकृतींपेक्षा निश्चित कमी दर्जाचा आहे. याला कारणे अनेक आहेत. खुद्द औरंगजेबाच्या कारकिर्दीतच मोगल साम्राज्याच्या विनाशकाळाला सुरवात झालेली होती. सहाजिकच सांस्कृतीक बाबींना जो राजाश्रय मिळतो तो या काळामध्ये मिळाला नाही. कलाकृतींच्या जोपासनेची ही जी उपेक्षा झाली त्याला कारण बऱ्याच अंशी औरंगजेबाचे व्यक्तीमत्वही कारणीभूत होते. कलेच्या बाबतीतला औरंगजेबाचा दृष्टीकोन अतिशय अदूरदर्शी आणि कोता असा होता. कलेचा हा जो ऱ्हास झाला त्याला तत्कालीन परिस्थितीही कारणीभूत झाली. मोगल साम्राज्याने आपल्या वैभवाची परीसीमा शहाजहानच्या काळात गाठली. कलेचाही फार मोठा विकास त्याकाळात झाला. समाजाची ही प्रगती औरंगजेबाच्या काळात रोखली गेली. या घटनेचा परिणाम कला आणि शिल्प यांचीही प्रगती रोखण्यात झाला.

शिल्प कसे असावे याबाबत औरंगजेबाच्या कारकिर्दीत अस्तित्वात आलेल्या बदलत्या दृष्टीकोनाचे प्रात्यक्षिक आपल्याला औरंगजेबाच्या कारकिर्दीतच दक्षिणेत ज्याकाही कलाकृतींची उभारणी झाली त्यामध्ये दृष्टीस पडते. याचे उदाहरण म्हणजे औरंगाबाद-जवळ औरंगजेबाची बायको रबीया उद् दौरानी हीची असलेली कबर हे होय. औरंग-जेबाच्या हुकमावरून १६७९ मध्ये त्याचा मुख्य शिल्पकार अताउल्ला याने ती बांधली. आकाराने ही कबर जरी ताजमहालाच्या निम्याइतकी असली तरी ती ताजमहालाची हुबेहुब प्रतिकृती वाटते. या कबरीच्या बांधणीकडे बघितल्या नंतर ताजमहाल बांधून उलटलेल्या ३० वर्षांच्या काळांत शिल्पविषयक कल्पना किती बदललेल्या होत्या आणि शिल्पाची कला किती निकृष्टावस्थेस पोहोचली होती हे दिसून येते. शिल्पाच्या बांधणीचे अपरिपक्व ज्ञान असलेल्या औरंगजेबाच्या शिल्पकाराने ताजमहालाच्या बांधणीपेक्षा या कबरीचे बांधकाम सरस करण्याचा आणि एकंदर बांधणी अधिक विलोभनीय करण्याचा प्रयत्न केला. याचा परिणाम असा झाला की जे शिल्प निर्माण झाले ते अगदी दुय्यम दर्जाचे झाले. ताजमहालाचे सौंदर्य त्या कलाकृतीच्या साधेपणात आहे. तो साधेपणा या शिल्पांत यत्किंचित दिसत नाही. अर्थात या शिल्पाचे काही भाग अतिशय उत्कृष्ट असून यावरून असे दिसून येते की औरंगजेबाच्या काळांत योजकांचा जरी तुटवडा असला

तरी उत्कृष्ट कारागिरांचा नव्हता.

बहमनी कालीन आणि त्यानंतरच्या शाह्यांच्या काळांत असलेली समाजरचना ही मोगल काळात पूर्णपणे बदलली. समाजाची विभागणी श्रीमंत आणि गरीब अशा दोन वर्गात झाली. पहिल्या वर्गात सरदार आणि इतर अमीर उमराव असून ते बादशहाच्या खास मर्जीतले असत. बादशहाकडून त्यांना खास अधिकारही दिले जात. दुसरा वर्ग सर्व सामान्य लोकांचा होता. विशेषतः औरंगजेबाच्या कारकीर्दीत सरदारांची वंशपरंपरागत पद्धती दूर केली गेल्यामुळे समाजातील हा वर्ग वृत्तीने बेदरकार बनला. त्यांच्यामध्ये खोटा भपकेबाजपणा, अनाठायी गर्व, अनैतिक वागणूक वगैरे दुर्गुणांचा प्रादुर्भाव झाला. मोगल काळाच्या सुरवातीला राज्याची सारी मदार ही अतिशय कार्यक्षम असलेल्या अमीर उमरावांवर असे. हे उमराव आपल्या अंगातील निव्वळ कर्तृत्वाने मोठ्या पदाप्रत पोहोचत. कालांतराने उमीर उमरावांमधील गुणांचा लोप झाला आणि मोगल साम्राज्याला ते भारभूत झाले. शहाजहानच्या कारकिर्दीच्या अखेरीला आणि औरंगजेबाच्या कारकिर्दीत दरबारातील सरदार मंडळींच्या उत्तान वागणुकीचा परिणाम सर्व साधारण जन मनावर झाला आणि यातूनच राजकीय असुरक्षितता आणि सामाजिक अवनती निर्माण होण्यास मदत झाली.

दुसऱ्या वर्गामध्ये व्यापारी आणि छोटा उद्योगधंदा करणारे अशांचा एक लहानसा वर्ग होता. आजच्या काळात त्यांची तुलना मध्यम वर्गाबरोबर करता येईल. ह्या वर्गाची वृत्ती आपल्या परीने श्रीमंत आणि सुखासीन अशा वर्गाचे अनुकरण करण्याची होती. परंतु सर्वसामान्य असा जो वर्ग होता त्याची परिस्थिती मात्र अनुकंपनीय होती. १७ व्या शतकात जरी जीवनाला आवश्यक असणाऱ्या वस्तूंचा कधीही तुटवडा नव्हता तरी या वर्गाच्या रहाणीमानाची तुलना समाजातल्या उच्च वर्गाच्या रहाणीमानाबरोबर होणे शक्य नव्हते. या दुसऱ्या वर्गात कामगार, शिपाई आणि प्यादे व दुकानदार यांचाच प्रामुख्याने भरणा होता. त्यांच्या स्थितीचे अतिशय हुबेहुब चित्रण पेल्सार्ट याने केलेले आहे. एके ठिकाणी तो म्हणतो की, 'तसे पाहिले तर त्यांना स्वातंत्र्य आहे. परंतु प्रत्यक्षात त्यांची स्थिती गुलामांपेक्षा फारशी वेगळी नव्हती'. वृत्तीने मात्र हा वर्ग अतिशय संयमी आणि सोशिक असा होता. समाजाच्या चालीरिती आणि आचार विचार यांचे आचरण करण्यात हिंदू आणि मुसलमान या दोन्ही वर्गांचे लोक फारखेच कट्टर आणि सनातनी होते.

राज्यामधील शहरे ही अतिशय वैभवसंपन्न असून त्यांच्या भोवतीच समाजजीवन उभारलेले असे. लोकांच्या गरजा भागविण्यासाठी आणि निर्यात करण्यासाठी लागणाऱ्या सर्व वस्तूंची निर्मिती ही शहरामधूनच होई. ह्या वस्तू निर्माण करणारा जो कारागिर त्याला मात्र सरदार वर्ग आणि अधिकारी वर्ग यांच्याकडून मिळणारी वागणूक अतिशय

कडक असे. त्यांना अतिशय कमी किंमतीला त्यांनी निर्माण केलेल्या वस्तू विकाव्या लागत. इतकेच नव्हे तर त्यांच्याकडून बेकायदेशीर असे कर देखील उकळले जात. त्या काळात दळण-वळणाची साधने ही सुव्यवस्थित असल्यामुळे उद्योगधंदे आणि व्यापार उदीम यांची अतिशय भरभराट झाली. रस्त्यांच्या बांधणीचे काम सरकारतर्फे हाती घेतले जात असे. त्याचप्रमाणे पुष्कळदा पूल बांधण्याचे कामही सरकारतर्फे केले जाई. औद्योगिक शहरे आणि बंदर गावे यांना जोडणारे रस्ते मुख्यतः बांधले जात. पूर्वीच्या प्रमाणेच मोगल कालखंडातही महाराष्ट्रात तीन प्रमुख बंदरे होती. ती म्हणजे वसई, चेऊल आणि दाभोळ. या बंदरातूनच महाराष्ट्रातला सगळा निर्यात व्यापार चाले.

बहुसंख्य लोकांचा व्यवसाय शेती हा होता. आजची पिके आणि त्या काळची पिके यामध्ये फारसा फरक नव्हता. कांही अपवाद सोडल्यास कालव्यावर चालणाऱ्या शेतीचा जवळ-जवळ अभाव होता. शेती ही पूर्णपणे पावसावर अवलंबून असे. पाऊस न पडल्यास अवर्षण हे ठरलेले असे. मोगलांजवळ दुष्काळ पडल्यास त्याचा प्रतिकार करण्यासाठी कायमची अशी यंत्रणा नव्हती. त्याकाळी किंमतींची पातळीही पुष्कळच कमी होती. याचा अर्थ असा नव्हे की लोकांचे रहाणीमान फार उच्च दर्जाचे होते. याला कारण म्हणजे सर्वसामान्य माणसाचे उत्पन्नही फारच कमी होते. वस्तूचे दर सरकारकडून नियंत्रित केले जात नसत. त्याकाळी सोने, चांदी आणि तांबे या धातूंच्या नाण्यांचा उपयोग केला जाई.

सुसंबद्ध अशी शिक्षण पद्धती त्याकाळी अस्तित्वात नव्हती. परंतु शाळा आणि महाविद्यालये बांधून मोगल बादशहा शिक्षणाला उत्तेजन देत. सरकारकडून ज्या मशिदी मध्ये शिक्षण दिले जाई अशा मशिदींना आर्थिक मदत देण्यात येई. हिंदूच्या बाबतीत शिक्षणाची सोय विद्वान व्यक्तींकडून ज्या खाजगी शाळा चालविल्या जात त्या पुरतीच मर्यादित असे. अकबर, जहांगिर आणि शहाजहान हे विद्वत्तेचे भोक्ते होते आणि त्यांच्या कडून विद्वान मंडळींना आश्रय मिळे. परंतु मोगल घराण्यात ज्याचा उल्लेख विद्वान म्हणून करता येईल अशी एकच व्यक्ती झाली आणि ती म्हणजे औरंगजेबाचा भाऊ दाराशुको ही होय. दारा हा फारशी, अरबी आणि संस्कृत भाषांचा गाढा विद्वान होता. त्याने केलेली '**उपनिषदे**', '**भगवत्गीता**' आणि '**योगवशिष्ठ रामायण**' या ग्रंथांची भाषांतरे सुप्रसिद्ध आहेत. मध्ययुगीन महाराष्ट्रात स्त्री शिक्षण अस्तित्वात होते असे मानण्याला भरपूर आधार आहे. श्रीमंतांच्या मुलांना त्यांचे शिक्षक घरी येऊन पाठ देत. या उलट इतर वर्गात आणि विशेषतः हिंदुमध्ये मुलींना मुलांबरोबरच शिक्षण दिले जाई. हिंदु काय किंवा मुसलमान काय यांच्या धर्मामध्ये स्त्रियांना शिक्षण दिले जाऊ नये असा कोणाचाही अट्टाहास नव्हता. यापुढे जाऊन आपल्याला असे म्हणता येईल की, मध्ययुगीन महाराष्ट्रांत धर्मविषयक तत्वज्ञान आणि पुराण वाङ्मय

यांचा गाढा व्यासंग असलेल्या स्त्रियांची अनेक उदाहरणे आपल्याला मिळतात.

वरील विवेचनावरुन असे दिसून येईल की मोगल राजवटीचा महाराष्ट्रातील सर्वसामान्य जनतेच्या एकंदर जीवनावर अतिशय दूरगामी असा परिणाम झाला. मराठ्यामधील प्रमुख घराण्यांनी पोशाख आणि दरबारी चालीरीती या बाबतीत मोगलांचे सही सही अनुकरण केले. मोगल आणि मराठे यांचा जो संघर्ष जवळ जवळ अर्ध्या शतका पेक्षा अधिक काळ चालू राहिला त्यामुळे मराठ्यांना मोगलांचे सामर्थ्य कशामध्ये आहे आणि त्यांचा कमकुवतपणा कशामध्ये आहे याची पूर्ण जाणीव झाली. सतराव्या शतकात गुजरात आणि माळवा या प्रांतावर मराठ्यांचे जे हल्ले झाले त्याचा परिणाम असा झाला की, महाराष्ट्रातील जनतेचा जीवनाकडे बघण्याचा संकुचित दृष्टिकोन बदलला. केवळ आपल्या पुरताच विचार करण्याचे त्यांनी सोडून दिले आणि त्यांची वृत्ती ही देशव्यापी बनली. एक तऱ्हेचा आत्मविश्वास त्यांच्यामध्ये निर्माण झाला, आणि युद्ध व राजनीती यामध्ये त्यांनी अधिक धडाडीचे धोरण स्विकारण्यास सुरुवात केली. आपल्या राज्यकारभारात देखील मराठ्यांनी बहमनीनंतर निर्माण झालेल्या शाह्या आणि मोगल यांचे अनुकरण केले. शिवाजीच्या मंत्रीमंडळातील प्रमुख मंत्री म्हणजे '**पेशवा**' '**सुरनीस**' '**मुजुमदार**' आणी '**डबीर**' हे बहमनी आणि शाह्या यांच्या मंत्री मंडळात ही आपल्याला आढळतात. तीच गोष्ट '**सुभेदार**' '**मामलेदार**' आणि किल्ल्याचे अधिकारी यांच्या बाबतीत लागू होते. स्थानिक महसूलाबाबतची पूर्वापार चालत आलेली व्यवस्था देखील मराठ्यांनी फारसा बदल न करता तशीच पुढे चालू ठेवली.

१६८७ मध्ये विजापूर आणि गोवळ कोंडा यांचा पाडाव झाल्यानंतर मध्ययुगीन महाराष्ट्राचा इतिहास संपुष्टात येतो असे म्हणावयास हरकत नाही. मध्ययुगीन इतिहासाचा कालखंड जवळ–जवळ साडेतीनशे वर्षांपेक्षा अधिक कालावधिवर पसरलेला आहे. या कालखंडाने अनेक राजवटी पाहिल्या. सिंहासनासाठी झालेली युद्धे आणि त्यात झालेले खून आणि रक्तपातही पाहिले. हा सारा कालखंड युद्धानी भरलेला होता असे म्हटल्यास त्यात काहीच चूक ठरणार नाही. बहमनींच्या कारकिर्दीत एकाही सुलतानांच्या कारकिर्दीत युद्ध झाले नाही असे घडले नाही. या युद्धांना धर्माचे बंधन नव्हते म्हणजे ती युद्धे मुसलमान-मुसलमानात झाली हिंदु मुसलमानांत झाली आणि हिंदु-हिंदुमध्ये झाली. बहमनीनंतर अस्तित्वात आलेल्या शाह्यांचा कालखंड म्हणजे यादवी युद्धाचा कालखंड असे म्हटल्यास हरकत नाही. १४९० मध्ये अहमदनगर, विजापूर आणि वऱ्हाड यांनी स्वातंत्र पुकारल्या नंतर पुढील १०० वर्षांच्या काळात असे एकही वर्ष गेले नाही की ज्या वर्षी युद्धाची ठिणगी पडली नाही. युद्ध झाले म्हणजे युद्धाबरोबर वित्तहानी, मनुष्य हानी आणि मालमत्तेची हानी या गोष्टी ओघानेच आल्या. शाह्यांचा काळ संपला आणि मोगल-

कालखंड सुरु झाला. या कालखंडात देखील महाराष्ट्राला स्वास्थ आणि शांती यांचा लाभ झाला नाही. अर्थात मोगल कालखंडात झालेल्या युद्धांचे स्वरुप वेगळे होते. या पूर्वीच्या कालखंडात स्थानिक प्रजेने युद्धात कोणताच भाग घेतला नाही. स्थानिकप्रजा दडपली गेली होती आणि अत्त्याचाराखाली गुदमरलेली होती. परकीय आक्रमणाचा इतका जबरदस्त फटका तिला खावयाला लागला होता की परकीय सत्तेविरुद्ध शस्त्र उचलण्याचे त्राणच तिच्यात उरले नव्हते. ही परिस्थिती मोगल कालखंडामध्ये बदलली. प्रथम मलीक अंबर आणि नंतर शहाजी-शिवाजी या पिता पुत्रांच्या जोडीने महाराष्ट्रातील जनतेच्या मनात चैतन्य निर्माण केले आणि असामान्य अशी प्रतिकार शक्ति जागृत केली. सबंध मध्ययुगीन कालखंडात जी युद्धे झाली त्यातील बहुतेक युद्धांचे स्वरुप हिंदुच्या विरोधी होते असे म्हटल्यास काहीच हरकत नाही. वरंगळ, ओरिसा आणि विजयनगर येथील हिंदु राजांचा मुसलमान राजवटींनी जो उच्छाद मांडला त्यावरुन ही गोष्ट सहज ध्यानामध्ये येते. मोगल कालखंडात याच गोष्टीची पण जरा वेगळ्या प्रकाराने पुनरावृत्ती झाली असे म्हणता येईल.

या काळखंडाचा आणखी एक विशेष म्हणजे परदेशी मुसलमानांची फार मोठ्या प्रमाणावर दक्षिणेत झालेली आवक. याचा परिणाम दक्षिणीपरदेशी अशी दुही निर्माण होण्यांत झाला, आणि त्याची कडु फळे येथील राजसत्ता आणि सर्व सामान्य जनता यांना भोगावी लागली. दक्षिणेतला मोगलांच्या पुरता काळ सोडल्यास बहमनी आणि इतर शाह्यांचे सुलतान हे कलेचे आणि वाङ्मयाचे भोक्ते आणि उपासक होते. त्यामुळे त्यांच्या काळखंडात विविधरंगी कलाकृती आणि बांधकामे महाराष्ट्रांत आणि महाराष्ट्राबाहेर निर्माण झाली. उत्कृष्ट वाङमयहि याच कालखंडात निर्माण झाले. परंतु या कलाकृतीवर आणि वाङमयावर एतद्देशीय संस्कृतीची छाप नव्हती तर पूर्णपणे उपऱ्या संस्कृतीचा पगडा होता. मुसलमान राज्य कर्त्यांनी विद्वेषाची भावना ठेवून सुंदर वास्तूंचा विध्वंस केला. त्याचप्रमाणे एतद्देशीय भाषेतील वाङमयाच्या विकासाला उत्तेजन न देता एक प्रकारे अप्रत्यक्षपणे त्या भाषेच्या पिछेहाटीला हातभार लावला. अशा परिस्थीतीतून देखील एतद्देशीय जनतेने जी अस्मिता दाखवून परकीय सत्ता उलथून पाडली ती स्वतःच्या बळावरच ही गोष्ट या ठिकाणी नमूद करण्यासारखी आहे. एकंदरीत विचार करता मध्ययुगीन राजवटीच्या मूल्यमापनातून आपल्याला जमेपेक्षा खर्चाचीच बाजू अधिक दिसते असे विधान केल्यास त्यांत काहीच चूक ठरणार नाही.

# फरिश्त्याची जीवनरेखा

ज्यावेळी एखाद्या इतिहासकाराने आपला ग्रंथ लिहितांना अनुभवांचा उपयोग केलेला असतो किंवा काही प्रसंगी तो वर्णन करीत असलेल्या घटनांच्या वेळी तो स्वतः जातीने हजर असतो त्यावेळी त्याच्या जीवनाचा वृत्तांत थोडाफार तरी आपल्याला समजावा असे वाचकाला वाटल्यास त्यात काहीच नवल नाही. हा इतिहासकार कोठून आला, तो कोण होता, कोणत्या कालखंडात त्याने आपले जीवन व्यतीत केले, आणि अखेर त्याचे काय झाले, हे समजण्याची उत्सुकता वाचकाला साहजीकच वाटते. फरिश्ता वेगवेगळ्या घटनांचे वर्णन करताना आपल्या विषयी कदाचीत विनयाने का होइना इतके कमी लिहींतो की त्याच्या विषयी आपल्याला जितके कळावे अशी आपली इच्छा असते त्याच्या निम्म्याने देखील ती इच्छा पुरी होत नाही. अधुनमधून आपल्याविषयी तो जे उल्लेख करतो त्यावरुन आपल्याला असे कळते की महमद कासीम फरिश्ता याचा जन्म कॅस्पियन समुद्राच्या किनाऱ्यावर अस्त्राबाद या गावी झाला. त्याच्या बापाचे नांव गुलाम अली हिन्दूशहा असे होते. त्याने आपल्या मातृदेशाचा त्याग करुन हिन्दुस्थानात प्रवेश केला आणि प्रवास करीत तो दक्षिणेत अहमदनगर येथे येऊन पोहोचला. त्यावेळी मूर्तजा निजामशहा हा अहमदनगरचा सुल्तान होता. आपला जन्म कधी झाला, हे फरिश्ता सांगत नाही. तो एवढेच सांगतो की अहमदनगर येथे तो जेव्हा बापाबरोबर पोहोचला तेव्हा त्याचे वय १२ वर्षांचे होते, आणि तेथे गेल्यावर राजपुत्र मिरान हुसेन निजामशहा याच्या बरोबर तो विद्यार्थीदशेत राहिला. इ. स. १५८७ मध्ये हुसेन निजाम शहाने वयाच्या १६ वर्षी आपल्या बापाला पदच्युत केले. यावरुन आपण असे अनुमान काढले की फरिश्ता हा राजपुत्र मिरान हुसेन याच्यापेक्षा वयाने थोडाच मोठा होता आणि म्हणून त्याचा जन्म इ. स. १५७० मध्ये झाला असावा तर त्यात काही चूक होणार नाही. गुलाम अली हिन्दूशहा याच्या विद्वत्तमुळे त्याची निवड राजपुत्र मिरान हुसेन याला फारशी भाषेचे शिक्षण देण्यासाठी करण्यात आली. गुलाम अलीचा मृत्यू अहमदनगर येथे आल्यानंतर काही काळानेच झाला असावा. अशा तऱ्हेने अगदी लहानपणीच फरिश्ता हा पोरका बनला. परंतु त्याच्या बापाने दरबारात जे मानाचे स्थान प्राप्त केले होते त्यामुळे त्याच्यावर मूर्तजा निजामशहाची मर्जी बसली. ज्यावेळी मूर्तजा निजामशहाला त्याच्या मुलाने पदच्युत केले तेव्हा फरिश्ता हा राज-

वाड्यातील रक्षकदलाचा प्रमुख **कप्तान** होता. याप्रसंगी मूर्तजा निजाम शहाच्या इतर सेवकांच्या नशिबी जी दुर्दशा आली त्यातून तो वाचला याचे कारण राजपुत्र मिरान हुसेन याने त्याला ओळखले आणि स्वतः मध्यस्ती करुन त्याचा जीव वाचविला. यानंतर १ वर्षाच्या आतच मिरान हुसेन पदच्युत झाला आणि त्याचा खून झाला. फरिश्ता यावेळी १७ वर्षाचा होता. आपल्या आश्रयदात्याच्या मृत्युनंतर झालेल्या राज्यक्रांत्यांमधे त्याने भाग घेतला असावा असे दिसत नाही. अहमदनगर दरबारात यावेळी सुन्नी पंथीयांचा प्रभाव होता आणि फरिश्ता हा स्वतः शिया असल्यामुळे त्याला मित्र मिळणे कठीण होते. अशा परिस्थीतीत त्याने अहमदनगर सोडण्याचा काही काळानंतर बेत केला आणि विजापूरच्या आदिलशाही सुलतानाचा आश्रय घेण्याचे ठरविले.

फरिश्त्याने स्वतः असे एके ठिकाणी सांगितले आहे की १५८९ मधे तो विजापूर येथे पोहोचला. विजापूरचा मुख्य वजीर दिलावरखान याने त्याचे स्वागत केले आणि दुसऱ्या इब्राहीम आदिलशहा बरोबर त्याची मुलाखत करुन दिली. मूर्तजा निजामशहाकडे फरिश्ता हा लष्करातील अधिकारी होता. त्यावरुन असे दिसते कीं आदिलशहाकडे देखील त्याला लष्करातील नोकरी मिळाली असावी. या विधानाला आधार म्हणजे पुढे घडलेल्या घटनेचा फरिश्त्याने केलेला उल्लेख. फरिश्ता विजापुरला येण्याच्या सुमारास अहमदनगर येथे बुरहाण निजामशहा विरुध्द जमालखान नावाच्या एका मेहदवी पंथाच्या सरदाराची कारस्थाने चालू होती. त्याच्याविरुध्द दिलावर खानाने निजामशहाला मदत देण्याचा सल्ला इब्राहीम आदिलशहाला दिला. जमाल खानाने विजापूरच्या रोखाने कूच केले. आदिलशहाच्या आज्ञेविरुध्द दिलावर खानाने भीमा नदीच्या नजीक त्याच्यावर हल्ला केला. या लढाईत दिलावरखानाचा पराभव होऊन विजापुरी सैन्याने शहादुर्गकडे माघार घेतली. या घटनेबाबत फरिश्त्याने केलेला उल्लेख पुढील प्रमाणे आहे. "या लढाईत मला झालेल्या जखमामुळे प्रवास करणे अशक्य झाले आणि मी जमालखानाच्या हाती कैदी म्हणून पडलो. पुढे माझी मी सुटका करुन घेतली." याचा अर्थ असा की बुरहाण निजामशहाला तोंड देण्यासाठी जेव्हा जमालखानाने माघार घेतली तेव्हा फरिश्ता विजापूराच्या सैन्याला जाऊन मिळाला असावा. जमालखानाचा पाठलाग विजापूरी सैन्याने १६० मैल रोहन खेडघाटापर्यंत केला. येथे पुन्हा इब्राहीम आदिलशहा आणि दिलावरखान यांच्यामधे मतभेद निर्माण झाले. दिलावरखानाला दूर करण्याचे आणि या कामी आपला सरदार ऐन उल् मुल्क गिलानी याची मदत घेण्याचे आदिलशहाने ठरविले. तो गुप्तपणे ऐन उल् मुल्कच्या छावणीत गेला. तेथे त्याचे अनेक सरदार त्याला येऊन मिळाले. फरिश्ता एके ठिकाणी असे सांगतो की, " या मंडळीमध्ये या ग्रंथाचा ग्रंथकर्ता म्हणजे मी होतो."

यानंतर अनेक वर्षेपर्यंत फरिश्ता आपला उल्लेख करीत नाही. यावरुन असे समजण्यास जागा आहे की त्याने आपल्या ग्रंथ लेखनास सुरवात केली असावी. एके ठिकाणी तो असे म्हणतो की इब्राहीम आदिलशहाने या कामासाठी जी विपुल ग्रन्थ सामुग्री मला लागली ती मिळविण्याचे कामी खर्च करण्यामध्ये कोणत्याही तऱ्हेची कसूर केली नाही. या ठिकाणी एक गोष्ट नमूद करण्यासारखी आहे. ती ही की फरिश्त्याने आपल्या प्रस्तावनेत दिलेले ३४ ग्रंथ आणि त्या शिवाय त्याने उपयोग केलेले आणखी २२ ग्रंथ यापैकी फारच थोडे आज अस्तित्वात आहेत. विजापुरच्या सुलतानांचा इतिहास फरिश्त्याने १५९६ मधे म्हणजे वयाच्या २६ व्या वर्षी पुरा केलेला दिसतो तर त्याच्या ग्रंथाचे इतर भाग त्याने नंतरच्या वर्षात पुरे केले असावेत. वयाच्या २६ व्या वर्षी तो राजकन्या बेगम सुलताना हिच्याबरोबर विजापुरहून अहमदनगर येथे गेला, तिचे लग्न १६०४ मध्ये मुंगी पैठण येथे राजपुत्र दानिअल मिर्जा याच्या बरोबर झाले. तेव्हा तो तेथे हजर राहिला आणि नंतर तिच्या पालखीबरोबर तो दानिअल मिर्जाच्या ( म्हणजे तिच्या नवऱ्याच्या ) खानदेश या सुभ्याच्या बुऱ्हाणपूर या राजधानीच्या गावापर्यंत गेला.

बुऱ्हाणपूरहून तो विजापूर येथे परतला, तेव्हा त्याची रवानगी जहांगीर बादशहा कडे एका विशिष्ट कामगिरीवर करण्यात आली. विजापूरच्या राजकन्येचा विवाह दानिअल मिर्जा बरोबर झाल्यानंतर थोड्या अवधीतच मिर्जा याला मृत्यु आला. ते दुःख सहन न होऊन अकबर हा मरण पावला. फरिश्ता याने इ. स १६०६ मध्ये जहांगीर लाहोर येथे असताना आपली हजेरी लावली. स्वतः फरिश्ता आपण कोणत्या कामगिरीवर गेलो होतो याचा उल्लेख करीत नाही. परंतु दोन्ही घराण्यात जे नाते अस्तित्वात होते आणि जहांगीर हा अकबराच्या मृत्युनंतर नुकताच गादीवर आला होता, या घटना लक्षात घेतल्यास आपल्याला असे अनुमान काढता येईल की विजापूर दरबारचा एक नामवंत मुत्सद्दी म्हणून फरिश्ता याची रवानगी जहांगीर बादशहाचे बापाच्या मृत्युबद्दल सांत्वन करण्यासाठी आणि सिंहासनावर आल्याबद्दल त्याचे अभिनंदन करण्यासाठी झाली असावी. याच सुमारास सुप्रसिद्ध प्रवासी बर्नीयर हा जहांगीरचे छावणीत असावा असे समजण्यास जागा आहे.

पुष्कळ वेळा फरिश्त्याच्या ग्रंथाचा उल्लेख नौरस नामा असा करण्यात येतो. यावरुन आपल्याला असे समजण्यास जागा आहे की इब्राहीम आदिलशहाने इ. स. १५९९ साली नौरस ह्या आपल्या नवीन राजधानीच्या बांधकामास सुरवात केली. तेथे तो रहात असताना फरिश्त्याने आपला ग्रंथ पुरा केला असावा. फरिश्ता आपल्या ग्रन्थात सुरत येथील पोर्तुगीज आणि इंग्रज यांच्या वखारींचा ( इ. सः १६११ ) उल्लेख करतो. या सुमारास त्याच्या ग्रन्थ लेखनाचे काम पुरे झाले असावे. त्यावेळी त्याचे वय ४१ होते.

या नंतर थोड्याच काळाने फरिश्त्याचा मृत्यू झाला असावा. या विधानाला पुढीलप्रमाणे पुरावा देता येईल. इब्राहीम आदिलशहाची कारकीर्द ३२ वर्षे झाल्या नंतर काही दैविक प्रत्यय आल्यामुळे आदिलशहाने आपली राजधानी विजापूरच्या पश्चिमेस ३ मैलावर हलविण्याचे ठरविले. या नवीन राजधानीला त्याने नौरस हे नांव दिले. काही वर्षानंतर इब्राहीम आदिलशहाने नौरस येथून मुक्काम हालविला आणि तो विजापूर येथे कायम राहाण्यासाठी आला. १६२६ मध्ये त्याला मृत्यू आला. इ. स. १६११ मध्ये फरिश्ता सुरतेचा उल्लेख करतो. तोपर्यंत त्याचे अस्तित्व जाणवते. तेव्हापासून १६२६ पर्यंतच्या काळांत फरिश्त्याचा प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष कुठेच उल्लेख मिळत नाही. या १५ वर्षांच्या काळात विजापूर येथे अतिशय सुन्दर अशा इमारतींची बांधणी झाली. अशा इमारतीत कामीलखानाचा राजवाडा, चांदबिबीची मशीद, फरिश्त्याचा आश्रयदाता दुसरा इब्राहीम आदिलशहा आणि त्याचा मुलगा महमद यांच्या अतिशय सुन्दर अशा कबरी आणि त्याशिवाय विजापूरच्या परीसरात मैलोमैल पसरलेले बांधणीकामाच्या दृष्टीने अतिशय भव्य असे प्रासाद, हवेल्या यांचा उल्लेख करावा लागेल. ही सर्व बांधकामे त्याकाळच्या वैभवाची साक्ष देतात. फरिश्त्याने आपला इतिहास पूर्ण केल्यानन्तर तो जर आणखी काही काळ हयात असता तर राजदरबारी त्याला जी मान्यता प्राप्त झालेली होती त्यावरुन त्याचे नाव इतिहासात दुय्यम वजीर अथवा लेखक म्हणून आपल्याला खासच आढळले असते. त्याचप्रमाणे ज्या गोंवळकोंड्याच्या सुलतानांचा तो नुसता उल्लेख करतो, त्याच्या विषयी पूर्ण माहिती मिळवून त्याने त्यांचा इतिहासदेखील पुरा केला असता. आपल्या इतिहासात त्याने बदक्षानचा खुश्राव शहा याचा इतिहास आपण पुरा करणार असे जे लिहिले होते त्याप्रमाणे त्याने तो पुराही केला असता. जर का त्याचा मृत्यू इब्राहीम आदिलशहा विजापूरला परतल्या नंतर झालेला असता तर फरिश्त्यासारख्या थोर इतिहासकाराचे नांव चिरंतन करणारी वास्तु आपल्याला विजापूर येथे सहज मिळाली असती. यावरून असे अनुमान काढता येईल की फरिश्त्याचा मृत्यू विजापूर दरबार नौरस येथेच असताना झाला असावा. फरिश्त्याची कबर ही तेथेच असावी परंतु नौरस येथून विजापूर येथे राजधानी हलविल्या नंतर तेथील बांधकामांचा विनाश झाला आणि फरिश्त्याचे स्मृतिचिन्ह जपून ठेवणारी वास्तु काळाच्या उदरात गडप झाली असावी. अशा परिस्थितीत इतिहासकार म्हणुन फरिश्त्याचे नांव चिरंतन ठेवणारी वास्तू म्हणजे त्याच्या हातून इतिहासाची निर्माण झालेली सुन्दर कलाकृती हीच होय.

भ. ग. कुंटे

# फरिश्ताकृत प्रस्तावना

गुलशने इब्राहिमी या ग्रंथाचा लेखक फरिश्ता याने आपल्या ग्रंथाला लिहिलेल्या प्रस्तावनेचा थोडक्यात सारांश; "मी या ग्रंथाचा लेखक महमद कासीम हिंदूशहा फरिश्ता विद्वानांना असे सांगू इच्छितो की मी तरुण असताना हिंद मध्ये मुसलमानी सत्तेचा जो विकास झाला त्याबद्दलच्या ऐतिहासीक माहितीचे संकलन करावे आणि या देशातील ज्या काही थोर व्यक्ति होऊन गेल्या त्यांचा थोडा फार वृतांत द्यावा अशी इच्छा माझ्या मनात निर्माण झाली. परंतु यासाठी जी साधनसामुग्री लागणार होती ती माझे निवासस्थान जे अहमदनगर त्यात मिळू न शकल्यामुळे मी हिजरी वर्ष ९९८ (इ. स. १५८९) मधे अहमदनगर येथुन विजापूर येथे गेलो. तेथे त्या राज्यावर राज्य करीत असलेल्या सुलताना बरोबर माझा परिचय करुन देण्यात आला. विजापूरचा सुलतान इतिहासाच्या अभ्यासामध्ये आपला बराच वेळ घालवीत असे. त्याच प्रमाणे माझ्या मनात जो हेतू धरुन मी विजापूर येथे आलो होतो तो मी साध्य करावा या उद्देशाने तो अनेकदा माझी भलावणी करीत असे.

वरील उद्देशाच्या पूर्ततेसाठी वेगवेगळ्या ठिकाणाहून मी ऐतिहासीक ग्रंथ आणावे असा आदेश मला देण्यात आला. थोड्याच कालावधीत प्रचंड अशी साधन सामुग्री एकत्र करण्यात आली. या साधन सामुग्रीची कसून तपासणी करण्यात आली. जमा केलेल्या ग्रंथां पैकी एकाही ग्रंथामध्ये मला पाहिजे असणारी संपूर्ण माहिती नव्हती. उदा. वर उल्लेखिलेल्या कालखंडा पैकी बऱ्हशी माहिती निजाम उद्दीन अहमद बक्षी याच्या ग्रंथामध्ये जरी होती तरी काही काही ठिकाणी ती इतकी चुकीची होती की त्या माहिती मध्ये असलेल्या उणीवा मला स्वतःला माहित असलेल्या माहितीच्या आधारे सहज भरुन काढता आल्या असत्या. अशा परिस्थितीत मुसलमानी सत्तेच्या हिंदुस्थानातील विकासा संबंधी ऐतिहासीक कथन करणारा इतिहासकार आपण व्हावे अशी इच्छा माझ्या मनांत घर करुन बसली. परिणामी माझ्या जवळ असलेल्या माहितीचे संकलन करण्यास मी सुरवात केली, आणि हिजरी १०१८ (इ. स. १६०९) या वर्षी हा ग्रंथ मी "फरिश्ताकृत इतिहास" या नांवाखाली ज्याच्या आश्रयाखाली मी काम केले त्या विजारच्या सुलतानाला अर्पण केला.

मी ज्या विषयावर लिहिले त्याच विषयावर ज्या लेखकांनी आपले लिखाण केले त्यांच्यावर टीका करणे हे मी अतिशय अप्रस्तुत समजतो. हे सर्व इसिहासकार आता आपल्या कबरस्थानात चिरनिद्रा घेत पडलेले असल्यामुळे त्यांच्या ज्या कांही उणीवा होत्या त्याबद्दल मी कांहीही भाष्य करु इच्छित नाही. माझ्या वाचकानीच माझ्या लिखाणाचा दर्जा ठरवावा. त्यांना माझी फक्त एवढीच विनंती आहे की माझा ग्रंथ तुलनेमधे वरील लेखकांच्या ग्रंथा बरोबरच असवा हीच माझी एकमेव महत्वाकांक्षा आहे, हे त्यांनी समजून घ्यावे.

लेखक म्हणून मला अशी आशा आहे की सत्यावर आधारलेले परंतु सुंदर शैली आणि उत्कृष्ट रचना यांचा अभाव असलेले, माझे हे जे साधे आणि अनलंकारीत असे ऐतिहासीक ग्रंथलेखन आहे ते माझा आश्रयदाता जो विजापूरचा सुलतान याच्या मनांत भरेल आणि या ग्रंथामध्ये आलेली माहिती पृथ्वीच्या दूरदूरच्या प्रदेशात प्रसारीत होईल.

या ग्रंथाच्या रचनेसाठी खालील अस्सल हस्तलिखीतांचा उपयोग करण्यात आला. १) तर्जूमा येमनी २) जैन उल् अखबार ३) ताज उल् मासीर ४) मुलहिकत शेख ऐन उद्दीन (विजापूरचा) ५) तबकात इ नसीरी ६) फिरोज शहाचा इतिहास ७) फिरोज शहाचे विजय ८) बाबरचे धावते वृत्तांत ९) हुमायूनचे धावते वृत्तांत १०) मुबारक शहाचा इतिहास ११) मुबारक शहाचा आणखी एक इतिहास १२) शेख अजुरीकृत बहमन नामा-एक वीररस प्रधान काव्य १३) तारीख बीन इ गिती १४) मुल्ला महमद लारी कृत सीराज उत् तारीख बहमनी १५) मुल्ला दाउद बीदरी कृत तोहफत उस् सलातीन १६) नीनेव्हचा मुल्ला अहमद कृत एक हजार वर्षाचा इतिहास १७) रोजत उस् सफा १८) हबीब उस सीर १९) हाजी महमद कंधारी कृत इतिहास २०) नसीरशहा कृत गुजराथचा तबकात महमूद शहा २१) गुजराथच्या महमूद शहाच्या कारकिर्दीची बखर २२) गुजराथच्या बहादूर शहाचा इतिहास २३) गुजराथच्या मुजफ्फर शहाचा इतिहास २४) गुजराथच्या मुजफ्फर शहाचा आणखी एक इतिहास २५) मंडूच्या महमूद (थोरल्या) चा इतिहास २६) मंडूच्या महमूद (लहान्या) चा इतिहास २७) निजाम उद्दीन अहमद बक्षीकृत इतिहास २८) बंगालचा इतिहास २९) सिंधचा इतीहास ३०) काश्मीरचा इतिहास ३१) फवायीद उल् फवाद ३२) खैर उल् मजलीस ३३) कुतुबशहाचा इतिहास ३४) कवि शेख जमालकृत सिर उल् अरीफीन आणि ३५) नुस्क कुतबी*

ग्रंथाची विभागणीं प्रस्तावना, बारा प्रकरणे आणि उपसंहार यामध्ये करण्यात आलेली आहे.

प्रस्तावने मधे हिंदुस्थानातील मुसलमानी सत्तेच्या विकासाचे विवरण केलेले आहे. बारा प्रकरणे पुढील प्रमाणे आहेत. १) `जनी आणि लाहोरचे सुलतान २) दिल्लीचे सुलतान ३) दक्षिणेचे सुलतान ४) गुजरथचे सुलतान ५) माळव्याचे सुलतान ६) खानदेशचे सुलतान ७) बंगाल आणि बिहारचे सुलतान ८) मुलतानचे सुलतान ७) सिंधचे राज्यकर्ते १०) काश्मीरचे सुलतान ११) मलबारचा वृत्तांत आणि १२) हिंदुस्थानातील साधुसंतांची माहिती."

---

*फरिश्त्याने आपल्या प्रस्तावनेंत नमूद केलेल्या ग्रन्थाव्यतिरिक्त पुढील ग्रन्थातील उताऱ्यांचा उपयोग आपल्या ग्रंथातील मजकूरात केला आहे १) साकीनामा २) तवारीख अहमद उल्ञा मुस्तवफी ३) तवारीख मुरीहाज उस् सिराज जरजानी ४) जामा उल् हिकायत ५) मासीर उल् मुलक ६) फतुह उल् बुलाद ७) अबुल नुस्त्र नुस्कती याची प्रवास वर्णने ८) अबुल फजील याची प्रवास वर्णने ९) फुतुह उस् सलातीन १०) फक्र उद्दीन मुबारक शहा लोदी कृत तवारीख घोरी ११) तवारीख शेख फरीद उद्दीन अत्तार १२) जैन उल् मासीर (क्रमांक ११ आणि १२ ही पुस्तके सोमनाथचे वर्णन देतात.) १३) सादीकृत गुलिस्तान १४) तवारीख गुजीदा १५) सुलतान बैराम बीन मसूद गजनवी याला अर्पण केलेले शेख निजामी कृत मखजून उल् असरार १६) कलील उ दुमना अथवा अनवर सुहेली १७) काजी अहमद गफरी कृत तवारीख जहान आरा १८) हजनामा १९) खुलासत उल् इन्शा आणि २०) रोजन उल् इन्शा

# पुस्तक दुसरें
# प्रकरण ३ रे
## दक्षिणेमधील सुलतानांचा इतिहास
## विभाग १ ला

बहमनी म्हणून प्रसिध्द असलेल्या कुलबर्ग्याच्या सुलतानांच्या घराण्याचा इतिहास (मूळ पाने २८३ ते ५५९)

अलाउद्दीन हसनशहा गंगू बहमनी त्याचा पूर्वेतिहास. दक्षिणेमधील मुसलमानी सत्तेची एकंदर परिस्थिती. दक्षिणे मधील नेमणूक केलेल्या परदेशी मुसलमानांचा बंड करण्याचा बेत असल्याबद्दल दिल्लीचा सुलतान महमद तघलक याला संशय. आपल्या छावणीमध्ये बंदीस्त करुन त्यांना पाठविण्यासाठी त्याने केलेली उपाय योजना. दक्षिणे मधील हिंदूराज्यांशी संगनमत करुन बंड करण्याचा वरील अधिकाऱ्यांनी केलेला बेत आणि त्यांनी केलेली कारवाई. दौलताबादचा त्यांच्या कडून ताबा. दिल्लीच्या सुलतानाचे आगमन आणि त्याच्या कडून बंडखोरांवर हल्ला, परंतु गुजरातेतील बंडाळीचा मोड करण्यासाठी दक्षिणेतून गुजरातकडे त्याचे प्रयाण. दक्षिणे मधील अधिकाऱ्यांनी स्वातंत्र्याची केलेली घोषणा. इस्माईलला त्यांनी केलेला राज्याभिषेक. दक्षिणे मधील बंडखोरांच्या पक्षाचा प्रमुख जफरखान हा दिल्लीच्या अधिकाऱ्यांच्या ताब्यातील कंधार आणि बिदर यावर कबजा करतो आणि दौलताबाद येथे पोहोचतो. जफरखानाप्रीत्यर्थ इस्माईलकडून सिंहासनाचा त्याग. जफरखानाकडून अलाउद्दीन हसन गंगू बहमनी या पदवीचे आणि संज्ञेचे ग्रहण. त्याच्याकडून सैफुद्दीन घोरी याची वजीर म्हणून नेमणूक आणि कुलबर्गा या शहराची राजधानी म्हणून नियुक्ती. भूतपूर्व सुलतान इस्माईल याच्या कडून सत्ता मिळविण्याचा प्रयत्न– त्याची कैद, चौकशी आणि त्याला झालेली देहांताची सजा. त्याची जहागीर आणि त्याच्या पदव्या यांवर त्याच्या मुलाची नियुक्ती हसन गंगू याच्या कडून दक्षिणेची चार विभागामध्ये विभागणी–

१ ला विभाग, दाभोळ, कुलबर्गा, रायचुर, आणि मुदगल.

२ रा विभाग, चेऊल, जुन्नर, दौलताबाद, आणि पैठण,

३ रा विभाग, माहुर, रामगिर, आणि वऱ्हाडचे खोरे.

४ था विभाग, बिदर, कौलास, आणि इंदूर.

सुलतानाच्या प्रकृतीत बिघाड– त्याचा मृत्यू (पान २८३).

## महमदशहा बहमनी पहिला.

सुलतानाच्या दरबारातील वैभावाचे वर्णन. सुलताना कडून चौकोनी आकाराची नाणी पाडण्यात येतात. हिंदू कडून त्या नाण्यांचा वापर करण्यास नकार. त्यांच्या कडून ती नाणी वितळवली जातात. अनेक हिंदूंना भोगावयाला लागलेला देहदंड. विजयनगर आणि वरंगळ येथील राजांकडून महमदशहा बरोबर युध्दाला चिथावणी. हिंदूंचा पराजय. सुलतानाचे वेलापट्टणकडे कूच– तेथील राजाला त्याने दिलेली क्रूर वागणूक. माघार घेताना सुलतानाच्या सैन्याचा जवळ जवळ झालेला सर्वनाश आणि खुद्द त्याला जखम. वरंगळच्या राजाकडून गोवळकोंडा तोडून दिले जाते. दोन्ही राज्यांमध्ये शांततेचा तह. वरील तहाच्या प्रसंगी वरंगळच्या राजाकडून सुलतानाला सुप्रसिद्ध अशा तख्त फिरोजा अथवा अस्मानी सिंहासनाची भेट. दारुच्या धुंदीत असताना सुलतान वादकांच्या एका पथकाला विजयनगरच्या राजाच्या खजीन्यावर एका मोठ्या रकमेची हुंडी देतो. दोन्ही राज्यांमध्ये युद्धाला सुरवात. विजयनगरच्या राजा कडून मुदगल काबीज आणि तेथे असलेल्या सर्व शिबंदीला कंठस्नान. महमदशहा कडून एक लक्ष हिंदूंना ठार मारण्याची प्रतिज्ञा. हिंदूंचा पराभव आणि पहिल्या चकमकीत सत्तर हजार हिंदूंची कत्तल. विजयनगरच्या राजाची राजधानीच्या शहरामध्ये कोंडी. राजाकडून वादकांना द्रव्य दिले जाते. दोन्ही राज्यांमध्ये तह. दौलताबाद येथे बैरामखानाचे बंड. पैठण येथे त्याचा पराभव आणि अखेर त्याची गुजरातेत माघार. पहिल्या महमदशहाच्या मुलकी राज्यकारभाराचे वर्णन. त्याचा मृत्यु (पान २९८).

## मुजाहीदशहा बहमनी

त्याच्या अंगी असलेली असामान्य शक्ती. त्याच्या तरुणपणातील दंतकथा– विजयनगरच्या राजा बरोबर झालेल्या लष्करी वाटाघाटी– युध्दभूमीकडे प्रयाण– केवळ एका बाणाने सुलताना कडून वाघ ठार– विजयनगर येथे आगमन. मुसलमानी सैन्यासमोर हिंदूंचे पलायन. जंगलामधून समुद्रकिनाऱ्या पर्यंत सुलताना कडून त्यांचा पाठलाग. विजयनगर येथे हिंदू राजाचे पुनरागमन– मुसलमानांकडून त्याचा सख्त पाठलाग. शहराच्या रस्त्यामध्ये सुलतानाची चाल आणि हिंदूंकडून त्याला झालेला प्रखर विरोध. सुलतानाचे एक हिंदू सैनिका बरोबर एकस्याने युद्ध. सुलतान हिंदू सैनिकाला ठार मारतो. दोन्ही फौजात घनघोर लढाई आणि मुसलमानांची माघार. शांततेचा तह. सुलतान कुलबर्ग्याकडे परततो– वाटेमध्ये त्याचा चुलता दाऊदखान याच्याकडून त्याचा खून. (पान ३४२)

## दाउदशहा बहमनी

लष्करी अधिकाऱ्यांमध्ये असंतोष– काही अधिकारी आपापल्या सैन्यासमवेत त्यांच्या सरकाराकडे निघून जातात. जनतेने दाऊदशहाचे स्वागत करावे यासाठी मलीक सैफुद्दीन घोरी याचे प्रयत्न. राजकीय जीवनातून निवृत्त होण्याची सैफुद्दीन याला परवानगी. मृत राजाच्या ब[illegible]ीचा आपला चुलता दाऊदशहा याच्या बरोबर मिळते जुळते घेण्यास नकार. दाऊदशहा मशिदी मध्ये नमाज पढत असताना त्याचा खून घडवून आणण्यात अखेर तिला आलेले यश. (पान ३४२).

## महमूद्शहा बहमनी पहिला.

राजकन्या रुहपरवर आगा हिची तडफदार वागणूक. मृत दाऊदशहाचा मुलगा महमद संजर याला आंधळा करण्यात आणि हसनगंगू याचा सर्वात धाकटा मुलगा महमूद याला सिंहासनावर बसविण्यात तिला आलेले यश. मलिक सफुद्दीन याची पुन्हा वजीराच्या जागेवर नेमणूक. सुलतानाचे विजयनगरच्या राजाकडून अभिनंदन– सुलतानां कडून वाङ्मयाला उत्तेजन– सुप्रसिद्ध कवी हाफीज याला इराण मधून दरबारात येण्यास निमंत्रण– त्याच्या न येण्याची कारणे. याप्रसंगी हाफीज याने रचलेले काव्य. राज्याच्या मुलकी खात्यामध्ये सुलतानाने केलेल्या सुधारणा. सगर येथील बंड– युसुफतुर्क याज कडून बंडाचा बिमोड. सुलतानाचा मृत्यु. (पान ३४५).

## गियासुद्दीनशहा बहमनी.

बापाच्या गादीवर गियासुद्दीन याचे राज्यारोहण. राजवाड्यातील एक गुलाम लाल चीन याचा सुलतानाने ओढवून घेतलेला रोष. लालचीनच्या मुलीसाठी वेडाझालेला सुलतान–लालचीनच्या घरी मेजवानीसाठी सुलतानाला आमंत्रण. लालचीन कडून सुलतान आंधळा केला जातो. सुलतानाची पदच्युती आणि सगरच्या किल्ल्यात बंदिवास. (पान ३५३).

## शम्सुद्दीनशहा बहमनी.

लालचीन कडून सम्सुद्दीन याची भावाच्या जागी सिंहासनावर स्थापना. त्याच्या हुकमती विरुद्ध त्याचे पुतणे फिरोजखान आणि अहमदखान यांचा कट– सगर येथे त्यांचे पलायन. त्यांच्या कडून सैन्याची जमवा जमव, राजधानीवर चाल आणि पराभव– सगरकडे त्यांची माघार. वाटाघाटीसाठी त्यांची बोलणी. सुलताना कडून त्यांना क्षमा आणि दरबारामध्ये त्यांचे आगमन. राजधानी मध्ये फिरोज आणि अहमद हे आपल्या बाजूला पक्षपाती मिळवितात. दोघे भाऊ सुलतानाला पकडतात आणि त्याला आंधळा करतात. लालचीन याला कैद आणि गियासुद्दीनकडे त्याची पाठवणी. आंधळा गियासुद्दीन त्याला आपल्या हाताने ठार मारतो. (पान ३५६).

## फिरोजशहा बहमनी.

फिरोजचे स्वभावचित्र. फैज उल्ला अंजू याची वजीर म्हणून नियुक्ती. विजयनगरचा राजा देवराय याच्या कडून दक्षिणेकडील प्रांतावर आक्रमण. खेडल्याचा नरसिंगराय याच्या कडून वऱ्हाडवर आक्रमण. सुलतानाचे दक्षिणेकडे कूच. सुलताना कडून युध्दखर्च म्हणून चारलक्ष चाळीस हजार रुपये येवढ्या रकमेची विजयनगरच्या राजाकडून वसुली. सुलतान उत्तरेकडे वऱ्हाडमध्ये चाल करुन जातो. खेडल्याच्या राजाचा पराभव. सुलतान तैमुरकडे वकीलातीची नियुक्ती करतो. तैमुर कडून माळवा आणि गुजरातवरील फिरोजच्या अधिसत्तेला मान्यता. विजयनगरच्या दरबारात माळवा आणि गुजरात या देशांच्या सुलतानांमधील गुप्त खलबते. विजयनगर बरोबर पुन्हा युध्द सुरु. विजयनगरवर हल्ला. विजयनगरच्या प्रदेशात मुसलमानांनी केलेली जाळपोळ. बंकापूर काबीज. राजा आपली मुलगी फिरोजला देऊन त्याच्या बरोबर तह करतो. फिरोज पानगळ काबीज करतो. पुन्हा युद्धाला सुरुवात. मुसलमानी राज्य उलथून पडण्याचा निर्माण झालेला धोका. सुलतानाचा भाऊ अहमद याच्या कडून अखेर हिंदूंचा पराभव. फिरोजशहाला झालेला बुद्धीभ्रंश—त्याची दुबळेपणाची वर्तणूक. सुलतानाचा भाऊ अहमद याचा सिंहासन मिळविण्याचा उद्देश—आपला उद्देश साध्य करण्यासाठी त्याने केलेले प्रयत्न आणि त्याला अखेर मिळालेले यश. फिरोजशहा बहमनी याचा मृत्यु (पान ३६३).

## अहमदशहावली बहमनी

आपल्या भावाच्या वजीरांची अहमदशहा कडून पुन्हा नेमणूक—मृत सुलतानाच्या मुलाला राहाण्यासाठी राजवाड्याची नियुक्ती. राज्याच्या उत्तर सीमेवर पहाणी करण्यासाठी सैन्याची जमवा जमव आणि विजयनगरचा राजा देवराय याच्या विरुद्ध दक्षिणेकडे कूच. वरंगळचा राजा देवराया बरोबर संगनमत करतो परंतु नंतर आपल्या सैन्याला परत बोलवतो. देवरायावर अचानक हल्ला आणि त्याची कैद. देवराय स्वतःची सुटका करुन घेतो. अहमदशहाकडून विजयनगरच्या प्रदेशाची नासधूस. हिंदू सैनिकांच्या एका तुकडी कडून अहमदशहाला ठार मारण्याची प्रतिज्ञा आणि त्यानी त्याला घातलेला वेढा. जीवानीशी अहमदशहाची या वेढ्यामधून सुटका आणि पलायन. दक्षिणे मधील भयंकर दुष्काळ. सुलतान वरंगळ जिंकून घेतो आणि तेथील राजाला ठार मारतो. कलम येथे हिऱ्याच्या खाणीचा शोध. माळव्याच्या राजाकडून खेडल्याच्या राजावर हल्ला. खेडल्याच्या राजाची अहमदशहा बहमनीकडे मदतीची याचना. माळव्याच्या राजाबरोबर युद्ध आणि त्याचा पराभव. दोन्ही राज्यांमधील तह. खेडल्यावर माळव्याच्या राजाकडून पुन्हा हल्ला—लढाई मध्ये राजाचा मृत्यु.

अहमदशहा कडून युद्धाला पुन्हा सुरुवात. खानदेशाच्या सुलताना कडून तहाबाबत मध्यस्ती. सुलतानाचा मृत्यु (पान ३९७).

## अलाउद्दीनशहा बहमनी दुसरा

सुलतानाचा भाऊ राजपुत्र महमद याची विजयनगरकडून खंडणीची मागणी करण्यासाठी सैन्यासहित खानगी. छावणीमध्ये सुलतानाच्या वजीरांबरोबर राजपुत्राकडून आपले स्वातंत्र्य जाहिर करण्यासाठी मदत देण्याबाबत प्रस्ताव— त्यांनी केलेला विरोध आणि त्यांचा खून. विजयनगरच्या राजाकडून राजपुत्राला मदत. राजपुत्र मुदगल, रायचुर, विजापुर, नळदुर्ग आणि सोलापूर काबीज करतो. राजपुत्राचा पराभव. त्याने जिंकून घेतलेल्या प्रदेशा इतकाच भाग म्हणून रायचुर घेण्यासाठी सुलतान त्याला भाग पाडतो. कोकणवर स्वारी आणि थोड्या बहुत प्रमाणात कोकणवर कबजा. वऱ्हाडमध्ये बंड. मलिक--उत्--तुज्जार याजकडून प्रामुख्याने परदेशी मुसलमान असलेल्या सैन्याकडून या बंडाचा बिमोड. दरबारामधे दक्षिणी मुसलमानांच्या वर अग्रक्रम घेण्याचा परदेशी मुसलमानांना आदेश. विजयनगरच्या राजाकडून त्याच्या सैन्यात मुसलमानांची भरती– दक्षिणेच्या सुलतानाबरोबर त्याच्याकडून युद्धाची जाहीर घोषणा. दोन्ही राज्यांमधील तह. कोकण जिंकण्यासाठी मलिक-उत्-तुज्जार कूच करतो– त्याच्या सैन्याचा नाश आणि त्याचा मृत्यु. परदेशी मुसलमानां विरुद्ध दक्षिणी अधिकाऱ्यांच्या मनात शत्रुत्वाची भावना. राज्याच्या कारभाराकडे सुलतानाचे दुर्लक्ष– त्याला जडलेला जीवघेणा विकार– सुलतानाच्या मृत्यु संबंधी अफवा. वऱ्हाड आणि तेलंगण येथे बंडाळी. माळव्याच्या सुलतानाकडून झालेले आक्रमण. राज्याच्या बचावासाठी केल्या गेलेल्या लष्करी उपाय योजना. सुलतानाचा मृत्यु – त्याचे व्यक्तीमत्व (पान ४२१).

## हुमायूनशहा जालीम बहमनी

सुलतानाचा सर्वात धाकटा मुलगा राजपुत्र हसन याला वजीर सिंहासनावर बसवितात. हुमायूनला बंदीस्त करण्याचा झालेला प्रयत्न. वरील कटाला आलेले अपयश. तरुण राजपुत्राची पदच्युती आणि हुमायूनकडून स्वतःला राज्याभिषेक. वरील कटामधे भाग घेणाऱ्याना हुमायून कडून शिक्षा. राजपुत्राला डोळे काढण्याची हुमायून कडून झालेली शिक्षा. ख्वाजा महमूद गावान याची वजीर म्हणून नियुक्ती. सरकारी यंत्रणेमधील फेरफार. नळगोंड्याचा सिकंदरखान याचे बंड– लढाईत झालेला त्याचा मृत्यु. देवरकोंड्याच्या किल्ल्यावर हल्ला. हिंदूनीं आणलेली रसद. सुलतानाच्या सैन्याचा पराभव. हुमायूनशहा कडून त्याच्या सेनापतीला मृत्यूची सजा आणि दुय्यम सेनापतीला पदच्युती. देवरकोंडा जिंकून घेण्यासाठी सुलतानाने केलेले ताजे प्रयत्न आणि सुलतानाचा भाऊ पळून गेल्याच्या बातमीने त्यात आलेला व्यत्यय–सुलतानाच्या भावाचे

बंड– विजापूर येथे त्याला झालेली कैद. सुल्तानाने त्याचे आणि त्याच्या बरोबर संबंध असलेल्या सर्वांचे केलेले हाल. सुलतानाने आपल्या प्रजेवर केलेले भयानक अत्याचार – त्याचे आजारीपण आणि मृत्यु (पान ४५२).

## निजामशाहा बहमनी

सुलतानाच्या अज्ञानपणात राजमाता, ख्वाजाजहान आणि महमूद गावान यांनी बनविलेले राजमंडळ. तेलंगण आणि ओरिसा यांच्या राजांनी बहमनींच्या राज्यावर केलेला हल्ला आंणि त्याना घ्यावी लागलेली माघार. दक्षिणेवर माळव्याच्या सुलतान महमूद याचे आक्रमण. दक्षिणी सैन्याचा पराभव. सुलतानाची बिदरकडे माघार. माळव्याच्या सैन्याची आगेकूच. सुलतानाची फिरोजाबादकडे माघार. माळव्याच्या सुलतानाकडून बिदर शहराचा ताबा. बहमनींच्या मदतीसाठी गुजरातच्या सुलतानाचे कूच. माळव्याच्या सुलतानाची माघार– त्याच्या सैन्याचे झालेले भयंकर हाल– आपले भारी सामान सुमान टाकून देण्याचा त्याच्यावर आलेला प्रसंग – गोंडवनाच्या डोंगरातून त्याला घ्यावी लागलेली माघार– त्याच्या सैन्याला भोगाव्या लागलेल्या भयंकर हालअपेष्टा. गुजरातचे सैन्य आपल्या देशाकडे परतते. माळव्याच्या सुलतानाची दुसरी स्वारी. गुजरातच्या सैन्याची आगेकूच. माळव्याच्या सुलतानाची माघार. दक्षिणेच्या सुलतानाचा अचानक मृत्यु ( पान ४६५ ).

## महमदशहा बहमनी दुसरा

जुलमी हुमायूनचा मुलगा महमदशहा याचे राज्यारोहण. दक्षिणेचे सैन्य माळव्याच्या सुलतानापासून खेडला जिंकून घेते. खेडला पुन्हा माळव्याच्या स्वाधीन आणि दोन्ही राज्यांत झालेला तह. ख्वाजा महमूद गावान याची कोकणवर स्वारी– खेळणा आणि रामगीर काबीज. महमूद गावान डोंगरसपाटी चढून जातो. कोल्हापुर येथे त्याचा पावसाळ्यात मुक्काम – पुन्हा कोकणाकडे चाल – गोवा काबीज – नवीन जिंकलेल्या मुलुखाचा ताबा किश्वर खानाकडे सोपवून राजधानीकडे महमूद गावानचे कूच. ख्वाजा महमूद गावानचे झालेले भव्य स्वागत. सुलतान स्वतःसैन्यासहीत तेलंगणावर चाल करुन जातो आणि राजमहेंद्री व कोंडापल्ली काबीज करतो. तेलंगणाचा सुभेदार म्हणून निजामन्उलमुल्क बहरी याची, दौलताबादचा सुभेदार म्हणून आदिलखान याची आणि वऱ्हाडचा सुभेदार म्हणून दर्या इमाद–उल्मुल्क याची अशा नेमणुका. सुलतानाची पश्चिमेच्या बाजूने चाल आणि बेळगावचा पाडाव. दक्षिणेमधील भयंकर दुष्काळ आणि अवर्षण. तेलंगणामध्ये बंड. बंडाचा बिमोड करण्यासाठी सुलतानाचे कूच– तेथून ओरिसाकडे चाल– पुन्हा दक्षिणेमध्ये आगमन आणि कांजीवरमची लुटालूट. वजीर ख्वाजा महमद गावान याच्या विरुद्ध कट. गावानच्या खोट्या सहीमुळे

तो दोषी असल्याची सुलतानाची खात्री. ख्वाजा महमूदचा वध– त्याचे स्वभावचित्र. सुलतानाला उमगून आलेली आपली चूक आणि त्याला झालेला पश्चात्ताप– त्याच्या सरदारांचे छावणीतून गमन. तापामुळे सुलतानाला झालेला आजार–त्याची रोग मुक्तता–मद्य पानाचा अतीरेक आणि पुन्हा उलटलेले दुखणे. सुलतानाचा मृत्यु (पान ४७७).

## महमूदशहा बहमनी दुसरा

दक्षिणी पक्षाची राज्यकारभारात वजीराने केलेली मजबुती. परदेशी मुसलमानांचे युसुफ आदिलखानाने घेतलेले पुढारीपण. दोन्ही पक्षांमधे घडून आलेला कलह. दोन्ही पक्षातील समझोता आणि परदेशी मुसलमानांकडून राजधानीचा त्याग. वजीर आणि कासीमबरीद यांच्याकडून सर्व सत्तेचे ग्रहण. त्यांचा खून घडवून आणण्यासाठी सुलतानाची आज्ञा–राजवाड्यामध्ये त्यांच्या खुनाचा झालेला प्रयत्न आणि त्याला आलेले अपयश. वजीराबद्दल लोकांमध्ये निर्माण झालेली अप्रियता आणि त्याच्या खुनाच्या दुसऱ्या प्रयत्नाला आलेले यश. सुलतानाचा मद्यपान आणि रंगढंग यामध्ये झालेला अतिरेक– राज्याच्या निलवर्ण सिंहासनाचे दारु पिण्याचे चषक आणि गुलदाने यामधे त्याने केलेले रुपांतर. कासीम बरीद कडून राज्यकारभाराचा ताबा. सुलतानाचा खून करण्याचा प्रयत्न आणि काही परदेशी मुसलमानांना तो मोडून काढण्यात आलेले यश. बहादुर गिलानीचे कोकणामध्ये बंड आणि ते मोडून काढण्यासाठी सुलतानाचे कासीम बरीद बरोबर पश्चिमेच्या दिशेने कूच. बहादुर गिलानी ठार – सुलतान बिदरकडे परततो. वजीराला ठार मारण्याच्या कटाला आलेले अपयश. वजीराचा मृत्यु–आणि त्याचा मुलगा अमीर बरीद याच्याकडे आलेली सत्ता. सुलतान आणि अमीर बरीद यांच्या मधील समेट. महमूदशहाचा मृत्यु (पान ५१९).

## अहमदशहा बहमनी दुसरा

दुसऱ्या महमूदशहा नंतर त्याचा मुलगा दुसरा अहमदशहा याचे राज्यारोहण. अमीर बरीदच्या हाती राज्यकारभाराचा आलेला संपूर्ण ताबा. सुलतानाची एक साधा पेन्शनर म्हणून त्याने लावलेली वाट– निर्वाहासाठी सुलतानाकडून मुकुटाच्या रत्नांची विक्री. या व्यवहारात सामील असलेल्या अनेकाना अमीर बरीद कडून देहदंडाची शिक्षा. रत्ने विकत घेणाऱ्यांचे विजयनगरकडे पलायन. सुलतानाचा मृत्यु. (पान ५५३)

## अलाउद्दीनशहा बहमनी दुसरा

अमीर बरीदचा अलाउद्दीन बहमनी याला सिंहासनावर बसविण्याचा निश्चय. आपल्या पूर्वजांच्या वाईट सवयी पासून सुलतानाची अलिप्तता आणि त्याने राज्यकारभारात घातलेले लक्ष– वजीराला पकडण्याचा त्याने रचलेला बेत. बेताची उघडीक–बेतामध्ये सामील असणाऱ्यांना देहदंडाची शिक्षा. सुलतानाची पदच्युती आणि तुरुंगामध्ये त्याचा झालेला खून (पान ५५५).

## वली उल्लाशहा बहमनी

दुसऱ्या महमूदशहाचा मुलगा वलीउल्लाशहा याला राज्याभिषेक. सुलतानाच्या पत्नीबद्दल वजीराच्या मनात निर्माण झालेली अभिलाषा– सुलतानाला विषप्रयोग आणि सुलतानाच्या विधवा स्त्री–बरोबर विवाह. (पान ५५७).

## कलीमउल्लाशहा बहमनी

नामधारी सुलतान म्हणून कलीमउल्ला याला राज्याभिषेक परंतु राजधानी मधील तुरुंगामध्ये राजबंदी म्हणून त्याला झालेली कैद. हिंदुस्थानवर त्यावेळी स्वारी केलेल्या बाबर बादशहाकडे आपल्या एका मित्राची वेषांतर करून त्याने केलेली रवानगी. या वकीलातीची अमीर बरीद याला लागलेली खबर– त्याने सुलतानावरील अधिक कडक केलेला पहारा. सुलतानाचे पलायन आणि त्याने आपल्या आईचा भाऊ इस्माईल आदिलशहा याच्याकडे घेतलेला आश्रय. तेथे मिळालेल्या वागणूकी बद्दल सुलतानाची नाखुषी आणि अहमदनगरच्या दरबाराकडे त्याने केलेले प्रयाण. मृत्युपर्यंत तेथे झालेले त्याचे वास्तव्य. बहमनी राजघराण्याचा शेवट (पान ५५८).

## पुस्तक तिसरे

# प्रकरण तिसरे (चालू)

### भाग तिसरा मूळ पाने १८९ ते ३२०

## निजामशाही ह्या नावाने प्रसिद्ध असलेल्या अहमदनगरच्या सुलतानांच्या घराण्याचा इतिहास

### अहमद निजामशहा

त्याच्या जन्माबद्दलची हकीकत आणि त्याचा पूर्वेतिहास; जुन्नरचा सुभेदार म्हणून त्याची नेमणूक; बिदरच्या दरबारात त्याच्या बापाचा खून झाल्यानंतर त्याने आपल्या स्वातंत्र्याची केलेली घोषणा; त्याने केलेला आपल्या राज्याचा विस्तार आणि सुलतान ही धारण केलेली पदवी; अहमदनगरचा किल्ला आणि शहर यांची बांधणी; बहमनी राज्याच्या अधिकाऱ्यांकडून दौलताबाद काबीज; खानदेशाच्या दक्षिणेकडील टेकड्यांमधील अनेक किल्ले व अंतुरचा किल्ला ह्यांचा पाडाव; गाळणा आणि बागलाण येथील राजांकडून सक्तीने खंडाची वसुली; खानदेशाच्या सिंहासनावर आलमखान फारुखी ह्याने सांगितलेल्या हक्काला अहमद निजामशहाने दिलेला पाठिंबा; परंतु गुजराथच्या सुलतानाने केलेल्या हस्तक्षेपामुळे त्याला घ्यावी लागलेली माघार. अहमद निजामशहाचा मृत्यु; त्याचे व्यक्तिमत्व. त्याच्या दरबारातील रीतिरिवाजांचे वर्णन (पान १८९).

### बुरहाण निजामशहा पहिला

वयाच्या सातव्या वर्षी सुलतानाचे सिंहासनावर आरोहण. मुकम्मीलखान दख्खनी याची वजीर आणि राजप्रतिनिधी म्हणून नेमणूक. त्याचा मुलगा अजीज–उल–मुल्क याची बादशहाच्या खाजगी सैन्याच्या सेनापती पदावर नियुक्ती. दरबारातील उमरावांच्या मनात अजीज–उल्–मुल्क ह्याच्या विषयी तिरस्कार आणि त्याच्या पक्षाला दूर करण्याचा त्यांनी केलेला निश्चय; सुलतानाचा धाकटा भाऊ राजाजु याला ताब्यात घेण्यासाठी त्यांनी केलेली प्रयत्नांची शिकस्त, आणि त्यामध्ये त्यांना आलेले अपयश; त्यांचे अहमदनगर मधून आठ हजार सैनिकांसह पलायन. त्यांची वऱ्हाडच्या सुलतानाबरोबर हातमिळवणी आणि वऱ्हाडच्या सुलतानाच्या मनात सैन्यासह निजामशाही प्रदेशावर हल्ला करण्याची झालेली इच्छा. अहमदनगरच्या तरुण

सुलतानाच्या सैन्याकडून राणुरीच्या झालेल्या लढाईत शत्रुचा पराभव. शत्रुचा पाठलाग आणि त्याला वऱ्हाडातून ध्यावी लागलेली माघार. शत्रुने खानदेशच्या सुलतानाकडे मध्यस्थ म्हणून काम करण्याची केलेली विनंती. दुसरे कोणतेही ठिकाण देऊन पाथरी अहमदनगरला देण्याची मुकम्मील खानाची मागणी. वऱ्हाडच्या सुलतानाकडून वरील मागणीचा धिक्कार आणि पाथरी शहराची त्याने केलेली मजबुती. त्यानंतर काही काळाने मुकम्मीलखानाने पाथरीवर केलेला रात्रीचा हल्ला आणि पाथरी काबीज. सुलतानाचे अमीना नावाच्या नर्तकीबरोबर रंगढंग आणि दारू पिण्याचे त्याला जडलेले व्यसन. मुकम्मीलखानाचा आपल्या वजीरपदाचा राजीनामा. शेख जाफर दख्खनी याची त्या पदावर नेमणूक. इस्माईल आदिलशहाची बहिण मरियम हिच्याबरोबर सुलतानाचा विवाह. विजापूरचा वकील बेळगावचा असदखान याच्याकडून सोलापुरचा किल्ला अहमदनगरच्या सुलतानाला मिळवुन देण्याचे आश्वासन; परंतु किल्ला तोडून देण्यास विजापूरच्या सुलतानाचा नकार. सुलतानाच्या पहिल्या बायकोची मरियमवर शिरजोरी. मरियमची आपल्या भावाकडे तक्रार. त्याने केलेला निषेध आणि अहमदनगरच्या सुलतानाला दिलेली धमकी. विजापूरच्या सुलताना विरुद्ध प्रचंड एकजूट, दोस्तांची सोलापूर घेण्यासाठी चढाई; त्यात झालेला त्यांचा पराभव. पाथरीवर हल्ला करण्यासाठी विजापूरच्या सुलतानाची वऱ्हाडच्या सुलतानाला चिथावणी; पाथरीचा पाडाव आणि पाथरी अहमदनगरकडून पुन्हा काबीज. पाथरीचा किल्ला जमीनदोस्त, वऱ्हाड आणि खानदेशच्या सुलतानांचा बुरहाण निजामशहावर हल्ला; त्या दोघांचा पराभव आणि अहमदनगरकडून तीनशे हत्ती काबीज. गुजराथचा सुलतान बहादूरशाहा याच्याकडे त्यांची मदतीची मागणी. बुरहाण निजामशहाला बिदरचा सुलतान अमीर बरीद याच्याकडून मदत आणि विजापूर कडून सैन्याच्या तुकडीची पाठवणी. अमीर बरीदचा बीड जवळ हल्ला आणि गुजराथच्या सैन्याच्या दोन विभागांची त्याने केलेली दैन्यावस्था; परंतु अखेर बुरहाण निजामशहाला प्रथम परेंड्याकडे आणि नंतर जुन्नरकडे ध्यावी लागलेली माघार. गुजराथच्या बहादुरशहाची अहमदनगरचा सुलतान म्हणून फिरलेली द्वाही आणि नंतर त्याचे दौलताबादकडे प्रयाण. बुरहाण निजामशहाकडून शेख जाफर ह्याची पेशवे पदावरुन बडतर्फी आणि त्याचे जागी कान्हू नरसी ह्या हिंदुची नेमणूक. सरतेशेवटी झालेला तह आणि शांतता. सुलतानांचे आपापल्या राजधान्यांकडे प्रयाण. गुजराथच्या बहादुर शहाच्या नावे खुत्ब्याचे बुरहाण निजामशहाला करावे लागलेले वाचन. माळवा जिंकल्यानंतर खानदेश मधे बुरहाणपुर येथे बहादूरशहाचे आगमन. त्याला भेटण्यासाठी बुरहाण निजामशहाला निमंत्रण. त्यात निर्माण झालेल्या अडचणी आणि या अडचणींचे शहा ताहिर तर्फे निराकरण. दोघामधील भेटीचे वर्णन. अहमदनगर आणि विजापूर ह्या राज्यांच्या सुलतानामधे राज्याच्या सरहद्दीवरुन निर्माण

झालेले कलह; वकीलांतर्फे मध्यस्थी, शिया पंथाला बुरहाण निजामशहाने दिलेला पाठिंबा; विजापूरच्या सुलतानाच्या मनामधे त्याचा वजीर बेळगावचा असदखान याच्या विरूद्ध निर्माण झालेल्या मत्सराचा फायदा घेऊन त्याच्या विरूद्ध बुरहाण निजामशहाने पुकारलेले युद्ध; अखेर त्याला घ्यावी लागलेली माघार; गोवळकोंड्याचा सुलतान आणि रामराजा यांच्याशी संगनमत करून त्याने पुन्हा सुरु केलेले युद्ध. अहमनगरच्या सुलतानाच्या तीन मोहिमा आणि अगदी थोड्या यशाची त्याला झालेली प्राप्ती, त्याचा मृत्यु; त्याच्या मृत देहाची करबला येथे रवानगी (पान २१०).

## हुसेन निजामशहा पहिला

वयाच्या तेराव्या वर्षी सिंहासनावर आरोहण, आणि त्याला मिळालेला परदेशी सैनिकांचा पाठिंबा; त्याचा भाऊ अब्दुल कादर ह्याने सिंहासनावर सांगितलेला अधिकार आणि दक्षिणी मुसलमानांनी त्याला दिलेला पाठिंबा; सुलतानाच्या सावत्र भावांचे त्यांत्रा चुलता विजापूरचा सुलतान ह्याच्याकडे पलायन; सुलतानाची विजापूर विरूद्ध युध्दाची घोषणा; विजापूरला वेढा. विजापूरच्या सुलतानाचा मृत्यु; युध्द पुढे चालू; हुसेन निजामशहाची पैठणकडे माघार; अहमदनगरला पडलेला वेढा. दोन्ही राज्यामधील शांततेचा तह. अहमदनगरच्या किल्ल्याची मजबुती. पुन्हा युध्दाला सुरवात. विजापूरचा सुलतान आणि विजयनगरचा राजा ह्यांच्याविरूद्ध गोवळकोंड्याच्या सुलतानाची अहमदनगरच्या सुलतानाबरोबर हात मिळवणी. एका चकमकीत अहमदनगरच्या सुलतानाच्या सहाशे तोफा निकामी. अहमदनगरला दुसऱ्यांदा वेढा. रात्रीच्या वेळी सिना नदीला आलेल्या पुरात शत्रुच्या पंचवीस हजार माणसांचा नाश. दोन्ही पक्षामधील तह. विजयनगरच्या रामराजा विरूद्ध दक्षिणेतील मुसलमानी सुलतानांची एकजूट. त्याचा पराभव आणि मृत्यु. पहिल्या हुसेन निजामशहाचा मृत्यु (पान २३७).

## दिवाणा अथवा वेडा म्हणून प्रसिद्ध असलेला मुर्तजा निजामशहा

सुलतान अज्ञान असताना राजमाता खुनजा सुलताना हिने आपल्याकडे घेतलेले राज्याचे सर्वाधिकार; विजापूरवर हल्ला करण्यासाठी तिने केलेली चाल. दोन्ही राज्यामधील तह. विजापूर आणि अहमदनगर ह्या राज्यांची वऱ्हाड जिंकण्यासाठी एकजूट. दोन्ही राज्यांची सैन्ये वऱ्हाडात फक्त लुटालूट करून परततात. वयात आलेला सुलतान आपल्या आईकडून सत्ता हिसकावून घेतो आणि तिची सार्वजनिक जीवनातून निवृत्ती. सुलतानाकडून राज्याच्या सर्व अधिकारांचे ग्रहण; विजापूर विरूद्ध त्याने पुकारलेले युद्ध; धारूरवर हल्ला आणि धारूरचा पाडाव. समुद्र पट्टीवर असलेल्या रेवदंडा ह्या बंदरामधून पोर्तुगीजांची हकालपट्टी करण्याचा सुलतानाचा प्रयत्न आणि त्याला आलेले अपयश. अहमदनगर आणि विजापूर ह्या दोन राज्यांमधे वऱ्हाड आणि

विजयनगर ह्यांच्या फाळणी संबंधी झालेला करार. अहमदनगरच्या सुलतानाकडून वऱ्हाड काबीज. दिल्लीचा बादशहा अकबर ह्याची वऱ्हाड सोडून देण्याबद्दलची सुलतानाला आज्ञा. अहमदनगरचा सेनापती आणि वजीर चेंगीजखान ह्याचे व्यक्तिचित्र; त्याचा मृत्यु. वजीर सलाबतखान. आपल्या मुलाचे प्राण घेण्याचा सुलतानाचा प्रयत्न. सुलतानाच्या मुलाकडून त्याचा खून (पान २५०).

## मीरान हुसेन निजामशहा

सुलतानाची अतिशय बेछूट आणि बेबंध अशी वागणूक आणि त्याने केलेले भयानक अत्याचार. सुलतानाचा चुलता याला सिंहासनावर बसविण्याचा बेत असल्याचा वजीर मीरजाखान ह्याच्याबद्दल सुलतानाच्या मनात संशय. वजीराची कैद आणि त्याची पुन्हा सुटका. राजघराण्यांतील हयात असलेल्या सर्व पुरुषांना ठार मारण्याची त्याने केलेली शिफारस. एकाच दिवशी पंधरा राजपुत्रांचा खून. राजद्रोहाबद्दल वजीराचा पुन्हा संशय. वजीराला पकडण्यासाठी सुलतानाने केलेला बेत सुलतानावर उलटतो, त्याची हकीकत. वजीराकडून सुलतानाला झालेली कैद. बारा वर्षे वयाच्या राजपुत्र इस्माईल ह्याला वजीर आणि परदेशी सैनिक ह्यांच्याकडून राज्याभिषेक. जमालखान नावाच्या दक्षिणी पुढाऱ्याने मीरजाखानाच्या हालचालींना विरोध दाखविण्यासाठी माजविलेली दंगल. मीरान हुसेन याला गादीवर बसविण्यासाठी जमालखानाची मागणी; मीरान हुसेन याचा खून आणि काठीवर ठेवून लोकांना दाखविण्यात आलेले त्याचे मस्तक. राज्यकारभारामध्ये दक्षिणी लोकांना अग्रक्रम देण्यात यावा याबाबत जमालखानाचा आग्रह. अहमदनगरच्या किल्ल्यावर हल्ला करण्यासाठी त्याने लोकांना दिलेली चिथावणी. लोकांकडून किल्ल्याचे दरवाजे भस्मसात् आणि किल्ल्यात प्रवेश. किल्ल्यामध्ये आणि शहरामध्ये असलेल्या परदेशी मुसलमानांची दक्षिणी आणि हबशी लोकांकडून कत्तल. वजीर मीरजाखान ह्याची मानखंडना आणि त्याचा हालहाल करून करण्यात आलेला वध (पान २७०).

## इस्माईल निजामशहा

जमालखानाच्या हाती आलेली संपूर्ण सत्ता; मेहेदवी नावाच्या पंथाचे त्याच्याकडे आलेले पुढारीपण. राज्यामध्ये असलेल्या सर्व परदेशी मुसलमानांना राज्य सोडून जाण्याचा हुकूम. ग्रंथाचा लेखक फरिश्ता अहमदनगर सोडून विजापूरचा आसरा घेतो. परागंदा झालेला वजीर सलाबतखान याचा वऱ्हाडमधून फौज आणून जमालखानाला प्रतिकार आणि त्याचा झालेला पराभव. विजापूरच्या राजप्रतिनिधींची सैन्यासहित जमालखानावर चढाई. दोन्ही राज्यांमधे झालेला तह. लढाईचा खर्च भरून काढण्यासाठी जमालखानाकडून आठ लक्ष पन्नास हजार रुपयांची खंडणी विजापूरकडे अदा. अलि आदिलशहाची विधवा स्त्री चांदबिबी हिची विजापूरकडे करण्यात आलेली पाठवणी. ★ इस्माईल निजाम-

शहाचा बाप बुरहाण ह्याच्या सिंहासनावरील हक्काला बादशहा अकबर याने दिलेला पाठिंबा. ★ (आपला भाऊ वेडा मुर्तजा निजामशहा ह्याच्या भितीने अनेक वर्षे दरबार सोडून परागंदा झालेल्या). विजापूर दरबारचा देखील बुरहाणला पाठिंबा, विजापूरच्या सैन्याचा जमालखानाकडून पराभव आणि बुरहाणला प्रतिकार करण्यासाठी त्याची चाल. युद्धाला सुरवात. जमालखान युद्धात ठार. युद्धभूमीवरून इस्माईल निजामशहाचे पलायन परंतु त्यानंतर त्याची कैद व बापाकडून त्याला झालेला बंदिवास. बुरहाणचे बुरहाण निजामशहा दुसरा म्हणून सिंहासनावर आरोहण ( पान २७६ ).

## बुरहाण निजामशहा दुसरा

त्याचे पूर्वायुष्य: सिंहासन मिळविण्यासाठी त्याने पूर्वी केलेल्या प्रयत्नांची सविस्तर हकिकत. राज्यातून मेहेदवी पंथाच्या लोकांची हकालपट्टी. शिया पंथाची पुन्हा स्थापना. विजापूरचा पूर्वीचा राजप्रतिनिधी दिलावरखान ह्याचे अहमदनगर येथे आगमन आणि त्याचा झालेला आदरसत्कार. इब्राहीम आदिलशहाकडून त्याला पाठवून देण्यासंबंधीची मागणी आणि त्या मागणीचा धिक्कार. युद्धाला सुरवात; पोर्तुगीजांपासून रेवदंडा परत घेण्याचा बुरहाण निजामशहाचा प्रयत्न. कोरला किल्ल्याची बांधणी; रेवदंड्याचा वेढा पुढेचालू. वेढा घालून बसलेल्या सैन्यावर पोर्तुगीजांचा हल्ला आणि त्या सैन्याची कोरला किल्ल्याकडे माघार. पळणाऱ्या सैनिकांचा पोर्तुगीजांकडून पाठलाग आणि बारा हजार दक्षिणी मुसलमानांची कत्तल. सुलतानाकडून राज्यातील मोठ्या जागांवर परदेशी मुसलमानांच्या नेमणूका. इब्राहीम आदिलशहाला गादीवरून काढून टाकण्यासाठी त्याच्या भावाला सुलतानाने देऊ केलेली मदत. आपल्या भावाच्या बंडाचा आदिलशहाकडून बिमोड आणि त्याला देहदंडाची शिक्षा. विजापूरच्या सुलताना विरूद्ध रामराजाचा भाऊ व्यंकटाद्रि ह्यांच्या बरोबर बुरहाण निजामशहाची एकजूट. त्याचा सोलापूर वरील हल्ला. हल्ल्यात निजामशाही सैन्याचा झालेला पराभव आणि त्यांच्या सेनापतीला आलेला मृत्यु. सुलतानाचे आजारीपण आणि त्याच्याकडून राजपुत्र इब्राहीम ह्याच्या नावे वारस म्हणून द्वाही. सिंहासनावरून पदच्युत झालेल्या इस्माईल. निजामशहाच्या बाजूने इखलासखान नावाच्या सरदाराच्या हाताखाली निर्माण झालेला गट. इस्माईलची युध्द घोषणा. युद्धात झालेल्या त्याचा पराभव आणि त्याचे परेंडा येथे पलायन. बुरहाण निजामशहाचा मृत्यु. (पान २८२).

## इब्राहीम निजामशहा

मिया मंजू दखनी याची वजीर म्हणून नेमणूक. इखलासखानाच्या अपराधाची क्षमा आणि पुन्हा दरबारात परतण्यास त्याला परवानगी; मिया मंजूला विरोध करण्यासाठी त्याने स्वतःकडे घेतलेले एका पक्षाचे पुढारीपण. विजापूरच्या वकिलाचा अपमान आणि

त्याने केलेला दरबाराचा त्याग. युद्धाला सुरवात. दोन्ही विरोधी पक्षांच्या पुढाऱ्यांची एकजूट आणि सुलतानासह त्यांची विजापूरच्या सरहद्दीकडे चाल. विजापूरबरोबर तह करावा आणि इब्राहीम अलिशहाबरोबर एकजुट करून दिल्लीच्या अकबर बादशहाचे आक्रमण मोडून काढावे असा मिया मंजू याने इखलासखानाकडे केलेला प्रस्ताव. या प्रस्तावाचा झालेला धिःकार. सुलतानाच्या बेफाट वागणुकीमुळे युद्धाला झालेली सुरवात. युद्धात सुलतानाचा झालेला मृत्यू आणि त्याच्या सैन्याचा पराभव. सुलतानाचा एकमेव तान्हा मुलगा बहादूर याची मिया मंजूकडून चांदवडच्या किल्ल्यात रवानगी; दौलताबादच्या किल्ल्यातून अहमद नावाच्या मुलाची मिया मंजूकडून आणवणी आणि त्याने अहमदला केलेला राज्याभिषेक (पान २८८).

## शहा ताहीरचा मुलगा अहमद

अहमदला सिंहासनावर बसविण्यासाठी दरबारातील सरदारांची मियामंजू याच्याबरोबर एकजूट, अहमदचे मूळ घराणे कोणते असावे यासंबंधीं इखलासखानाने सुरू केलेली चौकशी, त्याने आपण राजघराण्यातील आहोत असा जो दावा केला त्याला झालेला विरोध. मियामंजू आणि त्याचे साथीदार यांना इखलासखानाकडून किल्ल्यामध्ये वेढा. दौलताबादच्या किल्ल्यांत कैदेत असलेल्या नेहंगखान आणि हबशखान यांची त्याने केलेली सुटका. मृत सुलतानाचा मुलगा राजपुत्र बहादूर याचा ताबा घेण्यात त्याला आलेले अपयश. अहमदनगरच्या बाजारांत त्याने बहादूरच्याच वयाचा एक मुलगा पैदा करून त्याच्या नांवे सुलतान म्हणून फिरविलेली द्वाही. दिल्लीचा अकबर बादशहा याचा मुलगा राजपुत्र मुराद मिरजा याच्याकडे मियामंजू याने पाठविलेले प्रतिनिधी मंडळ आणि अहमदनगरवर चाल करून येण्याचे त्याने त्याला दिलेले निमंत्रण. इखलासखानाच्या पक्षात निर्माण झालेली फाटाफूट. इखलासखानाच्या पक्षावर मियामंजूचा हल्ला आणि त्याने त्याचा केलेला पराभव. तीस हजार सैनिकांच्या समवेत अहमदनगरच्या परिसरात राजपुत्र मुरादमिरजा याचे आगमन. मोगलांना प्रतिकार करण्याचा मियामंजू याने केलेला निर्धार आणि किल्ल्याचे संरक्षण करण्यासाठी त्याने केलेली उपाय योजना. चांदबिबीला तेथे ठेऊन किल्ल्याचा अहमदशहाला बरोबर घेऊन त्याने केलेला त्याग. किल्ल्याच्या सुभेदाराचा चांदबिबीने घडवून आणलेला खून आणि आपला नात पुतण्या बहादुरशहा याच्या नांवे सुलतान म्हणून तिने फिरविलेली द्वाही. राजप्रतिनिधी मंडळाची स्थापना. अहमदनगरला वेढा. सिंहासनावर अधिकार सांगणारे चार तोतये. नेहंगखान या हबशी प्रमुखाच्या नेतृत्वाखाली असलेल्या पक्षाबरोबर चांदबिबीने केलेली एकजूट. विजापूरच्या सुलतानाने चांदबिबीबरोबर सहकार्य करण्यासाठी १२ हजार सैनिकांच्या एका तुकडीची सुहेलखानाच्या हाताखाली केलेली

रवानगी. मियामंजू आणि इखलासखान यांनी त्याच्या बरोबर केलेली हात मिळवणी, मोगलांचा हल्ला परतवून लावण्यासाठी गोवळकोंड्याच्या सुलतानाने मदत म्हणून सहा हजार घोडेस्वारांची केलेली रवानगी. मोगलांचा अहमदनगरवर जोरदार हल्ला. किल्ल्याच्या शिबंदीने मोठ्या शौर्याने केलेला बचाव. चांदबिबीने दाखविलेली हिंमत. मोगलांचा हल्ला. परतवून लावण्यात अहमदनगरच्या सैनिकांना आलेले यश. मोगल आणि अहमदनगर यांच्यामध्ये झालेला तह, आणि या तहाप्रमाणे निजामशाही राज्याने मोगलांच्या स्वाधीन केलेले वऱ्हाडच्या सार्वभौमत्वाचे अधिकार. मोगलांची माघार. अहमदनगरच्या दोस्त राष्ट्रांच्या सैनिकांचे अहमदनगर येथे आगमन. बहादूरशहाच्या सिंहासनावरील अधिकाराला मान्यता. चांदबिबीची राजप्रतीनिधी म्हणून नेमणूक. सिंहासनावरून पद च्युत झालेल्या सुलतान अहमद याची विजापूरच्या इब्राहीम आदिलशहातर्फे जहागिरी देऊन चरितार्थाची सोय. (पान २९२).

## बहादूर निजामशहा

राणी चांद बहादूर निजामशहाची सुटका घडवून आणते. त्याला झालेला राज्याभिषेक. महमदखान याची पेशवा म्हणून नेमणूक आणि त्याने आपल्या नातेवाईकांची मोठमोठ्या जागावर केलेली नियुक्ती. जुन्या सरदार मंडळींना आलेला उबग. त्यांच्यापैकी अनेकांची महमदखानाकडून धरपकड. राणी चांदने आपला पुतण्या विजापूरचा इब्राहीम आदिलशहा याच्याकडे केलेली मदतीची विनंती. तिच्या मदतीसाठी आदिलशहाने आपला सेनापती सुहेलखान याच्या हाताखाली केलेली सैन्याची रवानगी. मोगल सेनापती खान-खानान याच्याबरोबर महमदखान याची कारस्थाने. महमदखानाच्या विश्वासघातकी वागणुकीची उघडीक आणि अहमदनगरच्या शिबंदीने त्याला केलेली कैद. त्याला शिक्षा देण्यासाठी राणी चांद हिच्याकडे त्याची रवानगी. मागील तहामध्ये समावेश न झालेल्या जिल्ह्यावर मोगलांचा सक्तीने ताबा. सुहेलखानाच्या हाताखाली अहमदनगर, विजापूर आणि गोवळकोंडा या राज्यांच्या साठ हजार संख्येने असलेल्या प्रचंड सैन्याची वऱ्हाडच्या दिशेने कूच. सुपाळ येथे झालेली लढाई. अखेर दुसऱ्या दिवशी दक्षिणी सैन्याचा झालेला पराभव. मोगल सैन्याची जालना येथे छावणी. राणी चांद हिच्याकडून नेहंगखानाची पेशवे पदावर नेमणूक. तिला कैद करण्याचा त्याने केलेला प्रयत्न; त्याची किल्ल्यातून हकालपट्टी; त्याने किल्ल्याला दिलेला वेढा; गोदावरीच्या दक्षिणेकडील मोगलांनी ताब्यांत घेतलेले काही जिल्हे त्यांच्याकडून पुन्हा काबीज. राजपुत्र मुरादमिरजा याचा मृत्यू; दक्षिणेतील सैन्याच्या सेनापतीपदावर त्याच्या पाठीमागून त्याचा भाऊ दानीयलमिरजा याची नेमणूक. अकबर बादशहाचे दक्षिणेकडे कूच; त्याचा असीरला वेढा; त्याचा मुलगा दानीयल याची अहमदनगरवर

हल्ला करण्यासाठी आगेकूच. मोगलांच्या चढाईला प्रतिकार करण्याचा नेहंगखानाचा प्रयत्न आणि सरतेशेवटी त्याला जुन्नरकडे घ्यावी लागलेली माघार. अहमदनगरचा दुसरा वेढा. राणी चांद हिने बोलाविलेली युद्धमंडळाची बैठक आणि किल्ला मोगलांच्या ताब्यात देण्यात यावा अशी तिने केलेली शिफारस. युद्धमंडळाचा तिच्या मताविरुद्ध निर्णय; किल्ल्याच्या शिबंदीकडून राणी चांद हिला झालेली कैद आणि तिचा खून. मोगलांकडून अहमदनगरवर हल्ला आणि अहमदनगरचा पाडाव. किल्ल्यावरील शिबंदीची कत्तल. ग्वाल्हेरच्या किल्ल्याकडे बहादूर निजामशहाची कैदी म्हणून रवानगी (पान ३०५).

## मूर्तजा निजामशहा दुसरा

शहाअलि याचा मुलगा मूर्तजा याची सुलतान म्हणून स्वतःच्या नांवे द्वाही; कांही निजामशाही सरदारांनी त्याला दिलेला पाठिंबा. मलीकअंबर आणि मियाराजु या दोन दक्षिणी पुढाऱ्यांचा सर्व निजामशाही मुलुखावर ताबा. अहमदनगरचा मोगल सुभेदार खान–खानान याचे त्यांना या प्रदेशातून हाकलून देण्याचे अयशस्वी प्रयत्न; अखेर त्याने मलीकअंबरबरोबर घडवून आणलेला संधि. सुलतानाची मलीकअंबरबरोबर हातमिळवणी आणि दौलताबाद येथे त्याने भरविलेला दरबार. अहमदनगर येथे राजपुत्र दानीयल मिरजा याचे आगमन आणि मलीकअंबरने त्याचा केलेला सन्मान. दानीयल मिरजा याने इब्राहीम आदिलशहाच्या मुलीबरोबर केलेला विवाह. मलीकअंबरविरुद्ध मदत करण्यासाठी मूर्तजा निजामशहाने मियाराजू याला केलेले पाचारण. दोन विरोधी प्रमुखांमधे युद्धाची सुरुवात. मलीकअंबरचा सुलतानाबरोबर झालेला समझोता. दौलताबादहून जुन्नर येथे राजधानीची हालवाहालव. मलीकअंबरकडून अखेर मियाराजूचा युद्धांत पराभव आणि जवळ-जवळ सर्व निजामशाही मुलखावर त्याला प्राप्त झालेली हुकमत. (पान ३१४).

# पुस्तक तिसरे

# प्रकरण तिसरे (चालू)

## भाग दुसरा मूळ पाने ३ ते १८८

## आदिलशहा या नावाने माहित असलेल्या विजापुरच्या सुलतानांचा इतिहास

## युसुफ आदिलशहा

त्याच्या घराण्याचा विलक्षण असा उगम; इराणमधून हिंदुस्थानामध्ये आगमन; दक्षिणेच्या सुलतानाने त्याला दिलेला राज्याश्रय आणि तेथे त्याने मिळविलेले असामान्य स्थान; परदेशी सैनिकांचे त्याच्याकडे आलेले पुढारीपण आणि कासीम बरीद याला त्याने

केलेला विरोध. विजापुर येथे त्याने टिकवून धरलेले आपले स्वातंत्र्य. बहादुर गिलानी, अहमदनगरचा मलीक अहमद बहरी आणि विजयनगरचा राजा याना युसुफवर हल्ला करण्यास कासीम बरीदने दिलेली चिथावणी. विजयनगरच्या राजावर त्याने मिळविलेला विजय आणि त्याच्या पदरात पडलेली प्रचंड संपत्ती. सगरच्या मुसलमान सुभेदाराला युसुफविरुद्ध युद्ध करण्यास देण्यात आलेली चिथावणी आणि झालेल्या युद्धात सुभेदाराचा मृत्यु. विजापुर, गोवळकोंडा, बिदर, अहमदनगर आणि वऱ्हाड यांच्या सार्वभौम राज्यांचीं स्थापना. युसुफकडून सुलतान या पदवीची धारणा; त्याने राज्यामध्ये शिया पंथ सुरू करण्याचा केलेला प्रयत्न; सिंहासन गमाविण्याचा त्याच्यावर ओढावलेला प्रसंग आणि शिया पंथाची स्थापना करण्याचा त्याला सोडून द्यावा लागलेला प्रयत्न. पोर्तुगीजां कडून गोवा काबीज परंतु थोड्याच अवधीत युसुफ आदिलशहाकडून गोव्याचा पाडाव. त्याचा मृत्यु आणि व्यक्तिमत्व (पान ३).

## इस्माईल आदिलशहा

मृत सुलतानाने आपल्या मृत्युशय्येवर कमालखान दख्खनी याची आपला एकुलता एक मुलगा इस्माईल याचा रक्षक म्हणून केलेली नेमणूक. सुन्नी पंथाची राज्याचा धर्म म्हणून उघडपणे करण्यात आलेली स्थापना. पोर्तुगीजांकडून गोवा पुन्हा काबीज. पोर्तुगीजां बरोबर तह. सुलतानाकडे विलीन होणाऱ्या अनेक जहागिरीवर कमालखानाने मिळविलेला ताबा आणि प्रत्यक्ष सिंहासनावर अधिकार सांगण्याचा त्याने घातलेला घाट. बिदरच्या अमीर बरीद बरोबर त्याने रचलेला डाव आणि या डावाप्रमाणे भीमा नदीच्या पूर्वेकडील आणि सोलापुरच्या दक्षिणेकडील सर्व जिल्हे त्याला देऊन पंढरपुरापासून भीमानदीच्या पश्चिमेकडील सर्व प्रदेशाचा सुलतान म्हणून स्वतःच्या नावे द्वाही फिरविण्याची त्याची योजना; सुलतानाला पदच्युत करण्याचा त्याने केलेला कट. कमालखानाच्या योजनेला विरोध करण्याचा राजमातेचा निश्चय. कमालखानाचा खून. कमालखानाच्या आईची जाणुनबुजून राज्यविरोधी वागणूक आणि त्याच्या मुलाच्या कारवाया. दुध भावाची (गजनफर बेग) बहीण दिलशादआगा हिने दाखविलेले फार मोठे साहस; राजवाड्या सभो-वार तिने केलेली परदेशी सैनिकांची जमवाजमव; कमालखानाच्या मुलाने केलेल्या प्रत्येक प्रयत्नाला तिने केलेला विरोध; कमालखानाच्या मुलाचा अचानक हल्ला करून राजवाडा जिंकून घेण्याचा प्रयत्न आणि तटबंदीवरून लोटलेला दगड अंगावर पडल्यामुळे त्याला आलेला मृत्यु. सुलतानाच्या पक्षाचा विजय. सर्व दक्षिणी सैनिकांची बडतर्फी आणि परदेशी शिपायांना देण्यात आलेले उत्तेजन. अमीर बरीद याला कमालखानाने दिलेल्या पूर्वेकडील जिल्ह्यांवर हल्ला करण्याबाबत मिरजा जहांगीर याला अधिकार पत्र; ते सर्व जिल्हे काबीज. महमूदशहा बहमनीच्या नावे अमीर बरीद याने सर्व दक्षिणी राज्यांना मदत पाठविण्यासबंधी

दिलेला आदेश; त्याची विजापूरवर चाल; त्याचा पराभव; बहमनी सुलतान आणि त्याचा मुलगा यांच्याबरोबर बिदरकडे छोट्याशा सैन्याची रवानगी. अमीर बरीदची राजधानीतून माघार. हिंदूंनी जिंकून घेतलेली रायचुर आणि मुदगल ही शहरे परत घेण्याचा इस्माईल आदिलशहाचा निश्चय. कृष्णेच्या तीरावर सैन्यासहित त्याचे कूच; शत्रुच्या ताब्यात असलेले नदीवरील तरीचे मार्ग; सुलतान हत्तीवरून पैलतीराला पोहोचतो; त्याच्या पाठोपाठ त्याच्या सैन्याचे पैलतीरावर झालेले आगमन, हिंदूंवर त्याने केलेला हल्ला आणि त्या हल्ल्याचा झालेला मोड; जेमतेम जीव बचावून आदिलशहाने केलेले पलायन; त्याचा सेनापती बेळगावचा असदखान याचा त्याला विजापूरकडे परतण्याचा सल्ला. सोलापूर येथे सुलतानाची बुरहाण निजामशहाबरोबर भेट आणि सुलतानाच्या बहिणीबरोबर निजामशहाचा विवाह. सोलापूर आणि इतर जिल्हे हुंड्यादाखल देण्याचे वचन; कालांतराने ते जिल्हे देण्यात इस्माईल आदिलशहाची टाळाटाळ. युद्धाला सुरवात. बुरहाण निजामशहाचा पराभव. पुढील वर्षी बुरहाण निजामशहाचा पुन्हा हल्ला आणि त्याचा पुन्हा पराभव. सुलतानाची बहीण खदीजा हिचा वऱ्हाडच्या अल्लाउद्दीन इमादशहाबरोबर विवाह. गुजराथच्या बहादुरशहाचा हल्ला परतवून लावण्यासाठी बुरहाण निजामशहाला दहा लक्ष होन एवढ्या रकमेची मदत. सुलतानाचा अमीर बरीदवर हल्ला आणि बिदरला वेढा. सुलतानाने आपल्या हाताने अमीर बरीदच्या दोन मुलांचा घडवून आणलेला मृत्यु. अमीर बरीदची कैद आणि त्याला त्याच्या ताब्यातील प्रदेशाचे पुन्हा दान. इस्माईल आदिलशहाचा मृत्यु, त्याचे व्यक्तिमत्व (पान ३२).

## मल्लु आदिलशहा

मल्लु आणि इब्राहीम हे लहान असल्यामुळे त्यांचे पालकत्व बेळगावच्या असदखानाच्या स्वाधीन; विजापूर येथे सैन्य परत येईपर्यंत, त्याने तहकूब केलेला राज्याभिषेक, दोन्ही राजपुत्रामध्ये कोणाबद्दल निष्ठा दाखवावयाची याबाबत सरदारांमधे मतभेद. सिंहासनावर कोणाला बसवावयाचे ह्यासंबंधी जनानखान्यांतील स्त्रियांबरोबर विचारविनिमय. मृत सुलतानाचा मोठा मुलगा मल्लु ह्याला राज्याभिषेक करण्याबाबत त्यानी केलेली शिफारस. असदखानाची वजीर म्हणून नेमणूक; सुलतानाच्या वागणूकीमुळे त्याचा झालेला अपमान; त्याचा आपल्या वजीर पदाचा राजीनामा आणि आपले जहागिरीचे ठिकाण बेळगाव इकडे प्रयाण. इस्माईलखान दखनी ह्याची वजीर म्हणून नेमणूक. सुलतानाच्या दुर्गुणांमुळे त्याच्या बद्दल सरदारांच्या मनात निर्माण झालेला तिरस्कार. दरबारातून त्यांनी आपापल्या जहागिरीकडे केलेले प्रयाण. सुलतानाला गादीवरून काढून त्याच्या जागी त्याचा भाऊ इब्राहीम ह्याला बसविण्यासाठी सुलतानाची आजी हिने युसुफखान तुर्क ह्याची केलेली योजना. मल्लु आदिलशहा ह्याची पदच्युती आणि तो

व त्याचा भाऊ अल्लु ह्यांना डोळे काढण्याची शिक्षा. इब्राहीम आदिलशहा ह्याला झालेला राज्यभिषेक (पान ७३).

## इब्राहीम आदिलशहा पहिला

सुलतानाने परदेशी मुसलमानांना काही अपवाद सोडून दरबारात घेण्यासाठी केलेली बंदी; सुलतानाने तीस हजार घोडेस्वारांचा सैन्यात केलेला भरणा आणि त्यात केलेला दक्षिणी लोकांचा समावेश; सरकार दरबारचे वृतांत दक्षिणी भाषेत ठेवण्याबाबत त्याने काढलेला हुकूम. विजापूर मधील यादवी युद्धाचा इतिहास. विजयनगरच्या सिंहासनावर तेथील वजीर रामराजा ह्याचे आरोहण; त्याच्या राजा ह्या पदवीला इब्राहीम आदिलशहाने दाखविलेला आपला विरोध. दोन्ही राज्यांमधे युद्धाला सुरवात आणि त्यामधे हिंदुना मिळालेला विजय. आपला वजीर आणि सेनापती असदखान ह्याच्याबद्दल इब्राहीम आदिलशहाला वाटू लागलेली असूया. अहमदनगर आणि बिदरच्या सुलतानांची इब्राहीम आदिलशहाविरूद्ध एकजूट. दोन्ही पक्षांमधे वऱ्हाडच्या सुलतानाची मध्यस्थी. इब्राहीम ह्याचा आपल्या वजीराबरोबर झालेला समझोता. अहमदनगर आणि गोवळकोंडा ह्या राज्यांचे सुलतान व विजयनगरचा राजा यांची इब्राहीम आदिलशहाविरूद्ध भयंकर एकजुट. राजपुत्र अब्दुल्ला याचे गोव्याकडे पोर्तुगीजांकडे पलायन आणि सुलतानाला गादीवरून काढून टाकण्यासाठी त्याने त्यांच्याकडून मदतीचे घेतलेले आश्वासन ! राजपुत्र अब्दुल्ला ह्याची कैद आणि त्याला मृत्युची शिक्षा. अहमदनगरच्या सुलताना बरोबर युध्द, आणि हे युध्द चालू असताना अहमदनगरच्या सुलतानाचा मृत्यु. अहमदनगरच्या वारसा बरोबर युध्द चालू. इब्राहीम आदिलशहाचा मृत्यु (पान ७८).

## अलि आदिलशहा

त्याच्या पूर्वजीवनाचा वृतांत; शिया पंथाचा स्वीकार; अहमदनगरच्या सुलताना विरूद्ध युध्दामध्ये विजयनगरच्या राजाची मदत मिळविण्याचा यशस्वी प्रयत्न. यशस्वी मोहिमे नंतर अलि आदिलशहाची तहाच्या अटी स्विकारण्यास संमति. गोवळकोंड्याच्या सुलतानाच्या संगनमताने अहमदनगरच्या सुलतानाकडून लढाईला पुन्हा सुरवात. अलि आदिलशहा आणि विजयनगरचा राजा युध्दाचे आव्हान स्विकारतात. शांततेचा तह. विजयनगरच्या राजाविरूद्ध दाक्षिणेतील मुसलमानी सुलतानांची एकजुट. तालीकोटच्या लढाईत विजय नगरच्या राजाचा मृत्यु; त्याच्या राज्याच्या काही भागाचा मुसलमानी सुलतानांनी घेतलेला कब्जा. विजयनगरचा प्रदेश आपल्या ताब्यात घेण्यासाठी अलि आदिलशहाने केलेले प्रयत्न आणि अहमदनगरच्या सुलतानाच्या मत्सरी धोरणामुळे त्यात त्याला अंशतः आलेले अपयश. दक्षिणेतील अनेक हिंदु रायांकडून मांडली-

कत्वाचा स्विकार. विजयनगरच्या घराण्यातील अधिकारावर असलेल्या व्यक्तिविरूद्ध विजापूरच्या सुलतानाकडून कूच. अलि आदिलशहाच्या हिंदु घोडदळाकडून त्याचा त्याग आणि त्यांच्या विरुद्ध कारवाई. वरील गोष्टीमुळे त्याला घ्यावी लागलेली माघार; आपल्या हिंदु अधिकाऱ्यांची विश्वासघात करुन त्याने केलेली हत्या; त्याचा मृत्यु. (पान ११३).

## इब्राहीम आदिलशहा दुसरा

मृत आदिलशहाची पत्नी चांदबिबी ही राज्यकारभाराची सूत्रे धारण करते; तिच्या-राज्याच्या वजीराची कैद आणि त्याला देहदंडाची शिक्षा. तिच्याकडून मुख्य वजीराच्या जागेवर दुसऱ्या अधिकाऱ्याची नियुक्ती; तिच्या एकंदर धोरणाबाबत त्याच्या मनात निर्माण झालेली भिती. चांदबिबीची कैद आणि सातारा किल्ल्यात तिचा बंदिवास. चांदबिबीला कैद करणाऱ्या वजीराची लोकांकडून हकालपट्टी आणि चांदबिबीची सुटका. विजापूर दरबारात निर्माण झालेले मतभेद आणि कलह. विजापूरवर हल्ला करण्यासाठी अहमदनगर आणि गोवळकोंडा ह्या राज्यांच्या सुलतानांची एकजूट; विजापूरला वेढा आणि दोघा सुलतांनाना घ्यावी लागलेली माघार. विजापूरचा प्रतिनिधी म्हणून दिलावर-खानाची नेमणूक. चांदबिबीचे अहमदनगर येथे प्रयाण. अहमदनगरमध्ये यादवी युद्ध, अहमदनगर आणि विजापूर ह्यांच्यामध्ये युद्ध. राजप्रतिनिधी दिलावरखान ह्याच्यावर राजधानी सोडून जाण्याचा आलेला प्रसंग. विजापूरच्या तरुण सुलतानाकडून राज्याच्या अधिकाराचे ग्रहण. कर्नाटक आणि म्हैसूर येथील हिंदुच्या विरुद्ध युद्ध. राजपुत्र इस्माईल याची गादी बळकाविण्याची आकांक्षा आणि त्याला झालेली देह दंडाची शिक्षा. अहमद-नगर बरोबर युद्ध. अहमदनगरच्या सुलतानाचा लढाईमध्ये मृत्यु. (पान १४४)

# पुस्तक तिसरे

# प्रकरण तिसरे (चालू)

## भाग पाचवा मूळपाने ४८५ ते ४९४

## इमादशाही या नावाने प्रसिद्ध असलेल्या वऱ्हाडच्या सुलतानांचा इतिहास

### फतेउल्ला इमादशहा

त्याच्या घराण्याचा प्रारंभ; उमराव पदावर त्याला मिळालेली बढती; वऱ्हाडच्या प्रांतावर सुभेदार म्हणून झालेली त्याची नियुक्ती; बिदरच्या राज्यापासून त्याने जाहिर केलेले स्वातंत्र्य; त्याचा मृत्यु. (पान ४८५)

### अलाउद्दीन इमादशहा

वऱ्हाडचा सुलतान म्हणून राज्याभिषेक; महमूदशहा बहमनीच्या मदतीसाठी कूच. परंतु त्याला मदत करण्यात आलेले अपयश; खुदावंदखानाच्या मुलांपासून माहूर आणि रामगिर हे किल्ले काबीज; त्याच्यावर झालेला बुरहाण निजामशहाचा हल्ला आणि बुरहाण निजामशहाकडून वरील किल्ले पुन्हा काबीज. खानदेशच्या सुलताना-बरोबर अलाउद्दीन इमादशहाचा मैत्रीचा तह; त्यांच्या फौजेचा बुरहाण निजामशहा कडून पराभव. गुजरातच्या बहादुरशहाकडे इमादशहाची मदतीसाठी विनंती. बहादूर-शहाने इमादशहासाठी केलेले प्रयत्न आणि अलाउद्दीन इमादशहाकडून त्याचा झालेला सत्कार. अलाउद्दीन इमादशहाचा मृत्यु (पान ४८७).

### दर्या इमादशहा

त्याची मुलगी बीबी दौलत हिचा हुसेन निजामशहाबरोबर विवाह; त्याचा मृत्यु; त्याच्या पाठीमागून त्याचा अज्ञान मुलगा बुरहाण याचे राज्यारोहण (पान ४९०).

### बुरहाण इमादशहा

त्याला गादीवरून काढून त्याचा वजीर तुफालखान याचे सिंहासनावर आरोहण (पान ४९१).

### तुफालखान

तुफालखान सत्तेने राज्य बळकावतो. अहमदनगर आणि विजापूर येथील सुलतानांची त्याच्याविरुद्ध युती. तुफालखानाकडून विजापुरच्या सुलतानाला लाच. तुफाल खानाकडून वरील युतीला सुरुंग. वऱ्हाडवर अहमदनगरच्या सुलतानाचे पुन्हा आक्रमण. तुफालखानाकडून गोवळकोंड्याच्या सुलतानाकडे मदतीची याचना आणि प्राप्ती आणि अहमदनगरच्या सैन्यावर त्याने केलेला हल्ला; त्यात झालेला त्याचा पराभव, आणि त्याचे नरनाळा किल्ल्याच्या दिशेने पलायन. अहमदनगरकरडून नरनाळा आणि गावीलगड काबीज. तुफालखानाचे पलायन. वऱ्हाडचा सुलतान बुरहाण इमादशहा याच्यासह त्याची कैद, एका किल्ल्यावर त्यांना करण्यात आलेला बंदिवास आणि तेथे त्यांना आलेला मृत्यु. (पान ४९२).

## पुस्तक तिसरे

# प्रकरण ३ रे (चालू)

## भाग सहावा मूळ पाने ४९५ ते ५००

### बरीदशाही या नावाने प्रसिद्ध असलेल्या बिदरच्या सुलतानांचा इतिहास

कासीम बरीद (४९५);
अमीर बरीद (४९६).

अली बरीदशहा (४९७);
इब्राहीम बरीदशहा (४९९);
कासीम बरीदशहा दुसरा;
मिरजा अली बरीदशहा;
अमीर बरीद दुसरा (५००).

## पुस्तक तिसरें
## प्रकरण तिसरें (चालू)
### भाग चौथा मूळ पाने ३२१ ते ३३५

**कुतुबशाही या नावाने ओळखल्या जाणाऱ्या गोवळकोंड्याच्या सुलतानांचा इतिहास.**

**सुलतान कुली कुतुबशहा**

त्याचा वंश; त्याचा तुर्कमान घराण्याशी असलेला संबंध, हिंदुस्थानमध्ये आगमन; राज्यकारभारातील एका महत्वाच्या जागी त्याची नेमणूक; तेलंगणाच्या जिल्ह्यात बंडाळी मोडण्यासाठी कूच करून जाण्यास त्याची संमत्ती, उमराव पदावर त्याची नियुक्ती; स्वतःच्या नावे म्हणून त्याने फिरविलेली द्वाही; राज्यकारभारामध्ये पार्शियन चालीरिती आणि धर्म यांची त्याने केलेली सुरवात; त्याच्या मुलाच्या हुकुमानुसार त्याचा झालेला खून.

**जमशीद कुतुबशहा**

विजापुरच्या सुलताना विरुद्ध कुतुबशहाची अहमदनगरच्या सुलताना बरोबर एकजूट; काकणीचा किल्ला काबीज; एटगीरला वेढा; विजापुरच्या सैन्याने केलेल्या पाठलागामुळे माघार, चेहऱ्यावर बसलेल्या तलवारीच्या भयंकर घावामुळे चेहरा कायमचा विद्रुप; असाध्य रोगामुळे आजारी, भितीमुळे त्याच्या भावांचे राजधानीमधून पलायन; सुलतानाचा मृत्यु (पान ३२५).

**इब्राहीम कुतुबशहा**

गोवळकोंड्याहून त्याने केलेल्या पलायनाचा वृत्तांत, वियजनगरच्या हिंदू राजाच्या दरबारी त्याचे झालेले स्वागत, राज्याभिषेकासाठी त्याला मिळालेले आमंत्रण, गोवळकोंडा येथे त्याचे आगमन, विजापूरच्या प्रदेशावर त्याने केलेला हल्ला, युद्धातून त्याने घेतलेली माघार, अहमदनगर विरुद्ध विजापूरच्या सुलतानाला त्याची मदत, मैत्रीच्या तहातून त्याने घेतलेली अचानक माघार, हुसेन निजामशहाची मुलगी बीबी जमेली हिच्या बरोबर

त्रिवाह, कल्याणीच्या पाडावामध्ये एकजुटीचा भंग; रामराजा विरुद्ध मुसुलमान सुलतानानी निर्माण केलेल्या आघाडीमध्ये सामील; तालीकोटच्या लढाईमध्ये त्याची उपस्थिती; त्याचा मुलगा राजपुत्र अब्दुल कादर याचा सिंहासनासाठी प्रयत्न; त्याची कैद आणि त्याला झालेला देहदंड. सुलतानाचे आजारीपण; त्याचा मृत्यु. (पान ३२८).

## महमद कुली कुतुबशहा

अहमदनगरच्या सुल्तानाबरोबर झालेल्या तहाच्या अटीनुसार कुलबर्ग्याकडे प्रयाण; मोहीम चालविण्यासाठी एका अधिकाऱ्याला पाठीमागे ठेवून राजधानीमध्ये पुनरागमन; विजापूरच्या राजप्रतीनिधीकडून अहमदनगरच्या सुलतानांवर हल्ला; अहमदनगरच्या सुलतानाचा पराभव आणि विजापूरकडून एकशे वीस हत्ती काबीज. विजापूरकडे महमद कुली कुतुबशहाकडून वकीलातीची रवानगी, इब्राहीम आदिलशहाच्या बहिणीला सुल्तानाकडून मागणी; भागानगर शहराची उभारणी आणि शहराला त्याची प्रेयसी भागमती हिच्या नावावरून भागानगर असे दिलेले नाव. (पान ३३३).

# गोवळकोंड्याच्या सुलतानांच्या इतिहासाला जोडलेले परिशिष्ट मूळपाने ३३७ ते ४८४ प्रास्ताविक (पान ३३७)

## सुलतान कुली कुतुबशहा

त्याच्या घराण्याचे मूळ; इराण मधून हिंदुस्थानामध्ये आगमन; बिदर येथे सुलतानावर झालेला हल्ला परतवून लावण्यात त्याने केलेली विशेष कामगिरी; तेलंगणाचा सुभेदार म्हणून नेमणूक. सुलतानाचा मृत्यु. सुलतान कुलीकडून स्वातंत्र्याचा जाहीरनामा आणि गोवळकोंड्याच्या नजीक महमदनगर या शहराची बांधणी; इतर प्रदेश जिंकून आपल्या राज्यात वाढ; विजयनगरच्या राज्यापासून राजकोंडा, देवरकोंडा आणि पानगळ व त्याचप्रमाणे गुणपुरा आणि कोवीलकोंडा काबीज. तेलंगणाचा राजा सीतापती याच्या बरोबर युध्द सुलतान कुली कडून वरंगळ आणि कुमामेट काबीज. गजरामचंद्र याच्या बरोबर युध्द. बेलमकोंडा काबीज. विजयनगरच्या राजाबरोबर युध्द. विजापुरचा सुलतान इस्माईल आदिलशहा याच्याबरोबर युध्द. हिन्दू पासून कोहीर आणि नळगोंदा काबीज. एटगीरचा वेढा. सुलतान कुलीचा मृत्यु (पान ३३९).

## जमशीद कुतुबशहा

जमशीद कुतुबशहाचे राज्यरोहण. सुलतानाचा भाऊ इब्राहीम याचे बंड आणि बिदरचा सुलतान कासीम बरीद याने त्याला दिलेला पाठींबा. विजयनगरच्या सिंहासनावर

आरुढ होणाऱ्या रामराजाच्या मूळ घराण्याचा वृतांत. बिदरच्या सुलतानाबरोबर युध्द. जमशीद कुतुबशहाचा मृत्यु. (पान ३७९).

## सुभान कुली कुतुबशहा

वयाच्या सातव्या वर्षी आपल्या बापाच्या मृत्युनंतर सुभानकुली याचे राज्यारोहण. जगदेवराव याचे बंड आणि राजप्रतीनिधी सैफखान याजकडून त्याचा पाडाव. सुलतानाचा चुलता इब्राहीम याने विजयनगरच्या रामराजाकडून मिळालेल्या मदतीच्या पाठिंब्यावर सिंहासनावर सांगितलेला हक्क, त्याला जगदेवरावाकडून मिळालेली मदत आणि गोवळ कोंडा येथे त्याचे आगमन. सुभान कुली यांची पदच्युती (पान ३९०)

## इब्राहीम कुतुबशहा

इब्राहीम कुतुबशहा याचे राज्यारोहण, अहमदनगरच्या सुल्तानाला विजयनगरच्या सुल्ताना विरुद्ध मदत. जगदेवराव याची मुख्य वजीर म्हणून नेमणूक. त्याचे गोवळ-कोंडयाहून वऱ्हाडकडे प्रयाण व त्याने पुकारलेले बंड. त्याचा पराभव आणि विजयनगरकडे पलायन. विजापूर आणि गोवळकोंडा या राज्याच्या सुलतानांची अहमदनगरच्या विरुद्ध विजयनगरच्या राजा बरोबर एकजुट. इब्राहीम कुतुबशहाच्या मध्यस्थीने झालेला तह. जगदेवरावाची विजयनगरच्या राजाला इब्राहीम कुतुबशहा बरोबर युद्ध करण्याबद्दल चिथावणी. कुतुबशहाची गोवळकोंडा येथे कोंडी. पायदळातील हिंदू अधिकाऱ्यांचा सुल-तानाला पकडण्याचा कट. कटाची उघडीक आणि कटवाल्यांच्या पुढाऱ्यांना देहान्त शिक्षा. तेलंगणामधील स्वाऱ्या. राजमहेंद्रीवर हल्ला. धवलेश्वर काबीज. दक्षिणेच्या मुसलमानी सुल्तानांची एकजुट. तालीकोटची लढाई आणि लढाईतील रामराजाचा मृत्यू. राजमहेंद्री नजीक इब्राहीम कुतुबशहाने काबीज केलेले प्रांत. रुफतखान राजमहेंद्री, कासीमकोटा आणि वीरकुटुम काबीज करतो. त्याचे कटकच्या नजीक प्रयाण. कोंडावीर, कुमुम, आणि कोंडापल्ली यांचा पाडाव. विजापूरच्या सुलतानाविरुद्ध युद्ध. इब्राहीम कुतुबशहाचा मृत्यु (पान ३९५).

## महमद कुली कुतुबशहा

बापानंतर सिंहासनावर आरोहण; विजयनगरच्या हिंदू बरोबर युद्ध. कुमुमला वेढा. सुल्तानाकडून भागानगर शहराची बांधणी आणि या नावाचे नंतरच्या काळात हैद्राबाद मध्ये झालेले रुपांतर. सुलतानाचे सैन्य कर्नुळ आणि नंदीयाल काबीज करते, सैन्याची आगेकूच आणि गंडीकोटा (गुंजीकोटा), मुसुलमुरु, आणि करपा (कडप्पा) काबीज. रुस्तुमखानाची सैन्याबरोबरील मिलाफासाठी दक्षिणेकडे रवानगी, त्याची भेकडपणाची वाग-णूक व त्यामुळे मुसलमानांवर ओढवलेला अनवस्था प्रसंग. शहासाहेब याने निर्माण केलेले बंड, पगतुरजवळ या बंडाचा बिमोड. तेलंगणामध्ये बंड. पश्चिम किनाऱ्याच्या बाजुने सुल-

तानाच्या फौजांची कारवाई. इराणमधून एका वकीलातीचे आगमन. हैद्राबाद शहरात उद्भवलेले भयंकर दंगेधोपे. कासीम कोटा येथे बंड. सुलतानाच्या राज्यातील काही भागात बस्तरच्या राजाकडून लुटालूट. त्याच्यावर हल्ला करण्यासाठी सैन्याची रवानगी. बस्तरकडे चाल करून जाण्यास निर्माण झालेल्या मोठ्या अडचणी आणि अपयशामुळे सोडावयास लागलेली मोहीम. सुलतानाचा मृत्यू. सुलतानाच्या कारकिर्दीत पार पाडण्यात आलेली सार्वजनिक कामे (पान ४४७).

## पुस्तक चौथे

# प्रकरण सहावे

## खानदेशच्या सुलतानांचा इतिहास मूळपाने २८० ते ३२७

### मलिकराजा फारूकी

त्याच्या घराण्याचे मूळ. योगायोगाच्या परिस्थितीमुळे मलिकराजा सुलतानाच्या नजरेत भरतो– सुलतानाकडून दोन हजाराच्या मनसबदारीच्या जागेवर त्याला मिळालेली बढती आणि थाळनेर, करांडा या जिल्ह्याची त्याला मिळालेली जहागीरी– बागलाणच्या राजांकडून त्याने सक्तीने केलेली खंड वसुली– गुजरातच्या सुलतानाच्या ताब्यातील सुलतानपुर आणि नंदुरबार या जिल्ह्यावर त्याने केलेले आक्रमण आणि त्याला घ्यावी लागलेली थाळनेरकडे माघार. गुजरातच्या सुलताना बरोबर त्याचा झालेला तह– आपला धाकटा मुलगा मलिक इफ्तीकार याला थाळनेर आणि मोठा मुलगा नसीरखान फारुकी याला इतर सर्व राज्य अशी त्याने केलेली आपल्या प्रदेशाची विभागणी. मलिकराजाचा मृत्यु– त्याच्या वंशाचे उमर फरुक याच्या पर्यंत पोहचलेले धागेदोरे. (पान २८०).

### मलिक नसीर उर्फ नसीरखान फारुकी

असीरचा विश्वासघाताने त्याने घेतलेला ताबा– आपला भाऊ इफ्तीकार याच्या कडून थाळनेरचा जबरदस्तीने घेतलेला ताबा आणि गुजरातच्या ताब्यातील सुलतानपुर आणि नंदुरबार या जिल्ह्यांवर त्याने केलेला हल्ला– तहासाठी त्याला करावी लागलेली याचना– बुरहाणपुर शहराची बांधणी आणि असीर किल्ल्याची मजबुती– बहमनींच्या राज्याच्या वारसाला त्याने विवाहादाखल दिलेली आपली कन्या– गुजरातच्या सुलताना विरूध्द झालावारच्या पळून आलेल्या राजाला त्याने दिलेला आसरा आणि दक्षिणेच्या सुलतानाला आपले अनुकरण करण्याबद्दल त्याने दिलेली चिथावणी. गुजरातच्या सुलतानाला मिळालेला विजय. वऱ्हाडमध्ये काही दक्षिणेतील बंडखोराच्या प्रमुखांना त्यांच्या

सुलताना विरुद्ध मलिक नसीर याने दिलेला पाठिंबा–बुरहाणपुर मधून त्याला घ्यावी लागलेली सक्तीची माघार. लालीगची लढाई आणि या लढाईत झालेला त्याचा पराभव. त्याचा मृत्यु. ( पान २८६ ).

## मिरान आदिलखान फारुकी

त्याचे राज्यारोहण आणि खानदेशमध्ये चाल करून आलेल्या दक्षिणी फौजांना घालवून देण्यासाठी गुजरातच्या सुलतानाकडून त्याने मिळविलेली मदत. बुरहाणपूर येथे त्याचा झालेला खून. ( पान २९६ ).

## मिरान मुबारकखान फारुकी

बापाच्या नंतर राज्यारोहण आणि सतरा वर्षाच्या कारकीर्दीनंतर मृत्यू (पान २९७).

## मिरान धुनी उर्फ आदिलखान फारुकी पहिला

बापानंतर राज्यारोहण–शेजारीत राज्यांपासून खंडणीची वसुली. गुजरातच्या सुलतानाचे सार्वभौमत्व मानण्यास अथवा त्याला खंडणी देण्यास नकार. गुजरातच्या फौजेचे खानदेशमध्ये आक्रमण आणि खंडणीच्या बाकीची वसुली. आदिलखान फारुकीचा मृत्यू (पान २९८ ).

## दाऊदखान फारुकी

अहमदनगरच्या सुलताना बरोबर युद्धाची घोषणा. माळव्याच्या सुलतानाकडे मदतीची याचना. अहमदनगरच्या सुलतानाकडून युद्ध करण्यास नकार आणि माघार. माळव्याच्या सेनापतीजवळ माळव्याचा सुलतान हा खानदेशचा सुलतान असल्याबद्दलची दाऊदखानाची कबुली. माळव्याच्या सेनापतीचे दाऊदखाना जवळून मौल्यवान नजराणा वसूल केल्यानंतर मायदेशी प्रयाण. दाऊदखान फारुकीचा मृत्यू ( पान ३०० ).

## आदिलखान फारुकी दुसरा उर्फ आजम हुमायून

दाऊदखान फारुकीचा अहमदनगर येथे राहणारा एक नातेवाईक आलमखान याला राज्याभिषेक. असीरचा सुभेदार मलिक लारुन याची त्याला मान्यता देण्यास नकार. थाळनेरचा आदिलखान फारुकी याने सिंहासनावर सांगितलेला अधिकार – त्याचा आजोबा गुजरातचा सुलतान याने त्याला दिलेला पाठिंबा आणि सुलतान म्हणून त्याला सर्वत्र मिळालेली मान्यता. अहमदनगरच्या सुलतानाच्या पाठिंब्याने आलमखानाचा सिंहासन मिळविण्याचा दुसऱ्यांदा प्रयत्न आणि त्यात त्यांचा झालेला पराभव. आपला सासरा दुसरा मुजफ्फरशहा याच्या बरोबर माळव्याच्या स्वारीत आदिलखान फारुकी याचे प्रयाण– त्याचा मृत्यु (पान ३०३)

## मिरान महमदखान फारुकी उर्फ मिरान महमदशहा

बापानंतर राज्यारोहण–वऱ्हाडच्या सुलतानाला त्याच्या अहमदनगरच्या सुलतानाबरोबरील युद्धात मदत–त्यात झालेला त्याचा पराभव, आणि हत्तींसह सर्व सामानसुमानाचा झालेला पाडाव– आपला चुलता गुजरातचा बहादुरशहा याच्या कडून त्याने मिळविलेली मदत आणि बहादुरशहाच्या अहमदनगर वरील स्वारीत त्याची हजेरी. युध्दाला विराम. बहादुरशहाच्या माळव्यावरील स्वारीत मिरान महमदखानाने त्याला केलेली मदत–मंदसोर येथे त्याच्या अखेरच्या पाडावाच्यावेळी त्याची उपस्थिती. खानदेशाकडे माघार– मोगलांपासून प्रदेश ताब्यात मिळविण्याचे कामी गुजरातच्या सुलतानाला मदत. गुजरातच्या बहादुरशहाचा मृत्यु. मिरान महमदशहा या नावाखाली मिरान महमदखानाला गुजरातचा सुलतान म्हणून राज्याभिषेक– त्याचा मृत्यु (पान ३०८).

## मिरान मुबारकखान फारुकी

आपल्या भावाच्या मृत्युनंतर राज्यारोहण. असीरच्या किल्यात कैदेमध्ये असलेल्या गुजरातच्या राजपुत्र महमूद याला त्या राज्याच्या अमीरांच्या स्वाधीन. गुजरातच्या सिंहासनावर त्याने केलेला खोटा दावा आणि अहमदाबादवर सैन्यासहित चाल. त्याचा पराभव. गुजरातच्या सुलतानाकडून सुलतानपुर आणि नंदुरबार यांचा मिळालेला ताबा. अकबर बादशहाचा अधिकारी पीर महमदखान याच्याकडून माळव्याचा सुलतान बाज बहादुर याची सिंहासनावरुन हकालपट्टी. बाज बहादुरचा बुरहाणपूरपर्यंत मोगलांकडून पाठलाग आणि शहराची लुटालुट. त्यांची माघार आणि मिरान मुकारकखान व बाज बहादुर यांच्याकडून त्यांचा पाठलाग. नर्मदा नदीजवळ मोगलांचा पूर्ण पराभव आणि पीर महमदखान लढाईत ठार. मिरान मुबारकखान याचा मृत्यू (पान ३१३)

## मिरान महमदखान फारुकी

बापानंतर राज्यारोहण. गुजरातचा चेंगिजखान याचे खानदेशवर आक्रमण आणि सुलतानपूर व नंदुरबार काबीज. पालनेरला वेढा मिरानमहमदखान आणि वऱ्हाडचा तुफालखान यांच्याकडून त्याला प्रतिकार. पालनेर वेढ्यातून मुक्त आणि चेंगिजखानाचे गुजरातला पलायन. मिरान महमदखान याची तीस हजार सैन्याची जमवाजमव आणि गुजरातवर आक्रमण. त्याने केलेला सिंहासनावर दावा. अहमदाबादच्या लढाईत त्याचा झालेला पराभव. गुजरातमध्ये मिरजांकडून त्याचा सक्त पाठलाग. खानदेशाची लूट आणि मिरजांची माळव्याकडे माघार. वऱ्हाडच्या तुफालखानाला अहमदनगरच्या सुलतानाविरुद्ध मिरान महमदखानाची मदत. तुफालखान आपला प्रदेश गमावतो आणि अखेर

अहमदनगरबरोबरील लढ्यात आपले प्राण देखील. दक्षिणी सैन्याकडून बुरहाणपुरची लुटालूट. फार मोठी खंडणी देऊन मिरान महमदखानाचा अहमदनगरबरोबर तह. मिरान महमदखानाचा मत्यू (पान ३१७).

### राजा अलिखान फारुकी

आपल्या भावानंतर राज्यारोहण – अकबराचे सार्वभौमत्व मान्य केल्याचे त्याने अकबराला लिहिलेले पत्र. राजा अलिखानाचे व्यक्तीमत्व. अहमदनगर येथील बंड केलेले काही प्रमुख सरदार बुरहाणपुर येथे येतात– त्यांच्याकडून बुरहाणपुर येथे लुटालुट– राजा अलिखानाकडून त्यांचा पाठलाग– मोगल सैन्याच्या एका तुकडीसह वऱ्हाड मध्ये त्यांचा प्रवेश– राजा अलिखानकडून त्यांचा पुन्हा पराभव. अकबराचा मुलगा मुराद मिरजा याचे दक्षिणेवर आक्रमण– राजा अलिखानाची त्याच्या बरोबर हात मिळवणी–गोदावरी नदीच्या तीरावर पैठण येथे झालेल्या लढाईत राजा अलिखानाचा मृत्यू (पान ३२१).

### बहादुरखान फारुकी

बापाच्या मृत्यू नंतर राज्यारोहण–अकबराच्या सामर्थ्याला त्याने कलेला विरोध. असीरला वेढा. आणि मोगलांकडून असीर काबीज. खानदेशच्या घराण्याचा शेवटचा सुलतान बहादुरखान याची राजकैदी म्हणून ग्वाल्हेर येथे रवानगी (पान ३२५).

# तळटीपांचा खुलासा

मूळ इंग्रजी ग्रंथातील कुठल्या परिच्छेदाचे भाषांतर आहे, तसेच मूळ ग्रंथातील टीपा व ज्यादा टीपा कोणत्या हे समजण्यासाठी पुढील भागाच्या छपाईत योजलेल्या खुणा लक्षात घ्याव्यात.

भाषांतराच्या डाव्या बाजूला मूळ इंग्रजी ग्रंथातील परिच्छेद (१) असा दर्शविला आहे. उजव्या बाजूला मूळ ग्रंथ व इंग्रजी ग्रंथातील मूळ पान [२] (२८४) असे दर्शविले आहे. मूळ ग्रंथातील तळटीपा [१]□ या खुणेने व भर घातलेल्या तळटीपा [१]* या खुणेने दाखविल्या आहेत.

भाग दुसरा

# प्रकरण पहिले

## अल्लाउद्दीन हसन गंगू बहमनी

(१) अल्लाउद्दीन हसन बहमनी याचा जन्म आणि [1]* [2]* [२] (२८४) पूर्वायुष्य 'याबद्दल चरित्रकारांत मतभेद आहेत. या विषयावर आतापर्यंत जे काही लिहिले गेले आहे ते सर्व या ठिकाणी सांगणे कंटाळवाणे आणि निरुपयोगी ठरेल. म्हणून दक्षिण देशांत सर्वसाधारणपणे जी हकीकत ग्राह्य म्हणून :समजली जाते तीच हकीकत या ठिकाणी कथन करण्याचा माझा विचार आहे.

(२) हसन हा दिल्लीचा रहिवाशी असून गंगू नावाच्या ब्राम्हण पंथी ज्योतिष्याचा चाकरमानी होता.[3]* राजपुत्र महमद तुघलघ याच्या हा अतिशय मर्जीतल्यापैकी होता. हसन याची अतिशय चांगली वर्तणूक लक्षात घेऊन त्याने त्याला बैलांची जोडी बक्षिस दिली आणि स्वतःपुरते धान्य उत्पादन करण्यासाठी जमिनीच्या एका तुकड्यावर नांगरणी करण्याची त्याला परवानगी दिली. एक दिवस तो शेतात काम करत असताना त्याचा नांगर एका कठिण पदार्थावर आपटून खडकला. हसनने हा काय अडथळा आला हे पाहिल्यावर त्याला दिसून आले की एका पितळेच्या भांड्याला बांधलेल्या साखळीवर नांगर खडकून राहिला आहे. या भांडयात त्याला अनेक पुरातन काळातील सोन्याची नाणी भरलेली आहेत असे आढळले. हसनला सोन्याच्या नाण्यांनी भरलेले भांडे आढळून आल्यावर त्याने आपल्याला मिळालेली संपत्ति आपल्या धन्याकडे नेली. हसनच्या या प्रामाणिकपणाबद्दल गंगूने त्याची प्रशंसा केली आणि घडून आलेली परिस्थिती त्याने राजपुत्र महमद तुघलब [२] (२८५) याच्या कानावर घातली. त्याने आपल्या बापाला म्हणजे सुलतानाला या गोष्टीची जाणीव करुन दिली. सुलतानाने हसनला आपल्या समक्ष बोलावून घेतले आणि त्याला १०० घोडेस्वारांच्या अधिकाराची मनसब बहाल केली.

(३) या पुढे असेही कथन केले जाते की त्या ब्राम्हणाने हसनला असे आश्वासन दिले की तुझी पत्रिका बघितल्यानंतर तू फार मोठ्या पदावर चढणार असल्याचे मला स्पष्ट दिसत आहे. त्याचप्रमाणे परमेश्वराच्या अतीव मर्जीचा आणि कृपाछत्राचा मानकरीहि तू होणार आहेस. तेव्हा तू मला आता असे वचन दे की जर का कधीकाळी तुला राजयोग प्राप्त झाला तर तू गंगू हे नाव धारण करशील आणि तुझ्या अर्थसचिव पदाचे अधिकार मला देशील. गंगूने प्रकट केलेली इच्छा पुरी करण्याचे हसनने ताबडतोब आश्वासन दिले. असेहि म्हणतात की हसनच्या जीवनांत पुढे काय होणार आहे त्याचे भाकित अगोदरच सुप्रसिद्ध अवलिया शेख निजामुद्दीन याने केले होते. हसनविषयी प्रकट झालेल्या या भाकीतांमुळे हसनच्या महत्वाकांक्षेने त्याला दक्षिणेत जाण्याची प्रेरणा दिली. दक्षिण देश त्याच्या भविष्यकाळात सौभाग्याचे एक स्थान बनून राहिला.

(४) कालांतराने दिल्लीच्या तख्तावर राजपुत्र महमद तुघलघ हा आपल्या बापाच्या मृत्यूनंतर आला. त्याने आपला शिक्षक कुतलखान उर्फ आलम उलमुल्क याला दौलताबादच्या सुभेदारीवर नेमले. त्याचवेळी त्याच्याबरोबर दक्षिणेत जाण्याचे ज्या अधिकाऱ्यांनी ठरविले, त्यांना त्याने तशी परवानगी देखील दिली. ह्या अधिकाऱ्यांमध्ये हसन होता. हसनला रामबाग जिल्ह्याच्या सीमेत असलेले कुंची हे गाव जहागिरी दाखल बहाल करण्यात आले. काही वर्षांनंतर महमद तुघलघ याने आपल्या फौजेनिशी गुजरातच्या बंडखोर अमिरांवर चाल केली आणि त्यांचा त्याने पराभव केला. त्यापैकी अनेकांनी दक्षिण देशाचा आसरा घेतला. दक्षिणेत कुतलखान आणि त्याचे अधिकारी यांनी त्यांच्या कर्तव्याला विसरुन आपल्या दिल्लीच्या सार्वभौमाजवळ [२] (२८६) द्रोह केला आणि या अमिरांना आसरा दिला. या घटनेमुळे बादशहाने दक्षिणेतील सर्व अधिकाऱ्यांची नेमणूक दुसऱ्या प्रांतात करण्याचा निश्चय केला. या हेतूने त्याने अहमद लछीन याला आलम् उलमुल्क याजकडे पाठविले आणि त्याच्यातर्फे दक्षिणेतील सर्व अधिकाऱ्यांना गुजरातेत पाठविल्याबद्दलचा आपला हुकूम आलम उलमुल्क याला कळविला. यानुसार आलम उलमुल्क याने त्या सर्वांना ताबडतोब दौलताबादला येण्याबद्दल कळविले. ते येई तो पर्यंत काही महिन्यांचा अवधि लोटला. सरतेशेवटी ते सर्वजण अहमद लछीनबरोबर गुजरातेत जाण्यास निघाले. या अमिरांचे हितसंबंध बादशहाकडे सुरक्षित राखण्यासाठी आपण लक्ष घालू अशी आशा लछीन याने त्यांना दाखविली आणि त्या जोरावर त्यांच्याकडून भरपूर नजराणे उपटण्याची इच्छा त्याच्या मनांत निर्माण झाली. परंतु या बाबतीत त्याच्या पदरी निराशा पडल्यामुळे त्याने त्यांच्या वागणुकीबद्दल आक्षेप घेऊन आपला असंतोष प्रकट केला आणि त्यांना अतिशय अपमानास्पद अशी वागणूक दिली. आपल्या चाकरांजवळ तो असेही म्हणाला की गुज-

रातच्या बंडखोर अमिरांना यांनी आसरा दिला त्याबद्दल यांना ठार मारण्याइतकी दुसरी उचित गोष्ट होणार नाही. त्यांत आणखी भर म्हणून दरबारांत ताबडतोब हजर होण्यासंबंधी त्यांना जी सरकारी आज्ञा मिळाली होती त्या आज्ञेकडे त्यांनी हेतुपुरःसर दुर्लक्ष केले. ल्छीन याने अशा तऱ्हेचे प्रकट केलेले विचार जेव्हा या अमिरांच्या कानावर गेले तेव्हा ते अतिशय भयभित झाले आणि त्यांनी राज्याच्या सरहद्दीजवळ पोहोचल्यावर बंड करण्याची योजना आखली. बादशहा अगदी बारीकसारीक गुन्ह्या-बद्दल वारंवार मृत्यूची शिक्षा ठोठावत असे आणि पुष्कळदा गुन्हेगाराची कसून परीक्षा घेतल्याशिवाय, ह्या गोष्टीची कुप्रसिध्दी सर्वतोमुखी झालेली होती. तेव्हा त्यांनी जरुर पडल्यास बळाचा उपयोग करुन आपले हितसंबंध सुरक्षित राखण्यासाठी आणि प्राण बचाविण्यासाठी दक्षिणेत राहणे, हे कत्तल करण्यासाठी नेल्या जाणाऱ्या शेळ्या-मेंढ्या-प्रमाणे मूकपणे आपल्या प्राणांचे बलिदान करण्याऐवजी, योग्य होईल असा विचार केला.

(५) अशा तऱ्हेचा त्यांचा विचार एकदा पक्का झाल्यावर त्यांनी अहमद ल्छीनची छावणी सोडली. ल्छीनने त्यांना प्रतिकार करण्याचा प्रयत्न केला परंतु त्यात त्याचा पराभव होऊन तो ठार मारला गेला. या घटनेमुळे ताबडतोब अनेक असंतुष्ट लोक या अमिरांना येऊन मिळाले. ते दौलताबाद येथे पोहोचेपर्यंत त्यांच्याजवळ मोठ्या संख्येने सैन्याची जमवाजमव झाली. दक्षिणेतील सर्व राजे हे दिल्लीच्या [२] (२८७) बादशहाकडून होणाऱ्या जुल्मामुळे संत्रस्त होऊन गेले होते. त्यांना ही या बंडाची बातमी ऐकून आनंद झाला. त्यांच्यापैकी काहीजण उघडपणे बंडात सामील झाले तर काहींनी भलाबुरा विचार करुन गुप्तपणे बंडखोरांना आपला पाठिंबा दिला आणि त्यांना द्रव्य आणि कुमक देऊन मदत केली. एका कवीने याबाबत काढलेले उद्‌गार किती यथार्थ आहेत पहा. तो म्हणतो :

जेव्हा माणसावर जुलूम जबरदस्ती होते तेव्हा तो आपल्या अन्नदात्या बादशहाविरुद्ध त्याच्या संकटकालातदेखील बंडाचे निशाण उभारतो, कारण जेव्हा राज्य-कर्त्याची वृत्ति हुकुमशहालाही लाजविणारी बनते तेव्हा अशा तऱ्हेच्या राज्याची कधी-तरी भरभराट होणे शक्य आहे का ?

(६) बादशहाचा जावई इमाद उलमुल्क हा वऱ्हाड आणि खानदेशचा सुभेदार असून तो एलिचपूर येथे रहात असे. त्याला असे आढळून आले की दररोज आपले सैनिक आपल्याला सोडून निघून जात आहेत. तेव्हा त्याला अशी भिती वाटली की आपले अधिकारी आता आपल्याला दक्षिणात्यांच्या स्वाधीन करतील. अशा परिस्थितीत त्याने आपल्या कुटुंबातील मंडळींना बरोबर घेऊन शिकार करण्याच्या मिषाने एलिचपूर सोडले आणि तो नंदूरबारकडे निघून गेला. इकडे वऱ्हाडच्या

अधिकाऱ्यांनी खजिना लुटला आणि बंडखोरांच्या दौलताबाद येथील छावणीत त्यांना मिळण्यासाठी त्यांनी कूच केले. बंडखोराजवळील सैन्याचा जमलेला प्रचंड समुदाय दौलताबाद किल्ल्याच्या शिबंदीने बघितला आणि त्यांनी किल्ला बंडखोरांच्या हवाली करुन दिला. अशा तऱ्हेने दक्षिणेचा जो प्रदेश जिंकण्यासाठी दिल्लीच्या बादशहाना एका पाठोपाठ एक अशा अनेक मोहिमा काढाव्या लागल्या होत्या आणि हा मुलुख ताब्यात आणण्यासाठी मोठ्या प्रमाणात रक्ताचा सडा शिंपावा लागला होता आणि प्रचंड पैसा खर्च करावा लागला होता तो मुलुख काही महिन्यातच दिल्लीच्या बादशहाच्या हातून हिसकावला जाणार असा रंग दिसू लागला.

(७) दौलताबाद किल्ल्याचा ताबा घेतल्यानंतर आपल्या घेताला भरीवपणाची पार्श्वभूमि तयार व्हावी म्हणून बंडखोरांनी पुढारी निवडून देण्याचे ठरविले. त्यांनी १००० स्वारांची मनसबदारी असलेल्या इस्माईल खान अफगाण याची आपला बादशहा म्हणून निवड केली आणि त्याला त्यांनी नसिरउद्दीन ही पदवी दिली. इस्माईल खानाचा भाऊ मलिक मुघ हा दिल्लीच्या ताब्यातील माळव्यामधे असलेल्या बादशाही सैन्याचा अधिकारी होता. दक्षिणात्यांना त्यांच्या नव्या सुल्तानाच्या [२] (२८८) माळव्यामधील नातलगांकडून भरघोस पाठिंबा मिळेल या आशेवर भिस्त ठेवून बंडखोरानी प्रामुख्याने आपल्या पुढाऱ्याची निवड केली होती. नवीन सुल्तानाने आपल्या सर्व अधिकाऱ्यांवर मानसन्मानाची खैर खैरात केली आणि प्रत्येकाला जमिनीच्या रुपात जहागिरी बहाल करण्यात आली. यापूर्वी ज्या हसनचा उल्लेख करण्यात आलेला आहे त्याला जफरखान ही पदवी देण्यात आली आणि त्याच्या मनसबीमधील सैनिकांच्या चरितार्थासाठी म्हणून काही जिल्हे तोडून देण्यात आले. दरम्यान महमद तुघलख याने गुजरातेतून दौलताबादकडे कूच केले. वाटेमध्ये त्याला इमादउलमुल्क तात्रिजी आणि माळव्याचा सुभेदार मलिक मुघ हे येऊन मिळाले. दौलताबादपाशी आल्यानंतर त्याला असे आढळून आले की बंडखोर अमिर ३०००० घोडेस्वारांची सेना बरोबर घेऊन ज्या सपाट मैदानावर प्रथम अल्लाउद्दीन याने देवगिरीचा राजा रामदेव याच्या मुलाचा पराभव केला होता त्याच मैदानावर त्याच्याशी सामना देण्यासाठी उभे ठाकले आहेत. दोहो बाजूमध्ये झालेल्या युद्धात बादशाही सैन्याच्या उजव्या आणि डाव्या फळीचा पूर्ण विमोड झाला आणि महमद तुघलख याने रणांगणातून पळून जाण्याची तयारी केली. तोच एकाएकी विश्वासघातरुपी शापाने बंडखोरांच्या सैन्यावर प्रहार केला. त्यांच्यापैकी एक प्रमुख अधिकारी खानजहान याला बाण लागून जखम झाली आणि तो घोड्यावरुन खाली आला. त्याची ६००० स्वारांची संपूर्ण तुकडी विस्कळीत झाली आणि त्यांनी रणांगणातून पळ काढला. त्याच वेळी नवे सुल्तानपद प्राप्त झालेल्या नसिरउद्दीन इस्माईलचा ध्वजवाहक हा घाबरुन गेला

आणि त्याच्या हातातून ध्वजचिन्ह खाली पडले. तेव्हा बंडखोरांच्या सैन्याची अशी समजूत झाली की आपल्या पुढाऱ्याने रणांगणातून आपल्यामधून पळ काढला आहे. या समजुतीने त्यांनीहि काढता पाय घेण्यास सुरवात केली. रात्रीचा प्रहर झाला आणि दोन्ही बाजूची सैन्ये परस्परात आणखी कोणतीहि धुमश्चक्री झाल्याशिवाय आपापल्या छावणीत परत गेली. नसिरउद्दीन इस्माईल याने जफरखान आणि आपले इतर प्रमुख अधिकारी यांना पाचारण केले. त्यांच्याशी सल्लामसलत करुन त्याने असे ठरविले की प्रतिपक्षाबरोबर पुन्हा एकदा लढाई देण्याचा धोका पत्करणे सद्य स्थितीत अगदी अयोग्य आहे. अशा परिस्थितीत बरोबर भरपूर सैन्य घेऊन नसिरउद्दीन इस्माईल याने दौलताबादच्या किल्ल्याचा आश्रय घ्यावा तर इतर सर्व अधिकाऱ्यांनी शत्रू बरोबरील संपर्क न तोडता आपापल्या जहागिरीच्या जिल्ह्यांच्या संरक्षणाची व्यवस्था करावी आणि शत्रूभोवती घिरट्या घालत शत्रूकडे कुमक घेऊन [२] (२८९) येणारे तांडे आणि रसद मारावी. या बेताप्रमाणे रात्रीच्या वेळी बंडखोरांनी रणांगणातून गुपचूपपणे माघार घेतली. दुसऱ्या दिवशी उजाडल्यावर दिल्लीच्या सुलतानाला शत्रूच्या सैन्यातील एक चिटपाखरु देखील रणांगणावर आढळले नाही. तो दिवस सुलतानाने तसाच जाऊ दिला आणि दुसऱ्या दिवशी इमाद उलमुल्क ताब्रिजी याला जफर खानाच्या पाठलागावर रवाना करण्यात आले आणि सुलतानाने दौलताबादला वेढा दिला. काही काळ गेल्यावर शिबंदीवर दुरावस्थेचा प्रसंग ओढवला आणि शिबंदीने निराश होऊन शरण जाण्याचे ठरविले. तोच बातमी आली की दिल्ली येथे तुर्की नावाच्या गुलामाने बंड केले असून त्याच्या हाताखाली जमा झालेल्या विघ्नसंतोषी बंडखोरांनी दिल्लीत भयंकर अत्याचार केले आहेत, प्रांता प्रांतातील राज्यव्यवस्थेला सुरुंग लावला आहे आणि ते गुजरातवर चाल करुन येत आहेत. तेव्हा सुलतानाने दौलताबादचा वेढा चालविण्याचे काम आपल्या एका सेनापतीवर सोपविले आणि या नवीन उद्भवलेल्या बंडाचा बिमोड करण्यासाठी कूच केले. ४ *

दक्षिणी अधिकाऱ्यांना या घटनेमुळे अतिशय जोर चढला. ते सर्व बाजूकडून एकत्र जमा झाले आणि मोठ्या संख्येने त्यांनी सुलतानाच्या फौजेबरोबर सामना देण्यासाठी आगेकूच केले. दौलताबादला वेढा देऊन बसलेल्या फौजेवर त्यांनी हल्ला केला आणि सुलतानाच्या फौजेला वेढा उठविणे त्यांनी भाग पाडले. सुलतानाच्या फौजेने आपल्या बादशहाच्या पाठोपाठ गुजरातेची वाट धरली. याप्रमाणे माघार घेत असताना जवळ जवळ नर्मदा नदीच्या तीरापर्यंत दक्षिण्यांनी त्यांचा कसून पाठलाग केला. या प्रसंगी झालेल्या संघर्षात दिल्लीच्या बादशाही सैन्याने आपले पुष्कळसे सामानसुमान आणि संपत्तीने भरलेले अनेक हत्ती गमावले.

(८) जफरखानाने देखील २०००० घोडेस्वार घेऊन बिदरकडे कूच केले.

बिदरचा ताबा नुकताच इमादउलमुल्क ताब्रिजी याने घेतला होता. परंतु बादशाही सैन्य सर्व दृष्टींनी वरचढ असल्याने त्यांच्याशी दोन हात करण्याचे धाडस जफरखानाला झाले नाही. या परिस्थितीत तेलंगणाच्या राजाने पाठविलेले १५००० पायदळी सैनिक आणि नसिरउद्दीन याने त्याला कुमक म्हणून दौलताबादहून काढून पाठविलेले ५००० घोडेस्वार येऊन मिळाल्यावर जफरखानाने बादशाही फौजांवर हल्ला चढविला. लढाई जरी म्हणण्यासारखी झाली नाही तरी सकाळपासून सूर्यास्त होईपर्यंत [२] (२९०) चकमकी चालूच राहिल्या. परंतु परमेश्वराची ५० इच्छाच अशी होती की दक्षिणेच्या सार्वभौमपदावर जफरखान याचीच नियुक्ती व्हावी. त्यामुळे इमाद उलमुल्क हा लढाईत ठार मारला गेला आणि त्याच्या फौजेची धूळधाण उडाली. त्याच्या सैन्यापैकी काहींनी बिदरचा तर काहींनी कन्धारचा आश्रय घेतला, तर काहीजण मोठ्या मुष्किलीने माळव्याकडे पळून गेले.

(९) जफरखानाने मलिक सैफुद्दीन घोरी याला बिदर आणि कन्धारचे किल्ले काबीज करण्यासाठी मागे ठेवले आणि त्याने स्वतः दौलताबादकडे कूच केले. या ठिकाणी त्याची नसिरउद्दीन इस्माईल याजबरोबर भेट झाली. तेथे इस्माईल याच्या दृष्टोप्तत्तीस आले की अधिकारी आणि फौजेतील शिपाई हे आपल्यापेक्षा त्यांचा सेनापति जफरखान याला अधिक चाहतात. त्याला असेहि दिसून आले की त्याच्याऐवजी जफरखानच आपला सुलतान व्हावा अशी त्या सर्वांची इच्छा आहे. हे बघितल्यानंतर आपण सुलतानपदाचा त्याग करुन कमी दर्जाच्या अधिकारपदाचा स्विकार करणे शहाणपणाचे ठरेल असा विचार इस्माईल याने केला. तेव्हा तेथे हजर असलेल्या प्रमुख अधिकाऱ्यांची इस्माईल याने बैठक बोलाविली आणि त्या सर्वासमक्ष त्याने जाहिर केले की सद्य परिस्थितीत माझे वय झाल्यामुळे राज्य करण्यास मी लायक नाही. तेव्हा माझी तुम्हाला विनंती आहे की तुम्ही नव्या सुलतानाची निवड करा. त्या पदाला माझ्यादृष्टीने सर्वतोपरी योग्य म्हणून मी जफरखानाची शिफारस करीत आहे. इस्माईलने पुढे मांडलेल्या या योजनेला तेथे जमलेल्या सर्व मंडळींनी एकमुखाने आपले अनुमोदन दिले. हा प्रसंग साजरा करण्यासाठी ज्योतिष्यांना शुभ वेळ कोणती ते सांगण्यासाठी आदेश देण्यात आला. त्याप्रमाणे शुक्रवार रबिऊल आखरच्या २४ तारखेला हिजरी ७४८ या वर्षी राजमुकुट जफरखानाच्या मस्तकावर ठेवण्यात आला ७* आणि अवासीद खलिफ वापरत असलेल्या काळ्या रंगाचे छत त्याच्या सिंहासनावर उभारण्यात आले. त्याच्या नावे खुत्ब्याचे वाचन करण्यात आले आणि नाणी पाडण्यात [२] (२९१) आली. नाण्यांवर जफरखानाने धारण केलेले नाव अल्लाउद्दीन हसन हे कोरण्यात आले.

रबीउल आखर २४ ६*
हिजरी ७४८
ऑगस्ट १२
इ. स. १३४७

त्या काळापासूनच कुलबर्गा हे नवीन राजघराण्याच्या राजधानीचे शहर झाले आणि त्याचे नाव बदलून अहसनाबाद ८ □ असे ठेवण्यात आले. अहसनाबाद शहर याप्रमाणे दक्षिणेतल्या पहिल्या मुसलमान सुलतानाच्या राजधानीचे शहर बनले. ९ * १० *

(१०) अल्लाउद्दीन हसन याने राज्यकारभाराचा ताबा आपल्याकडे घेतल्यानंतर राज्यपालनाच्या कर्तव्यात यत्किंचितहि कसूर केली नाही. दिवसें दिवस त्याच्या राज्यात भरच पडत गेली. थोड्याच कालावधीत भीमानदीपासून तो अदोनी किल्ल्याच्या नजीकपर्यंतचा आणि चौलच्या बंदरापासून तो बिदर शहरापर्यंतचा सर्व प्रदेश त्याच्या अधिपत्याखाली आला. असे सांगतात की सुलतान सिंहासनावर बसला तेव्हा त्याच्या भाग्योदयाचे भविष्य वर्तविणाऱ्या निजामउद्दीन औलियाच्या नावे त्याने ४०० पौण्ड भारंभार सोने आणि १०० पौंड चांदी दान म्हणून वाटली. प्रामाणिकपणाप्रमाणेच सुबुद्ध असल्याबद्दल ज्याची किर्ती झालेली होती अशा मल्कि सैफउद्दीन घोरी याला अल्लाउद्दीन हसन याने आपला वजीर म्हणून नेमले. भूतपूर्व सुलतान नसिर उद्दीन याने पुन्हा आपले मूळ नाव इस्माईल हे धारण केले. त्याला त्याने अमिरउल उमरा ही पदवी देऊन त्याचा सन्मान केला. आपल्या गतायुष्यातील आपला धनी याला दिलेले वचन अल्लाउद्दीन हसन हा विसरला नाही. त्याने गंगू ब्राम्हणाला आपल्या खजिन्याचा मुख्य पदाधिकारी नेमले. गंगूने महमद तुघलख बादशहाची चाकरी सोडली आणि तो दक्षिणेत निघून आला. यानंतर सर्व सरकारी कागदपत्रात [२] (२९२) बादशहांच्या पदवीपुढे गंगू बहमनी असे लावण्यात येऊ लागले. बहमनी घराण्याचा अस्त होईपर्यंत बादशाही शिक्यावर गंगू बहमनी एकदा कोरलेले कायम राहिले.

(११) सर्वसाधारणपणे अशी समजूत आहे की मुसलमान सुलतानाच्या हाताखाली चाकरी पत्करणारा गंगू हा पहिलाच ब्राम्हण होता. यापूर्वीच्या काळात ब्राम्हणांनी सार्वजनीक कारभारात कधीच भाग घेतला नव्हता, तर ते आपले जीवन धर्मसंबंधि कर्तव्ये पार पाडण्यात आणि वेदाभ्यास करण्यात व्यतीत करीत असत. संपत्तिची ते उपेक्षा करत आणि राजघराण्याची चाकरी करणे हे गुणवत्तेला मारक आहे असे ते मानीत. कधी काळी श्रीमंत अथवा सत्ताधिश व्यक्तींबरोवर वैद्य, ज्योतिष्यी, तत्वज्ञानी अथवा इतिहासकार या नात्याने त्यांचा जरी संबंध आला आणि अशा व्यक्तींनी बक्षिसी देऊन त्यांची मर्जी संपादन करण्याचा आणि त्यांना मोठ्या मानमरातवास चढविण्याची वचने देऊन बांधून घेण्याचा जरी प्रयत्न केला तरी नोकरपेशाचे जोकड आपल्या मस्तकावर लादून घेण्यास ते कधीही आपली संमती देत नसत. परंतु जेव्हा गंगूने नोकरी स्विकारली तेव्हापासून सर्वसाधारणपणे महसुलाच्या बाबींची व्यवस्था बघण्याचे काम दक्षिणेतील सर्व सुलतानांनी ब्राम्हणांकडे सोपविण्याची प्रथा पाडली. ११ □

(१२) अल्लाउद्दीन हसन याने शहाणपणाच्या धोरणाचा अनुनय करुन आणि त्याचप्रमाणे शस्त्र सामर्थ्याच्या जोरावर महमद तुघलघ याच्या कारकिर्दीच्या अखेर अखेर पर्यंत दिल्लीपतीच्या यापूर्वी ताब्यात असलेल्या दक्षिण देशाच्या प्रत्येक कानाकोपऱ्यावर आपली सत्ता प्रस्थापित केली. त्याचप्रमाणे त्याने बिदर आणि कन्धार आपल्या ताब्यात ठेवलेल्या दिल्ली सरकारच्या अफगाण, मोगल आणि रजपूत अधिकाऱ्यांना गोडीगुलाबीच्या उपायांचा अवलंब करून आपल्या पक्षास मिळवून घेतले. या अधिकाऱ्यांनी बिदर आणि कन्धारचा ताबा त्याच्याकडे सोपविला. अल्लाउद्दीन हसन याने त्याचप्रमाणे वरंगळच्या राजाकडून कौलास आणि कौलासच्या [२] (२९३) अधिपत्याखालील मुलूख हिसकावून घेतला आणि त्याच्या बरोबर त्याने मैत्रिचा तह केला.

हिजरी ७५२ }
इ. स. १३५१ } हिजरी ७५२ मध्ये महमद तुघलघ याचा मृत्यू झाला आणि आता दिल्लीपतीकडून हल्ला होण्याची यत्किंचितही भिती राहिली नाही. यामुळे सुलतानाने राज्याचा अंतर्गत कारभार अतिशय काटेकोरपणे करण्याकडे परिश्रमपूर्वक स्वतःला वाहून घेतले. त्याने आपला मोठा मुलगा महमद याचा विवाह मलिक सैफउद्दीन घोरी याच्या मुलीबरोबर लावून दिला. याप्रसंगी त्याने सोन्याच्या किनखाबाची, मखमलीची आणि साटिनची १०००० वस्त्रे आणि त्या व्यतिरिक्त १००० अरबी आणि पर्शियन घोडे व हिरे जडविलेल्या २०० तलवारी आपल्या दरबारातील अमिरांमध्ये वाटल्या. नागरिकांचे या प्रसंगी वेगवेगळ्या प्रकारच्या करमणुकीच्या साधनांच्या योगे मनरंजन करण्यांत आले. कुलवर्ग्याच्या रस्तोरस्ती दुकाने खोलण्यात आली आणि जमलेल्या समुदायावर मेवामिठाईचा जणू काही वर्षाव करण्यात आला. लग्नसमारंभ जवळजवळ वर्षभर चालला होता. वर्षाच्या अखेरच्या दिवशी राज्याचे अमीर उमराव आणि अधिकारी यांनी आपल्या परीने हिरे, द्रव्य आणि वेगवेगळ्या देशात निर्माण झालेल्या दुर्मिळ वस्तूंचे नजराणे सुलतानाला अर्पण केले.

(१३) या विवाहामुळे जी मैत्रीची भावना निर्माण झाली त्याचा परिणाम असा झाला की दरबारामध्ये मलिक सैफउद्दीन घोरी याला सर्व अमिर उमरावामध्ये अग्रस्थान मिळाले. यामुळे अमिरउल् उमरा याला आपला अपमान आणि मानखंडना झाली असे वाटले आणि त्याने त्याबद्दल तक्रार केली. परंतु त्याला असे सांगण्यात आले की, कोणत्याही स्थिर सरकारी राज्ययंत्रणेत लष्करी अधिकाऱ्यापेक्षा मुलकी अधिकाऱ्यांना अग्रस्थान दिले जाते. या स्पष्टिकरणाने जरी आपले वरवर समाधान झाल्याचे त्याने दाखविले तरी देखिल त्याने काही असंतुष्ट व्यक्तींबरोबर गुप्तपणे संगनमत करुन सुलतानाला सिंहासनावरून काढण्याचा कट रचला आणि अशा तऱ्हेने रिकाम्या झालेल्या सिंहासनावर पुन्हा राज्यारोहण करण्याचे त्याने ठरविले. परंतु त्याचे उद्दीष्ट सफल व्हावे असे परमेश्वराच्या मनांत नव्हते म्हणून की काय त्याच्या

बेतांची माहिती वेळीच सुलतानाला जे लोक या कटांत सामील झाले होते [२] (२९४) पण ज्यांना आता आपल्या कृतीबद्दल पश्चाताप झाला होता त्यांच्याकडून मिळाली. यावर सुलतानाने आपल्या सर्व प्रमुख अधिकाऱ्यांना दरबारात पाचारण केले आणि ईस्माईलवर उघड उघड कट केल्याचा आरोप केला. परंतु इस्माईल याने मोठ्या गंभीरपणे शपथा घेऊन आपल्या वरील आरोपाचा इन्कार केला. परंतु ज्यांनी या कटाची माहिती दिली होती त्यांनाच त्याच्यासमोर उभे करण्यात आले आणि पुष्कळशा कटवाल्यांनीच खुद्द त्याच्यावर ठेवण्यांत आलेले आरोप हे पूर्णपणे सिद्ध केले. त्यामुळे अमिर उल उमरा इस्माईल याला प्राणदंडाची सजा भोगावी लागली. त्याचे नातेवाईक आणि अनुयायी यांचा मात्र छळ करण्यात आला नाही. त्याची मालमत्ता देखील जप्त करण्यात आली नाही. उलट त्याचा मुलगा बहादूर खान याला अमिरउल उमरा या अधिकाराच्या जागेवर बढती देण्यात आली. सुलतानाचे हे कृत्य आणि अशा अनेक उदाहरणामधून त्याने न्याय देताना न्यायाला लावलेली दयेची झालर यामुळे त्याची किर्ती सर्वदूर पसरली आणि त्याच्या सामर्थ्यात भर पडली. तेलंगणाच्या राजाने सुलतानाबरोबरील एक निष्ठा पार झुगारून दिली होती तरी सुलतानाला त्याने जी मदत दिलेली होती त्यामुळे त्याला सुल्तानाने मोठ्या उदार सहिष्णुपणाच्या भावनेने वागविले. यापूर्वी तो दिल्लीच्या बादशहाना खंडणी देत असे. यापुढे आपण ती खंडणी बहमनी सुलतानांना देऊ असे त्याने आपणहून कबूल केले.

(१४) मलिक सैफउद्दीन घोरी याच्या सांगण्यावरुन सुलतानाने मोठे सैन्य कर्नाटकच्या [१२०] प्रदेशांत रवाना केले. तेथून त्याचा सेनापती विजयी होऊन परतला आणि येताना त्याने तेथल्या अनेक राजांपासून द्रव्य आणि हिरे या स्वरुपात बहुमोल खंडणी आणि शिवाय २०० हत्ती आणि १००० गायिका आणल्या. यापुढील हकीकत अशी : प्रेमराय नावाचा गुजरातच्या प्राचीन सुल्तानांचा प्रतिनिधी होता. दिल्लीच्या बादशहांची सत्ता दुर्बळ झाल्यामुळे तेथील परस्परांत भांडणाऱ्या अधिकाऱ्यांनी त्याची सत्ता झुगारून दिली होती. त्याने अल्लाउद्दीन हसनशहाला

शाबान | गुजरातवर स्वारी करण्याची विनंती केली. त्यानुसार हिजरी
हिजरी ७५८ | ७५८ या वर्षी शाबान महिन्यांत अल्लाउद्दीन हसन हा स्वतः
ऑगस्ट | स्वारीवर निघाला. त्याने आपला मोठा मुलगा [२] (२९५)
इ. स. १३५७ | राजपुत्र महमद याला २०००० घोडेस्वार देऊन पुढे

पाठविले आणि तो स्वतः त्याच्या पाठोपाठ सावकाशीने कूच करीत निघाला. नवसारी येथे राजपुत्र आला तेव्हा त्याला त्या प्रदेशांत शिकारीची रेलचल असल्याचे आढळून आले. याबद्दलची सर्व हकीकत त्याने आपल्या बापाकडे लिहून पाठविली. अल्लाउद्दीन हसन याला मैदानी खेळाची आवड होती. त्याने त्वरेने नवसारीकडे

कूच केले आणि जवळपासच्या प्रदेशांत त्याने एक महिनाभर घालविला. महिना संपता संपता त्याला अधूनमधून ताप येऊ लागला. प्रकृतीची कोणत्याही तऱ्हेची काळजी न घेता त्याने शरीराला पीडा देणारे खेळ आणि बेजबाबदार राहाणी यापासून परावृत्त न होता शरीराची हेळसांड चालूच ठेवली. अखेर त्याच्या शरीरात निर्माण झालेल्या रोगाने इतक्या पराकोटीची सीमा गाठली की त्याला कुलबर्गा येथे परत फिरणे भाग पडले. राजधानीला पोहोचल्यावर त्याने राज्यातील सर्व विद्वान आणि धार्मिक मंडळींची सभा बोलाविली आणि त्यांच्या समक्ष कुराणाच्या वचनांनी निषिद्ध मानलेल्या सर्व गोष्टींपासून भविष्यकालांत अलिप्त राहण्याची प्रतिज्ञा केली. या सुमारास त्याने आपल्या राज्याची चार प्रमुख भागांत विभागणी केली. कुलबर्ग्यापासून पश्चिमेस दाभोळपर्यंत आणि दक्षिणेस रायचूर आणि मुद्गलपर्यंत पसरलेल्या जिल्ह्यावर त्याने मलिक सैफउद्दीन घोरीची नेमणूक केली. या जिल्ह्यात राजधानीचा समावेश होता. समुद्रकिनाऱ्यावरील चौल बंदराचा समावेश असलेला आणि जुन्नर, दौलताबाद, बीड आणि पैठण यामध्ये पसरलेला मराठी प्रदेश त्याने आपला भाऊ अमिर अली याचा मुलगा महमद खान याच्या अधिकाराखाली दिला. इशान्येकडील माहूर, रामगीर आणि वऱ्हाडचा काही भाग या प्रदेशाचाकारभार पाहण्याचे काम त्याने सफ्दर खान सिस्तानी [२] (२९६) याजकडे सोपविले. बिदर, इंदूर, कौलास आणि तेलंगणाचे जिल्हे या प्रदेशाच्या कारभाराची व्यवस्था करण्याची कामगिरी त्याने मलिक सैफउद्दीन घोरीचा मुलगा आजम हुमायून याच्याकडे दिली. [13]★

(१५) यानंतर जवळ जवळ सहा महिने सुल्तानाची प्रकृति ढासळतच गेली. इतके असताना देखील तो दिवसातून दोन वेळा दरबारात जाई, राज्य कारभाराचे कामकाज बघे आणि गरिब गुरीब आणि ज्याचे हितसंबंध बघणारा कोणी नाही अशा बाबत न्यायदानाचे काम करी. राज्यातल्या ज्या कैद्यांवर राजद्रोह अथवा तत्सम गुन्हे यांचा आरोप होता ते कैदी सोडून राज्यातल्या सर्व कैद्यांची त्याने मुक्तता करण्याचा हुकूम दिला आणि इतरांना कुलबर्गा येथे जाण्याचे त्याने फर्माविले. त्याने त्या सर्वांचा स्वतः न्यायनिवाडा केला आणि सात कैदी सोडून इतरांची त्याने मुक्तता केली. या सात कैद्यांना त्याने आपला मुलगा महमद याच्या हवाली केले आणि आपल्या मृत्यू नंतर त्याला योग्य वाटेल त्या न्यायानुसार त्यांच्याबद्दल निर्णय घेण्यासंबंधी त्याने त्याला आदेश दिला. अखेर त्याला असे आढळून आले की औषधांचा त्याच्या प्रकृतित उतार पडण्याकडे कोणताही उपयोग होत नाही आणि निसर्ग आता त्याच्या बाबतीत थकला आहे. तेव्हा त्याने आपल्यावर उपचार करणाऱ्या हकिमांना रजा दिली आणि मानवी दुःखाचा अंतिम परिहार करणारा जो मृत्यू त्याची तो धिम्मेपणाने प्रतिक्षा करीत राहिला. या परिस्थितीत एक दिवस त्याचा सर्वात धाकटा मुलगा

महमूद हा आपल्या शिक्षकाबरोबर पठण करीत बसला असताना अल्लाउद्दीनहसन याने त्याला विचारले की तू कोणत्या पुस्तकाचे वाचन करीत आहेस ? यावर महमूदने उत्तर दिले की सादीच्या बोस्तान या पुस्तकाचे. एवढे सांगून महमूदने त्या दिवशी वाचलेल्या धड्यावरील उतारा म्हणून दाखविला. तो असा "मी असे ऐकले आहे की चांगुलपणाचा मूर्तिमंत पुतळाच असा जो जमशीद त्याने संगमरवरी कारंजावर पुढील प्रमाणे शब्द कोरुन घेतले, 'माझ्यासारख्या अनेकांनी ह्या कारंज्याचे दृष्य बघितले आहे, परंतु ते या जगातून गेले आहेत आणि त्यांचे डोळे कायमचे मिटले आहेत. मी हे जग शौर्य आणि शहाणपणा यांच्या जोरावर जिंकून घेतले परंतु मृत्यूरुपी कबरस्तानाच्या सत्तेला शरण आणण्यांत मात्र मला यश मिळविणे शक्य झाले नाही.'

(१६) सुलतानाने या ओळी ऐकल्यावर एक सुस्कारा सोडला आणि आपले मुलगे दाऊद आणि महमद यांना बोलावून तो म्हणाला "माझी आता अखेरची घटका भरत आली आहे. जर का तुम्हाला आपले राज्य कायम टिकून रहावे असे वाटत असेल तर माझे तुम्हाला असे आवाहनपूर्वक सांगणे आहे की तुम्ही [२] (२९७) एकमेका बरोबर मिळते जुळते घेऊन वागा. माझा वारस म्हणून मी महमद याला नेमले आहे. या जगातले तुमचे पहिले कर्तव्य म्हणजे त्याची आज्ञा प्रमाण मानणे आणि त्याजबरोबर एकनिष्ठ राहाणे. तुम्ही असे वागल्यास तुमच्या परलोकीच्या सुखाची शाश्वती निश्चित झाले असे समजा." यानंतर त्याने आपल्या खजिनदाराला बोलाविणे पाठविले आणि आपल्या प्रत्येक मुलाकडे ठराविक रक्कम देऊन तिचे गोरगरिबांना ताबडतोब दान करण्याची त्यांना आज्ञा दिली. राजपुत्रांनी याप्रमाणे त्या रकमेचे दान केले आणि त्यानी सुलतानाकडे येऊन सांगितले की तुमच्या इच्छेप्रमाणे आम्ही गोरगरीबांना दान दिले आहे. यावर सुलतानाने धन्य त्या परमेश्वराची असे उद्गार काढले आणि सृष्टि उत्पन्न करणाऱ्या त्या परमेश्वराच्या पायाशी त्याने त्याच क्षणी आपले जीवन समर्पण केले. अल्लाउद्दीन हसन याचा मृत्यू

| | |
|---|---|
| रबीउलअव्वाल १<br>हिजरी ७५९<br>फेब्रुवारी १०<br>इ. स. १३५८ | तो सिंहासनावर बसल्यापासून बरोबर ११ वर्षे २ महिने आणि ७ दिवसानंतर त्याच्या वयाच्या ६७ व्या वर्षी १ रबीउलअव्वाल हिजरी ७५९ या साली झाला. |

(१७) एकदा अल्लाउद्दीन हसन याला कोणीतरी विचारले की भरपूर द्रव्य अथवा फौजा नसताना तुम्ही राजपद प्राप्त करुन घेण्यात यशस्वी झालात ते कसे. यावर त्याने उत्तर दिले की माझ्या यशाचे गमक म्हणजे मी माझ्या मित्रांजवळ दयाळू-पणाने वागलो, माझ्या शत्रूंना मी उदारपणाची वागणूक दिली आणि सर्व मानवजाती बरोबर माझे वर्तन सभ्यपणाचे आणि औदार्याचे राहिले. पर्शियाचा एक पुरातन बादशहा

बहमन याच्या कुलांत त्याचा जन्म झाला असा सिद्धान्त मांडण्यात आला आणि मी, या ग्रंथाचा कर्ता फरिश्ता, स्वतः अहमदनगरच्या शाही ग्रंथालयात त्याचा बहमन बादशहाच्या कुलांत जन्म झाला आहे असे सांगणारा कुलवृत्तान्त बघितला आहे. परंतु बहुधा तो सिंहासनावर बसल्यानंतर भाट आणि कवी यांनी तो दडपून तयार केला असावा. कारण माझी अशी ठाम समजूत आहे की त्याच्या जन्माबद्दलची हकीकत इतकी गूढ आहे की त्यातून त्याचा कुलवृत्तान्त शोधून काढण्याइतकी दुसरी कठिण गोष्ट नाही. त्याने आपल्या नावापुढे बहमनी हे पद जे लावून घेतले ते आपला पूर्वायुष्यातील धनी गंगू ब्राम्हण याने त्याच्यावर जे उपकार केले त्याची परतफेड करण्यासाठी म्हणून यांत काहीच शंका नाही. ब्राम्हण या शब्दाचा उच्चार कधीकधी बाहमन असाही करतात. त्यावरून बहमनी हे नाव पडले असावे असे मानण्यास जागा आहे. मला असलेल्या माहितीवरून सुलतान स्वतः जन्माने अफगाण कुळातला होता. [१४] *

# प्रकरण दुसरे

## महमदशाहा बहमनी पहिला [१५] * [१६] *

(१८) जेव्हा महमदशाहा सिंहासनावर विराजमान झाला तेव्हा [२] (२९८) त्याने दरबाराच्या वैभवात बरीच भर टाकली. त्याच्या सिंहासनावर जे छत होते त्यावर त्याने हिऱ्याने मढविलेला सोन्याचा एक गोल करवून घेतला. या गोलावर त्याने मौल्यवान धातूपासून बनविलेला नंदनवनातील एक पक्षी बसविला. या पक्षाच्या मस्तकावर ज्याची किंमत करता येणार नाही असे लाल माणिक जडविले होते. हे माणिक अल्लाउद्दीन हसनशहा याला विजयनगरच्या राजाने नजराण्यादाखल पाठविले होते. महमदशहाने राज्यकारभार हाती घेतल्यावर आपल्या नोकरांच्या संख्येत वाढ केली. त्याने आपले अमीरउमराव आणि अधिकारी यांची चार दर्जामध्ये विभागणी केली. प्रत्येकाकडे त्याने विशिष्ट हुकुमांची तामिली आणि नेमून दिलेल्या वेळी दरबारात हजर होणे अशी कामे वाटून दिली. त्याने आपल्या सैन्याची एक तुकडी तयार करुन [२] (२९९) तिला बारदार असे नाव दिले. या तुकडीकडे सैन्याला जमविण्याचे आणि सुलतानाच्या भेटीला येणाऱ्या लोकांना स्वारी देण्याचे काम होते. त्याने या शिवाय शिलेदारांचे [१७] □ एक पथकही तयार केले. यामध्ये २०० तरुण मंडळी होती आणि त्यांची निवड अमिर उमरावांच्या मुलांमधून करण्यात आलेली होती. त्यांचे काम शाही चिलखत आणि शस्त्रास्त्रे वाहून नेण्याचे होते. महमदशहाने त्याचप्रमाणे ४००० सैनिकांचे एक शरीर रक्षक दल निर्माण केले आणि त्याचे अधिपत्य त्याने उच्चाधिकारपदस्थ

अशा एका अमिराकडे सोपविले. या अधिकाऱ्याला त्याने मिर नोबत असा किताब दिला. १५ शिलेदार आणि १००० शरीररक्षक सैनिक हे दररोज पहाऱ्यासाठी राजवाड्यात हजर रहात असत. शुक्रवार सोडून प्रत्येक दिवशी सकाळी लवकर तो जाहिर दरबार भरवीत असे आणि दुपारच्या प्रार्थनेची वेळ झाली असा पुकारा ओरडच्या करी पर्यंत तो राज्यकारभाराचे काम बघे. यानंतर दरबार बरखास्त केला जाई. सिंहासनावर बसण्यापूर्वी तो निव्वळ आदराच्या भावनेने सिंहासनापुढे सपशेल लोटांगण घाली आणि म्हणे की मी माझ्या वडिलांच्या स्मृतिप्रित्यर्थ असे करीत आहे. महमदशहाचे सिंहासन चांदीचे होते. त्याखाली एक भपकेदार गालिचा असून वरच्या बाजूला एक उत्कृष्ट असे छत होते. जाहिर दरबार ज्या ठिकाणी भरविण्यात येत असे त्या समोर एक पटांगण होते. त्याच्या दोहो बाजूला दर्जेदार किनखाबाच्या मखमलीचे पडदे सोडून किंवा तशाच प्रकारच्या किंमतवान कापडाच्या झालरी सोडून वातानुकुल वातावरण निर्माण करण्यात आले होते. आपल्या राज्याच्या प्रत्येक सुभ्याच्या सुभेदाराला त्याने तदफदार असे नाव दिले. त्याच्या कारकिर्दीच्या सुरुवातीला मलिक सैफउद्दीन घोरी [१८] ★ याला त्याच्यासमोर दरबारात आसनस्थ होण्याचा मान मिळत असे परंतु अशा तऱ्हेचा विषेशाधिकार आपणाला यापुढे नको असे खुद्द त्यानेच सांगितल्या वरून इतर अमिरांप्रमाणे मलिक सैफुद्दीन घोरी हाही सुलतानासमोर दरबारात उभा राहू लागला. दिवसातून नौबत [१९] □ अथवा नगारा ठरलेल्या वेळी पाच वेळा वाजविण्यात येई. जेव्हा जेव्हा कोणतीही व्यक्ती सुलतानाला [२] (३००) आपला परिचय करून देण्यासाठी सामोरी जाई तेव्हा ती व्यक्ती आपले गुडघे टेकीत असे आणि त्याच्या समोरच्या जमिनीला कपाळ टेकवित असे [२०] □. बहमनी घराण्याचा कालांतराने अस्त झाल्यावर दक्षिणेतल्या अनेक सुल्तानांनी छत्र आणि चामरे धारण केली आणि खुत्बा आपल्या नावाने वाचण्याची प्रथा सुरु केली. परंतु गोवळकोंड्याचा सुलतान कुतुबशहा सोडून दिल्यास त्यांच्यापैकी कोणीही स्वतःच्या नावे सोन्याची नाणी पाडली नाहीत अथवा दिवसातून पाच वेळा नौबती वाजविल्या नाहीत.

(१९) बहमनी घराण्याची नाणी [२१] ★ ही आकाराने चौकोनी होती आणि ती वेगळ्या मूल्यांची होती. त्यांच्या एका बाजूला मुसलमानांचा पवित्र ग्रन्थ जो कुराण त्यातील मूलतत्व आणि अशाब म्हणजे पहिले चार खलिफा यांची नावे कोरलेली होती. दुसऱ्या बाजूवर सुलतानाचे नाव व पदवी आणि त्याच्या कारकिर्दीच्या ज्या वर्षात ते नाणे पाडण्यांत आले ते वर्ष कोरलेली असत. विजयनगर आणि तेलंगण या देशांच्या राजानी चिथावणी दिल्यावरून हिंदू पेढीवाल्यांनी त्यांच्या हातांत जेवढी म्हणून बहमनींची नाणी पडली तेवढी सगळी त्यांनी वितळवून टाकली. अशी चिथावणी देण्यात त्यांचा उद्देश असा होता की केवळ त्या दोघा काफरांच्या नावे पाडण्यात

आलेली नाणीच दक्षिणेत प्रचलित रहावी. त्यांना ताकीद दिल्यानंतर देखिल त्यांनी हा अपराध करण्यापासून स्वतःला परावृत्त केले नाही. याचा महमदला अतिशय संताप आला आणि असे कृत्य करणाऱ्या अनेक अपराधी व्यक्तींना त्याने देहांत शासनाची शिक्षा दिली. या घटनेनंतर त्याने नाणी पाडण्याचे काम आणि पेढीबाबतचे व्यवहार खत्री जातीच्या काही लोकांकडे सोपविले. हे खत्री म्हणजे पूर्वी दक्षिणे मधे स्थलांतर करून आलेल्या दिल्लीच्या रहिवाशांचे वंशज होते. यानंतर मात्र मुसलमानी प्रदेशांत फक्त बहमनींची नाणीच वापरांत येऊ लागली. बहमनी घराण्याचे [२] (३०१) उच्चाटन झाल्यानंतर मुसलमानी प्रदेशांत हिंदू राज्यांची नाणी वापरली जाण्याची सर्रास परवानगी देण्यात आली.

(२०) महमदशहाच्या कारकिर्दीच्या सुरवातीला विजयनगर आणि तेलंगणाच्या राजानी [२२*] अल्लाउद्दीन हसन याने त्यांच्यापासून जिंकून घेतलेला मुलुख महमदशहाने आपल्याला परत करावा अशी मागणी केली. त्यांनी अशीहि धमकी दिली की आमची मागणी नाकारल्यास आम्ही तुमच्या प्रदेशावर आक्रमण करून येऊ इतकेच नव्हे तर दिल्लीच्या सुलतानाचे सैन्य तुमच्यावर चाल करुन येईल अशी व्यवस्था करू. या सुमारास महमदशहा आपल्या काही अधिकाऱ्यांच्या एकनिष्ठेबद्दल साशंक झाला होता. त्याचप्रमाणे त्याची आई मलिका जेहान हिने मक्का, मदिना आणि करबला येथे हाजची यात्रा करण्यासाठी भरपूर रकमा उचलल्यामुळे त्याचा खजिना बराचसा रिता पडला होता. त्यामुळे महमदशहाने विजयनगर आणि तेलंगणाच्या राजाच्या वकीलांना जवळजवळ १८ महिने आपल्या दरबारांत ठेऊन घेतले होते. आणि कालावधि मिळविण्यासाठी म्हणून आपले वकील या दोन राजांकडे रवाना केले होते. या दरम्यानच्या काळांत ज्या अधिकाऱ्यांबद्दल त्याच्या मनांत संशय होता त्यांची त्याने हकालपट्टी केली. त्याची आईदेखील हाज करून परतली. तेव्हा त्याने विजयनगर आणि तेलंगणच्या राजांबरोबर युद्ध करण्याचे ठरविले आणि त्यांच्यापासून जडजवाहिर, सोने आणि दक्षिणेमध्ये उत्पादन केल्या जाणाऱ्या अशा अत्यंत मौल्यवान मालाचे लादलेले असे त्यांच्या ताब्यातील उत्कृष्ट हत्ती आपल्याकडे पाठवून देण्याबद्दल त्याने मागणी केली. यावर तेलंगणाच्या राजाने आपला मुलगा विनायकदेव याला सैन्य देऊन कौलास जिंकून घेण्यासाठी पाठविले. विजयनगरच्या राजाने त्याच्याबरोबर सहकार्य करण्यासाठी म्हणून मोठ्या फौजेची रवानगी केली. हिंदूच्या सैन्याचा बहादूरखानाच्या हाताखालील मुसलमानी सैन्याने पराभव केला. बहादूरखानाने वरंगळच्या आसमंतातील सर्व प्रदेश लुटून उध्वस्त केला आणि तेलंगणाच्या राजाला मोठी रक्कम खंडणीदाखल देण्यास आणि याशिवाय २५ हत्ती आणि अनेक मौल्यवान हिरे कुलबर्ग्याच्या सुलतानाला नजराणा म्हणून पाठविण्यासाठी देण्यास त्याने भाग पाडले.

हिजरी ७७३ (इ.स. १३७१) } (२१) हिजरी ७७३ या वर्षाच्या अखेरीस काही व्यापारी दूर दूरच्या प्रदेशांतून विकण्यासाठी घोडे घेऊन कुलबर्ग्याला दाखल झाले. परंतु सुलतानाला ते पसंत पडले नाहीत आणि माझ्या उपयोगासाठी ते घोडे [२] (३०२) लायक नाहींत असेही उद्गार त्याने काढले. यावर त्या व्यापाऱ्यांनी सुलतानाला सांगितले की काही दिवसापूर्वी आमच्याजवळ अतिशय सुंदर असे घोडे होते परंतु आमच्यापासून विनायक देवाने जबरदस्तीने कमी किंमतीला ते वेलू पट्टम २३ □ येथे हिरावून घेतले. आम्ही त्याला सांगितले की हे घोडे आम्ही कुलबर्ग्याच्या सुलतानासाठी आणले आहेत तेही त्याने ऐकले नाही. महमदशहाला विनायक देवाचा अगोदरच संताप आला होता. त्यांत आणखी विनायक देवाने त्याच्या या नुकत्याच केलेल्या अपमानाची भर पडून त्याने विनायक देवाचा सूड घेण्याचा निश्चय केला. त्याने राज्याची व्यवस्था पाहण्याचे काम मलिक सैफुद्दीन घोरी याजवर सोपविले. नंतर त्याने सुल्तानपूर येथे सैन्याची जमवा जमव केली आणि त्या सैन्याचे संघटन करीत त्याने सुल्तानपूर येथेच दहा दिवस मुक्काम केला. या ठिकाणी त्याला विजय मिळावा म्हणून पूजनीय अशा महमद सिराजउद्दीन जुनैदी या अवलियाने त्याच्यासाठी प्रार्थना करुन त्याला आपले शुभाशिर्वाद दिले. यानंतर त्याने ११ व्या दिवशी आपला मुक्काम हलवून सावकाशपणे आपल्या मोहिमेची सुरवात तेलंगणाच्या दिशेने कूच करुन केली. कूच करीत तो कल्याणी येथे येऊन पोहोचला. महमदशहाचा एक विश्वासातला सेवक होता. आपल्यापाशी मोकळेपणाने बोलण्याचे स्वातंत्र्य या चाकराला त्याने दिलेले होते. त्याला सुलतानाने विचारले की किती वेळांत मी वेलूपट्टम येथे पोहोचू शकेन. त्या हजरजबाबी सेवकाने उत्तर दिले की आपण जर आपल्या हल्लीच्या गतीने कूच करण्याचे चालू ठेवले तर वेलूपट्टमजवळ पोहोचून ते शहर बघण्यास कदाचित आपल्याला १२ महिने देखिल लागतील. त्या सेवकाचे उद्गार सुलतानाला बोचले. त्याने ताबडतोब ४००० हलक्या घोडेस्वारांची एक तुकडी तयार केली आणि तिच्यासह इतक्या झपाट्याने त्याने कूच केले की तो एका आठवडाभरांत वेलूपट्टम जवळ येऊन पोहोचला. तेथे आल्यानंतर त्याने आपल्या फौजेतील [२] (३०३) कसलेल्या शिपायांच्या एका तुकडीला फाटकी तुटकी वस्त्रे परिधान करुन आपला वेष बदलण्यास सांगितले आणि घोड्यांचे व्यापारी म्हणून वेलपट्टम येथे जाण्याचा त्याने त्यांना हुकूम दिला. शहराच्या दरवाजातील रक्षकांचे लक्ष वेधून घेण्यासाठी म्हणून आमचे घोडे चोरट्यांनी पळवून नेले अशी हाकाटी करण्यासहि त्याने त्यांना सांगितले. याप्रमाणे ते शिपाई दरवाजाजवळ गेले तेव्हा रखवालदारांनी विचारलेल्या प्रश्नांना त्यांनी उत्तर केले कीं शहरापासून फार दूर नाही अशा अंतरावर अनेक चोरट्यांनी

नागविलेले आम्ही व्यापारी आहोत. या ठिकाणच्या सुभेदारापासून संरक्षण मागण्यासाठी आणि न्याय मिळविण्यासाठी आम्ही आलो आहोत. हे चालले असतांना दरम्यानच्या काळांत महमदशहाने १००० घोडेस्वार घेऊन पुढे चाल केली आणि रखवालदार शहराचे दरवाजे बंद करण्याच्या प्रयत्नात असताना सुलतानाच्या सैनिकांनी पुढे होऊन त्यांना प्रतिरोध केला. आता सुलतानाने शहरांत प्रवेश केला आणि कसलीहि दयामाया न दाखविता त्याने शहरातील नागरिकांची कत्तल करण्यास सुरुवात केली. इकडे अशा तऱ्हेने शत्रूचा आपल्यावर घाला येईल अशी बिलकूल अपेक्षा नसल्याने विनायकदेव स्वतःची करमणूक करून घेण्यात दंग झाला होता. त्याला जेव्हा शत्रूच्या हल्ल्याची धोक्याची सूचना मिळाली तेव्हा तो कसलाहि विचार न करता उतावळेपणाने किल्ल्यांत पळून गेला. सुलतानाने यत्किंचितहि विलंब न लावता किल्ल्यावर हल्ला केला. विनायक देवाने प्रतिकाराचा थोडासा देखावा निर्माण केला आणि किल्ल्याच्या मागील बाजूकडील दरवाजाने पळून जाण्याचा त्याने प्रयत्न केला. परंतु शहरामध्ये त्याला कैद करण्यांत आले. दुसऱ्या दिवशी सकाळी सुलतानाने त्याला विचारले की कुलबर्ग्याच्या मार्गावर असलेल्या व्यापाऱ्यांकडून घोडे पकडून नेण्याचे धाडस तुला झाले हे मोठे आश्चर्यच म्हटले पाहिजे. विनायक देवाने यावर सुलतानाला अतिशय अपमानकारक उत्तर दिले. तेव्हा महमदशहाचा प्रथम विनायक देवाला प्राणदान करण्याचा जो निश्चय होता तो बदलला. त्याने किल्ल्याच्या जवळच असलेला एक लाकडाचा ढिगारा पेटविण्याचा हुकूम दिला. नंतर त्याने विनायक देवाची जीभ छाटण्याची आज्ञा केली आणि त्याला (catapulta) मुंजनीकवर (फेकयंत्र) बसवावे असे सांगितले. तेथून भिंतीवरून त्याला आगीच्या धगधगत्या ज्वाळांत फेकण्यांत आले आणि विनायक देवाचा देह अग्निच्या भक्षस्थानी पडला. सुलतानाने [२] (२०४) १५ दिवस शहरांत मुक्काम केला. सुलतानाच्या पाठोपाठ त्याचे सैन्यहि येऊन पोहोचले होते. त्यांनी शहराच्या दरवाज्याबाहेर आपली छावणी दिली. कूच करण्यामुळे झालेल्या श्रमांचा परिहार करण्यासाठी महमदशहाने विश्रांति घेतली आणि सुखोपभोगाच्या चैनीत तो मशगूल होऊन गेला. महमदशहाने विनायक देवाजवळील संपत्ती आपल्या ताब्यांत घेतली आणि वेलूपट्टमच्या नागरिकांकडून जबरदस्त खंडणी वसूल केली. नंतर त्याने वेलूपट्टम सोडले आणि तो आपल्या राजधानीकडे येण्यासाठी परत फिरला. दरम्यान तेलंगणातील लोक मोठ्या संखेने जमा झाले होते. त्यांनी त्याला सर्व बाजूंनी घेरले आणि तो कूच करत असताना त्याला इतके पिडले की आपल्याजवळील हिरे आणि सोने वगळून वेलूपट्टम मधून त्याला मिळालेली लूट यासकट बाकी सर्व जड सामान आणि राहुट्या जाळून टाकण्याचा त्याने हुकूम दिला. त्याच्या जवळ जड सामानाची अशा तऱ्हेने जी अडचण होती त्यातून मुक्तता

झाल्यावर त्याने सकाळपासून रात्र पडेपर्यंत एकत्र समूहित पद्धतीने सैन्यासह कूच करण्याचे धोरण स्वीकारले. वाटेमध्ये जी खेडी लागत त्यांतून आपल्या सैन्यासाठी तो दाणागोट्याची सोय करु लागला. शत्रूकडून अचानक हल्ला होईल या भितीने रात्रीच्या वेळी तो अतिशय सावधगिरी बाळगू लागला. त्याने जरी इतकी काळजी घेतली तरी शत्रूने त्याच्यावर हल्ला करुन त्याच्या सैनिकांची इतकी कत्तल केली की त्याने बरोबर नेलेल्या ४००० सैनिकांपैकी जेमतेम १५०० सैनिक जिवंत परतले. खुद्द महमदशहाला दंडात जखम झाली आणि प्रकृति बिघडल्यामुळे त्याला कौलास येथे मुक्काम करणे भाग पडले. सुलतानाचे नशिब बलवत्तर होते म्हणून या ठिकाणी त्याला त्याच्या मुख्य सैन्यासहित मलिक सैफुद्दीन घोरी हा येऊन मिळाला. तेव्हा मुसलमानी सैन्याने पलटखाऊन हल्ला करुन तेलंग्यांची भयंकर कत्तल केली व त्यांना त्यांच्या देशाकडे हाकून दिले. सुलतान हा कुलबर्गा येथे पोहोचेपर्यंत अनेक ठिकाणे त्याने तेलंग्यांच्या पासून जिंकून घेतली.

(२२) आपल्या मुलाचा जो निघृण वध केला गेला त्यामुळे तेलंगणाचा राजा भयंकर संतप्त झाला आणि त्याने दिल्लीचा बादशहा फिरोज तुघलघ याला पत्र लिहिले आणि मी आपला मांडलिक आहे असे त्याला कळविले. त्याने त्याला असे वचन दिले की आपण जर दक्षिणेमध्ये सैन्य रवाना कराल तर त्या सैन्याबरोबर मी सहकार्य करीन आणि आपण दक्षिणेमध्ये जो प्रदेश गमावला तो मिळवून देण्यासाठी मी आपल्याला मदत करीन. आपण माझ्या सांगण्याप्रमाणे केल्यास मी आपल्याला बरीचशी रक्कम खंडणी म्हणून आदा करीन. त्याने दिल्लीच्या बादशहाकडे आपल्यातर्फे जो प्रस्ताव मांडला त्यात त्याला विजयनगरच्या राजाने आपला पाठिंबा दिला. [२] (३०५) परंतु फिरोज तुघलघ आपल्या राज्यातील अंतस्थ भानगडीत इतका गुंतला होता की त्यांना मदत देण्यासाठी त्याला सवड झाली नाही आणि त्यांनी त्याच्याकडे जो प्रस्ताव मांडला होता त्याकडे लक्ष देणे देखील त्याला जमले नाही.

(२३) तेलंगण आणि विजयनगरच्या राजांनी फिरोज तुघलघ जवळ सूत बांधण्याचा जो प्रयत्न केला त्याची हकीकत महमदशहाच्या कानावर गेली. दिल्लीचे बादशहा दक्षिणेत उतरण्यास आता दौर्बल्यामुळे असमर्थ आहेत याबद्दलच्या पूर्ण जाणीवेने त्याने संबंध तेलंगणाचा प्रदेश जिंकून घेण्याचे ठरविले. त्याने पुन्हा एकदा राज्याच्या अंतस्थ कारभाराची जबाबदारी मलिक सैफुद्दीन घोरी याजवर सोपविली आणि त्याने स्वतः कौलासकडे कूच केले. तेथून त्याने आजमहुमायूनची रवानगी बिदरची फौज बरोबर देऊन गोवळ कोंड्याकडे केली आणि सफदरखानाला वऱ्हाडच्या सैन्यासहित वरंगळच्या विरुद्ध रवाना केले. वरंगळच्या दिशेने तो स्वतः मजलदरमजल करीत पाठोपाठ निघाला. दिल्लीकडून मदत मिळण्याच्या बाबतींत तेलंगणाच्या राजाची निराशा झाल्यामुळे सुलतानाच्या फौजेबरोबर समरांगणात गाठ घेण्याचे त्याने टाळले आणि तो

नजिकच्या जंगली प्रदेशांत निघून गेला. तेथून त्याने आपल्या काही अधिकाऱ्यांना मौल्यवान नजराणे देऊन बहादूरखानाकडे पाठविले [२४ ग] आणि त्याने आपल्या वतीने तहासाठी मध्यस्थी करावी अशी त्याच्याकडे याचना केली. सुलतानाने प्रथम ही विनंती झिडकारून लावली. तेव्हा राजाने आपल्या मुलांपैकी एकाला सुलतानाच्या छावणीत पाठविले आणि त्याच्यातर्फे सुलतानाकडे आपण शरण आल्याची पत्रे देवविली. अखेर महमदशहाने त्याच्या अमिर उमरावांनी मोठया प्रयत्नांनी त्याचे मन वळविल्यामुळे तेलंगणाच्या राजाबरोबर तह करण्यास आपली संमती दिली. त्याने बहादूरखानाला सांगितले की माझ्या इतमामाला शोभेलशा अटीवर, ज्या अटी तुला योग्य वाटतात त्यावर तेलंगणाच्या राजाबरोबर तह कर. याप्रमाणे असे ठरले की तेलंगणाच्या राजाने खंडणी म्हणून ३०० हत्ती, २०० अतिशय नामी अबलख घोडे आणि ३३ लक्ष रुपये द्यावे आणि गोवळकोंड्याचा डोंगरी किल्ला, किल्ल्याच्या हुकमतीखालील मुलुखा सहित बहमनी सुलतानांना कायम तोडून देण्यास कबूली द्यावी. मुसलमानांचे सैन्य जवळजवळ दोन वर्षे तेलंगणाच्या प्रदेशांत मुक्काम देऊन होते आणि तेथील [२] (३०६) उत्पन्नावर त्यांचे पोषण होत होते. साहजिकच तेलंगणाचा राजा अतिशय संतप्त होऊन गेला होता आणि महमदशहाने घातलेल्या अटी पुऱ्या केल्याखेरीज आपल्याला सुटका नाही हे त्याला दिसून आले. अखेर असे ठरले की महमदशहाने तेलंगणातून परत फिरावे आणि तहाच्या अटी पुऱ्या पाळल्याजात आहेत की नाही हे पाहाण्यासाठी बहादूरखानाने कौलास येथेच काही काळ तळ देऊन रहावे. यानंतर महमदशहाने गोवळकोंडयाची व्यवस्था पाहण्याचे काम आजम हुमायून याजवर सोपविले आणि तो स्वतः राजधानीकडे जाण्यासाठी परत फिरला. बिदर येथे पोहोचल्यावर त्याने आपल्या सेनाविभागांना त्यांच्या प्रांतोप्रांती जाण्यास आज्ञा दिली. महमदशहाने यानंतर बिदर येथे जवळजवळ तीन महिने मुक्काम केला.

(२४) जेव्हा तेलंगणाच्या राजाचे प्रतिनिधी कौलास येथे आले तेव्हा बहादूरखान हा त्यांना घेऊन सुलतानाकडे गेला. तहाच्या अटींत ठरल्याप्रमाणे त्यांनी सुलतानाला नजराणा सादर केला. आपल्या परीने सुलतानाने त्यांना भारी पोषाख आणि त्याशिवाय उंची हिरे भेट म्हणून दिले. त्याचप्रमाणे तेलंगणाच्या राजाला देण्यासाठी अतिशय चपळ आणि चपखळ घोडे त्याने त्यांच्याबरोबर पाठविले. याप्रमाणे काही दिवस गेल्यानंतर तेलंगणाच्या राज्याच्या वकीलांनी बहादूरखानापुढे प्रस्ताव मांडला की जर का तेलंगणाच्या राज्याच्या प्रादेशीक सीमा आखून दिल्यानंतर आपल्या बादशहानी आमच्या बादशहांबरोबर तह केला आणि त्या तहात तेलंगणाच्या राज्यावर आपल्या वारसांकडून आक्रमण होणार नाही अशा तऱ्हेच्या अटींनी स्वतःस बांधून घेतले तर आमचे बादशहा तुमच्या बादशहासारख्या थोर पुरुषाला योग्य अशी एक

म. रा. ... ग्रंथालय स/१७०/२ मंत्रालय.

दुर्मिळ वस्तू नजराणा म्हणून अर्पण करतील.

(२५) तेलंगणाच्या वकीलांनी मांडलेला प्रस्ताव बहादूर खानाने महमदशहा समोर मांडला. तेव्हा आपल्याला असा कोणत्या तऱ्हेचा नजराणा देण्याचे तेलंगणाच्या राजाच्या मनांत आहे हे जाणून घेण्याबद्दल महमदशहाला अतिशय उत्सुकता लागून राहिली. तेलंगणाच्या वकीलांना सुलतानासमोर हजर करण्यात आले तेव्हा त्यांनी पुन्हा आपला प्रस्ताव सुलतानासमोर बोलून दाखविला. ते प्रामाणिकपणे सांगत आहेत अशी जेव्हा महमदशहाची खात्री झाली तेव्हा त्याने आपल्या हस्ताक्षरांत असे लिहून दिले की यापुढे आमचे राज्य आणि तेलंगणाच्या राजाचा मुलुख यामधील सरहद्द गोवळकोंडा म्हणून ओळखले जाईल. माझ्या वारसांना या लेखानुसार मी असे आवाहन करतो की जोपर्यंत तेलंगणाचे राजे वरील बोलीनुसार दिलेल्या वचनाचा भंग न करण्याची कोशीस करीत आहेत तो पर्यंत त्यांनी तेलंगणाच्या राजाना कोठल्याही तऱ्हेचा उपसर्ग देऊ नये. या तहाच्या कागदावर सुलतानाने आपल्या शिक्क्यानिशी दस्तखत केली आणि सुलतानाचे न्यायाधिश आणि प्रमुख उमराव यांनी साक्षीदार म्हणून आपले मोर्तब केल्यावर तेलंगणाच्या हिंदू वकीलांनी सुलतानाला एक [२] (३०७) तख्त अर्पण केले. या तख्ताला अतिशय मौल्यवान हिरे जडविण्यात आले होते. हे तख्त दिल्लीचा बादशहा महमद तुघलघ याला नजर करण्यासाठी म्हणून पहिल्याप्रथम तेलंगणाच्या राजाने बनवून घेतले होते. तख्ताचा नजराणा बघून महमदशहा अतिशय खूष झाला आणि त्याने तेलंगणाच्या वकिलांचा मानसन्मान करून आणि त्यांच्यावर विशेष मेहेर नजर दाखवून त्यांना जाण्यासाठी निरोप दिला. कुलबर्ग्याला परतल्यावर त्याने मोठा उत्सव केला आणि राजेशाही थाटाने तो या नवीन सिंहासनावर विराजमान झाला. या सिंहासनाला त्याने तख्त इ फिरोजा अथवा अस्मानी रंगाचे सिंहासन या नावाने ओळखले जावे असा हुकूम जारी केला. यानंतर त्याने जाहीर दरबार भरविला आणि ज्या अधिकाऱ्यांनी नुकत्याच झालेल्या लढाईत आपल्या शौर्याने सन्मानाला आपण पात्र आहोत असे दाखवून दिले होते त्यांना उंची उंची भेटी दिल्या आणि त्यांना पदव्या देवून त्यांचा सन्मान केला. आपल्या बापाच्या वेळचे सोन्याचे सिंहासन मात्र त्याने जामदारखान्यात ठेवण्यात यावे असा हुकूम दिला आणि एक मौल्यवान अवशेष म्हणून त्याची जपणूक करण्यात यावी असे त्याने फर्माविले.

(२६) माझ्या परिचयातल्या ज्या काही वृद्ध गृहस्थानी सुल्तान महमूद-शहाच्या कारकिर्दीत तख्त इ फिरोजा प्रत्यक्ष बघितले होते त्यांनी असे सांगताना मी ऐकले आहे की हे सिंहासन ९ फूट लांब असून ३ फूट रुंद होते. सिंहासनाची चौकट काळ्या टेंबुरणी लाकडाची असून तिच्यावर शुद्ध सोन्याचा साज चढविण्यात आला होता. या सोन्यामध्ये अतिशय भारी किंमतीचे मौल्यवान खडे अशा तऱ्हेने जडविण्यात

आले होते की ते अतिशय सहजपणे काढून घेता येत आणि बसविता देखिल येत. बहमनी घराण्यातील प्रत्येक सुलतानाने यांत भारी भारी रत्नांची भर घातली. त्यामुळे जेव्हा महमूद शहाच्या कारकिर्दीत फुलपात्रे आणि चषक यांच्यामध्ये बसविण्यासाठी त्यामधील काही मौल्यवान बाहेर काढले तेव्हा त्या सिंहासनाचे तुकडे करण्यात आले. त्यावेळी हिरे पारख्यानीं एकंदरी सिंहासनाची किंमत १ कोटी होनाएवढी केली. माझ्या अशीही माहिती ऐकिवात आली की आकाशी निळ्या रंगाने त्याला मुलामा चढविण्यात आल्यामुळे त्या सिंहासनाला फिरोजा म्हणू लागले. परंतु कालांतराने भारी भारी आणि मौल्यवान वस्तूंच्या योगे त्या सिंहासनाला अलंकारीत करण्यात आल्यामुळे त्याचा हा आकाशीरंग पूर्णपणे छपून गेला.

(२७) वर उल्लेख केलेला उत्सव समारंभ जवळजवळ ४० दिवस चालू होता. त्या अवधित धर्माने बंधनकारक[२५] □ म्हणून घालून दिलेल्या निषिद्ध गोष्टीबाबतचे सर्व नियम आणि कायदेकानून धाब्यावर बसविण्यांत आले. अमिर उमराव आणि[२](३०८) सर्वसामान्य प्रजाजन यांनी आपल्या सार्वभौम सुल्तानाचे अनुकरण केले आणि ते सर्वजण उत्सव करण्यांत आणि सुखोपभोगाची चैन करण्यांत मशगूल होऊन गेले. ह्याप्रसंगी दिल्लीहून अनेक वादकांचा ताफा जवळजवळ ३०० गवयांच्या बरोबर कुलबर्ग्याला दाखल झाला. यापैकी अनेकांनी दिल्लीचा सुप्रसिद्ध अमिर खुश्राव आणि ख्वाजा हसन यांच्या कवनांवर प्रभुत्व मिळविले होते तर काहीनी त्या कलेतील मेरुमुकुटासमान असणाऱ्या त्या कलावंताना प्रत्यक्ष ऐकले होते. अशा शुभप्रसंगी वरील गवयांचे झालेले आगमन महमदशहाने शुभ मानून त्यांचा सत्कार केला आणि त्यांच्याकडे सर्वतोपरी लक्ष पुरविले. महमदशहा या प्रसंगी इतक्या चांगल्या मनस्थितींत होता की त्याने भरदरबारांत मल्कि सैफुद्दीन घोरी आणि सद्रउल शरीफ व त्याचप्रमाणे बहाद्रखान यांना आपल्या सिंहासनाच्या पायाशी बसण्याची परवानगी दिली. त्याने बहाद्रखानाला अमिर उल् उमरा असा किताब दिला आणि त्याच्या मुलीशी आपला मुलगा राजपुत्र मुजाहिदशहा याचा विवाह पक्का केला.

(२८) तोहफत उस सलातीन या ग्रंथाचा कर्ता मुल्ला दाऊद बिदरी हा असे सांगतो की मी त्यावेळी १२ वर्षाचा होतो आणि माझ्याकडे सुल्तानाच्या चाकरमान्याचे आणि त्याचा बादशाही शिक्का वाहून नेण्याचे काम होते. एके दिवशी संध्याकाळी सुखाच्या उपवनातील मधुर सुगंधाच्या आनंदरूपी गुलाबी पिसाऱ्यांनी महमदशहाच्या गालावर आमोदाच्या फवाऱ्याचा हात फिरविला तेव्हा बादशाही उत्सवाच्या प्रसंगाचे वर्णन करणाऱ्या अमिर खुश्रावच्या काव्याच्या दोन ओळी गायकांच्या ताफ्याने तालावर म्हटल्या. त्या ऐकून महमदशहाला अपरिमित आनंद झाला. तेव्हा त्याने मलिक सैफुद्दीन घोरी याला त्या ३०० गायकांच्या ताफ्याला विजयनगरच्या राजाच्या

खजिन्यावर बक्षिसादाखल हुंडया देण्याबाबतचा हुकूम देण्यास सांगितले. [२] ( ३०९) मलिक सैफुद्दीन याने जाणले की सुलतानाने घेतलेल्या दारुच्या धुंदीचा जो परिणाम त्याच्यावर झाला आहे त्यातूनच अशा तऱ्हेचा हुकूम देण्यास त्याने सांगितले आहे. तरी देखील सुलतानाच्या मनासारखे व्हावे म्हणून त्याने वरीलप्रमाणे हुंडया लिहून तयार केल्या परंतु त्या हुंड्यांची रवानगी मात्र त्याने केली नाही. सैफुद्दीन घोरीच्या त्या नंतरच्या एकंदर वागणुकीवरून खरे काय घडले असावे याबद्दल सुलतानाला संशय आला आणि त्याने दुसऱ्या दिवशी विजयनगरच्या राजाकडे हुंड्या पाठविण्यांत आल्या आहेत किंवा नाही याबाबत चौकशी केली. त्याला जेव्हा नकारार्थी उत्तर मिळाले तेव्हा तो उद्गारला तुला असे वाटते की माझ्या तोंडून जाणारा एकदेखिल शब्द हा कधिही निरर्थकपणे जातो ? मी तुला जो हुकूम दिला तो दारुच्या धुंदीत दिला नसून त्याच्या पाठीमागे अतिशय महत्वाची अशी योजना मी आखलेली आहे. हे ऐकल्यानंतर मलिक सैफुद्दीन याने त्यानुसार वरील कागदपत्रांवर शाही शिक्क्याचा ठसा उमटविला आणि ते कागदपत्र त्याने जलदगतीच्या हरकाऱ्यांबरोबर विजयनगरच्या राजाकडे रवाना केले. विजयनगरचा राजा हा स्वभावतःच अतिशय तापट होता आणि आपल्या स्वातंत्र्याचा त्याला अतिशय अभिमान वाटत असे. त्याने पैसे देण्याबद्दलचा हुकूम त्याच्यापुढे नजर करणाऱ्या हरकाऱ्याला गाढवावर बसविले आणि विजयनगरच्या सर्व भागातून त्याची धिंड काढली. त्याचा त्याने करता येईल तितक्या तऱ्हेने अपमान केला आणि त्याला उपहासात्मक अशी वागणूक दिल्यानंतर माघारी हाकलून दिले. यानंतर त्याने ताबडतोब आपल्या सैन्याला एकत्र जमण्याचा हुकूम दिला आणि बहमनी घराण्याच्या मुलुखावर हल्ला करण्यासाठी त्याने आपली तयारी कली. ही तयारी पूर्ण झाल्यानंतर त्याने १०००० घोडेस्वार, ३००० हत्ती आणि १००००० पायदळी सैनिक यांच्यासह अदोनी किल्ल्याच्या परिसरापर्यंत कूच केले आणि तेथून त्याने मुसलमानी राज्याचा प्रदेश उध्वस्त करण्यासाठी आपल्या सैन्याच्या तुकड्या रवाना केल्या.

(२९) यापूर्वी झालेल्या २ वर्षाच्या मोहिमेच्या थकव्यातून बिदर आणि वऱ्हाडच्या फौजांना अजून स्वस्थता मिळालेली नव्हती. त्यामुळे सद्यपरिस्थितीत सुलतानाने दौलताबाद येथील सैन्यासह निघून येण्यास खान महमद याला हुकूम पाठविला. याचवेळी त्याने आपला मुलगा राजपुत्र मुजाहिद शहा याला वेल्लूपट्टम [२] (३१०) येथील लुटीचा पाचवा हिस्सा देऊन सय्यद [२६] □ आणि धार्मिक मंडळीमध्ये हे द्रव्य वाटण्यासाठी म्हणून शेख महमद सिराजउद्दीन याजकडे पाठविले आणि काफरां-विरुद्धच्या लढ्यांत आपल्याला यश मिळावे यासाठी त्यांचे आशीर्वाद मागितले. त्याने याचवेळी कुलबर्ग्यातील सर्व धर्मनिष्ठ मंडळींना एकत्र जमविले आणि त्यांच्यासह तो शुक्रवारी मोठ्या मशीदीकडे गेला. तेथे त्याने मोठ्या धर्मशीलपणाचा आव आणून

इस्लामच्या सैन्याला विजय मिळावा यासाठी विशिष्ट तऱ्हेचे स्तवन करुन परमेश्वराचा धावा केला. नंतर त्याने कूच करण्यासाठी शुभ वेळ मुक्रर केली आणि आपली छावणी शहरा बाहेर टाकण्यांत यावी असा हुकूम केला.

(३०) दरम्यान विजयनगरचा राजा जरी मुसळधार पावसाळ्याला सुरुवात झाली होती आणि कृष्णानदी दुथडी भरुन वाहात होती तरी देखील मुद्गलच्या किल्ल्यासमोर दाखल झाला आणि त्याने किल्ल्याला वेढा दिला. किल्ल्यावरील शिबंदीत जेमतेम ६०० सैनिक होते आणि त्यांचे शौर्य वादातील होते. त्यांनी किल्ल्याचे रक्षण करण्यासाठी काहीही करावयाचे बाकी ठेवले नाही. किल्ल्याचा सुभेदार हा मलिक सैफुद्दीन घोरीचा नातेवाईक होता. त्याने पूर्वी आपल्या कडक वागणुकीमुळे शिबंदीतील शिपायांच्या मनात त्याच्याबद्दल घृणा निर्माण केली होती. साहजिकच त्यांच्यात असंतोषाची भावना निर्माण झाली आणि अधिकारी आपल्या कर्तव्यपालनात निष्काळजी राहू लागले. याचा परिणाम असा झाला की किल्ला शत्रूच्या हाती पडला. शत्रूने दीर्घद्वेषामुळे निर्माण झालेल्या क्रौर्याच्या भावनेच्या आहारी जाऊन किल्ल्यावरील सर्व पुरुष, स्त्रिया आणि मुले यांची कत्तल केली. यातुन अपवाद म्हणजे एकच मनुष्य वाचला आणि पळून येऊन या घटनेची हकीकत त्याने सुलतानाकडे नेऊन पोहोचविली.

(३१) या अनार्थाची बातमी कळताच महमदशहाला क्रोध आणि चीड यांनी घेरले आणि तो अगदी वेडापिसा झाला. त्याने ही बातमी घेऊन येणाऱ्या त्या दुर्दैवी हरकाऱ्याला ताबडतोब ठार करण्याचा हुकूम दिला. त्याने असे उद्गार काढले की आपल्या अनेक शूर सहकाऱ्यांची अशा तऱ्हेने निर्घृणपणे कत्तल झालेली पाहिल्यानंतर देखिल जिवंत रहाणाऱ्या पापी चांडाळाचे मी मुखावलोकन करणार नाही. त्याच दिवशी हिजरी ७६७ या वर्षाच्या जमादिलउल अव्वाल महिन्यात त्याने आपले [२] (३११) सर्व सैन्य एकठ्ठा जमा होण्याची वाट न पाहता कूच करण्यास सुरुवात केली. वाटेत त्याने अशी प्रतिज्ञा केली की मुद्गल येथे झालेल्या मुसलमानांच्या कत्तलीचा सूड म्हणून १००००० काफरांना कंठस्नान घातल्याखेरीज मी तलवार म्यान करणार नाही.

जमादिलउल अव्वाल हिजरी ७६७ जानेवारी इ. स. १३६८

(३२) तो जेव्हा कृष्णेच्या काठावर पोहोचला तेव्हा त्या कर्त्याकरवित्या परमेश्वराला साक्ष ठेवून आणि त्याला वैभवाला चढविणाऱ्या त्या परमेश्वराचे स्मरण करुन त्याने प्रतिज्ञा केली की समोर उभ्या टाकलेल्या शत्रूची पर्वा न करता नदी ओलांडून गेल्याखेरीज व परमेश्वराच्या आशीर्वादाने शत्रूचा पूर्णपणे धुव्वा उडवून मुद्गल येथे शहीद झालेल्या धर्मवीरांच्या आत्म्याला संतोष दिल्या खेरीज मी अन्नसेवन अथवा निद्रा निषिद्ध मानीन. यानंतर त्याने आपला मुलगा राजपुत्र मुजाहिदशहा याला आपला

बारस नेमले आणि आपल्या स्वारीतील २० खेरीज सोडून इतर सर्व हत्ती त्याच्या स्वाधीन केले. त्याने मुजाहिदशहाला रितीप्रमाणे उपदेशाचे दोन शब्द सांगितले आणि त्याची रवानगी कुलबर्ग्याकडे केली. नंतर त्याने ९००० निवडक घोडेस्वार घेऊन कृष्णा नदी पार केली.

(३३) विजयनगरचा राजा आपल्या जवळील ३०००० घोडेस्वार आणि शिवाय पायदळ इतक्या प्रचंड सेनासंभाराचे सामर्थ्य लक्षात न घेता इतका घाबरला की त्याने दुसऱ्या दिवशी सकाळी परिस्थिती ज्याप्रमाणे पलट खाईल त्यानुसार माघार घेण्याच्या तयारीने म्हणा किंवा महमदशहाशी मुकाबला करण्याच्या हेतूने म्हणा आपली सर्व संपत्ती आणि हत्तींचे दळ यांची रवानगी आपल्या राजधानीकडे केली. रात्र भयंकर वादळी होती आणि पाऊस मुसळधार पडत होता. त्यामुळे हत्ती आणि इतर मालवाहणारी जनावरे ही वारंवार चिखलात फसू लागली. छावणीपासून जेमतेम ४ मैल कूच करुन जाणे देखिल त्यांना अशक्य झाले. महमदशहाला हिंदूंच्या हालचालीची जेव्हा बातमी लागली तेव्हा आपली छावणी तशीच उभी ठेवून त्याने त्यांच्याविरुद्ध त्वरेने कूच केले. सकाळ उजाडता उजाडता तो विजयनगरच्या राजाच्या छावणी जवळ येऊन ठेपला. तो आल्याची बातमी जेव्हा विजयनगरच्या सैन्यात पसरली तेव्हा त्यांच्यामधे इतका भयंकर घबराट पसरला की कसलाहि [२] (३१२) विचार न करता अविचारी पणाने काफरांनी अदोनीकडे पळ काढला. आपले सर्व सामानसुमान त्यांनी पाठीमागे ठेवले विजयनगरच्या छावणीच्या बाजारपेठ आणि सामानसुमान ठेवण्याच्या भागावर महमदशहाने घसारा केला आणि कोणताहि भेदभाव न करता पुरुष, स्त्रिया, मुले, स्वतंत्र आणि गुलाम अशा एकंदर ७०००० माणसांना त्याने ठार मारले. तोहफत उस सलातीनच्या वृत्तान्ताप्रमाणे सुल्तानाच्या हाती जी लूट पडली त्यांत २००० हत्ती, ३०० तोफांचे गाडे [२७ ◻] आणि (batteringrams) धडक मारणारे एडके, ७०० अरबी घोडे आणि हिऱ्यांनी जडविलेले सिंहासन एवढी सामुग्री होती. याशिवाय इतर जे सामानसुमान छावणीत होते [२] (३१३) ते सैन्यातील इतर अधिकारी आणि शिपाई यांना लुटीचा भाग म्हणून देण्यांत आले. आपल्याला मिळालेला हा विजय म्हणजे पुढील विजयांचे सुचिन्हच आहे असे महमदशहाने मानले. यानंतरचा पावसाळा त्याने मुद्गलजवळ काढला. तेथे त्याला दौलताबादेहून खानमहमद हा कुमक घेऊन येऊन मिळाला. त्याला बरोबर घेऊन महमदशहाने अदोनी येथील काफरांच्या विरुद्ध चाल केली. तेथून तुंगभद्रा नदीच्या जवळच असलेल्या सपाट मैदानावर विजय नगरच्या राजाने आपले मोर्चे उभारले होते. अदोनीच्या किल्ल्याचे अधिकार त्याने आपल्या बहिणीच्या मुलाकडे सोपविले. या ठिकाणी त्याने आपले सैन्य प्रचंड संख्येने जमविले होते आणि आपल्या जवळील सर्व हत्ती

आणि लढाईसाठी आपल्याजवळ असलेली सर्व सामुग्री आणि युद्धसाहित्य एकत्र जमा केले होते.

(३४) खान महमदने दिलेल्या सल्ल्यावरून महमदशहाने अदोनीला वेढा दिला नाही. परंतु आतापर्यंत दक्षिणेच्या कोणत्याही मुसलमान सुलतानाने उपयोगात न आणलेले तोफखान्याचे प्रचंड दल त्याने एकत्र जमविले. त्या तोफखान्याच्या दलावर त्याने सफ्दरखानाचा मुलगा मुकर्रबखान याची अधिकारी म्हणून नेमणूक केली आणि गोलंदाजीच्या कलेत प्राविण्य असलेल्या अनेक तुर्की आणि युरोपियन गोलंदाजाना त्याला मदत करण्यासाठी त्याच्या हाताखाली दिले. सैन्याची जेव्हा जेव्हा छावणी पडे तेव्हा तेव्हा चोरट्यांचे थवे रात्रीच्या वेळी छावणीत चोरुन शिरत असत आणि सैनिक आणि घोडे याना ठार करत आणि पंगू करत असत. तसे आपल्या छावणीत होऊ नये म्हणून विजयनगरच्या राजाच्या छावणीतून लुटलेले हत्ती महमदशहाने कुलबर्ग्याकडे पाठविण्याची आपल्या अधिकाऱ्यांना आज्ञा दिली. त्याचप्रमाणे त्याने आपल्या सर्व अधिकाऱ्यांना सांगितले की अगदी जरुर असेल तेवढे सामान सोडून बाकीचे तुमचे सर्व सामान तुम्ही वरील हत्तींप्रमाणेच कुलबर्ग्याला पाठवून द्या. यानंतर त्याने तोफखान्याचे मोर्चे साऱ्या छावणी भोवती उभारले आणि तोफा मजबूत दोरखंड आणि साखळदंड यांनी बांधून टाकल्या. रात्रीच्या वेळी त्याने गस्तगिरांचा पहारा नियमितपणे सुरु केला.

(३५) यानंतर थोडयाच कालावधीने सुलतानाने तुंगभद्रा नदी ओलांडून विजयनगरच्या प्रदेशांत प्रवेश केला. खुद्द जातीने विजयनगरवर आक्रमण करणारा महमदशहा हा पहिलाच मुसलमान सुलतान होय. विजयनगरचा राजा [२] (३१४) कृष्णराय याला ही बातमी कळली तेव्हा त्याने आपल्या दरबारातील सरदारांना बोलावणे पाठविले आणि मुसलमानांना प्रतिकार करण्यासाठी कोणती सर्वोत्कृष्ट योजना अमलांत आणावी याबद्दल त्यांच्याशी विचारविनिमय केला. सर्वानुमते असे ठरले की राजाचा मातुल आणि विजयनगरच्या सैन्याचा सेनापति भोजमल याने युद्धाची सूत्रे हाती घ्यावी. भोजमल याला कोणतीहि गोष्ट अतिरेकाला नेण्याची संवय होती. त्याने युद्धाबाबतचे सर्वाधिकार आपल्याला मिळाल्यावर राजाला विचारले की मुसलमानांच्या सुलतानाला कैदी म्हणून मी तुमच्या समक्ष जिवंत आणू कीं भाल्यावर ठेवलेले त्याचे मस्तक मी आपल्याला नजर करू. कृष्णरायाने उत्तर दिले की कोणत्याही परिस्थितीत जिवंत शत्रू कैदी म्हणून का होईना समोर येणे हे मला तरी इष्ट वाटत नाही. तेव्हा तो तुझ्या हाती लागल्याबरोबर तू त्याला ठार मारावेस अशी माझी इच्छा आहे. राजाने यानंतर भोजमलला निरोप दिला. भोजमलने महमदशहाबरोबर युद्ध करण्यासाठी म्हणून ४००० घोडेस्वार आणि ५००००० पायदळी फौज बरोबर घेऊन कूच केले. त्याने सैन्यामधील ब्राम्हण धर्मगुरुना आज्ञा केली की तुम्ही सैनिकामधील उत्साहाला उधाण

आणण्यासाठी मुसलमानांची कत्तल करण्यामधे किती पुण्यसंचय सांठविलेला आहे याबाबत सैनिकांमध्ये व्याख्याने द्या. भोजमलने त्याचप्रमाणे ब्राम्हणांना चेतावणी दिली की तुम्ही काहीही करून शत्रूविरुद्ध सैनिकांच्या मनांत क्रोध उत्पन्न करा आणि मुसलमानाविरुद्ध त्यांच्या मनांत जो विव्देषाचा वन्ही पेटलेला आहे त्यांत भर पडेल असे करा. हे करण्या-साठी म्हणून मुसलमान हे देवळांचे भंजक आणि आपल्या पवित्र देवांच्या मूर्तिचा विध्वंस करणारे आणि त्याशिवाय गायींची कत्तल करणारे आहेत असे चित्र त्यांच्या डोळ्यांसमोर उभे करा. [२८] □

(३६) इकडे कूच करीत महमदशहा हिंदूंच्या छावणीपासून १५ कोसांच्या अंतरावर येऊन पोहोचला. तेव्हा त्याने आपला सेनापति खान महमद याला आपले सैन्य एकत्रा करण्याची आज्ञा दिली. एकंदर सैन्य १५ हजार घोडेस्वार आणि ५०००० पायदळ एवढे भरले. त्यापैकी १०००० घोडेस्वार, ३०००० पायदळ [२] (३१५) आणि त्याशिवाय तोफखाना एवढ्या दळाने खान महमद याच्या हाताखाली कूच केले.

| | |
|---|---|
| जिलकाद १४<br>हिजरी ७६७<br>आगस्ट २२<br>इ. स. १३६६ | १४ जिलकाद रोजी दोन्ही फौजांची गाठ पडली आणि युद्धाला तोंड लागले. सकाळी उजाडल्यापासून तो सूर्य अस्तंगत होईपर्यंत युद्धाची रणधुमाळी चालू होती. दोन्ही बाजूकडील अनेक सैनिक ठार मारले गेले. खान महमदच्या उजव्या |

आणि डाव्या फळीचे अधिकारी अनुक्रमे मुसाखान आणि इसाई खान हे होते. दोघेजण धारातिर्थी पतन पाऊन हौतात्म्य पावले आणि त्यांच्या फौजांची वाताहात झाली. या दुर्दैवामुळे मुसलमानी सैन्यावर जवळजवळ नाशाची कठोर कुऱ्हाडच जणू काही पडणार असे वाटू लागले. या सुमारास महमदशहा ताजा दमाच्या ३००० घोडेस्वारांना घेऊन रणांत घुसला आणि त्याने गलितधैर्य झालेल्या खान महमदला धीर दिला आणि त्याच्या विस्कळीत झालेल्या सैनिकांना दिलासा दिला. विखुरले गेलेले हे सैनिक सावरले आणि महमदशहाला येऊन मिळाले.

(३७) दरम्यान मुकर्रब खानानें आपल्या तोफखान्याच्या भडीमाराने शत्रूमधे गोंधळ निर्माण करुन शत्रूचे मोर्चे थोडेफार उध्वस्त केले होते. त्याने शत्रूवर हल्ला करण्याची आणि घोडदळाच्या मदतीने शत्रूवर हल्ला चढवून शत्रूचा पार निःपात करण्यासाठी सुलतानाची आज्ञा मागितली. खान महमदने त्याच्या मदतीसाठी म्हणून फौजेतील अनेक अधिकाऱ्यांना आपली पथके बाजूला काढण्यास सांगितले. मुकर्रब खानानें आपल्या मदतीसाठी आलेल्या या पथकांना घेऊन शत्रूवर हल्ला करण्यासाठी झपाट्याने कूच केले. त्याने शत्रूची इतकी धुळधाण उडविली की शत्रूजवळ तलवारी आणि जंबिये यासारखी छोटी शस्त्रे सोडून लढण्यासाठी दुसरी काहीच हत्यारे आणि युद्धसाहित्य उरले नाही. याचवेळी खान महमदचा शेरशिकार [२९] □ नावाचा हत्ती

मस्त झाला आणि शत्रूच्या मोर्चाच्या मध्यभागी तो घुसला. त्याला भोजमलच्या [३०] × हत्तीने आडवे येऊन थांबविले, पण त्यांत भोजमलच्या हत्तीचा माहूर ठार झाला. खान महमद हत्तीच्या पाठोपाठ ५०० घोडेस्वार घेऊन पुढे घुसून गेला आणि त्याच-वेळी शत्रूच्या हत्तींनी पलट खाऊन आपल्या मोर्चाकडे तोंड फिरविले आणि मोर्चे धरुन बसलेल्या सैनिकांत एकच गोंधळ माजवून दिला. भोजमल याला प्राणांतिक जखम झाली. त्याला रणांगणातून बाहेर काढून नेण्यांत आले. त्याच्या अनुयायांनी या नंतर कसलाच प्रतिकार केला नाही. आपल्या फौजेची मधली फळी मोडून [२] (३१६) पडली हे जेव्हां काफरांनी बघितले तेव्हा त्यांनी सर्वदूर पळापळीला सुरुवात केली. मुसलमान सैनिकांच्या तलवारी नुकत्याच म्यान झाल्या होत्या तोच, महमदशहा रणांगणावर आला आणि त्याने काफरांची सर्रास कत्तल करण्याचा हुकूम दिला. या आज्ञेचे पालन इतक्या अवैधपणे करण्यात आले की मुसलमानी सैनिकांच्या तलवारीच्या तडाख्यातून गरोदर स्त्रिया आणि अंगावर पिणारी लहान लहान बालके देखिल निसटून जाऊ शकली नाहीत. महमदशहा यानंतर एक आठवडाभर रण मैदानावर मुक्काम करुन राहिला आणि त्याने आपल्या विजयाच्या हकीकतीचे वृत्तान्त आपल्या राज्याच्या कानाकोपऱ्यातून जाहिर केले. त्याने जी प्रतिज्ञा केली होती ती पार पाडण्यासाठी म्हणून तो कृष्णरायाच्या छावणीवर चाल करुन गेला. महमदशहा बरोबर लढा देण्याइतके सामर्थ्य आपल्या-मधे नाही याची जाणीव त्याला झाली आणि त्याने माघार घेऊन जंगलाचा आणि डोंगराळ मुलुखाचा आश्रय घेतला. जवळ जवळ तीन महिने सुलतानाने त्याचा या ठिकाणाहून त्या ठिकाणापर्यंत पाठलाग केला आणि वाटेत कोण-त्याही प्रकारचा भेदभाव न दाखविता जो जो म्हणून वाटेत भेटेल त्याला त्याने यमसदनी पाठविले. सरतेशेवटी कृष्णरायाने आपले राजधानीचे शहर विजयनगर येथे स्वतःला कोंडून घेतले. थोडयाच अवधीत शहराच्या नजिक सुलतान आपल्या सैन्या-सहवर्तमान येऊन पोहोचला. तेथे त्याचा काफरांच्या सैन्याने खूपच पिच्छा पुरविला. रात्रभर त्याच्या छावणीभोवती ते घिरट्या घालत. दिवसाउजेडी त्याच्यावर हल्ला करण्याचे धाडस त्यांना होत नसे. असे होताहोता एक महिना गेला. तेव्हा सुलतानाला विजयनगर काबीज करणे अशक्य आहे असे दिसून आले एवढेच नव्हे तर शत्रुला त्याच्या मोर्चाबाहेर युद्धासाठी घुमवत आणणेंहि कठीण आहे ह्याबद्दल त्याची खात्री झाली. तेव्हा सुलतानाने आपण भयंकर आजारी पडल्याची आवई उठविली आणि माघार घेण्याचा हुकूम सोडला. याप्रमाणे त्याच्या सैन्याने आपला तळ उठविला. कृष्णराय आपल्या सैन्यासहित शहरातून बाहेर पडला आणि त्याने सर्व बाजूनी एकच हाकाटी केली की तुमचा सुलतान मरून पडला आहे, आमच्या ब्राम्हणानी केलेली प्रार्थना परमेश्वराने ऐकली आहे आणि आता तुमच्यापैकी एकालाहि आम्ही आमच्या

ताबडीतून सुटून जाऊ देणार नाही. अशा तऱ्हेने सुलतानाच्या फौजेने तुंगभद्रा नदी ओलांडली आणि त्याच्या पाठोपाठ शत्रूचे सैन्य पाठलाग करून आले. अखेर सुलतानाने एका मोकळ्या मैदानावर छावणीची जागा मुक्रर करून आपल्या सैन्याला [२] (३१७) मुक्काम करण्याची आज्ञा दिली. कृष्णरायानेही त्याच्या तळापासून थोडयाशाच अंतरावर आपले मोर्चे उभे केले. आपल्या मनातील उद्देशाप्रमाणे प्रतिज्ञापूर्ति करण्यासाठी ही योग्य संधि आली आहे असा महमदशहाने विचार केला. आपली प्रकृति अतिशय उत्तम आहे ह्याबद्दल आपल्या अधिकाऱ्यांची खात्री पटविण्यासाठी त्याने एक जाहीर दरबार भरविला. महमदशहाने आपला उद्देश साध्य करण्यासाठी जो डाव रचला होता त्याबद्दल यत्किंचितही कल्पना नसल्यामुळे महमदशहाचे अधिकारी नाऊमेद झाले होते आणि म्हणूनच वरील दरबार त्याने भरविला. यानंतर आपल्या अंगात अतिशय अशक्तपणा आला आहे या मिषाखाली महमदशहा विश्रांतीसाठी लवकर परतला आणि त्याने आपल्या खाजगी बैठकीच्या खोलीत आपल्या प्रमुख सेनापतिंना बोलावणे पाठविले. त्याने त्यांना आज्ञा दिली की तुम्ही तुमच्या सैनिकांना शस्त्रसज्ज करा आणि विशिष्ट ठिकाणी माझ्या हुकूमाची वाट पाहात रहा. या नेमून दिलेल्या ठिकाणी तो मध्य रात्रीच्या वेळी सैन्यासह गेला. तेथे त्याने आपल्या फौजेची निरनिराळ्या तुकडयांत विभागणी करुन प्रत्येक अधिकाऱ्याच्या हाताखाली एक तुकडी दिली आणि शत्रूच्या छावणीवर अचानक हल्ला करून त्याला चकित करण्याचे उद्देशाने त्याने कूच केले.

(३८) कृष्णराज आणि त्याचे अधिकारी यांनी रात्र दारु पिण्यात आणि नर्तकी आणि गायक यांच्या संगतित घालविली होती. ते सर्वजण अतिशय दमून गेले होते आणि झोपेने त्यांना पूर्णपणे घेरले होते. या त्यांच्या धुंदीतुन सकाळ उजाडल्याबरोबर मरणाऱ्यांच्या वेदनापूर्ण किंकाळ्यांनी आणि स्वर्गापर्यंत ज्यांचा आवाज पोहोचत होता अशा इस्लामच्या शूर वीरांच्या रणगर्जनांनी त्यांना अचानक जागे केले. भितीने घाबरुन ज्यांचे धैर्य लोपून गेले आहे अशा आपल्या शिपायांमधे आत्मविश्वास निर्माण करणे हे कठिण आहे असे आढळून आल्याने कृष्णरायाने पळ काढला आणि आपल्या राजधानीला पोहोचेपर्यंत त्याने आपल्या घोड्याचे लगाम खेचून त्यांना थांबविले नाही. या प्रसंगी महमदशहाने शत्रूची छावणी लुटली तेव्हा त्याच्या पदरी अपार लूट पडली. पाठलागांत शत्रूचे एकंदर १०००० सैनिक मारले गेले परंतु शत्रूवर सूड घेण्याची सुलतानाची राक्षसी रक्त पिपासा अजून शमली नव्हती. त्यामुळे त्याने विजयनगर सभोवार वसलेल्या प्रत्येक गावातील नागरिकांची कत्तल करण्यांत यावी असा हुकूम दिला. राज्यातील ब्राम्हण आणि मुख्य मुख्य हिंदू अधिकारी यांनी हा भयंकर नाश ओढविलेला जेव्हा बघितला तेव्हा ते कृष्णरायाविरुद्ध बंड करुन उठले.

त्यांनी अशी तक्रार करावयास सुरवात केली की कृष्णरायाची कारकिर्द अशुभ सूचक आहे. त्याच्या कारकिर्दीत आमचा मानभंग झाला; जवळजवळ दहा हजार ब्राम्हण अगोदरच ठार मारले गेले आहेत आणि हे असेच चालू राहिले तर नागरिकांपैकी एकही शिल्लक राहणार नाही. यावर कृष्णरायाने उत्तर दिले की तुमच्या सल्ल्याशिवाय मी एकहि गोष्ट केलेली नाही. परंतु नशिबांत जे काही वाढून ठेवले [२] (३१८) आहे त्याचे नियमन करण्याची शक्ती माझ्यामध्ये नाहीं आणि म्हणून तुमची जी काही इच्छा आहे त्याप्रमाणे करण्याची माझी तयारी आहे. यावर त्यांनी सांगितले की तुम्ही तुमच्या वडीलांनी ज्याप्रमाणे केले त्याप्रमाणे मुसलमांना बरोबर शांततेचा तह घडवून आणा. यानुसार कृष्णरायाने सुलतानाकडे आपले वकील रवाना केले. त्यांच्या बरोबर निरोप पाठवून त्याने आपल्या हातून झालेल्या चुका कबूल केल्या आणि आपल्याला क्षमा करण्यात यावी अशी याचना केली. परंतु महमदशहाने त्याच्याकडे आलेल्या वकिलांनी तहाची जी विनंती केली होती त्याबाबत एक शब्दहि ऐकून घेण्याचे नाकारले.

(३९) या सुमारास सुलतानाच्या मर्जीतला एक खास अधिकारी म्हणाला की आपण एक लक्ष हिंदूंना ठार मारण्याची प्रतिज्ञा केली आहे, त्यांची सारी जात नाहीशी करुन टाकण्याची नव्हे. यावर सुलतानाने उत्तर दिले की मी जितक्या हिंदूंना ठार मारण्याची प्रतिज्ञा केली होती त्याच्या दुप्पट जरी हिंदू ठार मारले गेले असले तरी देखिल मी गायकांच्या नावे ज्या हुंडया विजयनगरच्या राजाच्या नावे काढल्या आहेत त्या त्याने वटविण्याचा हुकूम दिल्या खेरीज मी तहाला कबुलीही देणार नाही किंवा त्याच्या रयतेच्या प्राणांची कदरही करणार नाही. विजयनगरच्या वकिलांना कृष्णरायाने सर्वाधिकार दिलेले होते. त्यामुळे वरील गोष्टीला त्यांनी ताबडतोब कबुली दिली इतकेच नव्हे तर हुंडीवरील रकमे इतके द्रव्य देखील त्यांनी लगेच त्याचक्षणी भरले. महमदशहा यावर म्हणाला धन्य त्या परमेश्वराची कारण मी जे मनांत योजून त्यावर जी आज्ञा दिली होती त्याप्रमाणे घडून आले आहे. इतिहासाच्या पानामध्ये माझ्या तोंडून हलका शब्द गेल्याची नोंद मी होऊन देणार नाही तर मी दिलेल्या शब्दाप्रमाणे वागेन.

(४०) सुलतानाच्या मनासारखे होऊन तो खुष झाला आहे असे जेव्हा वकिलांनी पाहिले तेव्हा त्यांनीं जमिनी पर्यंत आपली मस्तके वाकवून त्याला मुजरे केले आणि आमच्या तोंडून चार शब्द आपण ऐका अशी त्याला विनंती केली. त्यांना बोलण्याची परवानगी देण्यात आल्यावर ते म्हणाले की अपराध्याच्या गुन्ह्यांबद्दल निरापराध आणि विशेषतः अगतिक स्त्रिया आणि मुले यांना शासन केले जावे असे कोणत्याच धर्मात सांगितले नाही. जर का कृष्णरायाचा अपराध असेल तर त्याने केलेल्या चुकाबाबत गरीब आणि दुबळी अज्ञान मंडळी त्यांच्या गुन्ह्यांत सामील आहेत

असे होत नाही. महमदशहाने उत्तर दिले की जे काही घडून आले ते परमेश्वरी इच्छेप्रमाणेच झाले आणि त्यामध्ये बदल करण्याची शक्ती माझ्यामध्ये नाही. यावर विजयनगरचे वकील असे बोलते झाले की राज्ये निर्माण करणाऱ्या त्या परमेश्वराने दक्षिण देशाचे राज्य आपल्याला बहाल केले. त्यामुळे कर्नाटकचे राजे [ २ ] ( ३१९ ) आणि आपले वारस हे यापुढे बराच काळपर्यंत परस्परांचे शेजारी राहण्याची शक्यता निर्माण झाली आहे. साहजिकच दोन्ही राज्यांत युद्धप्रसंग ओढवला असताना क्रौर्याची वागणूक परस्परांनी एकमेकांना देणे हे टाळले पाहिजे असे आम्हाला वाटते. तेव्हा आमची अशी योजना आहे की भविष्यकाळात दोन्ही राज्यांमध्ये युद्धे झाल्यास परावलंबी आणि निःशस्त्र अशा नागरिकांची विनाकारण कत्तल न करण्याबद्दल दोन्ही राज्यांत तह व्हावा. महमदशहाची या योजनेच्या चांगल्या स्वरूपाबद्दलची लगोलग खात्री पटली आणि त्याने अशी प्रतिज्ञा केली की विजय मिळाल्यानंतर एकाही शत्रूचा मी वध करणार नाही आणि याचप्रमाणे वर्तन करण्याचे बंधन मी माझ्या मागून राज्यावर येणाऱ्या वारसावर घालीन. त्यानंतर त्यावेळेपासून आजतागायत दक्षिणेमध्ये सर्वसाधारणपणे अशी प्रथा पडून गेली आहे की युद्धामध्ये पकडल्या गेलेल्या कैद्यांना प्राणदान करावे आणि शत्रूचे जे निःशस्त्र प्रजाजन असतील त्यांच्या रक्ताने भूमी लांछित करू नये. महमदशहा याप्रमाणे आपल्या मनाचे समाधान झाल्यावर कुलबर्ग्याला परतला. वाटेत त्याने शेख सिराजउद्दीन याचे दर्शन घेतले. कारण त्याला हिंदूंवर जो जय मिळाला होता त्याचे श्रेय त्याने शेखने त्याच्यासाठी केलेल्या प्रार्थनेला आणि त्याचप्रमाणे त्याने आपल्या आईबरोबर मक्का येथे दान म्हणून देण्याकरता ज्या रकमा पाठविल्या होत्या त्याला दिले होते.

(४१) राजधानीला परतल्यावर महमदशहा जेमतेम पाच दिवस राजधानीला राहिला नाही तोच त्याला दौलताबादच्या बाजूला तेथे झालेल्या बंडाचा उपशम करण्यासाठी चालून जाणे भाग पडले. विजयनगरहून परतताना सुलतानावर आजारपण ओढवलेले होते याच वेळी शत्रूने त्याच्यावर चढाई करून त्याला आपल्या कचाट्यात पकडले होते. साहजिकच त्याचा मृत्यू झाला असल्याबद्दलची आवई उठली होती. तिचा फैलाव राज्याच्या प्रत्येक कानाकोपऱ्यात झाला होता आणि त्यामुळे राज्याच्या निरनिराळ्या भागांत अंदाधुंदीचे वातावरण निर्माण करण्यास अनेक बंडखोरांना फावले. या बंडखोरांमध्ये बैरामखान माजिंदरानी हा होता. त्याला अल्लाउद्दीन हसनशहाने आपल्या मुलाप्रमाणे मानले होते. त्यावेळी दौलताबादच्या प्रदेशात जवळजवळ एकही सैनिक नव्हता. त्याचा फायदा घेऊन नाईकांचा प्रमुख गोविंद देव [३१□] मराठा याजबरोबर त्याने संगनमत केले आणि बंडाची निशाणी उभारली. वऱ्हाडमधील काही [२] (३२०) प्रमुखांनी गुप्तपणे त्याच्या मदतीसाठी फौजा रवाना केल्या. बागलाणाच्या राजानेही त्याला मदत पाठविली. आपल्याला मिळालेल्या विजयाचा त्याला गर्व चढला आणि त्याने महरठ [३२□] आणि वऱ्हाडचा काही वर्षांचा वसूल बळकाविला. हा वसूल महमद-

शहाने दौलताबादच्या किल्ल्यात साठवून ठेवला होता. या वसुलाच्या द्रव्यातून त्याने सैन्याची उभारणी केली. महरठच्या देशातील बहुतेक शहरे आणि जिल्हे त्याच्या हाती पडले. आपल्या अनुयायांमध्ये त्याने या प्रदेशाची विभागणी केली. थोड्याच काळाच्या अवधित याप्रमाणे बंडखोर बैरामखानाजवळ १०,००० घोडेस्वार, आणि पायदळ एवढे सैन्य जमा झाले.[३३]*

( ४२ ) यावर महमदशहाने बैरामखानाला पुढीलप्रमाणे पत्र लिहिले : मी मृत झाल्याची बातमी तुला कळली. दुष्ट प्रवृत्तीच्या तुझ्या सभोवतालच्या मंडळींनी तुझ्यापुढे नाना तऱ्हेची आमिषे उभी केली. त्याला बळी पडून तू बंडाला प्रवृत्त झालास. तू जर आपण पुन्हा एकनिष्ठ राहू असे वचन देत असलास तर तू आणि तुझे अनुयायी यांना मी क्षमा करीन. बैरामखानाने शरण यावे म्हणून त्याचे मन वळविण्यासाठी दरबारातून महमदशहाने सय्यद जमालुद्दीन आणि शहा मलिक यांची खास नियुक्ती केली होती. त्यांनी वरील पत्र बैरामखानाकडे पोहोचविले. सुलतानाचे पत्र मिळाल्यावर बैरामखानाने गोविंद देवाबरोबर सल्लामसलत केली. गोविंद देवाने असा सल्ला दिला की महमदशहा हा स्वभावतःच तापट आहे आणि आपल्या सत्तेची अतिशय काटेकोरपणे जपणूक करणारा आहे. आपण त्याच्या आज्ञांचा भंग करून आणि शिस्तीबाहेर वर्तन करून त्याला दुखावलेले आहे. अशा परिस्थितीत त्याच्या दया बुद्धीवर विसंबून राहणे कोणत्याही परिस्थितीत शहाणपणाचे आहे असे मला वाटत नाही. म्हणून माझ्या मते आपल्या ताब्यात आज दौलताबादसारखा किल्ला आहे आणि बागलाणचा [ २ ] (३२१) राजा आणि वऱ्हाडचे अमीरउमराव यांनी आपल्याबरोबर हातमिळवणी केली आहे, तेव्हा आता पाऊल मागे घेणे शहाणपणाचे ठरणार नाही इतकेच काय परंतु आपले बेत सिद्धीस जाण्यासाठी सर्व तऱ्हेची उपाययोजना करणे आणि आपले स्वातंत्र्य सुरक्षित करून घेणे ह्याचीच जरूर अधिक आहे असे मला वाटते. बैरामखानाने एकंदर परिस्थितीची जी सांगोपांग कारणमीमांसा गोविंद देवाने केली तिचा स्वीकार केला आणि सुलतानाने दिलेल्या तंबीला धाब्यावर बसवून युद्धाच्या दृष्टीने पुढे पाऊल टाकण्यासाठी सर्वतोपरी तयारी करण्यास सुरुवात केली. परिणामी सय्यद जमाळउद्दीन आणि शहा मलिक हे सुलतानाकडे परत फिरले आणि त्यांनी ज्या कार्यसिद्धीसाठी आपण गेलो होतो ती कशी असफल झाली त्याचा इतिवृत्तान्त सुलतानापाशी सादर केला.

( ४३ ) या शिरजोरीच्या वर्तनामुळे महमदशहा अतिशय संतप्त झाला आणि त्याने आपले दोन अधिकारी मसनदअली आणि खानमहमद हे आपले बहुतेक सैन्य बरोबर देऊन उत्तरेच्या दिशेने रवाना केले. त्यांच्या पाठोपाठ लगोलग निघण्याचाही त्याने निश्चय केला. बैरामखान ह्याने देखील गोविंद देव आणि वऱ्हाडचे अनेक अमीर व बागलाणचा राजा यासहवर्तमान पैठणकडे कूच केले. तेथे त्यांनी भरमसाट आमिषे दाखवून कोणतेही धाडसी कृत्य करण्यास तयार असलेल्या अनेक गरजू माणसांची एक भलीदांडगी फौज जमविली. मसनदअली हा महमदशहाचा एक जुनापुराणा आणि

अनुभवी कसलेला सेनानी होता. बंडखोरांबरोबर सामना देण्याची घाई करणे अयोग्य आहे असा विचार त्याने केला आणि त्याने शेवगाव येथे आपली छावणी केली. बैरामखानाने तेथे त्याच्यावर अचानक हल्ला करून त्याला चकित करण्याचा प्रयत्न केला परंतु त्याला तोंड देण्यास सुलतानाची फौज सज्ज आहे असे जेव्हा त्याने पाहिले तेव्हा आपला उद्देश सिद्धीस न गेल्यामुळे त्याला माघार घ्यावी लागली. तर इकडे मसनदअलीने शत्रूवर हल्ला करण्याचे ठरविले आणि आपला उद्देश त्याने महमदशहाकडे कळविला. महमदशहा त्यावेळी सरहद्दीवर असलेल्या डोंगराळ विभागात शिकार करण्यामध्ये गुंतला होता. आपल्या सेनापतीकडून आलेले पत्र मिळताच सुलतानाने त्याच्याबरोबर असलेल्या कुल ३०० अनुयायांना बरोबर घेऊन कूच करण्याची तयारी केली. त्याच्याबरोबर असलेल्या वजिरांनी असे करण्यामुळे महमदशहाच्या जीवाला धोका पोहोचेल याची भीती वाटून त्याला असे सांगितले की मसनदअलीने आपल्याकडे जे खलिते पाठविले आहेत त्यावरून असे दिसते की बंडखोर मोठ्या संख्येने जमा झाले आहेत. तेव्हा सावकाशपणे आगेकूच करून जाणे हे शहाणपणाचे ठरेल. असे केल्याने [२] (३२२) मुख्य सैन्याला शत्रूवर परिणामी हल्ला करण्याच्या दृष्टीने तुमच्याबरोबर हातमिळवणी करण्यासाठी म्हणून भरपूर अवधी मिळेल. यावर बादशहाने उत्तर दिले की, तुम्ही जे काही भाष्य केले आहे त्यात थोडाफार तथ्यांश आहे यात काहीच शंका नाही. परंतु तरीदेखील माझा निश्चय कायम आहे कारण माझ्याबरोबर केवळ १००० घोडेस्वार असताना मी तेलंगणाच्या अगदी अंतर्भागापर्यंत घुसून मजल मारली होती आणि शत्रूला शासन केले होते. त्याचप्रमाणे निव्वळ ९००० हजार सैनिकांसमवेत मी विजयनगरच्या सैन्याला चेपत चेपत डोंगरांच्या आणि जंगलाच्या प्रदेशात नेले होते आणि विजयी होत्साता परतलो होतो. तेव्हा आता माझ्याबरोबरचे ३०० सैनिक हे थोड्या थोडक्या बंडखोरांना वठणीवर आणण्यास पुरेसे आहेत. एवढे बोलून तो आपला आवडता घोडा शब्दिज याच्यावर स्वार झाला आणि त्याने एवढ्या झपाट्याने मजल मारली की ज्यावेळी मसनदअली बंडखोरांबरोबर टक्कर घेण्याच्या बेतात होता त्याचक्षणी तो पैठण येथे येऊन पोहोचला. सुलतान स्वतः चाल करून आल्याची बातमी ताबडतोब सर्वदूर झाली त्याबरोबर बागलाणाच्या राजाने आपल्या घोड्याला टाच मारली आणि बंडखोरांना सोडून तो पळाला. त्याच्या पाठोपाठ त्याचे सर्व अनुयायी रणांगण सोडून निघून गेले. आपल्या दोस्ताने रणांगणातून अशा तऱ्हेने पळ काढल्यामुळे गोंधळून जाऊन बैरामखान आणि गोविंद देव हे दोघेजण धनुष्याची प्रत्यंचा खेचून सुलतानाच्या फौजेवर एकही बाण न टाकता रणमैदान सोडून पळून गेले. त्यांनी दौलताबादच्या किल्ल्याचा आश्रय घेण्याच्या हेतूने त्वरेने तिकडे कूच केले. सुलतानाची फौज शत्रूची छावणी लुटण्यात दंग असताना सुलतान ७० सैनिक आणि काही हत्ती घेऊन दाखल झाला आणि त्याने दुसऱ्या दिवसापर्यंत तेथे मुक्काम केला. विजयी झालेल्या सैनिकांवर त्याने मानमरातबाची खैरखैरात करून आपल्याला झालेली खुषी

व्यक्त करून दाखविली. सकाळी त्याने इतक्या वेगाने कूच केले की संध्याकाळ होण्याच्या आत तो दौलताबादसमोर येऊन उभा ठाकला आणि किल्ल्याला वेढा देण्याच्या दृष्टीने त्याने उपाययोजना केली.

( ४४ ) बैरामखान आणि गोविंद देव अशा तऱ्हेने आपल्या महत्त्वाकांक्षेच्या स्वप्नातून खडाडून जागे झाले आणि आपण आता करावे तरी काय अशा संभ्रमात पडले. रात्रीच्या वेळी ते किल्ला सोडून बाहेर पडले आणि शेख ऐनउद्दीन याला भेटण्यासाठी त्याच्या निवासस्थानाकडे जाऊन त्याचा त्यांनी सल्ला मागितला. [ २ ] ( ३२३ ) शेखने त्यांना सांगितले की किल्ल्याचा आसरा घेणे आणि त्यांत आपणाला बंद करून घेणे हा शहाणपणाचा मार्ग आहे असे मला वाटत नाही. तुम्ही आपली बायका आणि मुले घेऊन किल्ल्याबाहेर पडा आणि तुमच्या मालमत्तेची पर्वा न करता परिस्थिती अजून तुमच्या आवाक्यातील आहे तोपर्यंत गुजरातेच्या दिशेने पलायन करून स्वतःची सुटका करून घ्या. शेख ऐनउद्दीन याने केलेल्या उपदेशाप्रमाणे वागण्याचे त्यांनी ठरविले आणि त्याप्रमाणे आपल्या कुटुंबीय मंडळींना त्यांनी निरोप पाठवून ताबडतोब उशीर न लावता शेख ऐनउद्दीन याच्या घरी निघून येण्यास सांगितले. बैरामखान आणि गोविंद देव यांच्या स्त्रियांच्या कानावर एकंदर परिस्थितीबद्दल थोडीफार कुणकुण आली होती. त्याप्रमाणे त्यांनी आपल्याबरोबर घोडे आणि प्रवासासाठी लागणारे इतर आवश्यक सामानसुमान आणले. शेख ऐनउद्दीन याने बैरामखान आणि गोविंद देव यांच्या मस्तकांवर आशीर्वाद निदर्शक हात ठेवले आणि त्यांना जाण्याची परवानगी दिली. त्यावेळी त्याने उद्गार काढले की परमेश्वराच्या कृपेने तुम्ही सुरक्षित राहाल. शेख ऐनउद्दीन याच्या उपदेशाप्रमाणे त्यांनी दोघांनी गुजरातेचा मार्ग स्वीकारण्यासाठी कूच केले.[३४*]

(४५) दुसऱ्या दिवशी सकाळी ते दोघेजण पळून गेल्याची बातमी महमदशहाच्या कानी पडल्यावर त्याने ४०० घोडेस्वार घेऊन त्यांचा पाठलाग केला. परंतु त्यांना गाठू न शकल्यामुळे अतिशय चिडलेल्या मनस्थितीत तो दौलताबादला परतला आणि आपल्या सर्व रागाचे उट्टे त्याने शेख ऐनउद्दीन याच्यावर काढले. यापूर्वीच त्याचा शेख ऐनउद्दीन याजबरोबर बेबनाव झाला होता. त्याची हकीकत पुढे दिली आहे. सिंहासनावर आल्यानंतर महमदशहाने आपल्या राज्यातील सर्व अवलियांच्याकडून त्याजबरोबरच्या एकनिष्ठेच्या शपथेची मागणी केली होती. शेख ऐनउद्दीन सोडून इतर सर्व जणांनी तशी शपथ घेतली होती. सुलतान हा दारू पीत असल्यामुळे आणि धर्माने निषिद्ध मानलेल्या गोष्टीबाबत अतिरेकी वर्तन करण्याचा अपराध त्याच्या हातून घडल्याने ऐनउद्दीन याने शपथ घेण्याचे नाकारले होते. या प्रसंगी सुलतानाने ऐनउद्दीन याजकडे निरोप पाठवून त्याला आपल्या समक्ष हजर राहण्याचा आणि आपल्याशी राजनिष्ठ राहण्याची शपथ घेण्याचा अथवा स्वतःच्या हस्ताक्षरात आपण तुमच्याबरोबर एकनिष्ठ राहू असे आश्वासन लिहून देण्याचा हुकूम केला. वरील

निरोपाला कसलेच उत्तर न पाठविता शेखने सुलतानाच्या निरोप्याला [ २ ] (३२४) पुढील दंतकथा सांगितली आणि ती तू सुलतानाला जाऊन सांग असा निरोप त्याला दिला. ती अशी :— एकदा एक विद्वान, एक सय्यद आणि एक वेश्या अशा तिघांना काफरांनी कैद केले. तुम्ही आमच्या दैवतांची पूजा करण्यास कबुली देत असाल तर आम्ही तुम्हाला मुक्त करू नाहीतर तुम्हाला ठार मारू अशी धमकी त्यांनी या तिघांना दिली. विद्वानाने तर्कशास्त्राच्या पंथाच्या वादविवादनियमाला अनुसरून काफरांच्या धर्माप्रमाणे विधी करण्यास हरकत नाही अशी मनाची समजूत करून त्याप्रमाणे वागण्यास संमती दिली. इतक्या मोठ्या माणसाचे अनुकरण करणे बरोबर आहे असा सय्यदाने विचार केला. पण ती वेश्या मात्र असे म्हणाली की साऱ्या जन्मभर मी पाप करीत आले आहे. मी काही विद्वान नाही किंवा सय्यददेखील नाही तेव्हा हा आणखी एक गुन्हा माझ्या हातून घडल्यास माझ्यावर परमेश्वर दया दाखवील अशी आशा करण्यास देखील मला जागा नाही. या विचाराने तिने काफरांच्या सांगण्याप्रमाणे वागण्याचे नाकारले आणि मृत्यूला तोंड दिले. एवढे सांगून शेख ऐनउद्दीन उद्गारला की माझी परिस्थितीही त्या वेश्येसारखीच आहे आणि सुलतानाची माझ्यावर गैरमर्जी होणार या गोष्टीबद्दल मी माझ्या मनाची तयारी केली आहे. परंतु म्हणून मी त्याच्यासमोर हजरही होणार नाही किंवा त्याच्याबरोबर एकनिष्ठ राहण्याचेही कबूल करणार नाही. हा निरोप कळल्यानंतर महमदशहाच्या रागात आणखीनच भर पडली आणि त्याने शेखला तावडतोब शहर सोडून जाण्यास फर्माविले. शेखने ही आज्ञा प्रमाण मानली आणि शेख बुऱ्हाणउद्दीनच्या थडग्यापाशी जाऊन त्याच्यावर तो बसला आणि उद्गारला : आता असा कोणी मनुष्य आहे काय की जो या ठिकाणाहून मला हाकलून काढील? सुलतानाला शेख ऐनउद्दीनच्या निर्धाराचे कौतुक वाटले. त्याला आपल्या वर्तणुकीचा पश्चात्ताप झाला आणि त्याने शेखला आपल्या सद्रउस शरीफबरोबर पुढील ओळ लिहून पाठविली—

मी तुला शरण आलो आहे. आता तूही मला शरण ये. यावर शेखने उत्तर केले की जर सुलतान महमदशहा गाजी हे आपल्या वडिलांप्रमाणे धर्माने घालून [ २ ] (३२५) दिलेली बंधने पाळली जातील अशा वृत्तींना पोषक अशी वागणूक, दुर्गुणांना सोडून काढून आणि समुदायात मद्याचे सेवन करण्याचे टाळून करतील आणि त्याचप्रमाणे वरील गोष्टीविरुद्ध वर्तन करणाऱ्या गुन्हेगारांना धर्मात सांगितलेल्या कायद्याप्रमाणे शासन करण्याची न्यायाधीशांना परवानगी देतील, तर त्यांच्या इतकी प्रिय व्यक्ती मला दुसरी कोणतीच नाही. या निरोपाबरोबरच शेख ऐनउद्दीन याने पुढील कविता आपल्या हस्ताक्षरांत सुलतानाकडे लिहून पाठविली.

जोपर्यंत मी जिवंत आहे तोपर्यंत चांगल्या गोष्टींखेरीज दुसरी कोणतीच गोष्ट मी करणार नाही. निष्ठा आणि प्रेम याखेरीज सोडून इतर कोणत्याच भावनांना माझ्या मनात स्थान नाही. ज्यांनी माझा अपमान करून मला दुखविले आहे त्यांच्या-

बाबत देखील जर माझ्या आवाक्यात असेल तर दुष्कर्माची फेड मी चांगुलपणाने करीन.

( ४६ ) शेख ऐनउद्दीन याने महमदशहाला गाजी ही जी पदवी दिली होती त्यामुळे महमदशहा अतिशय खुष झाला आणि ती पदवी त्याने यापुढे आपल्या नावापुढे लावण्यात यावी असा हुकूम केला.

( ४७ ) यानंतर सुलतानाने महरठ देशाची व्यवस्था बघण्याचे काम खान महमद याजवर सोपविले आणि तो कुलबर्ग्याला परतला. तेथे गेल्यावर त्याने आपल्या राज्यातील दारूच्या सर्व भट्टयांचा नाश करून टाकण्याबद्दल फर्माविले आणि धर्माच्या नियमांचे कडकपणे पालन होईल अशा तऱ्हेचे वातावरण निर्माण करण्याच्या पाठीमागे तो मनापासून लागला. दक्षिण देशामध्ये पूर्वीच्या काळापासून लमाणांच्या तांड्यांवर धाडसाने हल्ला करून चोऱ्या करण्याबद्दल दरोडेखोर फार प्रसिद्ध होते. त्यांचे समूळ उच्चाटन करून त्यांचा संपूर्ण नायनाट करण्याचा निश्चयदेखील त्याने केला. त्यासाठी त्याने प्रांतोप्रांतीच्या सुभेदारांना आज्ञापत्रके-पाठविली की तुम्ही आपापल्या प्रयत्नांची पराकाष्ठा करून चोर आणि दरोडेखोर यांच्या त्रासातून देशाला मुक्त करा, कोणताही भेदभाव न करता त्यांना तुम्ही ठार करा आणि जरब बसावी म्हणून त्यांची मुंडकी तोडून राजधानीकडे रवाना करा. या आज्ञापत्रकांचा परिणाम असा झाला की सहासात महिन्यांच्या अवधीत सुलतानाच्या राज्यांत दरोडेखोरांचा मागमूसही शिल्लक राहिला नाही. राज्याच्या निरनिराळ्या भागांतून ८००० मुंडकी कुलबर्ग्याला [ २ ] (३२६) आणण्यात आली आणि शहराच्या दरवाजांजवळ त्यांचे ढिगारे रचण्यात आले.

( ४८ ) शेख ऐनउद्दीन याने महमदशहाची जी कानउघडणी केली होती तिकडे त्याने पूर्णपणे लक्ष देऊन त्याप्रमाणे आपले वर्तन ठेवले. आपल्या सबंध कारकिर्दीत त्या सन्माननीय अवलियाबरोबर त्याने मित्रत्वदर्शक पत्रव्यवहार चालू ठेवला आणि त्याच्याशी वागताना अतिशय नम्रतेची आणि सौजन्यपूर्ण अशी वर्तणूक ठेवली. शेखदेखील आपल्याकडून अधूनमधून सुलतानाला कळकळीने उपदेश करण्याची संधी दवडीत नसे आणि असे करताना आपल्या मनातील विचार अतिशय मोकळेपणे सुलतानासमोर मांडण्यात यत्किंचितही कांकू करीत नसे.

( ४९ ) याप्रमाणे घटना घडत असताना विजयनगर आणि तेलंगणचे राजे आणि दक्षिणेतील इतर जमीनदार आपल्या सुलतानावरील निष्ठेत दृढ राहिले होते. ते सर्वजण सुलतानाने नेमून दिल्याप्रमाणे वेळच्या वेळी खंडणी रवाना करीत. साहजिकच सुलतानाचे राज्य लढाया आणि युद्धे यांच्या त्रासापासून मुक्त राहिले. महमदशहाने देखील आणखी प्रदेश जिंकून राज्याला जोडण्याचे सर्व विचार बाजूला ठेवले आणि आपल्या प्रजेच्या भरभराटीत वृद्धी कशी करता येईल या कामी त्याने आपल्याला वाहून घेतले. हा उद्देश साध्य व्हावा म्हणून दरवर्षी राज्याच्या एका भागात तो दौऱ्यावर जाई. अशा वेळी त्याच्या समवेत त्या त्या प्रांताचा सुभेदार जात असे. दौऱ्यावरून

परतताना सुभेदार राजधानीपर्यंत सुलतानाला पोहोचवून मग आपल्या प्रांताकडे परत जात. याप्रमाणे दौऱ्यावर गेल्यानंतर तो आपल्या राज्याच्या उत्पन्नाच्या काय बाबी आहेत हे शोधून काढण्याचे काम, त्याचप्रमाणे प्रजेच्या तक्रारीकडे लक्ष देऊन त्या दूर करणे आणि सार्वजनिक हिताची कामे पार पाडणे या गोष्टीत लक्ष घालून स्वतःला गुंतवून घेई. त्याच्या कारकिर्दीत राज्यातल्या प्रत्येक थरातील प्रजाजनाच्या जीवनात सुरक्षितता आणि शांतता यांचे वातावरण निर्माण झाले. सुलतान जर न्यायीपणाचा पुरस्कर्ता असला तर त्याची किंमत फार मोठी असते हे नागरिकांनी ओळखले आणि त्यामुळे सुलतानाची सत्ता ते प्रमाण मानीत आणि त्याच्याबद्दल नेहमी कृतज्ञ असत. त्याचे राज्य चिरकालपर्यंत टिकून राहावे याबद्दल ते प्रार्थना करीत असत. परंतु मृत्युरूपी लांडगा भक्षाकरता वखवखून नेहमी एखाद्या ताज्या जोसेफला पकडतो आणि त्यामुळे एकादा जेकब दुःखाच्या सागरात लोटला जातो तद्वतच मृत्युरूपी क्रूर काळाचे तीक्ष्ण पंजे त्या हुतात्म्याच्या शरीरात घुसले आणि जिल्काद महिन्याच्या १९ तारखेला त्यांनी सुलतानाला त्याच्या या नश्वर जगातील निवासस्थानातून हिसकावून नेले. जेकब हा जसा [२](३२७) पुत्रशोकाने विव्हल झाला त्याप्रमाणेच सुलतानाचे सारे प्रजाजन या मृत्युरूपी नुकसानीमुळे शोकांत आणि अश्रुरूपी सागरात बुडून गेले. महमदशहाला त्याच्या बापाच्या कबरी शेजारीच दफन करण्यात आले आणि त्याने पूर्वी दिलेल्या हुकूमानुसार त्याच्या कबरीवर "जगातील सारे काही दिखाऊ आहे" ही अक्षरे कोरण्यात आली. अशा तऱ्हेने ज्या सुलतानांची कारकीर्द जाते आणि ज्यांच्या स्मरणार्थ अशा प्रकारची स्मृतिस्थाने उभारण्यात येतात ते सुलतान खरोखरच धन्य होत. महमदशहाच्या हयातीत त्याच्याबद्दल सर्वांना आदर वाटत असे आणि त्याच्या मृत्यूनंतरही त्याच्या अंगी असलेल्या गुणांमुळे त्याची सर्वांना आठवण राहिली.

जिल्काद १९
हिजरी ७७६
मार्च २१
इ. स. १३७५

(५०) सिराजउत तवारीखमध्ये दिलेल्या वृत्तान्ताप्रमाणे महमदशहा बहमनीच्या कारकिर्दीत बहमनी घराण्यापाशी इतकी प्रचंड संपत्ती आणि इतके असंख्यात हत्ती जमा झाले होते की जितके त्या घराण्यातील कोणत्याही सुलतानाच्या कारकिर्दीत जमा झाले नाहीत. त्याच्या ताब्यात ३००० हत्ती आणि हत्तिणी होत्या. इतर दुसऱ्या कोणत्याही सुलतानाच्या कारकिर्दीत ही संख्या आपल्याला फक्त २००० एवढीच आढळून येते. वरील ग्रंथाच्या ग्रंथकर्त्याने दिलेल्या हकीकतीप्रमाणे महमदशहाने आपल्या कारकिर्दीत आपल्यापाशी जमा केलेले सोने हे इतर सुलतानांनी मिळविलेल्या सोन्यापेक्षा दुपटीने अधिक होते. त्याच्या अगोदरच्या कोणत्याही सुलतानाने कर्नाटकचे राजे आणि जमीनदार यांना जिंकून घेण्यात यश संपादन केलेले नव्हते. त्या सर्वांपासून महमदशहाने त्या त्या राजांच्या घराण्यात सातशे वर्षांपासून साठत आलेली संपत्ती बळकावून घेतली. असे गणित केले जाते की महमदशहाच्या कारकिर्दीत इस्लामच्या

वीरांच्या तलवारींना जवळ जवळ ५००००० काफर बळी पडले. त्यामुळे कर्नाटकची लोकसंख्या इतकी [३५ब] कमी झाली की अनेक दशकांपर्यंत ती पूर्वस्थितीवर येऊ शकली नाही. महमदशहाने एकंदर १७ वर्षे राज्य केले. [३६★]

## मुजाहिदशहा बहमनी

( ५१ ) आपल्या बापाच्या मृत्यूनंतर दक्षिणेच्या सिंहासनावर [ २ ] ( ३२८ ) मुजाहिद हा आला. मलिक सैफुद्दीन घोरीच्या मुलीपासून महमदशहा बहमनीला झालेला हा मुलगा होता. मुजाहिदशहाच्या अंगात असामान्य ताकद होती आणि दिसायला तो उंचापुरा होता. बहमनींच्या कुलातील सर्वांमध्ये रुबाबदारपणा आणि देखणेपणाच्या बाबतीत त्याची बरताण होती. धाडसीपणा, मनोधैर्य आणि शरीराचा कणखरपणा यामध्ये त्याची कुणीच बरोबरी करू शकत नव्हते. तो तुर्की भाषा अस्खलितपणे बोलत असे. त्याचे बहुतेक सहकारी तुर्की किंवा इराणातील होते आणि या आपल्या आवडत्या सहकाऱ्यांपासूनच त्याने तुर्की भाषेवरील असामान्य प्रभुत्व संपादन केले होते. लहानपणापासून त्याला धनुर्विद्येची अतिशय गोडी होती आणि लष्करीविषयाबाबत चर्चा करणे हा त्याचा आवडता छंद होता. तारुण्याच्या ऐन भरात असताना त्याने आपल्या बापाच्या भांडारगृहाचा दरवाजा मोडून काढला आणि त्यातील सोन्याच्या काही थैल्या पळवून नेऊन त्या आपल्या सवंगड्यात त्याने वाटून टाकल्या. खजिनदाराला जेव्हा ही चोरी कळून आली तेव्हा महमदशहा [ २ ] ( ३२९ ) बहमनीच्या कानावर त्याने ही हकीकत घातली. आपल्या मुलाच्या अंगातील कर्तृत्वाला अशा तऱ्हेचे वाईट वळण लागलेले पाहून महमदशहाने आपला दंडधारी मुबारक याला मुजाहिदला बोलावून आणण्यासाठी पाठविले. मुजाहिद बापासमोर आल्यावर आपला बाप अतिशय रागावला आहे असे त्याला दिसले आणि त्याचे कारण काय असावे हेही त्याला उमजले. सबब सांगून सहजासहजी आलेल्या आरोपातून सुटका करून घेणे शक्य नसल्यामुळे तो काहीच बोलला नाही. सुलतानाने त्याच्या अंगावर कडाडून आसुडाचे अनेक फटकारे ओढले. या फटकाऱ्यांच्या प्रहाराने त्याच्या अंगातून रक्त निघाले पण त्याने हू का चू केले नाही. सुलतानाने अखेर त्याला जाण्याची आज्ञा दिली तेव्हा तो गेला आणि आपली चुगली केल्याबद्दल त्याने आपल्या आईपाशी मुबारक-विरुद्ध तक्रार केली. तो असे म्हणाला की चोरी उघडकीस आल्याचे त्याने जर मला कळविले असते तर मी तुला माझ्यावतीने मध्यस्थी करण्यास सांगितले असते अथवा बापाचा राग शांत होईपर्यंत त्याच्याकडे जाण्यास लागू नये म्हणून काहीतरी सबब शोधून काढली असती. मुजाहिदच्या आईने त्याला सांगितले की मुबारकचा या गोष्टीत काहीच दोष नाही. यावर मुजाहिदने काहीच उत्तर केले नाही. त्याने आपली नापसंती तशीच दाबून टाकली आणि मुबारकबरोबर वागण्यात त्याने आपल्या नापसंतीची यत्किंचितही जाणीव त्याला होऊ दिली नाही.

या गोष्टीला एक आठवडा लोटला तेव्हा एक दिवस तो मुबारकला एकीकडे गाठून म्हणाला की तुझ्या अंगात प्रचंड शारीरिक ताकद असल्याचे माझ्या ऐकिवात आहे. त्याचप्रमाणे तुझ्या पकडीच्या जोरावर तू मी मी म्हणणाऱ्या-मल्लांना चित केल्याचेही मी ऐकले आहे. या गोष्टीमुळे तुझ्याशी मल्लयुद्ध खेळण्याची इच्छा माझ्या मनात निर्माण झाली आहे. मुबारकने या गोष्टीला आपली अनुमती दर्शविली. दोघांचे मल्लयुद्ध सुरू झाले आणि त्यात मुजाहिदने मुबारकला इतक्या जोराने खाली आपटले की पडताना मुबारकची मान मोडली आणि त्याला मृत्यू आला; ही घटना ज्यावेळी घडली त्या-वेळी मुजहिद अवघा चौदा वर्षांचा होता.

( ५२ ) वयाच्या १९ व्या वर्षी मुजाहिदशहा तख्तनशीन झाला. त्यानंतर लगेच दौलताबाद येथील शेख बुरहाणउद्दीन याच्या दर्ग्याचे दर्शन घेण्यासाठी त्याने दौलताबादची यात्रा केली. तेथे त्याने शेख जैनुद्दीन याला आपला अध्यात्मिक गुरू केले आणि तो राजधानीकडे परत फिरला. दौलताबाद येथे गेला असताना [ २ ] ( ३३० ) तेथला सुभेदार खान महमद याच्याविषयी त्याच्या मनात संशय आला होता. त्याने खान महमदच्या जागी दौलताबादचा सुभेदार म्हणून आजम हुमायून याची नेमणूक केली आणि खान महमद याला दरबारात हजर होण्याचा हुकूम दिला. त्याने विजय-नगरचा राजा कृष्णराय यालाही लिहून पुढीलप्रमाणे आपली मागणी सादर केली ती अशी की कृष्णा आणि तुंगभद्रा या नद्यांच्या दोआबामधील काही किल्ले आणि जिल्हे याची दोन्ही राज्यांत विभागणी झाली आहे. त्यामुळे दोन्ही राज्यांत वारंवार बाचाबाचीचे प्रसंग निर्माण होतात त्यामुळे आमची अशी अपेक्षा आहे की आपण यापुढे आपला वंकापूरच्या किल्ल्यासहित तुंगभद्रेच्या पूर्वेकडील असलेल्या सर्व मुलखावरील आणि त्याचप्रमाणे इतर काही ठिकाणांवरील अधिकार कायमचा सोडावा. मुजाहिद-शहाने केलेल्या या मागणीला कृष्णरायाने उत्तर दिले ते असे : रायचूर, मुद्गल आणि कृष्णा आणि तुंगभद्रा यांच्या दोआबातील इतर सर्व किल्ले आज शतकानु-शतके आमच्या घराण्याकडे चालत आलेले आहेत. तेव्हा आपण ते मुकाट्याने सोडून आमच्या ताब्यात देण्याचा शहाणपणा दाखवावा. आपल्या राज्याची सरहद्द कृष्णा नदीचा उत्तर किनारा अशी मानावी आणि आमच्या सेवकाने विश्वासघात केल्यामुळे मागील युद्धात महमदशहा बहमनीच्या ताब्यात आमचे जे हत्ती गेले होते ते परत करावे. तुम्ही वरील अटी मान्य करण्याचा मोठेपणा दाखविल्यास आपल्या परस्परांमध्ये आज जी शत्रुत्वाची भावना आहे तिचे रूपांतर मैत्रीच्या भावनेत होईल.

( ५३ ) कृष्णरायाकडून अशा प्रकारचे उत्तर आल्यावर मुजाहिदशहाने आपल्या बापाचा भांडारखाना खोलला आणि आपल्या सेनाबळात प्रचंड संख्येने भर घातली. त्याने आपल्या राज्याच्या मुलकी कारभाराची व्यवस्था पाहण्याचे काम मलिक सैफुद्दीन घोरी याजवर सोपविले आणि विजयनगरवर चाल करून जाण्याचा निश्चय केला. विजयनगरवरील मोहिमेसाठी दौलताबाद, बिदर आणि वऱ्हाड येथील फौजा

एकत्र झाल्यावर त्याने अफाट संपती आणि ५०० हत्ती बरोबर घेऊन दक्षिणेच्या बाजूकडे कूच केले. कृष्णा आणि तुंगभद्रा या नद्या ओलांडून तो अधोनीच्या किल्ल्यासमोर येऊन पोहोचला. दक्षिणेमधील किल्ल्यात हा किल्ला अतिशय मजबूत म्हणून समजला जाई. वऱ्हाडचे सैन्य बरोबर घेऊन या किल्ल्याला वेढा देण्याची त्याने सफ्दरखान सिस्तानी याला आज्ञा केली आणि अमीर उलउमरा बहादूरखान आणि आजम हुमायून यांना त्यांच्या सैन्यासहित विजयनगरच्या दिशेने पुढे [ २ ] ( ३३१ ) कूच करण्यास सांगितले. कृष्णराय हा तुंगभद्रा नदीच्या किनाऱ्यावर छावणी देऊन आहे असे मुजाहिदशहाच्या कानावर आले तेव्हा त्याने अतिशय धीमेपणाने आणि सावधगिरीने त्याच्या दिशेने कूच केले. इकडे कृष्णरायाने मुजाहिदशहाबरोबर लढण्यासाठी जारीने तयारी सुरू केली.

( ५४ ) याच सुमारास मुजाहिदशहाच्या कानावर अशी बातमी घालण्यात आली की एका प्रचंड वाघाने त्या भागात भयंकर धुमाकूळ घातला आहे. इतकेच नव्हे तर तो वाघ जेथे वसती करून राहिला आहे त्याजवळून जाणाऱ्या रस्त्यावर त्याने अनेक प्रवाशास ठार मारले आहे. त्याचा परिणाम असा झाला आहे की, प्रवाशांनी त्या रस्त्यावरून जाण्याचे सोडून दिले आहे. मुजाहिदशहाला शिकारीचा अतिशय षोक असल्याने वाघाची गुहा असलेल्या ठिकाणी आपल्याला घेऊन चलण्याची त्याने आपल्या अधिकाऱ्यांना आज्ञा केली. आपल्या परवानगीशिवाय आपल्याबरोबर कोणाही इसमाने येऊ नये असा त्याने हुकूम केला आणि फक्त सात अनुचरांना बरोबर घेऊन मुजाहिदशहा त्या नरभक्षकाच्या गुहेकडे पायी गेला. आपल्या बाजूला ही अनोळखी माणसे येत असलेली पाहून त्या वाघाने भयंकर डरकाळ्या फोडल्या आणि तो त्यांच्या दिशेने धिमेपणे पावले टाकत येऊ लागला. आपल्या सेवकांना आहेत तिथेच थांबण्यास मुजाहिदशहाने सांगितले आणि आपली आयुधे तयार ठेवण्याचा त्याने त्यांना हुकूम दिला. तो स्वतः काही पावले चालून पुढे गेला आणि एक बाण त्याने त्या जनावराच्या दिशेने सोडला. तो बाण वाघाच्या कुशीत शिरला आणि बाणाच्या प्रहाराने वाघ मृत होऊन खाली कोसळला. मुजाहिदशहा तेव्हा असे म्हणाला की जर का माझा नेम चुकला असता तर वाघावर तलवार आणि खंजीर घेऊन हल्ला करण्याचा माझा बेत होता. एका बाणाने वाघ ठार मरून पडावा हे चमत्कारिक वाटल्यामुळे मुजाहिदशहाने आपल्या सेवकांना वाघाची चिरफाड करून कोणत्या नाजूक भागी बाणाचा प्रहार लागल्यामुळे वाघ मेला ह्याची खातरजमा करण्यास सांगितले. त्याप्रमाणे सेवकांनी वाघाची चिरफाड केल्यावर असे दिसून आले की वाघाच्या हृदयस्थानाचा बाणाने भेद केला होता.

( ५५ ) विजयनगरच्या काफरांच्या कानावर या साहसी कृत्याची हकीकत पडल्यावर त्यांना भीतीने धडकी भरली. त्यांनी मुजाहिदशहा बरोबर युद्ध [ २ ] ( ३३२ ) करण्यासाठी जरी आगेकूच केली होती तरी त्यांनी आता आपल्या डावपेचांत बदल

प्र. रा. ला. ल. म. ग्रंथालय

केला. उघड्यावर न येता त्यांनी जंगलाचा आश्रय घेऊन आणि घनदाट झाडीच्या पाठीशी लपून मुजाहिदशहावर छुपे हल्ले करून त्याला त्रास देण्याचे ठरविले आणि अशा तऱ्हेने आपली बाजू सुरक्षित ठेवण्याच्या धोरणाचा अंगीकार केला. या धोरणाला अनुसरून कृष्णरायाने विजयनगरमधून माघार घेतली आणि शहराच्या संरक्षणाचे काम आपल्या मंत्र्यांवर सोपवून त्याने आपले सर्व सैन्य शहराच्या दक्षिणेच्या बाजूला असलेल्या जंगलात नेले.

(५६) विजयनगर शहराच्या अतीव संपन्नतेची आणि भरभराटीची हकीकत मुजाहिदशहाच्या यापूर्वीच कानावर आली होती. तेव्हा त्याने विजयनगरच्या रोखाने कूच केले. परंतु विजयनगरला त्यावेळी वेढा दिल्यास तसे करणे साहसीपणाचे ठरेल असा विचार करून मुजाहिदशहा हा आपल्या शत्रूच्या पाठलागावर निघाला. घनदाट जंगले आणि डोंगराळ मुलुखातून पळ काढीत कृष्णराय सेतूबंध रामेश्वरकडे [३७] □ पळाला. त्याच्या पाठलागावर मुजाहिदशहा होताच. आपल्या घोडदळाला मार्ग मिळावा यासाठी पूर्वी निबिड समजल्या जाणाऱ्या जंगलाची तोड करून त्याने वाट तयार केली. अशा तऱ्हेने कृष्णराय जवळजवळ सहा महिने या ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणाकडे पळत राहिला परंतु मुजाहिदशहाबरोबर समोरासमोर लढाईला उतरण्याची हिंमत मात्र त्याने दाखविली नाही. मुजाहिदशहाच्या सल्लागारांनी कृष्णरायाचा अशा तऱ्हेने पाठलाग करणे हे निरर्थक आहे एवढेच नव्हे तर त्यामुळे आपल्या सैन्याचाही नाश होत आहे असे त्याच्या मनावर बिंबविण्याचा व्यर्थ प्रयत्न केला परंतु अखेर मुजाहिद-शहाला त्याच्या दैवाने हात दिला. जंगलामधील रोगराईमुळे दूषित झालेल्या हवेचा परिणाम होऊन कृष्णराय आणि त्याची कुटुंबीय मंडळी यांचे स्वास्थ्य बिघडले आणि त्याच्या वैद्यकीय सल्लागारांनी त्याला ताबडतोब जंगल सोडून बाहेर पडण्याचा इशारा दिला. आपल्या पाठलागावर असलेल्या मुजाहिदशहाला जंगलामधील बिघडलेल्या वातावरणाचा ताप होईल आणि त्याला माघार घेणे भाग पडेल अशा तऱ्हेची बळकट आशा कृष्णरायाने आपल्या मनाशी बाळगिली होती परंतु दुर्दैवाचा [२](३३३) घाला त्याच्यावरच पडला. जंगलातून बाहेर पडणे परिस्थितीने भाग पडल्यामुळे कृष्णराय हा गुप्त मार्गाने आपली राजधानी विजयनगर येथे येऊन दाखल झाला. मुजाहिदशहाने पाठविलेल्या फौजेने त्याचा विजयनगरपर्यंत पाठलाग केला. मुजाहिद-शहाने स्वतः अमीर उलउमरा बहादूरखान आणि ५००० फौज बरोबर [३८] □ घेऊन सेतूबंध रामेश्वर बघण्यासाठी म्हणून कूच केले.

(५७) याप्रसंगी मुजाहिदशहाने अल्लाउद्दीन खिल्जी याच्या अधिकाऱ्यांनी बांधलेल्या एका मशिदीची दुरुस्ती केली. [३९] □ काफरांच्या अनेक देवळांची त्याने मोडतोड आणि नासधूस केली आणि वाटेतला सारा प्रदेश उद्ध्वस्त करून टाकला. त्यानंतर त्याने झपाट्याने विजयनगरच्या दिशेने कूच केले. विजयनगरकडे जाण्यासाठी दोन रस्ते होते. एक चांगला असून फौजेला जाण्यासाठी योग्य होता तर दुसरा अरुंद

आणि खडकाळ होता. पहिल्या रस्त्यावर अनेक धोक्याच्या जागा होत्या आणि त्यावरून शत्रूच्या दबा धरून राहिलेल्या सैन्याकडून अचानक हल्ला होणे शक्य होते. म्हणून मुजाहिदशहाने दुसऱ्या मार्गाने विजयनगरला जाण्याचे ठरविले. बरोबर निवडक सैन्य घेऊन त्याने या मार्गाने कूच केले आणि अचानक तो शहराच्या उपनगरातील भागात येऊन दाखल झाला. मुजाहिदशहाने दाखविलेल्या धाडसाने कृष्णराय चकित झाला आणि त्याने विजयनगरच्या रस्त्यारस्त्यातून मुजाहिदशहाबरोबर लढा देण्यासाठी आपल्याकडील हजारो लोकांची रवानगी केली. मुजाहिदशहाने या सर्वांना आपल्या-समोरून माघार घेण्यास लावले आणि एका छोट्याशा नदीच्या किनाऱ्यावरील एका भागाचा कबजा मिळविला. विजयनगरच्या किल्ल्यात कृष्णराय रहात असे. किल्ल्याला आणि मुजाहिदशहाच्या छावणीला विभागणारा असा हा एकमेव किनारपट्टीचा भाग होता. या किनारपट्टीजवळ जमिनीचा उंच आलेला असा एक भाग होता. त्यावर एक देऊळ बांधलेले होते. हे देऊळ सोने [२] (३३४) आणि चांदीच्या पट्ट्यांनी मढविण्यात आलेले असून त्यात हिरे बसविण्यात आले होते. हिंदू लोक या देवळाला अतिशय मानीत. त्या देशाच्या भाषेत या देवळाला पट्क असे म्हणत. या देवळाचा विध्वंस करणे ही आपली एक धार्मिक जबाबदारी आहे .असा मुजाहिदशहाने मनाशी विचार केला. त्याप्रमाणे तो त्या टेकाडावर चढून गेला. ते देऊळ त्याने भुईसपाट केले आणि देवळातील सर्व सोने-चांदी आणि हिरेमाणके लुटून आपल्या खजिन्यात दाखल केली. आपण अतिशय पूज्य मानीत असलेल्या या भक्तिस्थानाचा मुजाहिदशहाने केलेला विध्वंस बघून काफरांनी आरोळ्या मारल्या आणि गगनाला जाऊन भिडतील अशा स्वरात मोठमोठ्याने रुदन केले. त्यांनी कृष्णरायाला आपले पुढारीपण घेण्यास भाग पाडले आणि मोठ्या निकराने प्रचंड संख्येने त्यांनी मुजाहिदशहाच्या दिशेने चालून येण्यास सुरुवात केली. यावर मुजाहिदशहाने आपले छत्र बाजूला ठेवले आणि आपल्या शस्त्रधारी सैनिकांपैकी फक्त महमूद अफगाण याला बरोबर घेऊन काफरांच्या हालचालींचे निरीक्षण करण्यासाठी त्याने ती छोटीशी नदी ओलांडली. याच वेळी एका हिंदूने मुजाहिदशहा स्वार झालेल्या घोड्यावरून तो सुलतान असावा असे ओळखले. आपल्या देशाला पूज्य असलेल्या दैवताचा नाश करणाऱ्यावर सूड उगवून अमरत्व प्राप्त करून घेण्याचा हा समय आहे अशी त्याने आपल्या मनाशी खूणगाठ बांधली. खाचखळग्या-तून आणि तूटफूट असलेल्या जमिनीतून हळूहळू वाट काढीत वर उल्लेखिलेल्या छोट्याशा नदीच्या किनाऱ्याच्या बाजूबाजूने लपतछपत तो पुढे चाल करून येऊ लागला. मुजाहिदशहावर झपाट्याने हल्ला करण्याच्या तो अगदी बेतात होता. अगदी याच वेळी मुजाहिदशहाने त्याला पाहिले आणि महमूद अफगाण याला खुणाविले. ताबडतोब महमूद अफगाण हा सुलतान मुजाहिद आणि त्याच्यावरील हल्लेखोर यांच्या मधोमध येऊन उभा ठाकला. महमूदचा घोडा मागील पायावर उभा

रहाता रहाता जमिनीवर कोसळला आणि त्यामुळे त्याच्या प्रतिस्पर्ध्याला क्षणिकच का होईना आपल्या शत्रूच्या गैरसोयीचा लाभ उठविण्याची संधी मिळाली. हे होते आहे न होते तोच एखाद्या विजेच्या चापल्याने मुजाहिदशहाने पुढे उडी घेतली. तेवढ्यात त्या हिंदूने आपला पवित्रा बदलला आणि मुजाहिदशहावर प्रचंड प्रहार करण्याच्या उद्देशाने आपले शस्त्र उचलले आणि त्याचवेळी विजयाची मोठी आरोळी त्याने ठोकली. हे दृश्य पहाणाऱ्यांची अशी समजूत झाली की त्या प्रहाराने आपला उद्देश साध्य केलेला आहे. परंतु मुजाहिदशहाचे नशीब थोर म्हणून त्याच्या मस्तकावरील लोखंडी शिरस्त्राणाने त्याच्या मस्तकाचा बचाव केला. मुजाहिदशहाने [ २ ] ( ३३५ ) आपल्या शत्रूवर शस्त्राचा इतका जबरदस्त प्रहार केला की त्या शस्त्राचा वार त्याच्या खांद्यापासून त्याच्या बेंबीपर्यंत शरीराचा भेद करीत गेला आणि मुजाहिदशहावरील हल्लेखोर आपल्या घोड्यावरून मरून खाली पडला. ह्यानंतर मुजाहिदशहा महमूद अफगाणच्या घोड्यावर स्वतः स्वार झाला आणि त्याच्या मित्रांनी काढलेल्या धन्योद्गारांच्या आवाजात आणि त्याच्या शत्रूंनी त्याच्यावर वाहिलेल्या स्तुतिसुमनांच्या वर्षावात तो आपल्या फौजेला जाऊन मिळाला. मुजाहिदशहाने या प्रसंगी दाखविलेले शौर्य इतके असामान्य होते की त्याच्या शत्रूला देखील त्याची स्तुती करण्याचा मोह आवरून धरता आला नाही.

(५८) दरम्यान कृष्णरायाने आपल्या सैन्यासहित मुजाहिदशहावर चाल केली. मुजाहिदशहाने तेव्हा आपल्या उजव्या फळीवर अमीर उलउमरा बहादूरखान याला नेमले आणि डाव्या फळीवर आजम हुमायून याची नेमणूक केली. सफ्दरखानाने दारुगोळ्याच्या धडाक्याने कृष्णरायावरील हल्ल्याला सुरुवात केली. लढाई तुंबळ झाली आणि दोन्ही बाजूंकडील असंख्यात माणसे कामास आली. अखेर शत्रूला रणांगण सोडून पळ काढण्यास भाग पाडण्यात आले. युद्धात झालेल्या श्रमाचा परिहार करण्यासाठी मुजाहिदशहाचे सैन्य थोडीफार विश्रांती घेत आहे न घेत आहे तोच कृष्णरायाचा भाऊ आपल्या सरकारावरून शहरामध्ये येऊन दाखल झाला. त्याने आपल्याबरोबर भावाच्या मदतीसाठी म्हणून २०००० घोडदळ आणि पुष्कळसे पायदळ आणले होते. कृष्णरायाने आपल्या विस्कळीत झालेल्या सैन्याची जमवाजमव केली आणि पुन्हा एकदा तो मुजाहिदशहावर चाल करून आला. या युद्धात दोन्हीकडील वीरांनी आपल्या अंगातील असामान्य शौर्याची चमक दाखविली. दोन्ही बाजूंकडील असंख्यात वीरांनी रणांगणावर आपले प्राण ठेवले. मुजाहिदशहाकडील मुकर्रबखान[४०८] आदिकरून अनेक अधिकारी या ठार झालेल्यांमध्ये होते. आपल्या अंगातील शौर्याने आपल्या शिपायांना स्फूर्ती देत मुजाहिदशहा रणांगणाच्या सर्व भागांत विजेसारखा तळपत फिरताना दिसत होता. जिथेजिथे त्याने आपला काळा घोडा रणांगणात घुसविला तेथे तेथे त्याच्या तलवारीच्या माऱ्याखाली काफरांच्या सैनिकांनी शरणागती देऊन माघार घेतली. लढाईच्या जागेजवळच धुना-

सोद्रा नावाचे एक ठिकाण होतें. हे ठिकाण ताब्यात घेण्यासाठी मुजाहिदशहाचा चुलता दाऊदखान याला सहा हजार घोडेस्वार आणि काही पायदळी [ २ ] (३३६) सैनिक देऊन पाठविण्यात आले होते. लढाईला सकाळीच सुरुवात झाली आहे, शत्रूचा अद्याप पराभव झालेला नाही आणि प्रत्येक क्षणाला शत्रूला सारखी कुमक येऊन पोहोचत आहे, हे जेव्हा दाऊदखानाला कळले तेव्हा त्याला सुलतानाच्या जीविताच्या सुरक्षिततेसंबंधी काळजी निर्माण झाली. त्याने धुनासोद्रा हे ताब्यात घेतलेले ठिकाण सोडले आणि तो युद्धात सामील झाला. या युद्धात त्याने असामान्य शौर्य दाखविले. तो स्वार झालेली घोडी ३ वेळा मारली गेली आणि पुष्कळदा त्याला नुसते पायी लढणे भाग पडले. सुलतानाने जेव्हा समरांगणात दाऊदखानाचे निशाण पाहिलें तेव्हा त्याला अतिशय संताप आला. परंतु त्याच्या फौजेला विजयप्राप्त होईपर्यंत त्याने आपला राग दाबून धरला. त्यानंतर मात्र त्याने दाऊदखानाला आपल्यासमोर येण्यास फर्माविले, आणि आपली जागा सोडल्याबद्दल त्याची कडक शब्दात हजेरी घेतली. तो असे म्हणाला की, जर आपल्या सैन्याचा पराभव झाला असता आणि शत्रूच्या ताब्यात धुनासोद्रा हे ठिकाण गेले असते तर एकही मुसलमान जिवंत सुटून जाऊ शकला नसता. यानंतर मुजाहिदशहाने त्या महत्त्वाच्या जागेचा ताबा घेण्यासाठी आपल्या सैन्याची एक तुकडी रवाना केली. परंतु दाऊदखानाच्या गैरहजेरीचा फायदा घेऊन हिंदूंनी ते ठिकाण अगोदरच आपल्या ताब्यात घेतले होते. हिंदूंच्या फौजेचे सामर्थ्य ओळखून त्यांच्यावर हल्ला करणे धोक्याचे आहे असा निरोप त्या ठिकाणावर हल्ला करण्यासाठी गेलेल्या अधिकाऱ्याने मुजाहिदशहाकडे पाठविला. युद्धामध्ये हिंदूंचे ४० हजार सैनिक जरी ठार मारले गेले होते तरी मुसलमानांची हानी देखील प्रचंड झाली होती. साहजिकच मुजाहिदशहाने असा विचार केला की अशा परिस्थितीत त्या ठिकाणी जास्त वेळ रहाणे हे शहाणपणाचे ठरणार नाही. म्हणून त्याने आपल्या सर्व फौजेसह धुनासोद्राकडे कूच केले. मुजाहिदशहाचे सैन्य चालून येत आहे हे पाहिल्यावर हिंदूंनी ते ठिकाण खाली केले. यानंतर रस्त्याच्या तोंडाशी असलेल्या खिंडीजवळ मुजाहिदशहा स्वतः निवडक अशा सैनिकांची तुकडी घेऊन सर्व सैन्य सुरक्षितपणे कूच करून जाईपर्यंत उभा राहिला. त्याला असे वाटले की आपण विजयनगरमधून माघार घेत असताना कृष्णरायाकडून कदाचित् आपल्यावर छुपे हल्ले होतील. या [ २ ] (३३७) प्रदेशाची ज्यांना ज्यांना माहिती आहे त्या सर्वांनी उघडपणे कबूल केले की या मोहिमेत मुजाहिदशहाने जी कामगिरी बजावली ती प्रत्यक्ष परमेश्वराची त्याला मदत असल्याशिवाय त्याच्या हातून पार पडणे अशक्य होते.

( ५९ ) कर्नाटकच्या देशाची उत्तरेकडून दक्षिणेकडे, कृष्णेपासून सेतूबंध रामेश्वरापर्यंत [४१] □ लांबी ६०० कोस आहे आणि पश्चिमेपासून पूर्वेपर्यंत, हिंदी महासागराच्या किनाऱ्यापासून तेलंगणाच्या सरहद्दीपर्यंत रुंदी १५० कोस आहे. कर्नाटकच्या काही भागांत लोक कानडी भाषा बोलतात तर काही काही भागांत तिलंगी

भाषा बोलतात. या प्रदेशातील लोक इतके शूर आहेत की, युद्धासाठी कूच करताना ते गाणी गात आणि नाचत जातात. परंतु त्याचा अभिनिवेश फार काळ टिकत नाही. कर्नाटकात घनदाट झाडी आणि मजबूत किल्लेकोट आहेत. त्यामुळे फौजेला त्या प्रदेशातून कूच करून जाणे अशक्यप्राय असते. बहमनी घराण्यातील राजपुरुषांनी आपले सार्वभौमत्व केवळ आपल्या शौर्याच्या जोरावर टिकवून धरले कारण सामर्थ्य, संपत्ती आणि प्रदेशाचा विस्तार या बाबतीत तुलना करताना विजयनगरच्या राजांची बाजू बहमनीपेक्षा निश्चित उजवी होती. मुजाहिद-शहाच्या कारकिर्दीत दोन्ही राज्यांतील हा फरक विशेषेकरून दिसून येत असे कारण तेलंगणाचा सर्व प्रदेश अजून बहमनींच्या अमलाखाली आला नव्हता. गोव्याचे समुद्र-किनाऱ्यावरील बंदर, बेळगावचा किल्ला आणि खुद्द कर्नाटकात ज्यांचा [ २ ] ( ३३८ ) समावेश नाही अशी अनेक ठिकाणे व त्याचप्रमाणे थळघाटातील[*२०] अनेक जिल्हे विजयनगरच्या रायाच्या ताब्यात होते. त्याच्या राज्याची लोकसंख्या समृद्ध होती आणि त्याचे सर्व प्रजाजन त्याच्या अधिकाराला मान तुकवून असत. मलबार, सिलोन आणि इतर देशांचे राजेरजवाडे यांनी याच्या दरबारांत आपले वकील ठेवले होते आणि प्रतिवर्षी त्याच्याकडे ते अनेक मौल्यवान नजराणे पाठवीत. कृष्णरायाचे पूर्वज विजयनगरवर जवळजवळ ७०० वर्षेपर्यंत राज्य करीत होते. या संबंध कालावधीत त्याच्या राज्यांत अंदाधुंदीने कधीही शांततेचा भंग झाला नाही. कृष्णरायाचे पूर्वज यांनी आपल्या संपत्तीचा विनियोग उत्तम प्रकारे केला. त्यामुळे त्यांच्याजवळ जमा झालेली संपत्ती ही पृथ्वीवरील सर्व राज्यांच्या एकत्रित केलेल्या संपत्ती एवढी झाली असती. अल्लाउद्दीन खिलजीच्या काळात कृष्णरायाच्या आजाने मनामध्ये काही धार्मिक हेतू धरून आपली संपत्ती हा सेतूबंध रामेश्वर येथे पुरली होती. त्यापैकी काही भाग अल्लाउद्दीन खिलजीच्या अधिकाऱ्यांच्या हाती पडला.

( ६० ) सद्यःपरिस्थितीत विजयनगर जिंकून घेणे अशक्य आहे याची मुजाहिदशहाला खात्री पटली. तेव्हा त्याने विजयनगरच्या आसमंतातून जवळील युद्ध-कैद्यांसह आपला मुक्काम हलविला. या कैद्यांची संख्या ६० ते ७० हजारांच्या दरम्यान होती, आणि त्यातील बहुतेक स्त्रिया होत्या. मुजाहिदशहाच्या बापाने लढाई संबंधाने पाळण्याचे जे काही नियम घालून दिले होते त्याला अनुसरून युद्धाची भयंकर रण-धुमाळी थांबल्यानंतर शत्रुसैनिकांची कत्तल करू नये असा हुकूम त्याने दिला होता; त्याप्रमाणे शत्रुसैनिकांची कत्तल थांबविण्यात आली होती. मुजाहिदशहाच्या सैनिकांचा तळ अधोनीच्या किल्ल्यासमोर पडला होता. सुलतानाने त्या किल्ल्याकडे कूच केले आणि किल्ल्याला वेढा घातला. वेढा ९ महिनेपर्यंत चालला. किल्ल्यावर पाण्याची इतकी टंचाई पडली की किल्ल्यावरील शिबंदीची परिस्थिती हलाखीची होऊन ते शरणागती देण्याच्या मार्गात होते. तोच अचानक मुसळधार पाऊस पडला. शिबंदीची हलाखी दूर होऊन त्यांना दिलासा मिळाला. त्यांनी अधिक जोमाने वेढ्याचा प्रतिकार करण्यास सुरुवात

केली. याच सुमारास मुजाहिदशहाच्या छावणीत धान्याचा तुटवडा पडला. त्याचे अनेक सैनिक पाण्याच्या प्रवाहाबरोबर वाहून गेले. तर इतरांनी आपले पोट बिघडल्याच्या तक्रारी केल्या. याचा परिणाम असा झाला की सैन्यात [ २ ] (३३९) निराशेचे वातावरण पसरले. सर्व सैनिकांनी आम्हाला मायदेशाकडे परत घेऊन चला अशी एकच हाकाटी सुरू केली.

( ६१ ) एकंदर परिस्थितीने घेतलेल्या वाकड्या वळणाची हकीकत जेव्हा कुलबर्गा येथे मलिक सैफुद्दीन घोरी याच्या कानावर पडली तेव्हा त्याने आपल्या हाताखालील सैन्याच्या तुकडीसह सुलतानाला येऊन मिळण्याची परवानगी मागितली. अधोनीच्या किल्ल्याबाबत बरीच माहिती त्याच्या कानावर आली होती. अधोनीचा किल्ला आपल्याला पहावयास मिळावा अशीही इच्छा सैफुद्दीन घोरी याने मुजाहिदशहापाशी व्यक्त केली. मुजाहिदशहाने सैफुद्दीन घोरीने केलेल्या विनंतीला आपली संमती दर्शविली. अधोनीचा किल्ल्याच्या आजूबाजूच्या प्रदेशाची पाहणी केल्यानंतर मलिक सैफुद्दीन याने सुलतानाबरोबर गुप्तपणे संभाषण करताना असे सांगितले की दळणवळण ठेवू शकतील असे १५ किल्ले अधोनीच्या किल्ल्याच्या अवतीभोवती आहेत. ४३ □ अशा तऱ्हेची जागा थोड्या कालावधीत जिंकून घेता येईल अशी आशा करणे व्यर्थ आहे. अधोनीचा किल्ला जिंकून घ्यावयाचा असेल तर गोवा ते बेळगाव आणि बंकापूरच्या प्रदेशामधील नद्यांच्या दोआबांत असलेले सर्व किल्ले प्रथम जिंकून घेणे जरूर आहे. हा बेत मुजाहिदशहाला पसंत पडला आणि त्याने माघार घेण्याला आपली संमती दिली. मलिक सैफुद्दीन घोरीच्या मध्यस्थीने मुजाहिदशहा आणि विजयनगरचा राया यांच्यामध्ये शस्त्रसंधी झाली. त्यानंतर कुलबर्ग्याला मलिक सैफुद्दीन घोरी याला अगोदर रवाना करून मुजाहिदशहाने आपल्या राज्याकडे कूच केले.

( ६२ ) कूच करीत सुलतानाच्या फौजेने तुंगभद्रा नदी ओलांडली आणि ते मुद्गलच्या किल्ल्याजवळ येऊन पोहोचले. तेथे आल्यावर सुलतानाने आपल्या खास मर्जीतल्या आणि आनंदाच्या प्रसंगी त्याच्या सुखात सहभागी होणाऱ्या अशा मित्रमंडळींना बरोबर घेऊन शिकारीच्या आनंदाचा अनुभव घेण्यासाठी म्हणून प्रयाण केले. त्याच्याबरोबर रक्षक म्हणून केवळ ४०० घोडेस्वारांची एक तुकडी होती. यामध्ये दाऊदखान, सफ्दरखान सिस्तानी आणि आजम हुमायून आदिकरून मंडळी होती. दिवसभर शिकारीचा खेळ संपल्यानंतर काळोख पडल्यानंतर ज्याठिकाणी तो असे तेथेच रात्रभर मुक्काम करावयाची सुलतानाला सवय होती.

( ६३ ) विजयनगर येथे धुनासोद्रा हे ठिकाण सोडल्याबद्दल [ २ ] ( ३४० ) मुजाहिदशहाने दाऊदखानाची जी खरडपट्टी काढली होती त्याबद्दल त्याचा अतिशय जळफळाट झाला होता. दाऊदखानाची सिंहासन आपल्याला मिळावे अशी अभिलाषा देखील होती. अशा परिस्थितीत त्याने मुजाहिदशहाला ठार मारण्याचा कट रचला. या कटात खान महमद आणि मसूद खान हे पण सामील झाले. खान महमदला ज्या

परिस्थितीत दौलताबादच्या सुभेदारीवरून काढण्यात आले होते ती परिस्थिती अजून तो विसरला नव्हता. त्याचप्रमाणे त्याचा प्रतिस्पर्धी आजम हुमायून याच्याबद्दल मुजाहिदशहाने दाखविलेल्या पक्षपाताचे शल्य त्याच्या मनात होते. मुजाहिदशहाने राजपुत्र असताना महमदशहा बहमनीचा दंडधारी मुबारक याला कुस्तीत ठार मारले होते. त्याचा मसूद हा मुलगा. आपल्या बापाच्या मृत्यूचा सूड घेण्याच्या संधीची तो वाट पहात होता. ही सर्व कटवाली मंडळी उतावळेपणाने आपल्या मनातील बेत कसे पार पाडता येतील या संधीची मार्गप्रतीक्षा करीत होती. परंतु सफ्दरखान आणि आजम हुमायून यांनी इतकी काही दक्षता बाळगिली होती की अशा तऱ्हेची संधी त्यांना मिळूच शकली नाही. परंतु परमेश्वराच्या लेखणीतून मुजाहिदशहाच्या मृत्यूचा हुकूम लिहिला गेला आणि एके दिवशी आपल्या या अत्यंत विश्वासू सेवकांना ते विरोध करत असताना देखील त्याने आपापल्या सुभेदारीवर परत जाण्यास सांगितले. यानंतर आपल्या उरलेल्या अनुयायांसहित मुजाहिदशहा राजधानीकडे परत येण्यास निघाला. कूच करीत तो एका नदीच्या किनाऱ्यावर येऊन पोहोचला आणि तेथे मासे पकडून स्वतःचे मन रमविण्यासाठी त्याने मुक्काम केला. परंतु एकाएकी त्याच्या डोळ्यामध्ये असह्य वेदना होऊ लागल्या. त्याचे डोळे आले असल्याचे निदान करण्यात आले. त्यामुळे तो विश्रांती घेण्यासाठी म्हणून एका तंबूत परतला. त्याच्या दुर्दैवाने वर उल्लेखिलेले कटवाले हे त्या तंबूचे रखवालदार होते.

(६४) मध्यरात्रीच्या सुमारास खान महमद आणि त्याचे अनुचर यांना तंबूच्या बाहेर पहारा करण्यास ठेवून दाऊदखानाने मसुदखान आणि इतर दोन माणसे यांना बरोबर घेऊन मुजाहिदशहाच्या तंबूत प्रवेश केला. त्याला अतिशय गाढ झोप लागली होती. त्याचा एक हबशी गुलाम फक्त तेथे हजर होता, आणि तो सुलतानाचे पाय रगडीत होता. दाऊदखानाला हातामध्ये धारेचा तीक्ष्ण खंजीर घेऊन प्रवेश करताना जेव्हा त्या गुलामाने पाहिले तेव्हा तो चमकला, आणि मोठ्याने ओरडला. सुलतानाला जाग आली. परंतु त्याला डोळे उघडता येईनात. कारण त्याच्या डोळ्यांना जो विकार झाला होता त्याचे डोळे मिटून रहाणे हे एक लक्षण होते. दाऊदखान मुजाहिदशहावर धावून गेला, आणि त्याने खंजीर त्याच्या शरीरात खुपसला.

मुजाहिदशहाने वाराच्या प्रहाराने कळवळून ज्या हातात दाऊदखानाने [२] ३४१ मारेकऱ्याचे तीक्ष्ण शस्त्र धरले होते तो हात पकडून ठेवला, आणि दाऊदखानाबरोबर झटापट केली. तेथे असलेला गुलाम जरी निःशस्त्र होता तरी त्याने मसुदखानाला धरले परंतु आपल्या हातातील तलवारीच्या एकाच घावाने त्याने त्या गुलामाला ठार मारले, आणि तलवारीचा दुसरा घाव मुजाहिदशहावर इतक्या कौशल्याने केला की, झालेल्या जखमांनी मुजाहिदशहाला तावडतोब मृत्यू आला.[८८]*

दैव शरीरासाठी मोठमोठे इमले उभारते आणि नंतर त्या शरीराला सिंहासनावरून कबरस्तानात भिरकावून देते. या जगाने असले अनेक चमत्कार बघितले आहेत. काळाने बघितलेला विश्वासघाताचा हा काही पहिलाच प्रकार नाही. दैव एकाच्या मस्तकावर सोन्याचा मुकुट ठेवते तर दुसऱ्याला ते चिरनिद्रा घेण्यासाठी कबरस्तानात रवाना करते.

( ६५ ) आपला पुतण्या आणि बहमनी राजाचा सुलतान मुजाहिदशहा याचा खून केल्यानंतर त्याचे प्रेत दाऊदखानाने तसेच ठेवले आणि तो तंबूबाहेर आला. त्याचदिवशी दाऊदखानाने तेथे हजर असलेल्या सर्व अमीरउमरावांना आणि अधिकाऱ्यांना आपण सुलतान आहोत याची कबुली देणे भाग पाडले. प्रत्यक्षात बघितले तर दाऊदखान हाच गादीचा वारस असून त्याच्याकडे युवराजपद आले असते. कारण मुजाहिदशहाला मूलबाळ नव्हते. तेथे असलेल्या अमिरांनी मोठ्या नाखुषीने दाऊदखान सुलतान होण्यास संमती दिली. त्यांना तत्कालीन पद्धतीप्रमाणे दाऊदखानाने मानमरातब आणि नेमणुका करून देऊन खूष केले. दुसऱ्या दिवशी सकाळी दाऊदखानाने आपल्या पुतण्याचे प्रेत गुलबर्ग्याकडे रवाना केले. यानंतर त्या ठिकाणी २–३ दिवस मुक्काम करून मोठ्या राजेशाही इतमामाने सर्व सैन्याला बरोबर घेऊन दाऊदखानाने स्वतः राजधानीकडे प्रयाण केले.

( ६६ ) मुजाहिदशहाचा मृत्यू जेमतेम ३ वर्षांच्या कारकिर्दीनंतर जिल्हज
जिल्हज १७ महिन्याच्या १७ तारखेला हिजरी ७७९ या वर्षी रात्री झाला.
हिजरी ७७९ हाजी महमद कन्दहारी याबाबत असे सांगतो की, मुजाहिदशहाला
एप्रिल १४ ज्या जखमेमुळे मृत्यु आला ती जखम महमदशहा बहमनीच्या
इ. स. १३७८ दंडधारी मुबारक याच्या मुलाकडून केली गेली. यातील सत्य
ते [४५*] एक परमेश्वरच जाणे.

## दाऊदशहा बहमनी [४६*]

( ६७ ) दक्षिणेचे इतिहासकार असे सांगतात की जेव्हा मुजाहिदशहाच्या खुनाची बातमी सर्व दूर पसरली तेव्हा राज्याच्या सर्व भागात बखेडे [ २ ] (३४२) माजले. सफ्दरखान आणि आजम हुमायून हे विजापूर येथे पोहोचले होते. त्यांनी एकत्रित होऊन गुलबर्ग्याकडे कूच केले. मृत सुलतानाचा देह त्यांनी बघितला, आणि ते तसेच एलिचपूर आणि दौलताबादकडे परत फिरले. विजापूर येथे असलेले सर्व शाही हत्ती आणि घोडे त्यांनी आपल्याबरोबर नेले. त्याच वेळी त्यांनी दाऊदशहाला पत्र लिहून कळविले की, आम्ही आमच्या सैनिकांना ताजेतवाने करण्यासाठी आपापल्या जिल्ह्यांकडे जात आहोत आणि अत्यंत अधिरतेने आम्ही आपल्याकडून येणाऱ्या कृपापूर्ण हुकूमांची वाट पाहात राहू. ज्यावेळी आम्ही दरबारात हजर राहावे अशी आपल्याला जरुरी भासेल त्यावेळी यत्किंचितही वेळ न मोडता आम्ही ताबडतोब दरबारात हजर होऊ. मुजाहिदशहाच्या खुनाची बातमी जेव्हा विजयनगरच्या रायाच्या

फौजेला कळली तेव्हा त्यांनी त्याबद्दल आनंदोत्सव साजरा केला. कृष्णा नदीपर्यंतचा सर्व प्रदेश त्यांनी व्यापला आणि रायचूरच्या किल्ल्यासमोर येऊन ते ठाण मांडून बसले. गुलबर्ग्याच्या प्रजाजनामध्येही दोन तट पडले. एका पक्षाने दाऊदशहाचा पाठपुरावा केला तर दुसऱ्याने महमूदचा. हा महमूद म्हणजे अल्लाउद्दीन हसन गंगू [ २ ] (३४३) याचा सर्वांत धाकटा मुलगा. मुजाहिदशहा गादीवर आल्यानंतर त्याला गुलबर्ग्याच्या किल्ल्यात बंदिस्त करून ठेवण्यात आले होते.

( ६८ ) या प्रसंगी मुख्य वजीर मलिक सैफुद्दीन घोरी याने असा प्रस्ताव मांडला की राज्यात जर दुफळी माजली तर त्यामुळे राज्याचा विनाश ओढवेल आणि म्हणून त्याने असा सल्ला दिला की मृत सुलतानाचा दाऊदशहा हा अगदी जवळचा नातेवाईक आहे. त्याने एवीतेवी आपल्या मस्तकावर राजमुकुट ठेवला आहे. तेव्हा त्यालाच सुलतान म्हणून मानून यादवी युद्ध टाळण्याची कसोशी करावी. बहमनी घराण्याचा पहिला वजीर आणि त्या घराण्याचा प्रमुख आधारस्तंभ म्हणून मलिक सैफुद्दीन याचे दरबारी अधिकारी आणि प्रजाजन यांजवर वजन होते. त्या सर्वांनी आणि त्याचप्रमाणे जनानखान्यातील सर्व स्त्रियांनी त्याने दिलेला सल्ला मानण्याचे ठरविले. याला अपवाद म्हणजे खून झालेल्या मुजाहिदशहाची बहीण. ही म्हणजे खुद्द सैफुद्दीन घोरीचीच नात होती. तिने आपल्या बापाचा धिक्कार केला आणि आपल्या नातवाच्या खुनाबद्दल सूड घेण्यास त्याला सांगितले.

( ६९ ) मलिक सैफुद्दीन याने दाऊदशहाच्या नावे खुत्बा वाचला आणि आपल्या-बरोबर सर्व अमीरउमराव, धर्मशास्त्रज्ञ आणि इतर मानकरी आणि सरदार दरकदार यांना घेऊन तो दाऊदशहा हा कुलबर्ग्याजवळ येऊन पोहोचला तेव्हा त्याला सामोरा गेला. त्याने मोठ्या इतमानाने त्याला शहरात आणले. तिथे दाऊदशहा याने तख्त इ फिरोजा या सिंहासनावर पदार्पण केले. मलिक सैफुद्दीन याने विनंती केल्यावरून दाऊदशहाने त्याला अधिकार संन्यास घेण्याची परवानगी दिली. त्याने स्वतः राज्याची सर्व सूत्रे आपल्या हाती घेतली. राज्याचे सर्व अमीरउमराव त्याच्या आज्ञा मानू लागले आणि सर्व राज्यात त्याच्या अधिकाराचा जम बसला असे दिसून आले. परंतु मुजाहिदशहाची बहीण रुहपरवर आगा हिने मात्र त्याची सत्ता कबूल करण्याचे साफ नाकारले. दाऊदशहाने तिचे मन वळविण्यासाठी आपल्या प्रयत्नांची पराकाष्ठा केली. परंतु त्याने दाखविलेल्या सर्व प्रलोभनांना तिने आपल्या आडमुठेपणानेच उत्तर दिले. जनानखान्यात तिच्या शब्दाला अतिशय मान देत आणि महमदशहाच्या [ २ ] (३४४) मृत्यूनंतर तीच जनानखान्याची प्रमुख आहे अशी सर्वांची धारणा होती. त्यामुळे तिला योग्य तो मान देणे आणि तिची आदब राखणे याशिवाय दाऊदशहाला दुसरा मार्ग नव्हता. अखेर मुजाहिदशहाच्या मर्जीतील आणि लोभातील एका तरुण माणसाचे मन तिने वळविले आणि आपल्या प्राणाचे बलिदान देऊन आपल्या धन्याच्या रक्ताचा बदला घेण्यासाठी त्याला आव्हान केले.

(७०) २१ मोहरम हिजरी ७८० या दिवशी दाऊदशहा हा गुलबर्गा शहरातील सुप्रसिद्ध मशिदीत नमाज पढण्यासाठी जात होता. त्याच्याबरोबर खान महमद हा होता. त्याच्या पाठोपाठ त्याचा मारेकरीही निघाला. दाऊदशहा नमाजाची प्रार्थना म्हणण्यासाठी जमिनीवर वाकला आहे या संधीचा फायदा मारेकऱ्याने घेतला आणि तो ताबडतोब दाऊदशहाच्या पाठीमागे जाऊन उभा राहिला. दाऊदशहावर प्रहार करण्यासाठी त्याने आपले शस्त्र उपसले आणि दाऊदशहाच्या सेवकांना हा काय करीत आहे याचे आकलन होण्याचे अगोदरच त्याने दाऊदशहावर इतका [४७*] भयानक वार केला की दाऊदशहा जागचे जागी गतप्राण झाला. मारेकऱ्याने दाऊदशहावर केलेला खुनी हल्ला खान महमद याने बघितला. त्याने मारेकऱ्याला पळून जाण्याची संधी दिली नाही. त्याने आपल्या तलवारीच्या एकाच फटक्याने मारेकऱ्याचे शिर धडावेगळे केले. दाऊदशहाची कारकीर्द फक्त १ महिना आणि ५ दिवस एवढीच झाली.

मोहरम २१
हिजरी ७८०
मे १९
इ. स. १३७८

## महमूदशहा बहमनी पहिला [४८*]

(७१) दाऊदशहाच्या मृत्यूनंतर खान महमद याने मरहूम [२] (३४५) सुलतानाचा मुलगा महमद संजर याला सिंहासनावर बसविण्याचे ठरविले. त्यावेळी त्याचे वय ९ वर्षांचे होते. ह्या उद्देशाने त्याने आपले आश्रित जमविले आणि तो राजवाड्याकडे निघाला. ह्या बेताची बातमी रुहपरवर आगा हिला कोणाकडून कळली. तिने दरवाजे बंद केले आणि अशी प्रतिज्ञा केली की जोपर्यंत माझ्या जीवात जीव आहे तोपर्यंत ज्या विश्वासघातक्याने आपल्या सुलतानाचा आणि माझ्या भावाचा खून केला त्याचा मुलगा सुलतान म्हणून मी गादीवर येऊ देणार नाही. त्याच वेळी तिने अल्लाउद्दीनशहाचा सर्वांत धाकटा मुलगा महमूद हा गादीचा वारस आहे अशी द्वाही फिरवली. यावेळी महमद संजर हा राजवाड्यात होता आणि तो राजकन्येच्या पूर्णपणे ताब्यात होता. साहजिकच आपण आता कसे वागावे याबद्दल खान महमद हा सचिंत झाला. तो मलिक सैफुद्दीन घोरी याच्या घरी गेला आणि त्याने आपल्या पक्षाला मिळावे यासाठी त्याचे मन वळविण्याची पराकाष्ठा केली. यावर उत्तरादाखल मलिक सैफुद्दीन याने त्याला सांगितले की, " महमद संजर आणि राजपुत्र महमूद हे दोघेजण रुहपरवर आगा हिच्या ताब्यात आहेत. तेव्हा कलह टाळावयाचा असेल तर मला असे वाटते की, गादीवर कोणाला बसवावयाचे याचा निर्णय घेण्याचे काम तिच्याकडे [२] (३४६) सोपवावे. " राज्यातील सर्व मुसलमान आणि हिंदू धर्माचे अमीरउमराव आणि प्रजाजन हे मलिक सैफुद्दीन घोरी याच्या सल्ल्यानुसारच वागतील याची खान महमद याला जाणीव होती. म्हणून त्याने सैफुद्दीन घोरी याच्या सल्ल्याला मान तुकवली आणि त्याच्या समवेत तो राजवाड्याकडे गेला. इकडे राजवाड्यात महमद संजर याला

गादीवर आणण्याचे प्रयत्न होऊ नयेत म्हणून राजकन्येने त्याला आंधळा केले आणि राज्याचे वजीर आणि प्रमुख अधिकारी यांच्या अनुमतीने महमूद याला गादीवर बसविले.

(७२) महमूदशहा हा स्वभावतःच वृत्तीने दयाळू, गुणी आणि न्यायी असा होता. राज्याच्या कारभाराबाबत त्याने दिलेला निर्णय हा बहुधा अचूक असे. आपल्या कारकिर्दीच्या सुरुवातीला त्याने नुकत्याच झालेल्या बंडाला प्रोत्साहन देणारा म्हणून खान महमद याला सागरच्या किल्ल्यात कैदेत ठेवले. काही काळ लोटतो न लोटतो तोच खान महमद हा तुरुंगातच मरण पावला. मुजाहिदशहाचा जो खून झाला होता त्या बाबतच्या कटाचा एक साथीदार या आरोपावरून त्याने मसूदला देहांताची शिक्षा दिली. त्याचप्रमाणे त्याने मलिक सैफुद्दीन घोरी यांची खूपच विनवणी केली आणि राज्याचे वजीरपद आणि राजधानीच्या सुभेदारीचे अधिकार घेण्याविषयी त्याचे मन वळविले. राज्यकारभाराच्या कोणत्याही बाबींत त्याच्या सल्ल्याशिवाय सुलतान पुढे पाऊल टाकत नसे. सुलतानाचे हे धोरण अतिशय फलदायी असे ठरले. कारण त्याच्या कारकिर्दीत राज्यामध्ये कोणत्याही तऱ्हेचा गोंधळ निर्माण झाला नाही किंवा सरकारच्या कर्तव्यदक्षतेत कसल्याही प्रकारची शिथिलता आली नाही.

(७३) महमूदशहाचा राज्याभिषेक झाल्यानंतर बहादूरखान, सफ्दरखान आणि आजम हुमायून [४९०] हे तिघेजण त्वरेने राजधानीकडे आले. तेथे त्यांनी [२] (३४७) नवीन सुलतानापाशी राजनिष्ठेची शपथ घेतली आणि सुलतानाच्या अभिनंदनार्थ योग्य ते नज़राणे अर्पण केले. त्याचप्रमाणे विजयनगरच्या राजाने रायचूरचा वेढा उठविला आणि महमदशहा गाजी याच्या कारकिर्दीत कबूल केलेली खंडणी सुलतान महमूद याला देण्याचे कबूल केले.

(७४) महमूद याला काव्याची अतिशय आवड होती आणि त्याने स्वतः काही उत्कृष्ट कविता रचल्या होत्या. पर्शियन आणि अरबी या भाषा तो अस्खलितपणे बोलत असे. संपत्तीच्या मदाने तो कधी धुंद झाला नाही किंवा संकटाच्या अथवा निराशेच्या प्रसंगी तो दुःखाच्या कधी पूर्णपणे आधीनही झाला नाही. एका पत्नीशिवाय इतर स्त्रियांजवळ त्याने संबंध ठेवला नाही. तत्त्ववेत्त्या विद्वानांच्या मतांबद्दल तो अतिशय आदराची भावना दाखवी. इतकेच नव्हे तर त्यांच्या संगतीत त्याच्या मनाला आनंदाचे भरते येई. त्याच्या कारकिर्दीत अरबस्तान आणि इराण येथील कवींनी दक्षिणेत आश्रय घेतला, आणि त्याच्या उदारतेच्या छत्राखाली आपल्याला सामावून घेतले. त्यावेळी मिर-फैज-उल्ला अंजू हा मुख्य न्यायाधीशाच्या पदावर होता. त्याने एकदा सुलतानासमोर **गझल** म्हणून दाखविली. त्याबद्दल सुलतानाने त्याला एक हजार सोन्याच्या मोहरा बक्षीस दिल्या आणि संपत्ती आणि मानसन्मान याची त्याच्यावर खैरखैरात करून त्याला त्याच्या देशाकडे जाऊन राहण्याची परवानगी दिली. सुलतानाची आवडनिवड, त्याची मधुर वाणी आणि

त्याचा दानशूरपणा या गोष्टींची प्रसिद्धी इतक्या दूरवर पसरली की शिराजचा सुप्रसिद्ध कवी ख्वाजाहाफिज याने दक्षिणेला भेट देण्याचा निश्चय केला. परंतु त्याच्या इकडे येण्यात दैवयोगाने अशा काही गोष्टी घडून आल्या की त्याच्या इथे येण्यात अडथळे निर्माण झाले. ती हकिकत पुढे सांगितली आहे.

(७५) मिर-फैज-उल्ला अंजू याने या सुप्रसिद्ध कवीकडे सुलतानातर्फे एक बक्षिसी आणि स्वतःतर्फे एक पत्र पाठविले. त्यात त्याने त्याला असे वचन दिले की, "आपण जर कुलबर्ग्याला याल तर आपल्याला मनपसंत अशी बिदागी देण्यात येईल आणि सिराज येथे आपल्याला सुरक्षितपणे पोहोचविण्याची हमी घेतली जाईल." अशा प्रकारची अभिवचने मिळाल्यामुळे हाफिज याने दक्षिणेत येण्यास आपली अनुमती दिली. त्याच्याकडे बहमनी सुलतानाकडून ज्या काही वस्तू पाठविण्यात आल्या होत्या त्या त्याने आपले नातेवाईक आणि ऋणको यांच्याकडे वाटून टाकल्या. नंतर त्याने सिराज सोडले आणि तो लार येथे सुखरूप पोहोचला. तेथे त्याच्या एका मित्राला चोरट्यांनी लुबाडले होते. त्याला त्याने आपल्या जवळील रोख पैसे देऊन [२] (३४८) मदत केली. लारपासून ओर्मसपर्यंत त्याच्याबरोबर ख्वाजा-जैनूल-आबी-दिन हमदानि आणि ख्वाजा-महमद-काजीरुनी हे दोघेजण सोबत होते. तेही हिन्दुस्तानला भेट देण्यासाठी निघाले होते. दक्षिणेतून ओर्मस येथे बहमनी सुलतानाची अनेक शाही जहाजे आली होती. त्यापैकी एका जहाजात तो वरील मंडळींसह प्रवासासाठी सज्ज झाला. परंतु जहाजाने नांगर उचलून प्रवासास सुरुवात केली न केली तोच अतिशय सोसाट्याचा असा वारा वाहू लागला. त्यामुळे जहाजाला धोका निर्माण झाला आणि ते बंदराकडे परत फिरले. या वादळात हाफिजला इतका त्रास सहन करावा लागला की आपल्याला किनाऱ्यावर ठेवण्यात यावे असा आग्रह त्याने धरला आणि प्रवास करण्याचा बेत त्याने सोडून दिला. फैज-उल्ला अंजू याला देण्यासाठी त्याने आपल्या सहकाऱ्यांबरोबर पुढील कविता रचून दिल्या.

१. या पृथ्वीमातेने भाग्यरूपी देवतेच्या अनंत हस्ताने जरी सुवर्णाचा वर्षाव केला तरी माझ्या मातृभूमीत वाहणाऱ्या वाऱ्याच्या झुळकेच्या सुखद आनंदाला मी मुकतो आहे त्याची त्यामुळे भरपाई होईल का ?

२. यावर माझा मित्र उद्गारला "अरे! तू तुझ्या घरी राहा आणि एके काळी तुला अतिशय प्रिय असलेली भूमी सोडू नको. तुझी पर्णकुटी जे सिराज आहे ते सोडून इतस्ततः भटकण्याचे वेड कोणत्या मूर्खपणाने तुझ्या डोक्यात भरले आहे.

३. तू जिथे चालला आहेस त्या दरबारात तुझा योग्य आब राखला जाणार नाही. त्या दरबारातील अमाप संपत्ती जरी तुला देण्यात आली तरी प्रत्यक्ष स्वर्गातून तुला नजराण्याच्या रूपाने मिळालेल्या सुदृढता आणि सुखासीनता या देणग्यांचा तू फुकाफुकी त्याग मात्र करशील."

४. रत्नांच्या झगमगाटाने माझी दृष्टी संभ्रमित होऊन गेली. या समुद्राची प्रचंड गर्जना मी कधीच ऐकली नव्हती. परन्तु आता मी सम्यक् दृष्टीने विचार करू लागलो आहे, आणि मी कबूल करितो की, मी चुकलो आहे.

५. माझ्यासमोर मनाला भुरळ पाडणाऱ्या अभिवचनांची बरसात करण्यात आली. परन्तु एखाद्या भूल पडलेल्या माणसासारखा मी [ २ ] ( ३४९ ) चळून जाऊ का? ज्या भूमीने मला जन्म दिला तेथील मनाला ओढ घालणाऱ्या हिरवळीला मी वंचित होऊ का? ते मनाला गुंगी आणणारे मादक पेय आणि ज्यांच्यावर माझी अपार प्रीती आहे अशा सवंगड्यांचा मी त्याग करू का?

— ५ —

६. हा हाफिज, त्या शाही दरबाराच्या मिजाशीकडे ढुंकूनही बघत नाही. त्या सुखाने येणारी–गुंगी आणि शरीराचे स्वास्थ्य यातच तो समाधानी आहे. अरे! ज्याने ही संपत्ती मिळविण्यासाठी या भूतलावरील लोकांकडून ज्या मार्गांचा अवलंब केला जातो त्याकडे तिरस्काराने बघितले त्याला सोन्याने जे विकत घेता येईल त्याची काय किंमत आहे?

( ७६ ) जेव्हा फैज-उल्ला याला वरील काव्य मिळाले तेव्हा त्याने ते सुलतानाला वाचून दाखविले. ते ऐकल्यावर सुलतान अतिशय खुष झाला. त्याने असे उद्गार काढले की, "मला भेटण्याच्या उद्देशाने हाफिज आपले घरदार सोडून निघाला. साहजिकच माझ्या दानशूरपणाचा प्रत्यय आणून न देता त्याला तसेच राहू देणे हे माझ्या दृष्टीने अतिशय अयोग्य असे आहे." असे म्हणून त्याने महमद-कासिम-मशिदी याच्या हवाली एक हजार सोन्याच्या मोहरा केल्या. मशिदी हा कुलबर्गा येथील एक अतिशय विद्वान मनुष्य होता. त्याने त्याला अशी आज्ञा केली, की "सिराज येथे हाफिजला पाठविण्यासाठी स्वीकार करण्यायोग्य अशा हिन्दुस्थानात उत्पन्न होणाऱ्या वस्तूंपैकी तू काहीही खरेदी कर."

( ७७ ) महमूदशहा हा तरुण असताना त्याला अतिशय भपकेदार असा पोशाख करण्याची मोठी हौस होती. परंतु तो सिंहासनावर आल्यानंतर पांढरे स्वच्छ असे कपडे वापरू लागला. तो अनेकदा असे भाष्य करी की सुलतान हे राज्याचे केवळ विश्वस्त असतात आणि गरजेपेक्षा अधिक त्यांनी आपल्या स्वतःसाठी खर्च करणे म्हणजे त्यांच्यावर टाकलेल्या विश्वासाचा भंग करण्यासारखे आहे. त्याच्या कारकिर्दीत एकदा मोठा दुष्काळ पडला तेव्हा त्याने माळवा आणि गुजराथ येथून धान्याची ने-आण करण्यासाठी स्वखर्चाने दहा हजार बैल कामी लावले. हे धान्य त्याने अतिशय स्वल्प-किमतीत लोकांमध्ये वाटले. त्याने कुलबर्गा, बिदर, कंधार, एलिचपूर, दौलताबाद, चेऊल, दाभोळ आणि इतर काही मोठ्या शहरांमध्ये पोरक्या [ २ ] ( ३५० )

मुलांचे संगोपन करणाऱ्या शाळा उघडल्या आणि त्या व्यवस्थित चालाव्या म्हणून द्रव्याची भरपूर सोय करून ठेवली. त्याने धर्मग्रंथांचे विवरण करणाऱ्या पंडितांसाठी नेमणुका नियुक्त करून दिल्या आणि राज्यामधल्या आंधळ्यांसाठी दरमहा धर्मादाय दिला जाण्याची व्यवस्था केली. त्याने शेख-सिराज-उद्दिन याच्याकडे अतिशय जातीने लक्ष पुरविले. त्याच्या शेवटच्या आजारपणात तो वारंवार त्याच्या भेटीला जाई. त्याच्या मृत्यूनंतर तो नेहमी त्याच्या कबरस्तानाकडे जाई, त्याच्या नावे प्रार्थना करी आणि कबरस्तानाला भेट देणाऱ्या यात्रेकरूंना दानधर्म करी.

(७८) सुलतानाने लढाईच्या मार्गाचा स्वीकार करण्याऐवजी शांततेच्या, आशीर्वादाच्या छत्राचा आश्रय घेतला. त्याने आपल्या कारकिर्दीतील शांततेचे वातावरण बिघडणार नाही याबद्दल अतिशय दक्षता घेतली. त्याच्या अंगी वसत असलेल्या शहाणपणामुळे त्याला दक्षिणेतील लोकांनी ॲरिस्टॉटल ही पदवी दिली. त्याच्या एकंदर एकोणीस वर्षे, नऊ महिने आणि चोवीस दिवस एवढ्या कारकिर्दीत राज्यात फक्त एकदाच अशांततेची परिस्थिती निर्माण झाली. परंतु काही महिन्यांच्या अवधीतच या अशांततेचा उपशम करण्यात आला. ती हकिकत पुढीलप्रमाणे होती :-

(७९) बहाउद्दिन नावाच्या एका हलक्या कुळात जन्मलेल्या आणि दौलताबादचा रहिवासी असलेल्या एका इसमाला सागर किल्ल्याचा किल्लेदार म्हणून नेमण्यात आले. त्याचे दोन मुलगे महमद आणि ख्वाजा यांना सुलतानाने आपल्या खास विश्वासात घेतले आणि अखेर उमरावपदावर त्यांची बढती करण्यात आली. त्यांना इतके सामर्थ्य प्राप्त झाले की त्यांच्याबद्दल त्यांच्या प्रतिस्पर्ध्यांच्या मनात मत्सराची भावना निर्माण झाली. त्यांनी या भावांची सुलतानाकडे बदनामी केली. त्यांच्या अपेक्षेप्रमाणे या बदनामीमुळे सुलतानाचे मन त्या दोघांविषयी कलुषित झाले. महमद आणि ख्वाजा यांना आपल्या जीविताच्या सुरक्षिततेबद्दल भीती वाटू लागली. त्यांनी बंडाचा पुकारा केला आणि एक हजार अनुयायी घेऊन सागरकडे पलायन केले. त्या दोघांनी आपल्या बापाची एकंदर परिस्थितीबद्दल गैरसमजूत करून दिली. परिणामी तोही आपल्या मुलांच्या बंडात सामील झाला. त्याने सैन्य उभारले. दोन वेळा त्याच्यावर पाठविण्यात आलेल्या शाही फौजेचा त्याने पराभव केला आणि भरपूर लूट मिळवली. त्यामुळे त्याच्या सामर्थ्यात अधिकच वाढ झाली.

(८०) तिसऱ्या प्रसंगी महमूदशहाने ५० ❒ युसुफ अजदार नावाचा एक तुर्की अधिकारी सुसज्ज असे सैन्य देऊन बंडखोरांवर रवाना केला. तो सागर [२] (३५१) समोर दोन महिने तळ देऊन बसला होता. त्या दरम्यान बंडखोरांनी अनेक वेळा जीवावर उदार होऊन त्याच्यावर हल्ले चढविले. विशेषतः एके दिवशी मोठा भाऊ महमद याने आपल्या चारशे शूर अनुयायांना घेऊन शाही सैन्याच्या पिछाडीवर हल्ला चढविला आणि मोठे यश संपादन केले. या धुमश्चक्रीत काळापहाड नावाच्या एका अधिकाऱ्याने महमदच्या हाताला जखम केली. महमदने देखील त्याच्यावर हल्ला

करून त्याला निकामी केले. महमदच्या स्वारांनी पळ काढला तरी देखील त्याने घोड्यावरून पाय उतारा होण्याचे नाकारले. अखेर बहाउद्दीन आपल्या मुलाच्या मदतीला येऊन दाखल झाला. पुन्हा रणधुमाळी सुरू होऊन ती रात्र पडेपर्यंत चालली. सरतेशेवटी काळोखाच्या बुरख्याआड बहाउद्दीनने माघार घेतली. त्या दोघा भावांनी मात्र नेहमीच्या प्रथेच्या विरुद्ध वर्तन करून ती सारी रात्र मूर्खपणाने किल्ल्याबाहेर असलेल्या एका खंदकाच्या टोकावर बसून घालविली. शाही सैन्याशी संगनमत करून असलेल्या किल्ल्यावरील शिबंदीने या संधीचा फायदा घेऊन सर्व परिस्थिती युसुफ अजदार याच्या कानावर घातली आणि एका दरवाजातून त्याच्या सैनिकांना आत प्रवेश देण्याचे आणि मुख्य बंडखोर बहाउद्दीन याला मारण्याचे कबूल केले. ही कामगिरी पार पाडण्यासाठी युसुफ अजदार याने अनेक माणसे जमा केली आणि त्यांना किल्ल्याकडे रवाना केले. त्यांना त्याने असे सांगितले की किल्ल्यावरील शिबंदीने बहाउद्दीनचे मस्तक जर तुमच्या ताब्यात दिले तर तुम्ही किल्ल्यात प्रवेश करून तो ताब्यात घेण्याची जोखीम अंगावर घ्या; नाहीतर पराङ्मुख होऊन छावणीकडे परत फिरा. ठरलेल्या वेळी आणि ठिकाणी किल्ल्यातील शिबंदीने बहाउद्दीनचे मस्तक बाहेर फेकले. त्याबरोबर शाही सैनिकांनी किल्ल्यात प्रवेश करून किल्ल्याचा ताबा आपल्याकडे घेतला. त्याच वेळी पूर्वी ठरलेल्या खुणेप्रमाणे बाहेर असलेल्या शाही सैनिकांनी त्या दोन्ही भावांवर हल्ला केला. जीवावर उदार होऊन लढत असताना ते दोघे भाऊ मरण पावले. [ २ ] ( ३५२ ) महमूदशहाच्या कारकिर्दीत शिक्षेची तलवार म्यानातून काढली जाण्याचा हा पहिलाच आणि शेवटचाच प्रसंग होता.

( ८१ ) ह्या विजयानंतर थोडाफार काळ लोटला नाही तोच सुलतानाला एका व्याधीतून उद्भवलेल्या तापामुळे २१ रज्जब, हिजरी ७९९ या वर्षी मृत्यू आला. त्याच्या दुसऱ्याच दिवशी बहमनी घराण्याचा अतिशय विश्वासू असा सेवक मलिक सैफुद्दीन घोरी हा मरण पावला. त्याचे वय १०७ वर्षांचे होते. त्याने आपली सर्व हयात बहमनी घराण्याच्या चाकरीत घालविली होती. त्याने प्रकट केलेल्या इच्छेप्रमाणे त्याला सुलतान अल्लाउद्दीन हसन गंगू बहमनी यांची कबर असलेल्या आवारात पुरण्यात आले. त्याच्या कबरीवर एक दगडाचा ओटा बांधण्यात आला.

रज्जब २१
हिजरी ७९९
एप्रिल २०
इ. स. १३९७

( ८२ ) असे नमूद करण्यात आले आहे की कुराणात सांगितलेल्या नीतिनियमांचा महमूदशहा हा कट्टा पुरस्कार करणारा होता. अगदी बारीकसारीक मुद्द्यांबाबत निष्काळजीपणा दाखविलेला तो खपवून घेत नसे. साहजिकच सर्व न्यायाधीशांना नीतिमत्तेच्या प्रत्येक मुद्द्याबाबत जे जे काही पतनाचे प्रसंग घडत त्या सर्वांची दखल घेणे भाग पडत असे. एके दिवशी एका व्यभिचारी स्त्रीला शिक्षा देण्यासाठी म्हणून न्यायालयात आणण्यात आले. जेव्हा न्यायाधीशाने “ इतका भयंकर गुन्हा घडल्याचा आरोप तुझ्यावर कसा आला ? ” असा प्रश्न तिला विचारला तेव्हा तिने उत्तर केले:

की " न्यायाधीश महाराज ! मी केलेले कृत्य बेकायदेशीर आहे असा विचार माझ्या मनामध्ये कसा येईल ? कारण एक पुरुष चार स्त्रिया करू शकतो हे मी जेव्हा पाहिले तेव्हा त्याच न्यायाने मीही चार नवरे का करू नये असा विचार माझ्या मनात आला. जर का माझी चूक असेल तर माझे चुकले आहे असे मी कबूल करीन आणि त्याच गुन्ह्याची पुनरावृत्ती करण्याचे पाप मी करणार नाही. " तिच्या ह्या उत्तरामुळे न्यायाधीश गोंधळात पडला आणि तिच्या अपराधाबद्दल तिला नुसती ताकीद देऊन त्याने तिला सोडून दिले.

महमूदशहा बहमनी याने एकंदर एकोणीस वर्षे नऊ महिने चोवीस दिवस राज्य केले.

## गियासुद्दीनशहा बहमनी [५१*]

( ८३ ) ज्यावेळी दक्षिण देश त्या गुणवान आणि न्यायी अशा [ २ ] ( ३५३ ) महमूदशहा बहमनीला मुकला त्यावेळी त्याचा मोठा मुलगा गियासुद्दीन हा सिंहासनावर बसला. त्यावेळी त्याचे वय १७ वर्षांचे होते. त्याच्या बापाने घालून दिलेल्या रूढीला अनुसरून तो आपल्या सर्व दरबारी मंडळींबरोबर अतिशय सौजन्याने वागला. बहमनी घराण्याचे जुने सेवक आणि बहमनी घराण्यातील मंडळींना नेहमीच ज्यांनी मदत केली अशांवर त्याने अतिशय कृपादृष्टी दाखविली आणि त्यांच्यावर मानमरातबाची खैरखैरात केली. या सुमारास सफदरखान सिस्तानी याच्या मृत्यूची बातमी येऊन पोहचली. तेव्हा त्याचा मुलगा सलाबतखान याला सुलतानाने मजलीस अली ही पदवी दिली. त्याचबरोबर त्याच्या बापाचे सर्व अधिकार आणि जहागिरी त्याला बहाल केली आणि त्याला वऱ्हाडात जाण्यास निरोप दिला. आजम हुमायूनचा मुलगा महमदखान याचा मुख्य वकील आणि पेशवा [५२ □] व अहमद बेग कजविनी याची बढती रक्षकदलांच्या मुख्याधिकारपदी म्हणजे मिर नोबत या जागेवर करण्यात आली. सुलतानाने त्याच्याकडे अतिशय जातीने खास करून लक्ष पुरविले. यामुळे सुलतानाच्या अंतःपुरातील एक प्रमुख तुर्की गुलाम लालचीन [५३ *] हा त्यांच्याबद्दलच्या मत्सराने पेटून निघाला. लालचीनची इच्छा स्वतःसाठी मुख्य वकील आणि पेशवा हे अधिकाराचे पद आपल्याला मिळावे एवढीच नव्हती तर आपला मुलगा हसनखान [ २ ] ( ३५४ ) याची नेमणूक मिर नोबत या अधिकारपदावर व्हावी असे त्याला वाटत होते. वरील गोष्टीमुळे त्याच्या पदरी निराशा पडली. त्याने आपला असंतोष आणि नामर्जी उघडउघड प्रकट केली. यावर सुलतानाने त्याची चांगलीच खरडपट्टी काढली. एकदा सुल्तान त्याच्या समक्ष असेही म्हणाला की मोठमोठ्या घराण्यातील पुरुषांवर ज्या जागांचा अधिकार चालतो अशा जागांवर गुलामाची नेमणूक करण्यासाठी निवड करणे म्हणजे अतिशय अन्यायाचे आहे. कारण त्यांच्यापैकी पुष्कळजण खुद्द पैगंबराच्या वंशजांपैकी होते. माझ्या पूर्वजांनी या बाबतीत जे नियम घालून दिलेले आहेत त्या

नियमाच्या बाबतीत मी माझ्या पुरते बोलावयाचे म्हटल्यास कधीही उल्लंघन केले नाही. याबद्दल मला दुःख होत नाही.

( ८४ ) लालचीनने सुलतानाने काढलेले हे उद्गार आपल्या मनामध्ये जपून ठेवले, आणि गुप्तपणे सुलतानावर सूड कसा घेता येईल याचा विचार तो करू लागला. उघडउघड मात्र आपली मानखंडना झालेली आहे असे त्याने यत्किंचितही दाखविले नाही. लालचीनला एक मुलगी होती. तिचे सौंदर्य अप्रतिम होते. गायनामध्ये तिचे कौशल्य वाखाणण्यासारखे होते तितकीच तिची हजरजबाबीपणाबद्दल प्रसिद्धी होती. सुलतानाला ती आपल्याला प्राप्त व्हावी अशी इच्छा निर्माण झाली आणि तिला मिळविण्यासाठी म्हणून त्याने गुप्तपणे खटपट सुरू केली. सुलतानाला आपल्या मुली-बद्दल इच्छा निर्माण झाली आहे हे लालचीन याच्या ध्यानात आले. त्याने तरुण सुलतानाला करमणुकीच्या कार्यक्रमासाठी म्हणून आमंत्रण केले. भोळ्या सुलतानाला असे वाटले की या प्रसंगी लालचीन आपली मुलगी आपल्याला अर्पण करील. लालचीनने मोठ्या भपक्यात आपल्या शाही पाहुण्यांची करमणूक केली. सुलतानाने मद्याचे पेले रिते केले होते. सुलतान त्या धुंदीत असताना लालचीनने खुणा करून सुलतानाला सांगितले की तुम्ही बरोबर आणलेल्या आपल्या शिपायांना येथून निघून जाण्याची आज्ञा करा. हा आपल्याला एक शुभशकुनच झाला आहे अशी समजूत सुलतानाने करून घेतली. आपल्या गुलामाची सुंदर मुलगी आपल्या ताब्यात केव्हा एकदा येते याबद्दल सुलतान अतिशय उत्सुक झाला होता. दारू प्यायल्यामुळे बेहोषीच्या धुंदीत त्याचे भान हरपले होते. त्याने अविचाराने ती खोली सोडून जाण्याचा आपल्या अनुचरांना हुकूम दिला. लालचीनने दारूचा पुरवठा करण्यासाठी फक्त एक खोजासरा सुलतान असलेल्या खोलीत ठेवला आणि तो स्वतः आपल्या जनानखान्याच्या दिशेने गेला. थोड्या वेळानंतर हातामध्ये नग्न खंजीर घेऊन त्याने त्या खोलीत प्रवेश केला. सुलतान जरी दारूच्या धुंदीत होता तरी त्याने लालचीनला प्रतिकार करण्याचा प्रयत्न केला. परंतु सरळ चालणे अशक्य झाल्यामुळे तो [ २ ] ( ३५५ ) खाली कोसळला, आणि जिन्याच्या पायऱ्या गडगडत खाली गेला. लालचीनने त्याचे केस धरले, आणि आपल्या खोजासराच्या मदतीने सुलतानाला पाठीवर उताणे पाडले. नंतर आपल्या खंजिराच्या अणकुचीदार टोकाने त्याने सुलतानाचे डोळे फोडले. हे भयानक कृत्य केल्यानंतर जणू काही सुलतानाच्या आज्ञेने आपण त्यांना बोलावीत आहोत असा आभास निर्माण करून त्याने सुलतानाच्या अनुचरांना एका पाठोपाठ एक असे आत बोलाविले. ते आत शिरताच प्रत्येकाला त्याने ठार मारले. अशा तऱ्हेने त्याने एकंदर २४ माणसांचा वध केला. या २४ माणसांत बहुतेकजण सुलतानाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांपैकी होते. साहजिकच खुनी लालचीनच्या हलकट बेतांना प्रतिकार करू शकेल अशी हिंमत असलेली एकही व्यक्ती राज्यात शिल्लक राहिली नाही. सुलतान गियासुद्दीन याचा भाऊ शम्सउद्दीन याला लालचीन

याने सिंहासनावर बसविले आणि गियासुद्दीन याला त्याने सागरच्या किल्ल्यावर

रमजान १७ हिजरी ७९९ जून ९ इ. स. १३९६ — बंदिवासात ठेवण्यासाठी रवाना केले. ही घटना १७ रमजान हिजरी ७९९ या वर्षी घडली. गियासुद्दीन याने एकंदर फक्त १ महिना आणि २० दिवस एवढेच राज्य केले.

## शम्सउद्दीन बहमनी

(८५) शम्सउद्दीन जेव्हा सुलतान पदावर आला तेव्हा त्याचे वय [२] (३५६) १५ वर्षांचे होते. आपल्या भावावर जी दुर्दशा ओढविली होती तिचा त्याने भयंकर धसका घेतला, आणि आपण नामधारी का होईना पण सुलतान आहोत यात समाधान मानले. लालचीन याला आता मलिक नायब[४४] हा किताब मिळाला. सरदारांपैकी जे त्याच्या तलवारीच्या तडाख्यातून सुटले होते त्यांनी लालचीन याला शरणागती देण्यातच आपले जीवन सुरक्षित राहील असा विचार केला आणि लालचीनच्या अधिकारापुढे मान तुकवली. शम्सउद्दीन याची आई ही राजघराण्यात येण्यापूर्वी गुलाम होती. आपल्या मुलाचे प्राण सुरक्षित कसे राहतील या काळजीने तिने लालचीन याच्याबरोबर अतिशय सौजन्याची वागणूक ठेवली आणि त्याला योग्य तो मान दिला. "लालचीन याने शिफारस केलेली गोष्ट तू कृतीत उतरवत जा. कारण तुला जो राजमुकुट मिळाला आहे तो केवळ याच्यामुळेच," असा उपदेश तिने त्याला केला. तिने त्याला असेही सांगितले की, तुझ्या उपकारकर्त्या-विरुद्ध तुला अनेकजण प्रतिकूल आणि मत्सरग्रस्त अशा सूचना करतील त्याकडे तू पूर्णपणे दुर्लक्ष करीत जा. लालचीन यानेही राजमातेबरोबरची आपली वागणूक सभ्यतेची ठेवली. तिला तो अतिशय मान देत असे. वेळोवेळी तिच्याकडे तो अतिशय मौल्यवान भेटी पाठवी. तिचा विश्वास आणि मर्जी संपादन करावी या [२] (३५७) हेतूने त्याने सर्व तऱ्हेच्या उपायांचा अवलंब केला.

(८६) दाऊदशहा बहमनी याला एकंदर तीन मुलगे होते. ते म्हणजे महमद संजर (ह्याला राजकन्या रूहपरवर आगा हिच्या आज्ञेवरून आंधळा करण्यात आल्याची हकीकत यापूर्वीच सांगण्यात आली आहे.), फिरोजखान आणि अहमदखान. शेवटच्या दोघाजणांची आई एकच होती. आपल्या बापाच्या मृत्यूच्या वेळी त्यांची वयं ६ आणि ७ वर्षांच्या दरम्यान होती. त्यांचा चुलता महमूदशहा यांना त्याने पितृप्रेमाच्या वात्सल्याची वागणूक दिली होती, आणि त्यांच्या दर्जाला शोभेल असे शिक्षण त्याने त्यांना दिले होते. मिर फैजुल्ला अंजू शिराजी याला त्याने त्यांचा शिक्षक म्हणून नेमले होते आणि लष्करी कवायती आणि डावपेच यामध्ये ते पूर्णपणे प्रावीण्य संपादन करतील अशी खबरदारी त्याने घेतली होती. त्यावेळी महमूदशहा याला मुलगा नसल्याने त्याने प्रत्येक राजपुत्राला आपली एक एक मुलगी लग्नामध्ये दिली. पुष्कळदा

तो असेही म्हणे की फिरोजखान हाच माझा वारस आहे. अनेकदा तो फिरोजला आपल्या शेजारी सिंहासनावर बसवून घेई आणि असे म्हणे की माझ्या घराण्यातील दुसरा कोणीही इतका लायक नाही किंवा माझ्या घराण्याचे तेज अधिक वृद्धिंगत करील अशी दुसऱ्या कोणाचीहि कुवत नाही. जेव्हा परमेश्वराच्या कृपेने महमूदशहाला मुलगे झाले तेव्हा त्याने त्यांपैकी वडील मुलगा गियासुद्दीन याला आपला वारस नेमले आणि मरतेसमयी त्याने फिरोजखान आणि अहमदखान यांच्याकडून गियासुद्दीन-बरोबर आपण एकनिष्ठ राहू आणि त्याच्या आज्ञांचे पालन करू अशी शपथ घेवविली. शपथ घेतल्याप्रमाणे त्या दोघांनी अतिशय आज्ञाधारकपणे आणि इमानीपणाने त्याची चाकरी केली.

(८७) लालचीन याने गियासुद्दीन शहा याला सिंहासनावरून काढून टाकले आणि त्याला आंधळा केले याबद्दल अतिशय संताप येऊन त्याच्या बहिणींनी आपल्या नवऱ्यांना त्याच्या मृत्यूचा सूड घेण्याबद्दल चेताविले परंतु त्यांच्या बेताचा लालचीन याला सुगावा लागला आणि त्याबद्दल त्याने सुलतानाकडे तक्रार करून त्यांच्यावर राजद्रोहाचा आरोप केला. असे करण्यात त्याचा उद्देश असा होता की त्यामुळे सुलतानाला आपण सिंहासनावर राहतो किंवा नाही याबद्दल भय वाटेल आणि तो त्यांना ठार मारण्याबद्दलचा हुकूम सुलतानापासून मिळवू शकेल. या आरोपाकडे शम्सउद्दीनशहाने पूर्णपणे दुर्लक्ष केले तेव्हा नाईलाजाने ही परिस्थिती [२] (३५८) त्याने राजमातेच्या कानावर घातली. त्याने असे प्रतिपादन केले की तुम्ही जर या दोन भावांचा निकाल लावला नाही तर तुमच्या मुलाची सिंहासनावरून उचल-बांगडी होईल. तुम्हाला मजबद्दल अतिशय आपुलकी वाटते असा सर्वांना संशय आहे. त्यामुळे तुमच्यावरही भयानक प्रसंग गुजरण्याची भीती निर्माण होईल. लालचीनने जी कारणमीमांसा दिली तिचा परिणाम शम्सउद्दीन पेक्षाही त्याच्या आईवर अधिक-तर झाला. तिच्याशी पुष्कळ वादविवाद घातल्याबद्दल तिने अखेर फिरोजखान आणि अहमदखान यांना पकडण्याच्या बेताला नाईलाजाने आपली संमती दिली. परंतु आपण पकडले जाणार या बेताचा त्यांना अगोदरच सुगावा लागला आणि ते कुलबर्ग्याहून पळून सागरच्या किल्ल्याकडे निघून गेले.

(८८) राजघराण्याचा एक गुलाम सुद्दू हा सागरच्या किल्ल्याचा किल्लेदार होता. तो श्रीमान असून अतिशय सामर्थ्यशाली होता. त्याने उघडउघड आणि मोठ्या प्रेमाने राजपुत्रांचे स्वागत केले आणि राजपुत्रांविषयी आपल्याला अतिशय आपुलकी वाटते असे ज्यामुळे सर्वांना दिसून येईल अशी कोणतीही गोष्ट करण्याचे त्याने शिल्लक ठेवले नाही दुसऱ्यादिवशी फिरोजखान आणि अहमदखान यांनी शम्सउद्दीनशहा आणि त्याचबरोबर राज्यातल्या मुख्यमुख्य अमिरांना पत्रे लिहिली. त्या पत्रांत त्यांनी असे लिहिले की लालचीन याने गियासुद्दीनशहाबरोबर अतिशय कपटाची वागणूक केली. त्याने जे इतर भयंकर गुन्हे केले त्यामुळे राजघराण्याची बेअब्रू होऊन राजघराण्याच्या

कीर्तीला कालिमा लागलेला आहे. ह्या गोष्टींची आपल्या सर्वांना जाणीव आहेच. त्यामुळे आमचा उद्देश लालचीन याची हकालपट्टी करणे एवढाच आहे. त्यामुळे आमचे तुमच्या-पाशी एवढेच मागणे आहे की लालचीन याला तुम्ही कडक शासन करावे. त्यानंतर आम्ही येऊन शम्सउद्दीनशहाच्या सत्तेला मान्यता देऊन त्याच्यापाशी रुजू होण्याचे आश्वासन देतो. परंतु त्याचबरोबर आम्ही तुम्हा सर्वांना असे बजावतो की लालचीन याचा नाश करण्यासाठी आम्ही आमचे सर्व सामर्थ्य पणाला लावून सर्व उपायांचा अवलंब करू आणि आमचे उद्दिष्ट साध्य झाल्याखेरीज स्वस्थ बसणार नाही.

( ८९ ) शम्सउद्दीनशहाने आपली आई आणि लालचीन यांच्याशी सल्लामसलत केली आणि वरील पत्राला उत्तर पाठविले. त्यामुळे राजपुत्र फिरोज आणि अहमद यांच्या रागात अधिकच भर पडली. त्यांनी सागरच्या किल्लेदाराच्या मदतीने ३००० घोडेस्वार आणि पायदळ एवढी फौज जमा केली. आपण राजधानीकडे चालून गेल्यावर तेथील फौजही आपल्याला येऊन मिळेल असा पूर्ण विश्वास त्यांना होता. त्याच्या बळावर त्यांनी कुलबर्ग्याच्या दिशेने कूच केले परंतु त्यांच्या अपेक्षेप्रमाणे [ २ ] ( ३५९ ) न झाल्यामुळे निराशा त्यांच्या पदरी पडली. ते काही काळ भीमा नदीच्या तीरावर थांबून राहिले. या ठिकाणीही त्यांना नाव घेण्याजोगा कोणताही अधिकारी राजधानी-मधून त्यांना मदत करण्यासाठी म्हणून येऊन मिळाला नाही. तरी देखील त्यांनी असे ठरविले की दोन्ही राजपुत्रांनी कुलबर्ग्याच्या दिशेने कूच करावे आणि कूच करताना फिरोजखानाने शाही छत्रचामरे आपल्या मस्तकावर धारण करावी. या प्रसंगी त्याने आपला भाऊ अहमदखान याला अमिर उल् उमरा या पदावर नेमले. मुद्दू याला मिर नोबती दिली आणि मिर फैजुल्ला अंजू याला वकील किंवा वजीर या जागेवर नेमले.

( ९० ) दोन्ही राजपुत्र कूच करीत कुलबर्ग्यापासून चार कोस अंतरावर येऊन पोहोचले. तेव्हा लालचीनने सैन्यातील अधिकारी आणि शिपाई यांच्यामध्ये भरपूर द्रव्य वाटले आणि दोघा राजपुत्रांना प्रतिकार करण्यासाठी तो शम्सउद्दीनशहाला बरोबर घेऊन शहराबाहेर पडला. मरकोल शहरानजीक दोन्ही फौजांत भयंकर धुमश्चक्रीची लढाई झाली. या लढाईत दोन्ही भावांचा पराभव झाला आणि आपल्या अनुयायांसह ते सागरकडे पळून गेले. लालचीनच्या या विजयामुळे त्याचे आणि राजमातेचे सामर्थ्य आणि घमेंड इतक्या पराकोटीला पोहोचली की दरबारातील पुष्कळशा अमीर-उमरावांनी गुप्तपणे आम्ही तुमच्या चाकरीत यावयाला तयार आहो असे दोघा राजपुत्रांकडे कळविले. त्यांनी त्यांना असाही सल्ला दिला की तुम्ही शम्सउद्दीनशहाकडे क्षमायाचनेसाठी लिहा आणि त्याच्याकडून तुम्हाला तसे लिहून आल्यावर तुम्ही कुलबर्ग्याला निघून या. तुम्ही कुलबर्ग्याला आल्यावर आपल्याला सावकाशपणे सल्लामसलत करता येईल आणि तुमचे काय विचार आहेत त्याचीही माहिती तुम्हाला देता येणे शक्य होईल.

( ९१ ) कुलबर्ग्याहून अमिरांच्या आलेल्या या वचनांवर विसंबून फिरोजखानाने

राजमाता आणि लालचीन यांजकडे मिर फजुल्ला अंजू आणि सय्यद कमालउद्दीन यांना इतर प्रतिष्ठित .माणसे बरोबर देऊन पाठविले. त्याने त्यांच्याबरोबर असा निरोप पाठविला की निव्वळ आमच्या मनातील भीतीने आम्हाला बंड करण्यास प्रवृत्त केले आणि आता आम्ही केलेल्या कृत्याचा आम्हाला मनापासून पश्चात्ताप होत आहे. अशा परिस्थितीत सुलतानाकडून जर आम्हाला क्षमा केली आहे असे सांगणारी पत्रे आली तर आम्ही दरबारात परत येऊ. दोन्ही राजपुत्रांकडून अशा तऱ्हेने क्षमायाचनेची पत्रे आल्यामुळे राजमाता आणि लालचीन यांना अतिशय आनंद झाला. [ २ ] ( ३६० ) त्यांनी राजपुत्रांकडे क्षमेची पत्रे पाठविली. या पत्रांत राजपुत्रांना क्षमा केल्याचा भरपूर मजकूर त्यांनी पुन्हा पुन्हा लिहून कळविला आणि अतिशय गोडव्याने भरलेल्या वाक्यांत त्यांनी राजपुत्रांना भरघोस आश्वासने दिली.

( ९२ ) क्षमेच्या मजकुराचे हे खलिते येऊन पोहोचल्यानंतर काही काळाने दोघे राजपुत्र आपल्या घराच्या गच्चीवर बसून कुलबर्ग्याला जाण्यात जो धोका आहे तो पत्करावा किंवा नाही याबद्दल विचारविनिमय करत बसले असताना घरासमोरून एक काश्मिरी वेडसर मनुष्य गेला. तो मोठ्याने ओरडला ' ज्याच्या कृपाछत्राखाली समृद्धी प्राप्त होते अशा हे फिरोज तुला कुलबर्ग्याला नेण्यासाठी आणि तुला सुलतान बनविण्यासाठी मी आलो आहे. ' त्या वेड्याचे हे उद्गार म्हणजे आपल्याला झालेला हा एक शुभशकुनच आहे असे समजून त्या दोघांनी ताबडतोब कुलबर्ग्याकडे कूच केले. तेथे गेल्यावर सुलतानाने त्यांना मानाचे पोषाख आणि भेटीदाखल नजराणे दिले. परंतु लालचीन आणि फिरोजखान यांच्या मनात मात्र दोघेजण परस्परांच्या दृष्टीस पडल्यापासून संशयाने घर केले आणि दोघेजण अतिशय जागरुकतेने राहू लागले.

( ९३ ) कुलबर्ग्याला आल्यानंतर १५ दिवसांनी गुरुवार २३ सफर हिजरी ८०० या दिवशी फिरोजखान दरबारात गेला. त्याच्याबरोबर त्याच्या जीवाला जीव देणारे १२ शिलेदार होते. त्याच वेळी त्याच्या जवळ जवळ ३०० इतर अनुयायांनी प्रत्येक वेळी एक-एक दोन-दोन असे करून किल्ल्यात प्रवेश करून घेतला. नंतर फिरोजखानाने आपला भाऊ अहमदखान याला बोलावणे पाठविले. तो आल्यानंतर त्याने लालचीनला असे सांगितले की माझे काही नातेवाईक आपापल्या जहागिरीवरून सुलतानाला मानाचा मुजरा देण्यासाठी आलले आहेत, तेव्हा आपण मी ज्यांना ज्यांना बोलावणे पाठवीन अशा सर्वांना किल्ल्यात प्रवेश करू देण्यासंबंधी किल्ल्याच्या पहारेकऱ्यांना हुकूम पाठवा.

सफर २३
हिजरी ८००
नोव्हेंबर १५
इ. स. १३९७

( ९४ ) याप्रमाणे लालचीनबरोबर फिरोजखानाने संभाषण करत करत त्याचे लक्ष वेधले आहे अशी काळजी घेतली. तेव्हा त्याचा भाऊ, अहमदखान हा आपल्या

नातेवाईकांची ओळख करून देण्याच्या मिषाने किल्ल्याच्या बाहेर [ २ ] ( ३६१ ) पडला. परंतु तो बारा माणसांना एकदम बाहेर घेऊन जाण्याचा प्रयत्न करीत असताना त्याला रखवालदारांनी अडविले. आपला कट उघडकीस आला अशी अहमदखानाच्या मनाची समजूत झाली. तेव्हा त्याने सर्व तऱ्हेचा धोका पत्करण्याचे आणि त्यावेळी कामावर हजर असलेल्या सर्वांवर हल्ला करण्याचे ठरविले. तेथे असलेल्या रखवालदारांना त्याने निःशस्त्र केले. अहमदखान तसाच दरबारात घुसला. तेथे त्याला इतर कोणीही प्रतिकार केला नाही. फक्त लालचीनच्याच मुलांनी त्याला विरोध केला. तेथे जमलेली इतर सर्व मंडळी पळून गेली. शम्सउद्दीनशहा आणि त्याचा वजीर लालचीन हे दोघेजण दरबाराखाली असलेल्या भुयारात लपून राहिले. पूर्वी ठरल्याप्रमाणे फिरोजखानाच्या ३०० अनुयायांनी राजवाड्यातील दरबाराच्या खोल्यांमध्ये असलेल्या लालचीनच्या अनुयायांवर हल्ला चढविला आणि त्यांना पळवून लावले. अशा तऱ्हेने ठरविलेल्या बेताप्रमाणे दोघा राजपुत्रांची योजना सिद्धीस गेली.

( ९५ ) फिरोजखानाने सुलतान आणि लालचीन यांच्या पायात बेड्या चढविल्या आणि राजवाड्याच्या ज्या दालनामध्ये आसरा घेण्यासाठी ते पळून गेले होते तेथेच त्यांना बंदिस्त केले. तो स्वतः दरबाराच्या सर्व अमीरउमरावांना बरोबर घेऊन दिवाण-इ-खासमध्ये गेला. तेथे गेल्यावर तो तख्त-इ-फिरोजा या बहमनींच्या सिंहासनावर आरूढ झाला. त्याने फिरोजशहा-रोज-अफजून असा किताब धारण केला आणि अलाउद्दीन हसन गंगु याची तलवार आपल्या म्यानात ठेवली. अशा तऱ्हेने आपली सत्ता सर्वांवर बसविल्यानंतर शम्सउद्दीनशहाचे डोळे त्याने काढले आणि त्याला बिदरच्या किल्ल्यात कैदेत ठेवले. त्याचवेळी त्याने सागरच्या किल्ल्यातून गियासउद्दीन याला कुलबर्ग्याला आणविले. त्याचे लालचीनने जे हाल केले होते त्याबद्दल त्याने लालचीनवर सूड उगवावा म्हणून त्याला गियासउद्दीनच्या स्वाधीन केले. गियासउद्दीन जरी पूर्णपणे आंधळा होता तरी त्याने लालचीनला आपल्यासमोर बसविण्याचा हुकूम दिला आणि तलवारीच्या एका घावानेच त्याला ठार केले. त्यानंतर त्याने, "मला मक्केच्या यात्रेला जाण्याची परवानगी द्या," अशी फिरोजशहाजवळ विनंती केली. फिरोजशहाने ही विनंती मान्य केली तेव्हा गियासउद्दीन हा चेऊल बंदरात जहाजात चढला आणि प्रवास करत सुखरूपपणे मक्केला येऊन पोहोचला. त्यानंतर अनेक [ २ ] ( ३६२ ) वर्षांनी त्याचा मृत्यू होईपर्यंत तो मक्केलाच राहिला. त्याच्या आयुष्यभर फिरोजशहाने अतिशय उदारपणे त्याला ५ हजार सोन्याच्या अश्रफींची नेमणूक करून दिली. त्याचप्रमाणे दरवर्षी तो त्याच्यासाठी उंची कपडेही मक्केला पाठवी.

( ९६ ) शम्सउद्दीनची कारकीर्द फक्त ५ महिने आणि ७ दिवस झाली.

## फिरोजशहा बहमनी [५५] □

( ९७ ) अनेक इतिहासकारांनी असे निवेदन केलेले आहे की, [ २ ] ( ३६३ )

सामर्थ्य आणि भव्यता या गोष्टींचा विचार केला तर फिरोजशहा हा आपल्या पूर्वजांपेक्षा निश्चितपणे उजवा होता. इतकेच नव्हे तर त्याच्या कारकिर्दीत बहमनी घराण्याने वैभवाची पराकोटीची सीमा गाठली. हिंदूंमध्ये फक्त आपल्या जातीतच लग्न करतात आणि जातीबाहेर मुलगी देणे ते धर्मबाह्य समजतात. तरी देखील विजयनगरच्या राजाला त्याने ( फिरोजशहाने ) स्वतःसाठी आपली मुलगी देणे भाग पाडले. त्याचप्रमाणे मुसलमानी धर्माचा प्रसार करण्याच्या कामामध्येही [ २ ] ( ३६४ ) त्याच्या हातून कुचराई झाली नाही. त्यासाठी त्याने यशस्वी अशा २४ मोहिमा केल्या. त्यांत मिळालेल्या विजयामुळे त्याने आपल्या राज्यामध्ये भर घालून त्याचा विस्तार केला. त्याने बंकापूरचा किल्ला जिंकून घेतला, आणि तेलंगणाच्या बहुतेक भागाला मुसलमानी अंमलाच्या छत्राखाली आणले. फेव्याच्या पद्धतीवर हिऱ्याने जडविलेला राजमुकुट मस्तकावर धारण करणारा तोच दक्षिणेतील पहिला सुलतान होता. [५६] * सुलतानाच्या अंगी औदार्य हे प्रकर्षाने वास करीत असले पाहिजे. फिरोजशहाला आपल्या औदार्याचा अतिशय अभिमान वाटत असे. या त्याच्या गुणामुळे त्याला अमाप कीर्ती प्राप्त झाली. दारू पिणे आणि संगीताला साद देणे या दोन गोष्टी सोडल्या तर धर्मतत्त्वाविरुद्ध दुसरा कोणताही गुन्हा केल्याचा दोषारोप त्याच्यावर करता आला नसता. तो वारंवार उपवास करी आणि पवित्र कुराणाने जे धार्मिक विधी आखून दिले होते त्यांचे नियमितपणे पालन करी. त्याच्या स्वभावातील दोन वाईट प्रवृत्तीबद्दल तो पुष्कळदा पश्चात्ताप व्यक्त करी. परंतु तो असे म्हणे की संगीताने माझ्या आत्म्याला त्या सर्व सामर्थ्यवान परमेश्वराच्या चिंतनाचा अनुपमेय असा आनंद मिळतो आणि माझा बुद्धिभ्रंश होईल इतक्या प्रमाणात मी दारूचे सेवन करीत नाही. त्यामुळे माझी अशी खात्री आहे की, त्या दयाघन परमेश्वराकडून यापुढे क्षमा मिळविण्याचे कामी मला यश मिळेल.

( ९८ ) फिरोजशहा हा स्त्रियांच्या बाबतीत अतिशय लंपट होता. मुसलमानी धर्माप्रमाणे फक्त चार बायका करण्याची परवानगी होती. यासाठी आपल्या कामवासनेची तर तृप्ती होईल परंतु आपल्या हातून धर्मविहीत असे कृत्य घडणार नाही, यासाठी त्याने दरबारातील धर्मपंडितांची सल्लामसलत घेतली. काहींनी त्याला असा सल्ला दिला की, मन मानेल त्याप्रमाणे तुम्ही एकीबरोबर घटस्फोट घ्या आणि दुसरीशी विवाह करा. परंतु हे मत त्याला असमाधानकारक वाटल्याने त्याने हा मुद्दा आपला वजीर मीर फैजुल्ला अंजू याच्याकडे निर्णयासाठी सोपविला. फैजुल्लाने त्यावर असे निवेदन केले की महमद पैगंबर आणि पहिला खलिफा यांच्या काळामध्ये मुतीआ [५७] □ म्हणजे तात्पुरता विवाह करण्याची परवानगी होती. दुसऱ्या खलिफाच्या कारकिर्दीत ही परवानगी रद्द करण्यात आली. तरीदेखील शियापंथाच्या तत्त्वप्रणालीप्रमाणे असा विवाह पूर्णपणे कायदेशीर आहे ह्या मतप्रणालीची पारंपारिकता सुन्नीपंथीयांनी नाकारली. याचा परिणाम असा झाला की दरबारातील धर्मपंडितांमध्ये या गोष्टीबद्दल [२] (३६५)

कडाडून चर्चा झाली. धर्मशास्त्रावर उपलब्ध असलेले अनेक टीकात्मक ग्रंथ प्रत्येक पक्षाने आपापल्या मताच्या पुष्ट्यर्थ धुंडाळून पाहिले. अखेर शियापंथीयांनी या प्रश्नाचा जो ऊहापोह केला त्याबद्दल खुद्द सुलतानाची त्यांनी मांडलेल्या मताबद्दल खात्री पटली आणि त्याने ३०० स्त्रियांना एकाच दिवशी आपल्या जनानखान्यांत आणून भरले. हाजी महमद कन्दहारीने आपल्या इतिहासात कथन केल्याप्रमाणे दर चार दिवसांनी कुराणातील १६ पाने लिहून काढण्याकडे फिरोजशहाचा कटाक्ष असे. त्यानंतर तो राज्याच्या कारभाराच्या बाबींकडे लक्ष पुरवीत असे. सर्वसाधारणपणे मध्यरात्रीचा सुमार होईपर्यंत तो आपला वेळ धर्मोपदेशक, कवी, इतिहास कथन करणारे, शहानाम्याचे वाचन करणारे आणि विद्वान व दरबारातील हजरजबाबी यांच्या सहवासात घालवी. ह्या मंडळींच्या संगतीत तो जेव्हा असे तेव्हा तो कोणतीही बंधनें पाळीत नसे. तो असे भाष्य करी की मी जेव्हा सिंहासनावर राज्यकारभाराच्या बाबींचा निकाल लावण्यासाठी नसतो तेव्हा माझी भूमिका सार्वभौमाची असते. त्यावेळी प्रजेच्या मनावर योग्य तो परिणाम होऊन त्यांनी शासनाच्या सत्तेला पाठिंबा द्यावा या उद्देशाने सार्वभौमासारखी वर्तणूक करणे हे निश्चितपणे मला क्रमप्राप्त होते. परंतु वरील सर्व मंडळींच्या संगतीत माझी भूमिका एक खाजगी व्यक्ती एवढीच असते आणि त्यामुळे माझ्याशी त्यांनी आदर दाखवून वागावे अथवा सुलतान म्हणून माझा गाजावाजा करावा अथवा माझ्यासमोर वागण्यात विशिष्ट बंधने पाळावी अशी माझी बिलकुल इच्छा नसते. यावेळी जमणाऱ्या मंडळींनी स्वेच्छेप्रमाणे सभेतून केव्हाही उठून जावे अगर सभेला यावे अशीच माझी त्यांच्याकडून अपेक्षा असते. ज्याला जे पाहिजे असेल ते त्याने खाण्याकरता आणि पिण्यासाठी मागून घ्यावे आणि फक्त दोन गोष्टी सोडून दिल्यास इतर सर्व विषयांवर मनमोकळेपणाने बोलावे असा माझा आदेश असतो. ह्या दोन गोष्टींपैकी पहिली गोष्ट म्हणजे राजकारभाराच्या बाबीविषयांसंबंधी चर्चा आणि दुसरी त्या ठिकाणी गैरहजर असलेल्या व्यक्तींची निंदानालस्ती आणि कुचाळकी.

( ९९ ) सुलतानाच्या दरबारात मुल्ला इसाक सिरहिंदी नावाचा एक अतिशय विद्वान आणि हजरजबाबी असा इसम होता. तो फिरोजशहाशी बोलताना एकदा म्हणाला की तुम्ही तुमच्या सेवकांना काही प्रसंगी तुमच्याबरोबर शाही इतमामाने आणि तुमची आदब न राखता वागण्यास सांगितले आहे ही गोष्ट इतर सुलतान ज्या पद्धतीचा अवलंब करतात त्याला प्रतिरोधी अशी आहे. आपल्या म्हणण्याची सत्यता सिद्ध करण्यासाठी त्याने अमीर सबक्तगीन गजनी आणि तत्त्वज्ञानी व ज्योतिषी अन्वरी यांच्यामध्ये घडून आलेल्या एका प्रसंगाबद्दलची जी आख्यायिका होती [ २ ] ( ३६६ ) उदाहरणादाखल कथन केली. सुलतानाने सिरहिंदीने सांगितलेली गोष्ट ऐकली आणि स्मिततीहास्य करून तो म्हणाला की ज्या सुलतानांच्या स्वभावात न्यायीपणाचा प्रभाव आहे अशा सुलतानांच्या वागण्यामधूनच तुम्ही कथन केलेल्या गोष्टीतील वृत्तीची प्रचिती दिसून येते. माझ्या स्वभावाबद्दल विचारले तर मी तुम्हाला असे सांगू शकेन

की अशा तऱ्हेचे दौर्बल्य माझ्या स्वभावात नाही. ज्यांना ज्यांना सुलतानाच्या सभांमध्ये भाग घेण्याचा योग आला त्या सर्वांना सुलतानाच्या वागणुकीतील एकवाक्यता आणि त्याच्या स्वभावातील परस्परसंगती ही इतर सर्व सुलतानांबरोबर तुलना करताना किती वरचढ आहेत याचा भरपूर अनुभव आला होता.

( १०० ) मुल्ला दाऊद बिदरी याने सुलतान फिरोजशहाच्या संबंधी अनेक चमत्कारिक आख्यायिका सांगितल्या आहेत. त्यांचा नुसता परिचय जरी मी करून देण्याचे या ठिकाणी ठरविले तरी मोठे चऱ्हाट सांगितल्यासारखे होईल आणि सत्य सांगण्याच्या प्रथेपासून मी च्युत झाल्याचा आरोप माझ्यावर करण्यासारखी परिस्थिती मी निर्माण केली असे होईल. म्हणून माझ्या वाचकांना त्या आख्यायिका कथन करण्याचा मोह मी आवरत आहे. परंतु सबक्तगीन आणि तत्त्वज्ञानी अन्वरी यांच्या संबंधीच्या आख्यायिकेचा मी यापूर्वीच उल्लेख केला आहे. तेव्हा मुल्ला दाऊदच्या शब्दामध्येच ती गोष्ट देणे योग्य आहे असे मला वाटते.

( १०१ ) असे सांगतात की तत्त्वज्ञानी अन्वरी हा त्याच्या काळातील एक अजब व्यक्ती समजली जात असे. त्याने अनेक आश्चर्यकारक गोष्टी करून दाखविल्या. त्याच्या अंगातील मोठी विद्वत्ता आणि सुलतानाने त्याच्यावर केलेला अत्यानुग्रह यामुळे त्याला सुलतानाबरोबर थोडे फार मोकळेपणाने वागण्याचे स्वातंत्र्य देण्यात आले होते. परंतु अखेर त्याच्या वागणुकीमुळे असंतोषाची बिजे पेरली गेली. एक दिवस गजनी येथील राजवाड्यातील एका भव्य प्रासादाच्या गच्चीवर सबक्तगीन बसलेला असताना अन्वरी एका दरवाजाने आत आला. मी वाड्यातून बाहेर पडताना कोणत्या मार्गाने बाहेर पडणार आहेस ते मला आताच सांग अशी सुलतानाने अन्वरीला आज्ञा केली. अन्वरीने ताबडतोब आपला फलज्योतिष गोल सज्ज केला आणि अस्मानात दिसणाऱ्या ग्रहांचे निरीक्षण केले. निरीक्षण संपल्यानंतर त्यावरून काढलेली अनुमाने त्याने एका कागदाच्या तुकड्यावर लिहिली आणि तो कागद एका उशीखाली ठेवला. यावर सुलतान सबक्तगीन याने राजवाड्याच्या पूर्वेकडील भिंतीचा एक भाग पाडून टाकण्याचा हुकूम दिला, आणि तो राजवाड्याबाहेर निघून गेला. अन्वरी [२] (३६७) याने लिहिलेला कागद तपासून पहाता असे आढळून आले की, सुलतानाने जे काही केले ते अन्वरीने अटकळ बांधून अगोदरच लिहून ठेवले होते. अन्वरीला आपल्यासंबंधी अनुमान काढण्यात जे यश आले त्याचा सबक्तगीन याला अतिशय संताप आला, आणि त्या संतापाच्या भरात त्याने अन्वरीला राजवाड्याच्या मनोऱ्यावरून पायाला धरून फेकून देण्याची आज्ञा केली. अन्वरीचे नशीब बलवत्तर म्हणून तो एका जाळ्यात पडला आणि कसलीही दुखापत न होता तो बचावला. यावर सुलतानाने त्याला विचारले की, "असे होणार याचाही तू अंदाज बांधला होतास काय?" या प्रश्नाला अन्वरीने उत्तर दिले की, 'होय. त्याची अटकळ मला आली होती.' इतके सांगून त्याने आपले फलज्योतिषाचे पुस्तक मागविले आणि त्यामध्ये अमुक अमुक

दिवशी आपण एखाद्या उंच जागेवरून खाली पडणार आणि काहीही न लागता बचावणार असे आपल्याबद्दल त्यात लिहिले होते ते सुलतानाला त्याने दाखविले. ते वाचल्यानंतर सुलतान अधिकच नाखूष झाला आणि त्याने अन्वरीला कैदेत टाकावे असा हुकूम केला. याला सहा महिन्यांचा अवधी लोटला. तत्त्वज्ञानी अन्वरी अजूनही कैदेतच होता. त्याचा एक गुलाम बाजारात जात असताना एका ज्योतिष्याने त्याला सांगितले की तुझ्याबाबत मला जी काही चिन्हे दिसत आहेत त्यावरून तुझ्या नशिबात अतिशय चांगल्या गोष्टी आहेत हे मला स्पष्टपणे दिसते. तू मला मी सांगेन तेव्हढी रक्कम दिल्यास तुझ्यासंबंधीचे सर्व ज्योतिष मी तुला सांगीन. त्या गुलामाने ज्योतिष्याने मागितलेली रक्कम त्याला दिली. त्यावर त्या ज्योतिष्याने त्या गुलामाला सांगितले की तुझा एक धनी असून तो अतिशय संकटात आहे. परंतु थोड्याच दिवसांत त्याच्यावर आलेल्या संकटांचा परिहार होऊन तो मोकळा होईल आणि एवढेच नव्हे तर त्याला एक मानाचा पोषाखही देण्यात येईल. यावर तो गुलाम आपल्या धन्याला कैदेत ठेवलेल्या ठिकाणी पळत आला आणि त्याने आपल्या धन्याचे अभिनंदन केले. परंतु अन्वरीने त्याने दाखविलेल्या अंधश्रद्धाळूपणाबद्दल आणि वाईट लोकांच्या संगतीत गेल्याबद्दल त्याची कानउघडणी केली. यानंतर तीन दिवसांनी सुलतानाबरोबर फलज्योतिषासंबंधी हसन मिमंदी हा संभाषण करीत होता. त्या संधीचा फायदा घेऊन हसनने दुर्दैवी अन्वरीचा सुलतानापाशी उल्लेख केला आणि मोठ्या खेदाने तो म्हणाला की अन्वरी याने मनाला धक्का देतील अशा दोन गोष्टींची भविष्यवाणी वर्तविली. त्याबद्दल त्याला बक्षिशी मिळण्याचे ऐवजी आणि त्याचा मान-मरातब होण्याचे ऐवजी त्याच्या नशिबी भयानक अंधार कोठडी आली. यावर सुलतानाने उत्तर दिले की त्या शास्त्राच्या ज्ञानाबद्दल अन्वरीचा विचार केला तर अन्वरीचा हात धरणारा दुसरा कोणी नाही. परंतु विद्वान असलेल्या माणसांना मनुष्य जातीच्या स्वभावाची जास्त पारख असणे हे जरूर आहे. कारण माझे असे मत [२] (३६८) आहे की, राजा हा एखाद्या लहान मुलासारखा असतो आणि त्याची अशी स्तुती केली पाहिजे की त्यामुळे त्याची तब्येत खूष झाली पाहिजे. एवढे बोलल्यानंतर त्याने अन्वरीची सुटका करावी असा हुकूम दिला. तुरुंगातून दरबाराकडे जात असताना अन्वरीची आणि त्या ज्योतिष्याची भेट झाली, आणि त्याला असे कबूल करणे भाग पडले की, तत्त्वज्ञानी लोकांशिवाय इतर व्यक्तीही भविष्यकाळात काय घडेल ते सांगू शकतात. सुलतानाने अन्वरीला मानाचा पोषाख, एक हजार सोन्याची नाणी, एक घोडा, एक पुरुष आणि स्त्री गुलाम एवढे देऊन त्याचा सन्मान केला, आणि त्याच वेळी जे काही होऊन गेले त्याबद्दल आपल्याला वाईट वाटत असल्याचे त्याने सांगितले.

(१०२) फिरोजशहा दरवर्षी जगातील सर्व देशांतून त्या त्या ठिकाणी होणारा तयार माल आणि चित्रविचित्र वस्तू आणण्यासाठी गोवा आणि चेऊल या बंदरातून जहाजे रवाना करी. परंतु वस्तुतः असे करण्यात त्याचा मुख्य उद्देश बुद्धिमंतबद्दल मान्यता

पावलेल्या व्यक्तींना आपल्या दरबारात आमंत्रण देण्याचा असे. तो असे म्हणे की प्रत्येक सुलतानाने आपल्याभोवती सर्व देशांतील विद्वान आणि नाणावलेली मंडळी जमा करावी. असे केल्याने त्यांच्या सहवासातून सुलतानांना अत्यंत महत्त्वाची माहिती मिळून त्यांच्या ज्ञानात भर पडते. साहजिकच पृथ्वीवरील लांबलांबच्या प्रदेशात प्रवास केल्याने जे काही फायदे मिळतात त्याचा लाभ त्या सुलतानांना त्यांच्या राज्यातच मिळू शकतो. फिरोजशहाची स्मृती इतकी उत्कृष्ट होती की अनेक भाषांमधून तो संभाषण करीत असे. आपल्या या अनेक भाषांवरील प्रभुत्वाचा उपयोग शक्यतो तो परदेशी लोकांबरोबर बोलताना करीत असे. एखादी गोष्ट त्याला जर एकदा सांगितली तर ती आयुष्यभर कायमची लक्षात ठेवणे हा गुण फिरोजशहाच्या अंगी होता. सुलतान हा स्वतः नावाजलेला कवी होता, आणि समयस्फूर्त कविता करण्याची त्याच्या अंगी हातोटी होती. विविध विद्वानांशी त्याचा उत्तम परिचय होता, आणि विशेषतः नैसर्गिक तत्त्वज्ञानाची त्याला फार आवड होती. प्रत्येक शनिवारी, सोमवारी आणि गुरुवारी सर्वसाधारणपणे दिवसा तो वनस्पतिशास्त्र, भूमितिशास्त्र आणि तर्कशास्त्र यांवर विद्वानांनी दिलेल्या व्याख्यानांचे परिश्रवण करी. परंतु जर का राज्यकारभाराचे काम मध्ये आले तर रात्रीच्या वेळी तो या विषयावरील व्याख्याने ऐकत असे. असे म्हणतात की विद्याविषयक योग्यतेची त्याने जी पातळी गाठलेली होती त्याबाबतीत तो महमद [२] (३६९) तघलक याच्यापेक्षाही वरचढ ठरला असता.

(१०३) अंजू येथील सय्यद घराण्याबरोबर विवाहविषयक संबंध जोडणारा फिरोजशहा हा दक्षिणेतील पहिलाच सुलतान होता. त्या घराण्यातील एक मुलगी त्याने आपला मुलगा हसनखान याच्याकरता केली. त्याचप्रमाणे त्याने आपल्या मुलींपैकी एक मुलगी मीर शम्सउद्दीन महमद अंजू याला दिली, आणि त्याला दौलताबादचा सुभेदार नेमले.

(१०४) भीमा नदीच्या तीरावर फिरोजशहाने एका शहराची स्थापना केली, आणि त्या शहराला त्याने फिरोजाबाद हे नाव दिले. शहरातील रस्त्यांची अत्यंत व्यवस्थित तऱ्हेने आखणी केलेली होती, आणि रस्ते अतिशय रुंद होते. नदीजवळच त्याने एका दगडी किल्ल्याची उभारणी केली. या किल्ल्याची विभागणी परस्परापासून वेगळ्या असलेल्या भव्य अशा राजवाड्यामध्ये त्याने केली. प्रत्येक राजवाड्याला नदीपासून जे कालवे खोदून आणलेले होते, त्यामधून नेलेल्या पाण्याचा भरपूर पुरवठा करण्यात आला होता. त्यातील प्रत्येक राजवाडा त्याने आपल्या आवडीतल्या एकेक स्त्रीच्या वाट्याला लावून दिला. राजवाड्यातील स्त्रियांमध्ये गोंधळ होऊ नये आणि त्यांच्या हातून नियमबाह्य वर्तन होऊ नये म्हणून त्याने आपल्या जनान्यासाठी काही नियम तयार केले. त्याच्या हयातभर या नियमांचे अतिशय काटेकोरपणे पालन करण्यात आले.

(१०५) राजवाड्यातील स्त्रियांच्या विभागात एका स्त्रीला तीन चाकरांपेक्षा

अधिक चाकर त्याने दिमतीला दिले नाहीत. हे चाकर त्यांची मालकीण ज्या देशाची रहिवासी असे त्याच देशातील असत, आणि त्यांची व त्यांच्या मालकीणीची बोलण्याची भाषा एकच असे. निरनिराळ्या देशांतील स्त्रियांची खरेदी करण्यासाठी तो नेहमी व्यापाऱ्यांच्या नेमणुका करी. या व्यापाऱ्यांनी आणलेल्या स्त्रियांतून त्याच्या जनान्यातील बायका अगर त्यांच्या नोकर स्त्रिया ह्यांचा मृत्यू होई किंवा इतर काही कारणामुळे त्यांची जागा रिकामी पडे त्यांच्या ठिकाणी निवड करी. त्यांच्या जनानखान्यात अरबी, सिरकॅशिन, जार्जीयन, तुर्की, रशियन, [५८] □ युरोपियन, चिनी, अफगाणी, रजपूत, बंगाली, गुजराथी, तेलंगणी, मराठी आणि इतर अशा स्त्रिया होत्या. प्रत्येकी जवळ तो तिच्या मातृभाषेतच बोलत असे. जनानखान्यातील प्रत्येक स्त्रीबरोबर [२] (३७०) त्याचे वर्तन इतके सारखे असे की प्रत्येकीला असे वाटे की, सुलतानाची फक्त आपल्यावरच अधिक मर्जी आहे. तो तौरात आणि अंजील [५९] □ या दोन्ही ग्रंथांचे वाचन करी आणि प्रत्येक धर्माच्या धर्मतत्त्वाचा आदर करी. परंतु महमदी धर्माच्या इतर सर्व तत्त्वांपेक्षा ज्या तत्त्वांचा तो अधिक आदर करी ते महमदी धर्माचे तत्त्व म्हणजे दारू पिण्याला प्रतिबंध करणारे आणि नवख्या लोकांच्या नजरेस स्त्रिया पडू नये असे सांगणारे हे होय. फिरोजशहा हा सिंहासनावर बसल्यानंतर त्याने आपला भाऊ अहमदखान याची अमीर-उलउमरा या अधिकारावर नेमणूक केली आणि त्याला खानखानान ही पदवी दिली. त्याचप्रमाणे त्याने आपला धर्मगुरू मीर-फैजुल्ला अंजू याला **वकील उससलतनत** या अधिकारावर नेमले, आणि त्याला **मलिक नायब** हा किताब दिला. बहमनी घराण्यातील इतर अनेक व्यक्तींवर त्याने मान-सन्मानाची खैरखैरात केली. हिंदूंवर त्याने २४ मोहिमा केल्या याबद्दल सर्व इतिहासकाराचे एक मत आहे परंतु या स्वाऱ्यांपैकी फक्त काहींची हकीकत मुल्ला दाऊद बिदरी याने आपल्या **तोहफत-उससलातीन** या ग्रंथात दिली आहे.

हिजरी ८०१
इ. स. १३९८

(१०६) हिजरी ८०१ यावर्षी विजयनगरच्या देवरायाने ३० हजार घोडेस्वार आणि असंख्य पायदळ एवढी सेना घेऊन मुद्गल आणि रायचूर हे किल्ले जिंकण्यासाठी दोआबवर [६०] □ स्वारी केली. देवरायाच्या या हालचालींची बातमी फिरोजशहाला लागल्यावर त्याने कुलबर्ग्याहून सागरकडे कूच केले. तेथे त्याने आपल्या सैन्याची पाहणी केली. त्यानंतर त्याने तेथील हिंदू जमीनदाराला त्याच्या सात ते आठ हजार अनुयायांसह ठार मारले. [६१] * हा हिंदू जमीनदार बराच काळपर्यंत फिरोजशहाविरुद्ध बंडाळी करत असे. दौलताबाद आणि वऱ्हाड येथील बहमनी फौजेच्या तुकड्या त्याला सागर येथे येऊन मिळाल्या. देवरायाविरुद्ध कूच करण्याच्या फिरोजशहा हा तयारीत होता. तोच त्याला [२] (३७१) अचानक बातमी मिळाली की, विजयनगरच्या राज्याच्या मसलतीवरून आणि मांडू आणि असीर [६२] □ येथील सुलतानांच्या चिथावणीवरून खेडल्याचा राजा नरसिंग राय याने वऱ्हाडच्या प्रांतावर स्वारी केली [६३] * आहे आणि माहूर किल्ल्याच्या तटापर्यंत

पसरलेल्या मुसलमानी प्रदेशात भयंकर लूटालूट केलेली आहे आणि अत्याचारांचा कळस केलेला आहे. ही बातमी कळताच नरसिंगरायाचा प्रतिकार करण्यासाठी त्याने दौलताबादच्या आपल्या सैन्याच्या तुकडीला रवाना केले आणि उरलेले सैन्य घेऊन विजयनगरच्या देवरायाच्या विरुद्ध त्याने कूच केले.

( १०७ ) ते दिवस पावसाळ्याचे होते. कृष्णा दुथडी भरून वाहात होती. देवरायाने आपली छावणी नदीच्या दक्षिण तीरावर केलेली होती आणि मुसलमानी सैन्य नदी ओलांडण्यास लागले तर त्यांना प्रतिकार करण्यासाठी आपल्या पायदळाच्या मोठ्या तुकड्या त्याने नदीच्या किनाऱ्यावर ठेवल्या होत्या. कृष्णा नदीजवळ आल्यानंतर फिरोजशहाने आपल्या मंत्र्यांना युद्धासंबंधी विचार करण्यासाठी पाचारण केले. परंतु त्याला पटेल अशी सल्लामसलत युद्ध मंडळाकडून त्याला मिळू शकली नाही. देवरायाविरुद्ध कोणती कारवाई करावी याबद्दल फिरोजशहाच्या मनात संभ्रम निर्माण झाला होता; अशावेळी काजी सिराज नावाच्या माणसाने सुलतानाला असे सांगितले की, " तुम्ही जर परवानगी देत असाल तर खास निवडलेल्या माणसांना बरोबर घेऊन मी नदी पार करून जाईन आणि संधी सापडेल आणि योग्य वेळ मिळेल तेव्हा देवराय अथवा त्याचा मुलगा यांना ठार मारीन. दोघांपैकी एकजण अशा तऱ्हेने ठार मारला गेल्यानंतर शत्रूच्या छावणीत घबराट निर्माण होईल आणि शत्रुसैनिक गोंधळून जातील. अशा वेळी तुम्ही सैन्याची एक तुकडी नदीपलीकडे पाठवा आणि सर्व सैन्याला ज्या मार्गाने नदी ओलांडून पलीकडे जाता येईल असा मार्ग त्या तुकडीला ताब्यात घ्यावयास सांगा. "

( १०८ ) ह्या युक्तीला फिरोजशहाने मान्यता दिल्यावर वरून चामड्याचे आच्छादन घातलेल्या अशा शेकडो टोपल्या [६४] □ सैन्याला नदी ओलांडून [२](३७२) जाण्यासाठी म्हणून अतिशय घाईघाईने तयार करण्यात आल्या. काजीसिराज हा आपल्या सात मित्रांना भिकाऱ्याच्या वेषात बरोबर घेऊन देवरायाच्या छावणीकडे निघाला, आणि छावणीमध्ये नृत्य करणाऱ्या मुलींचे तंबू ज्या ठिकाणी होते त्यातिकडे तो गेला. तेथे त्याने एका नर्तकीवर आपण अतिशय खूष झालो आहोत असे दाखविले आणि आपण जे काय म्हणतो याची सत्यता पटविण्यासाठी त्याने मुक्त हस्ताने आणि हजारो तऱ्हांनी तिच्यासाठी उधळमाधळ केली. संध्याकाळच्या वेळी त्या नर्तकीने उत्तमोत्तम पोषाख करून आणि मौल्यवान दागिने अंगावर घालून बाहेर जाण्याची तयारी केली. यावर एकाद्या मत्सरी आणि अस्वस्थ झालेल्या प्रियकराचा आभास निर्माण करून काजी-सिराज याने तिच्या पायावर लोळण घेतली. तू येथेच माझ्यापाशी रहा अथवा मला तुझ्याबरोबर येऊ दे अशी त्याने तिची विनवणी केली. तू येथून निघून गेल्यास माझे हृदय भग्न होईल असेही तो तिला म्हणाला. यावर त्या नर्तकीने त्याला सांगितले की देवरायाच्या मुलाने आज संध्याकाळी मेजवानी देण्याचा बेत केला आहे तेथे जाण्याचा मला हुकूम आहे. या हुकुमाची मी अवज्ञा करू शकत नाही अथवा तुलाही बरोबर नेऊ

शकत नाही. कारण त्या ठिकाणी फक्त वादक आणि नर्तक यांनाच प्रवेश आहे. यावर काजीसिराज म्हणाला की, तू जी वाद्ये वाजवतेस तीच वाद्ये मलाही वाजविता येतात आणि त्याशिवाय मी वाद्ये वाजविण्यात असे काही चमत्कारिक प्राविण्य संपादन केले आहे की, त्यामुळे देवरायाच्या मुलाची करमणूक होईल. त्या नर्तकीने काजीसिराज हे सर्व मस्करीने बोलत आहे या विचाराने गंमत म्हणून आपल्या जवळील मुंडल[६५] □ नावाचे वाद्य त्याला दिले आणि तू ते वाजव असे त्याला सांगितले. काजीसिराजने ते इतक्या उत्तम तऱ्हेने वाजविले की ती नर्तकी एकदम खूष झाली आणि तिने त्याला आणि त्याच्या मित्रांना संध्याकाळी देवरायाचा मुलगा त्याच्या तंबूत जी मेजवानी देणार होता, तेथे येण्यास परवानगी दिली.

( १०९ ) दक्षिणेतील पद्धतीप्रमाणे एकाचवेळी नृत्य करणाऱ्या मुलींचे ताफेच्या ताफे नृत्य करीत असत. त्यांचे नृत्य संपल्यानंतर देवरायाच्या मुलाने [ २ ] ( ३७३ ) जादुगार आणि विदुषक यांना पुढे बोलाविले. त्यावेळी वर उल्लेखलेल्या मुलीने काजी-सिराज आणि त्याचा एक सवंगडी यांना आपल्या अंगातील कसब दाखविण्याबद्दलची परवानगी देवरायाच्या मुलाकडून मिळविली. त्या दोघांनी वायकांचे पोषाख अंगावर चढविले आणि वेडेवाकडे पहात आणि हसत आणि एकीकडे नाचत व त्या मुलीने दिलेले मुंडल वाद्य वाजवीत रंगमंचकावर प्रवेश केला. त्यानी आपली कामगिरी इतक्या उत्तम तऱ्हेने बजावली की देवरायाचा मुलगा अतिशय खूष झाला. अखेर त्यांनी आपल्या कमरेचे खंजीर हातात घेतले आणि दक्षिणेतील[६६] □ नर्तकांच्या सर्वसाधारणपणे पद्धतीप्रमाणे त्यानी आपल्या हातातील खंजीर काही वेळ निरनिराळे आविर्भाव करत पाजळण्यास सुरुवात केली. असे आविर्भाव करत ते कधी पुढे सरकत, कधी पाठीमागे येत, तर कधी स्वतःभोवती गिरकी घेत. असे होता होता ते दोघेजण एकदम देवरायाच्या मुलाच्या अंगावर धावून गेले आणि आपले खंजीर त्याच्या छातीत त्यांनी खोलवर खुपसले. त्यानंतर त्या दोघांनी देवरायाच्या मुलाचे सेवक आणि सवंगडी यांच्यावर हल्ला केला. दरम्यान काजीसिराजचे मित्र हा चाललेला सर्व प्रकार बघत बाहेर उभे होते. त्यांनी जेव्हा वरील धामधूम उडाल्यामुळे देवरायाच्या मुलाच्या अनुचरांनी मारलेल्या आरोळ्या ऐकल्या तेव्हा त्यांनी तंबूच्या कनाती फाडून टाकल्या आणि काजी-सिराजला साहाय्य देण्यासाठी ते आतमध्ये घुसले. तेथे जमलेल्या मंडळींपैकी अनेक-जण दारूच्या धुंदित होते. त्यांना ठार करण्यात आले. त्यांच्याकडून कसलाच प्रतिकार झाला नाही. इकडे काजीसिराज आणि त्याचे साहाय्यक यांनी तेथील दिवे विझवून टाकले. तेथून ते नंतर पळाले आणि जमा झालेल्या गर्दीत मिसळून गेले. देवरायाच्या मुलाच्या खुनामुळे झालेला गोंधळ आणि धामधूम ही सर्वत्र पसरली. सर्व छावणीत एकच अंदा-धुंदी माजली आणि वेगवेगळ्या बातम्या आणि घबराटीच्या सूचना यांचा एकच हल-कल्लोळ सर्वत्र झाला. काहीजण म्हणाले की मुसलमानांच्या राजाने नदी ओलांडली आहे आणि त्याने छावणीवर अचानक हल्ला चढविला आहे; तर दुसऱ्या काहींनी गप्प

उठविली की सुलतानाच्या एका अधिकाऱ्याने १२००० सैनिकांना घेऊन देवरायावर हल्ला चढविला आहे आणि त्याला आणि त्याच्या मुलाला ठार मारले आहे. ती रात्र भयानक काळोखाची होती. छावणीचा विस्तार जवळ जवळ १० मैलापर्यंत पसरला होता. त्यामुळे प्रत्यक्षात काय घडलेले आहे याविषयी पूर्ण अनभिज्ञ राहून [२] (३७४) छावणीत हजर असलेले वेगवेगळे राजेराजवाडे हे सर्व आपापल्या जागी शस्त्रसज्ज होऊन दिवस उजाडावयाची वाट पाहात यापेक्षा आपण सद्य परिस्थितीत अधिक काहीच करू शकत नाही या भावनेने आपापल्याला जागी मुक्काम करून राहिले. दरम्यान फिरोजशहाच्या ४००० सैनिकांनी होड्या आणि तराफे यावरून नदी ओलांडली. ह्या होड्या आणि तराफे नदी ओलांडून जाण्यासाठी अगोदरच तयार करण्यात आले होते. या उताराशी मुसलमानांच्या फौजा उतार पार करून आल्यास त्यांना प्रतिकार करण्यासाठी शत्रूचे पायदळी सैनिक ठेवण्यात आले होते. त्यांनी आपल्या छावणीमध्ये उडालेला गोंधळ आणि त्याच वेळी त्यांच्यावर चालून येत असलेली फिरोजशहाची फौज बघितली आणि ते भयचकीत झाले. त्यांचा गोंधळ उडाला आणि कोणताही प्रतिकार न करता त्यांनी पळ काढला. सकाळ होईतोपर्यंत फिरोजशहाने नदी ओलांडली आणि झुंजूमुंजू होते आहे न होते आहे तोच तो शत्रूच्या छावणीत घुसला. आपल्या मुलाच्या मृत्यूने देवरायाचे दुःख अनावर झाले होते. त्याने फिरोजशहाला प्रतिकार करण्याचा काहीच प्रयत्न केला नाही. त्याने मुलाचा मृतदेह बरोबर घेऊन रणांगणातून पळ काढला. देवरायाच्या छावणीत फिरोजशहाला अगणित लूट मिळाली. त्याने विजयनगरच्या परिसरापर्यंत हिंदूंचा पाठलाग केला. विजयनगरच्या वाटेत बऱ्याच ठिकाणी दोन्ही फौजांत अनेक युद्धप्रसंग झाले. त्या सर्वांत मुसलमानांचा विजय झाला. परिणामी विजयनगरपर्यंतच्या रस्त्यावर शत्रूच्या शिपायांच्या मृत देहाचा नुसता खच पडला होता.

(१६०) देवरायाने आपल्याला विजयनगरच्या किल्ल्यात कोंडून घेतले. रणांगणावर प्रतिकार करण्यासाठी आता शत्रू उरला नाही हे पाहिल्यानंतर शहराच्या दक्षिणेकडे असलेले असे विजयनगरच्या राज्यातील समृद्ध आणि गजबजलेले किल्ले लुटून उद्‌ध्वस्त करण्यासाठी फिरोजशहाने खान खानान आणि मिर फैजउल्ला यांची रवानगी केली. काजीसिराजने दाखविलेल्या मर्दुमकीच्या कृत्याबद्दल बक्षिस म्हणून त्याला अमीरपदावर चढविण्यात आले आणि सैन्याबरोबर त्याची पुढे रवानगी करण्यात आली. ह्या फौजेने सुलतानाच्या आज्ञेप्रमाणे सर्व कारवाई यशस्वीरित्या पार पाडली आणि अनेक युद्धकैदी आपल्या ताब्यात घेऊन ती फौज छावणीकडे परतली. मुसलमानांच्या हाती अनेक ब्राह्मण कैद होऊन पडले होते. विजयनगरमधील त्यांची मित्रमंडळी मोठमोठ्या रकमा घेऊन तडजोड घडवून आणण्यासाठी आणि कैद्यांची सुटका करण्यासाठी खंडणी म्हणून देवरायाला [२] (३७५) साहाय्य करण्यासाठी पुढे आली. देवरायाने त्यांच्या देणग्यांचा स्वीकार केला. बराच काळ वाटाघाटी झाल्यानंतर मिर फैजउल्ला याने सुलतानाच्या जामदार-

खान्यात भरण्यासाठी दहा लक्ष होन युद्धकैद्यांची सुटका करण्यासाठी म्हणून आणि स्वतःसाठी मध्यस्थ म्हणून १ लक्ष होन घेण्यास मान्यता दिली.[६५] याप्रमाणे ब्राह्मणांनी ६ लक्ष होन आणि देवरायाने ५ लक्ष होन याप्रमाणे ११ लक्ष होन एवढी रक्कम मिर फैजउल्ला याजकडे पाठविली. ती त्याने सुलतानापुढे आदा केली. मिर फैजउल्लाने बजाविलेल्या प्रशंसनीय कामगिरीबद्दल सुलतानाने त्याची वाहवा केली. यानंतर दोन्ही राज्यांत तह झाला. त्या तहातील अटीप्रमाणे असे ठरले की युद्धापूर्वी दोन्ही राज्यांच्या ज्या सरहद्दी होत्या त्या तशाच ठेवण्यात याव्या आणि कोणीहा परस्परांच्या प्रजाजनास उपद्रव देऊ नये. फिरोजशहाने यानंतर आपल्या ताब्यातील कैद्यांची सुटका केली आणि आपल्या राज्याकडे जाण्यासाठी म्हणून कूच केले. तुंगभद्रा नदी ओलांडल्यावर त्याने पोलादखानास दोआबच्या प्रदेशाचा ताबा घेण्यास सांगितले. मुख्य सैन्यास आपल्या पाठीमागून येण्याची आज्ञा देऊन बरोबर फक्त काही सेवकगण घेऊन तो त्वरेने कुलबर्ग्याकडे निघाला.

(१११) ही मोहीम संपल्यानंतर काही महिन्यांनी हिजरी ८०२ या वर्षाच्या (हिजरी ८०२ इ. स. १३९९) सुरुवातीला खेडल्याचा राजा नरसिंगराय याला शिक्षा करण्यासाठी सुलतानाने कूच केले. सुलतान माहूर येथे येऊन पोहोचला. तिथे आल्यावर त्याला असे आढळून आले की, त्या जिल्ह्याच्या स्थानिक अधिकाऱ्यांनी नरसिंगरायाची भीती वाटल्यामुळे त्याची सत्ता मान्य करण्याला कबुली दिलेली आहे. प्रस्तुत प्रसंगी सुलतानाच्या काही उमरावांनी [२] (३७६) त्यांच्या बाजूने मध्यस्थी केल्यामुळे सुलतानाने त्यांना क्षमा केली. त्या अधिकाऱ्यांनी सुलतानाला मोठमोठे नजराणे दिले आणि ते त्याच्या सैन्याला येऊन मिळाले. सुलतानाने माहूर येथे एक महिना आणि पाच दिवस मुक्काम केला आणि नंतर खेडल्याच्या दिशेने कूच केले. नरसिंगरायाच्या ताब्यात गोंडवनातील डोंगराळ मुलूख आणि इतर प्रदेश होता. त्याची संपत्ती आणि सामर्थ्य ही अफाट होती. म्हणून त्याने माळवा आणि खानदेश या देशांच्या सुलतानांकडे उंची भेटी रवाना केल्या आणि त्यांच्याकडे मदतीची याचना केली. पूर्वीच्या प्रसंगी जरी त्यांनी नरसिंगरायाला मदत केली होती, तरी प्रत्यक्षात मात्र त्यांची इच्छा त्याचा नाश व्हावा अशीच होती. त्यामुळे त्यांनी ह्या वेळी त्याच्याबरोबर हातमिळवणी करण्याचे नाकारले. ही परिस्थिती विचारात न घेता त्याने सुलतानाबरोबर टक्कर देण्याचा निश्चय केला. खेडल्यापासून दोन कोसांपर्यंत तो चालून गेला. तेथे त्याने आपल्या सैन्याची जमवाजमव केली आणि सुलतानाची वाट पाहात तो दबा धरून बसला.

(११२) फिरोजशहा स्वतःच्या अधिपत्याखाली सैन्यासह चालून जाण्यास अतिशय उत्सुक होता. परंतु खान खानान आणि मिर फैजउल्ला अंजू यांनी या मोहिमेवर आपल्याला जाऊ द्यावे अशी सुलतानापाशी विनंती केली आणि

मुलतानाने त्यांच्या विनंतीला मान्यता दिली. नरसिंगरायाला एक खलिता त्यांनी पाठविला आणि युद्धाची तुतारी फुंकली. त्यामध्ये त्यांनी नरसिंगरायाला त्याच्या अलिकडील उद्दाम वर्तनाची आठवण दिली आणि खंडणी देण्यास कबूल होऊन परस्परांतील तंटा मिटविण्याचा त्याला सल्ला दिला. परंतु नरसिंगरायाचे उत्तर उद्दामपणाचे असून त्यात गर्भित धमक्या होत्या. इतकेच नव्हे तर युद्धाच्या दृष्टीने अधिक तयारी करण्यास त्याने सुरुवात केली. यावर मिर फैजउल्ला आणि खान खानान यांनी आगेकूच करून त्याच्या फळीवर हल्ला केला. युद्धाची एकच धुमश्चक्री उडाली. या युद्धात शुजातखान, दिलावरखान आणि बहादूरखान हे मुसलमानी सैन्यातील मोठ्या दर्जाचे अधिकारी मारले गेले. नंतर काफरांनी [२](३७७) मुसलमानांच्या सैन्यावर विलक्षण त्वेषाने हल्ला चढविला आणि इस्लामच्या सैन्याची फळी फोडली. या सुमारास मिर फैजउल्ला याला बातमी देण्यात आली की खान खानान हा ठार मारला गेला आहे. त्याने बातमीदाराला वरील बातमी गुप्त ठेवण्यास सांगितले. त्याने स्वतः २०० घोडेस्वार घेऊन पुढे चाल केली आणि आपल्या सैन्याला विजयसूचक नगारे वाजविण्याची आज्ञा देऊन खुद्द सुलतानच आपल्या मदतीला येत असल्याचा मोठ्याने खोटाच पुकारा केला. त्याच्या सैनिकांना ही बातमी कळताच ते पुन्हा एकत्र झाले आणि त्यांनी शत्रूवर हल्ला करून त्याला परतवून लावले. खान खानान हा मृत झाला आहे असे सर्वजण समजत होते तो पुन्हा काही घटकानंतर मिर फैजउल्ला याला येऊन मिळाला. आता मुसलमानांची पाळी होती. त्यांनी हिंदूंवर हल्ला करून त्यांना पळवून लावले आणि नरसिंगरायाचा मुलगा गोपाळराय याला कैद केले. पळणाऱ्या नरसिंगरायाच्या सैन्याचा पाठलाग अगदी खेडल्यापर्यंत मुसलमानांनी केला. मोठ्या कष्टाने नरसिंगराय ह्याने खेडल्याच्या किल्ल्यात आश्रय घेतला. त्याचे १० हजारांवर सैनिक रणांगणात गारद झाले. यानंतर विजयी मुसलमानांच्या सैन्याने खेडल्याच्या किल्ल्याला वेढा दिला.

(१६३) वेढा दोन महिने चालला. शिबंदीवर अतिशय दुरावस्थेचा प्रसंग ओढवला आणि त्यांनी काही अटींवर तहाची याचना केली. पण त्यावर मुसलमानी सेनापतीने उत्तर दिले की बिनशर्त शरणागतीशिवाय इतर कोणत्याही तहाच्या मसुद्याला मान्यता देण्याचा आम्हाला हुकूम नाही. नरसिंगरायाने पाहिले की आता आपल्याला दुसरा कोणताच मार्ग उरला नाही. तेव्हा तो आपल्या कुटुंबीय मंडळींना बरोबर घेऊन एलिचपूर येथे सुलतानाला त्याच्या छावणीत भेटावयास गेला. तेथे त्याने सुलतानाजवळ आपल्या वर्तनाबद्दल पश्चात्ताप व्यक्त केला. त्याने सुलतानाचे आपण मांडलिक आहोत असे कबूल केले आणि खेडला त्याच्या ताब्यात देण्याची तयारी दाखविली. त्याचप्रमाणे त्याने अशीही अपेक्षा प्रकट केली की मी आता आपल्याला शरण आलो आहे तेव्हा आपण मला आपल्या अनेक खंडणीदारांमध्ये सामील करून घ्या आणि मागे जे काही झाले त्याकडे दुर्लक्ष करा. या सर्व गोष्टी आपण उदार

मनाने कबूल केल्यास पूर्वी अल्लाउद्दीन हसन गंगू बहमन शहा याने [२] (३७८) ठरवून दिलेली वार्षिक खंडणी देण्याचे मी वचन देतो.

(११४) या विनंतीला फिरोजशहाने मान्यता दिली आणि नरसिंगरायाबरोबर त्याचा अशा रितीने समेट झाला. नरसिंगरायाला एक मानाचा पोषाख देण्यात आला. हा पोषाख सोन्याच्या तारेने मढविण्यात आला होता. नरसिंगरायाने आपली एक मुलगी फिरोजशहाला अर्पण केली. भेट म्हणून त्याने ४५ हत्ती, बरीच मोठी द्रव्याची रक्कम आणि इतर मौल्यवान वस्तू फिरोजशहाकडे पोहोचविल्या. तेव्हा फिरोजशहाने खेडल्याचा वेढा उठविण्यात यावा असे हुकूम सोडले. खान खानान आणि मिर फैजउल्ला यांच्या फौजांची हातमिळवणी झाली तेव्हा नरसिंगरायाला आपल्या निवासस्थानाकडे जाऊ देण्यात आले आणि सुलतान विजयी होत्साता कुलबर्ग्याकडे परत फिरला. या विजयाला कारण म्हणजे मिर फैजउल्ला याने घेतलेले अपार श्रम होत. ही गोष्ट फिरोजशहाने जाणून त्याने फैजउल्ला याला वऱ्हाडच्या सेनाप्रमुखाच्या अधिकारावर बढती दिली.

(११५) हिजरी ८०४ या वर्षी विजेत्या अमिर तिमूरच्या दरबारातून खबर आली की त्याने दिल्लीचे तख्त आपल्या एका मुलाला बहाल केले असून त्याला हिंदुस्थानातील सर्व राजेरजवाड्यांना आपल्या अंकित करण्याची आज्ञा दिलेली आहे. त्याचप्रमाणे आपला हा बेत सिद्धिस जावा म्हणून जरूर पडल्यास स्वतःच कूच करून येण्याचा त्याचा निश्चय आहे. यावर फिरोजशहाने त्या तातराधिपतीकडे मौल्यवान नजराणे देऊन आणि त्याच्यासंबंधी आदरभाव प्रकट करणारी पत्रे देऊन आपले वकील रवाना केले. तिमूरने कृपादृष्टीने फिरोजशहाच्या वकिलांचे स्वागत करून त्यांनी आणलेला नजराणा स्वीकारला. त्या वकिलांनी अमीर तिमूरपाशी असेही निवेदन केले की आपल्या अनेक आश्रितांपैकी एक समजला जाण्याची फिरोजशहा बहमनी याची इच्छा आहे आणि ज्या वेळी तिमूर स्वतः हिंदुस्थानात येईल अगर त्याच्या राजपुत्रांपैकी एकाद्याला हिंदुस्थान काबीज करण्यासाठी रवाना करील तेव्हा फिरोजशहा स्वतः त्वरेने दक्षिणेतून येऊन आपल्या सेनेबरोबर सहकार्य करील. विनासायास मिळत असलेल्या या मदतीच्या आश्वासनाने तिमूर हा अतिशय खुष झाला. त्याच्या दरबारातील मंडळींपैकी काहींनी मध्यस्थी करून तिमूरवर दडपण आणले आणि फिरोजशहाला माळवा आणि गुजरातचे [२] (३७९) सार्वभौमपद आणि छत्र चामराचा आणि इतर सर्व शाही चिन्हांचा वापर करण्याची परवानगी देण्यास त्याला भाग पाडले. या गोष्टीला सहा महिने लोटले तेव्हा अमिर तिमूर याने फिरोजशहाच्या वकिलाबरोबर वर उल्लेखिलेल्या दोन्ही देशांचे सार्वभौमत्व फिरोजशहाकडे सोपविणारे फर्मान आणि त्याचबरोबर हिऱ्याने जडविलेली त्याची स्वतःच्या मालकीची तलवार, एक उमदा शाही पोषाख, एक तुर्की गुलाम आणि ४ सिरियन घोडे इतक्या वस्तू फिरोजशहाला देण्यासाठी

हिजरी ८०४ (इ. स. १४०१)

दिल्या. दक्षिणेमध्ये यापूर्वी इतके उमदे घोडे कधीही दृष्टीस पडले नव्हते. गुजरात, माळवा आणि खानदेश[६८] □ येथील सुलतानांची सत्ता अजून कमकुवत होती. फिरोजशहाकडून होणाऱ्या या आक्रमणाची त्यांना दहशत वाटली आणि त्याची मैत्री संपादन करण्यासाठी त्यांनी आपले वकील त्याच्याकडे रवाना केले. त्यांनी फिरोजशहाला असा निरोप आणला की आपण सर्व धर्माने मुसलमान आहोत आणि म्हणून भावाप्रमाणे एकजूटीने राहाणे हे आपले कर्तव्य आहे. त्याच-प्रमाणे दिल्लीच्या बादशहाच्या सत्तेविरुद्धही आपण सर्वांनी मित्रत्वाचा तह करून एकत्र येणे हे क्रमप्राप्त आहे. त्याच वेळी त्या सर्वांनी विजयनगरच्या राजाकडे खाजगीरित्या असे लिहिले की तुम्हाला फिरोजशहाविरुद्ध मदतीची गरज पडल्यास त्याप्रमाणे आम्हाला कळवा. तुम्ही असे कळविल्यास आमच्या कुवतीप्रमाणे आम्ही तुम्हाला सर्वप्रकारचे साहाय्य देऊ. वरील सुलतानांनी विजयनगरच्या राजाकडे याप्रमाणे संधान लावले त्यामुळे विजयनगरच्या राजाने फिरोजशहाबरोबर वागण्याचे आपले धोरण बदलले. त्याने चार वर्षेपर्यंत ठरलेली खंडणी देण्यात कुचराई केली. फिरोजशहाला आपले शेजारी गुजरात आणि माळवा यांच्या अंतस्थ शत्रुत्वाच्या धोरणाची कल्पना असल्याने त्याने विजयनगरच्या राजावर खंडणी देण्यासाठी दडपण आणले नाही. परंतु तेव्हा तरी त्याने खंडणी देण्यात जी कुचराई केली, तिकडे दुर्लक्ष केले. पुढे कधी तरी योग्य वेळ येईल तेव्हा मात्र [२] (३८०) विजयनगरच्या राजाला शासन करण्याचा त्याने निश्चय केला.

(११६) त्यावेळी मुद्गल शहरात एक सोनार राहात असे. त्याला निहाल नावाची एक मुलगी होती. तिचे सौंदर्य इतके अप्रतिम होते की, तिला परिपूर्ण करण्यासाठी जणू काही निसर्गाने आपल्या कलाकुसरीचा मन मानेल तसा उपयोग केला असावा. हिंदुस्थानातील रूढीला धरून तिच्या आईवडिलांची इच्छा तिचे लग्न आपल्याच जातीतील एखाद्या तरुणाबरोबर तिच्या लहानपणीच ठरवावे अशी होती. परंतु तिने हा समारंभ पुढे ढकलला जावा अशी निकराची विनंती केली आणि त्यांनी त्याप्रमाणे हा समारंभ पुढे ढकलला. यानंतर काही काळाने बनारसची यात्रा करून परत येताना एक म्हातारा ब्राह्मण निहालच्या बापाच्या घरी थांबला. तिच्या सौंदर्याचा त्याच्या मना-वर इतका परिणाम झाला की त्याने तिला आपल्या मुलीप्रमाणे मानले. त्या ब्राह्मणाचे गायनकला आणि नृत्यकला यावर असामान्य प्रभुत्व होते. या दोन्ही कलांत तिला तरबेज करण्याचे त्याने ठरविले. त्या कुटुंबात जवळ जवळ १८ महिने त्या ब्राह्मणाने वास्तव्य केले. या कालावधीनंतर तिने या दोन्ही कलांत उत्कृष्ट प्रावीण्य मिळविले असल्याचे त्याला आढळून आले. त्याने जाण्यासाठी निरोप मागितला. आपण परत येऊ असे त्याने वचन दिले आणि त्याचवेळी आपली विद्यार्थिनी निहाल हिला मान मान्यता मिळेल आणि त्या कुटुंबाचाही भाग्योदय होईल असे करण्याचा आपला बेत त्यांना सांगितला. त्या ब्राह्मणाची प्रथमपासूनची आकांक्षा आपल्या मानलेल्या मुलीला

राजकन्येचे वैभव प्राप्त करून देण्याची होती. या हेतूने तो विजयनगरकडे निघाला. विजयनगरच्या राजाबरोबर त्याची भेट घालून देण्यात आली. राजाशी बोलताना त्याने त्या तरुणीबाबत इतके प्रशंसेचे उद्गार काढले की राजाने तिला आपलीशी करण्याचे ठरविले आणि तिचा आपल्याबरोबर विवाह व्हावा याकरता खटपट करण्याची त्या ब्राह्मणाला विनंती केली. राजा अशा तऱ्हेची विनंती करील ही अटकळ त्या ब्राह्मणाने बांधलीच होती. राजाची इच्छापूर्ती होईल यासाठी त्याला मदत करण्याचे त्याप्रमाणे ब्राह्मणाने कबूल केले. यावर तिला देण्यासाठी मौल्यवान देणग्या देऊन राजाने ब्राह्मणास रवाना केले आणि तुमच्या सुंदर मुलीला राणी अथवा राजकन्या हा किताब मी बहाल करीन असा निरोप त्याने तिच्या वडिलांकडे पाठविला. त्या ब्राह्मणाने प्रवास करण्यात जास्त वेळ दवडला नाही. त्या सोनाराच्या घरी [२] (३८१) पोहोचल्याबरोबर तुम्हाला आणि तुमच्या बायकोला निहालबरोबर घेऊन विजयनगरास ताबडतोब निघून यावे असा विजयनगरच्या राजाचा हुकूम आहे, असे त्याने त्या दोघांस निवेदन केले. अनपेक्षितपणे आपल्या भाग्याला असा उजाळा आल्याचे बघून त्या जोडप्याला अतिशय आनंद झाला. त्यांनी आपल्या मुलीला बोलाविले, राजाने पाठविलेले उंची दागिने तिच्यासमोर ठेवले आणि इतक्या थोर कीर्तीच्या राजपुत्रा-बरोबर तिचे जे मीलन होणार होते त्याबद्दल त्यांनी तिचे अभिनंदन केले. विवाह ठरल्याची निशाणी म्हणून त्यांनी तिच्या गळ्यात हिऱ्याने जडविलेला सोन्याचा एक हार घालण्याचा प्रयत्न केला. हार जर तिच्या गळ्यात पडला असता तर राजाबरोबर ठरलेला विवाह पक्का होऊन कधीही मोडला गेला नसता. परंतु निहालने आईबापांना धक्का बसेल अशी गोष्ट केली. ती म्हणजे तिने हाराचा स्वीकार करण्याचे नाकारले. ती असे म्हणाली की, " एखाद्या तरुणीचा एकदा का विजयनगरच्या राजाच्या जनान्यात प्रवेश झाला की, तिला आपल्या अगदी जवळच्या नातेवाईकाला भेटण्याचीही परवानगी मिळणे शक्य होत नसे. तुम्ही जरी राजदरबारातील संपत्तीच्या मोहाने माझा बळी देण्यास तयार झाला असला तरी माझे तुमच्यावर इतके प्रेम आहे की तुमच्या-पासून कायमचे दुरावण्याला कोणत्याही परिस्थितीत माझी तयारी नाही. मग त्यापुढे विजयनगरच्या राजवाड्याचे वैभवही मला तुच्छ आहे." आपल्या मुलीने अश्रुपूर्ण नयनांनी त्यांच्याबद्दलच्या प्रेमाने ओथंबलेले जे उद्गार काढले त्यामुळे निहालच्या आईवडिलांची जी दारुण निराशा झाली होती ती त्यांनी बाजूला सारली. निहालची मनःस्थिती त्यांनी जाणून तिच्या इच्छेशी ते एकरूप झाले. तिचे मन वळविण्यासाठी आपण जबरदस्ती करावी असे त्यांच्या मनात देखील आले नाही. त्यांनी त्या ब्राह्मणाला त्याने आणलेल्या भेटीच्या वस्तू परत करून निरोप दिला. अपयशाचे माप पदरात घेऊन तो ब्राह्मण विजयनगरला परत गेला. यानंतर काही काळाने निहालने आपले मन आपल्या वडिलांजवळ मोकळे केले. ती असे म्हणाली की, "बराच काळपर्यंत माझे अंतर्मन मला अशी ग्वाही देत होते की, एके

दिवशी तू इस्लाम धर्माचा अनुनय करणाऱ्या राजपुत्राची पत्नी होशील. म्हणून माझी तुम्हाला अशी विनंती आहे की, परमेश्वराच्या मनात जे काही आहे त्याची आपण शांतपणे वाट पाहावी.''

(१६७) इकडे वर उल्लेखिलेला ब्राह्मण विजयनगरला येऊन पोहोचला. आपण आपल्या कार्यात अयशस्वी झाल्याचे त्याने राजाला सांगितले. विजयनगरचा राजा यामुळे संतापाने बेभान झाला. त्याने वेळ पडल्यास जबरदस्ती करूनही आपल्या इच्छेची पूर्तता करून घेण्याचा निश्चय केला. [२] (३८२) मग आपले ईप्सित फिरोजशहाच्या राज्याच्या अगदी अंतर्भागात राहात आहे, या गोष्टीचाही त्याने विचार केला नाही. आपला उद्देश साध्य करून घेण्यासाठी सर्व सैन्य घेऊन तो आपल्या राज्याची पाहणी करण्यासाठी आपण जात आहोत, या मिषाने विजयनगर सोडून निघाला. कूच करत तो तुंगभद्रा नदीच्या तीरावर आला आणि तेथे त्याने मुक्काम केला. तेथे त्याने आपल्या सैन्यातील ५ हजार उत्कृष्ट घोडेस्वार निवडले, आणि त्यांना दिवसरात्र काहीही न बघता अतिशय वेगाने मुद्गल येथे कूच करून जाण्याचा हुकूम दिला. त्याच्या अधिकाऱ्यांनी केलेल्या विरोधालाही त्याने जुमानले नाही. मुद्गल येथे पोहोचल्यावर तो सोनार राहात असलेल्या खेड्याला वेढा देऊन त्याची मुलगी आणि त्याच्या कुटुंबातील सर्व मंडळी यांना कैद करून आणावे परंतु त्यांना कसल्याही तऱ्हेची दुखापत होऊ देऊ नये अशीही त्याने आपल्या सैन्याला ताकीद दिली.

(१६८) आपल्या उत्साहाच्या भरात विजयनगरच्या राजाला सारासार विचार राहिला नाही. माझे सैन्य येत आहे तरी तुम्ही घाबरून जाऊ नका असा निरोप निहालच्या आईवडिलांकडे देण्यासाठी आणि त्या खेड्यातील इतर रहिवाशांना पळून जाण्यासाठी वेळ मिळाल्यास त्यांना पळून जाण्याची मुभा देण्यास परंतु निहालच्या आईवडिलांना त्याच ठिकाणी राहण्याचे प्रलोभन दाखविण्यासाठी त्या ब्राह्मणाला पाठविण्याचे तो विसरला. परंतु प्रत्यक्षात असे घडले की विजयनगरच्या फौजा चालून येत असल्याची खबर मुद्गल सभोवारच्या मुलुखांत फैलावली. तेथील रहिवाशांनी तेथून पळ काढून दूरदूरच्या प्रदेशांत आसरा घेतला. या रहिवाशांत निहालचे कुटुंब होते. निहालरूपी बक्षीस आपल्या हाती पडेल अशी जी देवरायाच्या फौजेची अपेक्षा होती ती विफल झाली. त्यामुळे देवरायाचे सैन्य बहमनींच्या स्थानिक फौजा जमा होऊन त्यांना करावयाची तयारी करितोपर्यंत आपल्या वाटेतील अनेक शहरे आणि खेडी उद्ध्वस्त करीत आपल्या देशाकडे परतले. सरतेशेवटी त्या प्रांताचा सुभेदार पोलादखान हा त्यांच्यावर चालून गेला. विजयनगरच्या लुटारू फौजांनी पाहिले की आपण पोलादखानापेक्षा संख्येने अधिक आहोत. तेव्हा त्याला तोंड देण्यासाठी ते थांबले. झालेल्या लढाईत पोलादखानाचा पराभव होऊन त्याला माघार घ्यावी लागली.

परंतु पोलादखानाला लगोलग कुमक मिळाली आणि दुसऱ्यांदा त्याने विजयनगरच्या फौजांचा पाठलाग सुरू केला. पराजित झालेल्या शत्रूकडून आपला पाठलाग होईल असे विजयनगरच्या फौजांच्या स्वप्नातही आले नाही. त्यामुळे परतताना ते अतिशय निष्काळजीपणे कूच करत होते. अशा वेळी पोलादखानाने त्यांच्यावर अचानक हल्ला केला आणि त्यांचा संपूर्ण पराभव [२] (३८३) केला. विजयनगरचे सैन्य तुंगभद्रा नदीच्या तीरावर येऊन ती नदी ओलांडून पलीकडे जाईपर्यंत त्यांची २००० माणसे गायब झाली. कोणतेही कारण नसताना विजयनगरने जे आक्रमण केले त्याला प्रत्युत्तर म्हणून फिरोजशहाने तावडतोब फिरोजाबाद येथे आपल्या सैन्याची जमवाजमव करण्याचा हुकूम दिला.
हिजरी ८०९ ) हिजरी ८०९ या वर्षी त्याने प्रचंड फौज घेऊन कूच केले
इ. स. १४०६ } आणि कोणत्याही प्रतिकाराला तोंड द्यावे न लागता तो विजयनगरजवळ येऊन पोहोचला. देवरायाने आपल्याला विजयनगर येथे कोंडून घेतले होते. फिरोजशहाने विजयनगरवर हल्ला चढविला. शहरातील काही रस्त्यांचा त्याला ताबा मिळाला. विजयनगरच्या फौजेने अतिशय निकराने मुसलमानांचा प्रतिकार केला आणि अखेर कर्नाटकी पायदळाने मुसलमानांनी केलेला हल्ला परतवून लावला. देवरायाला हा जो विजय मिळाला त्याने जोर येऊन आपल्या फौजेची छावणी शहराबाहेर देण्याचा धोका त्याने पत्करला. त्याप्रमाणे त्याने आपली फौज किल्ल्याच्या तटबंदीच्या आवरणाच्या सुरक्षिततेखाली नेली आणि मुसलमानांच्या वेढा देऊन बसलेल्या सैन्यावर आपल्या हलक्या पायदळी फौजांना घेऊन हल्ला चढविला. विजयनगर भोवतालचा प्रदेश खडबडीत असल्यामुळे मुसलमानांच्या आपल्या घोडदळाचा उपयोग या हल्ल्याविरुद्ध करणे जमले नाही. त्यामुळे विजयनगरच्या सैन्याने केलेल्या हल्ल्यामुळे बहमनींच्या फौजेचे अतोनात नुकसान झाले आणि त्यांचा धीर खचला. विजयनगरने केलेल्या एका हल्ल्याच्या प्रसंगी फिरोजशहाच्या हाताला बाणाने जखम झाली परंतु त्याने आपल्या घोड्यावरून उतरण्याचे नाकारले. त्याने आपली तलवार म्यानातून काढली आणि आपल्या हातावरील जखम त्याने फडक्याने बांधली. अखेर सरतेशेवटी फिरोजशहाचा भाऊ अहमदखान खान खानान याने दाखविलेल्या शौर्यामुळे शत्रूला हाकलून देण्यात मुसलमानी फौजेला यश मिळाले. फिरोजशहाने आपल्या फौजेतील जखमी झालेले सैनिक बरे व्हावे यासाठी म्हणून आपल्या फौजेची छावणी शहरापासून दूरवर सोयिस्कर अशा एका सपाटीच्या जागी हलविली. तिथे आल्यावर त्याने विजयनगर जिंकून घेण्याचा आपला बेत सोडून दिला. नंतर त्याने आपला भाऊ खान खानान आणि मिर नोबत मिया मुद्दू यांच्या हाताखाली १०००० घोडेस्वारांची फौज तैनात केली. त्यांना त्याने विजयनगरच्या दक्षिणेकडील मुलख उद्ध्वस्त करण्यासाठी पाठविले. त्याचप्रमाणे त्याने कर्नाटकातील अत्यंत [२] (३८४)

महत्त्वाचा किल्ला बंकापूर याला वेढा देण्यासाठी वऱ्हाडची फौज बरोबर देऊन मिर फैजउल्ला अंजू याची रवानगी केली. उरलेल्या फौजेसह सुलतानाने विजय-नगरच्या परिसरामध्ये देवरायाला रोखून धरण्यासाठी ठिय्या दिला आणि आपल्या छावणीसभोवार तोफांची जणूकाही फळीच उभी केली. देवरायाने अनेकदा त्याच्यावर हल्ला केला पण प्रत्येक वेळी देवरायाचा हल्ला परतविण्यात आला. देवरायाची अपरंपार हानी झाली. देवरायाने त्यामुळे सुलतानावर हल्ला करण्याचे थांबविले, परंतु त्याच वेळी त्याने माळवा, गुजरात आणि खानदेश या देशांच्या सुलतानांकडे मदत मागविण्यासाठी आपल्या वकिलाती रवाना केल्या.

(११९) याप्रमाणे सुलतानाने जवळ जवळ चार महिने देवरायाला युद्धात गुंतवून ठेवले. या दरम्यानच्या काळात खान खानानने कर्नाटकामधील अतिशय समृद्ध अशी शहरे आणि जिल्हे साफ उजाड आणि उद्ध्वस्त केले. मिर फैजउल्ला याने बंकापूरचा किल्ला आणि त्या सभोवतालच्या किल्ल्याला लावून दिलेला अतिशय संपन्न मुलूख जिंकून घेण्यात यश मिळविले. सुलतानाच्या आज्ञेने त्याने जिंकलेल्या प्रदेशाचा ताबा त्या दिशेने कूच करून येणाऱ्या मिया सुद्दूच्याकडे सोपविला आणि तो स्वतः सुलतानाच्या छावणीकडे परतला. खान खानान हा देखील जवळ जवळ ६०००० हिंदू स्त्री आणि पुरुष एवढ्या संख्येने असलेल्या कैद्यांना घेऊन सुलतानाला येऊन मिळाला. याशिवाय सोन्याच्या रूपाने त्याने अगणित लूट आणली ती वेगळीच. या सर्व अधि-काऱ्यांनी जी सेवाचाकरी बजाविली होती त्याला साजेलशा रितीने सुलतानाने त्यांची दखल घेतली. त्यांना मिळालेल्या यशाप्रीत्यर्थ त्यांचा सन्मान करण्यासाठी त्याने एक भव्य मेजवानी दिली. यावेळी पुढे काय कारवाई करावयाची याबद्दलची योजना त्याने आखली. काही काळ या विषयावर चर्चा झाल्यानंतर असे ठरले की देवरायाला प्रतिकार करण्यासाठी खान खानान याने विजयनगर येथेच मुक्काम करून राहावे आणि सुलतानाने मिर फैजउल्ला याला बरोबर घेऊन शत्रूच्या ताब्यातील अतिशय अभेद्य असा अदोनी किल्ला काबीज करण्यासाठी कूच करून जावे.

(१२०) देवरायाला माळवा, खानदेश आणि गुजरात येथील [ २ ] ( ३८५ ) सुलतानांकडून मदत मिळाली नाही. त्यात त्याने जेव्हा सुलतानाने आखलेली योजना त्याच्या हस्तकांकरवी ऐकली तेव्हा तो निराशेच्या खोल गर्तेत बुडाला आणि त्याने आपले काही प्रमुख अधिकारी सुलतानाच्या छावणीवर तहाची बोलणी करण्यासाठी रवाना केले. फिरोजशहाने पहिल्या प्रथम तहाची कसलीही बोलणी करण्याचे सपशेल नाकारले परंतु अखेर मिर फैजउल्ला याच्या सल्ल्यावरून आणि विनंतीवरून त्याच्या मनात बदल घडून आला आणि त्याने खालील अटींवर तह करण्याला आपली संमती दिली. त्या अटी अशा—देवरायाने आपली मुलगी सुलतानाला विवाहादाखल द्यावी; देवरायाने त्याशिवाय १० लक्ष होन खंडणी म्हणून द्यावे आणि नजराणा म्हणून ५ मण मोती, ५० नामवंत हत्ती, आणि २००० स्त्री व पुरुष गुलाम, गवई, नर्तकी

आणि बादक सुलतानाच्या स्वाधीन करावे; त्याचप्रमाणे बंकापूरचा किल्ला जो सुलतानाच्या फौजांनी जिंकला होता तो पुढील सर्व भांडणाचे मूळच नाहीसे करण्यासाठी कायमचा फिरोजशहाकडे विजयनगरच्या राजकन्येच्या सुलतानाबरोबरील विवाहानिमित्त लग्नभेट म्हणून तोडून देण्यात यावा.[६९]*

(१२१) यापूर्वी जरी कर्नाटकच्या राजांनी आपल्या मुली आपल्या जातीबाहेर असलेल्या कोणत्याही पुरुषाला लग्नाप्रीत्यर्थ कधीही दिलेल्या नव्हत्या आणि त्रयस्थाला आपली मुलगी देणे हे जरी ते स्वतःला अतिशय अपमानास्पद आणि कमीपणाचे समजत तरी देखील आपली मुलगी फिरोजशहाला देण्याच्या अटीला देवरायाने प्रसंगोपात निर्माण झालेली परिस्थिती म्हणून आणि त्यातून आता दुसरा सुटकेचा मार्ग नाही म्हणून मान्यता दिली. दोन्ही पक्षांनी लग्नसमारंभ थाटाने साजरा करण्यासाठी म्हणून जारीने तयारी सुरू केली.[७०]□ सुलतानाची छावणी आणि [२] (३८६) विजयनगर यामध्ये जरी १४ मैलांचे अंतर होते तरी दोहोंमध्ये जवळ जवळ ४० दिवसपर्यंत सारखी रहदारी आणि ये-जा चालू होती. रस्त्याच्या दोन्ही बाजूंना मुसलमान आणि हिंदू या दोघांच्या दुकानांच्या रांगाच्या रांगा लागून राहिल्या होत्या. पाहुण्यांचे मन विजयनगरमधील जादूगार, नर्तक आणि विदूषक आपल्या अंगामधील कौशल्याचे प्रदर्शन करून रमवीत होते. खान खानान आणि मिर फैजउल्ला या दोघांना शाही इतमामाने वधूसाठी रूढीप्रमाणे भेटीच्या वस्तू देऊन विजयनगरकडे पाठविण्यात आले. तेथे गेल्यानंतर सात दिवसांनी ते वधूला घेऊन विजयनगरच्या राजाने दिलेला उंची नजराणा आणि भारीभारी भेटी बरोबर घेऊन सुलतानाच्या छावणीकडे परतले. देवरायाने यानंतर आपल्या जावयाला भेटण्याची इच्छा दर्शविल्यामुळे शिष्टाचाराच्या भरीस पडून आपल्या वधूसह देवरायाच्या भेटीस जाण्यास सुलतानाने आपली संमती दिली.

(१२२) भेटीचा दिवस ठरविण्यात आल्यावर खान खानानकडे छावणीचा ताबा सोपवून सुलतान फिरोजशहाने अपल्या वधूसह विजयनगरकडे कूच केले. वाटेमध्ये देवराया मोठ्या भपक्याने त्याला भेटण्यासाठी आला. शहराच्या दरवाजापासून तो राजवाड्यापर्यंत जवळ जवळ ६ मैलांचे अंतर होते. या सबंध रस्त्यावर सोन्याने मढविलेले कापड, मखमल, सॅटिन आणि इतर उंची उंची कापड पसरण्यात आले होते. सुंदर मुलगे आणि मुली यांच्या रांगांमधून दोन्ही बादशहा घोड्यावर बसून मिरवत गेले. त्यांच्या मस्तकांवर ऊद आणि चांदीची फुले यांनी भरलेली सोन्याची ताटे ओवाळण्यात आली. ती त्यांनी तेथे जमलेल्या लोकांनी वेचावी म्हणून इतस्ततः उधळून टाकली. हा विधी संपल्यानंतर तेथे जमलेल्या स्त्री आणि पुरुष रहिवाशांनी आपापल्या मानाप्रमाणे त्यांना नजराणे अर्पण केले. याप्रमाणे एकेका चौकातून मिरवत जात जात ते शहराच्या मध्यावर येऊन पोहोचले. तेथे रस्त्याच्या दोन्ही बाजूला देवरायाची नातेवाईक मंडळी उभी होती. त्यांनी दोन्ही बादशहांना आपले मुजरे सादर केले. नंतर

ते या घोडेस्वारांच्या मिरवणुकीत सामील झाले, आणि दोन्ही बादशहांच्या पुढे पायी चालू लागले. राजवाड्याच्या दरवाजाशी आल्यानंतर फिरोजशहा आणि देवराया हे घोड्यावरून खाली उतरले, आणि मौल्यवान हिऱ्यांनी जडविलेल्या अशा [२] ( ३८७ ) उत्कृष्ट पालख्यांमध्ये आसनस्थ झाले. तेथून त्या दोघांना वधू आणि वर त्यांच्या स्वागतासाठी जे दिवाणखाने सज्ज करण्यात आले होते तेथे नेण्यात आले. या ठिकाणी देवरायाने सुलतानाची रजा घेतली आणि तो आपल्या दालनाकडे निघून गेला. यानंतर ३ दिवसपर्यंत सुलतानाला देवरायाने पंचपक्वान्नांच्या मेजवान्या दिल्या. यावर सुलतानाने देवरायाचा निरोप घेतला. पूर्वीपेक्षाही अधिक मौल्यवान भेटी देवरायाने सुलतानाला या प्रसंगी दिल्या आणि शहरात परतण्यापूर्वी सुलतानाच्या छावणीच्या मार्गावर ४ मैलपर्यंत तो त्याला पोहोचविण्यास गेला. फिरोजशहाच्या छावणीपर्यंत देवराया त्याला पोचविण्यास न गेल्यामुळे फिरोजशहाला आपला अपमान झाला आहे असे वाटले आणि तो मिर फैजउल्ला याला म्हणाला की " माझ्याकडे दुर्लक्ष करून माझा जो अपमान करण्यात आलेला आहे त्याबदली एक दिवस मी निश्चितच सूड घेईन. " फिरोजशहा जे बोलला त्याची हकिकत देवरायाला कळली. त्यावर त्याने फिरोजशहाला उपमर्दकारक असे भाष्य केले. याचा परिणाम असा झाला की दोन्ही घराणी जरी एकत्र आली होती तरी देखील त्यांच्यामधील शत्रुत्व कोणत्याही प्रकारे कमी झाले नाही. काही काळाने आपल्या राज्याच्या राजधानीला फिरोजशहा पोहोचला. तेथे गेल्यावर दोन्ही राज्यांमध्ये जिच्यामुळे युद्धाला सुरुवात झाली होती त्या सोनाराच्या सुंदर मुलीला आणि त्याच्या कुटुंबातील माणसांना दरबारात आणण्यासाठी आपले काही अधिकारी त्याने रवाना केले. तिच्या सौंदर्याविषयी ज्या काही बातम्या आतापर्यंत कानावर आल्या होत्या त्यापेक्षा प्रत्यक्षात तिचे सौंदर्य अतुलनीय आहे असे सुलतानाला दिसून आले. तिच्याशी लग्न करणे ही गोष्ट आपले वय झाले असल्यामुळे योग्य नाही असा सुलतानाने विचार केला आणि आपला मुलगा हसनखान याच्याशी त्याने तिचे लग्न लावून दिले. तिच्या आईवडिलांना उंची उंची भेटी आणि ते राहात असलेल्या प्रदेशातच जमिनीच्या सनदा करून देऊन सुलतानाने त्यांना खूष केले. दरम्यान लग्नाची तयारी पुरी होईतोपर्यंत निहालला सुलतानाच्या आत्याच्या ताब्यात सोपविण्यात आले. लग्नाची तयारी पूर्ण झाल्यानंतर मोठ्या आनंदाने आणि थाटामाटाच्या आणि शाही इतमामाच्या समारंभात निहाल आणि हसनखान यांच्या विवाहाची गाठ बांधण्यात आली.

( १२३ ) फिरोजशहा हा खगोलशास्त्राला मोठे उत्तेजन [ २ ] ( ३८८ ) देणाऱ्यापैकी एक होता. हिजरी ८१० या वर्षी त्याच्या हुकुमावरून दौलताबाद घाटाच्या जवळील डोंगरमाथ्यावर एक वेधशाळा[११०] बांधण्यात आली. परंतु ज्योतिर्विद हकीम हसन गिलानी याचा मृत्यू झाल्यामुळे बांधकाम थांबविण्यात आले आणि ते तसेच अपुरे राहिले.

हिजरी ८१०
इ. स. १४०७

( १२४ ) हिजरी ८१५ या वर्षी सुलतान शिकारीच्या मिषाने गोंडवाड्याच्या
हिजरी ८१५ } मुलुखात शिरला. तो प्रदेश त्याने बेचिराख करून टाकला आणि
इ. स. १४१२ } जवळ जवळ ३०० हत्ती गोंडवाड्यातून त्याने आणले. यानंतर
काही काळ लोटला आणि त्याला असे कळले की सुप्रसिद्ध अवलिया सय्यद महमद गिसू दराज हा दिल्लीहून गुलबर्ग्याजवळ आला आहे. तेव्हा सुलतान त्याला भेटण्यासाठी फिरोजाबादहून गेला आणि आपल्या दरबारातील सर्व अमीर-उमरावांना त्याने सय्यद गिसू दराज याच्या दर्शनासाठी पाठविले. पहिल्या प्रथम सुलतानाने त्याच्याकडे जातीने लक्ष पुरविले. परंतु जेव्हा सुलतानाला असे दिसून आले की विद्वत्ता आणि शास्त्र यांच्यामध्ये त्याची फारशी गती नाही तेव्हा त्याची मर्जी गिसू दराजवरून उडाली. सुलतानाचा भाऊ खान खानान याला सय्यद गिसू दराज याच्याबद्दल अतिशय आदराची भावना होती. त्याने गिसू दराज याच्यासाठी एक भव्य राजवाडा बांधला. एवढेच नव्हे तर त्याची प्रवचने ऐकण्यात तो आपला बराचसा काळ घालवू लागला. गिसू दराज याला जेव्हा जेव्हा समाधी ( वज्द ) लागे तेव्हा तेव्हा खान खानान याने कधीही हजर राहण्याचे टाळले नाही. अशा प्रसंगी दर्ग्यामध्ये असलेला सेवकगण आणि तेथे जमा असलेली फकीर मंडळी यांना खान खानान मोठमोठ्या रकमा दान करीत असे.

( १२५ ) हिजरी ८१८ या वर्षी सुलतानाने आपला मुलगा हसन याला आपला
हिजरी ८१८ } वारस नेमले आणि त्याला राजमुकुट आणि कमरपट्टा, छत्र,
इ. स. १४१५ } अनेक शाही शामियाने आणि काही हत्ती इत्यादी सार्व-
भौमत्वाच्या निदर्शक अशा वस्तू बहाल केल्या. हसन हा एक [ २ ] ( ३८९ ) दुबळा आणि व्यसनांनी फुकट गेलेला राजपुत्र होता. याचवेळी त्याने आपल्या अमीर-उमरावांना बोलावू पाठविले आणि त्यांना हसनशी राजनिष्ठेची शपथ घ्यावयास सांगितले. त्याचबरोबर पवित्र अवलिया सय्यद गिसू दराज याला त्याने अशी विनंती केली की आपण आपले आशीर्वाद हसन याला द्यावे. यावर सय्यद गिसू दराजने असे उत्तर दिले की ज्याची निवड खुद्द सुलतानाने केलेली आहे त्याच्याबाबत एखाद्या गरीब भिकाऱ्याने केलेली प्रार्थना काय उपयोगाची आहे. या उत्तराने असमाधान झाल्यामुळे फिरोजशहाने त्याच्याकडे पुन्हा निरोप पाठविला. त्यावर गिसू दराजने भाष्य केले की परमेश्वराची इच्छाच अशी आहे की राजमुकुट तुमचा भाऊ खान खानान यानेच मस्तकावर धारण करावा. तेव्हा तो दुसऱ्याच्या मस्तकावर विराजमान होऊ दे असे मी म्हणणे म्हणजे निरर्थक आहे. सय्यद गिसू दराज याने हे जे भाष्य केले त्यामुळे फिरोजशहा घाबरून गेला आणि त्याने सय्यदला शहर सोडून जाण्याची आज्ञा केली. ही आज्ञा त्याने अशा सबबीखाली दिली की तुमचा दर्गा राजवाड्याच्या अतिशय नजीक आहे आणि तुमच्याकडे तुमचे शिष्य आणि विद्यार्थी यांचा जो जमाव होतो तो राजधानीच्या

शांततेला धोकादायक आहे. त्या सत्पुरुषाने सुलतानाच्या आज्ञेचे तावडतोब पालन केले आणि हल्ली ज्या जागी त्याची कबर आहे त्या जागेवर तो जाऊन राहिला. तेथे त्याच्या शिष्यमंडळींनी त्याच्यासाठी एका भव्य प्रासादाची उभारणी केली.[७२]

(१२६) हिजरी ८२० या वर्षी तेलंगणाच्या राजाकडे बऱ्याच वर्षांची खंडणी थकली होती. तिची मागणी करण्यासाठी सुलतानाने आपले वकील रवाना केले. तेलंगणाच्या राजाने थकबाकी पाठविली एवढेच नव्हे तर त्याबरोबर इतर अनेक मौल्यवान नजराणे देखील पाठविले. या वर्षाच्या मध्यंतरात फिरोजशहाने पानगळचा [७३] किल्ला जिंकून घेण्याचा बेत केला. या किल्ल्याला हल्ली बिलकोंडा असे म्हणतात. हा किल्ला जवळ जवळ [ २ ] (३९०) अधोनीपासून ८० फरसख ( २४० मैल ) अंतरावर आहे. विजयनगरच्या राजाजवळ आपले नाते आहे ही गोष्ट विचारात न घेता त्याने कूच केले आणि पानगळला वेढा दिला. हा वेढा पुरी दोन वर्षेपर्यंत चालला. दोन वर्षे संपली तरी तो किल्ला फिरोज-शहाच्या हाती तेव्हा पडावा अशी परमेश्वराची इच्छा नसल्याने सुलतानाच्या फौजेत रोगराईने धुमाकूळ घातला आणि दररोज असंख्यात माणसे आणि घोडी मरू लागली. जे जिवंत राहिले त्यांची मने असंतोष आणि भीती यांनी बिथरून गेली. पुष्कळसे पहिल्या दर्जाचे अधिकारी आपापल्या अनुचरांना घेऊन छावणी सोडून गेले आणि आपापल्या जहागिरींकडे चालते झाले. या सुमारास देवरायाने आपल्या फौजेची जमवाजमव केली. तेलंगणाच्या राजा सरसकट आजूबाजूच्या सर्व राजेरजवाड्यांकडून त्याने मदत मिळविली आणि प्रचंड घोडदळ आणि पायदळी सैनिक यांना बरोबर घेऊन त्याने सुलतानाविरुद्ध चाल केली.

हिजरी ८२०
इ. स. १४१५

(१२७) हिंदूंच्या सैन्याला तोंड देण्याइतकी आपल्या सैन्याची कुवत नाही याची अटकळ फिरोजशहाला आली. परंतु अभिमानाच्या भावनेच्या भरीला पडून आणि त्याच्या अधिकाऱ्यांनी केलेल्या विरोधाला न जुमानता त्याने देवरायाबरोबर युद्ध सुरू केले. इस्लामची सेना मीर फैजउल्ला याच्या हाताखाली होती. त्याने मोठ्या शौर्याने काफरांवर हल्ला केला, त्यांच्या सैन्याच्या मध्यभागाची धुळधाण उडविली आणि तो हिंदूंच्या उजव्या फळीवर तुटून पडला. त्याच्या गळ्यांत विजयश्री माळ घालणार असा क्षण अगदी जवळ येऊन ठेपला, आणि त्या क्षणी त्याच्याच एका सैनिकाने त्याच्या मस्तकावर प्रहार करून त्याला जबरदस्त जखमी केले. फैजउल्ला याला तावडतोब मृत्यू आला. हे काम करण्यासाठी देवरायाने त्या सैनिकाला लाच दिली होती असे म्हणतात. ह्या भयानक घटनेमुळे त्या दिवशीच्या जयापजयाचा रंग पालटला. फिरोजशहाचा पराभव झाला आणि मोठ्या मुष्किलीने व स्वतः अतिशय कष्ट सहन केल्यानंतर रणांगणातून तो पळून जाऊ शकला; हिंदूंनी मुसलमानांची सरसि कत्तल केली, आणि ठार मारलेल्या मुसलमानांच्या मस्तकांचा एक [ २ ] ( ३९१ ) ढिगारा रणांगणावर रचला. फिरोजशहाचा त्यांनी त्याच्याच मुलखात पाठलाग केला,

आणि त्याचा मुलुख बेचिराख आणि उद्ध्वस्त करून टाकला. यानंतर त्यांनी बहमनींची अनेक शहरे घेतली, मशिदी आणि इतर पवित्र ठिकाणे यांची मोडतोड केली आणि कोणत्याही तऱ्हेची दया न दाखवता त्यांनी लोकांना ठार मारले. आपल्या रानटी-पणाच्या वर्तनाने जणूकाही शतकानुशतके त्यांच्या मनात सूडाची जी भावना होती आणि मुसलमानांवरती त्यांचा जो संताप होता, त्यालाच जणू वाट करून देण्याची त्यांची इच्छा होती असे दिसले. फिरोजशहावर जे संकट ओढवले होते त्यातून त्याच्यावर बाका प्रसंग ओढवल्यामुळे त्याने गुजराथेच्या सुलतानाकडे मदतीकरता याचना केली. परंतु गुजराथेचा सुलतान हा नुकताच सिंहासनावर बसलेला असल्याने तो कोणतीही मदत देऊ शकला नाही.[७४] * सरतेशेवटी त्याच्या नशिबानेच आपल्या स्मितहास्याची मेहरनजर त्याच्यावर केली. अनेक वेळा युद्धप्रसंग ओढवल्यानंतर सुलतानाचा भाऊ खान खानान याला बहमनींच्या मुलखातून शत्रूला घालवून देण्यात यश मिळाले. परंतु या सर्व दुर्दैवी घटनांचा परिणाम फिरोजशहाच्या मनावर झाला. त्याचे आता वय झाले होते. दुखण्याने त्याच्या शरीराला घेरले. दुखणे लांबतच चालले आणि त्याचा त्याच्या डोक्यावर आणि हिमतीवर वाईट परिणाम झाला.

(१२८) आजारीपणाच्या काळात त्याने राज्याची सूत्रे आपले दोन गुलाम हुश्यार आणि बेदार यांच्या[७५] □ हातात दिली. आपल्या सर्व अमीरउमरावांचे सामर्थ्य त्यांच्या पाठीशी उभे करून त्या दोघांच्या राज्यातील वजनाला त्याने बळकटी आणली. या दोघा मंत्र्यांना खान खानान याची लोकप्रियता आणि महत्त्वाकांक्षा यांचा मत्सर वाटू लागला. ते सुलतानाला एकदा म्हणाले की जेव्हा खान खानान याची सत्ता आणि महत्त्व यांचा राज्यातून समूळ उच्छाद करण्यात येईल, त्याच वेळी दक्षिण देशाचे सरकार हे तुमचा मुलगा हसनखान याच्या हाती सुरक्षितपणे पडेल असे आम्हाला वाटते. फिरोजशहाला या वेळी सय्यद महमद गिसू दराज याने वर्तविलेल्या भविष्याची आठवण झाली. त्याने आपला भाऊ खान खानान याला आंधळा करण्याचे ठरविले आणि त्यायोगे सिंहासनावर कधीकाळी तो बसण्याची शक्यताच नाहीशी करून टाकण्याचा त्याने निश्चय केला. फिरोजशहाच्या या बेताची खान खानान [२] (३९२) याला जेव्हा बातमी लागली तेव्हा त्याने पळून जाण्याची तयारी केली. रात्रीच्या वेळी आपला मुलगा अल्लाउद्दीन याला घेऊन तो सय्यद गिसू दराज याच्या निवासस्थानी गेला आणि त्याने आपल्याला सल्ला आणि आशीर्वाद द्यावा अशी त्याला विनंती केली. गिसू दराजने अल्लाउद्दीनच्या डोक्यावरील फेटा आपल्या हातात घेतला आणि त्याचे दोन तुकडे केले. एक तुकडा त्याने खान खानानच्या मस्तकाभोवती गुंडाळला आणि दुसरा अल्लाउद्दीनच्या डोक्याभोवती गुंडाळून आपले दोन्ही हात त्यांच्या मस्तकावर आशीर्वादपूर्वक धरून तुम्ही दोघेही सार्वभौम व्हाल असे भविष्य त्याने त्यांना सांगितले. सय्यद गिसू दराजजवळील भेटीचा प्रसंग संपुष्टात आल्यानंतर खान खानान आपल्या वाड्यात परतला. रात्रीचा उरलेला वेळ त्याने आपली जाण्याची तयारी करण्या-

मध्ये घालविला. दिवस उजाडला न उजाडला आहे तोच आपल्या ४०० विश्वासू सैनिकांना घेऊन तो वाड्याच्या दरवाजाबाहेर पडला. दरवाजाजवळ त्याच्याशी फार पूर्वीपासून परिचय असलेला बसऱ्याचा सुप्रसिद्ध व्यापारी खलफ हसन याने त्याला राजाधिराज अशी हाक मारून त्याच्या आगामी सुलतान पदारोहणाची सलामी दिली. खलफ हसन याला खान खानानच्या बेताबद्दल अगोदरच कळले होते.

( १२९ ) खान खानानने खलफ हसनला दरबारातील अधिकाऱ्यांनी बघू नये आणि त्याच्या स्वतःच्यामुळे त्याला काही त्रास भोगावा लागू नये म्हणून तावडतोब आपल्या घराकडे निघून जाण्याची त्वरा करण्यास सांगितले. यावर खलफ हसन म्हणाला की भरभराटीच्या दिवसांत मोठ्या मित्रत्वाचा आव आणणे आणि त्या मित्रावर संकटाची छाया कोसळली म्हणजे त्याच्या डोळ्यांत आपल्या चंचलतारूपी स्वभावाची धूळ फेकणे हे चारित्र्यवान माणसाला शोभून दिसत नाही. माझा जीवन-रूपी अग्नीचा एक स्फुल्लिंग जोपर्यंत शिल्लक आहे तोपर्यंत तुम्हाला--जो माझा आश्रय-दाता आहे--सोडून जाण्याची हलकटपणाची कल्पना देखील माझ्या मनात येणार नाही. मला अशी आशा आहे की आपण आपल्या अनेक सेवकगणांमध्ये माझी भरती करून मला संभाळून घ्याल आणि आपल्यासाठी अतिशय महत्त्वाची अशी कामगिरी पार पाडण्याची परवानगी द्याल. आपल्याबद्दल आपुलकीने भरलेले खलफ हसन याचे बोलणे ऐकूण खान खानान याला अतिशय आनंद झाला. त्याने खलफ हसन याला आपल्या बरोबर येण्यास संमती दिली. त्यावेळी तो असे म्हणाला की, ' कधीकाळी मी सिंहा-सनावर बसलो तर मी तुला माझा मार्गदर्शक आणि मंत्री करीन.' एवढे बोलून त्याने शहर सोडले आणि संध्याकाळी तो खान खानानपूर येथे पोहोचला. ' मी जर राजा झालो तर या शहरापासून येणारे उत्पन्न मक्का आणि मदिना, आणि [ २ ] ( ३९३ ) नजफ आणि करबला येथील सय्यद जमातीच्या लोकांसाठी लावून देईन,' अशी त्याने प्रतिज्ञा केली.

( १३० ) खान खानान पळून गेल्याची बातमी जेव्हा हुश्यार आणि बेदार यांना समजली तेव्हा ते अधिऱ्या उत्सुकतेने सुलतानाकडे गेले. खान खानान याच्या पाठलागावर जाण्याची परवानगी त्यांनी सुलतानापासून मिळविली. बरोबर चार हजार घोडेस्वार आणि काही लढाऊ हत्ती घेऊन ते घाईघाईने खान खानानच्या पाठलागावर निघाले. राज्यातील काही अमीर-उमरांवाना आपल्या बाजूला वळवून घेऊन त्यांचे साहाय्य मिळवीपर्यंत खान खानान याने अज्ञातवासात राहण्याचे ठरविले परंतु त्याचा मार्गदर्शक खलफ हसन याने त्याला या बेतापासून परावृत्त केले. त्याने कुलबर्गा, बिदर आणि कल्याणी येथे आपली माणसे पाठवून तेथील फिरोजशहा विरुद्ध असंतुष्ट असलेल्या अनेक माणसांना खान खानानच्या निशाणाखाली जमविले. प्रत्यक्ष युद्धाचा प्रसंग येऊ नये म्हणून इकडून तिकडे जाण्यातच काही दिवस मोडले. अखेर फिरोज-शहाच्या मंत्र्यांना भरपूर कुमक आली. खान खानानचे पळून जाण्याचे सर्व मार्ग रोखले

गेले. फिरोजशहाच्या सरदारांपाशी ८ हजार फौज जमा झाली तर खान खानानचे सबंध सैन्य एक हजार घोडेस्वारांपेक्षा जास्त भरले नाही. अशा आणीबाणीच्या वेळी हिंदुस्थानात वंजारी [७६] म्हणून ओळखल्या जाणाऱ्या जमातीतील काही धान्याचे व्यापारी वऱ्हाडमधून २ हजार बैल घेऊन पुढील प्रवासाला निघाले होते. त्यांनी कल्याणीच्या परिसरात छावणी दिली. त्यांच्याबरोबर काही व्यापाऱ्यांनी लाहोरमधून विक्रीकरिता आणलेले ३०० घोडे पण होते. खलफ हसन याने या परिस्थितीचा फायदा घेतला. त्याने ती सर्व जनावरे खरेदी केली. दक्षिणेतील पद्धतीप्रमाणे त्याने तांबडी आणि हिरवी निशाणे तयार केली, आणि प्रत्येक बैलावर हातात निशाण देऊन एका माणसाला बसविले. या लुटुपुटीच्या सैन्याबरोबर त्याने काही घोडेस्वार ठेवले. त्यांना त्याने हुकूम दिला की, तुम्ही काही अंतरावरच राहा, आणि जेव्हा प्रत्यक्ष लढाईला सुरुवात होईल तेव्हा असे जाहीर करा की आपल्या जहागिरीवरून खान खानान [२](३९४) याला मदत करण्यासाठी काही राजेरजवाडे आलेले आहेत. खान खानानने या बेताकडे एक पोरकटपणाची योजना म्हणून बघितले. परंतु अखेर त्याने तो बेत अमलात आणण्यास संमती दिली. दुसऱ्या दिवशी सकाळी तो फिरोजशहाच्या फौजांच्या दिशेने सावकाश कूच करून गेला. आपल्या सैनिकांना उत्तेजन देण्यासाठी त्याने जाहीर केले की, "सैनिकहो आपल्याला मिळण्याकरता काही सरदार सैन्य घेऊन झपाट्याने चाल करून येत आहेत आणि ते आपल्यापासून फक्त काही मैल अंतरावर आहेत." खान खानान याला कुमक आली तर मोठा बाका प्रसंग ओढवेल याची भीती वाटून हुश्यार आणि बेदार यांनी खान खानान आणि त्याला येऊ घातलेली तथाकथित कुमक यांचा मिलाफ होऊ नये म्हणून युद्धाचे आव्हान स्वीकारले. लढाईला सुरुवात झाल्यावर खलफ हसन हा बैलांच्या पुढे घोडेस्वार असलेल्या सैन्याला बरोबर घेऊन कूच करून आला. बैलावर बसलेली माणसे आपल्या हातातील निशाणे फडकावीत होती. खलफ हसन हा काही अंतरावर असलेल्या जंगलातूनच चाल करून पुढे येत आहे असा भास निर्माण झाला. खान खानानच्या मदतीला येणाऱ्या सरदारांचे अपेक्षित असलेले सैन्य ते हेच असे शत्रूने अनुमान काढले. याच वेळेला त्यांच्यावर खान खानानच्या फौजेने जबरदस्त मारा केला आणि फिरोजशहाच्या सैन्याची उजवी फळी यामुळे मोडली जाऊन विस्कळीत झाली. हुश्यार आणि बेदार हे दोघेजण सैन्याच्या मध्यभागी होते. त्यांनी आपली माणसे पळताना बघितली. खान खानानच्या मदतीसाठी येणारी तथाकथित कुमक बघून त्यांच्या हृदयात भीतीने धडकी भरली. खानखानानच्या सैन्याने त्यांचा धुव्वा उडविला, आणि त्यांना रणांगणातून हाकलून लावले. हुश्यार आणि बेदार यांनी फारच थोडा प्रतिकार केला. खान खानानला अनपेक्षितपणे मिळालेल्या या विजयानंतर त्याने पळणाऱ्या सैनिकांचा पाठलाग केला. अनेक हत्ती आणि घोडे त्यांनी काबीज केले. थोड्याच काळात सर्व बाजूंनी राजनिष्ठ सैनिक त्याला मोठ्या संख्येने मिळाले.

( १३१ ) आपली तब्येत बरी नाही आणि आपल्या अंगात अशक्तपणा आहे या गोष्टीची दखल न बाळगता फिरोजशहाने आपला मुलगा राजपुत्र हसनखान याच्या मस्तकावर छत्रचामरे ढाळण्याची आज्ञा दिली. किल्ल्याचा बंदोबस्त करण्याचे काम त्याने आपल्या काही विश्वासू सेवकांवर सोपविले. इतर कोणत्याही प्रकारे प्रवास करून जाणे शक्य नसल्याने फिरोजशहा पालखीत बसला. बरोबर अनेक [२] (३९५) उमराव, ४ हजार घोडेस्वार, भरपूर पायदळ, काही तोफा आणि पुष्कळ हत्ती बरोबर घेऊन आपला भाऊ खान खानान याला प्रतिकार करण्यासाठी त्याने कूच केले. शहरापासून काही मैल अंतरावर दोन्ही सैन्यांत चकमक झाली. फिरोजशहा सैन्याच्या ज्या भागात होता त्या भागावर शत्रूने जबरदस्त दडपण आणले, त्यामुळे तो ठार झाला अशी बातमी फैलावली. यावर त्याच्या सैन्यातील अनेक अधिकारी आणि शिपाई मोठ्या संख्येने खान खानानच्या सैन्याला जाऊन मिळाले. इतके सैनिक सैन्य सोडून निघून गेल्यामुळे हुश्यार आणि बेदार हे घाबरून गेले, आणि सुलतानाला घेऊन किल्ल्याकडे पळाले. पराभवाचे भय आणि पळापळीचा त्रास यामुळे फिरोजशहाला मूर्च्छा आली होती. किल्ल्याच्या दरवाजाशी आल्यानंतर फिरोजशहा या मूर्च्छेतून सावध झाला.[७७] *

( १३२ ) सुलतानासंबंधी वाटत असलेल्या आदराच्या भावनेमुळे खानखानानला त्याचा पाठलाग करणे प्रशस्त वाटेना. परंतु तो जेव्हा किल्ल्यात गेल्याचे त्याच्या कानावर आले, तेव्हा तो राजधानीपर्यंत कूच करून गेला, आणि किल्ल्याच्या तटाखाली त्याने छावणी दिली. हुश्यार आणि बेदार यांनी राजपुत्र हसनखान याच्यासह किल्ल्याच्या संरक्षणाची तजवीज केली, आणि बंदुका आणि बाण यांच्या वर्षावाने किल्ल्याला वेढा देऊन बसलेल्या सैनिकांच्या हल्ल्याला परतवून लावण्यास सुरुवात केली. तोफेचा एक गोळा खान खानानच्या तंबूत पडला, आणि त्याच्याशेजारी बसलेले लोक जखमी झाले. यावर त्याने किल्ल्यापासून काही अंतरापर्यंत आपला मुक्काम हटविला. सरते शेवटी फिरोजशहाने आपला मुलगा हसनखान याला आपल्यासमोर बोलावून असे सांगितले की, "अमीर-उमराव आणि फौज यांना सुलतानाबद्दल वाटणाऱ्या आत्मीयतेवर साम्राज्ये अवलंबून असतात. माझे अमीर आणि सैन्य यापैकी बहुतेकांनी तुझ्या चुलत्याचे बाजूने कल दिलेला आहे. म्हणून माझा तुला असा सल्ला आहे की तू यापुढे प्रतिकार करण्याचे टाळ. तू प्रतिकार केल्यास, त्यामुळे सार्वजनिक जीवनावर विपन्नावस्थेचा प्रसंग गुजरेल." यानंतर सुलतानाने राजवाड्याचे दरवाजे उघडण्यात यावे असा हुकूम दिला आणि खान खानान व त्याचे काही अनुचर यांना किल्ल्यात प्रवेश दिला. सुलतानाच्या बिछान्यावर खान खानान हा गेला. आपले मस्तक त्याने सुलतानाच्या पायावर ठेवले. तेव्हा त्याच्या भेटीबद्दल फिरोजशहाने आनंद [२] (३९६) प्रगट केला आणि तो म्हणाला की, "तू सार्वभौम झाल्याचे बघण्याची परवानगी त्या सर्वसाक्षी परमेश्वराने दिल्याबद्दल मी त्याचे आभार मानतो. हे माझ्या बंधो, त्या

उच्चाधिकारपदी विराजमान होण्यास तू सर्वथैव योग्य आहेस. माझ्या मनातील नैसर्गिक पितृवात्सल्यामुळे माझ्या मुलाला वारस नेमण्याची इच्छा मला झाली. परंतु त्यात निराशा पदरी पडल्यामुळे माझे साम्राज्य मी परमेश्वरावर सोपविले आहे आणि माझ्या मुलाला तुझ्या स्वाधीन केले आहे." यानंतर फिरोजशहाने खान खानान याला सिंहासनावर बसण्याची विनंती केली. "माझ्या आयुष्याचे जे काही थोडेसे क्षण उरले आहेत तेवढ्यापुरती तू माझी काळजी घे. एखाद्या पाहुण्यासारखा मी तुझ्याकडे राहीन," असे तो केविलवाणेपणाने म्हणाला. त्याच दिवशी म्हणजे ५ शव्वाल हिजरी ८२५ यावर्षी खान खानान याने पूर्वी फिरोजशहा याने धारण केलेला राजमुकुट आपल्या मस्तकावर धारण केला, आणि फिरोजा या सिंहासनावर तो विराजमान झाला. त्याने

शव्वाल ५ हिजरी ८२५ सप्टेंबर १५ इ. स. १४२२

अहमदशहा बहमनी अशी पदवी घेतली, नाणी आपल्या नावाने पाडण्याचा आणि **खुतबा** आपल्या नावे वाचला जाण्याचा हुकूम दिला. यानंतर दहाच दिवसांनी म्हणजे १५ शव्वाल या दिवशी फिरोजशहाचा आत्मा स्वर्गलोकीच्या पहारेकऱ्याच्या आधीन झाला. त्याच्या पूर्वजांच्या कबरस्थानाजवळ त्याच्या मृत देहाचे मोठ्या थाटामाटाने

शव्वाल १५ सप्टेंबर २५

आणि समारंभाने दफन करण्यात आले. त्याने एकंदर २५ वर्षे, ७ महिने आणि १५ दिवस राज्य केले.

(१३३) सांगोवांगी आलेल्या हकिकतीप्रमाणे आणि मी प्रत्यक्ष लिहिलेले जे बघितले आहे त्यानुसार अहमदशहा बहमनी याने आपल्या बहिणीचा मुलगा शेरखान याच्या चिथावणीवरून आपला भाऊ फिरोजशहा याला गळा दाबून ठार मारले, असे आहे. यातील सत्य काय ते एक परमेश्वरच जाणू शके. [७८] *

## अहमदशहा वली बहमनी [७९] * [८०] □

(१३४) लष्करी आणि मुलकी बाबींचा कारभार उत्तम तऱ्हेने कसा करावयाचा याची अहमदशहाला पूर्णपणे जाणीव होती. आपल्या भावाच्याच धोरणाचे [२] (३९७) त्याने अनुकरण केले आणि सय्यद जमातीचे लोक, आणि विद्वान आणि पापभीरू व्यक्ती यांना त्याने सन्मानपूर्वक वागणूक दिली. त्याच्या फायद्याची आणि लाभाची कोणतीही गोष्ट करण्याकडे त्याने यत्किंचितही दुर्लक्ष केले नाही. आपल्या कारकिर्दीच्या पूर्वार्धात सय्यद महमद गिसू दराज याने त्याजविषयी जी भविष्यवाणी वर्तविली होती त्यामुळे त्या पतितपावन अवलियावर त्याने आपल्या कृपेचा जणू वर्षावच केला. सर्वसाधारणपणे यथा राजा तथा प्रजा हा एकंदरीत न्याय असल्याने दक्षिणेतील लोकांनी धार्मिक बाबींच्या बाबतीत सय्यद गिसू दराज याची आपल्या गुरुस्थानी निवड केली. त्याचा परिणाम असा झाला की त्याचे घर म्हणजे सर्व पंथांच्या लोकांचे एक यात्रास्थान होऊन बसले. शेख सिराजउद्दीन याच्या घराण्यावरील आपली [२] (३९८) मेहरनजर सुलतानाने काढून घेतली आणि आपली कृपादृष्टी त्याने सय्यद महमद गिसू

दराज याजकडे वळविली. त्याने गिसू दराज याला कुलबर्ग्याजवळ वंशपरंपरेने अनेक शहरे, खेडी आणि मोठमोठया जमिनी जहागिरीदाखल दिल्या आणि त्याच्यासाठी शहरापासून फारसे लांब नाही अशा अंतरावर एक महाविद्यालय बांधले. हल्ली देखील जरी तो प्रदेश बहमनी घराण्याच्या ताब्यातून विजापूरच्या सुलतानाच्या ताब्याखाली आला असला तरी देखील पूर्वीच्या सुलतानांनी दिलेल्या सर्व जहागिरी अजून देखील सय्यद गिसू दराज याच्याच वंशजांच्या ताब्यात आहेत. दक्षिणेतील लोकांच्या मनात त्या अवलियाबद्दल इतकी काही आदराची भावना आहे की एखाद्या दक्षिणी माणसाला असा प्रश्न विचारला की महमद पैगंबर आणि सय्यद गिसू दराज या दोहोंमध्ये कोणाचे व्यक्तिमत्त्व मोठे आहे असे तू मानतोस. यावर तो थोड्याशा आश्चर्याचा अविर्भाव आणून या प्रश्नाचे उत्तर देईल की महमद पैगंबर हा निःसंशय थोर मनुष्य आहे परंतु सय्यद महमद गिसू दराज या व्यक्तीची थोरवी काही आगळीच आणि उच्च दर्जाच्या कोटीची आहे.

(१३५) ज्या क्षणी अहमदशहा सिंहासनावर बसला त्या क्षणापासून त्याने आपले लक्ष आपल्या सैन्याची सुधारणा घडवून आणण्याकडे वळविले. याचे कारण फिरोजशहाच्या कारकिर्दीत विजयनगरच्या राजाने बहमनींच्या प्रदेशावर केलेल्या आक्रमणांचा त्याला सूड घ्यावयाचा होता. त्याने खलफ हसन याला वकील उस्सलतनत या अधिकारावर नेमले आणि त्याला १२०० घोडेस्वारांच्या अधिकाराची मनसब दिली. खलफ हसन हा मूळचा व्यापारी असल्याने अहमदशहाने त्याला मलिक उत् तुज्जार ही पदवीही बहाल केली. ही पदवी दक्षिणेमध्ये अजून प्रचलित आहे [१] आणि सन्माननीय अशा ज्या पदव्या बहाल करतात त्यामध्ये ही पदवी अतिशय मानाची अशी समजली जाते. फिरोजशहाचे जे मंत्री होते त्यांच्या राज्यनिष्ठेचे खलफ हसन याला कौतुक वाटले. ते आपल्या विश्वासाला पात्र आहेत असा त्याने विचार केला, आणि त्यांच्या वतीने सुलतानाजवळ त्याने रदबदली केली. खलफ हसनच्या [२] ३९९ शिफारसीवरून सुलतानाने हुश्यार ऐनउलमुल्क याचा अमीर उल्उमरा ही पदवी देऊन सन्मान केला आणि त्याला १५०० घोडेस्वारांच्या [२] अधिकाराची मनसब बहाल केली. दौलताबादच्या सुभेदारीवर त्याने बेदार निजाम उल्मुल्क याला नेमले, आणि त्याबरोबरच त्याला २ हजार घोडेस्वारांच्या मनसबीवर बढती दिली. बहमनी सुलतानांच्या राज्यकारभारात सर्वश्रेष्ठ अमीर हे पद २ हजार घोडेस्वारांचा जो अधिकारी होतो त्याच्यापुरतेच मर्यादित होते. ह्या पदावर **तरफदार** किंवा राज्याच्या ४ मुख्य विभागांचे सुभेदार यांच्याच नेमणुका होत. ह्या उच्च अधिकाराच्या जागेपासून तो कमीत कमी २०० घोडेस्वारांचे अधिकारी असत. परंतु यापेक्षा कमी **मनसब** असलेल्या कोणालाही अमीर मानत नसत. १ हजाराची मनसबदारी असलेल्या अमिराला आपल्याबरोबर तोघा, [३] निशाण, आणि नौबती ही अमिरीच्या अधिकाराची चिन्हे बाळगण्याचा खास अधिकार असे.

( १३६ ) फिरोजशहाचा मुलगा हसनखान हा दक्षिणेच्या सार्वभौमपदाचा खराखुरा कायदेशीर वारस होता. सुलतानाच्या मंत्र्यांनी हसनखानाला सक्त कैदेत ठेवावे अगर ठार मारावे असा सल्ला दिला. त्या सल्ल्याविरुद्ध सुलतानाने त्याची [२](४००) ५०० च्या मनसबीवरील अमीर म्हणून नेमणूक केली. त्याचप्रमाणे फिरोजाबाद येथील राजवाडा त्याला राहण्यासाठी देण्यात आला आणि भरपूर जहागिरी उदरनिर्वाहासाठी त्याला तोडून देण्यात आली. वेळेचे किंवा समारंभाचे कोणतेही बंधन न पाळता त्याला त्याच्या राजवाड्यापासून ८ मैल अंतरापर्यंत शिकारीला जाण्याची अगर मन मानेल त्याप्रमाणे भटकण्याची परवानगी देण्यात आली. हसनखानाचा कल सुखोपभोग घेण्याकडे होता. साहजिकच राज्यकारभाराच्या जबाबदारीपेक्षा त्या सुखांचा उपभोग घेण्याचे जे स्वातंत्र्य त्याला बहाल करण्यात आले होते त्यातच त्याने समाधान मानले. त्याचा चुलता जोपर्यंत हयात होता तोपर्यंत त्याने मजेने जीवनाचा उपभोग घेतला आणि चुलत्या पुतण्यामध्ये कुठलाही मतभेद आला नाही. परंतु अहमदशहाच्या मृत्यूनंतर त्याला आंधळा करण्यात आले आणि फिरोजाबाद येथील राजवाड्यात कैदी म्हणून त्याला ठेवण्यात आले.

( १३७ ) जेव्हा अहमदशहाने आपल्या गुणांनी लोकांची मने आपल्याकडे खेचून घेऊन त्यांच्यामध्ये सरकाराबद्दल आपुलकीची भावना निर्माण केली तेव्हा त्याने गुजराथेच्या बाजूने आपल्या राज्यावर आक्रमण होऊ नये म्हणून आपल्या राज्याच्या उत्तर सरहद्दीवर मोठी फौज शस्त्रसज्ज ठेवली. त्यानंतर तो ४० हजार घोडेस्वार घेऊन कर्नाटकाच्या दिशेने चाल करून गेला. देवरायाने देखील वेळ न गमाविता आपल्या सैन्याची जमवाजमव केली. वरंगळच्या राजाला त्याने आपल्या मदतीला येण्यासाठी बोलावणे केले आणि मुसलमानांचा समूळ नाश करण्याच्या हेतूने त्याने प्रचंड फौज घेऊन तुंगभद्रेच्या तीराकडे कूच केले.

( १३८ ) अहमदशहा हा त्याचवेळी नदीच्या विरुद्ध तीरावर येऊन पोहोचला. त्याने तुर्की लोकांच्या पद्धतीप्रमाणे शत्रूच्या पायदळाकडून रात्रीच्या वेळी होणाऱ्या हल्ल्यांना प्रतिबंध करण्यासाठी आपल्या छावणीसभोवार गाडे लावून ठेवले. नदीच्या तीरावर त्याने ४० दिवस मुक्काम केला. या काळात त्याच्या सैन्याच्या हलक्या तुकड्यांनी नदीच्या उत्तर किनाऱ्यावरील देवरायाच्या ताब्यातील मुलूख उद्ध्वस्त करून टाकला. अशा तऱ्हेचे डावपेच अहमदशहाने केले याचे कारण त्याला असे वाटले की त्यामुळे हिंदूंना नदीपार करून येण्याचा मोह होईल. तसे झाले असते म्हणजे तो ज्या जागी मुक्काम करून होता ती जागा त्याच्या दृष्टीने अत्यंत मोक्याची असल्यामुळे [२] (४०१) तेथे हिंदूंबरोबर त्याला यशस्वीरित्या लढाई देता आली असती. परंतु या दृष्टीने केलेले त्याचे सर्व प्रयत्न व्यर्थ गेले. सरतेशेवटी युद्ध संपविण्याच्या दृष्टीने जो विलंब होत होता त्याला कंटाळून त्याने आपल्या युद्धमंडळाची बैठक बोलाविली. त्याच्या सर्व अधिकाऱ्यांनी एकमताने असा निर्णय दिला की नदी ओलांडून जावे आणि शत्रूच्या मुक्कामावर

हल्ला करावा. सुलतानाला हे मत पटून त्याने त्याप्रमाणे दुसऱ्या दिवशी कारवाई करण्याचे ठरविले. या ठिकाणी ही गोष्ट नमूद केली पाहिजे की वरंगळच्या राजाने यापूर्वीच आपल्या दोस्ताला सोडून पळ काढला होता आणि आपली फौज छावणीतून काढून घेतली होती. रात्रीच्या वेळी लोदीखान, अधमखान आणि दिलावरखान यांनी कूच केले आणि काही अंतरावर नदी ओलांडून ते दिवसा-उजेडी शत्रूच्या छावणीच्या आसमंतात जाऊन पोहोचले. विजयनगरचा राजा एका बागेत निद्रिस्त होता आणि त्याच्याजवळ फारच थोडे सेवकगण होते. त्या बागेच्या शेजारीच एक दाट असा उसाचा मळा होता. मुसलमानांचे काही सैनिक लूट करण्याच्या उद्देशाने बागेमध्ये शिरले आणि देवराया अतिशय घाबरून तसाच अर्धवट नग्नावस्थेत त्या उसाच्या मळ्यात घुसला. तेथे तो शिपायांच्या हाती पडला. त्यांना वाटले की तो एक खेडूतच आहे. म्हणून त्यांनी त्याच्या डोक्यावर उसाची एक मोळी दिली आणि आपल्यापुढे त्याला धावावयास लावणे भाग पाडले. आपल्याला या शिपायांनी ओळखले नाही याची देवरायाला जाणीव झाली. त्याने उसाची मोळी तत्परतेने आपल्या डोक्यावर घेतली. त्याला असे वाटले की शत्रूच्या छावणीत पोहोचल्यावर आपली सुटका करण्यात येईल अथवा या नाही त्या उपायाने आपण आपली सुटका करून घेऊ.

(१३९) ते शिपाई आणि देवराया फार अंतर गेले नाहीत तोच हिंदूंच्या छावणीत घबराट पसरली की अहमदशहाने नदी ओलांडली असून देवरायाचा पत्ता नाही. अहमदशहा यामुळे प्रतिकार न होता शत्रूच्या फळीत घुसला. ज्या शिपायांनी देवरायाला पकडले होते त्यांनी उसापेक्षा अधिक मौल्यवान लूट मिळविण्याच्या आशेने देवरायाला वाटेल तिकडे जाण्याची मुभा देऊन आपल्या अधिकाऱ्यांना जाऊन मिळण्याची घाई केली. कोणाच्याही दृष्टीस न पडता देवरायाने पलायन केले. साधारण दुपारच्या वेळी त्याच्या काही अधिकाऱ्यांबरोबर त्याची गाठ पडली. त्यांनी [२](४०२) देवरायाला ओळखले आणि मोठ्या आनंदाने त्याचे स्वागत केले. देवराया आल्यामुळे त्याच्या विस्कळीत झालेल्या सैन्यात फिरून थोडाफार शिस्तबद्धपणा येऊ लागला. परंतु घडून आलेला प्रसंग म्हणजे आपल्याला झालेला अपशकून आहे असे देवरायाच्या मनाने घेतले. अहमदशहाच्या सैन्याबरोबर युद्धासाठी उभे राहण्याचे सर्व विचार त्याने मनातून बाजूला काढून टाकले आणि तो विजयनगरला पळून गेला.

(१४०) हिंदूंच्या राजधानीला वेढा देण्याच्या भानगडीत न पडता अहमदशहाने आजूबाजूचा मोकळा प्रदेश पायाखाली * घातला. तो जेथे जेथे गेला तेथे तेथे त्याने दया न दाखविता पुरुष, स्त्रिया आणि मुले यांची कत्तल केली. त्याचे हे वर्तन त्याचा चुलता आणि पूर्वज महमदशहा आणि विजयनगरचे राजे यांच्यामध्ये जो करार झाला होता त्याच्या अगदी विरुद्ध होते. जेव्हा जेव्हा त्याने मारलेल्या माणसांचा आकडा २० हजार एवढा भरत असे, तेव्हा तो त्या जागी ३ दिवस मुक्काम करी आणि या रक्तपिपासू घटनेसंबंधी आनंद दाखविण्यासाठी उत्सव साजरा

करी. त्याने मूर्तिपूजकांची देवळे उद्ध्वस्त केली आणि ब्राह्मणांच्या महाविद्यालयांचा नाश केला. अहमदशहाची ही कारवाई चालू असताना आपल्या धार्मिक वास्तूंचा नाश केला जात आहे आणि आपल्या देवतांची विटंबना केली जात आहे यामुळे जवळ जवळ ५ हजार हिंदू अतिशय चिडून गेले. या अत्याचाराचे मूळ जो अहमदशहा त्याला ठार मारण्याचे प्रयत्न करण्याच्या कामी आपला प्राणत्याग करण्याच्या शपथा त्यांनी घेतल्या. आपला बेत सिद्धीस जावा म्हणून त्यांनी अहमदशहाच्या हालचालींवर नजर ठेवण्यासाठी हेर नेमले. यात त्यांचा उद्देश मिळेल त्या पहिल्या संधीचा फायदा घेऊन आपला बेत तडीस नेण्याचा होता. एकदा असे झाले की अहमदशहा शिकारीकरता गेला होता. शिकारीच्या नादात त्याची त्याच्या सेवकांपासून चुकामूक झाली, आणि तो छावणीपासून जवळ जवळ १२ मैल दूर भरकटला. आपला उद्देश साध्य करण्यासाठी प्राण देण्याची तयारी असलेल्या त्या काफरांना जेव्हा या परिस्थितीची खबर कळली तेव्हा ते अहमदशहाला अडविण्यासाठी त्वरेने धावले. अहमदशहा जेव्हा त्यांच्या दृष्टीस पडला तेव्हा त्याचे २०० मोगल शरीररक्षक हे त्याच्यापासून काही अंतरावर होते. सुलतानाने जेव्हा [२] (४०३) आपल्या शत्रूंना बघितले तेव्हा तेथून जवळच सपाटीवर असलेल्या एका मातीच्या झोपडीकडे आसरा घेण्याच्या उद्देशाने त्याने आपल्या घोड्याला टाच दिली. या झोपडीचा गुरे बांधण्यासाठी उपयोग करीत. परंतु शत्रूने त्याचा सख्त पाठलाग केला. वाटेमध्ये बरीचशी खडबडीत आणि उंचवटे असलेली जमीन होती. त्यामुळे ती ओलांडून पलीकडे जाईपर्यंत त्याचे शत्रू त्याच्या पाठीशी येऊन ठेपले. त्याचे भाग्य थोर म्हणून त्याचे काही धनुर्धारी त्या क्षणीच तेथे येऊन पोहोचले. त्यांनी शत्रूला थोपवून धरले आणि तेवढ्या वेळात सुलतानाला त्या झोपडीकडे जाण्यास अवधी मिळाला. काफरांनी झोपडीत घुसण्याचा प्रयत्न केला, तेव्हा दोन्ही पक्षात एकच धुमश्चक्री उडाली. अहमदशहाच्या सैनिकांनी इस्लामच्या नावाचा जयजयकार केला व शरण जाण्याऐवजी लढून प्राण देण्याची प्रतिज्ञा केली. याप्रसंगी सय्यद हसन बदक्षी, मिर अलीसिसतानी, मीर अलीकाबुली आणि अबदुल्ला कुर्द यांनी फार मोठी कामगिरी बजावली आणि सुलतानाच्या अखंड कृपाप्रसादाला ते पात्र झाले. सुलतानाचे बहुतेक शरीररक्षक मारले गेले अथवा जखमी झाले. शत्रू झोपडीच्या अगदी भिंतीनजीक येऊन ठेपला आणि त्यांनी कुदळी व पहारी यांनी भिंत पाडण्यास सुरुवात केली. सुलतानाची परिस्थिती या भयानक संकटामुळे अतिशय केविलवाणी झाली. या आणीबाणीच्या प्रसंगी सुलतानाचा शस्त्रवाहक अबदूल कादर हा सैन्याच्या एका तुकडीला घेऊन हजर झाला. त्याने आपल्या धन्याच्या शोधासाठी या तुकडीबरोबरच छावणी सोडली होती. इतके होईतोपर्यंत काफरांनी भिंतीला मोठे खिंडार पाडले होते. परस्परांमध्ये हातघाईची लढाई चालली होती. तोच काफरांवर पिछाडीकडून अचानक अबदूल कादर याने हल्ला चढविला. हे पाहिल्यावर आपल्या

उरलेल्या सैनिकांसह आपल्या जागेतून बाहेर पडून सुलतानाने शत्रूवर अचानक हल्ला केला. फार मोठ्या चकमकीनंतर शत्रूचा पराभव झाला. शत्रूने एकंदर १ हजार माणसे गमावली. मुसलमानांचे एकंदर ५०० सैनिक ठार झाले. याप्रमाणे अबदूल कादर याने जणूकाही परमेश्वरानेच पाठविले आहे अशा तऱ्हेने सुलतानाच्या मदतीस येऊन सुलतानाला नाशाच्या खोल गर्तेतून सार्वभौम पदाचा आनंद [२] (४०४) उपभोगण्यासाठी वर खेचून काढले. परस्परांच्या फौजा एकमेकांसमोर युद्धासाठी उभ्या असताना या एकाच मोहिमेत विजयनगरचा राजा आणि बहमनींचा सुलतान हे दोघेजण एका भयंकर संकटात सापडावे आणि काहीही इजा न होता त्यांची सुटका व्हावी हा एक मोठा योगायोगच समजला पाहिजे आणि नमूद करण्यासारखी गोष्ट असेच समजले पाहिजे. छावणीत परतल्यावर अहमदशहाने अबदूल कादर याला २ हजाराच्या मनसबदारीच्या अधिकारावर नेमले, आणि वऱ्हाडच्या सुभेदारीवर त्याची नेमणूक केली. त्याला त्याने खानजहान हा किताब देखील बहाल केला. त्याशिवाय त्याने अबदूल कादर याला आपला प्राणदान देणारा भाऊ व अतिशय विश्वासू मित्र अशा संज्ञांनी त्याचा मोठ्या सन्मानपूर्वक उल्लेख केला. त्याचा भाऊ अबदुल लतीफ यालाही त्याने तेवढ्याच मनसबीची बढती दिली आणि आजमखान ही पदवी बहाल केली. ज्या ज्या व्यक्तींनी सुलतानाची सुटका करण्याच्या कामात हातभार लावला होता त्या त्या सर्वांना पदव्या आणि नजराणे दिले जाऊन त्यांचा भरपूर गौरव करण्यात आला. वरील प्रसंगात मोगल धनुर्धरांनी मोठी कामगिरी बजावल्यामुळे सुलतानाने मलिकउत्तुज्जार याला तिरंदाजींची ३ हजार स्वारांची एक तुकडी तयार करण्याचा हुकूम दिला आणि त्यात इराक, खुरासाण, मावर उलनेहर, तुर्कस्थान आणि अरबस्थान यांतील रहिवाशांची भरती करण्यास सांगितले. त्याचप्रमाणे त्याने आपल्या सर्व अधिकाऱ्यांना त्यांची मुले आणि त्यांचे आश्रित यांना तिरंदाजीमध्ये तरबेज करण्याची आज्ञा केली. [८५] □

(१४१) या प्रसंगानंतर अहमदशहाने आजूबाजूचा सर्व प्रदेश उद्ध्वस्त केला, आणि तो विजयनगरवर चाल करून गेला. त्याने विजयनगरला जारीने वेढा दिला. त्यामुळे तेथील रहिवाशांची स्थिती अतिशय अनुकंपनीय झाली. आपल्या प्रजाजनांची या हालअपेष्टांतून सुटका व्हावी म्हणून देवरायाने तहाची बोलणी करण्यासाठी आपले वकील अहमदशहाकडे पाठविले. अहमदशहाने पुढील अटीवर तहाला मान्यता दिली. ती अट अशी - देवरायाने उत्तमोत्तम हत्तीवर लादून मागील सर्व वर्षांची थकलेली बाकी सुलतानाच्या छावणीत पाठवावी, आणि ही बाकी घेऊन [२] (४०५) देवरायाच्या मुलाने नौबती, तुताऱ्या आणि सार्वभौमत्वाची इतर सर्व चिन्हे घेऊन यावे. ही अट नाकारणे म्हणजे आपली सुरक्षितता धोक्यात आणण्यासारखे आहे हे देवरायाने ओळखले, आणि ३० हत्तींवर खंडणीची रक्कम लादून आपल्या मुलाला रवाना केले. सुलतानाने आपले काही अधिकारी त्याला सामोरे पाठविले. छावणीतील

बाजार आणि मुख्य मुख्य रस्ते यांमधून मोठ्या समारंभाने त्याला नेल्यावर नंतर त्याला सुलतानाच्या समक्ष आणण्यात आले. सुलतानाने त्याला आलिंगन दिले आणि सिंहासनाच्या पायाजवळ बसण्याची त्याला परवानगी दिली. नंतर त्याने देवरायाच्या मुलाच्या खांद्यावर एक भरजरी अंगरखा टाकला आणि त्याला हिऱ्याने मढविलेली एक तलवार बक्षीस दिली· त्याचप्रमाणे निरनिराळ्या देशांतील वीस अलबख घोडे, एक हत्ती, शिकारीसाठी लागणारे कुत्रे आणि बहिरी ससाण्यांचा एक तांडा भेट म्हणून त्याला नजर केला. या ठिकाणी हे नमूद करणे आवश्यक आहे की, तोपर्यंत कर्नाटकच्या लोकांना बहिरी ससाणा म्हणजे अपरिचित पक्षी होता. यानंतर अहमदशहाच्या सैन्याने विजयनगरच्या परिसरातून कूच केले. कृष्णा नदीच्या तीरावर आल्यानंतर सुलतानाने देवरायाच्या मुलाला निरोप दिला आणि तो सैन्यासहित कुलबर्ग्याला परत आला.

(१४२) या वर्षी पाऊस अजिबात पडला नाही. त्यामुळे सबंध दक्षिणेत अतिशय मोठा दुष्काळ पडला. पाण्याच्या अभावी असंख्यात गुरेढोरे वाळून गेलेल्या मैदानावर मरून पडली. परिणामी सुलतानाने आपल्या सैन्याच्या पगारात वाढ केली आणि बादशाही धान्याची कोठारे गरिबांच्या उपयोगासाठी खुली केली. पुढील वर्षीही पाऊस पडला नाही. लोकांनी बंडखोरीला सुरुवात केली. लोक असे म्हणू लागले की, या सुलतानाची राजवटच कमनशिबी आहे आणि त्याची वागणूक परमेश्वरापाशी रुजू नाही. या गोष्टीचे सुलतानाला अतिशय दुःख झाले. परमेश्वराची आपल्या प्रजेवर कृपा व्हावी म्हणून त्याची आळवणी करण्यासाठी तो स्वतः मशिदीमध्ये गेला. त्याच्या प्रार्थना जणू परमेश्वराच्या कानावर पडल्या आणि त्यानंतर काही काळाने मुसळधार पाऊस कोसळला. ज्यांनी त्याला शिव्या दिल्या होत्या तेच [ २ ] ( ४०६ ) त्याची आता तोंड भरून स्तुती करू लागले. त्याला ते वली ( अवलिया ) आणि चमत्काराचा जनक असे म्हणू लागले. यानंतर मोठ्या आनंदाने आणि परमेश्वराला धन्यवाद देत सुलतान राजवाड्याकडे परतला. वाटेत लोकांनी त्याचा जयजयकार केला आणि त्याच्यावर टीका केल्याबद्दल स्वतःला धिक्कारून घेतले.

(१४३) हिजरी ८२८ ) इ. स. १४२४ ) हिजरी ८२८ या वर्षी सुलतानाने विजयनगरच्या राजाबरोबर दोस्ती केल्याबद्दल वरंगळच्या राजाला शिक्षा लावण्यासाठी आणि तेलंगणाचा प्रदेश जिंकून घेण्यासाठी त्याच्या राज्यावर स्वारी केली. गोवळकोंडा येथे आल्यावर आजमखानाच्या हाताखाली सैन्याची एक तुकडी त्याने पुढे पाठविली, आणि तो स्वतः तेथे २७ दिवस मुक्काम करून राहिला. या काळात त्याला बातमी मिळाली की आजमखानाने आपले सैन्य लहान आहे याची पर्वा न करता शत्रूवर हल्ला करून त्याचा पराजय केला आहे, ७ हजार हिंदूंना ठार मारले आहे आणि वरंगळचा ताबा घेतला आहे. त्याला असेही कळले की, झालेल्या चकमकीत वरंगळचा राजा ठार झाला आहे. हे कळल्यानंतर सुलतानाने वरंगळकडे

कूच केले आणि वरंगळमधील आतापर्यंत लुटली न गेलेली आणि वर्षानुवर्षे साचत आलेली संपत्ती आपल्या ताब्यात घेतली. या कामगिरीबद्दल सुलतानाने आजमखानाला त्याने १० मोठे व १० लहान असे हत्ती, हिरे बसविलेला कमरपट्टा, उत्कृष्ट मोत्याच्या ४ माळा आणि भरपूर द्रव्य देऊन त्याचा गौरव केला. त्यानंतर त्याने तेलंगणाचा उरलेला भाग जिंकून घेण्यासाठी आजमखानाची रवानगी केली. आजमखानाने आपल्यावर सोपविण्यात आलेली कामगिरी ४ महिन्यांच्या अवधित संपविली आणि तो सुलतानाला वरंगळ येथे येऊन मिळण्यासाठी परतला. तेलंगणाच्या मृत रायाच्या वारसाच्या ताब्यात असलेली काही मजबूत ठाणी जिंकून घेण्यासाठी सुलतानाने आजमखानाला मागे ठेवले, आणि तो स्वतः कुलबर्ग्याकडे निघाला.

( १४४ ) हिजरी ८२९ इ. स. १४२५ हिजरी ८२९ या वर्षी माहुरच्या एका बंडखोर जमीनदाराचा मोड करण्यासाठी अहमदशहाने कूच केले. या जमीनदाराच्या ताब्यात अनेक मजबूत ठाणी होती. त्याने अहमदशहाच्या सैन्याचा बराच काळपर्यंत प्रतिकार केला. बंडखोर लवकरच शरण आला. [ २ ] ( ४०७ ) अहमदशहाने जरी त्याला क्षमेचे वचन दिलेले होते तरी देखील तो त्याच्या हाती पडताच दिलेल्या वचनांना त्याने हरताळ फासला आणि त्याला व त्याच्या ५-६ हजार अनुयायांना त्याने ठार मारले. त्याच वेळी पकडलेल्या सर्व बायका आणि मुलांना जबरदस्तीने इस्लाम धर्माची दीक्षा त्याने दिली. या मोहिमेत गोंडवाड्याच्या ताब्यात असलेले एक ठिकाण कळंब येथील एक हिऱ्याची खाण त्याच्या ताब्यात आली. गोंडवाड्यात त्याने काफरांची अनेक देवालये जमीनदोस्त केली आणि त्यांच्या जागी मशिदी बांधल्या. मशिदीमधील फकीर आणि अवलिये यांच्या उदरनिर्वाहासाठी आणि धार्मिक कार्यासाठी लागणारे तेल आणि दिवे यांच्या खर्चासाठी त्याने प्रत्येक मशिदीला जमीन तोडून दिली. यावेळी तो जवळ जवळ एक वर्षभर एलिचपूर येथे मुक्काम करून राहिला. या काळात त्याने गावीलचा किल्ला बांधला, ८६ □ नरनाळ्याचा किल्ला दुरुस्त केला, आणि नंतर तो कुलबर्ग्याकडे परतला.

( १४५ ) अहमदशहाच्या साम्राज्याचा उत्तरेच्या दिशेने होणारा विस्तार बघून माळव्याचा सुलतान होशंग ८७ * याला भिती वाटली आणि त्याने खेडल्याचा राजा नरसिंगराय याला असे सुचविले की बहमनी सुलतान अहमदशहा याच्याविरुद्ध आपण एकजुटीचा करार करू. ही योजना नरसिंगरायाने मान्य केली नाही. तेव्हा होशंग याने त्याच्या राज्यावर दोन वेळा स्वारी केली. परंतु दोन्ही वेळा त्याचा पराभव झाला आणि त्याला भयंकर नुकसान सोसावे लागले. तिसऱ्या हल्ल्यात होशंग याने अगदी अचानकपणे नरसिंगराय याला गाठले. आपल्या सैन्याची जमवाजमव करणे अशक्य झाल्यामुळे आपल्या किल्ल्यातच राहाणे त्याला भाग पडले. ह्या प्रसंगी नरसिंगरायाने अहमदशहाकडे मदतीकरिता याचना केली. हे वर्ष म्हणजे हिजरी ८३० हे होय.

हिजरी ८३० } त्याने त्याला असे कळविले की, " फिरोजशहा [२] (४०८)
इ. स. १४२६ } बहमनीच्या वेळेपासून आपला मांडलिक राहीन असे मी कबूल केले, तेव्हापासून आतापर्यंत मी आज्ञापालनाच्या मार्गापासून एकदाही परावृत्त झालो नाही. बहमनी घराण्याचा मी मांडलिक आहे असेच शेजारील सर्व राज्यांचे राजेरजवाडे मानतात. यामुळे मला असा विश्वास वाटतो की माझ्यावर ओढवलेल्या या प्रसंगात मी आपल्याकडे मदतीची जी याचना केली आहे, तिचा आपण अव्हेर करणार नाही." अहमदशहाने यानुसार वऱ्हाडचा सुभेदार खानजहान याला नरसिंगरायाच्या मदतीसाठी कूच करून जाण्याचा आदेश दिला. त्याने स्वतः जरूर पडल्यास खानजहानच्या मदतीसाठी म्हणून ७ हजार घोडेस्वार घेऊन एलिचपूरकडे कूच केले. माळव्याचा सुलतान होशंग याने असा कयास बांधला की सुलतान अहमद हा घाबरून जाऊन वऱ्हाडातील आपल्या सैन्यापासून दूर गेला आहे. या समजुतीने त्याने खेडल्यावर चाल केली. आजूबाजूचा प्रदेश त्याने उद्ध्वस्त केला आणि अहमदशहाच्या नाकर्तेपणाबद्दल कुत्सितपणाचे उद्गार काढण्यात तो धन्यता मानू लागला. याची चीड येऊन खेडल्याला कुमक पोहोचविण्यासाठी अहमदशहाने त्वरेने खेडल्याच्या दिशेने कूच केले.

(१४६) या सुमारास काही श्रद्धाळू मंडळींनी अहमदशहाला असे सांगितले की तुमच्या कोणत्याही पूर्वजांनी सच्चा मुसलमानाविरुद्ध मदत केलेली नाही. असे करणे हे इस्लाम धर्माच्या मूलतत्त्वाविरुद्ध आहे आणि म्हणून अशी गोष्ट टाळली पाहिजे. सुलतान जरी शत्रूच्या छावणीपासून केवळ ४० मैलांवर होता तरी वरील धर्मपंडितांनी त्याच्याजवळ प्रगट केलेल्या विरोधाचे प्रखर दडपण त्याच्यावर पडले. त्याने ताबडतोब आगेकूच थांबविली आणि सुलतान होशंग याला त्याचवेळी पत्र लिहून कळविले की, 'नरसिंगराय हा माझ्या आश्रितांपैकी एक आहे. आपल्या दोन्ही राज्यांत मैत्री वाढवावयाची असेल तर आपण नरसिंगरायावर हल्ले [२] (४०९) करण्यापासून परावृत्त व्हा, आणि आपल्या देशाला परत जा. माझ्या धर्मपंडितांनी माझ्याजवळ जो काही वादविवाद केला त्याचा परिणाम म्हणून मी आता माझ्या राजधानीकडे परत फिरण्याच्या विचारात आहे.' अहमदशहाचा निरोप घेऊन जासूद शत्रूच्या छावणीत पोहोचण्याच्या अगोदरच त्याने आपल्या माघारीला सुरुवात केली. सुलतान होशंग याने अहमदशहाकडून आलेल्या पत्राची तिरस्कारपूर्वक अवहेलना केली. आपल्या जवळ असलेले सैन्य हे संख्येने अहमदशहाच्या सैन्याच्यापेक्षा अधिक आहे याची पूर्णपणे जाणीव असल्याने त्याने अहमदशहाचा इतक्या सक्तपणे पाठलाग केला की सकाळी ज्या जागेवरून दक्षिणी सैन्याचा तळ हाले तेथे दर दिवशी नंतर तो आपल्या सैन्याचा तळ ठोकीत असे त्याच्या ह्या वर्तनाचा अहमदशहाला संताप आला आणि त्याने आपल्या धर्मपंडितांना असे बजावले की, 'मुसलमानी धर्माच्या तत्त्वांबद्दल माझ्या मनात किती आदर आहे त्याचा पुरावा माझ्या वागणुकीने मी भरपूर दिलेला आहे.' एवढे सांगून त्याने आपले सर्व सामानसुमान सैन्याच्या पुढे रवाना केले. नंतर

त्याने मुक्काम केला, आणि लढाई देण्याच्या हेतूने आपल्या सैन्याच्या उजव्या फळीवर खानजहान याला नेमले, आणि डाव्या फळीवर इस्माईल फतेखान याचा नातू अबदुल्ला खान याची नेमणूक केली. सैन्याच्या मध्यभागी त्याने राजपुत्र अल्लाउद्दीन याला ठेवले. अहमदशहा स्वतः २ हजार निवडक घोडेस्वार आणि १२ युद्धसज्ज हत्ती बरोबर घेऊन शत्रूची वाट बघत दबा धरून बसला.

(१४७) सुलतान होशंग याला अहमदशहाच्या या तयारीची काहीच कल्पना नव्हती. आतापर्यंत अहमदशहाच्या सैन्यापासून त्याला कोणताच विरोध झालेला नव्हता. तेव्हा त्याला असे वाटले की दक्षिणी फौजा अजूनही आपल्यापुढे पळ काढीतच आहेत. तेव्हा त्याने शिस्तीची फारशी कदर न करता आपली आगेकूच चालू ठेवली आणि एकाएकी शत्रूचे सैन्य त्याच्यापुढे उभे ठाकले. आपल्या सैन्याची युद्धासाठी व्यूहरचना करण्यास त्याला फुरसत न मिळाल्यामुळे त्याने आपल्याजवळील १७००० सैनिकांसमवेत अतिशय गोंधळलेल्या परिस्थितीत शत्रूवर हल्ला चढविला. दोन्ही फौजांमध्ये युद्धाला तोंड लागले तेव्हा अहमदशहाने आपण दबा धरून बसलेल्या जागेवरून होशंगशहावर हल्ला चढविला आणि आपल्याजवळील हत्ती आणि २००० स्वार यांच्यासह तो माळव्याच्या फौजेच्या पिछाडीवर तुटून पडला. दोन्ही बाजूंनी [२] (४१०) हल्ला झाल्यामुळे माळव्याचे सैन्य कैचीत सापडले. त्यांच्यामध्ये एकच घबराट उडाली आणि कसलाही विचार न करता त्यांनी सैरावैरा पळण्यास सुरुवात केली. दक्षिणी फौजांनी त्यांचा पाठलाग केला आणि त्यांच्या जवळ जवळ दोन हजार सैनिकांना ठार मारून त्यांचे सर्व सामानसुमान काबीज केले. एकंदर २०० हत्ती आणि सुलतान होशंगच्या जनान्यातील सर्व स्त्रिया अहमदशहाच्या हाती पडल्या. माळव्याच्या सैन्याचा पराभव झाल्याची[८८] बातमी जेव्हा नरसिंगरायाला कळली तेव्हा तोदेखील किल्ल्यातून बाहेर पडला. खेडल्याच्या प्रदेशातून माळव्याचे सैन्य माघार घेत असताना तो त्यांच्यावर तुटून पडला आणि मोठ्या संख्येने त्याने त्यांची कत्तल केली. अहमदशहाला जरी विजय मिळाला तरी मुसलमानांवर हल्ला करणे त्याला जे प्राप्त झाले त्याबद्दल त्याला अतिशय दुःख झाले. परंतु त्याने सुलतान होशंग याचा जनाना आणि मुलेबाळे यांना बहुमोल भेटी नजर देऊन त्यांच्या सुटकेबद्दल खंडणीची मागणी न करता त्यांना माळव्याकडे रवाना केले. त्यांच्याबरोबर जाण्यासाठी त्याने आपल्या दरबारातील काही उच्चपदस्थ मंडळी आणि आपल्या खाजगीतील काही खोजासरा यांची नियुक्ती केली. सुलतानाची भेट घेण्यासाठी आणि त्याचे अभिनंदन करण्यासाठी नरसिंगराय आपल्या मुलांना बरोबर घेऊन दाखल झाला. सुलतानाने खेडल्याला भेट देण्याबद्दल त्याने त्याचे मन वळविले. सुलतानाचे त्याने मोठ्या थाटामाटाने स्वागत केले. त्याने सुलतानाला अतिशय मौल्यवान नजराणा दिला. त्यात अनेक किंमतवान हिरे, माणके आणि मोती वगैरे जिनसा होत्या. सुलतान राजधानीकडे परत निघाला तेव्हा तो त्याच्याबरोबर माहूरपर्यंत दाखल झाला. माहूर येथे सुलतानाने त्याला

मानाचा पोषाख दिल्यावर आणि त्याच्यावर इतर मानसन्मानांची खैरखैरात केल्यावर त्याने सुलतानाची आपल्या राज्याकडे जाण्यासाठी रजा घेतली.

(१४८) माळव्याच्या इतिहासात असे लिहिले आहे की, या दोन्ही सुलतानांत आणखी एकदा लढाई झाली. याला कारण असे घडले की, अहमदशहाने जेव्हा खेडल्याला वेढा दिला तेव्हा नरसिंगरायाने सुलतान होशंग याला आपल्या मदतीसाठी बोलाविले. परंतु दक्षिणेचे इतिहासकार या घटनेची दखल घेत नाहीत. त्यामुळे [ २ ] (४११) सत्य काय ते एक परमेश्वरच जाणे. या मोहिमेवरून परतल्यानंतर अहमदशहा बहमनी हा बिदर येथे येऊन दाखल झाला आणि त्याने शिकारीच्या नादात आपल्याला गुंतवून घेतले. शिकार करत असताना एका सुंदर जागी तो येऊन पोहोचला तेथे मुबलक पाणी होते. या ठिकाणी त्याने अहमदाबाद बिदर नावाचे शहर बसविण्याचे ठरविले. हिंदू इतिहासकारांनी [८९★] प्राचीन काळी ५ हजार वर्षांपूर्वी लिहिल्याप्रमाणे या देशात जे राजे राज्य करीत होते, त्यांची राजधानी असलेल्या बिदर [९० □] शहराच्या जागी त्याने एका अतिशय प्रचंड आणि मजबूत किल्ल्याची बांधणी केली. या इतिहासकारांच्या मते या राजांच्या ताब्यात महाराष्ट्र, कर्नाटक आणि तेलंगण [९१ □] या प्रांतातील सर्व मुलूख होता. या घराण्यातील अतिशय सुप्रसिद्ध राजा म्हणजे राजा भीमसेन हा होय. या राजाची मुलगी आणि माळव्याचा अधिपती राजा नल यांची प्रेमकथा साऱ्या हिंदुस्थानात सुप्रसिद्ध आहे. हिंदी भाषेतील नल आणि दमन ( दमयंती ) यांची कथा अकबर बादशहाच्या हुकूमावरून शेख फैजी याने फारशी काव्यात भाषान्तरित केलेली आहे.

(१४९) या सुमारास अहमदशहाच्या मनात अशी कल्पना आली की हिंदुस्थानातील इतर सुलतानांबरोबर वैचारिक संबंध प्रस्थापित करून आपल्या घराण्याचे आसन मजबूत करावे. या हेतूने त्याने खानदेशचा सुलतान नसीरखान फारूकी याच्या मुलीची आपला मुलगा राजपुत्र अलाउद्दीन याच्याबरोबर विवाह करण्यासाठी मागणी केली. आपण ऊमर फारूक याचे वंशज आहोत याचा नसीरखान याला अतिशय अभिमान होता. नसीरखानाला आपला शेजारी गुजराथेचा सुलतान [ २ ] ( ४१२ ) याच्या वाढत्या सामर्थ्याबद्दल भीती वाटत होती. त्याने अहमदशहाची विनंती मान्य केली आणि आपल्या मुलीला मोठ्या सन्मानाने बरोबर आपले वकील देऊन अहमदाबाद बिदर येथे रवाना केले. तिची शहरामध्ये सन्मानपूर्वक पाठवणी करण्याच्या अगोदर तिच्यासाठी अहमदशहाने एका राजवाड्यात तिची राहण्याची सोय केली. राजपुत्र आणि राजकन्या यांच्या विवाहविधीचे समारंभ मोठ्या थाटामाटाने पार पाडण्यात आले. ह्या समारंभाचा सोहळा जवळजवळ दोन महिनेपर्यन्त चालू होता.

( १५० ) या सुमारास सुलतानाला असे वाटले की, आपण आपल्या राज्याची विभागणी आपल्या मुलांमध्ये करणे सयुक्तिक ठरेल· त्यानुसार त्याने राजपुत्र [९२★]

महमूद खान याच्याकडे रामगीर, माहूर आणि कलम व वऱ्हाडचा काही भाग इतका प्रदेश लावून दिला. राजपुत्र दाऊदखान याला त्याने राजचिन्हे दिली[१३*] आणि अनेक अमीर-उमरावांना बरोबर देऊन त्याला तेलंगणाचा राज्यकारभार करण्यासाठी पाठवून दिले. सर्वांत मोठा राजपुत्र अलाउद्दीन याला त्याने आपला वारस म्हणून जाहीर केले. त्याच्याकडे त्याने राज्याच्या एकंदर कारभारावर देखरेख करण्याची कामगिरी सोपविली. ही कामगिरी पार पाडण्याबाबत अहमदशहाने आपला सर्वांत लहान मुलगा महमूद याला सहभागी केले. याप्रसंगी आपण ही जी व्यवस्था केली आहे तिचे आम्ही पूर्णपणे पालन करू अशा तऱ्हेची शपथ त्याने आपल्या सर्व अधिकाऱ्यांना घ्यावयास लावली. अशा तऱ्हेचे धोरण स्वीकारताना त्याला असे वाटले की, जे प्रत्यक्षात उतरणे अशक्य आहे ते अशा तऱ्हेची शपथ घेतल्याने तरी सुरक्षित राहील. याच प्रसंगी त्याने मलीक उत्‌तुज्जार याची दोन हजारी **मनसबदार** म्हणून बढती केली आणि दौलताबादच्या सुभेदारीवर त्याची नेमणूक केली.

(१५१) हिजरी ८३३ इ. स १४२९ } हिजरी ८३३ या[१४*] वर्षाच्या उत्तरार्धाच्या अखेरीस सुलतानाने कोकणच्या प्रदेशातील बंडखोर आणि शांतता मोडणाऱ्या लोकांचे पारिपत्य करण्यासाठी त्या प्रदेशात चाल करून जाण्याची मलीक उत्‌तुज्जार याला आज्ञा केली. कोकणचा प्रदेश हा हिंदी महासागराच्या किनारपट्टीवर पसरलेला आहे. मलीक उत्‌तुज्जारने अतिशय थोडया कालावधीत सुलतानाने सांगितलेली कामगिरी पार पाडली. कोकणचा प्रांत त्याने बहमनींच्या अमलाखाली आणला आणि आपल्या विजयाची फळे म्हणून सोने आणि चांदी यांनी लादलेले अनेक हत्ती व उंट त्याने दरबाराकडे रवाना [२] (४१३) केले.[१५□] त्याच्या या कामगिरीबद्दल अहमदशहाने त्याला स्वतःच्या वापरातला एक पोषाख, हिरेजडित अशी तलवार आणि इतर वस्तू बक्षिसीदाखल दिल्या. यापूर्वी बहमनी घराण्यातील कोणत्याही सेवकाचा अशा तऱ्हेने सन्मान झालेला नव्हता.

(१५२) आपण सुलतानाची काही तरी विशेष चाकरी करून दाखवावी या आकांक्षेने मलीक उत्‌तुज्जार याने गुजराथेच्या सुलतानाच्या ताब्यातील माहीम बेट आपल्या ताब्यात घेतले.[१६□] अहमदशहा गुजराथी याला जेव्हा हे कळले तेव्हा त्याने आपला मुलगा जफरखान याला माहीम जिंकून घेण्यासाठी सैन्य देऊन रवाना केले. आपल्या ताब्यात नुकत्याच आलेल्या प्रदेशाचे संरक्षण करण्याची आवश्यकता वाटून दक्षिणेच्या सुलतानाने मलीक उत्‌तुज्जार याला कुमक करण्यासाठी म्हणून आपला मुलगा अलाउद्दीन याची रवानगी केली. समुद्रातून आत आलेल्या एका खाडीच्या दोन्ही किनाऱ्यावर काही काळपर्यंत विरोधी बाजूंच्या फौजा छावणी करून राहिल्या. दोन्ही फौजांना परस्परांवर हल्ला करण्याचे धारिष्ट मात्र झाले नाही. काही कालानंतर त्या प्रदेशातील खराब हवा आणि पाणी यांच्या योगाने राजपुत्र अलाउद्दीन याची प्रकृती बिघडली. म्हणून त्याने हवा पालटण्यासाठी छावणीपासून काही दिवस मजलेच्या अंतरावर

असलेल्या ठिकाणाकडे कूच केले. त्याच्या गैरहजेरीत गुजराथचा राजपुत्र जफरखान यान मलीक उत्तुज्जार याच्यावर हल्ला केला. दोन्ही बाजूंत भयंकर रणधुमाळी माजली. लढाईत मलीक उत्तुज्जार याचा भाऊ पकडला गेला, बहमनींचे [२] ( ४१४ ) दोन मोठे अधिकारी ठार मारले गेले आणि त्यांच्या सैन्याचा संपूर्णपणे पराभव झाला. दक्षिणी फौजेचे सर्व तंबू, हत्ती आणि घोडे यांसह छावणीचे सर्व सामान गुजराथी सैन्याच्या हाती पडले. **तवारीख महमूदशाही** या ग्रंथात असे सांगितले आहे की राजपुत्र अलाउद्दीन या लढाईत हजर होता. त्याने आपल्या अंगी वसत असलेल्या शौर्याची चुणूक दाखविली. परंतु लढाईत मिळणारा विजय हा केवळ मानवी प्रयत्नावर अवलंबून नसल्यामुळे राजपुत्र अलाउद्दीन आणि मलीक उत्तुज्जार यांना पराजित होऊन मोठ्या घाईघाईने रणांगणातून पळ काढावा लागला.

( १५३ ) दरम्यान अहमदशहा बहमनीने आपला पराभव झाल्यानंतर काही काळाने पुन्हा एकदा आपल्या सैन्याची जमवाजमव केली आणि गुजराथेच्या दिशेने कूच [९७] केले. बहमनींच्या सैन्याला तोंड देण्यास अहमदशहा गुजराथी चुकला नाही. दक्षिणी फौजांनी पहिल्या प्रथम बागलाणातील तुंबोला नावाच्या किल्ल्याला वेढा दिला. परंतु सुलतानाने जेव्हा शत्रूचे सैन्य चाल करून येत असल्याची बातमी ऐकली तेव्हा त्याने वेढा उठविला आणि गुजराथेच्या फौजेला प्रतिकार करण्यासाठी कूच केले. काही काळपर्यंत दोन्ही फौजा कोणतीही हालचाल न करता परस्परांच्या नजीक तळ देऊन राहिल्या. अखेर दोन्ही फौजांतील शहाण्या माणसांनी गुजराथ आणि बहमनी सुलतानांमध्ये सलोखा घडवून आणला. परस्परांमध्ये असे ठरले की, एकमेकांनी आपापल्या ताब्यातील जिल्हे आणि किल्लेकोट यावर समाधान मानावे आणि भविष्यकाळात एकमेकांच्या मुलखावर आक्रमण करू नये. [९८★]

( १५४ ) हिजरी ८३५ इ. स. १४३१ } **तवारीख अल्फी** या ग्रंथाचा कर्ता असे सांगतो की, हिजरी ८३५ या वर्षी अहमदशहा बहमनीच्या कानावर असे आले की गुजराथच्या सुलतानाचा मुलगा राजपुत्र महमदखान हा लांबच्या मोहिमेच्या निमित्ताने नंदुरबारच्या दिशेने गेला आहे. त्याच्या विरुद्ध अहमदशहा बहमनीने चाल केली. हे कळताच गुजराथेच्या सुलतानाने [ २ ] ( ४१५ ) आपल्या मुलाच्या मदतीसाठी कूच केले. परंतु ही बातमी कळताच दक्षिणी फौजांनी ४ मजला एवढ्या अंतरापर्यंत माघार घेतली. तेव्हा गुजराथेच्या सुलतानाने आपल्या राजधानीच्या दिशेने कूच केले आणि तापी नदीच्या तीरावर मुक्काम केला. या ठिकाणी त्याला दक्षिणी फौजांनी तुंबोलाच्या किल्ल्याला वेढा दिल्याचे कळले. तेव्हा त्याने त्यांच्याविरुद्ध कूच केले. दोन्ही फौजांत लढाई झाली. सकाळपासून सूर्योदयापर्यंत लढाई चालली होती. कोणत्याच पक्षाला निर्णायक विजय मिळाला नाही. रात्रीच्या वेळी दोघेही सुलतान परस्परांमध्ये कोणताच सलोखा घडवून न आणता आपापल्या देशांकडे निघून गेले. इतर इतिहासकारांनीही तुंबोला किल्ल्याच्या वेढ्याच्या हकिकती दिलेल्या

आहेत. परंतु त्याच हकिकती परत सांगणे म्हणजे निरर्थक ग्रंथविस्तार होईल म्हणून त्या मी ( फरिश्ता ) सांगत नाही. [९९★]

( ६५५ ) हिजरी ८३६ ) हिजरी ८३६ यावर्षी अहमदाबाद बिदर या किल्ल्याचे
इ स. १४३२ ) बांधकाम पुरे करण्यात आले. हा किल्ला पूर्णपणे दगडाचा बांधण्यात आलेला होता. याप्रसंगी बादशहाने लोकांनी उत्सव करावेत अशी आज्ञा दिली. त्याचवर्षी त्याने आपल्या बहिणीचा मुलगा शेरखान याला ठार मारले. [१००□] आपल्या मुलांच्या हितसंबंधाला त्याच्यापासून धोका आहे अशी सुलतानाची समजूत
हिजरी ८३७ ) झालेली होती. गुजराथेचा सुलतान आणि दक्षिणेचा सुलतान
इ. स. १४३३ ) यांच्यामध्ये युद्ध चालू असल्याचा फायदा घेऊन माळव्याचा होशंगशहा याने खेडल्याच्या नरसिंगरायाच्या प्रदेशावर आक्रमण केले आणि युद्धात त्याला ठार मारले. त्याने खेडल्याचा किल्ला आणि आजूबाजूचा मुलूख जिंकून घेतला. या घटनांची बातमी लागताच अहमदशहा बहमनीने माळव्याच्या [ २ ] ( ४१६ ) सैन्याच्या रोखाने कूच केले. परंतु खानदेशचा सुलतान नसीरखान फारुकी याने मध्यस्थी करून दोन्ही सुलतानांमधील शत्रुत्वाची भावना नाहीशी केली. थोड्या वाटाघाटीनंतर असे ठरले की माळव्याचा सुलतान होशंग याने खेडल्याच्या किल्ल्याचा ताबा घ्यावा आणि वऱ्हाड अहमदशहा बहमनीकडे जावा. ही कलमे असलेला तह दोन्ही राज्यांत झाला. त्याबाबत दोन्ही सुलतानांनी आणाभाका घेतल्या. त्यानंतर दोघेही सुलतान आपआपल्या राजधान्यांकडे परतले. या घटनेला काही काळ लोटल्या-नंतर तेलंगणातील प्रबळ अशा हिन्दू रायांचे बंड मोडण्यासाठी सुलतानाने त्या प्रान्तावर चाल केली. थोड्या काळातच त्याने बंडखोरांना वठणीवर आणले.

(६५६) तेलंगणातून राजधानीकडे परतताना सुलतान अहमदाबाद बिदरपासून एक मजलेच्या अंतरावर होता. तेथे सुलतानाने सय्यद नसिरउद्दीन करबाली [१०१□] याला चांदीच्या पाच हजार टंका त्याच्या स्वतःसाठी आणि तीस हजार टंका करबाला येथील साधुपुरुषांमध्ये वाटण्यासाठी अर्पण केल्या. यापूर्वी थोडाकाळ अगोदर अहमदशहाच्या स्वप्नामध्ये महमद पैगंबराचे रूप घेऊन त्याला दर्शन देणारा तो हाच सय्यद नसिरउद्दीन. त्याच्या संबंधी शेख अजूरी याने अतिशय चांगले उद्गार काढले आहेत. या सुमारास सुलतानाने नसिरउद्दीन याला भेटीसाठी बोलाविणे पाठविले आणि करबाला येथे जाण्यासाठी त्याला रजा दिली. या समारंभानंतर नसिरउद्दीन हा घोड्यावर बसून आपल्या घराकडे चालला असताना, शेर मलीक नावाचा अधिकारी इतर काही अधिकाऱ्यांसमवेत तो असलेल्या ठिकाणापाशी आला. त्यांच्याकडे दुर्लक्ष केल्यासारखे दाखवून सय्यद नरसिउद्दीन हा घोड्यावरून खाली उतरला नाही. याचा अपमान [ २ ] ( ४१७ ) वाटून शेर मलीक याने त्याला घोड्यावरून खाली खेचण्याची आपल्या नोकरांना आज्ञा दिली. [१०२□] याचा अपमान वाटून सय्यद नसिरउद्दीन हा ताबडतोब

सुलतानाकडे गेला, आणि त्याने शेर मलीकविरुद्ध तक्रार केली. सुलतानाने त्याचे तात्पुरते समाधान करून त्याला सांगितले की, योग्य प्रसंगी परमेश्वर आणि पैगंबर हे त्याच्या अपमानाचा सूड घेतील. यानंतर काही काळाने सुलतान अहमदाबाद बिदर येथे परतला. याप्रसंगी लष्करी अधिकाऱ्यांना आपापल्या घरी जाण्याच्या अगोदर आणि सैन्याची त्या त्या प्रांतामध्ये पाठवणी करण्याच्या अगोदर मानाचे पोषाख देण्याची प्रथा होती. हा समारंभ चालू असताना सुलतानाची नजर शेर मलीकवर पडली आणि त्या क्षणीच त्याला शेर मलीक याने सय्यद नसिरउद्दीन याचा जो अपमान केला होता त्याची आठवण झाली. सुलतानाने ताबडतोब आपल्या कसाब नावाच्या हत्तीला आणण्याची आज्ञा दिली. नंतर त्याने शेर मलीकला त्याच्या नसिर उद्दीन बरोबरील वागण्याची आठवण दिली. शेर मलीक याला हत्तीच्या पायाखाली टाकण्यात यावे असा हुकूम दिला. एका क्षणात हत्तीने त्याला चिरडून ठार मारले. शेर मलीकचा चेतना विरहित देह जणू काही शेकडो वर्षे मृत असल्याप्रमाणे त्या ठिकाणी पडून होता.

रज्जब २८ हिजरी ८३८ फेब्रुवारी १९ इ. स. १४३५

अहमदशहावली बहमनी याने १२ वर्षे आणि दोन महिने राज्य केले, आणि तो रज्जब महिन्याच्या २८ तारखेला हिजरी ८३८ या वर्षी मरण पावला. [१०३□]

(१५७) साधुपुरुष[१०४*] आणि [१०५□] विद्वान मंडळी यांना [२] (४१८) अहमदशहा अतिशय मान देत असे असे सांगतात. याचे एक उदाहरण म्हणजे त्याने आपल्या दरबारातील दोन धर्मवेत्त्यांना इराणमधील किरमान येथे पाठविले, आणि बरोबर येताना शहा निमतुल्ला याला हिन्दुस्थानात आपल्याबरोबर आणण्याची त्यांना आज्ञा केली.[१०६*] या दोन व्यक्ती म्हणजे शेख हबीद उल्ला जुनैदी आणि कुमचा मिर शमसुद्दीन. शहा निमतुल्ला याने अहमदशहाकडून आलेल्या प्रतिनिधींचे मोठ्या थाटाने स्वागत केले. त्याने स्वतः हिन्दुस्थानात येण्याचे नाकारले. परंतु आपला एक पट्टशिष्य किरमानचा मुल्ला कुतुबुद्दीन याला वरील प्रतिनिधींबरोबर जाण्याचा आदेश दिला. त्याने कुतुबुद्दीनजवळ एक पेटी दिली. या पेटीमध्ये त्याने अहमदशहाकरिता १२ कोन असलेला हिरवा मुकुट पाठविला. हे प्रतिनिधिमंडळ जेव्हा परत आले तेव्हा त्याला भेटण्यासाठी सुलतान स्वतः सामोरा गेला. मुल्ला कुतुबुद्दीन याला पाहिल्यावर सुलतान उद्गारला की, "मी सिंहासनावर आरूढ होण्याचे अगोदर ज्याला मी स्वप्नात पाहिले आणि ज्याने मला १२ कोन असलेला हिरवा मुकुट दिला तोच मला दिसलेला हा अवलीया पाहा. त्याने आणलेल्या पेटीत जर का मी स्वप्नात पाहिलेला हिरवा मुकुट असला तर खरोखरच माझे स्वप्न अतिशय आश्चर्यकारकरीतीने फलद्रूप होईल." यानन्तर तो अवलीया सुलतानासमोर आला आणि त्याने तो मुकुट सुलतानाला नजर केला. यावर अहमदशहा आश्चर्याने थक्क होऊन गेला. सुलतानाचे आश्चर्य बघून त्या

पूज्य मुल्लाने सुलतानाला सांगितले, " हे राजा, याबद्दल तुला आश्चर्य वाटण्याचे अगर संभ्रमित होण्याचे काहीही कारण नाही. आता जो मुकुट मी तुला नजर करीत आहे तो आणि तू स्वप्नात पाहिलेला हे दोन्हीही सारखे आहेत. त्याचप्रमाणे तुझ्यासमोर जी व्यक्ती मुकुट घेऊन आली ती व्यक्ती म्हणजे खरोखरीच मी होतो " [१०७८] शहा निमतुल्ला याने सुलतानाला जे पत्र लिहिले त्यात त्याने सुलतानाचा उल्लेख शहा-बुद्दीन अहमदशहा वली असा केला होता. त्यामुळे सुलतान अतिशय [ २ ] ( ४१९ ) खुष होऊन गेला आणि त्यानंतर सही करताना वरील पदव्यांचा उपयोग करण्यास त्याने सुरुवात केली. मुल्ला कुतुबुद्दीन याच्या भेटीची परतफेड म्हणून सुलतानाने पुन्हा एकदा ख्वाजा शम्सुद्दीन समनानी आणि सैफ उल्ला अहसनाबादी ह्या दोघांची किरमान येथे जाण्याकरिता रवानगी केली आणि शहा निमतुल्ला याने आपल्या एका मुलाला बहमनींच्या दरबारात पाठविण्यासाठी त्याचे मन वळविण्याचा त्याना आदेश दिला. शहा निमतुल्ला याला शहा खलीलउल्ला नावाचा एकच मुलगा होता. तेव्हा त्याने आपला नातू मिर-नूर-उल्ला याला दक्षिणेत जाण्याची परवानगी दिली.

( १५८ ) मिर नूर-उल्ला हा चौलच्या बंदरात येऊन पोहोचला. त्याला आणण्यासाठी सुलतानाने आपली स्वतःची पालखी पाठविली. राजधानीपर्यंत त्याला सोबत म्हणून मिर अबुल कासीम जुरजानी आणि सय्यद महमद सद्र या दोघांची रवानगी केली. मिर नुर-उल्ला हा राजधानीच्या जवळ येऊन पोहोचल्यानंतर अहमदशहा हा आपल्या मुलांना बरोबर घेऊन त्याला सामोरा गेला. भेटीच्या जागी त्याने एक मशीद बांधली आणि तेथे एका खेड्याची स्थापना करून त्याला निमताबाद हे नाव दिले. यानंतर काही काळाने त्याने शहा निमतउल्ला याच्या नातवाला धार्मिक लोकांचा प्रमुख–मलिक उल मुशायिक हा किताब दिला. त्याचप्रमाणे सुलतानाने आपल्या दरबारातील सर्व अमीर उमरावांच्यापेक्षा अग्रहक्काचे स्थान नुरुल्ला याला दिले. यातून त्याने सय्यद महमद गेसू दराज याच्या वंशजांनाही वगळले नाही. कालांतराने सुलतानाने आपल्या मुलीचा विवाह नुरुल्ला याजबरोबर लावून दिला.

( १५९ ) हिजरी ८३४ इ. स. १४३१ } या वर्षी शहा निमतउल्ला मरण पावला तेव्हा त्याचा मुलगा शहा खलील उल्ला आपल्या कुटुंबियासमवेत हिंदुस्थानात आला. त्याचा दुसरा [ २ ] ( ४२० ) मुलगा म्हणजे मिर नुरुल्ला याचा भाऊ शहा मुहिब उल्ला हा दक्षिणेत अतिशय नावाजलेला लष्करी अधिकारी म्हणून मोठ्या दर्जाप्रत जाऊन पोहोचला. त्याच्या सेवाचाकरीबद्दल बक्षीस म्हणून त्याच्या उदरनिर्वाहाच्या खर्चासाठी सुलतानाने त्याला बीडचा जिल्हा दिला. एवढेच नव्हे तर आपली नात म्हणजे राजपुत्र अल्लाउद्दीन याची मुलगी त्याला विवाहादाखल अर्पण केली. त्या काळापासून या सुप्रसिद्ध पवित्र घराण्यातील व्यक्तींच्याकडे बीड जिल्ह्याची जहागिरी चालत आलेली आहे. बीड

शहराच्या बाहेर जे कबरस्तान बांधण्यात आले आणि जे अजून उभे आहे त्याचा उद्देश ह्या पूजनीय अवलियांचे त्या ठिकाणी दफन व्हावे हाच होता.

(१६०) आपल्या अंगातील असामान्य लष्करी हिकमतीच्या जोरावर शहा मुहिब उल्ला याला गाजी म्हणजे पावन योद्धा असा किताब [१०८*] मिळाला.

## अल्लाउद्दीन शहा बहमनी दुसरा [१०९*] [२](४२१)

(१६१) आपल्या वडिलांनी प्रगट केलेल्या इच्छेप्रमाणे अल्लाउद्दीन शहा हा अहमदाबाद बिदर येथे सिंहासनावर बसला. त्याने आपला भाऊ महमदखान याची उपेक्षा केली नाही, तर त्याने त्याच्या उपयोगासाठी त्याला हत्ती–घोडे बहाल केले, आणि त्याच्या नावे जहागिरी तोडून दिली. दरबारातील पहिल्या दर्जाचा एक अधिकारी दिलावरखान याला त्याने आपला मुख्य वजीर नेमले, आणि त्याला **वकील उस्सलतनत्** हा किताब दिला. त्याचप्रमाणे ख्वाजा जहान अस्राबादी याची [२](४२२) त्याने मंत्र्याच्या जागेवर नेमणूक केली. राज्याचा एक जुना सेवक इमाद उलमुल्क घोरी हा होता. बहमनी घराण्याची त्याने बऱ्याच काळपर्यंत मोठी चाकरी केल्यानंतर तो निवृत्त झाला होता. सुलतानाने **अमीर उल्उमरा** या अधिकारपदाचा त्याने स्वीकार करावा याकरिता म्हणून त्याचे मन वळविले. त्यानंतर त्याने इमाद उल्मुल्क याची त्याचे भाऊ महमदखान आणि ख्वाजा जहान यांजबरोबर अतिशय बलाढ्य सैन्य देऊन विजयनगरच्या काफरांविरुद्ध रवानगी केली. विजयनगरच्या राजाने ५ वर्षे खंडणी देण्याची टाळाटाळ केली होती आणि आता त्याने बाकी देण्यास सपशेल नकार दिला होता. वरील सैन्याने विजयनगरच्या प्रदेशाची खूप धुळधाण उडविली, आणि त्यांचा प्रदेश भयंकर रीतीने लुटून उद्ध्वस्त केला. विजयनगरच्या राजाने अखेर २० हत्ती, बरीच मोठी रकम आणि गायन आणि नर्तन यांमध्ये प्रवीण असलेल्या २०० स्त्रिया सुलतानासाठी जेव्हा बहाल केल्या आणि शिवाय राजपुत्र महमदखान याच्यासाठी अनेक मौल्यवान नजराणे जेव्हा त्याने पाठविले, तेव्हाच त्याची तहाची विनंती अल्लाउद्दीन शहा बहमनीने मान्य केली.

(१६२) अल्लाउद्दीन शहा बहमनीचे सैन्य यानंतर मुद्गल येथे परतले. तेथे आल्यावर सैन्यातील काही नाराज झालेल्या अधिकाऱ्यांनी राजपुत्र महमदखान याच्यापाशी असे निवेदन केले की ज्याअर्थी तुम्हाला तुमच्या बापाने आपल्या हयातीतच राज्याचा भागीदार केले आहे त्याअर्थी पुढीलपैकी एक गोष्ट होणे क्रमप्राप्त आहे. ती म्हणजे एक तर अल्लाउद्दीन शहाने तुम्हाला सिंहासनावर आपल्याबरोबर आसन देऊन राज्याचा कारभार दोघांनी मिळून चालविण्यास संमती दिली पाहिजे अथवा दुसरे म्हणजे त्याने राज्यातील मुलखाची दोघामध्ये विभागणी केली पाहिजे. परंतु या दोन्ही गोष्टींपैकी कोणतीच करण्याकडे सुलतानाच्या मनाचा कल दिसून येत नाही. तेव्हा आमचा तुम्हाला असा सल्ला आहे की राज्याच्या अर्ध्या भागाचा ताबा जबर-

दस्तीने मिळवून घेण्याचा अधिकार तुम्हाला प्राप्त झाला आहे. महमदखानाला वरील अधिकाऱ्यांनी प्रकट केलेले आपले मत पटले आणि त्याने त्याप्रमाणे करण्यास मान्यता दिली. त्याने ख्वाजा जहान आणि त्याचप्रमाणे इमाद उल्मुल्क घोरी या दोघांची मने आपल्या बेताला त्यांनी पाठिंबा द्यावा यासाठी वळविण्याचा प्रयत्न केला. या दोघा अधिकाऱ्यांनी मात्र धिक्कारपूर्वक महमदखानाच्या योजनेत सामील होण्यास साफ-साफ नकार दिला आणि त्याला अखेर असे सांगितले की तुझे हे कृत्य म्हणजे बापाविरुद्ध उघड उघड बंडखोरी केल्याच्या सदरात मोडण्याजोगे आहे. यावर [२] (४२३) राजपुत्राने त्या दोघांचाही खून करविला. यानंतर त्याने विजयनगरच्या राजाकडून मदतीदाखल बरेच मोठे सैन्य मिळविले आणि मुद्गल आणि रायचूर व त्याचप्रमाणे सोलापूर, विजापूर आणि नळदुर्ग ही शहरे जबरदस्तीने हिसकावून घेतली.

(१६३) या घटनेतील इतर कोणत्याही गोष्टीपेक्षा अल्लाउद्दीन शहाला इमाद उल्मुल्क घोरी याच्या मृत्यूमुळे अतिशय दुःख झाले. त्याने असे उद्गार काढले की घोरीने राज्यासाठी अतिशय अद्वितीय अशा कामगिऱ्या बजाविल्या होत्या. माझे त्याच्यावर पितृवत् प्रेम होते. माझी अशी खात्री आहे की अशा थोर आणि नामवंत माणसाचा खून केल्याने खुनी लोकांचा जर काही फायदा होईल अशी समजूत असेल तर ती चुकीची आहे. सुलतानाने यानंतर ताबडतोब आपल्या फौजेची जमवाजमव करण्यासंबंधी योग्य उपाययोजना करण्याबद्दल हुकूम दिले आणि सैन्याला शस्त्र सज्ज करण्यासाठी लागेल तेवढा पैसा खर्च करण्याची त्याने आज्ञा दिली. यानंतर सुलतानाने बंडखोरांबरोबर सामना देण्यासाठी म्हणून राजधानीमधून कूच केले. थोड्याच कालावधीत दोन्ही भावांमध्ये भयानक युद्धाचा उद्भव झाला. विजयश्रीने अल्लाउद्दीन शहाला माळ घातली. ज्या अधिकाऱ्यांनी महमदखानाला बंडाची चिथावणी दिली होती त्या सर्वांना कैद करण्यात आले. राजपुत्र महमदखान हा आश्रयासाठी थोड्याशा सेवकगणांबरोबर जवळच्याच डोंगराळ आणि जंगली भागात पळून गेला. दरम्यान सुलतान अहमदाबाद बिदर शहराकडे परतला. वरील घटनेमध्ये भाग घेणाऱ्या अनेक दोषी अधिकाऱ्यांचे गुन्हे त्याने माफ केले आणि त्यांची त्याने कैदेतून सुटका केली. तुझे अपराध मी क्षमा करीन असे अभिवचन त्याने महमदखानाला दिले आणि त्याच्या सुरक्षिततेची हमीही त्याने त्याला दिली. सुलतानाने एवढे कळवून त्याला स्वाधीन होण्याबद्दल निरोप पाठविला. यावर महमदखान हा सुलतानाकडे आला. त्याचे सुलतानाने अतिशय प्रेमाने स्वागत केले. यानंतर थोडा काळ लोटला न लोटला तोच तेलंगणाचा सुभेदार आणि सुलतानाचा भाऊ राजपुत्र दाऊद हा मरण पावला. त्याच्या मृत्यूमुळे रिकामा झालेला रायचूरचा किल्ला आणि त्या प्रदेशाचा वसूल एवढी महमदखानाने सुलतानापासून आपल्यासाठी मिळविली. या ठिकाणी राजपुत्र महमदखान पूर्ण मालकीने आणि अनिर्बंधपणे त्याला दिलेल्या जहागिरीचा [२] (४२४)

उपभोग घेत अनेक वर्षेपर्यंत राहिला. हा काळ त्याने अनेक प्रकारच्या मौजमजेत आणि चैनीत घालविला.

(१६४)१ मोहरम हिजरी ८४० जुलै १५ इ. स. १४३६ — हिजरी ८४० या वर्षाच्या पहिल्या दिवशी अल्लाउद्दीन शहाने दिलावरखानाला मानाचा पोषाख अर्पण केला. त्याने त्याच्या हाताखाली मोठी फौज देऊन कोकण नावाने ओळखल्या जाणाऱ्या समुद्र किनाऱ्याच्या बाजूला असलेला प्रदेश जिंकून घेण्याची कामगिरी त्याच्यावर सोपविली. या प्रदेशात अतिशय कणखर असलेल्या जातीच्या लोकांची वस्ती होती. त्याने रायरी आणि सोनखेड येथील राजांचा पराभव करून त्यांना शरण येणे भाग पाडले. त्यांनी नियमितपणे खंडणी देण्याचे कबूल केले. दिलावरखानाने सोनखेडच्या राजाच्या सुंदर मुलीला सुलतानासाठी हस्तगत केली. तिला बरोबर घेऊन तो राजधानीला परतला. परत येताना त्याने आपल्याबरोबर काही वर्षांची बाकी राहिलेली खंडणीही आणली होती. दिलावरखानाने बजावलेल्या चाकरीबद्दल पहिल्या प्रथम सुलतान अतिशय खूष झाला. सोनखेडच्या राजाच्या मुलीच्या सौंदर्याने तर त्याला अतिशय मोह घातला. सौंदर्य, स्वभावचातुर्य आणि गायनविद्येचे ज्ञान या गोष्टीत तिची बरोबरी करणारी दुसरी स्त्री सापडली असती किंवा नाही याबद्दल शंकाच आहे. सुलतानाने तिला परिचेहरा हा किताब दिला. त्या दोघांचे प्रेम इतके पराकोटीला गेले की लोकांत त्याबद्दल कुजबूज सुरू झाली. सरतेशेवटी सुलतानाला कळून आले की कोकणच्या राजाकडून दिलावरखानाने लाच घेतली आहे आणि किल्ले जिंकून घेण्याच्या कामामध्ये त्याने आपल्या प्रयत्नांची पराकाष्ठा केलेले नाही. तेव्हा दिलावरखानाबरोबरची त्याची वागणूक बदलून तिला तेढे स्वरूप आले. यावर आपणहून दिलावरखानाने आपल्या अधिकाराची वस्त्रे खाली ठेवली आणि अशा तऱ्हेच्या वर्तनाने आपल्यावर ओढवणाऱ्या संकटातून स्वतःची सुटका करून घेतली. या महत्त्वाच्या अधिकाराच्या जागी सुलतानाने दस्तुर उल्मुल्क या खोजाची नेमणूक केली. परंतु त्याच्या अत्यंत उद्धट वागणुकीचा राजधानीतील सर्व तऱ्हेच्या लोकांना लवकरच उबग आला. याबद्दल सुलतानाकडे दररोज तक्रारी नेण्यात येत. परंतु त्यांचा सुलतानाच्या मनावर यत्किंचितही परिणाम झाला नाही. ह्या तक्रारी दस्तुर उलमुल्क ह्याच्याबद्दल लोकांना जी असूया वाटते त्यामधून[२](४२५) आणि राजधानीमध्ये जे अनेक पक्ष होते त्यांच्यामधील भांडणामधून निर्माण झाल्या आहेत, याबद्दल अल्लाउद्दीन शहाची खात्री झाली. याचा परिणाम म्हणून दिवसेंदिवस त्याची दस्तुर उल्मुल्क यांजवरील मर्जी वाढतच गेली. अखेर एकदा असे झाले की सुलतानाचा मुलगा हुमायून याने एक अर्ज आणला होता; त्या अर्जाला दस्तुर उल्मुल्क याने मान्यता द्यावी अशी हुमायूनने इच्छा प्रकट केली. यावर त्याने उत्तर दिले की, " या अर्जाकडे ताबडतोब मला लक्ष देता येणार नाही. परंतु एक-दोन दिवसात तो अर्ज मी विचारात घेईन. " ही दोन-तीन दिवसांची मुदत संपल्यावर राजपुत्राने त्याला

निरोप पाठविला की " माझ्या कामाचा अजून निकाल लागला नसून ते अजून अपुरे आहे. माझी अशी इच्छा आहे की तुम्ही यत्किंचितही वेळ न लावता तें काम पुरे करावे. " यावर दस्तुर उल्मुल्क याने उत्तर पाठविले की, " ही बाब तुमच्या अधिकाराच्या कक्षेत येत नाही आणि म्हणून त्या बाबतीत हस्तक्षेप करणे तुम्हाला शोभत नाही. "

( १६५ ) राजपुत्र हा स्वभावतःच अतिशय तापट होता. दस्तुर उल्मुल्क याने केलेल्या अपमानामुळे तो भयंकर क्रोधाविष्ट झाला. त्याने आपल्या एका चाकराला बोलाविले आणि दस्तुर उल्मुल्क याचा खून करण्याची त्याला आज्ञा दिली. इतकेच नव्हे तर त्यामुळे जे काही वाईट परिणाम होतील त्यापासूनही संरक्षण करण्याचे वचन त्याने त्याला दिले. ज्या सैनिकाला राजपुत्राने बोलाविले होते त्याचे दस्तुर उल्मुल्क याच्या हातून थोडेफार नुकसान झालेले होते. त्याने ही कामगिरी पत्करली. वर ठरल्याप्रमाणे त्याच दिवशी दस्तुर उल्मुल्क हा दरबारातून परत येत असताना वरील शिपाई जणू काही आपण त्याच्यापुढे अर्ज दाखल करण्यासाठी जात आहोत अशा मिषाने पुढे झाला. समोर गेल्यावर त्याने एकाएकी आपल्या कमरपट्ट्यातून खंजीर बाहेर काढला, आणि त्याच्या हृदयात खोलवर खुपसला. दस्तुर उल्मुल्क-वरील हल्ल्यासाठी राजपुत्राच्या रक्षकांनी आपली तयारी ठेवलेलीच होती. त्यांनी खुनी माणसाला पळून जाण्यासाठी फावावे अशा तयारीचा पवित्रा घेतला. याचा परिणाम असा झाला की त्यांच्यामध्ये आणि दस्तुर उल्मुल्क याच्या अनुचरांमध्ये हाणामारी झाली. ह्या गडबडीचा आवाज सुलतानाच्या दिवाणखान्यापर्यंत पोहोचला. ही गडबड कशाची आहे याची चौकशी करण्यासाठीच आपण जणू काही [ २ ]( ४२६ ) जात आहोत या मिषाने राजपुत्र हुमायून राजवाड्याबाहेर पडला. तेथून परतल्यानंतर त्याने सुलतानाला खबर दिली की अनेक वर्षे चाकरी झालेल्या आणि सुलतानाच्या मर्जीला पात्र झालेल्या एका शिपायाला दस्तुर उल्मुल्क याने अतिशय तिरस्करणीय रितीने वागणूक दिली. इतकेच नव्हे तर आता त्याने त्या शिपायाला शिवीगाळी करून त्याचा अपमान केला. त्या शिपायाने दस्तुर उल्मुल्क याला भोसकले आहे. सैनिकांनी त्या शिपायाला पकडले आहे आणि त्याच्याबाबत काय करावयाचे यासंबंधी आज्ञेची वाट ते पाहात आहेत. अल्लाउद्दीनशहाने आपल्या सर्व राजवटीत कोणालाही मृत्यूची शिक्षा ठोठावली नाही. अशी शिक्षा ठोठावण्याच्या तो विरुद्ध असल्याने आणि राजपुत्राच्या एकंदर वर्तनावरून खरी गोष्ट काय झाली असावी याबाबत त्याला संशय आल्याने त्याने खुनी माणसाला फक्त कैद करून ठेवावे अशी आज्ञा दिली. दस्तुर उलमुल्क याचा मृत्यू झाल्यामुळे रिकाम्या झालेल्या जागी फिरोजशहाच्या काळातील एक विद्वान मियामन उल्ला दक्नी याची त्याने नेमणूक केली.

( १६६ ) हिजरी ८४१ या वर्षी सुलतानाची बेगम मालिका जहान ( खानदेशचा

हिजरी ८४१ ) सुलतान नसीरखान याची मुलगी ) हिला परिचेहरावरील सुलतानाच्या इ. स. १४३७ ) मर्जीमुळे मत्सर उत्पन्न झाला. सुलतानाची तिच्याबरोबर जी थंड वागणूक होती त्याचाही तिला अपमान वाटला आणि तिने आपल्या बापाकडे त्या संबंधात तक्रारवजा पत्रे लिहिली. या सबबीवर नसीरखानाने अल्लाउद्दीनशहाबरोबर युद्ध करण्याचे ठरविले. त्याला या कामी गुजरातच्या अहमदशहाच्या पाठिंबा मिळाला. युद्धाची सुरुवात वऱ्हाड जिंकून घेऊन करण्याचे नसीरखानाने ठरविले. या बेतानुसार त्याने वऱ्हाड प्रांताच्या अधिकाऱ्यांबरोबर खाजगीरीत्या बोलणी सुरू केली आणि तुम्ही मला येऊन मिळत असाल तर तुम्हाला मोठी बक्षिसी मी देईन अशी लालूच त्याने त्यांना दाखविली. त्याने दाखविलेल्या आमिषांना इतके यश आले की वऱ्हाडमधल्या दक्षिणी अधिकाऱ्यांनी एकमुखाने त्याला जाऊन मिळण्याचा निश्चय केला. त्यांनी असा विचार केला की नसीरखान हा त्या थोर उमरच्या वंशातला आहे. त्याच्या शत्रूंविरुद्ध लढताना रणांगणात जर आपल्याला मरण आले तर आपल्याला हुतात्म्यांचे मरण येईल. याप्रमाणे नसीरखान आपल्या सर्व सैन्याला बरोबर घेऊन वऱ्हाडमध्ये [ २ ] ( ४२७ ) घुसला. गोंडवनाच्या राजानेही त्याच्या मदतीसाठी म्हणून मोठे सैन्य रवाना केले. वऱ्हाडच्या विश्वासघातकी अधिकाऱ्यांनी त्यांचा सुभेदार खानजहान याला पकडण्याचा प्रयत्न केला. खानजहान हा बहमनी घराण्याशी अतिशय एकनिष्ठ होता आणि वऱ्हाडवर आक्रमण करणाऱ्या शत्रूला जाऊन मिळण्याइतकी त्याची निष्ठा कमकुवत नव्हती. त्याला वरील अधिकाऱ्यांच्या बेताची खबर मिळाली. तो लगोलग नरनाळ्याच्या किल्ल्याकडे पळाला आणि त्या किल्ल्यात त्याने आपल्याला कोंडून घेतले. तेथून त्याने निर्माण झालेल्या एकंदर परिस्थितीची हकीकत दरबाराकडे लिहून कळविली. दरम्यान वरील विश्वासघातकी अधिकारी नसीरखानाला येऊन मिळाले. त्यांनी नसीरखानाच्या नावे तो वऱ्हाडचा सुलतान आहे असे जाहीर करून खुत्ब्याचे वाचन केले एवढेच नव्हे तर नरनाळ्याला वेढा देण्यासाठी ते त्याच्याबरोबर कूच करून देखील गेले.

( १६७ ) अल्लाउद्दीन शहाला या घडामोडींची बातमी कळल्यावर त्याने आपले वजीर आणि लष्करी प्रमुख यांची सभा, त्यावेळी निर्माण झालेल्या बिकट परिस्थितीवर कोणती उपाययोजना करावी याचा विचारविनिमय करण्यासाठी बोलाविली. या सभेने अशी शिफारस केली की सुलतानाने खुद्द स्वतः शत्रूविरुद्ध चाल करून जावे कारण गुजरात आणि माळवा या देशांचे सुलतान आणि त्याचप्रमाणे गोंडवनाचे राजे हे नसीरखानाला मदत करण्यासाठी तयारी करून राहिले होते. परंतु सुलतानाला आपल्या अधिकाऱ्यांच्या एकनिष्ठेविषयी संशय निर्माण झाल्यामुळे त्याने दौलताबादचा त्यावेळी असलेला सुभेदार मलिक उत्तुज्जार याची ही मोहीम पार पाडण्याच्या कामगिरीवर नेमणूक केली.

( १६८ ) मलिक उत्तुज्जार याने या कामगिरीचा स्वीकार केला. त्यावेळी त्याने असे उद्गार काढले की सेवकांना आज्ञेचे पालन करण्याखेरीज दुसरा उपायच नसतो.

इतकेच काय तर धन्याने हुकूम दिल्यास आपल्या प्राणावर पाणी सोडणे हे देखील त्यांचे कर्तव्यच ठरते. तो असेही म्हणाला की माहीम येथे आम्हाला जो लांछनास्पद पराजय स्वीकारावा लागला त्याचे एकमेव कारण म्हणजे दक्षिणी आणि हबशी अधिकाऱ्यांनी माझ्याबाबत मनात ठेवलेली शत्रुत्वाची भावना हेच होय. कारण ११०□ [२] (४२८) एक परदेशी माणूस आपल्या हिमतीवर प्रसिद्धी मिळवीत आहे ही गोष्ट त्यांना बघविली नाही. एवढे बोलून त्याने सुलतानापाशी अशी नम्र विनंती केली की याप्रसंगी आपण मला आपले खाजगीतले रक्षकदल आणि दक्षिणी आणि हबशी शिपाई वगळून सर्व परदेशी सैनिक ही कामगिरी पार पाडण्यासाठी द्या. मला असा विश्वास वाटतो की परमेश्वराच्या आशीर्वादाने आणि आपल्या कृपाप्रसादाच्या जोरावर वऱ्हाडमधील कामगिरी यशस्वीरित्या पार पाडणे मला शक्य होईल. या विनंतीला अल्लाउद्दीनशहा याने संमती दिली आणि आपल्या खास शरीररक्षक दलातील ३००० मोगल तीरंदाज आणि अनेक मोगल अधिकारी यांना त्याने मालिक उत्तुज्जारबरोबर वऱ्हाडात जाण्याचा हुकूम दिला. हे मोगल सैनिक फिरोजशहा आणि अहमदशहा यांच्या वेळे-पासून बहमनींच्या चाकरीत होते. या रक्षकामध्ये मंजू सुलतान आणि शहा कुली सुलतान या नावाचे दोन राजपुत्र होते. विश्वविजेता चेंगिजखान याच्या कुळात त्यांचा जन्म झाला होता. पहिल्या प्रथम मलिक उत्तुज्जार याने दौलताबादकडे कूच केले. तेथून त्याने गुजरात आणि माळवा यांच्या सरहद्दीवर आपल्या फौजेची टेहेळणीची पथके रवाना केली. नंतर त्याने ७००० शस्त्रसज्ज कसलेल्या मोगल १११□ सैनिकां-सह वऱ्हाडमध्ये प्रवेश केला. खानजहानला देखील नरनाळ्याचा किल्ला सोडून बाहेर येण्याची संधी मिळाली. तो किल्ला सोडून सुलतानाच्या सैन्याला मेहकर येथे येऊन मिळाला. मलिक उत्तुज्जार याने आता खानजहान याला त्याच्या सैन्यासहित एलिचपूरमार्गे गोंडवाड्याच्या रायाने वऱ्हाडात प्रवेश करू नये म्हणून त्याला प्रतिरोध करण्यासाठी एलिचपूर येथे अलग करून ठेवले. तो स्वतः मुख्य [२] (४२९) सैन्याला घेऊन रोहनखेडा घाटाच्या दिशेने ज्या ठिकाणी शत्रुसैन्याची छावणी होती तिकडे निघाला. घाटाच्या पायथ्याशी त्याची खानदेशच्या सैन्याच्या एका तुकडीबरोबर गाठ पडली. त्याने त्या सैन्याची धूळदाण उडविली आणि त्यांचा भयंकर संहार केला. आपला झालेला हा पराभव हे एक दुश्चिन्ह आहे असा विचार नसीरखानाचे मनात आला आणि त्याने अविवेकाने बुरहाणपूरच्या दिशेने माघार घेतली. त्या शहरापर्यंत मलिक उत् तुज्जार याने त्याचा पाठलाग केला. आपल्या राजधानीमध्ये देखील आपण सुरक्षित नाही ह्या भावनेने मलिक नसीरखान याने लालिंगच्या किल्ल्याकडे पलायन केले. ११२ □

(१६९) मलिक उत्तुज्जार याने बुरहाणपूरच्या रहिवाशांकडून हिरे, द्रव्य आणि इतर वस्तू यांच्या स्वरूपाने जबरदस्त खंडणी वसूल केली आणि नंतर खानदेशचा प्रांत उद्ध्वस्त करण्याच्या उद्देशाने त्याने कूच केले. आपल्या मनाप्रमाणे

ही कामगिरी पार पाडल्यावर तो बुरहाणपूरला परतला. तेथे त्याने बादशाही राजवाडे जाळून टाकले आणि त्यांची पाळेमुळे खणून काढली आणि जणू काही आपण दक्षिणेकडेच परत निघालो आहोत असे भासवीत त्याने बुरहाणपूरमधून कूच केले. परंतु रात्रीच्या वेळी त्याने आपला मार्ग बदलला आणि जलद गतीने कूच करून तो ४००० घोडेस्वारांच्या तुकडीला घेऊन लालिंगच्या किल्ल्यासमोर येऊन थडकला. नसीरखानापाशी १२००० सैनिक होते. त्याला असे वाटले की शत्रूपेक्षा आपण वरचढ आहोत याचे कारण शत्रूची संख्या आपल्यापेक्षा कमी आहे. एवढेच नव्हे तर कूच करण्याच्या श्रमामुळे शत्रू दमून देखील गेला आहे. या विचाराने तो मलिक उत्तुज्जारबरोबर लढाईला उभा ठाकला. परंतु खानदेशच्या फौजेचा संपूर्ण [२] (४३०) पराभव झाला. नसीरखानाचे अनेक प्रमुख अधिकारी वऱ्हाडच्या बंडखोर सरदारांसहित रणांगणावर ठार मारले गेले. मलिक उत्तुज्जार याच्या हाती प्रचंड लूट मिळाली. त्यात ७० हत्ती आणि काही तोफा होत्या. या लुटीसह तो मोठ्या विजयोन्मादाने अहमदाबाद बिदरकडे परत फिरला.

(१७०) बिदरनजीक मलिक उत्तुज्जार आला तेव्हा त्याने बजाविलेल्या लोकोत्तर कामगिरीबद्दल त्याच्यावर आपली मेहेर नजर झाली हे दाखविण्यासाठी अल्लाउद्दीनशहाने राजपुत्र हुमायून याला सर्व दरबारी मंडळीसहित त्याला सामोरे जाण्यासाठी शहरापासून बऱ्याच अंतरापर्यंत पुढे रवाना केले. मलिक उत्तुज्जार तेथे आल्यावर त्याने त्याला बादशाही पोषाखाचा एक जोड, एक हत्ती आणि हिरे जडविलेले एक खड्ग बक्षिसीदाखल दिले आणि त्याला दौलताबाद येथील जहागिरीवर रुजू होण्याची परवानगी दिली. त्याचवेळी त्याच्याबरोबर जे जे अधिकारी गेले होते त्या सर्वांना अल्लाउद्दीनशहाने पदव्या, बढत्या आणि जमिनीच्या देणग्या देऊन खूष केले. वरील लढाईत आपल्या अद्वितीय कामगिरीने प्रसिद्धी पावलेल्या शहा कुली सुलतान याला सुलतानाने आपली मुलगी विवाहादाखल दिली. त्याचवेळी त्याने असा हुकूम जारी केला की यापुढे मानाच्या बाबतीत दक्षिणी आणि हबशी लोकांऐवजी मोगलांना अग्रहक्क देण्यात यावा. मोगलांचा अशा तऱ्हेने सन्मान करण्याचा निर्णय घेण्यात आल्या दिवसापासून तो अजूनपर्यंत दक्षिणी आणि मोगल यांच्यामधील वैमनस्याची पाळेमुळे खूप खोलवर रुजली गेली आहेत आणि जेव्हा जेव्हा संधी प्राप्त झाली त्या त्या सर्व प्रसंगी दक्षिणी लोकांनी आपल्या मनातील वैराचे उघडपणे प्रदर्शन केले आहे.

(१७१) यासुमारास विजयनगरच्या देवरायाने आपले सरदार आणि राज्यातील प्रमुख ब्राह्मण यांची सभा बोलाविली. त्या सभेला त्याने असे सांगितले की माझा देश म्हणजे कर्नाटक. हा विस्तार, लोकसंख्या आणि वसूल या बाबतीत बहमनी घराण्यापेक्षा कितीतरी पटीने वरचढ आहे. त्याचप्रमाणे माझी फौजही त्यांच्यापेक्षा संख्येने अधिक आहे. असे असताना मुसलमानांना नेहमी विजय का मिळतो

आणि माझ्यावर खंडणी भरावयाला लागण्यासारखी परिस्थिती का ओढवते याची कारणे तुम्ही मला कृपा करून सांगा. यावर काहींनी त्याला असे निवेदन [ २ ] (४३१) केले की आमच्या शास्त्रात असे भविष्य लिहून ठेवले आहे की परमेश्वराने हिंदूंपेक्षा मुसलमान हे ३०००० वर्षे वरचढ रहावे असे वरदान त्यांना देऊन ठेवले आहे आणि म्हणून या कारणास्तव सर्वसाधारणपणे हिंदूंचा पराभव करण्याचे कामी मुसलमानांना यश मिळते. दुसऱ्या काहीजणांनी असे सांगितले की मुसलमानांच्या वरचढपणाला दोन तऱ्हेची परिस्थिती कारणीभूत आहे. एक म्हणजे त्यांच्या सैन्यातील घोडे हे अधिक ताकदवान आहेत आणि कर्नाटकच्या दुबळ्या घोड्यांपेक्षा अधिक श्रम सहन करण्याची त्यांची ताकद आहे. दुसरी गोष्ट म्हणजे बहमनी घराण्याच्या सुलतानांच्या नोकरीत उत्तम तिरंदाज नेहमी जय्यत तयार असतात. आपल्या सैन्यात असे उत्कृष्ट तिरंदाज फारच थोडे आहेत.

(१७२) यावर देवरायाने आपल्या फौजेत मुसलमानांची भरती करण्याचा हुकूम दिला. त्याने त्यांना जहागिरी लावून दिल्या आणि विजयनगरमध्ये त्यांच्या उपयोगासाठी एक मशीद बांधली. ११३ □ मुसलमानांना त्यांच्या धर्माप्रमाणे वागण्याचे कामी कोणीही प्रतिबंध करू नये असा वटहुकूम त्याने काढला. त्याचप्रमाणे एका उंची आसनावर आपल्या सिंहासनासमोर कुराणाची एक प्रत ठेवण्याची त्याने आज्ञा दिली. त्यापाठीमागे त्याचा असा उद्देश होता की विजयनगरच्या राजाच्या सिंहासनासमोर आपली हजेरी लावण्याचे कामी आणि त्याला आदाबअर्ज करण्याचे कामी त्यांच्याकडून मुसलमानी धर्माने घालून दिलेल्या आज्ञांविरुद्ध वागण्याचे पाप घडू नये. ११४ □ देवरायाने त्याचप्रमाणे आपल्या सर्व हिंदू शिपायांना तिरंदाजी शिकणे सक्तीचे केले. या कामासाठी त्याने व त्याच्या अधिकाऱ्यांनी आपल्याला इतके [ २ ] (४३२) वाहून घेतले की थोड्याच अवकाशात तिरंदाजीमध्ये प्रवीण असलेले २००० मुसलमान आणि ६०००० हिंदू तिरंदाज त्याने भरती केले. त्याशिवाय नेहमीच्या पद्धतीनुसार भाला आणि बरची ही शस्त्रे धारण करणारे ८०००० घोडेस्वार आणि २ लक्ष पायदळी सैनिक त्याच्या सैन्यात सामील झाले.

(१७३) इतका प्रचंड सेनासंभार जमा झाल्यावर त्याने बहमनी राज्य जिंकून घेण्याचा निश्चय केला आणि त्याप्रमाणे हिजरी ८४७ या वर्षी त्याने तुंगभद्रा नदी ओलांडली आणि एकाएकी हल्ला करून मुद्गलचा किल्ला जिंकून घेतला. आपल्या मुलांना त्याने रायचूर आणि बंकापूर यांना वेढा देण्यासाठी रवाना केले आणि सैन्यासहित त्याने कृष्णेच्या काठावर छावणी दिली. तेथून त्याने सैन्याच्या तुकड्या रवाना केल्या. त्यांनी सागर आणि विजापूर पर्यंतच्या मुलखात लुटालूट केली आणि तो मुलख जाळूनपोळून उद्ध्वस्त केला. तेथील रहिवाशांना त्यांनी बिनदिक्कत यमसदनास पाठविले. या घटनांची बातमी जेव्हा अल्लाउद्दीनशहाला मिळाली तेव्हा या आक्रमणाला परतवून लावण्याची त्याने

हिजरी ८४७ इ. स. १४४३

तयारी केली. त्याने तेलंगण, दौलताबाद आणि वऱ्हाड येथील आपल्या सैन्यांच्या तुकड्यांना विलंब न लावता ताबडतोब अहमदाबादबिदर येथे हजर होण्याचा हुकूम दिला. ह्या सैन्याची त्याने नंतर पाहणी केली तेव्हा त्याला आपल्या फौजेत ५०००० घोडेस्वार, ६०००० पायदळ आणि मोठ्या संख्येने तोफखाना एकत्र जमा झाल्याचे दिसून आले. या सेनासमूहासह त्याने शत्रुविरुद्ध चाल केली. अल्लाउद्दीन शहा कूच करून येत आहेसे पाहून देवरायाने मुद्गल किल्ल्याच्या तटाच्या भिंतीखाली आपली छावणी दिली आणि आपल्या सैन्याच्या अनेक सुटसुटीत तुकड्या त्याने अल्लाउद्दीनशहाच्या कुचीत अडथळे निर्माण करण्यासाठी रवाना केल्या. अल्लाउद्दीनशहाचे सैन्य मुद्गलपासून १२ मैल अंतरावर थांबले. मलिक उत्तुज्जार याला तेथून देवरायाच्या मुलांविरुद्ध दौलताबादच्या सैन्याबरोबर रवाना करण्यात आले. विजापूरचा सुभेदार खान जमान आणि वऱ्हाड [ २ ] ( ४३३ ) आणि तेलंगणाच्या सैन्याचा सेनापती खान आजम यांची रवानगी शत्रूच्या मुख्य सैन्याला विरोध करण्यासाठी करण्यात आली. मलिक उत्तुज्जार हा प्रथम रायचूर येथे गेला आणि त्याने देवरायाच्या मोठ्या मुलाबरोबर लढाई दिली. या लढाईत देवरायाचा मुलगा जखमी झाला आणि त्याने बंकापूरच्या रोखाने पलायन केले. त्याचा धाकटा भाऊ बंकापूरला घातलेला वेढा उठवून त्याला वाटेत तेथून येऊन मिळाला.

(१७४) दोन महिन्यांच्या अवधीत विरोधी पक्षांच्या प्रचंड सेनासमूहात एकंदर तीन वेळा लढाया झाल्या. पहिल्या लढाईत दोन्ही बाजूंकडील असंख्यात सैनिक प्राणास मुकले. लढाईचे पारडे निश्चित हिंदूंच्या बाजूने झुकले आणि मुसलमानांना भयंकर हानी सोसावी लागली. दुसऱ्या लढाईत सुलतान अल्लाउद्दीन यास विजय मिळाला आणि शेवटच्या लढाईत देवरायाचा मोठा मुलगा खान जमानने फेकलेला भाला लागून ठार मारला गेला. ह्या घटनेमुळे हिंदूंमध्ये अतिशय घबराट पसरली आणि त्यांनी अस्ताव्यस्तपणे पलायन करून मुद्गलच्या किल्ल्यात माघार घेतली. मुशिर उल्मुल्क आणि त्याचा भाऊ हे दोघेजण नावाजलेले अधिकारी होते. त्यांनी पळणाऱ्यांचा पाठलाग केला आणि त्यांच्याबरोबरच ते किल्ल्यात शिरले. काफरांना त्यांच्या शौर्याबद्दल कौतुक वाटले आणि त्यांना कोणत्याही प्रकारे अपाय न करता त्यांनी कैद केले. त्या दोघांना नंतर त्यांनी देवरायासमोर नेले. देवरायाने त्या दोघांना कैदेत ठेवण्याचा हुकूम दिला. यावर अल्लाउद्दीनशहाने देवरायाला पत्र लिहून कळविले की माझ्या दृष्टीने माझ्या दोन प्रमुख अधिकाऱ्यांच्या जीविताची बरोबरी २००००० सामान्य माणसांच्या जीविताइतकी आहे. माझ्या घराण्यातील सुलतानांमध्ये अशा तऱ्हेची प्रथा चालत आलेली आहे की एका मुसलमानाला ठार मारल्यास त्याच्या मृत्यूचा बदला १००००० हिंदूंना ठार मारून घ्यावयाचा. तेव्हा मी तुम्हाला असे निक्षून बजवितो की तुम्ही माझ्या दोन कैद केलेल्या अधिकाऱ्यांना ठार माराल तर त्यांच्या प्रत्येकाच्या मृत्यूचा बदला मी एक-एक लाख हिंदूंना ठार मारून घेईन.

(१७५) बहमनी राजघराण्यातील सुलतान आपण केलेल्या [२] (४३४) प्रतिज्ञा किती कसोशीने तडीला नेतात याची अनुभवाने देवरायाची खात्री झालेली असल्याकारणाने त्याने सुलतानाकडे आपले खाजगीतील अधिकारी पाठविले. त्यांच्यातर्फे देवरायाने प्रस्ताव मांडला की आपण यापुढे माझ्या ताब्यातील प्रदेशाचे नुकसान न करण्याचे वचन देत असाल तर मी दरवर्षी तुम्हाला खंडणीची ठराविक रक्कम देत जाईन आणि तुमच्या कैद केलेल्या दोन्ही अधिकाऱ्यांची सुटका करीन. सुलतानाने या अटींना मान्यता दिल्यावर दोन्ही पक्षात तह झाला. देवरायाने ताबडतोब मुशिर उल्मुल्क आणि त्याचा भाऊ यांची सुलतानाकडे रवानगी केली. त्याचप्रमाणे त्याने चाळीस लढाऊ हत्ती आणि मोठ्या किमतीच्या अनेक मूल्यवान वस्तू सुलतानाकडे भेट म्हणून पाठविल्या. त्याच वेळी त्याने काही वर्षे थकलेली खंडणी सुलतानाला दिली. यानंतर सुलतानाने एक उत्कृष्ट पोषाख देऊन देवरायाचा सन्मान केला. देवरायाला त्याने उत्तम प्रकारे सजविलेले आणि हिरेजडित सामुग्रीने मढविलेले अनेक घोडे नजर केले. त्यानंतर सुलतानाने आपल्या देशाकडे परत कूच करून जाण्यास सुरुवात केली. यानंतरच्या आपल्या उर्वरित कारकिर्दीत देवराय हा नियमितपणे खंडणी देत असे. याप्रसंगी जो तह झाला त्यातील अटींचे सुलतान आपल्यापरीने अतिशय काटेकोरपणे पालन करी.

(१७६) आपल्या कारकिर्दीच्या पूर्वार्धात अल्लाउद्दीन शहाने अहमदाबाद बिदर येथे गरिबांसाठी एक रुग्णालय बांधले. या रुग्णालयाच्या खर्चासाठी त्याने खूप मोठ्या जमिनींचे उत्पन्न तोडून दिले. त्यामध्ये त्याने मुसलमान हकीम आणि हिंदू वैद्य अशा दोघांचीही नेमणूक केली. आपल्या राज्याच्या प्रत्येक भागांत तो लोकांच्या वर्तनाची तपासणी करण्यासाठी अधिकारी आणि निःपक्षपाती अधिकारी पाठवीत असे. तो स्वतः जरी दारू पीत असे तरी इतरांनी तिचे सेवन करू नये, असा हुकूम त्याने काढला. त्याचप्रमाणे आपल्या राज्यात जुगार खेळण्यालाही त्याने बंदी केली आणि कलंदर व्यक्ती, आळशी माणसे आणि फुकट गेलेले टवाळखोर ह्यांच्या मानेवर साखळदंड चढवले. रस्त्यावरील घाण साफ करणे, मोठेमोठे दगड वाहून नेणे आणि सर्व तऱ्हेची मेहनतीची कामे करण्याची शिक्षा त्याने त्यांना दिली. यामध्ये [२] (४३५) सुलतानाचा उद्देश त्यांची सुधारणा व्हावी असा होता. त्याचप्रमाणे त्यांनी मेहनत करून आपल्या उपजीविकेसाठी द्रव्य कमवावे अथवा ते न जमल्यास देश सोडून कायमचे चालते व्हावे अशीही सुलतानाची इच्छा होती. कोणत्याही व्यक्तीला कानउघडणी केल्यानंतर आणि थोड्याफार सुधारणेसाठी वाव दिल्यानंतर दारू पिण्याच्या गुन्ह्याबद्दल दोषी ठरविण्यात आले तर शिक्षा म्हणून सुलतानाने असा हुकूम जाहीर केला की गुन्हेगाराचे समाजातले स्थान कोणतेही असले तरी त्याच्या घशात वितळवलेले शिसे ओतण्यात यावे.

( १७७ ) सय्यद महमद गिसू दराज याचा एक नातू हयात होता. एका दरबारी नर्तकीकडे त्याचे मन आकर्षिले गेले. तिच्या नादाने तो दारूचे सेवन करण्यास उद्युक्त झाला. दारू प्याल्यानंतर दारूच्या धुंदीत तो भांडाभांड करू लागला आणि एका बाईला त्याने मारले व तिचे केस कापून टाकले. ही भानगड शहराच्या कोतवालापुढे सादर करण्यात आली. त्याने गुन्हेगार आणि ती बाई या दोघांना कैद केले. परंतु गिसू दराजचे घराणे हे सय्यदामध्ये मोडत असल्याकारणाने त्यांच्या विषयीच्या आदराच्या भावनेने त्याने वरील फिर्याद सुलतानाच्या समक्ष गुदरण्याचा विचार केला. फिर्याद ऐकल्यानंतर सुलतानाला अतिशय संताप आला आणि त्याने गुन्हेगाराला शहरातील अत्यंत गजबजलेल्या चौकात नेण्याचा हुकूम दिला. तेथे त्याच्या तळव्यावर २०० फटके लगावण्यात यावे असे त्याने फर्माविले आणि त्याचप्रमाणे आपण यापुढे दारूचे सेवन करणार न ी अशी शपथपूर्वक प्रतिज्ञा घेण्यास त्याला सांगितले. गुन्हेगाराला नादी लावलेल्या नर्तकीची गाढवाचे कातडे घालून रस्त्यातून धिंड काढण्यात आली आणि नंतर तिची शहरातून हकालपट्टी करण्यात आली.

( १७८ ) सुलतानाने आपल्या मुलकी आणि लष्करी खात्याची इतक्या कौशल्याने पुनर्घटना केली की त्याबरोबर तुलना करताना फरिदून आणि नौशेरवान यांनी केलेली कामगिरी फिकी पडली. शुक्रवारी आणि सर्व सुट्टयांचे दिवशी तो नियमाने मशिदीत जात असे आणि धर्मावरील प्रवचने ऐकत असे. मानवी रक्त सांडण्याच्या तो अतिशय विरुद्ध होता. अर्थात या गोष्टीबद्दल जरी त्याला तिटकारा वाटत असे तरी त्याने मूर्तिपूजकांच्या अनेक देवळांचा नाश केला आणि देवळांचे जागी मशिदी बांधल्या. तो नाजारेन ( म्हणजे ख्रिश्चन ) अथवा ब्राह्मण यांजबरोबर कधीही संभाषण करीत नसे. इतकेच काय तर आपल्या राज्यकारभारात कोणत्याही [ २ ] ( ४३६ ) मुलकी अधिकाराची जागा स्वीकारण्यास तो त्यांना परवानगी देत नसे.

( १७९ ) विजयनगरबरोबरचे युद्ध संपुष्टात आल्यानंतर सुलतानाने आपली वर्तणूक बदलली आणि तो आपला सारा वेळ ख्यालीखुशाली आणि मौजमजा करण्याच्या कामी घालवू लागला. राज्याचा कारभार बघण्याचे काम त्याने आपल्या मंत्र्यांवर सोपविले आणि राज्यामधील १००० अतिशय सुंदर स्त्रिया गोळा करून आपल्या जनानखान्यात आणून भरल्या. या स्त्रियांची राहण्याची सोय करण्यासाठी एका जलाशयाच्या किनाऱ्यावर त्याने एक भव्य राजवाडा बांधला आणि त्यासभोवार प्रशस्त आणि सुंदर बागबगीचे त्याने तयार केले. या राजवाड्यास त्याने सुखाचे निवासस्थान असे नाव दिले. या राजवाड्यात तो आपला सर्व वेळ माणकाच्या रंगाच्या दारूचे सेवन करण्यात आणि मधुर चेहऱ्याच्या स्त्रियांच्या ओठांची चुंबने घेण्यात अथवा उत्तम आवाज असलेल्या गायकांनी गायिलेली नितांत सुंदर गीते ऐकण्यात घालवीत असे. सुखाची धुंदी मनावर चढलेल्या या मनःस्थितीत असताना चार अथवा पाच महिन्यातून फक्त

एकदा तो दरबारात हजर राहात असे. राज्याचा अधिकार हाती असलेले त्याचे दक्षिणी अधिकारी सत्तेचा अनिर्बंधपणे उपयोग करीत.

( १८० ) या सुमारास मियामनउल्ला दकनी याने समुद्रकिनाऱ्यालगत असलेले सर्व किल्ले जिंकून ताब्यात आणण्याचा मनसुबा रचला. हा मनसुबा सिद्धीस नेण्यासाठी सुलतानाने मलिक उततुज्जार याची नियुक्ती केली. त्याच्याबरोबर त्याने ७००० दक्षिणी पायदळी सैनिक, ३००० अरबी घोडेस्वार आणि शिवाय त्याच्या हाताखालील सैन्याची तुकडी एवढे सैन्य देऊन त्याची रवानगी पश्चिम दिशेकडे केली. मलिक उततुज्जार याने आपल्या सैन्याचा तळ चाकण या ठिकाणी ठेवण्याचे ठरविले. त्याप्रमाणे त्याने जुन्नर शहराजवळचा किल्ला आपल्या ताब्यात घेतला. या ठिकाणाहून त्याने वेळोवेळी कोकणात आपल्या सैन्याच्या तुकड्या रवाना केल्या आणि त्या देशातील अनेक राजांना शरण येण्यास भाग पाडले. सरतेशेवटी तो स्वतः कोकण देशात उतरला आणि तेथल्या एका किल्ल्याला त्याने वेढा दिला. [ २ ] ( ४३७ ) त्या किल्ल्याच्या अधिपतीचे नाव शिर्का असे होते. ११५८ त्याला मलिक उततुज्जार याने झटपट शरण येण्यास लावले आणि त्याला आणि त्याच्या कुटुंबातील मंडळींना आपल्या स्वाधीन होण्यास भाग पाडले.

( १८१ ) मलिक उततुज्जार याने शिर्का याला यानंतर असे बजाविले की तू एक इस्लाम धर्माचा स्वीकार तरी कर नाहीतर तुला ठार मारणे मला भाग पडेल. यावर त्या लबाड काफराने मोठ्या नम्रतेचा आव आणून मलिक उततुज्जार याला सांगितले की माझ्यामध्ये आणि शंकरराय याच्यामध्ये वंशपरंपरागत वैर आहे. शंकररायाच्या ताब्यात खेळण्याच्या किल्ल्याच्या आजूबाजूचा प्रदेश आहे. अशा परिस्थितीत मी जर इस्लाम धर्माच्या ( Pale ) परिमितीत प्रवेश केला आणि माझा शत्रू शंकरराय हा पूर्वीप्रमाणेच आपल्या हाती सत्ता बाळगून बलाढ्य राहिला तर तुम्ही या प्रदेशातून निघून गेल्यावर धर्मबदलाच्या कारणास्तव तो माझी तिरस्कारपूर्वक अवहेलना करील आणि माझी नातेवाईक माणसे आणि माझे प्रजाजन यांना माझ्याविरुद्ध बंड करण्यास चिथावणी देईल. याचा परिणाम असा होईल की माझ्या वाडवडिलांपासून ताब्यात असलेला प्रदेश माझ्या हातातून जाईल. राजा शिर्का मलिक उततुज्जार याला असेही म्हणाला की माझा प्रतिस्पर्धी खेळण्याचा शंकरराय याला आपण वठणीवर आणा आणि त्याच्या ताब्यातील प्रदेश माझ्या अथवा माझ्या अधिकाऱ्यांच्या स्वाधीन करा. ही गोष्ट साध्य करणे सहज सुकर आहे. आपण जर असे केलेत तर खऱ्या धर्माच्या म्हणजे मुसलमानी धर्माच्या तत्त्वांचा मी अंगीकार केला आहे असे मी जाहीर करीन आणि सुलतानाच्या अनेक सेवकांमध्ये माझी भरती मी करून घेईन. त्याचप्रमाणे सुलतानाच्या खजिन्यात दरवर्षी खंडणी मी देत जाईन आणि या प्रदेशातील जे राजेरजवाडे आपल्या कर्तव्यात कसूर करतील आणि राजनिष्ठ राहणार नाहीत त्यांना वठणीवर आणण्याचे कामात देखील मी सुलतानाला मदत करीन.

(१८९) यावर मलिक उत्तुज्जार याने उत्तर दिले की माझ्या असे कानावर आले आहे की राजा शिर्काच्या देशाकडे जाणारा मार्ग घनदाट जंगलाने भरलेला [२] (४३८) आणि अतिशय कठीण अशा घाटाच्या रस्त्याने आहे. राजा शिर्का यावर म्हणाला की सैन्याला मार्ग दाखविण्यासाठी माझ्यासारखा अतिशय विश्वासू आणि कर्तबगार वाटाड्या असताना सैन्यामधील एकाही सैनिकाला इजा होईल याची भीतीदेखील बाळगण्याचे आपल्याला कारण नाही. राजा शिर्का असे म्हणाल्यावर त्याच्या
हिजरी ८५८ ) वचनावर विसंबून मलिक उत्तुज्जार याने हिजरी ८५८ मध्ये
इ. स. १४५३ ) आपल्या खेळण्याविरुद्धच्या मोहिमेला सुरुवात केली. परंतु सुरुवातीलाच जंगलाच्या प्रदेशात कूच करण्याचे नाकारून त्याचे बहुतेक दक्षिणी आणि हबशी अधिकारी त्याला सोडून गेले. राजा शिर्का याने वचन दिल्याप्रमाणे कूचीचे पहिले दोन दिवस सैन्याला मोठ्या आणि रुंद रस्त्याच्या मार्गाने नेले. यावरून त्याचा उत्साह आणि निष्ठावानपणा याची मलिक उत्तुज्जार याने प्रशंसा केली. परंतु तिसऱ्या दिवशी मात्र त्याने त्यांना इतक्या भयंकर रस्त्यावरून नेले की वाघाची देखील वाघीण बनली असती. म्हणजे भीतीमुळे एखाद्या वाघाची देखील मुरकुंडी उडून गेली असती. त्याने दाखविलेल्या वाटा इतक्या कठीण होत्या की एकाद्या रमणीच्या केशकलापातील गुंतागुंत देखील त्यांच्यापुढे उकलणे सोपे गेले असते. इतकेच काय तर प्रेमाच्या चक्रव्यूहातून मार्ग काढणे हे देखील कदाचित त्या रस्त्याच्या जंजाळरूपी गुंतागुंतीतून मार्ग काढण्यापेक्षा सुलभ झाले असते. त्या जंगलामध्ये डोंगरांचे जे भयंकर कडे तुटलेले होते आणि ज्या खोल दऱ्या निर्माण झालेल्या होत्या त्या बघून सैतान देखील भयाने दचकून थांबला असता. दूरवर पसरलेल्या पर्वतांच्या काळ्याकभिन्न रांगांचे रौद्र स्वरूप पाहिल्यानंतर पिशाच्च्याच्याही छातीत भीतीचा बागुलबोवा निर्माण झाला असता. या प्रदेशामध्ये असलेल्या दऱ्याखोऱ्यांना सूर्यकिरणांच्या प्रच्छन्न झगमगाटाने कधीच सुशोभित केले नाही की काय असे वाटत होते. इतकेच काय तर त्या दऱ्याखोऱ्यांच्या तळाशी सूर्यकिरणांनी कधी पोहोचूच नये असा परमेश्वराचा इरादा असावा असे भासमान होत होते. तेथील गवत नागराजाच्या तीक्ष्ण सुळ्यांसारखे कणखर आणि अणकुचीदार होते आणि वातावरण सपक्ष सर्पाने टाकलेल्या उश्वासासारखे दुर्गंधियुक्त होते. तेथल्या जलाशयातील पाणी पिणे म्हणजे मृत्यूला आव्हान देण्यासारखे होते तर तेथल्या हवेत जणू काही विषारी वायूच भिनून राहिला होता. या भयंकर चक्रव्यूहरूपी रस्त्यामधून मार्ग आक्रमण केल्यामुळे दमून गेलेले आणि भयचकित झालेले मलिक उत्तुज्जारचे सैन्य घनदाट काळोख असलेल्या एका अरण्यात प्रवेश करते झाले. त्या अरण्यातला मार्ग हा स्वर्गातून वाहणाऱ्या वायूला आक्रमिण्यास देखील कठिणतम असा होता. या जंगलाच्या तिन्ही बाजूला गगनाला भिडणारे पर्वत होते. ते इतके उंच होते की त्यांची शिखरे ढगातून वर बाहेर डोकावत होती. जंगलाची एक बाजू समुद्रातून आत घुसलेल्या पाण्याच्या

प्रवाहाने वेढलेली होती. यामुळे परिस्थिती अशी निर्माण झाली की पुढे सरकण्यास वाट नव्हती अथवा माघार घेण्यास रस्ता नव्हता. या जंगलातून बाहेर पडण्याचा मार्ग एकच होता आणि तो म्हणजे ज्या मार्गाने त्यांनी या जंगलात [ २ ] ( ४३९ ) प्रवेश केला त्याच मार्गाने परत फिरणे हा होय. ११६ □

( १८३ ) अशा तऱ्हेचा आणीबाणीचा प्रसंग कोसळलेला असताना मलिक उत्तुज्जार रक्तस्रावाच्या भयंकर विकाराने आजारी पडला. त्याला सैन्याबरोबर नियमितपणे कूच करून जाण्याचेही जमेनासे झाले. इतकेच काय तर सैन्याने कोणती रचना करून मार्ग आक्रमण करावा याबद्दल हुकूम देण्याइतकीही त्याच्या अंगी ताकत राहिली नाही. सतत चाललेल्या कुचांमुळे सैनिक इतके दमून जात की रात्र पडली की ज्या ठिकाणी जागा मिळेल त्या ठिकाणी ते जमिनीवर स्वतःचे शरीर झोकून देत कारण त्या जंगलात दोन तंबू एका शेजारी एक असे ठोकता येतील अशी सलग जागाही आढळणे कठीण होते. अशा तऱ्हेने सैन्यात कसलीही शिस्त न राहता ते सर्वदूर विखुरले गेले. तेव्हा त्यांचा विश्वासघातकी आणि कपटी वाटाड्या शिर्का त्यांना सोडून निघून गेला आणि त्याने शंकररायाला कळविले की सावजाला मी तुमच्या जाळ्यात फसवून आणले आहे. रायाने शिर्काच्या मार्गदर्शनाखाली मोठे सैन्य घेऊन मुसलमानांच्यावर मध्यरात्रीच्या सुमारास हल्ला चढविला. आपल्यावर अशा तऱ्हेने अचानक हल्ला होईल अशी शंकाही मनात न बाळगता मुसलमान सैनिक अतिशय कष्टमय प्रवासामुळे आलेल्या शिणवट्याने दमून भागून निद्रेच्या पूर्ण आधीन झालेले होते. अशा तऱ्हेच्या अगतिक अवस्थेत असताना शंकररायाच्या सैनिकांनी जवळ जवळ ७००० सच्च्या मुसलमानांची चाकू आणि खंजिरांचे प्रहार करून जणू काही बोकडाप्रमाणे कत्तल केली. त्यावेळी वाऱ्याचे थैमान चालू होते आणि झाडामधून वाहणाऱ्या वाऱ्याचा जो आवाज होत होता त्यामुळे जखमी झालेल्या सैनिकांच्या वेदना विव्हल किंकाळ्या इतर सैनिकांच्या कानावर जाण्यास प्रतिबंध होत होता. या ठार झालेल्यात मलिक उत्तुज्जार हाही होता आणि त्याजबरोबर मदिना, करबाला आणि नजफ येथील ५०० सय्यद मंडळीचीही कत्तल झाली. त्याचप्रमाणे थोडे फार दक्षिणी आणि हबशी अधिकारी त्यांच्या अंदाजे २००० अनुयायांसहित या कत्तलीत मारले गेले. हे सैनिक आपापल्या सेनाधिकाऱ्यांपाशी या छावणीत मुक्काम करून राहिले होते. दिवस उजाडेपर्यंत रायाने छावणीतील सर्व मुसलमानांची कत्तल करून भूमीवर रक्त सिंचन करण्याचे काम पूर्ण [ २ ] ( ४४० ) केले होते. त्यानंतर तो आपल्या सैनिकासहित त्या जंगली प्रदेशातून माघारी परत फिरला.

(१८४) या भयंकर कत्तलीमधून जे वाचले त्यांनी मोठ्या मुष्किलीने आल्या मार्गाने माघार घेतली. माघार घेत घेत घाटमाथ्यावरील मोकळ्या मैदानात जेथे दक्षिणी आणि हबशी अधिकारी छावणी देऊन मागे राहिले होते तेथे येऊन ते पोहोचले. दक्षिणी अधिकाऱ्यांनी परत आलेल्या परदेशी सैनिकांना

सल्ला दिला की तुम्ही आपापल्या जहागिरीवर यावेळी परत जावे. असे केल्याने तुम्हाला जे कष्ट पडले आहेत त्यांचा परिहार होईल आणि पुढील कामगिरी बजावण्याच्या दृष्टीने तुम्हाला साधनसामुग्रीची जमवाजमव करता येईल. या बेताला मोगल अधिकारी आणि सैनिक यांनी मान्यता देण्यास नकार दिला. ते म्हणाले की चाकण हे गाव येथून जवळच आहे तेथे आम्ही जातो. थोड्याच अवधित सैन्याची भरती पहिल्याप्रमाणे करून आम्हाला मूळ सैन्याला परत येऊन मिळणे सहज शक्य होईल. काही मोगल अधिकारी अदूरदर्शीपणे असेही बोलून गेले की दक्षिणी अधिकारी यांनी पळपुटेपणा आणि भ्याडपणा दाखविला आणि घाटावरून उतरून कोकणात येण्यास सपशेल नाकबुली दिली. या त्यांच्या अवसानघातकीपणामुळेच मलिक उत्तुज्जार आणि सय्यद यांच्यावर भयानक प्रसंग ओढवला. मोगल अधिकाऱ्यांनी अशीही धमकी दिली की आम्ही चाकणला पोहोचताच दक्षिणी अधिकाऱ्यांनी आमच्यापासून पळून जाण्याचा भ्याडपणा दाखविला त्याची साद्यंत हकीकत आम्ही सुलतानाच्या दरबाराकडे लिहून कळवू.

(१८५) या धमकीमुळे दक्षिणी अधिकाऱ्यांच्या मनात भय निर्माण झाले आणि त्यांनी मोगल अधिकाऱ्यांवरच वरील आरोप उलटविण्याचा निश्चय केला. त्यांनी सुलतानाकडे निरोप पाठवून असे कळविले की आम्ही परोपरीने विरोध दर्शविला असताना त्या विरोधाला ठुकरावून लावून मलिक उत्तुज्जार याने शिर्का नावाच्या जमीनदाराच्या चिथावणीने आणि सय्यद आणि मोगल यांनी दिलेल्या सल्ल्यानुसार भयंकर जोखीम असलेली कामगिरी पार पाडण्याचा मनसुबा रचला. मलिक उत्तुज्जार याच्या बेदरकार स्वभावाचे प्रायश्चित त्याचा या मोहिमेत मृत्यू ओढवल्यामुळे त्याला मिळाले आहे. खेळण्याच्या कत्तलीत त्याचे बहुतेक अनुचर ठार झाले आहेत. वरील कत्तलीतून वाचून आलेले जे परदेशी अधिकारी आणि सैनिक आहेत त्यांना आम्ही असे सांगितले आहे की दुसरा सेनापती नियुक्त होऊन इथे येईपर्यंत तुम्ही आमच्या बरोबरच मुक्काम करून राहा. परंतु आमचे न ऐकता आमच्याशी त्यांनी अतिशय उद्धटपणाची वागणूक केली आणि खुद्द आपल्या-संबंधी त्यांनी अनुदारपणाचे उद्गार काढले. इतकेच नव्हे तर ते सर्व [ २ ] ( ४४१ ) एकत्र होऊन चाकणच्या किल्ल्याकडे निघून गेले. कोकणच्या राजांना त्यांनी असेही सांगून कळविले की आम्ही तुमच्या चाकरीत रुजू होण्यास तयार आहोत, तरी तुम्ही बंडाचे निशाण उभारण्याची सिद्धता करा.

( १८६ ) अशा मजकुराची पत्रे शेरउल्मुल्क दक्नी आणि निजाम उल्मुल्क यांच्यातर्फे सुलतानाकडे पाठविण्यात आली. निजाम उल्मुल्क हा इमाद उल्मुल्क घोरी याचा मुलगा. हे सर्व अधिकारी मोगलांबद्दल शत्रुत्वाची भावना बाळगून असत आणि त्यांना आपल्या प्रतिस्पर्ध्यांप्रमाणे मानीत. त्यांनी अशा तऱ्हेने आपल्याजवळील पत्रे अल्लाउद्दीन शहाकडे सादर केली. त्यांनी मलिक उत्तुज्जार याच्या पराभवाची हकीकत

आणि कत्तलींतून वाचलेल्या मोगल अधिकाऱ्यांची वर्तणूक सुलतानासमोर सांगितली. अल्लाउद्दीन शहा त्यावेळी दारूच्या धुंदीत होता. वरील अधिकाऱ्यांनी मोहिमेबद्दल आणि इतर गोष्टींबद्दल सांगताना अतिशय अतिशयोक्तीपूर्ण हकीकत सुलतानाला सांगितली आणि परिस्थिती विकोपाला जाईल असे आणि पूर्णपणे आकसाने भरलेले व द्वेषपूर्ण असे आरोप परदेशी मंडळींवर केले. ह्या गोष्टी ऐकल्यावर सुलतान परदेशी अधिकाऱ्यांवर अतिशय क्रोधाविष्ट झाला. क्षणभरही विचार न करता ज्या दोन अधिकाऱ्यांनी ही पत्रे आणली होती त्यांना त्याने लगोलग चाकणकडे रवाना केले आणि सर्व परदेशीयांना ठार मारण्याचा हुकूम त्याने त्यांना दिला.

(१८७) महमद पैगंबराच्या वंशजांवर हल्ला चढविण्यासाठी ज्याप्रमाणे अबदुल्ला जईद किंवा शम्स उल् जोशन [११७] यांनी कंबर कसून चिलखत अंगावर धारण केले तद्वत हे दोघे अधिकारी मोठ्या हिरिरीने चाकणच्या दिशेने निघाले. त्यांच्या आगमनाची चाहूल जेव्हा सय्यद आणि मोगल मंडळींना लागली तेव्हा त्यांनी किल्ल्यामध्ये स्वतःला कोंडून घेतले आणि दरबाराकडे अर्जी घेऊन आपल्यातर्फे निरोप्ये रवाना केले. त्यात त्यांनी घडलेली सारी हकीकत कथन केलेली होती आणि आपल्या निरपराधित्वाचा दावा सिद्ध करण्याचा प्रयत्न केलेला होता. परंतु त्यांची पत्रे घेऊन जाणाऱ्या जासूदांना शेरउल्मुल्क याने वाटेत अडविले आणि त्यांच्या पत्रांचा नाश केला. त्याबदली परदेशी मंडळींनी दुसरी पत्रे रवाना केली. परंतु त्यांना जेव्हा असे आढळून आले की, त्यांच्या सोबत्यांपैकी कोणालाही पुढे जाऊन देत नाहीत तेव्हा त्यांनी आपल्या अर्जी हिंदुस्थानातील त्या भागात राहणाऱ्या [२] (४४२) दोघाजणांच्या स्वाधीन केल्या. त्यांच्या देशबांधवांनीच या दोघांना आपल्या चाकरीत अनेक वर्षेपर्यंत रुजू करून घेतले होते. ह्या दोघा हलकट माणसांनी आपल्या निसर्गतःच असलेल्या कपटी आणि विश्वासघातकी स्वभावानुसार ही पत्रे शेरउल्मुल्क याजकडे नेली. कारण या माणसांचे काळेकुट्ट चेहेरे म्हणजे त्यांच्या हृदयातील हलाहलाचे निदर्शकच होते. पूर्वीच्या पत्रांप्रमाणेच याही पत्रांचा शेरउल्मुल्क याने नाश केला आणि त्या विश्वासघातक्यांना त्याने बक्षिसी दिली. चाकणकडे जाणारे सर्व मार्ग इतक्या कडकपणे रोखून धरण्यात आले की कोणतीही व्यक्ती झडती घेतल्याशिवाय तिथून जाऊच शकली नसती. त्या दुर्दैवी सय्यदांवर त्यांचा थोर पूर्वज जो हुसेन त्याच्यासारखीच परिस्थिती ओढवली आणि निराशेच्या खोल गर्तेत ते गाडले गेले. परंतु रक्ताचा शेवटचा बिंदू अंगात असेपर्यंत लढा देऊन स्वसंरक्षण करण्याचा त्यांनी कठोर निश्चय केला. त्यांचा अट्टाहासाने कणखर प्रतिकार करण्याचा पण बघितल्यावर शेरउल्मुल्क याने कोकणातून आपल्या मदतीसाठी दक्षिणी अधिकाऱ्यांना बोलावणे पाठविले. अशा तऱ्हेने चाकणसमोर प्रचंड सेनासमुदाय एकत्रित झाला. दोन महिनेपर्यंत चाकणच्या किल्ल्याला या फौजेने अयशस्वी वेढा दिला. त्या दरम्यान शेरउल्मुल्क याने सुलतानाकडे वारंवार पत्रे लिहून कळविले की

सय्यद आणि मोगल हे हट्टवादीपणाने बंडखोरीचा मार्ग चोखाळीत आहेत. त्यांनी गुजरातच्या सुलतानाची मदत मागितली आहे आणि चाकण त्याच्या हाती सोपविण्याचे त्यांनी कबूल केले आहे. दरबारातील दक्षिणी वजिरांनी आपले जेवढे म्हणून वजन सुलतानापाशी होते तेवढे खर्च करून वरील पत्रांतून आलेली माहिती खरी असली पाहिजे असे ठासून सांगितले. त्यांनी सुलतानापासून वारंवार असे हुकूम मिळविले की बंडखोरांना अशी शिक्षा लावा की इतरांनी त्यापासून धडा घेतला पाहिजे. जर अधूनमधून एखादे पत्र तथाकथित बंडखोरांपासून राजधानीपर्यंत येऊन जर पोहोचलेच तर ते सुलतानाच्या नजरेस पडू नये याबद्दल योग्य ती काळजी वरील दरबारातील दक्षिणी वजीर घेत असत. बाहेर ते देखावा निर्माण करीत की सुलतान परदेशी मुसलमानांवर इतका चिडला आहे की त्यांच्याकडून आलेला एक शब्द देखील ऐकण्याची किंवा वाचण्याची त्याची बिलकुल तयारी नाही.

( १८८ ) जेव्हा किल्ल्यावर दाण्यागोट्याचा तुटवडा भासू लागला तेव्हा आतील परदेशी मुसलमानांनी ठरविले की त्याच्या कुटुंबीय मंडळींचे रक्षण [२] (४४३) करण्यासाठी किल्ल्यामध्ये जेवढी जरूर असतील तेवढी माणसे ठेवावीत आणि उरलेल्यांनी किल्ल्याच्या बाहेर पडून शत्रूवर तुटून पडावे. त्यांना असे वाटले की लढत लढत शत्रूची फळी फोडून त्यांनी बाहेरचा मार्ग गाठला तर राजधानीला पोहोचणे त्यांना शक्य होईल. राजधानीला पोहोचल्यावर एकंदर घडलेली खरी हकीकत मग त्यांना सुलतानाच्या कानावर घालता येईल. दक्षिणी मुसलमानांना परदेशी मुसलमानांचा मनसुबा जेव्हा समजला तेव्हा या मनसुब्यांत ते यशस्वी झाले तर त्याच्या होणाऱ्या भयंकर परिणामांची त्यांना भीती वाटली कारण त्यांना अशी खात्री होती की परदेशी मुसलमान प्राणपणाने लढतील आणि त्यांच्यापैकी कदाचित काहीजण दरबारामध्ये निसटून जाण्यात यशस्वी होतील. असे झाल्यास दक्षिणी मुसलमानांनी जे भयंकर कपटपूर्ण वर्तन केले होते ते ताबडतोब उघडकीस येईल. तेव्हा दक्षिणी मुसलमानांनी अशा एका युक्तीचा अवलंब करण्याचे ठरविले की परदेशी मुसलमानांवरील त्यांची पकड मजबूत होऊन ते पूर्णपणे त्यांच्या कह्यात येतील. हा हेतू सिद्धीस जावा म्हणून त्यांनी किल्ल्यामधील परदेशी मुसलमानांकडे एक निरोप पाठविला तो असा : आपण सर्वजण त्या पैगंबराचे अनुयायी आहोत. तुम्ही सर्वजण सय्यद आहात. तुमच्यावर व तुमच्या बायका आणि मुले यांजवर जी दुर्दैवाची कुऱ्हाड कोसळली आहे त्याबद्दल आम्हाला अतिशय अनुकंपा वाटल्यामुळे आम्ही सुलतानापाशी त्याने तुम्हाला क्षमा करावी यासाठी तुमच्या वतीने रदबदली केली. सुलतानाने सरतेशेवटी आमचे विनंती अर्ज मान्य केले आणि असा हुकूम दिला की तुम्हा सर्वांना तुमच्या कुटुंबियांसमवेत आणि मालमत्तेसहित कोणताही अपाय न केला जाता आपल्या राज्याच्या सरहद्दीबाहेर पडण्याची मुभा देण्यात यावी. दक्षिणी अधिकाऱ्यांनी आपल्या म्हणण्याच्या प्रामाणिकपणाची ग्वाही देण्यासाठी सुलतानाची सही वठविलेला

एक हुकूम आपले हेतू साध्य व्हावे म्हणून सादर केला. शेरउल्मुल्क दक्कनी आणि निजामउल्मुल्क यांनी याजीदप्रमाणे ११८ □ परमेश्वराच्या नावे कुराणावर हात ठेवून आणि पैगंबराला साक्ष ठेवून आम्ही तुमच्या जिवाला अथवा मालमत्तेला कोणत्याही प्रकारे धोका देणार नाही अशा शपथा घेतल्या.

(१८९) चाकणच्या किल्ल्यात अदमासे २५०० परदेशी मुसलमान होते. त्यांपैकी १२०० जण उच्च कुलात जन्म पावलेले सय्यदांच्या वंशातील होते. त्या सर्वांनी वरील दोघा दक्षिणी अधिकाऱ्यांनी गंभीरपणे घेतलेल्या शपथांवर विसंबून किल्ला खाली केला. आपली बायका आणि मुले यांसहित ते सर्वजण किल्ल्यातून बाहेर पडले. बायका, मुलांना घेऊन जाण्यासाठी वाहनांची व्यवस्था करणे सुकर जावे म्हणून त्यांनी तेथून थोड्याच अंतरावर मुक्काम केला. दक्षिणी अधिकाऱ्यांनी जेमतेम तीन दिवस दिलेली वचने पाळली. या काळात परदेशी मुसलमानांचा [ २ ] ( ४४४ ) विश्वास संपादन करण्यासाठी त्यांनी हरतऱ्हेने प्रयत्नांची पराकाष्ठा केली आणि त्यांच्या मनातील संशय नाहीसे करून त्यांची मन दुसरीकडे गुंतविण्याचा प्रयत्न केला. त्यासाठी वारंवार त्यांनी त्यांच्या गाठीभेटी घेतल्या आणि आपल्यातर्फे त्यांना मदत करण्याची आश्वासने दिली. चौथ्या दिवशी दक्षिणी मुसलमानांनी परदेशी मुसलमानांवर दडपण आणून त्यांना किल्ल्यात मेजवानीसाठी येण्याचे आमंत्रण स्वीकारणे भाग पाडले. या मेजवानीला एकंदर ३०० भरतील एवढ्या संख्येने प्रमुख प्रमुख परदेशी ११९ □ मुसलमान गेले. याला अपवाद म्हणजे कासीम बेग ( सफ शिकन ), कुरीखान कुर्द आणि मक्‍चा अहमद बेग हे होते. ही सर्व मंडळी भोजन करीत असताना बरीचशी सशस्त्र मंडळी शेरउल्मुल्क याने खुणावल्यावरून त्यांच्यावर घसरून पडली आणि त्यांच्यापैकी प्रत्येकाला त्यांनी कंठस्नान घातले. त्याचवेळी किल्ल्याच्या बाहेर असलेल्या ४००० दक्षिणी सैनिकांनी परदेशी मुसलमानांच्या छावणीवर हल्ला चढवून त्यांच्यापैकी प्रत्येक पुरुषाला ठार मारले. या कत्तलीत त्यांनी अंगावर पिणाऱ्या लहान बालकांवर देखील दयामाया दाखविली नाही. या भयानक शोकान्तिकेनंतर त्यांनी त्यांची छावणी लुटून फस्त केली. कामांधता अथवा क्रौर्य यामुळे माणूस जितका नीच बनू शकेल तितक्या नीचपणे दक्षिणी मुसलमानांनी परदेशी मुसलमानाच्या जनान्यांची सर्वप्रकारे विटंबना केली. हुसेनच्या वेळेपासून तो या वेळेपर्यंत सय्यदांना अशा प्रकारची वाईट वागणूक कधीच देण्यात आली नव्हती. परंतु जे लोक आपण महमद पैगंबराच्या सेवकगणांपैकी आहोत असे म्हणत फिरतात त्या लोकांनीच त्यांच्या वंशजांना अशा तऱ्हेने १२० ★ हलकटपणाने वागवावे हे खरोखरीच विस्मयजनक नाही का ?

(१९०) कासीम बेग आणि इतर मोगलांनी त्यांच्या दुर्दैवी सहकाऱ्यांची कत्तल झाली त्या घटना स्थळापासून २ मैलांवर छावणी दिली होती. त्यांच्या कानावर जेव्हा हा हलकल्लोळ गेला तेव्हा ते तावडतोब शस्त्रसज्ज झाले. आपल्या जवळील बायकामंडळींना देखील त्यांनी सैनिकाप्रमाणे पोषाख देऊन घोड्यावर स्वार केले

आणि राजधानीच्या दिशेने पळ काढला. शेरउल्मुल्क याने ताबडतोब दाऊदखानाच्या हाताखाली २००० घोडेस्वार त्यांच्या पाठलागावर रवाना केले. मार्गातील सर्व जमीनदार आणि शेतकरी यांना त्याने लिहून कळविले की राजधानीकडे जाणाऱ्या परदेशी मुसलमानांना बंडखोर म्हणून तुम्ही पकडा अथवा त्यांची कत्तल करा. तुम्ही तसे न केल्यास सुलतानाची गैरमर्जी तुम्ही तुमच्यावर ओढवून घ्याल. परदेशी मुसलमानांपैकी कासीम बेगजवळ फक्त ३०० अनुचर होते. त्याने मात्र न थांबता अविरत दौड चालू ठेवली परंतु दक्षिणी सैनिक अगदी जवळ येऊन [ २ ] ( ४४५ ) ठेपल्यावर त्यांच्यावर तो हल्ला करून त्यांना उधळून लावी. असे त्याला अनेकदा करावे लागले आणि असे करण्यात त्याने आपले प्राण पणाला लावून शौर्याची पराकाष्ठा केली. रात्रीचा वेळ तो उघड्या मैदानात मुक्काम करून घालवीत असे. अशा तऱ्हेने काही दिवसपर्यंत त्याने राजधानीच्या दिशेने मजल मारली. अखेर सरतेशेवटी बीड शहरानजीक दाऊदखान हा त्याच्या अगदी नजीक येऊन पोहोचला आणि त्याने जवळ-जवळ त्याला घेरले. दाऊदखानाने बीडचा जहागिरदार हसनखान याला आपल्या मदतीस बोलाविले होते. ह्या सरदाराला विजयनगरवरील एका मोहिमेत कासिमबेग याने फार मोठ्या संकटातून वाचविले होते. त्याने आता त्या गोष्टीची परतफेड म्हणून कासिम-बेगला मदत करण्याचे ठरविले. त्याप्रमाणे त्याने दाऊदखानाला सांगितले की मोगल हे बंडखोरी करतील हे मला तरी अशक्य कोटीतले वाटते कारण ते आपणहून झपाट्याने कूच करीत राजधानीच्या दिशेने चालले आहेत. याच वेळी दाऊदखानाला शेरउल्मुल्क हा स्वतः जातीने येऊन मिळाला. त्याच्याबरोबर आणखी १५०० सैनिकांची एक तुकडी होती. या फौजेसह त्यांनी मोगलांवर हल्ला चढविला. आपल्या जीवाची बाजी करून कासिमखान आणि त्याच्या अनुयायांनी प्रतिकार केला. पहिल्याच सपाट्याला नशिबाने खैर केली म्हणून दाऊदखान बाण लागून मारला गेला. दाऊदखानाच्या मृत्यूने दक्षिणी मंडळींना सूडाच्या भावनेने अधिकच पेटविले. मोगलांवर त्यांची मात होणार असा रंग दिसू लागला. अगदी याच क्षणी हसनखान त्यांच्या मदतीस धावून आला. त्याचा मारा असह्य होऊन दक्षिणी मंडळींनी आपल्या पुढाऱ्याच्या मृत देहाला बरोबर घेऊन चाकणच्या दिशेने माघार घेतली. दैवाचा आघात शूरपणाने सहन करणाऱ्या परदेशी मंडळींना घेऊन हसनखान हा आपल्या वाड्यात आला. हसनखानाने कृपावंत होऊन त्यांना भरपूर दाणागोटा आणि रसद पुरविली. त्याचप्रमाणे हसनखानाने सुलतानाकडे परदेशी मुसलमानांच्या वतीने निवेदने सादर केली. सुलतानाने उत्तरादाखल कासिम-बेगला आज्ञा केली की तुम्ही आणि तुमचे अनुयायांनी ताबडतोब दरबारात हजर होण्यासाठी निघून यावे.

(१९१) त्याप्रमाणे ही सर्व मंडळी राजधानीत आल्यावर अल्लाउद्दीन शहाने त्यांना आपल्या समक्ष येण्याचा हुकूम दिला. त्यानंतर त्याने एकंदर सर्व [ २ ] ( ४४६ ) प्रकरणाची कसून छाननी केली. त्याच्या विश्वासघातकी मंत्र्यांच्या वर्तनामुळे तो अतिशय

क्रोधाविष्ट झाला आणि या विश्वासाचे जे जीवघेणे परिणाम झाले त्याबद्दल त्याने आपल्या स्वतःलाच दोष लावून घेतला. मुस्तफाखानाने सय्यदांच्याकडून आलेली पत्रे त्याच्या नजरेस न येण्याची खबरदारी घेतली होती. सुलतानाने आपल्या समक्षच मुस्तफाखानाचा शिरच्छेद करण्यात यावा आणि सार्वजनिक रस्त्यांवर त्याच्या मृत देहाचे प्रदर्शन करण्यात यावे असा हुकूम दिला. त्याने कासिमबेगची दौलताबाद आणि जुन्नरच्या सरकारावर नेमणूक केली. मृत मलिक उत्तुज्जार हा जे मानमरातब आणि ज्या मानसन्मानाला पात्र होता त्या सर्वांची त्याने कासिमबेगवर खैरखैरात केली. त्याचप्रमाणे सुलतानाने कासिमबेगच्या सर्व अनुयायांना लष्करात दर्जाच्या जागा दिल्या आणि लष्करात मोगलांची भरती नव्याने करण्याचा व अशा तऱ्हेने भरती केलेले सैनिक कासिमबेगच्या अनुयायांच्या हाताखाली देण्याचा हुकूम दिला. त्याने निजामउल्मुल्क आणि शेरउल्मुल्क यांची घरेदारे आणि मालमत्ता आपल्या स्वतःच्या उपयोगासाठी सरकारजमा केली. त्या दोघांना आणि त्यांच्या सर्व चढाईखोर साथीदारांना अनवाणी चालत आणि जड साखळदंडाने भारावलेल्या अशा परिस्थितीत राजधानीकडे घेऊन येण्याबद्दल फर्माविले. सय्यदांवर पहिल्या प्रथम आरोप करणारी बनावट पत्रे ज्यांनी तयार करण्यात भाग घेतला होता त्या सर्वांना त्याने वेगवेगळ्या उपायांचा अवलंब करून ठार मारले. त्यांच्या मुलाबाळांकडून त्यांच्या जहागिरी त्याने काढून घेतल्या आणि त्यांना एका वेळचे जेवण मिळण्याचीही मुष्किल करून अन्नाला मोताद करून सोडले. तबकाते महमूदशाही या ग्रंथाप्रमाणे वरील घटना घडली त्याच वर्षी शेरउल्मुल्क आणि निजामउल्मुल्क यांना महारोगाने ग्रासले आणि त्यांची मुलेबाळे समाजाने बहिष्कृत केलेल्या समाजकंटकांत हलकट मार्गांचा अवलंब करून पोटाची खळगी भरण्याकरिता रस्तोरस्ती भटकू लागली. [१२१*]

(१९२) या वर्षी म्हणजे इ. स. १४५३ साली सुलतानाचा [२] (४४७) भूतपूर्व शिक्षक शेख आजरी याने त्याला खुरासाणहून एक लांबलचक उपदेशपर असे पत्र लिहिले. सुलतान तरुण वयाचा असताना त्याला शेख आजरी याच्याबद्दल अतिशय आदर वाटत असे. हे पत्र वाचल्यानंतर सुलतान अतिशय भारावून गेला. परिणामी त्याने यापुढे आपण दारू पिणार नाही अशी मनःपूर्वक प्रतिज्ञा केली. त्याने शेख आजरींच्या पत्राला आपल्या हातच्या मजकुराचे पत्र लिहिले आणि परत भेट म्हणून त्याच्याकडे अतिशय मौल्यवान नजराण्याच्या वस्तू रवाना केल्या. सुलतानाने अतिशय जारीने अहमदशहाने घालून दिलेल्या प्रथा आणि केलेले कायदेकानू अमलात आणण्यास सुरुवात केली. त्याचप्रमाणे राज्याच्या कारभाराकडे तो नियमितपणे लक्ष पुरवू लागला. आणि विश्वासाच्या सर्व जागांवरून त्याने दक्षिणी मंडळींना दूर केले.

(१९३) हिजरी ८५९ इ. स. १४५४ } हिजरी ८५९ या वर्षी सुलतानाच्या पायाला अतिशय धोकादायक असे गळू झाले. सुप्रसिद्ध अशा शस्त्रवैद्यांच्या कौशल्यानेही या आजारापुढे हार खाल्ली. साहजिकच सुलतानाला

आपल्या राजवाड्यातील खाजगी निवासस्थानामधून बाहेर पडणे अशक्य होऊन गेले. राज्याच्या प्रांतोप्रांती वारंवार सुलतानाचा मृत्यू झाल्याच्या बातम्या फैलावू लागल्या. यामध्ये सुलतानाचा मेव्हणा जलालखान याला सुलतान मेला असल्याची खात्रीलायक बातमी कोणीतरी दिली. जलालखान हा नवलगुंड सरकारच्या सुभेदारीवर होता. त्याने आजूबाजूचे अनेक जिल्हे बळकावून ताब्यात घेतले. या जिल्ह्यांचा ताबा त्याने आपला मुलगा सिकंदरखान याजकडे दिला. सिकंदरखान हा मृत सुलतान अहमदशहाचा (आईच्या बाजूकडून) नातू होता. [१२२] याच सुमारास तेलंगणाचा सुभेदार खान आजम हा मरण पावला. सुभेदारीचा ताबा घेण्यालायक योग्य ते वजन असलेला असा अधिकारी त्यावेळी त्याठिकाणी नव्हता. त्यामुळे साहजिकच त्या प्रांताच्या सर्व अधिकाऱ्यांनी सिकंदरखानाच्या सत्तेपुढे मान तुकवली.

(१९४) अल्लाउद्दीन शहाला यावेळी जरी तापाने अतिशय बेजार केले होते तरी देखील बंडखोरांचा बिमोड करण्यासाठी त्याने कूच करून जाण्याची तयारी केली. ते ऐकल्यानंतर जमालखान आणि सिकंदरखान यांनी असे ठरविले की जमालखानाने तेलंगणातच राहावे आणि सिकंदरखानाने माहूरच्या दिशेने कूच करावे. असे केल्याने सुलतानाच्या फौजेचे लक्ष द्विधा करणे सुलभ जाईल असा विचार त्यांनी [२] (४४८) केला. सुलतानाने बंडखोरांकडे निरोप पाठविला की तुम्ही जर शस्त्रे खाली ठेवून शरण याल तर तुम्हाला क्षमा केली जाईल. यापूर्वी एका प्रसंगी राजपुत्र महमदखान याने जे बंड केले होते तेव्हा सिकंदरखान हा राजपुत्राला जाऊन मिळाला होता. त्याचप्रमाणे सुलतानाचे अनेक अपराध करून त्याच्या रोषाचाही तो धनी झालेला असल्यामुळे सुलतानाच्या वचनावर विश्वास ठेवून शरण जाण्याचे त्याने नाकारले. इतकेच नव्हे तर माळव्याचा सुलतान महमूद खिलजी याच्याकडे त्याने निवेदन सादर केले की अल्लाउद्दीन शहा मरून गेल्याला आता बराच काळ लोटला आहे. परंतु त्याच्या मंत्र्यांनी अल्लाउद्दीन शहा अजून जिवंत आहे अशी खोटी भलावणी करून राज्याच्या सर्व प्रमुख अमीरउमरावांचा नाश करण्याचा आणि आपापसात राज्याची वाटणी करून घेण्याचा कट रचला आहे. अशा परिस्थितीत आपण जर मनावर घेतले तर तलवारीचा एक घावही न घालवता वऱ्हाड आणि तेलंगण हे प्रांत आपल्या हातात पडतील. महमूद खिलजीच्या महत्त्वाकांक्षेला उजाळा देणाऱ्या या अभिवचनावर महमूद खिलजीने विश्वास ठेवला आणि हिजरी ८६० या वर्षी खानदेशच्या सुलतानाबरोबर संगनमत करून त्याने दक्षिणेकडे कूच केले. त्यांना सामोरा जाण्यासाठी सिकंदरखान हा १००० सैनिकांची तुकडी घेऊन निघाला होता तो त्यांना जाऊन मिळाला.

हिजरी ८६०<br>इ. स. १४५५

(१९५) या घटनेची बातमी जेव्हा अल्लाउद्दीन शहा याला लागली तेव्हा त्याने तेलंगणावर स्वतः चालून जाण्याच्या आपल्या बेतात बदल केला. त्या प्रांतावर चाल करून जाऊन जलालखानावर हल्ला करण्यासाठी त्याने ख्वाजा महमूद गिलानी

( हा सामान्यपणे ख्वाजा महमूद गावान म्हणून ओळखला जात असे ) याची त्याच्या हाताखाली बरेच मोठे सैन्य देऊन नियुक्ती केली. याच वेळी त्याने वऱ्हाडचा सुभेदार खान जहान याला खानदेशाच्या सुलतानाच्या हालचालींवर लक्ष ठेवण्याचा आदेश दिला तर दौलताबादचा सुभेदार कासिमबेग याने निरीक्षणाचे काम [ २ ] ( ४४९ ) करण्यात तरबेज असलेल्या एका तुकडीला१२३० बरोबर घेऊन माळव्याच्या सुलतानाच्या आधिपत्याखाली असलेल्या फौजेच्या दिशेने कूच केले. त्याच्या पाठोपाठ १० मैल एवढ्या अंतरावर दक्षिणचा सुलतान अल्लाउद्दीन हा मुख्य सैन्यासह निघाला. सुलतानाच्या फौजेत मुख्यतः विजापूर विभागातील सेनाविभागाचे सैनिक होते.

( १९६ ) हे पाहिल्यानंतर माळव्याचा सुलतान महमूद याची खात्री पटली की दक्षिणचा सुलतान अजून हयात आहे आणि तो आपल्याविरुद्ध प्रत्यक्ष चाल करून येत आहे. तेव्हा त्याने आपल्या बहुसंख्य सैन्यासह माघार घेतली. त्याने पाठीमागे आपला एक अधिकारी सिकंदरखानाला मदत करण्याच्या मिषाखाली ठेवला. परंतु या अधिकाऱ्याला त्याने गुप्तपणे अशा सूचना देऊन ठेवल्या की जर कदाचित दक्षिणी फौजेला जाऊन मिळण्याचा सिकंदरखानाने प्रयत्न केला तर सिकंदरखानाला कैद करावे आणि त्याच्या सर्व संपत्तिसह कैदी म्हणून मांडूला घेऊन यावे. सिकंदरखानाला या सर्व बेताची वेळीच खबर मिळाली तेव्हा त्याने बरोबर २००० अफगाण आणि रजपूत सैनिकांना घेऊन माळव्याच्या फौजेतून पळ काढला आणि तो नवलगुंडला येऊन पोहोचला. या सुमारास ख्वाजा महमूद गावान हा नवलगुंडला वेढा देण्याच्या बेतात होता. यानंतर थोड्याच काळाने सिकंदरखानाने किल्ला गावानच्या स्वाधीन केला. आपल्याला गुन्ह्याची पूर्णपणे माफी करण्यात यावी अशी अट मात्र त्याने घातली. ख्वाजा महमूद गावान याच्याबरोबर तो दरबारात येऊन दाखल झाला तेव्हा सुलतानाने फिरून त्याच्यावर आपली कृपादृष्टी केली आणि नवलगुंड पुन्हा त्याच्या ताब्यात सुपूर्द केले. सुलतानाने फखरउल्मुल्क तुर्क याच्याकडे माहूरच्या जिल्ह्याचा राज्यकारभार पाहण्याचे काम सोपविले आणि फखरउल्मुल्क याला माहूरच्या शिबंदीचा अधिकारी नेमले. नंतर सुलतान राजधानीला परत फिरला. तेथे हिजरी ८६२ या

हिजरी ८६२ ) वर्षी सुलतानाच्या पायाला झालेले गळू विकोपाला जाऊन सडले.
इ. स. १४५७ ) या दुखण्यातच त्याने या दिखाऊ जगताचा त्याग करून त्या चिरंतन जगाकडे प्रयाण केले. त्याची एकंदर कारकीर्द २३ वर्षे, ९ महिने आणि २० दिवस झाली.

( १९७ ) असे म्हणतात की अल्लाउद्दीन शहाचे अंगी वक्तृत्वशक्ती होती. त्याचप्रमाणे तो अतिशय विनोदी असून त्याला शिकण्याची अतिशय [ २ ] ( ४५० ) हौस होती. कधीकधी तो राजधानीतल्या मोठ्या मशिदीच्या व्यासपीठावर शुक्रवारी आणि सुटीच्या दिवशी चढून जाई आणि स्वतः खुत्ब्याचे वाचन करी. खुत्बा वाचताना तो स्वतःचा उल्लेख पुढील बिरुदावली वापरून करीत असे. ' परमेश्वराच्या सेवकांवर

कृपादृष्टीची खैरात करणारा, न्यायी, दयाळू आणि सहनशील, ऐहिक आणि धार्मिक बाबतीत पुढारी असलेला आणि सुलतानामध्ये नावाजलेल्या अशा अहमदशहावली बहमनीचा मुलगा '. एकदा असे झाले की एका अरबी व्यापाऱ्याने सुलतानाच्या उपयोगासाठी काही घोड्यांची विक्री केली. सुलतानाच्या गृहव्यवस्थापक अधिकाऱ्याकडून त्या व्यापाऱ्याचे पैसे देण्यात दिरंगाई झाली. हा व्यापारी वरील खुत्बावाचनाच्या वेळी हजर होता. त्याने जेव्हा सुलतानाने स्वतःला लावलेली बिरुदावली ऐकली, तेव्हा त्याच्या बाबतीत जो अन्याय झाला होता त्यामुळे तो अगोदरच चिडला होता आणि नुकतीच निरपराधी सय्यद मंडळींची जी निर्घृण कत्तल झाली होती त्यामुळेही तो अतिशय संतापला होता. तो अतिशय मोठ्या आवाजात म्हणाला की महाराज आपण म्हणता त्याप्रमाणे आपण न्यायी नाही, की कृपाळू नाही की सहनशील देखील नाही. आपण स्वतःला उदार म्हणविता ते आपण उदारदेखील नाही. तर पैगंबराच्या वंशजांची निर्घृण कत्तल करणारे क्रूर आणि बेगडी असेच आपले वर्णन करावे लागेल, आणि इतके करूनही इस्लामच्या सच्चा अनुयायांच्या व्यासपीठावर उभे राहून अशा तऱ्हेच्या बढाईखोर पदव्या स्वतःच्या नावापाठीमागे लावून घेण्याचे [१२४□] धाडस आपण दाखवावे ही मोठ्या नवलाची गोष्ट आहे. हे ऐकल्यावर सुलतानाला अतिशय पश्चात्ताप झाला आणि त्याने त्या व्यापाऱ्याला ताबडतोब त्या जागी पैसे देण्यात यावे असा हुकूम दिला. त्यावेळी सुलतानाने असे उद्गार काढले की ज्यांनी माझ्या कीर्तीला कलंक लावला आहे त्यांची परमेश्वराच्या क्रोधातून कधीही सुटका होणार नाही. इतके झाल्यानंतर सुलतान राजवाड्याकडे परत फिरला. त्यानंतर त्या मशिदीत त्याने पुन्हा प्रवेश केला नाही आणि जेव्हा प्रवेश केला ते त्याच्या मृत देहाचे त्या मशिदीत दफन करण्याच्या वेळीच. आपण आता मरणार हे जेव्हा सुलतानाने ओळखले तेव्हा त्याने सर्व दरबारी मंडळींच्या इच्छेला न जुमानता आपला मुलगा हुमायून याला आपला वारस नेमले. त्याच्या क्रूर आणि [२] (४५१) रक्तपिपासू स्वभावाची दरबारी मंडळींना अतिशय दहशत वाटत असे. त्यामुळे हुमायून गादीवर आल्यानंतर त्याच्या हुकूमशाहीपासून आपला बचाव व्हावा म्हणून अल्लाउद्दीन शहाच्या मृत्यूच्या अगोदरच अनेक अमिरांनी गुजरातच्या राज्याकडे पळ काढला [१२५*]

## [१२६*] हमायूनशहा जालीम बहमनी [२] (४५२)

(१९८) जेव्हा अल्लाउद्दीन शहा आपले शेवटचे क्षण मोजीत पडला होता तेव्हा राजपुत्र हुमायून आपल्या राजवाड्यातच होता. अमीर मंडळींपैकी दोन सुप्रसिद्ध अमीर सैफखान आणि मल्लूखान यांनी सुलतानाच्या मृत्यूची बातमी गुप्त ठेवली आणि त्याचा सर्वांत लहान मुलगा हसनखान याला गुप्तपणे सिंहासनावर बसविले. त्यांच्या या बेतात त्यांना हबीबउल्ला [१२७□] आणि इतर काही अधिकारी सामील झाले. सैफखान आणि मल्लूखान यांनी रचलेला बेत म्हणजे त्यांना एखाद्या

अनपेक्षित पर्वणीसारखाच वाटला. बंडखोरांच्या एका तुकडीने आता [ २ ] ( ४५३ ) हुमायूनशहाच्या राजवाड्यात लुटालूट करण्यासाठी आणि त्याला कैद करण्यासाठी म्हणून कूच केले. हुमायून याने मोठ्या निर्धाराने या हल्ल्याचा प्रतिकार केला आणि बंडखोरांना माघार घेण्यास भाग पाडले. त्याने बंडखोरांचा शाही निवासस्थानापर्यंत पाठलाग केला. वाटेमध्ये माहूत, पर्दादार, [१२८] □ शिलेदार आणि शरीररक्षक वगैरे मंडळी, गृहव्यवस्था खात्यातील इतर काही मंडळींसह हुमायून याला जाऊन मिळाली. सुलतानाचा नाश करण्याचा जो पूर्वनियोजित कट झाला होता त्याची त्यांना काहीच कल्पना नव्हती. साहजिकच त्यांच्या मदतीने कोणताही प्रतिकार न होता हुमायूनने दरबाराच्या भव्य दिवाणखान्यात प्रवेश केला. त्याने आपल्या घाबरलेल्या आणि थरथर कापत असलेल्या सिंहासनावर बसलेल्या आपल्या भावाला पकडले. त्याच्याऐवजी हुमायून आता सिंहासनावर चढून बसला. यानंतर कसलाही प्रतिकार वा विरोध न होता सर्वांनी सुलतान म्हणून त्याला मान्यता दिली. या झटपट प्रत्यक्षात आणलेल्या उपाययोजनेनंतर हुमायूनने या सर्व कटापाठीमागचा सूत्रधार सैफखान याला पकडले आणि त्याला हत्तीच्या पायाला साखळदंडाने बांधून सर्व शहरातून त्याला फरफटत नेण्याचा हुकूम फर्माविला. त्याचा साथीदार हबीबउल्लाव त्याचप्रमाणे राजपुत्र हसनखान या दोघांना त्याने बंदिस्त केले आणि हसनखानाचे डोळे काढण्याची आज्ञा त्याने केली. [१२९] □

( १९९ ) यानंतर आपल्या बापाने प्रकट केलेल्या इच्छेप्रमाणे त्याने वकील उस सलतनत या अधिकाराच्या जागेवर ख्वाजा महमूद गावान [१३०] * याची नेमणूक केली. त्याने त्याला मलिक उत्तुज्जार हा किताब दिला आणि विजापूरचे सरकार त्याच्याकडे सोपविले. आपण चेंगीजखानाचे वंशज आहो असे सांगणारा मलिकशहा नावाचा अधिकारी होता. त्याची तेलंगणामध्ये जहागिरी होती. त्याला हुमायूनशहाने तेलंगणाच्या प्रांताचा सुभेदार नेमले. त्याचप्रमाणे त्याला ख्वाजाजहान ही पदवी दिली आणि एक हजार स्वारांच्या मनसबीचा अधिकार त्याच्याकडे सुपूर्द केला. इमादउल्मुल्क घोरीचा पुतण्या दरबारातला एक नावाजलेला असा तरुण [ २ ] ( ४५४ ) अमीर होता. त्याला सुलतानाने निजामउल्मुल्क ही पदवी दिली. हुमायूनशहा हा सिंहासनावर येण्याचे अगोदर जलालखानाचा मुलगा सिकंदरखान हा हुमायूनशहाचा आवडता सवंगडी होता. तेलंगणाच्या सरकारावर त्याची नेमणूक न झाल्यामुळे त्याची मोठी निराशा झाली आणि त्याने बादशहाचा निरोप देखील न घेता दरबार सोडला. [१३१] □ तो नवलगुंड येथे आपल्या बापाला जाऊन मिळाला आणि त्याने सैन्याची जमवाजमव करण्यास सुरुवात केली.

( २०० ) हुमायूनशहाने यत्किंचितही वेळ न घालविता वऱ्हाडचा सुभेदार खान जहान याला सिकंदरखानाच्याविरुद्ध पाठविले. खान जहान हा हुमायूनशहाचे त्याच्या राज्यारोहणाबद्दल अभिनंदन करण्यासाठी आला होता. परंतु खान जहानचा

पराभव झाल्यामुळे त्याने बंडखोरांवर खुद्द स्वतःच चाल करून जाणे जरूर आहे असा विचार केला. हुमायूनशहाला अशीही आशा वाटली की आपण खुद्द नवलगुंडच्या आसमंतात जाऊन पोहोचलो की जलालखान आणि सिकंदरखान यांना आपली चूक कळून येईल आणि ते शरण येतील. परंतु याबाबत त्याने ज्या अपेक्षा मनाशी धरल्या त्यात मात्र त्याच्या पूर्णपणे निराशा पदरी पडली. कारण सिकंदरखानाने सुलतानाच्या छावणीवर रात्री अचानक हल्ला केला. त्यात त्याला थोडेफार यश आले. परिणामी दुसऱ्या दिवशी तो किल्ल्याला वेढा घालण्यास उद्युक्त झाला. सिकंदर-खानाबद्दल त्याच्या सैनिकांना आत्मीयता वाटत होती. त्याचे सैनिकदेखील अतिशय शूर होते. या दोन्ही गोष्टींवरच सिकंदरखानाची मोठी मदार होती. त्या जोरावर आठ हजार दक्षिणी आणि रजपूत सैन्याबरोबर युद्ध करण्यासाठी त्याने कूच केले. परंतु त्याच्याबरोबर असलेले पूर्वीचे घनिष्ठ संबंध आणि नाते हे विचारांत घेऊन सुलतानाने सिकंदरखानाकडे निरोप पाठविला की प्रत्यक्ष सुलतानाच्या विरुद्ध हातात शस्त्र घेऊन युद्धाला उभे राहण्याचे भयंकर कृत्य तुझ्याकडून जरी घडले असले तरी तुझा नाश करण्याची माझी इच्छा नाही. याउलट तुझ्या अपराधांची मी पूर्णपणे क्षमा करीन आणि दौलताबाद प्रांतातील एक जहागीर तुझ्या नावे मी करून [ २ ] ( ४५५ ) देईन. सिकंदरखानाने यावर उत्तर पाठविले की अहमदशहाचे जरी तुम्ही नातू असला तरी मीही अहमदशहाचा मुलीकडून नातूच आहे आणि म्हणून आपल्या दोघांच्या आजाच्या राज्यांत मी तुमचासारखाच भागीदार आहे. अशा परिस्थितीत तुम्ही तेलंगणावरील तुमचे सार्वभौमत्वाचे अधिकार एक सोडून तरी द्यावे किंवा युद्धाला तरी तयार व्हावे. १३२८

( २०६ ) हुमायूनशहाला या उन्मत्तपणे लिहिलेल्या पत्रातील भाषेचा अतिशय क्रोध आला आणि त्याने आपल्या मोर्चातील सैनिकांना ताबडतोब हल्ला करण्यासाठी कूच करून जाण्याचा हुकूम दिला. सुलतानाने दिलेल्या या आव्हानाला पाठ न दाखविता सिकंदरखानाने ते स्वीकारले आणि सुलतानाच्या फौजेने केलेल्या अतिशय प्रखर हल्ल्यांना तोंड देऊन वारंवार सुलतानाच्या हल्ल्यांना परतवून लावले. ही लढाई बराच काळपर्यंत चालली पण कोणाच्याच बाजूने निर्णय लागला नाही. अखेर मलिक उत्तुज्जार महमूद गावान याने विजापूरची सैन्याची तुकडी आणि ख्वाजा जहान तुर्क याने तेलंगणाची फौज यांसह शत्रूच्या उजव्या आणि डाव्या फळीवर अनुक्रमे एकाच वेळी हल्ला चढविला. या प्रखर हल्ल्याला तोंड देता न आल्याने हळूहळू बंडखोरांनी माघार घ्यावयास सुरुवात केली. बंडखोरांमध्ये उडालेला गोंधळ सुलतानाने बघितला आणि त्याने सैन्याच्या मध्यभागावरून ५०० तिरंदाज आणि ५०० भालाईत यांना आपल्या हाताखाली घेऊन वरील दोघा सेनानींचा पाठपुरावा केला. तो स्वतः हत्तीवर स्वार झाला आणि शत्रूवर जोरदारपणे तुटून पडला. सुलतानाच्या चढाईचा शत्रूने इतका कणखर प्रतिकार केला की सुलतानाचे सर्व सैनिक त्याला सोडून निघून गेले, आणि

विस्कळीत अशा अवस्थेत त्यांनी माघार घेतली. सिकंदरखानाने या परिस्थितीचा फायदा घेतला आणि आपला भाला हातात घेऊन त्याने खुद्द सुलतानावरच हल्ला चढविला. ज्या हत्तीवर हुमायून स्वार झाला होता त्या हत्तीने सिकंदरखानाला आपल्या सोंडेत धरले, घोड्यावरून ओढून काढले आणि जमिनीवर जोराने आपटले. [ २ ] ( ४५६ ) सिकंदरखानाने केलेल्या हल्ल्यात त्याला मदत करण्यासाठी पाठोपाठ त्याचे अनुयायी जोरात येत होते. त्यांना आपला वेग आवरता येईना. त्यांनी सिकंदरखानाला पायाखाली तुडविले आणि त्यांच्या पायाखाली चेंदामेंदा होऊन त्याला मृत्यू आला. आपला पुढारी मृत झाला आहे असे पाहून बंडखोरांच्या सैन्याने पळ काढला. सुलतानाने आपले सैन्य एकत्र जमविले आणि बंडखोरांचा पाठलाग लढाईच्या मैदानापासून बऱ्याच दूर अंतरापर्यंत करून त्यांची भयानक कत्तल केली.

( २०२ ) दुसऱ्या दिवशी सुलतानाने नवलगुंडच्या वेढ्याला सुरुवात केली. वेढा आठवडाभर चालला आणि शरणागतिशिवाय दुसरा मार्ग नाही हे जलालखानाने बघितले आणि आपण शरण येण्यास तयार आहे हे सुलतानाकडे कळविले. मलिक उततुज्जार आणि ख्वाजा जहान यांच्या मध्यस्थीने जलालखानाला सुलतानाने क्षमा केली. जलालखानाने सुलतानाच्या पायाशी लोळण घेतली आणि चाळीस वर्षांच्या आपल्या उच्च पदाच्या आणि फायदेशीर चाकरीत कमावलेली सर्व संपत्ती त्याने सुलतानाला अर्पण केली. सुलतानाने त्याला जीवदान देऊन एका किल्ल्यात बंदिवासात ठेवले. तेथेच तो आपले अखेरपर्यंतचे दिवस मोजीत राहिला.

( २०३ ) नवलगोंड्याचा पाडाव झाल्यानंतर हुमायूनशहाने देवरकोंडा किल्ला जिंकून घेण्याचा मनसुबा रचला. हा किल्ला तेलंगणाच्या जमीनदाराच्या ताब्यात होता. त्याने सिकंदरखानाला सर्वतोपरी साहाय्य केले होते. ही योजना फलद्रूप व्हावी या हेतूने त्याने ख्वाजा जहान आणि निजामउल्मुल्क यांना अलग केले आणि तो स्वतः वरंगळवर चाल करून गेला. तेलंग्यांनी एकोप्याने रणांगणावर बहमनींबरोबर अनेकवार लढाया दिल्या. पण प्रत्येकप्रसंगी ख्वाजा जहानने त्यांचा पराभव केला. अखेर त्यांनी किल्ल्यामध्ये माघार घेतली. किल्ल्याला सर्व बाजूंनी बहमनींच्या सैन्याने सक्त वेढा दिला. किल्ला जरी उंच डोंगरपठारावर आणि भयानक जंगल प्रदेशात बांधलेला होता तरी बहमनी सैन्याने त्याची पर्वा केली नाही. तेलंग्यांनी या परिस्थितीत ओरिसाच्या रायाकडे मदतीसाठी विनंती केली. त्याला त्यांनी मोठ्या द्रव्याचे आमिष दाखविले. त्याचा मोह पडून त्याने बरीच मोठी फौज बरोबर अनेक लढाऊ हत्ती देऊन तेलंग्यांच्या मदतीसाठी पाठविली. आपले सर्व सैन्य घेऊन जलद गतीने कूच करून येण्याचे [ २ ] ( ४५७ ) आश्वासनही त्याने दिले. तेलंग्यांना या आश्वासनामुळे जोर चढला आणि त्यांनी कणखरपणे आपला प्रतिकार चालू ठेवला. तेलंग्यांच्या मदतीसाठी अपेक्षित असलेली ओरिसाच्या रायाची फौज कूच करून येत असल्याची बातमी ऐकल्यावर बहमनींचे दोन्ही सेनापती गोंधळात पडले आणि त्यांना काय कारवाई करावी हेच समजेना. निजाम-

उलमुल्कने असे सुचविले की आपण वेढा उठवू आणि या डोंगरातून आणि घाटामधून कूच करून जाऊ. आपण तसे केल्यास ओरिसाच्या रायाची फौज चाल करून येत आहे तिला मैदानावर गाठून लढाई देण्याने आपली बाजू निश्चित फायद्याची ठरेल आणि आपण ओरिसाची फौज आणि तेलंगी यांच्या फौजा एकत्र येण्यास प्रतिबंध करू शकू. निजामउल्‌मुल्कच्या या योजनेला ख्वाजा जहानने आपला विरोध दर्शविला. आपली बाजू मांडताना तो म्हणाला की आपण जर वेढा उठविला तर तो भीतीच्या पोटी असे तेलंगी म्हणतील आणि आपण कूच करून जात असताना किल्ल्यातून बाहेर पडून आपल्यावर हल्ला करतील. तेव्हा माझ्या मते वेढा चालू ठेवणे आणि ओरिसाची फौज इथे तेलंग्यां-बरोबर मिळू नये म्हणून प्रतिकारासाठी तयारी करणे हाच योग्य मार्ग होय. दुसऱ्या दिवशी ओरिसाच्या फौजा येऊन ठेपल्या त्याच दिवशी तेलंगीही किल्ल्यामधून बाहेर पडले आणि दोघांनी मिळून एकाच वेळी सुलतानाच्या फौजेवर हल्ला चढविला. तेथील प्रदेशाच्या विशिष्ट भौगोलिक रचनेमुळे सुलतानाच्या घोडदळाला कोणतीच कारवाई करणे अशक्य झाले आणि परिणामी मुसलमानी फौजांना प्रचंड पराभव सोसावा लागला. रणांगणातून मोठ्या मुष्किलीने बहमनींच्या दोन्ही सेनापतींनी पळ काढला. तेलंग्यांनी ८० मैलांपर्यंत त्यांचा पाठलाग केल्यामुळे वरंगळ येथे पोहोचेपर्यंत त्यांनी मुक्काम केला नाही. आपल्या सेनापतींवर असा भयानक प्रसंग का कोसळला याच्या कारणांची हुमायूनशहाने जेव्हा चौकशी केली तेव्हा ख्वाजा जहानने आपला जीव बचाविण्यासाठी सुलतानाला खोटेच सांगितले की निजामउल्‌मुल्क याने सुचविलेली उपाययोजना मला जरी पूर्णपणे अमान्य होती तरी मी पूर्णपणे त्याच्याच सल्ल्यानुसार कारवाई केली. सुलतानाने संतापाच्या भरात १३२ अ * आणखी चौकशी न करता त्या शूर निजामउल्‌मुल्काचा वध करविला. त्याचे नातेवाईक आणि अनुयायी यांनी पलायन केले आणि [ २ ] ( ४५८ ) ते माळव्याचा सुलतान महमूद याच्या चाकरीत दाखल झाले. ख्वाजा जहानचीदेखील मानहानी करण्यात आली आणि त्याला सक्त बंदी म्हणून एका किल्ल्यावर पाठविण्यात आले.

( २०४ ) आपल्या फौजेला अपयशाचा हा जो डाग लागला होता तो धुऊन काढण्याचा हुमायूनशहाने निश्चय केला आणि त्या दृष्टीने देवरकोंड्याविरुद्ध चाल करून जाण्यासाठी ताज्या दमाच्या फौजेची जारीने तयारी करण्यात तो गुंतला. त्यावेळी राजधानीकडून त्याला खबर मिळाली की युसूफ तुर्क नावाच्या एका माणसाने आंधळा राजपुत्र हसनखान आणि शहा हबीबउल्ला यांची सुटका केली आहे आणि त्यांना घेऊन तो खानदेशच्या प्रदेशात पळून गेला आहे. हे ऐकल्यावर सुलतानाच्या सहन-शीलतेचा अंत झाला. त्याने आपला वजीर महमूद गावान याला तेलंगणाच्या रक्षणासाठी ठेवले आणि तो स्वतः झपाट्याने कूच करीत राजधानीला येऊन पोहोचला. ते वर्ष हिजरी
हिजरी ८६४ } ८६४ हे होते. तेथे पोहोचल्यावर तो संतापाने अगदी काळानिळा
इ. स. १४५९ } झाला आणि त्याचा तोल सुटला. परंतु या ठिकाणी त्याने जी क्रूर

कृत्ये केली ती नमूद करण्याच्या अगोदर त्याचे मूळ कारण काय आहे हे सांगण्याची जरुरी आहे.

( २७५ ) शहा हबीबउल्ला हा अतिशय प्रज्ञावान पापभीरू मनुष्य होता. त्याचा ओढा राजपुत्र हसनखान याजकडे असल्याने सुलतानाने त्याला बंदिवासात ठेवले होते. सुलतान ज्यावेळी सिकंदरखानाविरुद्ध नवलगुंडच्या दिशेने चाल करून गेला तेव्हा शहाच्या ७ शिष्यांनी काय वाटेल ते झाले तरी त्याची कैदेतून सुटका करण्याचा चंग बांधला होता. या कामासाठी त्यांनी युसूफ या अल्लाउद्दीन शहाच्या एका तुर्की [१३७]□ गुलामाबरोबर बोलणी सुरू केली. युसूफ याला सर्वसाधारणपणे प्रत्येकजण चाहत असे. सद्गुणी, प्रामाणिक, दयाळू आणि अतिशय [ २ ] ( ४५९ ) दानशूर म्हणून त्याची प्रसिद्धी होती; आणि त्याशिवाय तो शहा हबीबउल्ला याचा जीवश्चकंठश्च मित्र आणि शिष्यवृंदांपैकी एक होता. युसूफतुर्कने वरील शिष्यांना मदत देण्याचे कबूल केले. त्याने राजवाड्याचे काही पहारेकरी आणि रखवालदार यांना लाच देऊन आपलेसे केले. ही बंडखोरी करण्यास उद्युक्त झालेल्यांची संख्या १२ घोडेस्वार आणि ५० पायदळी सैनिक एवढ्यापुरती मर्यादित होती आणि शहा हबीबउल्ला याची सेवा करण्याप्रीत्यर्थ आपल्या प्राणांचे बलिदान करण्याचीही त्यांची तयारी होती. त्यांची योजना आता कृतीत उतरविण्यायोग्य झाली आहे असे जेव्हा युसूफला वाटले तेव्हा तो एका संध्याकाळी आपल्या मित्रांबरोबर ज्या ठिकाणी कैद्यांना बंदिवासात ठेवण्यात आले होते त्या जनानखान्याच्या फाटकाजवळ गेला. तेथील बहुतेक रक्षक गैरहजर होते परंतु जेवढे आपल्या कामावर होते त्यांनी मात्र त्याला हटकले. युसुफने उत्तर दिले की मला तुरुंगात प्रवेश करण्याची आणि अमुकअमुक गुन्हेगारांचे डोळे काढण्याची सुलतानाने आज्ञा दिली आहे. आपल्या म्हणण्याच्या पुष्ट्यर्थ त्याने सुलतानाची सही असलेला एक खोटा वटहुकूमाचा कागद सादर केला. तो कागद बघितल्यावर रक्षकानी त्याला तेथून पुढे जाऊ दिले. दुसऱ्या दरवाजाजवळ पोहोचल्यावर दुसऱ्या रक्षकाने त्याला पुढे जाऊ देण्याची परवानगी नाकारली. कारण जरी युसूफने सुलतानाची आज्ञा असलेला हुकमाचा कागद सादर केला होता तरी तुरुंगात प्रवेश मिळण्याच्या अगोदर कोतवालाचा हुकूम आणणे जरूर होते. यावर युसूफ आणि त्याचे साथीदार यांना आपले बिंग उघडकीस येणार याची भीती वाटून ते त्या रखवालदारावर तुटून पडले. त्यांनी त्याला ठार मारले आणि ते तेथून पुढे गेले. युसूफ पहिल्या प्रथम राजबंद्यांना ज्या ठिकाणी बंदिस्त ठेवले होते त्या खोल्यांकडे गेला आणि त्याने शहा हबीबउल्ला याच्या अंगातील साखळदंड काढले. तेव्हा अल्लाउद्दीन शहाचे मुलगे राजपुत्र हसनखान आणि याह्याखान आणि त्याचप्रमाणे जलालखान बुखारी [१३८]□ यांनीही त्याला आपल्या अंगावरील बेड्या काढण्याची आणि त्याच्याबरोबर घेऊन जाण्याबद्दल त्याची आर्जवे केली. युसूफने त्यांची विनंती मान्य केली. यानंतर तो प्रत्येक खोलीत गेला आणि [२] ( ४६० )

ज्यांना ज्यांना कैदेतून मुक्त होण्याची इच्छा होती त्या सर्वांना त्याने राजवाड्याच्या दरवाजाजवळ येण्याचे आणि त्याला येऊन मिळण्याचे आवाहन केले. जवळ जवळ सर्व धरातील असे ७००० दुर्दैवी बंदी याप्रमाणे आपल्या रक्षकांवर तुटून पडले आणि काठ्या अथवा जे काही हाती लागेल ते शस्त्र म्हणून बरोबर घेऊन सांगितल्याप्रमाणे ते दरवाजापाशी एकत्र झाले. या सुमारास शहराच्या कोतवालास ह्या धामधुमीची खबर मिळाली आणि तो शहराच्या रखवालदारांना घेऊन राजवाड्याच्या दिशेने चाल करून आला. परंतु तुरुंगातून सुटलेले बंदी आता जीवावर उदार झाले होते. त्यांनी आपल्यावर चालून येणाऱ्या सैनिकांवर दगड आणि लाठ्या-काठ्या यांचा जणू काही पाऊसच पाडला आणि त्यांचा हल्ला परतवून त्यांना हाकलून दिले. रात्र पडल्यावर हे सर्व बंदी शहरामध्ये निरनिराळ्या भागांत राहणाऱ्या आपल्या मित्रमंडळींकडे निघून गेले. परंतु काही प्रहराच्या आतच जवळजवळ ८० वर्षांचा वृद्ध झालेला जलालखान आणि राजपुत्र याह्याखान हे कोतवालाच्या हाती लागले. कोतवालाने त्या दोघांना ठार मारले. राजपुत्र हसनखान आणि शहा हबीबउल्ला यांनी एका न्हाव्याच्या घराचा आश्रय घेतला. तेथे त्यांनी आपल्या दाढ्या काढून टाकल्या आणि भिकाऱ्यांचा पोषाख अंगावर चढविला. शहा हबीबउल्लाने असा सल्ला दिला की हा देश सोडून जाणेच श्रेयस्कर ठरेल. परंतु राजपुत्राने खोट्या मोठेपणाच्या भरी पडून सांगितले की सर्वसामान्य जनतेला माझ्या भावाच्या क्रूर स्वभावाचा आता अगदी किळस आला आहे. त्यांना माझ्याविषयी अतिशय आपुलकी वाटते. बरेच मोठे सैन्य मला उभारता येईल अशी मला शक्यता वाटते. त्या सैन्याच्या जोरावर मी सिंहासन बळकावून घेऊ शकेन. शहा हबीबउल्लाने त्याच्या या बेतास मदत करण्याची आपली अनुमती दर्शविली. दोघांनी बिदर शहर सोडले आणि ते शहरापासून काही अंतरावर जाऊन राहिले. यानंतर राजपुत्र हसनखान याने आपले खरे रूप प्रकट केले. तेथे त्याला सगळीकडून धाडसी आणि नादान असलेली मंडळी येऊन मिळाली. या माणसांमध्ये त्याची सुटका करणारा युसूफ तुर्क हा होता. काही दिवसांतच राजपुत्राने ३००० घोडेस्वार आणि ५००० पायदळ एवढी फौज जमा केली. त्या सैन्यानिशी त्याने कामठाण्याचा तटबंदी असलेला राजवाडा आणि बाग याजकडे त्यांचा आपल्याला ताबा घेता येईल, या आशेने [२] (४६१) चाल केली. राजवाडा आणि बाग राजधानीपासून फक्त सहा मैल अंतरावर होती. परंतु पहिल्या प्रथम त्याला वाटले त्यापेक्षाही ही योजना कठीण आहे हे त्याला आढळून आले. तेव्हा त्याने बीड[१५५] शहराच्या दिशेने माघार घेतली. बीड शहर आणि आजू-बाजूचा प्रदेश यांचा त्याने ताबा घेतला आणि नवीन सैन्य भरतीचे काम त्याने चालू ठेवले. एकंदर परिस्थिती अशा तऱ्हेची असताना सुलतान हुमायून आपल्या सैन्यानिशी अहमदाबाद बिदर येथे येऊन पोहोचला,

(२०६) सुलतानाने पहिल्या प्रथम जे कृत्य केले ते शहराच्या रखवालदारांनी निष्काळजीपणा दाखविल्याबद्दल त्यांना शिक्षा करण्याचे. एकंदर रक्षक २०००

होते. त्यांना त्याने अतिशय क्रूरपणे हालहाल करून ठार मारले. शहराच्या कोतवालालाही त्याने एका लोखंडी पिंजऱ्यात कैद करून ठेवले. दररोज त्याच्या शरीराचा कोणता तरी एक भाग कापून टाकण्यात येई. सुलतान तो अवयच कोतवालाला खाण्यास भाग पाडीत असे. यामुळे थोड्याच दिवसांत कोतवाल मरण पावला. दरम्यान त्याने राजपुत्राविरुद्ध ८००० घोडेस्वार आणि पायदळ एवढी फौज रवाना केली. राजपुत्राला या फौजेविरुद्ध प्रथम यश मिळाले. ही बातमी ऐकल्यावर सुलतानाचा क्रोध त्याच्या आटोक्याबाहेर गेला. त्याने आपल्या फौजेच्या मदतीसाठी आणखी फौज रवाना केली. परंतु त्याच वेळी त्याने फौजेतील अधिकाऱ्यांच्या बायका आणि मुलांना पकडले आणि त्यांना ओलीस म्हणून ठेवून घेऊन अधिकाऱ्यांना धमकावले की जर सैन्याचा पराभव झाला किंवा तुम्ही सैन्याला सोडून राजपुत्र हसनखान याला जाऊन मिळाला तर तुमच्या बायका मुलांना ठार मारण्यात येईल.

(२०७) यानंतर दोन्ही पक्षांत झालेल्या युद्धात राजपुत्राचा सपशेल पराभव झाला. हसनखानाने कडवा प्रतिकार केल्यानंतर आपल्या अनुयायांसहित रणांगण सोडले आणि विजयनगरकडे आश्रय मिळेल या आशेने तिकडे पळ काढला. कूच करत तो विजापूरच्या किल्ल्यानजीक ८०० घोडेस्वारांसहित येऊन पोहोचला. विजापूरचा सुभेदार सिराजखान जुनैदी याने त्याच्याकडे शहरात येण्यासाठी आमंत्रण पाठवून कळविले की तुमच्या स्वाधीन मी विजापूरचा किल्ला आणि [२] (४६२) किल्ल्याच्या आधिपत्याखालील मुलूख करीन. शहा हबीबउल्ला आणि युसूफ तुर्क यांच्या सल्ल्यावरून हसनखानाने विजापूरच्या किल्ल्यात प्रवेश केला. त्यावेळी हा किल्ला फक्त मातीत बांधण्यात आलेला होता. सिराजखानाने वरवर मोठ्या सन्मानाने आणि लक्षपूर्वक वरील मंडळींचे स्वागत केले; रात्र पडल्यावर राजपुत्राला कुर्निसात करण्याच्या मिषाने तो आपल्या शिपायांसहित राजपुत्राच्या खोलीसमोर आला आणि त्याने खोलीला वेढा दिला. दुसऱ्या दिवशी त्याने आपल्या पाहुणे-मंडळींना पकडण्याचा प्रयत्न केला. त्याला प्रतिकार करताना शहा हबीबउल्ला ठार मारला गेला. सरते शेवटी राजपुत्र हसनखान, युसूफ तुर्क आणि त्याचे इतर अनुचर इतकेच नव्हे तर तंबू ठोकणारे, पखाल्ये, भंगी वगैरे सर्वांना पकडण्यात आले. त्या सर्वांची रवानगी सिराजखानाने मोठ्या कडक बंदोबस्तात अहमदाबाद बिदरकडे केली.

(२०८) हुमायूनशहा आता त्याच्या अंगी स्वभावतःच असलेल्या क्रूर प्रवृत्तींच्या आधीन पूर्णपणे गेला. क्रोधाने तो अगदी वेडापिसा झाला. त्याने राजवाड्यासमोरील चौकोनी पटांगणात अथवा बाजारपेठेत दोन्ही बाजूला मेखा ठोकण्याचा हुकूम दिला. या चौकांच्या वेगवेगळ्या भागांत त्याने पिसाळलेले हत्ती आणि रानटी जनावरे बांधण्यास सांगितले. त्याचप्रमाणे हालहाल करण्याची

साधने म्हणून चौकाच्या दुसऱ्या काही भागांत त्याने उकळत्या तेलाच्या आणि अंग भाजून टाकणाऱ्या गरम पाण्याने भरलेल्या मोठ्या कढया ठेवण्याची आज्ञा दिली. समोरचा देखावा डोळे भरून मनःपूतपणे दृष्टीस पडावा म्हणून सुलतान राजवाड्याच्या गच्चीवर चढून बसला. प्रथम त्याने आपला भाऊ हसनखान याला एका भयंकर पिसाळलेल्या वाघासमोर टाकले. त्या दुर्दैवी आणि कमनशिबी राजपुत्राचे त्या वाघाने क्षणभरातच तुकडे तुकडे केले आणि जागच्या जागीच त्याचा फन्ना उडविला. नंतर युसूफ तुर्क आणि त्याचे सात साहाय्यक यांचा सुलतानाच्या समक्ष शिरच्छेद करण्यात आला. या निरपराध आणि अगतिक झालेल्या कुटुंबातील स्त्रियांना त्यांच्या घरामधून फरफटत आणण्यात आले. राजवाड्यासमोरील चौकात गुंडांकडून त्यांची अब्रू लुटविण्यात आली आणि त्यांना इतक्या वाईट तऱ्हेने वागविण्यात आले की त्याचे वर्णन करणे देखील बीभत्सपणाचे होईल. सुलतानाने हालहाल करून ठार मारण्याच्या नव्यानव्या [२] (४६३) क्लृप्त्या शोधून काढल्या. तरुण आणि त्याचप्रमाणे वृद्ध स्त्रीपुरुषांवर त्याने इतके क्रूर आणि भयानक अत्याचार केले की जोहाक [१३६अ] आणि हुकुमशाही वृत्तीचा हिजाज [१३७अ] यांच्या कल्पनेतही या प्रकारे हालहाल करण्याच्या क्लृप्त्या आल्या नसतील. बायका आणि नोकरचाकर मिळून ७००० स्त्री-पुरुषांना, ज्यांचा या बंडाबरोबर दुरून देखील का होईना संबंध जोडता आला नसता ठार मारण्यात आले. त्याशिवाय आणखी चाकरमानी माणसे म्हणजे आचारी, भांडीवाले व इतर नोकरचाकर यांना ठार करण्यात आले ते वेगळेच. काहींना खंजिरांनी भोसकून ठार मारण्यात आले तर काहींचे कुऱ्हाडीचे घाव घालून तुकडे तुकडे करण्यात आले तर काहींना उकळते तेल अथवा अंग भाजून काढणारे गरम पाणी टाकून कातडी सोलवटून काढून मारण्यात आले. ही दुर्दैवी घटना ज्या वर्षी वरील बंड झाले त्याच वर्षाच्या शाबान महिन्यात घडून आली.

शाबान हिजरी ८६४ ऑगस्ट इ. स. १४६०

१३७अ.

(२०९) तवारीख महमूद शाहीच्या कर्त्याने पुढील हकीकत सांगितली आहे : सुलतानाच्या अनुचरांकडून मला असे कळले की सुलतानाच्या कानावर जेव्हा राजपुत्र हसन खान पळून गेल्याची बातमी पहिल्या प्रथम पडली तेव्हा त्याच्या मनावर क्रोध आणि विकार यांचा इतका पगडा बसला की त्याने आपल्या अंगावरचे कपडे फाडले, उशांना चावे घेतले आणि मधूनच अशा तऱ्हेने आपले दातओठ खाल्ले की त्यातून रक्त ठिबकू लागले. हसनखानाच्या पळून जाण्याच्या प्रकारामुळे त्याने राज्यातील निरनिराळ्या किल्ल्यांत बंदिस्त करून ठेवण्यात आलेल्या राजघराण्यातील अनेक निरपराध व्यक्तींना ठार केले. इतके करूनही त्याच्या मनातील संशयाची निवृत्ती झाली नाही. त्याच्या बेलगाम क्रौर्याला त्याच्याच दरबारातील अनेक निरपराध

व्यक्तींचा हकनाक बळी पडला. ह्या क्षणापासून हुमायूनने आपल्यावरील विचाररूपी सर्व निर्बंध साफ झुगारून दिले. इच्छेला येईल तेव्हा तो आपल्या प्रजाजनांची मुले पकडून आपल्या हलकट विकाराच्या शमनार्थ त्यांच्या वाडवडिलांपासून हिरावून घेऊ लागला. अनेकदा तो विवाहाच्या मिरवणुका रस्त्यात अडवून धरी, [२] (४६४) वधूला पकडून राजवाड्यात नेई आणि तिला संभोगून नंतर वराच्या घरी पाठवून देई. अगदी क्षुल्लक कारणावरून देखील आपल्या अंतःपुरातील कोणत्याही स्त्रीला ठार मारण्याची त्याला आदत पडून गेली होती. जेव्हा जेव्हा त्याच्या अमिरांपैकी एकाद्याला त्याच्या बरोबर जाणे भाग पडे तेव्हा त्यांची इतकी पाचावर धारणा बसे की जणू काही मृत्यूच्या मुखात आपण उडी घेण्यास जात आहोत अशा तयारीने ते आपल्या बायकामुलांचा निरोप घेत असत.

(२१०) सरतेशेवटी त्या जगन्नियंत्याने लोकांच्या हालांकडे बघून त्यांच्याकडे कृपादृष्टी वळविली आणि पिडितांच्या तक्रारीकडे लक्ष दिले. तो क्रूरकर्मा आजारी पडला आणि आता आपण मरणार हे जाणून त्याने आपला मोठा मुलगा निजामशहा याला आपला वारस नेमले. तो यावेळी केवळ आठ वर्षांचा होता. त्याने ख्वाजा जहान तुर्क याला वऱ्हाडमधून आणि ख्वाजा महमूद गावान याला तेलंगणामधून बोलावून घेतले आणि आपले मृत्यूपत्र तयार केले. त्या दोघांचे मिळून त्याने राजप्रतिनिधी मंडळ बनविले आणि आपला मुलगा अज्ञान असेपर्यंत त्या दोघांची त्याचे पालक म्हणून नियुक्ती केली. त्याच वेळी त्या दोघांना त्याने अशी सक्त आज्ञा केली की राजमातेच्या त्यांनी दृष्टोत्पत्तीस आणल्याखेरीज राज्यकारभाराच्या कोणत्याही बाबींबाबत निर्णय घेऊ नये. [१३८ अ *] हुमायूनचा मृत्यू २८ जिल्काद हिजरी ८६५ यावेळी झाला तर काहीजण असे कथन करतात की हुमायून आपल्या आजारातून बरा झाला. नंतर एके दिवशी तो दारूच्या धुंदीत असताना त्याच्या अमानुष क्रौर्याला कंटाळून गेलेल्या त्याच्याच एका चाकराने त्याचा खून केला. हुमायूनशहाची कारकीर्द [१३८*ब] एकंदर ३ वर्षे, ६ महिने आणि ६ दिवस एवढी झाली.

जिल्काद २८ हिजरी ८६५ सप्टेंबर ३ इ. स. १४६१

## निजामशहा बहमनी [२](४६५)

(२११) जेव्हा मानवजातीवर कृपा करून परमेश्वराने त्या क्रूर हुमायूनला ह्या जगामधून ओढून नेले आणि दक्षिणेच्या रिकाम्या पडलेल्या सिंहासनावर त्याचा मुलगा निजामशहा जेव्हा आरूढ झाला तेव्हा राजमातेने राजप्रतिनिधी म्हणून अधिकार स्वीकार केला. राजमाता ही अंगात मोठे कर्तबगारीचे गुण असलेली स्त्री होती. परंतु तिने ख्वाजा जहान आणि ख्वाजा महमूद गावान यांचा सल्ला घेतल्याशिवाय कोणतीही गोष्ट केली नाही. या दोघांशिवाय राज्यकारभारात तिने इतर कोणत्याही अमिरांचा हस्तक्षेप होऊ दिला नाही; महमूद गावानकडे वऱ्हाडची

सुभेदारी होती. त्याला वजिरीच्या जागेवर नेमण्यात आले. ख्वाजा जहान याने वकील उस्सलतनत या अधिकाराच्या जागेचा स्वीकार केला. त्याला तेलंगणाच्या सुभेदारीवर नेमण्यात आले. हे दोघे वजीर दररोज सकाळी राजवाड्यात हजर होत आणि एका स्त्री अनुचरातर्फे राजमातेशी संभाषण व्यवहार करीत. [२](४६६) राजमाता आपली संमती दर्शवीत असे आणि नंतर आपल्या तरुण मुलाला ती दरबाराच्या दिवाणखान्यात पाठवीत असे. दरबारात तो सिंहासनावर बसत असे. त्याच्या उजव्या बाजूला ख्वाजा जहान उभा राहात असे आणि डाव्या बाजूला महमूद गावान. हे अधिकारी त्याच्या समक्ष वटहुकूम काढीत आणि कारभार पाहात. या तीन व्यक्तींमधील उत्कृष्ट सहकार्य आणि एकोपा यामुळे हुमायूनच्या क्रूर वर्तनामुळे प्रजाजनांच्या मनावर झालेल्या जखमा लवकर बुजून निघाल्या. परंतु आजुबाजूच्या हिंदू आणि मुसलमान राजांच्या कानावर जेव्हा पडले की दक्षिणेच्या सिंहासनावर एक लहान मुलगा आरूढ झाला आहे आणि मृत हुमायूनशहाच्या क्रूर वर्तनामुळे सरदार, दरकदार आणि अधिकारी असंतुष्ट झालेले आहेत तेव्हा त्यांनी बहमनी राज्या-वर आक्रमण करण्याचा कट रचला. पहिल्या प्रथम ओरिसाच्या रायाने तेलंगणा-मधील जमीनदारांबरोबर संगनमत करून राजमहेंद्रीच्या मार्गाने बहमनी राज्यावर आक्रमण केले. कौलासपर्यंतच्या मुलुखात त्यानी लुटालूट केली आणि तो प्रदेश त्यांनी उध्वस्त करून टाकला. राजमाता आणि राज्याचे मंत्री यांनी कोणत्याही तऱ्हेने नाऊमेद न होता ४०००० सैनिकांच्या फौजेची जमवाजमव केली आणि आपल्या तरुण बादशहाला घेऊन शत्रूचा प्रतिकार करण्यासाठी त्यांनी कूच केले. ओरिसाचा राया हा बादशाही सैन्यापासून ६ मैल आणि अहमदाबाद बिदर या राजधानीच्या शहरापासून १० मैल एवढ्या अंतरापर्यंत चाल करून आला. यामध्ये त्याचा बेत तेलंगणाचा त्याचा प्रदेश परत मिळविण्याचा आणि अल्पवयी बहमनी सुलतानाकडून खंडणी वसूल करून घेण्याचा होता. वरील उद्देश विशद करून सांग-णारा खलिता जेव्हा ओरिसाच्या रायाकडून बहमनी राज्याच्या दोन्ही वजिरांना मिळाला तेव्हा त्यांनी उत्तर पाठविले की आमच्या बादशहाचा बेत ओरिसा आणि जजनगरवर हल्ला १३८□ करण्याचा आणि ती जिंकून घेण्याचा होता परंतु तुम्ही स्वतःच आता आपल्या सैन्यानिशी इतक्या दूरवर चाल करून आला [ २ ] ( ४६७ ) आहात तेव्हा आपल्या सैन्याचा पराभव करण्याचे आमच्या बादशहांचे जे उद्दिष्ट आहे ते इतक्या लांबच्या प्रदेशात चाल करून जाण्याचे श्रम न घेताच आता साध्य होईल. त्याशिवाय आमच्या बादशहानी असा पक्का निर्धार केला आहे की बहमनी राज्याचे तुम्ही केलेले नुकसान पूर्णपणे भरून आल्याखेरीज आणि तुम्ही स्वतः खंडणी देण्याचे मान्य करीपर्यंत तुमच्या एकाही सैनिकाला राज्यातून जिवंत जाऊ देणार नाही. वरील मजकूर असलेला खलिता देऊन शहा मुहिबऊल्ला १३९□ याला ओरिसाच्या रायाकडे रवाना करण्यात आले. त्याच्याबरोबर संरक्षणा-

साठी देण्यात आलेल्या १६० घोडेस्वारांच्या तुकडीला काफरांनी वाटेत अडविले तेव्हा शत्रूच्या हल्ला करण्यास आलेल्या आघाडीच्या तुकडीवर त्याने इतक्या धाडसाने हल्ला केला की शत्रूचे सबंध सैन्यच आपल्यावर चाल करून आले आहे असे वाटून हिंदूंनी माघार घेतली आणि ते आपल्या मुख्य सैन्याला जाऊन मिळाले. ओरिसा आणि तेलंगणाच्या रायांनी यावर आपले जड सामानसुमान मैदानावरच टाकले आणि रातोरात रणांगण सोडून माघार घेतली. दुसऱ्या दिवशी ख्वाजा जहान त्यांच्या पाठलागावर गेला. सुलतान आणि महमूद गावान हे दोघेजण सावकाशपणे कूच करीत त्याच्या पाठोपाठ निघाले. [१४०] ख्वाजा जहानच्या कारवाईमुळे आपल्या दररोजच्या कूच करण्यात दोन ते तीन हजार माणसे गारद होत आहेत हे जेव्हा ओरिसाच्या रायाच्या नजरेस आले तेव्हा त्याने संरक्षणासाठी एका किल्ल्याचा आश्रय घेतला. [१४१] तेथून त्याने वजीर महमूद गावान याजकडे निरोप पाठवून क्षमायाचना केली. बऱ्याच वाटाघाटीनंतर आणि भलीमोठी रक्कम खंडणीदाखल दिल्यानंतर त्याला त्याच्या प्रदेशात कोणत्याही प्रकारचा उपद्रव न होता सुखरूप जाऊ देण्यात आले. विजयी होत्साता निजामशहा बहमनी [ २ ] ( ४६८ ) राजधानीकडे परतला. आपले अधिकारी आणि शिपाई यांजवर मानमरातब आणि बक्षिसी यांची खैरसैरात त्याने केली आणि नंतर त्याने त्यांना आपापल्या जहागिरी-च्या ठिकाणांवर जाण्यासाठी परवानगी दिली.

( २१२ ) या मोहिमेनंतर माळव्याच्या सुलतान महमूदने २८००० घोडेस्वार बरोबर घेऊन खानदेशाच्या मार्गाने बहमनींच्या प्रदेशावर आक्रमण केले. त्याचप्रमाणे ओरिसा आणि तेलंगणाचे राजेही पुन्हा लढाईच्या मैदानात उतरले आणि मुसलमानांच्या प्रदेशात धुमाकूळ घालण्याच्या कामास त्यांनी पुन्हा सुरुवात केली. बहमनींच्या वजिरांनी या घटनेमुळे तेलंगणाच्या फौजेला हिंदूंच्या आक्रमणाविरुद्ध तेलंगणाच्या प्रांताचे संरक्षण करण्याचे हुकूम दिले. नंतर त्यांनी विजापूर, दौलताबाद आणि वऱ्हाड प्रांतांच्या फौजा बरोबर घेऊन सुलतान महमूदविरुद्ध कूच केले.

( २१३ ) निजामशहा हा वयाने अतिशय तरुण होता तरी देखील तो सैन्याच्या अग्रस्थानी उभा राहिला. ख्वाजा महमूद गावान याने १०००० घोडेस्वारांची सैन्याची उजवी फळी बनविली. तर निजामउल्मुल्क तुर्क आणि इतर प्रमुख सरदार मंडळींनी सैन्याची डावी फळी संघटित केली. खुद्द सुलतान, ख्वाजा जहान आणि त्याचा दुधभाऊ सिकंदरखान यांच्या समवेत सैन्याच्या मध्यभागी ठाण मांडून उभा राहिला. मध्यभागी असलेल्या सैन्यांत १०००० घोडेस्वार आणि १०० लढाऊ हत्ती होते. माळव्याच्या सुलतान महमूदने आपल्या सैन्याच्या उजव्या फळीचे नेतेपद आपला मुलगा राजपुत्र गियासउद्दीन याजकडे दिले तर चन्देरीचा सुभेदार महाबतखान याला त्याने डाव्या फळीचा प्रमुख नेमले. डाव्या फळीला जहीर उल्मुल्क याचा भक्कम पाठिंबा होता. खुद्द माळव्याच्या सुलतानाने आपल्या सैन्यातील उत्कृष्ट शिपायांना

आपल्या हाताखाली घेतले आणि सैन्याच्या मध्यविभागाचे नेतृत्व त्याने संभाळून मधली आघाडी तयार केली.

(२१४) ख्वाजा महमूद गावान याने शत्रूच्या डाव्या आघाडीवर हल्ला चढविला आणि लढाईला तोंड फोडले. शत्रूने काही काळ प्रतिकार केला पण लवकरच त्यांची फळी मोडली आणि त्यांनी रणांगणातून पळ काढला. माळव्याचे [२] (४६९) महाबतखान आणि जहीर उल्मुल्क हे दोघेजण ठार झाले. माळव्याच्या सैन्याची उजवी फळी राजपुत्र गियासुद्दीन याच्या हाताखाली होती तिच्यावर निजाम उल्मुल्क तुर्क याने आपल्या डाव्या फळीच्या सैनिकांसह हल्ला चढविला. साऱ्या हिंदुस्थानात अतिशय निधड्या छातीचा शिपाई असा राजपुत्र गियासुद्दीन याने लौकिक मिळविलेला होता. दोन्ही बाजूचे सैनिक परस्परांत मिसळून घनघोर लढाईत गुंतले असताना दोन्ही सेनानी परस्परांसमोर हातघाईचे युद्ध करण्यासाठी एकत्र आले. गियासुद्दीनने केलेल्या प्रहारामुळे निजाम उल्मुल्काच्या तलवारीचे तुकडेतुकडे झाले. तेव्हा त्याने इतक्या जोराने आपल्या मोडक्या तलवारीची मूठ आपल्या [१८२] □ प्रतिस्पर्ध्याच्या तोंडावर फेकली की त्याच्या डोळ्याला जबरदस्त दुखापत झाली, डोळ्यातून भयानक रक्तस्राव सुरू झाला आणि जखमेचे दुःख सोसेनासे झाल्याने तो विव्हळत घोड्यावरून खाली पडला. आपला पुढारी पडल्याचे पाहून माळव्याच्या सैनिकांची उमेद खचली. त्यांची उमेद खचणे अशा प्रसंगी साहजिकच होते. त्यांनी रणांगणातून पळ काढला. दक्षिणी फौजांनी ४ मैलपर्यंत त्यांचा पाठलाग केला. त्यांनी माळव्याच्या फौजेची भयानक कत्तल केली आणि प्रचंड लूट ताब्यात घेतली. या लुटीबरोबर ५० हत्ती त्यांच्या हाती पडले. आपल्या सैन्याच्या दोन्ही फळीतील सैनिकांनी माघार घेतलेली माळव्याच्या सुलतान महमूद याने बघितली आणि त्याने त्यांचेच अनुकरण करण्याची तयारी केली. परंतु त्याचा दुसरा एक मुलगा आणि काही सरदारमंडळी यांनी त्याला परावृत्त केले. सुलतान महमूद आता ख्वाजा जहानच्या हल्ल्याची मार्गप्रतीक्षा करत तयारीने राहिला. ख्वाजा जहान याने १०००० घोडेस्वारांनिशी त्याच्यावर हल्ला चढविला. या प्रसंगी सुलतान महमूद याने सिकंदर-खान तुर्क याच्या हत्तीच्या मस्तकात बाण मारला. त्याबरोबर तो प्रचंड हत्ती झालेल्या जखमेच्या वेदनेने पिसाळून माघारी फिरला आणि आपल्याच फौजेतील अनेक शिपायांना त्याने पायाखाली तुडविले. तो निजामशहाला अगदी धरण्याच्याच [१८३] □ मार्गावर होता त्यावेळी सिकंदर खानाने भीतीमुळे म्हणा किंवा ख्वाजाजहानबरो-बरील वैमनस्यामुळे म्हणा आपल्या हाताखालील फौजा रणमैदानातून [२] (४७०) बाहेर काढल्या आणि लढाईच्या मैदानापासून काही अंतरापर्यंत आल्याबरोबर बादशहाला घेऊन तो निघून गेला. यावर जेव्हा दक्षिणी सैनिकांना बादशाही ध्वज [१८४] □ रणांगणातून बाहेर काढला गेल्याची जाणीव झाली तेव्हा त्यांनी रणमैदानातून पळ काढला आणि राजधानीच्या शहरापर्यंत जाईपावेतो ते थांबले नाहीत. ख्वाजा जहानला

जेव्हा आढळून आले की फौजेच्या उजव्या आणि डाव्या फळीतील सैनिक पाठलाग करण्यासाठी निघून गेले आहेत आणि खुद्द सुलतानाने दक्षिणी सैनिकांच्या बरोबर पलायन केले आहे तेव्हा आता माघार घेणेच श्रेयस्कर असा विचार त्याने केला. माघार घेण्याचे काम त्याने इतक्या शिस्तशीरपणे केले की आपल्या हाताखालील सर्व सैनिकांची तुकडी आणि त्याचप्रमाणे बादशाही घोडदळ आणि गजदळ त्याने अहमदाबाद बिदर येथे परत सुखरूपपणे आणले. दैवाचा फासा असा विचित्र पद्धतीने उलटा पडलेला पाहून ख्वाजा महमूद गावान आणि त्याची फौज यांनीही माघार घेतली. सिकंदर खान तुर्क हा राजधानीला परतल्यावर राजमातेने पहिल्या प्रथम रणांगणातून आपल्या मुलाला सुखरूप परत आणल्याबद्दल त्याला बक्षिसी दिली. परंतु ख्वाजा जहानकडून खरी गोष्ट काय झाली हे जेव्हा तिला कळले तेव्हा भ्याडपणा दाखविल्याबद्दल आणि विजयश्री अगदी हातात येण्याचा क्षण निर्माण झाला असताना त्याक्षणी सुलतानाला रणांगणातून बाहेर काढून त्याची नाचक्की केल्याबद्दल त्याला कैदखान्यात बंदिस्त केले. सिकंदरखानाच्या मित्रमंडळींनी त्याची अशी जोरदार भलावणी केली की ज्यावेळी रणांगणात सुलतानाच्या आवतीभोवती सैनिक नसताना आणि फौजेच्या दोन्ही फळ्यांतील सैनिक लुटालूट करण्याच्या कामात विस्कळीत झालेले असताना निश्चित होणाऱ्या नाशाच्या दुष्परिणामापासून सिकंदरखानाने सुलतानाचा जीव वाचविला आहे यात काहीच शंका नाही. त्यांनी असेही जाहीर केले [ २ ] ( ४७१ ) की आम्ही कोणत्याही परिस्थितीत मोगलांकडून आमची अवहेलना करून घेणार नाही. ज्यांनी राज्याचे सर्वाधिकार जबरदस्तीने आपल्या हाती घेतले आहेत त्यांच्यापुढे आम्ही कधीच मान तुकविणार नाही असेही ते म्हणाले. त्या वेळी अशी काही परिस्थिती निर्माण झाली की त्या परिस्थितीत सिकंदरखानाला शिक्षा करणे शक्य नव्हते. त्यामुळे कैदेतून सिकंदरखानाची मुक्तता करण्यासाठी ख्वाजा जहानचे मन वळविण्यात यश आले.

( २६४ अ ) बहमनींच्या राज्यातील ही दुफळी आणि दक्षिण्यांना मंत्रिमंडळातील वजीरांबद्दल वाटणारा तिटकारा या गोष्टी जेव्हा माळव्याच्या सुलतान महमूदच्या कानावर गेल्या तेव्हा त्याने अहमदाबाद बिदरला वेढा देण्यासाठी म्हणून कूच केले. ख्वाजा जहानबद्दल राजमातेच्या मनात संशयाचे वातावरण निर्माण झाले होते आणि मागील लढाईत बहमनींना जो पराभव खावा लागला होता त्याचे खापर तिने ख्वाजा जहानच्या निष्काळजीपणावर फोडले होते. ह्या तिच्या मताला ख्वाजा महमूद गावान याने आपला पाठिंबा दाखविला. त्याने दिलेल्या सल्ल्याप्रमाणे तिने बिदरच्या किल्ल्याचा कारभार मल्लूखान दक्कनी ह्याच्याकडे सुपूर्द केला आणि ती स्वतः सुलतानाला घेऊन फिरोजाबादच्या आश्रयाला गेली. सुलतान निघून गेल्यानंतर १७ दिवसांनी सुलतान महमूद याने बिदर शहराचा ताबा[१४५८] मिळविला. बहमनी राज्याचा बराचसा मुलुखही त्याने आपल्या हुकमतीखाली आणला. सर्वसाधारणपणे असा समज पसरला की बहमनी

घराण्याचे राज्य संपुष्टात येऊन त्यांची सर्व सत्ता आता खिलजी घराण्यातील सुलतानांच्या हाती जाणार. याच वेळी गुजरातच्या महमूद शहाच्या कूचीचे वृत्तान्त येऊन थडकले. फिरोजाबाद येथे माघार घेण्याचे अगोदर महमूद गावानच्या सल्ल्यावरून निजाम-शहाने मदतीची याचना करण्यासाठी आपले वकील गुजरातच्या सुलतानाकडे रवाना केलेले होते. दरम्यानच्या काळात स्वतःचे संरक्षण करण्यासाठी त्याने आपले विस्कळीत झालेले सैन्य एकत्र जमविले आणि त्यांच्या तुकडया शत्रूला सतावण्यासाठी त्याने रवाना केल्या. बहमनी राज्याच्या सरहद्दीजवळ आता गुजरातचा सुलतान ८०००० घोडेस्वार घेऊन येऊन पोहोचला होता. राजमातेने त्याला सामोरा [२] (४७२) जाण्यासाठी म्हणून ख्वाजा महमूद गावान याची रवानगी केली होती. गुजरातच्या महमूद शहाने आपल्या सैन्यातील २००१० घोडदळाची एक तुकडी आणि काही प्रमुख अधिकारी गावानच्या ताब्यात दिले आणि याप्रमाणे दोस्तांचे सैन्य थोडयाच अवकाशात एकसमयावच्छेदेकरून राजधानीच्या दिशेने चालू लागले. [१४६]

(२१५) माळव्याचा सुलतान महमूदला बिदरचा किल्ला [१४७] जिंकून घेण्याचे कामी अजून यश प्राप्त झाले नव्हते. त्याने जेव्हा दोस्तांच्या सैन्याच्या आगमनाची बातमी ऐकली तेव्हा त्याने बिदरचा वेढा उठविला आणि मोठ्या घाईने, आणि विचार न करता त्याने माळव्याच्या दिशेने माघार घेतली. शत्रूने वऱ्हाडचा मार्ग धरल्यास विघ्ने आणि अडचणी निर्माण करण्यासाठी ख्वाजा महमूद गावानने १०००० दक्षिणी घोडे-स्वारांची रवानगी केली. तो स्वतः १०००० घोडेस्वार घेऊन कूच करून गेला आणि कंधार व बीडच्या मध्ये असलेल्या एक जागी दबा धरून बसला. त्याचा परिणाम असा झाला की माळव्याचे सैन्य कुठेही गेले तरी दक्षिण्यांना त्यांच्यावर घसरा करता येणे सहज शक्य झाले. इकडे दक्षिणी सैन्याच्या हलक्या तुकड्यांनी शत्रूचा दाणागोटा आणणाऱ्या पलटणींना गाठून शत्रूची रसद तोडून टाकली. अगदी विश्वासार्ह अशा वृत्तांताप्रमाणे सुलतान महमूदजवळ अंदाजे ३०००० घोडेस्वार होते. त्याने वारंवार शत्रूबरोबर सामना देण्याच्या दृष्टीने पाऊले टाकली परंतु त्याने कितीही प्रयत्न केला तरी ख्वाजा महमूद गावान याने मुळातच युद्धाचे डावपेच आखले होते. [२] (४७३) त्यात बदल करण्यासाठी परिस्थिती निर्माण करण्यात सुलतान महमूद याला यश आले नाही. अखेर अशी झाली की अन्नावाचून माळव्याच्या सैनिकांवर भयंकर अनावस्थेचा प्रसंग ओढवला. माळव्याच्या सैनिकांनी बंडाचे निशाण उभारून एकच कोलाहाल केला आणि या कोलाहालाकडे मन शांत ठेवून कान देणे माळव्याच्या सुलतानाला भाग पडले.

(२१६) या आणीबाणीच्या परिस्थितीत महमूदने आपल्या फौजेतील अनेक हत्तींना ठार मारले आणि जड सामानसुमानाला आग लावून दिली. आपल्या जवळील ओझ्यापासून अशा तऱ्हेने मुक्त झाल्यावर त्याने गोंडवनाच्या दिशेने कूच केले. त्या देशाच्या परिसीमापर्यंत त्याचा पाठलाग करण्यात आला. महमूद गावानने त्याची

इतकी ससेहोलपट केली की त्याचे सैनिक मोठ्या संख्येने मारले गेले आणि त्याच्या उरलेल्या सामानसुमानांपैकी बव्हंशी सामानसुमान गायब झाले. गोंडवनाच्या प्रदेशात पोहोचल्यावर सुलतान महमूद याने तिथल्याच एका जमीदाराचे मन वळवून त्याला अशा मार्गाने आपल्याला घेऊन जाण्याची विनंती केली की जेणे करून दक्षिणी सैनिकांकडून होणाऱ्या पाठलागाला प्रतिबंध होईल आणि कसल्याही तऱ्हेचा उपद्रव न होता त्याचे अतिशय दमलेले असे सैन्य कूच करून जाऊ शकेल. सुलतान महमूदच्या मनावर निरर्थकपणे असे ठसविण्याचा प्रयत्न केला गेला की त्याने सरळ जाणाऱ्या मार्गाने माघार घेतल्यास त्या मार्गावर काही टप्प्यापर्यंतच त्याला जेमतेम पाण्याचा पुरवठा होईल. पाठलाग करणाऱ्या शत्रूच्या हातून कसातरी निसटण्याचा विचार करण्याच्या ओघात सुलतान महमूद याने ह्या अडचणींना सांगोपांगपणे विचारात घेतले नाही आणि त्याच मार्गाने आपल्या देशाकडे माघार घेण्याचे ठरविले. कूच करण्याला सुरुवात केल्यावर पहिल्याच टप्प्यात अंगाला भाजून काढणारे वारे आणि पाण्याचे झालेले दुर्भिक्ष्य [१८८] यामुळे त्याची जवळ जवळ ६००० माणसे हालहाल होऊन मरण पावली. दुसऱ्या टप्प्यात त्या डोंगराळ प्रदेशातील रहिवाशांनी महमूदच्या सैन्यावर ओढवलेल्या दुरवस्थेच्या प्रसंगाचा फायदा घेऊन [ २ ] ( ४७४ ) त्याच्या बाजारबुणग्यांना लुटले. महमूदचे शिपाई त्यांच्यावर कोसळलेल्या प्रसंगाने अगोदरच नाउमेद झालेले असल्याकारणाने त्यांना संरक्षण देण्याच्या कामी ते अगदीच कुचकामी ठरले. त्या दिवशी पाण्याच्या एका भांड्याची किंमत दोन रुपये झाली आणि इतके करूनही पैसे देऊनही पुष्कळदा पाणी मिळेनासे झाले. जेव्हा सुलतान महमूदने असंख्यात आणि अवर्णनीय अशा यातना सहन केल्यावर सरते शेवटी या भयानक चक्रव्यूहातून आपली वाट काढण्यात यश मिळविले तेव्हा त्याला असा संशय आला की त्याला जे कष्ट सहन करावे लागले त्याचे मूळ त्याच्या वाटाड्याच्या विश्वासघातकी वर्तणुकीत आहे. म्हणून त्याने त्या वाटाड्याला ठार मारण्याचा हुकूम केला. आपल्या जिवाची तमा न करता त्या गोंड अधिपतीने सुलतान महमूद याला शिव्या दिल्या आणि अशी फुशारकी मारली की काहीही झाले तरी तुमच्या १२००० शिपायांना तहानेने व्याकुळ करून त्यांचा नाश करावा व अशा तऱ्हेने आपला सूड घ्यावा असे मी मनाशी योजलेच होते. माझ्या मृत्यूची मला यत्किंचितही पर्वा नाही कारण मला तीन मुलगे आहेत आणि माझ्या मृत्यूनंतर त्यांच्यापैकी कोणाच्या तरी मुलाच्या रूपाने मी लवकरच पुनर्जन्म घेईन याची मला निश्चिती आहे. गोंड राजाच्या या बोलण्यावरून आपल्याला असे कळून येते की हिंदू-प्रमाणेच गोंड लोकांचाही [१८९] आत्म्याच्या पुनर्जन्मावर विश्वास होता. साहजिकच इहलोकीच्या जीविताबद्दल त्यांना फारशी काळजी वा भय वाटत नसे कारण ते मनाशी अशी खूणगाठ बांधीत असत की या जन्मी केलेली चांगली सत्कृत्ये त्यांना पुढील जीवनात त्वरित रीत्या पुनर्जन्म देण्याच्या कामी उपयोगी पडतील.

( २१७ ) अहमदाबाद बिदर हे शहर सुलतान महमूदचे हाती पडण्याच्या अगोदर त्याने आपल्या शिपायांना युद्धकालाच्या अनुषंगाने होणाऱ्या सर्व अत्याचारी कृत्यांची परमावधी करण्याची पूर्णपणे मुभा दिली होती. परंतु जेव्हा त्याने दक्षिण देशात आपले स्वतःचेच राज्य स्थापन करण्याचा निश्चय केला तेव्हा त्याने आपले वर्तन बदलले आणि तेथील प्रजाजन हे जणू काही आपलेच प्रजाजन आहेत असे समजून त्यांना वागणूक दिली. पवित्र आणि अपवित्र अशा गोष्टी संबंधाने कुराणाने घालून दिलेले जे काही नियम आहेत त्यानुसार आपला पोषाख आणि खाणेपिणे यांचे नियमन [ २ ] ( ४७५ ) तो प्रत्येक वेळी अतिशय कटाक्षाने करण्याकडे लक्ष देई. यामुळे जरी तो लढाईच्या मैदानावर असला तरी देखील त्याला जेवण बनविण्यासाठी लागणाऱ्या तांदूळ, गहू, तेल आणि इतर जरुरीच्या वस्तू त्याच्या स्वतःच्या राज्यातील काही विशिष्ट शेतामधूनच मिळवीत असे. त्याचप्रमाणे तो जेव्हा जेव्हा कूच करून जाई तेव्हा तो लाकडी कुंड्यांमध्ये माती भरून स्वतःसाठी लागणारे भाजीपाले त्यात लावून घेऊन जात असे. अहमदाबाद बिदर येथे तो राहात असताना त्याने मौलाना शम्सउद्दीन या अवलियाला बोलावू पाठविले. हा अवलिया शहा खलील उल्ला याच्या कबरीची देखभाल करीत असे. त्याच्यापाशी त्याने भाजीपाल्याशिवाय आपली गैरसोय होत असल्याची तक्रार केली आणि त्याला असे सांगितले की ज्याची स्वतःच्या मालकीची जमीन आहे अशा एखाद्या बागवानाचे नाव मला सुचवा म्हणजे परंपरागत चालत आलेल्या कायद्या कानुनानुसार त्याच्यापासून पडेल त्या किमतीला मला भाजी-पाला विकत घेता येईल. मौलानाने यावर उत्तर केले की आपण खरोखरच माझी चेष्टा करीत आहा. कारण सद्धर्माचे पालन करणाऱ्यांच्या प्रदेशावर आक्रमण करणे, त्यांचा मुलख आणि घरेदारे उद्ध्वस्त करणे आणि त्यांची मालमत्ता त्यांच्यापासून छिनावून घेणे व एवढे केल्यानंतर पोषाख कोणता करावा व काय खावे यासारख्या धर्मतत्त्वाच्या क्षुल्लक बाबींवर अमुक वागणे शिष्टसंमत आहे किंवा नाही याबद्दल शिष्टाचाराचे ढोंग करणे म्हणजे ढोंगीपणाचा कळस आहे.

सुलतान महमूद याला मौलाना शम्सउद्दीन याने त्याला जो गर्भित टोला दिला होता त्याचा मत्यर्थ पटला आणि त्याने अश्रू ढाळले. तरी देखील त्याने असे उद्‌गार काढले की वरवर परस्परविरोधी दिसणाऱ्या अनेक गोष्टीकडे नाईलाज म्हणून वळल्या-खेरीज साम्राज्ये टिकून राहणे जवळ जवळ अशक्यप्राय आहे.

( २१८ ) माळव्याच्या सुलतानाने माघार घेतल्यानंतर निजामशहाने किंमतवान नजराणे देऊन आपले वकील गुजराथच्या महमूदशहाकडे पाठविले आणि त्याने मित्रत्वादाखल दिलेल्या मदतीबद्दल त्याचे मनःपूर्वक आभार मानले. यानंतर महमूदशहा गुजराथेला परत गेला आणि निजामशहा आपले राजधानीचे शहर अहमदाबाद बिदर येथे परतला. त्यानंतर पुढल्याच वर्षी माळव्याच्या सुलतानाने पुन्हा एकदा दक्षिणेवर स्वारी केली आणि दौलताबादपर्यंत तो चाल करून आला परंतु पुन्हा दुसऱ्यांदा [२] ( ४७६ )

हिजरी ८६६ } गुजरातच्या सुलतानाने आयत्यावेळी मदत पाठविल्यामुळे त्याला
इ. स. १४६२ } आपल्या देशाकडे माघार घेणे भाग पडले.

(२१९) बहमनींच्या घराण्यात मुलांचा विवाह ती लहान असतानाच करण्याची प्रथा होती. त्याला अनुसरून राजमातेने आपल्या मुलासाठी आपल्या नातेवाईकांमधूनच एक वधू शोधून काढली आणि लग्नाच्या मेजवानीची भव्यपणाने आणि थाटामाटाने तयारी केली. त्या दिवशी रात्रीच जेव्हा जमलेली मंडळी चैनीच्या धुंदीत गुंग होती आणि दरबारातले वातावरण खाणेपिणे आणि मौज मजा यांनी दुमदुमून गेले होते तेव्हा एकाएकी शाही अंतःपुरातून आरोळ्या आणि किंकाळ्यांचा ध्वनी उमटला. दुःखांनी गदगदलेल्या आवाजांनी जणू काही मोठ्याने विव्हळून जाहीर केले की निजामशहाचे प्राण या नश्वर जगास सोडून गेले आहेत. उत्पाताच्या झंझावाताने राजशाही घराण्यातील रोपटे पुरे उमलून येण्याचे अगोदरच मुळासकट उन्मळून टाकले. सौंदर्याची झालर अजून पुष्पकमळावर पसरलेली नसतानाच मृत्यूने नाशरूपी
जिल्काद १३ } रोगाने त्याच्यावर प्रहार केला. ही घटना जिल्काद महिन्याच्या
हिजरी ८६७ } १३ तारखेला रात्री हिजरी ८६७ या वर्षी घडली. निजामशहा
जुलै २९ } सिंहासनावर आल्याला केवळ २ वर्षे आणि १ महिना एवढाच
इ. स. १४६३ } अवधी लोटला होता.

## महमदशहा बहमनी दुसरा [१५०★] [२] (४७७)

(२२०) महमदशहा [१५१ □] जेव्हा दक्षिणेच्या सिंहासनावर बसला तेव्हा त्याचे वय केवळ ९ वर्षांचे होते. त्याच्या मृत भावाच्या कारकिर्दीप्रमाणेच राज्याचा कारभार राजमातेच्या निदर्शनाखाली ख्वाजा जहान आणि ख्वाजा महमूद गावान चालवीत होते. सुलतानाचा धाकटा भाऊ अहमद याला त्याच्या पालनपोषणासाठी भरपूर वेगळी वतनवाडी नक्त करून देण्यात आली होती. ख्वाजा जहानने [२] (४७८) सुलतानाच्या शिक्षणाची खास कामगिरी आपल्याकडे घेतली. सुलतानाने सद्रजहान शुस्तरी या त्या काळातील मान्यवर समजल्या जाणाऱ्या विद्वानाच्या हाताखाली अभ्यासात भरपूर प्रगती केली. त्यामुळे फिरोजशहाच्या खालोखाल बहमनींच्या सिंहासनावर बसलेला एकमेव अतिशय विद्वान सुलतान म्हणून त्याला प्रसिद्धी प्राप्त झाली. ख्वाजा जहान याला राज्यकारभाराच्या प्रत्येक बाबीत अतिशय सामर्थ्य आणि वजन प्राप्त झाले आणि त्याने राज्याच्या कारभारासंबंधीचे सर्व अधिकार आपल्याकडे बळकाविले. त्याने अनेक जुन्या अमीरउमरावांना त्यांच्या जहागिरीवरून हाकलून लावले आणि त्यांच्या जागी आपणच अधिकारावर चढविलेल्या स्वतःच्या बगलबच्च्यांची वर्णी लावली. त्याने शाही खजिन्यातील संपत्तीवर खूप मोठ्या प्रमाणात डल्ला मारला आणि आपला सहकारी ख्वाजा महमूद गावान याला त्याने राज्याच्या सरहद्दीवर गुंतवून ठेवण्यात यश मिळविले. साहजिकच त्याला राज्यकारभाराच्या बाबतीत हस्तक्षेप करणे[१] जवळ-

जवळ अशक्यप्राय होऊन गेले. राजमाता ही अतिशय कुशाग्र बुद्धीची स्त्री होती. ख्वाजा जहानच्या हातात इतकी अमर्याद सत्ता गेल्यामुळे त्याच्याबद्दल तिच्या मनात द्वेषबुद्धी निर्माण झाली आणि त्याचा नाश करावा असा आग्रह तिने सुलतानाला चालविला. त्यासाठी तिने आपल्या मुलाकडून वचन घेतले की 'दुसऱ्या दिवशी ख्वाजा जहान जेव्हा दरबारात येईल तेव्हा त्याला ठार मारण्याची आज्ञा आपण देऊ.' नेहमीच्या रीतीप्रमाणे ख्वाजा जहान दरबारात हजर झाला परंतु निजामउल्मुल्कतुर्क हा जेव्हा काही गारद्यांसह दरबारात हजर झाला तेव्हा त्याच्या मनात संशय जागृत झाला. परंतु त्याला असे दिसून आले की परत फिरण्याची वेळ आता निघून गेली आहे. म्हणून त्याने नेहमीप्रमाणे सुलतानाशेजारी आपली जागा घेतली. यानंतर थोड्याच वेळाने दोन नोकराण्या दरबारात हजर झाल्या आणि सुलतानाला मोठ्या आवाजाने ओरडून म्हणाल्या की 'तुम्ही दिलेले वचन पुरे कराल अशी सम्राज्ञीची अपेक्षा आहे'. यावर सुलतान निजामउल्मुल्कतुर्क याजकडे वळून उद्‌गारला 'तो हलकट मनुष्य देशद्रोही आहे. त्याला ठार कर.' निजामउल्मुल्क याचे ख्वाजा जहानबरोबर शत्रुत्व होते. वरील कृत्य करण्याच्या तयारीनेच तो आला होता. त्याने ख्वाजा जहानला त्याच्या जागेवरून फरफटत ओढले आणि सुलतानाच्या समक्ष आपल्या [ २ ] ( ४७९ ) शस्त्राने त्याचे तुकडे तुकडे केले. १५२□ १५२अ★

( २२१ ) यानंतर काही दिवसांनी महमदशहाने महमूद गावान याला बोलावू पाठविले. त्याला त्याने ख्वाजा जहान हा किताब दिला आणि त्याच्या नैमित्तिक कामगिरीव्यतिरिक्त त्याच्यावर वकील उल् सलतनत या पदाची कामगिरी सोपविली. १५२ब★ सुलतानाला जेव्हा चौदावे वर्ष लागले तेव्हा बहमनी घराण्यातीलच एका राजकन्येबरोबर मोठ्या थाटामाटाने त्याचा विवाहसमारंभ उरकण्यात आला. राजमातेने यानंतर राज्याच्या व्यवहारातून आपले अंग काढून घेतले आणि भक्तिमार्गाच्या जीवनाचा स्वीकार तिने केला. असे असले तरी देखील महत्त्वाच्या बाबींवर तिचा सल्ला घेण्यात येत असे. खुद्द बादशहा तिला नमन करण्यासाठी तिच्या महालात दररोज जात असे. आपली आई आणि वजीर ख्वाजा जहान यांच्या बंधनामुळे त्याच्याकडे आलेल्या नामधारीपणातून त्याची मुक्तता झाल्यावर सुलतानाने पहिले कार्य हाती घेतले ते म्हणजे आपल्या शेजारील राष्ट्रांबरोबर युद्ध करणे हे होय. ही योजना सिद्धीस जावी या हेतूने त्याने निजामउल्मुल्क याची वऱ्हाडच्या सुभेदारीवर नेमणूक केली आणि हिजरी ८७२ या वर्षी अतिशय प्रबळ असे सैन्य घेऊन माळव्याच्या सुलतानाच्या ताब्यात असलेल्या खेडल्याच्या किल्ल्यावर चाल करून जाण्याची त्याला आज्ञा दिली. निजामउल्मुल्क याने खेडल्याला वेढा दिला आणि खेडल्याच्या मदतीसाठी पाठविण्यात आलेल्या रसदीच्या सैनिकांचा त्याने वारंवार पराभव केला. शेवटच्या प्रसंगी अतिशय निकराचे असे युद्ध झाले. माळव्याच्या सैन्यातील १२००० रजपूत आणि अफगाण

हिजरी ८७२ }
इ. स. १४६७ }

सैनिकांनी अतिशय प्राणपणाने लढा दिला. दोहोबाजूंकडील सैनिक मोठ्या संख्येने ठार झाले. सरते शेवटी दक्षिणी सैनिकांच्या गळयात विजयश्रीने माळ घातली. किल्ल्यातील काही शिबंदीने त्यांच्यावर अचानक हल्ला केला होता त्यांना पिटाळत [ २ ] ( ४८० ) त्यांनी किल्ल्यापर्यंत रेटले. निर्वासितांबरोबरच ते किल्ल्यात घुसले आणि त्यांनी किल्ल्याचा आपल्याकडे ताबा घेतला. [१५३] दक्षिणेतील सर्वसामान्य शिपाईपेशाच्या प्रथेनुसार विजेत्यांनी जिंकलेल्या शिबंदीतील शिपायांना शिवीगाळ केली. त्यामुळे माळव्याच्या सैन्यातील दोन रजपूत शिपायांची माथी इतकी भडकली की आम्ही शौर्याच्या बाबतीत कुठल्याही प्रकारे कमी नाही हे आपल्या शत्रूला पटवून देण्याचा त्यांनी निश्चय केला. जेव्हा सर्वत्र चाललेला गोंधळ संपला आणि माळव्याच्या शिपायांनी किल्ला खाली केला तेव्हा वरील दोघे रजपूत निजामउल्मुल्काच्या सेवकांकडे जाऊन पुढीलप्रमाणे बोलते झाले. ते म्हणाले ' आम्ही जरी आमची सर्व हयात सैनिकपेशात घालविली असली आणि अनेक शूर वीर आमच्या दृष्टोत्पत्तीस आले असले तरी आपल्याशी बरोबरी करील असा दुसरा कोणीही आमच्या आढळात आला नाही. तरी आमची अशी इच्छा आहे की आम्ही आपली रजा घेण्याच्या अगोदर आपण आम्हाला आपल्या पायांचे चुंबन घेण्याची परवानगी द्यावी '. ते दोघेजण निःशस्त्र आहेत हे निजामउल्मुल्क याने बघितले आणि त्यांना जवळ येण्याचा हुकूम दिला. त्यावर ते दोघेजण अतिशय नम्रपणे त्याच्यापुढे येऊन ठेपले. परंतु एकाएकी ते झपाट्याने वळले आणि जवळच उभ्या असलेल्या रक्षकांच्या हातातील तलवारी त्यांनी हिसकावून घेतल्या. त्या दोघांपैकी एकाने निजामउल्मुल्क याला प्राणांतिक जखम केली. त्यानंतर ते दोघेजण त्यांच्या शरीराचे अगदी तुकडे तुकडे होईतोपर्यंत प्राणपणाने लढले. निजामउल्मुल्क याला दोन मानलेले भाऊ होते. एक युसुफ आदिलखान सवाई आणि दुसरा दर्याखान तुर्क. त्यांनी किल्ल्यावर मजबूत शिबंदी ठेवून किल्ल्याचा बंदोबस्त केला आणि आपल्या सेनापतीचा मृत देह बरोबर घेऊन किल्ल्यात मिळालेल्या मौल्यवान लुटीसह त्यांनी दरबाराकडे कूच केले. बादशहाने [ २ ] ( ४८१ ) त्यांच्या कामगिरीची प्रशंसा केली आणि प्रत्येकाला १००० स्वारांच्या मनसबीवर नेमून खेडल्याचा किल्ला आणि किल्ल्याच्या अंकित असलेला मुलूख त्यांना जहागिरीदाखल दिला. [१५४]

( २२२ ) माळव्याच्या सुलतानाला आता जाणीव झाली की दक्षिणी लोकांचे मनोधैर्य हे विचलित होणारे नाही. त्याचप्रमाणे त्याला अशी भीतीही वाटली की मागील सुलतानाच्या कारकिर्दीत त्यांना जे आघात सहन करावे लागले आहेत त्याबद्दल विद्वेषाने ते आपला कदाचित सूड घेण्याचीही शक्यता आहे. म्हणून त्याने आपल्यातर्फे शरीफ उल्मुल्क नावाचा एक वकील मौल्यवान असे नजराणे घेऊन महमदशहाच्या दरबाराकडे रवाना केला. या सरदारान असे निवेदन केले की सुलतान होशंग याचा अहमदशहा बहमनी याजबरोबर अतिशय गंभीर स्वरूपाचा असा कदारमदार झाला

होता. त्या तहाची एक अट अशी होती की वऱ्हाडचा प्रांत दक्षिणच्या सुलतानांच्या मालकीचा असावा तर खेडल्याच्या किल्ल्याचा ताबा माळव्याच्या सुलतानाच्या हाती राहावा. अशा तऱ्हेच्या चिरकाल तहनाम्याचे बंधन होशंगशहा आणि अहमदशहा व त्याचप्रमाणे त्यांचे वारस यावर कायम असावे. शरीफउल्मुल्क याने आणखी पुढे असे सांगितले की आता सद्यःस्थिती अशी आहे की दक्षिणच्या फौजांनी खेडल्याच्या किल्ल्याचा ताबा घेतला आहे आणि वरील तहाच्या अटी विचारात घेता अहमदशहा बादशहांनी त्या अटींच्या अनुषंगाने वर्तणूक करणे आणि दोन्ही राज्यांच्या प्रजाजनांचा लढाईच्या भयंकर उत्पातातून बचाव करणे हे अतिशय जरुरीचे आहे.

( २२३ ) यावर महमदशहाने शरीफ उल्मुल्काबरोबर मांडू येथे जाण्यासाठी शेख अहमद सद्र यास पाठविले. त्याच्याबरोबर त्याने खलिता पाठवून त्यात असे लिहिले की यापूर्वी दोन्ही राज्यांत जो करारनामा झाला आहे त्याप्रमाणे वर्तन करण्याकडेच आमचा कल आहे. त्याने असाही विचार पुढे मांडला की कर्नाटकच्या अवतीभोवती सर्वत्र मजबूत अशी ठाणी असून ती सर्व काफरांच्या ताब्यात आहेत आणि असे असल्यामुळे माझ्या शस्त्र सामर्थ्याचा उपयोग खेडल्याच्या किल्ल्याविरुद्ध करण्याचा प्रसंग माझ्यावर आला नाही. त्या परमेश्वराची कृपा म्हणूनच [ २ ] ( ४८२ ) वर झालेल्या तहाच्या अटी मोडण्याच्या पापाचे खापर बहमनी घराण्याच्या माथी पडले नाही. माझा अज्ञान वयाचा भाऊ माझ्यापूर्वी जेव्हा गादीवर होता तेव्हा राज्यकारभारातील दुबळेपणाचा फायदा घेऊन माळव्याच्या सुलतानाने म्हणजे आपण आमच्या राज्यावर हल्ला केला आणि त्या महादुष्ट चेंगिजखानाने केले नसतील एवढे अत्याचार आणि अनाचार आपण आमच्या ताब्यातील मुसलमानी प्रजेविरुद्ध केले. महमदशहाने आपल्या पत्राच्या समारोपादाखल असे लिहिले की जे काही झाले ते आता परत भरून येत नाही म्हणून मी माळव्याच्या म्हणजे तुमच्या दरबाराकडे शेख अहमद या मुसलमानामध्ये समझोता घडवून आणणाऱ्या अतिशय उत्साही वकिलाची रवानगी केली आहे. तो धर्मवेत्ता पुरुष ज्या ज्या गोष्टी आपल्याबरोबर तहात कबूल करील त्या त्या सर्वांचे पालन करण्याची माझी तयारी आहे. माळव्याच्या सुलतानाने शेख अहमदला सामोरे जाण्यासाठी राज्यातील प्रमुख सरदारांचे एक प्रतिनिधिमंडळ मांडूनजीक रवाना केले. त्यांनी त्याला मोठ्या सन्मानाने आणि मानमरातबाने शहरात नेले. तेथे त्याची सुलतान महमूद खिलजीबरोबर मुलाखत घालून देण्यात आली. त्याने सुलतानापाशी आपली अधिकारपत्रे आणि महमदशहाने दिलेले पत्रही सादर केली. पूर्वी झालेल्या तहाचा भंग होण्यास आपण कारणीभूत आहोत हे कबूल करण्याची तयारी माळव्याच्या दरबाराने दाखविली. त्यांनी असे निवेदन केले की परमेश्वराचे ठायी जी अपार कृपादृष्टी आणि चांगुलपणा आहे ते बघता आम्ही केलेल्या कृत्याचा जाब देण्याची पाळी तो आमच्यावर आणणार नाही अशी आम्हाला आशा आहे. सुलतान महमूद याने जाहिररीत्या आपण दोषी आहोत असे कबूल केले आणि आपले अपराध

विसरले जातील अशी आशाही व्यक्त केली. त्याने असा विश्वास प्रकट केली की आता दोन्ही घराण्यांत अशा तऱ्हेचा तह घडवून आणण्यात यावा की माझे वारस आणि त्याचप्रमाणे बहमनी घराण्यातील सुलतान भविष्यकाळात परस्परांबरोबर शत्रुत्वाच्या भावनेने वागणार नाहीत. महमदशहा बहमनीच्या वतीने शेख अहमद याने आणि सुलतान महमूद खिलजी याच्या वतीने शेख उल् इस्लाम या विद्वान धर्मवेत्त्याने तहाचा आराखडा तयार केला. या तहाच्या मसुद्यावर दोघांच्या सह्यांचे आणि त्याचप्रमाणे दोन्ही राज्यांतील धर्मवेत्त्यांच्या सह्यांचे शिक्कामोर्तब झाले. दोन्ही सुलतानांनी [ २ ] ( ४८३ ) समासात आपल्या अक्षरात पुढीलप्रमाणे नोंद केली : “ जो कोणी या तहाच्या अटी पाळण्यापासून च्युत होईल त्याच्यावर परमेश्वराचा कोप होईल आणि तो पैगंबराच्या तिरस्कारास पात्र होईल. ” वरील तहाचे सार पुढीलप्रमाणे होते : ( १ ) दोन्ही पक्षांनी परस्परांच्या राज्यावर आक्रमण करण्यापासून स्वतःस परावृत्त करावे ( २ ) खेडल्याचा किल्ला हा सुलतान अहमदशहा जो न्यायी म्हणून ओळखला जाई त्याच्या कारकिर्दीत असल्याप्रमाणेच माळव्याच्या सुलतानाच्या ताब्यात सोपविला जावा आणि ( ३ ) हिंदूंच्या कडून जो जो प्रांत दोन्ही राज्यांकडून जिंकला जाईल त्यातील परस्परांच्या ताब्यातील प्रांतावर दोघांपैकी कोणीही आपली लोभी दृष्टी ठेवू नये. याप्रमाणे परस्परांत चाललेल्या वाटाघाटी संपुष्टात आल्यावर शेख अहमद याने खेडल्याच्या सुभेदाराला लेखी कळवून किल्ला माळव्याच्या सुलतानाच्या प्रतिनिधींच्या ताब्यात देण्याचा हुकूम दिला. यानंतर शेख अहमद दक्षिणेत आपल्या राज्याकडे परतला. यानंतर भविष्यकाळात दोन्ही राज्यांमध्ये कधीही भांडणाचा प्रसंग उद्भवला नाही.

( २२४ ) हिजरी ८७४ / इ. स. १४६९ } हिजरी ८७४ या वर्षाच्या सुरुवातीला वजीर[१५५□] महमूद गावान याने सुसज्ज अशा सैन्यासहित खेळण्याचा शंकरराय आणि कोकणातील इतर बंडखोर राजांविरुद्ध चाल केली. या कामगिरीवर गावानला जाऊन मिळण्यासाठी म्हणून जुन्नर, चाकण, कोल्हार, दाभोळ, चेऊल, वाई आणि माण व इतर भागातील सेनाविभागांना हुकूम सोडण्यात आले. खेळण्याच्या शंकररायाकडे[१५६□] ३०० गलबतांचे आरमार सदैव सुसज्ज [२] ( ४८४ ) असे. त्याच्या मदतीने मुसलमानांच्या दर्यावरील वाहतुकीत तो सदैव अडथळा आणीत असे. ख्वाजा महमूद गावान आपल्यावर चाल करून येत असल्याची बातमी कळताच त्या हलकट काफरांनी परस्परांबरोबर एकमेकांच्या मदतीला जाण्याबाबत करारमदार केले. त्यानंतर ते मोठ्या संख्येने घाटाच्या तोंडाशी जमा झाले. परंतु महमूद गावानने अस्ते अस्ते त्यांनी धरलेल्या सर्व मोर्चांतून त्यांची हकालपट्टी केली. कोकणच्या डोंगराळ प्रदेशात आपले घोडदळ कुचकामाचे आहे असे त्याला जेव्हा आढळून आले तेव्हा त्याने राजधानीहून आणलेले सर्व घोडदळ परत पाठविले. जुन्नरच्या सेनाविभागाबरोबर असलेले असदखान गिलानीच्या हाताखालील सैनिक आणि कोल्हार व दाभोळ

येथील सेनाविभागाबरोबर असलेले त्याच्या स्वतःचे खुष कदम या अधिकाऱ्याच्या हाताखालील असलेले अनुचर यांच्या मदतीने त्याने ही मोहीम निभावून नेण्याचे ठरविले. या सैन्याच्या मदतीने त्याने जंगलातून आग लावीत आणि झाडे तोडून मार्ग काढला. खेळण्याच्या किल्ल्यासमोर तो पाच महिनेपर्यंत ठाण मांडून राहिला पण किल्ला त्याच्या ताब्यात आला नाही आणि तितक्यात पाऊस सुरू झाल्यामुळे त्याला वेढा सोडून देणे भाग पडले. गावानन त्या प्रदेशातील हवेचा ज्यांना सराव पडला आहे अशा १०००० पायदळाकडे तेथील खिंडीच्या संरक्षणाचे काम सोपविले. या सैनिकांवर आपण पूर्णपणे अवलंबून राहू शकतो याची त्याला खात्री होती. अशा तऱ्हेने व्यवस्था केल्यावर तो डोंगरमाथा चढून गेला आणि पावसाळा घालविण्यासाठी कोल्हापूरच्या जिल्ह्यात गवताची छपरे असलेल्या झोपड्या त्याने बांधल्या. या ठिकाणी मुक्कामाला असताना त्याने रामगीरचा किल्ला जिंकून घेतला. पावसाळा संपल्यावर तो घाटमाथा उतरून परत सपाटीच्या प्रदेशात आला. युक्तिप्रयुक्तिचा उपयोग करून आणि द्रव्याच्या देणगीने त्याने खेळण्याच्या किल्ल्याचा ताबा मिळविला. या कालापर्यंत हा किल्ला मुसलमानांच्या ताब्यात अजूनपर्यंत कधीही आलेला नव्हता. पुढील वर्षाच्या पावसाळ्याच्या आगमनाची चाहूल लागताच त्याने मागील वर्षी केलेल्या उपाय-योजनांचीच फिरून अंमलबजावणी केली. पावसाळ्याचे चार महिने संपल्यावर त्याने शंकररायाच्या प्रदेशावर चाल केली. तो प्रदेश त्याने बेचिराख केला आणि पूर्वीचा मलिक उत्तुज्जार खलफ हसन बसरी आणि त्याचे सैन्य यांची जी कत्तल झाली होती तिचा भरपूर बदला घेतला. [ २ ] ( ४८५ ) यानंतर ख्वाजा महमूद गावान याने गोव्याचे बंदर आणि बेट यावर चाल केली. गोवा हे त्यावेळी विजयनगरच्या राजाच्या ताब्यात होते. गोव्याविरुद्ध त्याने समुद्र मार्गाने हल्ला करण्यासाठी १२० गलबते रवाना केली, आणि खुष्कीच्या मार्गाने तो स्वतः गोव्यावर हल्ला करण्यासाठी चाल करून गेला. विजयनगरच्या राजाकडून विरोधादाखल कोणतीही हालचाल होण्याचे आत त्याने गोव्यावर आपले वर्चस्व प्रस्थापित केले. या अतिशय महत्त्वाच्या अशा विजयाची बातमी जेव्हा महमद शहाला कळली तेव्हा त्याने सात दिवसपर्यंत विजयनिदर्शनादाखल [१५७□ १५७अ*] शहाजणे वाजविण्याचा आणि इतर उत्सव समारंभ करण्याचा हुकूम दिला. [१५८□]

(हिजरी ८७५ इ. स. १४७०)

( २२५ ) ख्वाजा महमूद गावान याने अतिशय सुसज्ज अशी शिबंदी गोवा बंदराच्या रक्षणासाठी ठेवली. त्याचप्रमाणे इतर सर्व तऱ्हेच्या प्रत्येक वस्तूचा भरपूर पुरवठा त्याने गोव्यात केला आणि जवळ जवळ ३ वर्षांच्या गैरहजेरीनंतर तो अहमदाबाद बिदर या राजधानीच्या शहरी परतला. [१५८अ*] याप्रसंगी सुलतानाने एक आठवडाभर महमूद गावानच्या निवासस्थानी पाहुणचार घेतला व त्याच्यावर अनपेक्षित मेहेरनजर दाखविली. गावानला त्याने आपल्या खास पोषाखाचा संच देणगीदाखल देऊन त्याच्यावर अनेक पदव्यांची खैरखैरात केली. राजमातेने तर त्याला

आपल्या भावासमान मानले.[१५९] खुष कदम हा गावानच्या सेनाविभागाचा सेनापती होता. वर उल्लेखिलेल्या अतिशय कठीण अशा मोहिमात त्याच्याकडून अतुलनीय शौर्याची कामगिरी पार पाडली गेली होती. महमूद गावानच्या शिफारसीवरून त्याला उच्चपदावर चढविण्यात आले. त्याला किश्वरखान हा किताब देण्यात आला आणि त्याच्या स्वतःच्या वैयक्तीक जहागिरी व्यतिरिक्त त्याला गोवा, फोंडा, कंदवल आणि कोल्हापूर हे किल्ले जहागिरी दाखल देण्यात आले.[१६०] महमदशहा हा महमूद गावानचे प्रासादातून निघून गेल्यानंतर महमूद गावान हा स्वतःच्या खोलीत [२](४८६) गेला. आपला भपकेदार पोषाख त्याने अंगावरून काढून टाकला आणि जमिनीवर एकाएकी लोळण घेऊन त्याने मुक्त कंठाने रुदन सुरू केले. अश्रूंना वाट करून दिल्यावर तो बाहेर आला आणि त्याने फकिराचा वेष परिधान केला. यानंतर त्याने अतिशय धार्मिक प्रवृत्तीच्या आणि विद्वान मंडळींना व त्याचप्रमाणे अहमदाबाद बिदरमधील सर्व सय्यदांना एकत्र बोलावू पाठविले. त्या सर्वांमध्ये त्याने आपले फक्त हत्ती, घोडे आणि वाचनालय एवढे खेरीज सोडून आपली इतर बहुतेक सर्व संपत्ती, हिरेमाणके आणि इतर धनसंचय वाटून टाकली. त्यावेळी त्याने असे उद्गार काढले ' धन्य त्या परमेश्वराची ! मोहापासून मी बचावलो आहे आणि संकटापासून माझी मुक्तता झाली आहे.'

( २२६ ) मुल्ला शम्सुद्दीन याने गावानला असे विचारले की ' तुम्ही आपले ग्रंथालय, हत्ती, आणि घोडे खेरीज करून सर्व संपत्ती वाटून टाकण्याचे कारण काय.' यावर महमूद गावानने उत्तर दिले ' जेव्हा बादशहाने मला भेट देऊन माझा सन्मान केला आणि राजमातेने मला आपला भाऊ मानले तेव्हा माझ्या मनातील दुष्ट प्रवृत्तींनी माझ्या मनातल्या सत्प्रवृत्तीवर कुरघोडी मिळविली. इतकेच नव्हे तर माझ्या मनामधील सद्गुण आणि दुर्गुण यामधील संघर्ष इतक्या पराकोटीला पोहोचला की प्रत्यक्ष बादशहाच्या समोर असतानादेखील माझ्या मनात चलबिचल निर्माण झाली. बादशहानी कृपावंत होऊन माझ्या चलबिचलीचे कारण विचारले. माझ्या मनोविकाराचे कारण माझा आजार आहे असे खोटेच सांगणे मला भाग पडले. यावर बादशहानी मला काही काळ विश्रान्ती घेण्याचा सल्ला दिला आणि ते राजवाड्याकडे परतले. या कारणासाठी म्हणून वाईट गोष्टीबद्दल मनात मोह निर्माण करणारी जी संपत्ती तिला मी माझ्यापासून दूर केले. मी माझ्याजवळ ग्रंथालय ठेवले याचे कारण विद्यार्थ्यांनी त्याचा उपयोग करावा म्हणून तर हत्ती आणि घोडे ही मी सुलतानाच्या मालकीची असून एका मोसमासाठी माझ्या उपयोगाकरता त्याने दिली असे समजतो'. या दिवसानंतर ख्वाजा महमूद गावान हा नेहमी साधा पोषाख धारण करीत असे. जेव्हा जेव्हा राज्यकारभाराच्या कटकटीतून त्याची मोकळीक होई तेव्हा तेव्हा तो [ २ ] ( ४८७ ) स्वतःचा दर्गा आणि विद्याभ्यासालय यात जाऊन बसे आणि त्या ठिकाणी विद्वान आणि कृपाळूपणा आणि गुणवेत्तेपणाबद्दल प्रसिद्ध असलेल्या मंडळींच्या सहवासात आपला वेळ व्यतीत करी. शुक्रवारी रात्री तो पोषाख बदलून शहराच्या वेगवेगळ्या

भागात फिरत असे आणि गोरगरिबांना दान देत असे. दानाची भिक्षा देताना तो असे उद्गार काढी की 'हे दान बादशहाकडून आलेले आहे'. महमूद गावानच्या या वर्तणुकीकडे यत्किंचितही लक्ष न देता हलकटपणा आणि कारस्थानीपणा याकडे स्वभावतःच प्रवृत्ती असलेल्या दक्षिणेतील लोकांनी अशा सद्‌गुणी वजिरावर लाचलुचपतीचा आरोप केला आणि त्याच्या जीवनाची अवेळी इतिश्री घडवून आणली. ती हकीकत यापुढे यथाक्रमाने सांगण्यात येईलच. [१६०अ*]

(२२७) हिजरी ८७६ या वर्षी ओरियाचा राजा अंबर राय याने महमदशहाकडे
हिजरी ८७६ } तक्रार केली की ओरियाचे [१६१□] राजे मृत झाले असून मंगलराय
इ. स. १४७१ } नावाच्या त्यांच्या एका ब्राह्मण मानस पुत्राने राज्याच्या वारसदारीवर प्रथम माझा अधिकार असताना देखील, मला धुडकावून लावून राज्याचा कारभार बळकाविला आहे. मी आपल्याला असे वचन देतो की आपण आपली फौज माझ्या मदतीला देऊन माझे अधिकार प्राप्त करून घेण्यास मला मदत केली तर मी आपला मांडलीक होऊन राहीन. राजमहेन्द्री आणि कोंडापल्ली यासह ओरियाचा सर्व प्रदेश आपण जिंकून घ्यावा अशी महमदशहाची दुर्दम्य महत्त्वाकांक्षा होती. त्याला ओरियाच्या राजाकडून आलेली विनंती म्हणजे आपले ईप्सित प्राप्त करून घेण्यासाठी इष्टापत्तीच वाटली. त्यास अनुसरून त्याने ख्वाजा महमूद गावान याच्या सल्ल्यावरून मलिक हसन बहरी याला निजामउल्मुल्क हा किताब बहाल केला आणि मोठे सैन्य घेऊन ओरियाच्या प्रदेशाकडे चाल करून जाण्याबद्दल त्याला आदेश दिला. ओरियाच्या सरहद्दीवर त्याला अंबरराय आपल्या सैन्यासहित येऊन मिळाला. या सैन्याच्या मार्गदर्शनाखाली बहमनी सैन्याने मंगलरायाविरुद्ध चाल केली. राज्य बळकविणाऱ्या मंगलरायाचा पराभव करण्यात आला आणि अंबररायाची त्याच्या वारसाहक्काने चालत आलेल्या प्रदेशावर अधिपती म्हणून स्थापना करण्यात आली. यानंतर निजामउलमुल्क याने अंबररायासहवर्तमान [२] (४८८) कोंडापल्ली आणि राजमहेन्द्री यावर चाल केली. ही दोन्ही ठिकाणे त्याने जिंकून घेतली आणि महमदशहाच्या हुकमानुसार त्यांच्या व्यवस्थित संरक्षणाची तरतूद व्हावी म्हणून तेथे सुसज्ज लष्करी शिबंदी नियुक्त केली. एवढे केल्यानंतर त्याने अंबररायाला आपल्या देशाकडे जाण्यास परवानगी दिली आणि तो स्वतः अमाप लूट घेऊन दरबाराकडे येण्यासाठी परत फिरला. या प्रसंगी राजमाता आणि ख्वाजा महमूद गावान यांच्या शिफारसीवरून निजामउल्मुल्क याची तेलंगणाच्या सुभेदारीवर कायम नियुक्ती करण्यात आली. याच सुमारास दर्याखान ऊर्फ इमादउल्मुल्क याची नेमणूक वऱ्हाडच्या सुभेदारीवर करण्यात आली. युसुफ आदिलखान सवाई हा ख्वाजा महमूद गावानचा अनुयायी होता. अंगात असलेल्या थोरथोर आणि उत्तमोत्तम गुणाबद्दल त्याची ख्याती होती. ख्वाजा महमूद गावानने त्याला आपल्या मुलाचे ठिकाणी मानले होते. राज्यामधील अतिशय महत्त्वाच्या जागेवर म्हणजे दौलताबादचे सुभेदारीवर त्याची नेमणूक करण्यात आली.

महमदशहाची युसुफ आदिलखानाच्या कर्तृत्वाबद्दल पूर्णपणे खात्री पटल्यामुळे त्याने वैरागडचा[१६२] किल्ला जिंकून घेण्याचा आणि अंतूरचा किल्ला परत मिळविण्याचा त्याला आदेश दिला. माळव्याच्या स्वारीचे वेळी हा किल्ला एका मराठा अधिपतीच्या ताब्यात गेला होता. हा अधिपती बहमनी सुलतानांचे सार्वभौमत्व मानण्यात कुचराई करीत असे. दौलताबाद येथे पोहोचल्यावर युसुफ आदिलखानाने कासिमबेग सफशिकन[१६३] याला अंतूर घेण्यासाठी आणि दर्याखानाला वैरागडच्या विरुद्ध रवाना केले. अंतूरच्या अधिकाऱ्याने आपल्याला पूर्णपणे क्षमा करण्यात यावी या अटीवर किल्ला प्रतिकार केल्याशिवाय कासिमबेगच्या स्वाधीन केला. परंतु वैरागडच्या [२] (४८९) राजाने किल्ल्याला वेढा देणाऱ्या शिबंदीचा ६ महिनेपर्यंत सख्त प्रतिकार केला. या कालावधीचे अखेरीस मदत येण्याची आशा नाही हे जेव्हा त्याला दिसून आले तेव्हा त्याने युसुफ आदिलखानाकडे निरोप पाठवून असे वचन दिले की मला जर जीवदान देण्यात आले तर किल्ल्यातील सर्व मालमत्ता मी तुमच्या स्वाधीन करीन आणि माझ्या कुटुंबियासहित किल्ला सोडून निघून जाईन. युसुफ आदिलखानाने या अटीला आपली मान्यता दिली आणि दर्याखानाला हुकूम देऊन कळविले की कोणताही त्रास न देता राजा विजीसिंग याला किल्ल्यावरील रहिवाशांसहित किल्याबाहेर जाऊ द्यावे. त्याचप्रमाणे राज विजीसिंग याने आपले आश्रित आणि कुटुंबीय मंडळी यासह आपल्या वाडवडिलांचे पूर्वापार चालत आलेले प्राचीन निवासस्थान सोडले. किल्ल्यात असलेली सार्वजनिक संपत्ती आणि वंशपरंपरा चालत आलेली धनदौलत त्याने ठरल्याप्रमाणे पाठीमागे ठेवली. दरम्यान युसुफ आदिलखान हा छावणीत डेरादाखल झाला होता. त्याने त्याच दिवशी किल्ल्यात प्रवेश केला आणि किल्ल्यातील मालमत्तेचा ताबा घेतला. यानंतर त्याने त्या प्रदेशातील प्रमुख प्रजाजन आणि शेतकरी मंडळी यांना संरक्षणाचे आश्वासन देऊन दिलासा दिला. यानंतर तो रांजणी[१६४] किल्यावर चाल करून गेला. किल्लेदाराचा बाप नुकताच मरण पावला होता. आपल्याला जीवदान देण्यात यावे या अटीवर त्याने शरणागती पत्करली. युसुफ आदिलखानाने काही हत्ती, घोडे आणि सुलतानाला देण्यायोग्य अशा इतर वस्तू यांची निवड केली आणि नंतर रांजणीचा राजा अमरसिंग याला आपल्या संरक्षणाखाली घेऊन त्याच्याकडे किल्ला आणि सभोवतालचा मुलूख पुन्हा सुपूर्द केला. यानंतर युसुफ आदिलखान हा अहमदाबाद बिदर येथे परत फिरला. त्याने सुलतानाला अनेक हत्ती आणि घोडे नजर केले आणि त्याशिवाय इतके द्रव्य आणि हिरे सुलतानासमोर ठेवले की त्यांच्याशी तुलना करता राजमहेन्द्री आणि नैालगोंडा येथील भारी लूट कःपदार्थ ठरली. या कारणास्तव महमदशहाने युसुफ आदिलखानावर मानमरातबांची खैरखैरात केली. त्यावेळी त्याने असे [२] (४९०) उद्गार काढले की ज्याला ख्वाजा महमूद गावानसारखा पिता लाभला आहे त्याच्या हातून अशा तऱ्हेची महत्त्वाची कामगिरी पार पडणार नाही असे होणारच नाही. याप्रसंगी

सुलतानाने ख्वाजा महमूद गावानला असा आदेश दिला की तू आपल्या स्वतःच्या घरी युसुफ आदिलखानाचा एक आठवडाभर मोठ्या थाटामाटाने पाहुणचार कर. यावर महमूद गावानने उत्तर केले की खुद्द सुलतान हजर असल्याशिवाय कोणताही समारंभ अपुराच राहील. अर्थात दुसऱ्या पाहुण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या पाहुणचाराचा समारंभात भाग घेण्याचे महमदशहाने नाकारले. परंतु त्याने महमूद गावानला असे वचन दिले की आदिलखानाचा पाहुणचार संपल्यानंतर मी एका आठवड्यासाठी तुझ्या घरी भेट देण्यासाठी येईन.

(२२८) या वचनानुसार आठव्या दिवशी महमदशहाने महमूद गावानच्या प्रासादाकडे गमन केले. तेथे सतत आठवडाभर त्याने मोठ्या थाटामाटाच्या पाहुणचारात वेळ घालविला. युसुफ आदिलखानाला त्याने आपल्याबरोबर मदिरासेवन करण्याची परवानगी देऊन त्याच्यावर मेहेर नजर दाखविली. या प्रसंगी ख्वाजा महमूद गावान याने सुलतानाचा अनुपमेय अशा थाटामाटाने पाहुणचार केला एवढेच नव्हे तर शुद्ध सोन्याने काठोकाठ भरलेली पन्नास पात्रे त्याला नजर केली. या पात्रांवरचे आवरण हिऱ्यांनी मढविण्यात आलेले असून एक एक पात्र पकवलेले कोकरू राहील एवढे मोठे होते. त्याचप्रमाणे गायन आणि वादनामध्ये तरबेज असलेले सिरकॅशिया, जॉर्जिया आणि हबसाणातील १०० गुलाम, अरेबिया, सिरीया आणि आशिया मायनॉर या देशांतील १०० घोडे आणि फारच थोड्या राजपुत्रांच्या राजवाड्यांशिवाय इतरत्र कुठेही नजरेस न पडणारी अशी १०० उत्कृष्ट चिनीमातीची पात्रे वगैरे गोष्टीही त्याने सुलतानाला नजर केल्या. शेवटच्या दिवशी त्याने सुलतानाच्या राजपुत्रांना आणि दरबारातील सर्व कारभारी मंडळींना मौल्यवान अशा भेटी अर्पण केल्या. नंतर त्याने आपल्या जवळील सर्व मालमत्तेची नोंद केलेली एक यादी सुलतानाला सादर केली आणि तो सुलतानाला म्हणाला ह्यावर आपली पूर्णपणे मालकी आहे. या मालमत्तेचा आपण ताबा घ्यावा अशी माझी इच्छा आहे. आपल्या ठिकाणी महमूद गावानने जी आत्मीयता अशा तऱ्हेने दाखविली त्याचे महमदशहाला कौतुक वाटले. त्याने महमूद गावानची सर्व मालमत्ता [२] (४९१) खरोखरच आपल्या ताब्यात आली आहे असे दाखविले आणि त्याला जे जे पावले ते ते सर्व त्याने महमूद गावान याला पुन्हा बहाल केले. [१६५] राज्यामध्ये आता ख्वाजा महमूद गावान आणि युसुफ आदिलखान यांचे वजन एवढे वाढले की राज्यातील सर्व अमिर-उमराव त्यांच्या पुढे पुढे करू लागले आणि त्यांचा द्वेषही करू लागले. तर इकडे दक्षिणी लोकांनी जखमी झालेले विषारी जनावर ज्याप्रमाणे त्वेषाच्या यातनांत तडफडत असते त्याप्रमाणे त्या दोघांचा नाश करण्याची एकजुटीने शपथ घेतली.

(२२९) हिजरी ८७७ या वर्षी बेळगावच्या किल्ल्याचा राजा बिरकनराय [१६६]

हिजरी ८७७ / इ. स. १४७२ } याने विजयनगरच्या राजाच्या चिथावणीवरून आणि बंकापूरच्या हिंदू अधिपतीने गोव्याचे बेट पुन्हा जिंकून घेण्यासाठी चाल केली. या शत्रुत्व निदर्शक तयारीची बातमी जेव्हा महमदशहा याला मिळाली तेव्हा त्याने आपल्या फौजेची जमवाजमव केली आणि तो बेळगावच्या[१६७ब] किल्ल्यावर चाल करून गेला. बेळगावचा किल्ला अतिशय बळकट असून त्याच्या सभोवार पाण्याने भरलेला खोल खंदक होता. किल्ल्याकडे जाण्यासाठी फक्त एकच वाट असून ती एका खिंडीमधून होती आणि ठिकठिकाणी तट बांधून मजबूत करण्यात आली होती. या बेळगावच्या किल्ल्याला सुलतानाने वेढा दिला. आपले पुढील भवितव्य सुरक्षित राहावे या हेतूने बिरकनरायाने गुप्तपणे तहाच्या अटीसंबंधी बोलणी करण्यासाठी ख्वाजा महमूदकडे आपली [२] (४९२) माणसे पाठविली. परंतु महमदशहाने आपल्या सामर्थ्याचे प्रदर्शन करण्यासाठी आणि इतर किल्लेदारांमध्ये प्रतिकार करण्याची इच्छाशक्ती निर्माण होऊ नये या कारणास्तव म्हणून कोणत्याही अटींना मान्यता देण्याचे सपशेल नाकारले आणि किल्ल्यावर हल्ला करून तो जिंकून घेण्याचा निश्चय केला. त्याने तोफखान्यावरील अधिकाऱ्यांना बजाविले की तुम्हाला जर आपल्या जीविताची किंमत असेल तर तुम्ही १४ दिवसांच्या आत किल्ल्याच्या भिंतींना सैनिकांना प्रवेश करता येईल असे भगदाड पाडा. त्याचप्रमाणे त्याने ख्वाजा महमूद गावान याजकडे किल्ल्यासभोवारचा खंदक-भरून काढण्याची कामगिरी सोपविली आणि त्याला असे सांगितले की जेव्हा तोफांच्या भडिमाराने किल्ल्याच्या तटांना भगदाड पडेल तेव्हा सैनिकांना आतमध्ये प्रवेश करण्यासाठी खंदकावरून जाण्यासाठी मार्ग तयार व्हावा अशी माझी अपेक्षा आहे. जरी ख्वाजा महमूद गावान हा दिवसभरात मातीचे प्रचंड ढिगारे आणि लाकडे ही खंदकात भरभरून टाकीत असे तरीदेखील रात्रीच्या वेळी शत्रूचे लोक माती आणि लाकडे काढून टाकून खंदक पूर्णपणे रिकामा करीत. त्यामुळे ख्वाजा महमूद गावान याने आपल्या हालचालीचे क्षेत्र बदलले आणि त्याने खंदक खोदण्यास आणि सुरुंग भरण्यास सुरुवात केली. दक्षिणेतल्या लोकानी युद्धनीतीचे हे तत्त्व अजूनपर्यंत प्रत्यक्ष उपयोगात आणले नव्हते. आपल्या किल्ल्याभोवती पाण्याचा खंदक आहे आणि म्हणून आपण सुरक्षित आहोत या स्वप्नात बिरकनराय गुंग होता तोच एकाएकी ख्वाजा महमूद गावान, युसुफ आदिलखान आणि फतेउल्ला इमाद उल्मुल्क यांच्या ठाण्यापासून किल्ल्याच्या भिंतीपर्यंत जमिनीतून जे सुरुंग भरण्यात आले होते त्यांचा भडका उडाला आणि त्यामुळे किल्ल्याच्या तटांना खिंडारे पडली. [१६७अ] किल्ल्याचे संरक्षण करण्यासाठी बिरकनरायाच्या फौजांनी मोठ्या त्वेषाने चाल केली आणि त्यांच्या आणि मुसलमानी फौजांमध्ये झालेल्या धुमश्चक्रीत सुलतानाची २००० माणसे रणांगणावर किल्ल्यावर चाल करून किल्ला घेण्याच्या प्रयत्नात गारद झाली. किल्ल्यातील शिबंदीने लाकूड आणि दगड यांच्या साहाय्याने तटाला पडलेले खिंडार जवळ जवळ दुरुस्त केले होते तोच महमदशहाने हल्ला

करण्यासाठी चाल करून समोर असलेल्या शत्रूला हाकलून लावले आणि किल्ल्याच्या तटबंदीवर कबजा मिळविला. किल्ल्यावर हल्ला करण्याची कारवाई करीत असताना बिरकनरायाने स्वतः दुसरा वेष धारण केला आणि तो राज सेवकांजवळ [२] (४९३) आला. त्याने त्यांना अशी विनंती केली की मी बिरकनरायाचा निरोप्या आहे. तुम्ही मला तुमच्या बादशहाकडे घेऊन चला. सुलतान महमदशहाच्या समोर आल्यानंतर त्याने आपले पागोटे आपल्या मानेभोवती वेढले आणि तो आपल्या खऱ्या स्वरूपात प्रगट झाला. तो सुलतानाला म्हणाला की मी आपल्या कुटुंबिया-समवेत या सिंहासनाच्या पायाचे चुंबन घेण्यासाठी आलो आहे. बिरकनरायाने या प्रसंगी आत्मविश्वास आणि मनाचा मोठेपणा या गुणांचे जे प्रदर्शन केले त्याच्या योगे महमदशहा अतिशय खूष झाला आणि त्याने बिरकनरायाला आपल्या दरबारातील सरदारांमध्ये दाखल करून घेण्याची आज्ञा केली. अशा तऱ्हेने प्रतिकार थांबल्या-वर सुलतानाने किल्ल्यात प्रवेश केला आणि आपल्याला मिळालेल्या विजयाबद्दल त्याने परमेश्वराचे आभार मानले. त्याने बेळगाव आणि बेळगावच्या ताब्यातील परिसरातला इतर मुलूख ख्वाजा महमूद गावानच्या जहागिरीत दाखल केला आणि नंतर तो राजधानीकडे परत फिरला. या मोहिमेत राजमाता आपल्या मुलाबरोबर गेली होती. तिच्या शहाणपणामुळेच बहमनी राज्य उच्चस्थितिप्रत येऊन पोहोचले होते. राजधानीकडे येत असताना वाटेतच तिला मृत्यू आला. तिचा मृत देह दफन करण्यासाठी सुलतानाने मोठ्या थाटामाटाने अहमदाबाद बिदरकडे रवाना केला. १६७३★

(२३०) जेव्हा सुलतानाची स्वारी विजापूर शहरापाशी येऊन पोहोचली तेव्हा ख्वाजा महमूद गावान याच्या विनंतीवरून महमदशहाने झालेल्या श्रमांचा परिहार करण्यासाठी तेथे मुक्काम केला. ख्वाजा महमूद गावानने त्याठिकाणी आईच्या मृत्यूने सुलतानाला जे दुःख झाले होते ते दूर करण्याचा प्रयत्न केला. विजापूर शहराची जी एकंदर रचना होती त्यामुळे सुलतान खूष झाला. तेथे त्याने सबंध पावसाळा मोठ्या आनंदाने राहून काढला असता परंतु त्यावेळी दक्षिणेत इतका भयंकर दुष्काळ पडला होता की विहिरीमधले पाणी आटून गेले होते. त्यामुळे सुलतानाला आपल्या मनाच्या विरुद्ध आपल्या सैन्यासह अहमदाबाद बिदरकडे फिरणे भाग पडले. पुढील वर्षी देखील पाऊस पडला नाही आणि परिणामी शहरेच्या शहरे लोकांच्या अभावी ओसाड पडली. अनेक रहिवासी दुष्काळी अवस्थेमुळे मरण पावले तर अनेकजण अन्नासाठी माळवा, जजनगर आणि गुजरातेकडे निघून गेले. तेलंगण, महाराष्ट्र आणि बहमनी [२] (४९४) राज्यांत सर्वत्र दोन वर्षेपर्यंत अन्नधान्याची लागवड झाली नाही. तिसऱ्या वर्षी जेव्हा परमेश्वराने आपल्या कृपाप्रसादाचा महापूर वर्षाव पृथ्वीवर केला तेव्हा जमिनी नांगरण्यासाठी देशात थोडेफार शेतकरी देखील शिल्लक राहिले नव्हते. १६९७

(२३१) ह्या भयंकर दुष्काळाचे निवारण होऊन थोडाफार काळ लोटतो आहे न लोटतो तोच आणि झालेल्या आबादीच्या नाशापासून देश थोडेफार डोके वर काढू लागतो आहे तोच अशी बातमी आली की कोंडापल्ली येथील शिबंदीने बंडाचे निशाण पुकारले आहे. इतकेच नव्हे तर त्यांनी तेथील सुभेदाराला ठार मारून त्याच्या आश्रितांची मालमत्ता जप्त केली आहे आणि महमदशहाच्या मुळात कृपाछत्राखाली असलेल्या भीमराज ओरिया नावाच्या माणसाच्या ताब्यात किल्ला दिला आहे. किल्ला आपल्या ताब्यात अशा तऱ्हेने आल्यावर भीमराजाने आपल्याकडील माणसे ओरिसाच्या राजाच्या भेटीसाठी रवाना केली आणि त्याला असे निवेदन केले की तुमचे तेलंगणातील वंशपरंपरेने चालत आलेले राज्य तुम्हाला परत हिसकावून घ्यावयाचे असेल तर ती संधी आता आली आहे कारण दक्षिणेतील साधनसामुग्री दोन वर्षांच्या दुष्काळामुळे संपुष्टात आलेली आहे आणि सैन्याची संख्या रोडावून त्यात फक्त थोड्या तुकड्याच उरल्या आहेत. भीमराजाने असेही कळविले की मुसलमानांकडून तुम्ही जो प्रदेश जिंकून घ्याल त्यात जर मला सहभागी करणार असाल तर आणि तूर्त मला कोंडापल्लीचा किल्ला आणि जिल्हा ताब्यात ठेवण्याची परवानगी देत असाल तर तुमच्या मोहिमेत सामील होण्याचे वचन मी तुम्हाला देतो. ओरिसाच्या रायाने या आवाहनाचा फायदा घेतला आणि १०००० घोडेस्वार आणि ८००० पायदळी फौज जमा केली. नंतर त्याने जजनगरच्या राजाला आपल्या मदतीसाठी येण्याची हाक दिली आणि यत्किंचितही विलंब न लावता त्याने तेलंगणात प्रवेश केला. राजमहेन्द्रीचा सुभेदार निजाम उल्मुल्क याला एवढ्या प्रचंड [२] (४९५) फौजेबरोबर मुकाबला करता येणे अशक्य झाल्यामुळे त्याने त्या किल्ल्यात आपल्याला कोंडून घेतले आणि एकंदर परिस्थितीचा वृत्तान्त दरबाराकडे त्याने रवाना केला.

(२३२) ख्वाजा महमूद गावान याच्या सल्ल्यावरून महमदशहाने काफरांवर स्वतः चालून जाण्याचा निश्चय केला. त्यानुसार त्याने आपल्या फौजेला एक वर्षाचा आगाऊ पगार दिला आणि शक्य तितक्या जलद गतीने त्याने आपल्या कुचीला सुरुवात केली. कूच करत तो राजमहेन्द्री येथे येऊन पोहोचला परंतु शत्रूने रणांगणात त्याच्याबरोबर उघडउघड सामना देण्याचे टाळले. भीमराज हा कोंडापल्लीच्या किल्ल्याकडे परत फिरला आणि ओरिसाच्या राजाने राजमहेन्द्री येथे नदी पार करून आपल्या राज्याकडे जाण्यासाठी माघार घेतली. काहीही कारण नसताना आपल्या राज्यावर झालेल्या आक्रमणाची महमदशहाला अतिशय चीड आली होती. त्याने ख्वाजा महमूद गावान याला राजपुत्र महमूदखान याजबरोबर राजमहेन्द्री येथे ठेविले आणि त्याने स्वतः २०००० घोडेस्वार घेऊन त्या बंडखोर काफरांना शासन करण्यासाठी म्हणून कूच केले. हिजरी ८८२ या वर्षाच्या उत्तरार्धात सुलतानाने ओरिसाच्या राजधानीपर्यंत मुसंडी मारली. कसलीही दयामाया न दाखविता तेथील रहिवाशांची

हिजरी ८८२ }
इ. स. १४७७ }

त्याने कत्तल केली आणि त्याचबरोबर शत्रूचा प्रदेश जाळूनपोळून उद्ध्वस्त केला. ओरिसाच्या राजाने आपल्या राज्याच्या अगदी एका टोकाला आपले सैन्य काढून घेतल्यामुळे मुसलमानांनी घातलेल्या धुमाकुळाला कोणताच प्रतिकार झाला नाही आणि त्यांनी ओरिसामधील प्रजाजनांपासून खंडणीची रक्कम वसूल केली. सरतेशेवटी सुलतानाने ख्वाजा महमूद गावान आणि राजपुत्र महमूदखान यांना तेथे बोलावून घेऊन ओरिसा प्रांत त्यांच्या ताब्यात सुपूर्द करण्याचे ठरविले. त्याचप्रमाणे नवीन जिंकलेला प्रांत कायमचा आपल्या राज्यात सामील करून घेण्याचाही त्याने निश्चय केला.

(२३३) सुलतानाच्या मनसुब्यांच्या हकीकती ओरिसाच्या राजाच्या कानी गेल्या तेव्हा त्याने अनेकवार आपले वकील हत्ती आणि इतर मौल्यवान वस्तूंचे नजराणे बरोबर देऊन सुलतानाला भेट देण्यासाठी म्हणून रवाना केले. [२] (४९६) त्यात त्याचा उद्देश सुलतानाचे मन आपल्याला क्षमा करण्यासाठी वळवावे असा होता. आपल्या वकिलांबरोबर त्याने असे निष्ठापूर्वक निवेदन पाठविले की यापुढे भविष्यकाळात मी तेलंगणामधील जमीनदारांना कोणत्याही प्रसंगी मदत करणार नाही. त्यावर सुलतानाने त्याला असे उत्तर पाठविले की तू जर मी सांगेन ते २५ हत्ती जे पूर्वी तुझ्या बापाच्या मालकीचे होते ते मला देण्याचे कबूल करशील तर तह करण्याची माझी तयारी आहे. ओरिसाच्या रायाला हे हत्ती त्याच्या प्राणापेक्षाही अधिक मोलाचे होते तरीदेखील ही मागणी नाकारण्याचे धाडस त्याच्याने झाले नाही. त्याप्रमाणे सुलतानाने मागितलेले हत्ती भरजरी साज अंगावर चढवून आणि सोंडेमध्ये सोने आणि चांदी यांचे साखळदंड घालून सुलतानाकडे रवाना करण्यात आले. त्यानंतर सुलतानाने ओरिसामधून आपल्या राज्याकडे जाण्यासाठी म्हणून काढता पाय घेण्यास सुरुवात केली.

(२३४) रस्त्यामध्ये एक दिवस नेहमीच्या मार्गापासून थोडासा दूर सुलतान शिकार करण्यामध्ये गुंतला असताना त्याने एका उंच टेकडीवर बांधलेला एक किल्ला बघितला. तो अधिक जवळून बघण्यासाठी आपल्या अनुचरासह सुलतान गेला. तेथे असलेल्या काही लोकांजवळ त्याने तो किल्ला कोणाच्या ताब्यात आहे याबद्दल चौकशी केली. त्यांनी उत्तर दिले की तो किल्ला ओरिसाच्या राजाच्या मालकीचा आहे आणि कोणतीही सत्ता तो किल्ला जिंकून घेण्याचा अविचारीपणा करण्याचे धाडस दाखवू शकणार नाही. सुलतानाला या उत्तराचा अतिशय संताप आला आणि त्याने किल्ल्याच्या पायथ्याजवळ मुक्काम केला. दुसऱ्या दिवशी त्याने किल्ल्याच्या वेढ्याचे काम सुरू केले. परंतु वेढा जवळ जवळ दीड महिना चालून देखील सुलतानाला यशाची प्राप्ती झाली नाही. या कालावधीनंतर ओरिसाच्या रायाने आपल्या नागरिकांनी दाखविलेल्या उद्धटपणाबद्दल क्षमायाचनेचे पत्र रवाना केले. त्यात त्याने आपल्या नागरिकांची सभ्यपणाच्या वागणुकीचा परिचय नसलेले विदूषक या शब्दांत संभावना केली. त्याने सुलतानाला अशीही विनंती केली की आपण हा किल्ला जिंकून आपलासा

केला आहे असे समजावे परंतु आपला एक मांडलिक म्हणून किल्ला पुन्हा माझ्या ताब्यात द्यावा. मोठ्या कौशल्यपूर्वक मागितलेल्या या माफीच्या दिलगिरीमुळे सुलतान खूष झाला. त्याने किल्ल्याचा वेढा उठविला आणि आपल्या कुचीला सुरुवात केली.

(२३५) महमदशहा यानंतर कोण्डापल्लीसमोर ठाण मांडून बसला आणि सहा महिन्यानंतर अतिशय हलाखीची परिस्थिती ओढविल्यामुळे भीमराजाने सुलतानाकडे क्षमायाचनेची बोलणी सुरू केली. सुलतानाने भीमराजाला काही सरदारांच्या मध्यस्थी-मुळे क्षमा केली. त्याने किल्ला आणि शहर सुलतानाच्या फौजांच्या ताब्यात दिले. सुलतान यानंतर किल्ला पाहण्यासाठी गेला असताना त्याने मूर्तिपूजकांच्या [२] (४९७) एका देवळाचा विध्वंस केला आणि त्या देवळाचे काही पुजारी जे ब्राह्मण होते त्यांना त्यान आपल्या हाताने जणू काही आपण आपल्या धर्माच्या आदेशाप्रमाणेच वागत आहोत असे समजून ठार मारले. यानंतर त्यान देवळाच्या चौथऱ्यावर मशिद उभी करण्यात यावी असा हुकूम दिला. यानंतर तो स्वतः चवुतऱ्यावर उभा राहिला आणि काही प्रार्थनांचे पठण करून दान धर्म केला व खुत्बा आपल्या नावाने वाचला जावा अशी आज्ञा जाहीर केली. या घटनेनंतर ख्वाजा महमूद गावान यान सुलताना-पाशी निवेदन सादर केले की बादशहानी काही काफरांना स्वहस्ताने कंठस्नान घातले असल्याने ज्या पदवीबद्दल आपल्याला अतिशय अभिमान वाटतो ती गाजी ही पदवी आपण धारण करणे हे अतिशय उचित असेच कृत्य होईल. महमदशहा हा त्याच्या घराण्यातील पहिलाच सुलतान की ज्यान ब्राह्मणांचा वध केला. [१६९ब] दक्षिणेतील लोकांची अशी धारणा झाली की हे कृत्य अपशकून निदर्शक असे होते. त्यातूनच सुलतानाला स्वतःला आणि त्याच्या कुटुंबातील मंडळींना विवंचनेत आणणाऱ्या आणि अखेर ज्याचा शेवट बहमनी घराण्याचे विसर्जन होण्यात झाला – त्या अनेक कटकटी निर्माण झाल्या.

(२३६) ख्वाजा महमूदच्या सल्ल्यानुसार महमदशहा जवळ जवळ तीन वर्षे राजमहेन्द्री येथे राहिला. या अवधित त्याने जिंकून घेतलेला प्रदेश स्थिरस्थावर केला आणि त्या देशाच्या सीमेवरील प्रदेशात जरूर ती लष्करी ठाणी स्थापन केली. हुकमांचे पालन न करणाऱ्या बंडखोर जमीनदारांची त्याने हकालपट्टी केली आणि सर्व तेलंगणावर त्याने आपला ताबा केला. त्यानंतर त्यान नरसिंग रायाच्या ताब्यातील प्रदेश जिंकून घेण्याचा निश्चय केला. त्याचप्रमाणे तेलंगणाच्या प्रांतावर कोणाला सुभेदार नेमावयाचे या विषयावर त्याने आपल्या मंत्र्यांबरोबर विचारविनिमय केला. मंत्री ख्वाजा महमूद गावान याने उत्तर दिले की हा अधिकार ग्रहण करण्यास [२] (४९८) योग्य असा निजामउल्मुल्कावाचून मला दुसरा कोणी दिसत नाही. सुलतानाला महमूद गावानची निवड पसंत पडली आणि त्यान राजमहेन्द्री, कोण्डापल्ली आणि इतर अनेक ठिकाणे निजामउल्मुल्काच्या देखरेखीखाली सोपविली. [१६९ अ ★] वरंगळ आणि इतर जिल्हे त्याने अजीमखानाच्या ताब्यात सोपविले आणि नंतर

त्याने नरसिंग रायाच्या प्रदेशाकडे कूच करण्यास सुरुवात केली. अजीमखानाला आपल्या सुभेदारीच्या प्रांतात वेगळा असा स्वतंत्र अधिकाराचा दर्जा मिळाल्याचे निजामउल्मुल्काला वैषम्य वाटले. त्याने सुलतानाकडे अर्जी सादर केली की माझे सुभेदारीचे अधिकार मी माझ्या मुलांपैकी एखाद्याकडे सोपवितो आणि मी स्वतः बादशहाच्या समवेत सेवेसाठी नेहमी सादर राहतो. या अर्जीला सुलतानाने उत्तर दिले की आमचा उद्देश देशाचे संरक्षण कसे होईल याची तजवीज करण्याचा असतो. तो उद्देश कोणाच्या हस्ते साध्य होऊन पार पडावा या बाबीशी आम्हाला यत्किंचितही कर्तव्य नाही. असे म्हणतात की निजामउल्मुल्क हा अतिशय महत्त्वाकांक्षी आहे याची ख्वाजा महमूद याला जाणीव झाली होती. निजामउल्मुल्क याचा मुलगा मलिक अहमद याचे नुकतेच सुलतानाच्या अंतःपुरातील एका तरुणीबरोबर लग्न झालेले होते. आपल्या बापापेक्षाही अधिक महत्त्वाकांक्षा त्याच्या अंगी होती आणि म्हणून बापाबरोबर एकाच प्रांतात त्याची अधिकारावर नियुक्ती व्हावी अशी ख्वाजा महमूद गावान याची इच्छा नव्हती. ज्यावेळी पहिल्या प्रथम निजामउल्मुल्क याची राजमहेन्द्रीचा सुभेदार म्हणून नेमणूक झाली तेव्हा त्याने मलिक अहमदची नेमणूक खुदावंदखान हबशी याच्या हाताखाली करण्याबद्दल, त्याला माहूर जिल्ह्यात जहागिरी देण्याबद्दल आणि ३०० स्वारांची मनसब त्याला बहाल करण्याबद्दल सुलतानाचे मन वळविले. यावेळी मात्र महमदशहाने निजामउल्मुल्काने केलेल्या विनंतीला मान तुकविली आणि त्याचा मुलगा मलिक अहमद याला छावणीत बोलावले. महमदशहाने १००० स्वारांच्या मनसबीचा अधिकारी म्हणून त्याला बढती दिली आणि आपल्या बापाचा दुय्यम म्हणून राजमहेन्द्रीकडे जाण्यासाठी म्हणून त्याला परवानगी दिली.

(२३७) कर्नाटक आणि तेलंगणाच्या मध्ये १७०□ पसरलेला प्रदेश ज्याच्या मालकीचा आहे असा नरसिंग राय हा एक बलाढ्य राजा होता. समुद्रकिनाऱ्याच्या बाजूबाजूने त्याचे राज्य मच्छलीपट्टमपर्यंत पसरलेले होते. त्याने स्वतःच्या आक्रमणाने विजयनगरचा बराचसा प्रदेश अनेक मजबूत किल्ल्यांसह आपल्या [२] (४९९) राज्याला जोडला होता. बहमनींच्या सरहद्दीवरील अनेक जमीनदारांना अनेकदा चिथावणी देऊन त्याने बंडाला प्रवृत्त केले होते. सरहद्दीवरील अधिकाऱ्यांना नरसिंग रायाच्या ताकदीशी मुकाबला करून त्याला प्रतिरोध करणे शक्य न झाल्याने त्यांनी अनेकदा त्याच्या वर्तनाबद्दल सुलतानाकडे निवेदने सादर केली होती. परिणामी त्याच्यावर हल्ला करण्यास सुलतान उद्युक्त झाला होता.

(२३८) महमदशहा आपल्या मोहिमेच्या सुरुवातीला १७१□ कूच करीत एका मोडकळीस आलेल्या किल्ल्यापाशी येऊन पोहोचला. तेथे त्याला असे सांगण्यात आले की सरहद्दवासियांच्या मनात दहशत निर्माण करावी म्हणून दिल्लीच्या कोणाएका बादशहाने हा किल्ला बांधला आहे. हे कळल्यावर सुलतानाने तेथे मुक्काम केला आणि विलंब न लावता किल्ल्याची दुरुस्ती करण्याबद्दल त्याने हुकूम सोडला. ख्वाजा महमूद गावान

याने या कामासाठी इतकी मेहनत घेतली की ज्या गोष्टीला दोन वर्षांचा अवधी लागला असता ती गोष्ट केवळ ६ महिन्यांच्या थोड्या अवधित उरकण्यात आली. त्या ठिकाणी शिबंदी ठेवण्यात आली आणि किल्ल्याच्या रक्षणासाठी सर्व तऱ्हेच्या सामुग्रीचा भरपूर साठा तेथे करण्यात आला. हे काम इतक्या अल्पावधीत पार पाडण्यात आलेले जेव्हा महमदशहाने बघितले तेव्हा तो उद्गारला की परमेश्वराने अनंतहस्ताने माझ्यावर दोन अमोज अशा आशीर्वादांची बरसात केलेली आहे. एक म्हणजे मोठे साम्राज्य आणि दुसरा म्हणजे महमूद गावान सारखा सेवक. इतके बोलून त्याने आपले उत्तरीय वस्त्र काढले आणि ते महमूद गावानच्या खांद्यावर टाकले आणि त्याचवेळी महमूद गावानचे उत्तरीय वस्त्र घेऊन ते आपल्या अंगावर पेहेरले. आपल्या एका नागरिकावर एखाद्या सुलतानाने इतका सन्मान बहाल केल्याचे असे उदाहरण कोणत्याही इतिहासाने नमूद केलेले नाही. परंतु पुष्कळदा असे होते [ २ ] ( ५०० ) की अत्युच्च सन्मानाच्या प्राप्तीतून कधीकधी अविश्वास उत्पन्न होतो आणि कधीकधी त्यातून त्या व्यक्तीचा नाश देखील होतो. अशीच हकीकत ख्वाजा महमूद गावानच्या बाबतीत घडून आली. ती हकीकत यापुढे सांगण्यात येईल.

( २३९ ) आपल्या पिछाडीचे संरक्षण व्हावे म्हणून महमदशहाने ३००० घोडेस्वार किल्ल्याजवळ ठेवले आणि त्याने पुढे कूच केले. जिथे जिथे तो गेला तेथील प्रदेश त्याने उद्ध्वस्त केला आणि ज्या ज्या रहिवाशांनी त्याला प्रतिकार केला अशा सर्वांना त्याने ठार मारले. कोण्डापल्ली येथे तो येऊन पोहोचल्यावर तेथील रहिवाशांनी त्याला माहिती दिली की येथून १० दिवसांच्या प्रवासा एवढ्या अंतरावर कांचीचे ( कांजीवरम ) देवालय आहे. या देवालयाच्या भिंती आणि छप्पर ही सोन्याच्या पत्र्यांनी मढविलेली असून त्यात अतिशय मौल्यवान अशा खड्यांचे आभरण आहे. परंतु अजूनपर्यंत एकाही मुसलमान सुलतानाने ते पाहिले नाही अथवा त्या देवळाच्या अस्तित्वाबद्दल देखील काही ऐकले नाही. हे ऐकल्यावर महमदशहाने आपल्या घोडदळातील ६००० उत्कृष्ट घोडेस्वारांची निवड केली आणि आपले उरलेले सैन्य कोण्डापल्ली येथे ठेवून अतिशय जलद गतीने त्याने कांचीच्या दिशेने कूच केले. त्याकाळच्या इतिहासकारांनी कथन केल्याप्रमाणे शेवटच्या दिवशी त्याने इतक्या वेगाने कूच केले की केवळ ४० सैनिक त्याच्याबरोबर साथ देऊ शकले. या चाळिसांमध्ये निजामउल्मुल्क बहरी आणि मुघरीश खान तुर्क हे दोघेजण होते. ते देवळाच्या नजीक आले तेव्हा काही हिंदू पुढे आले. त्यामध्ये एक प्रचंड देहाचा माणूस घोड्यावर बसून आपल्या हातातील तलवार आघात करण्याच्या अभिनिवेशात फिरवित सुलतानाच्या अंगावर अतिशय वेगाने चालून गेला. त्याने सुलतानावर तलवारीचा घाव घातला तो सुलतानाने झेलला आणि आपल्या तलवारीच्या एका घावाबरोबर त्याचे दोन तुकडे केले. यानंतर दुसऱ्या एका काफराने सुलतानावर हल्ला चढविला आणि थोड्याच वेळात सुलतानाच्या प्रत्येक माणसाबरोबर शत्रूची माणसे

हात करू लागली. परंतु महमदशहाचे भाग्यच एवढे थोर की आपल्या [ २ ] ( ५०१ ) प्रतिस्पर्ध्याला त्याने ठार केले. त्याबरोबर उरलेले सर्व हिंदू देवळात निघून गेले. परंतु मधमाश्यांचे मोहोळ उठावे तद्वत देवळातून लोंढ्या लोंढ्याने माणसे बाहेर पडली आणि देवळाच्या भिंतीला पाठ देऊन देवळाच्या संरक्षणासाठी ती सिद्ध झाली. सरते शेवटी सुलतानाचे इतर सर्व सैनिक तेथे येऊन दाखल झाले. यानंतर देवळावर हल्ला करण्यात आला आणि देवळाचा पाडाव झाला. यावेळी मुसलमानांनी भयंकर कत्तल केली. अतिशय मोठी लूट जेत्यांच्या हाती पडली परंतु त्यांनी देवळामध्ये भरपूर प्रमाणामध्ये असलेल्या फक्त सोने, हिरे आणि चांदी एवढ्याच वस्तू आपल्याबरोबर नेल्या. यानंतर सुलतानाने कांची शहराचा पूर्ण विध्वंस केला. शहरामध्ये एक आठवडाभर मुक्काम केल्यावर तो आपल्या सैन्याकडे परतला.

( २४० ) या विजयानंतर सुलतानाने मलिक हसन निजामउल्मुल्क, [१७२□] युसुफ आदिलखान आणि फखरउल्मुल्क यांच्याशी सल्लामसलत केली. त्यांना त्याने दौलताबाद आणि जुन्नरच्या सेनाविभागातील इतर अनेक परदेशी अधिकारी आणि सैनिक यासह मुख्य सैन्यापासून अलग केले आणि नरसिंग रायाविरुद्ध त्यांची रवानगी केली. ही फौज एकंदर १५००० सैनिक एवढी भरली. स्वतः सुलतानाने नरसिंग रायाच्याच ताब्यात असलेल्या मच्छलीपट्टम या ठाण्याकडे कूच केले आणि मच्छलीपट्टम आणि त्या आवतीभोवती असलेल्या मुलखावर ताबा करून नंतर तो कोण्डापल्लीकडे परत फिरला. ह्या घटना घडत असतानाच निजामउल्मुल्क, जरीफउल्मुल्क आणि इतर अधिकारी यांच्या मनात ख्वाजा महमूद गावानबद्दल सुलतानाची त्याच्यावर जी विशेष कृपा होती त्यामुळे असूया उत्पन्न झाली. त्यांनी सुलतानाच्या खाजगीतील अनेक विश्वासू सेवकांना पैसे चारून ख्वाजा महमूद गावानबद्दल सुलतानाच्या मनात संशय निर्माण होईल अशा तऱ्हेचे उद्गार वेळ प्रसंगी काढण्याबद्दल त्यांना चिथावून दिले. त्यानी सुलतानाच्या मनात संशयाचे विष पेरण्याची कोणतीच संधी वाया दवडली नाही. त्यांनी महमूद गावानच्या आकांक्षा फार मोठ्या आहेत [ २ ] ( ५०२ ) याबद्दल सुलतानाच्या मनात आशंका निर्माण केली आणि बादशाही खजिन्यामध्ये पैशाचा मोठ्या प्रमाणावर अपहार होत असल्याचा उघडउघड आरोप केला. सरतेशेवटी त्यांनी एका बनावट पत्राचा बनाव घडवून आणला आणि त्या थोर माणसाचा नाश करण्याच्या कारस्थानात ते यशस्वी झाले. ही घटना कशी घडली त्याची सविस्तर हकीकत देण्याचे अगोदर ज्या अमिरांनी महमूद गावानचा नाश करण्याचे कारस्थान रचले त्यांच्या मनात गावान विषयी द्वेषाची भावना निर्माण का झाली याचा ऊहापोह करणे सयुक्तिक ठरेल.

( २४१ ) महमदशहाच्या कारकिर्दीत बहमनी प्रदेशाचा विस्तार अतिशय वाढला. अलाउद्दीन हसनशहा गंगू याने आपल्या प्रदेशाचे जे विभाग केले होते त्यांची उपयुक्तता राज्य जो पर्यंत लहान आहे तेवढ्यापुरतीच होती. राज्यव्यवस्था मुक्रर

करणाऱ्या हुकमामध्ये आता अनेक बदल करणे इष्ट आहे असा ख्वाजा महमूद गावान यानी विचार केला. याबाबतच्या जरुरीची त्याने सुलतानाची खात्री पटविली तेव्हा सुलतानाने त्याला आपली योजना कृतीत आणण्याची परवानगी दिली.[१३३*] यापूर्वी साऱ्या बहमनी राज्याची विभागणी सुरुवातीला ४ तर्फ अथवा प्रांत यामध्ये झाली होती. प्रत्येक प्रांत एका सुभेदाराच्या हाताखाली याप्रमाणे या चार प्रांतांवर ४ सुभेदार नेमण्यात आले होते. या चार भागांची आता आठ भागांत वाटणी करण्यात आली. वऱ्हाडची दोन सरकारांत विभागणी करण्यात आली ती येणेप्रमाणे गावल आणि माहूर. गावलवर फत्तेउल्ला इमादउल्मुल्क आणि माहूरवर खुदावंदखान हबशी यांच्या नेमणुका करण्यात आल्या. दौलताबादचा ताबा युसुफ आदिलखानाकडे देण्यात आला. त्याचप्रमाणे जुन्नरपासून दक्षिणेकडे असलेल्या इंदापूर, वाई, माण वगैरे अनेक जिल्ह्यांचा आणि त्याचप्रमाणे गोवा आणि बेळगाव हे किल्ले हे फख्रउल्मुल्कच्या हाताखाली देण्यात आले. भीमा नदीकाठचे विजापूरसहित अनेक जिल्हे आणि त्याशिवाय रायचूर आणि मुद्गल हे सरकार महमूद गावानने स्वतःसाठी राखून ठेवले. अहसनाबाद कुलबर्गा, सागर, नळदुर्ग आणि सोलापूर यांचा ताबा दस्तुर दिनार या हबशी खोजाकडे सोपविण्यात आला. एकेकाळी निजामउल्मुल्क [ २ ] ( ५०३ ) बहरीच्या पूर्ण अधिपत्याखाली असलेल्या तेलंगणाच्या प्रदेशाचीही विभागणी करण्यात आली. राजमहेन्द्री, मच्छलीपट्टम, विलकोण्डा, ओरिया वगैरेंवर त्याचा ताबा नवीन विभागणीमध्ये चालू ठेवण्यात आला तर वरंगळचे सरकार आजमखानाकडे सोपविण्यात आले. या आठही विभागांतील प्रत्येकी अनेक ठाणी विशेषतः सुलतानाच्या खाजगी खर्चासाठी म्हणून राखून ठेवण्यात आली. त्यांच्या बंदोबस्तासाठी दरबारातून विशेष महसूल अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली.

(२४२) अल्लाउद्दीनशहाच्या वेळेपासून तो महमदशहाच्या कारकिर्दीपर्यंत अशी प्रथा चालत आलेली होती की प्रत्येक प्रांतामधील सर्व किल्ल्यांचा ताबा सुभेदार किंवा तरफदार याजकडे सोपविण्यात यावा. हा सुभेदार किल्ल्यावर आपल्यातर्फे किल्लेदार आणि शिबंदी नियुक्त करीत असे. ह्या व्यवस्थेचा परिणाम असा झाला होता की पुष्कळदा प्रांताच्या सुभेदारांनी बंडे केलेली होती आणि प्रत्यही त्यांचे बंड मोडून त्यांना वठणीवर आणणे हे काम अतिशय कठीण गेलेले होते. गावानने लागू केलेल्या नवीन वटहुकूमाप्रमाणे फक्त एकाच किल्ल्याचा ताबा सुभेदाराकडे सोपविण्यात आलेला होता. या किल्ल्यामध्ये त्याने पाहिजे असल्यास रहावे असे ठरविण्यात आलेले होते. परंतु प्रांतातील इतर सर्व किल्ले विशेषेकरून सुलतानाने नेमलेल्या अधिकाऱ्यांच्या आणि शिबंदीच्या हाती सोपविण्यात आलेले होते आणि त्यांना मिळणारा पगारही मध्यवर्ती सरकारच्या खजिन्यातून दिला जाई.

( २४३ ) सैन्याला वेतन देण्याच्या पद्धतीतही नवीन वटहुकूमाप्रमाणे बदल करण्यात आला होता. पूर्वी ५०० स्वारांच्या वरील अधिकाऱ्याला १ लक्ष होन[१३४]

वार्षिक मिळत असत; १००० स्वारांच्या अधिकाऱ्याला २ लक्ष होन मिळत असत. ही नेमणूक रोख पैशात देण्यात येत असे अगर त्यासाठी जहागीर लावून दिली जात असे. ख्वाजा महमूद याने तेलंगणाचा प्रांत पूर्णपणे जिंकून कबजात [२] (५०४) आल्यानंतर फौजेला आपलेसे करण्याच्या हेतूने ५०० स्वारांच्या अधिकाऱ्याचा पगार १२५००० होन एवढा केला आणि १००० स्वारांच्या अधिकाऱ्याचा पगार २५०००० होन एवढा वाढविला. जेव्हा अधिकाऱ्याला रोख द्रव्याऐवजी जहागिर लावून देण्यात येत असे त्यावेळी असा अलिखित नियम ठरविला जाई की जरी जहागिरीचे उत्पन्न १ होना एवढ्या रकमेने जरी कमी पडले तरी अशा तऱ्हेच्या तुटीची भरपाई पूर्णपणे शाही खजिन्यातून करण्यात यावी. त्याच वेळी हीही गोष्ट मान्य करण्यात [२] (५०५) येत असे की जर का नेमून दिलेल्या स्वारांच्या मनसबीपेक्षा एक देखील शिपाई त्या अधिकाऱ्याच्या हजेरीपटावर नसेल तर त्या अधिकाऱ्याच्या नेमणुकीतून त्या शिपायाच्या पगाराइतकी ती रक्कम कापली जावी. महमूद गावानने योजिलेल्या या उत्तम नियमावलीमुळे सर्वत्र सुव्यवस्था नांदू लागली, सरकारचे हात अधिक बळकट झाले आणि सर्व पक्षोपक्षांना न्यायी वागणूक मिळू लागली. परंतु या नियमावलीत अध्याहृत असलेल्या काटेकोर तपासणीच्या योजनेमुळे काही महत्त्वाकांक्षी अधिकाऱ्यांना आपला अपमान झाला आहे असे वाटले आणि परिणामी त्यांच्या मनात ख्वाजा महमूद गावान याच्याबद्दल द्वेषाची भावना निर्माण झाली.

(२४४) ख्वाजा महमूद याला त्यांच्या मनात निर्माण झालेल्या नाखुषीच्या भावनेची जाणीव झाली. परंतु त्याच्या सर्व विचारांची दिशा सार्वजनिक हित कसे साधले जाईल इकडेच केंद्रीभूत झाल्यामुळे त्याने वरील असंतोषाकडे दुर्लक्ष केले. या पाठीमागे त्याला स्वतःबद्दल आणि त्याच्या मित्रांबद्दल वाटणारा आत्मविश्वासच कारणीभूत होता. या मित्रमंळीत त्याने ज्याला आपला मुलगा म्हणून मानले होते तो युसुफ आदिलखान हा होता. गावानच्या शत्रूंची अशी धारणा होती की जोपर्यंत गावान आणि आदिलखान हे एकजुटीने टिकून आहेत तोपर्यंत दोघांपैकी एकावरही त्यांना हात उचलता येणार नाही. आपण मागे बघितल्याप्रमाणे युसुफ आदिलखान हा नरसिंगरायाच्या विरुद्ध मोहिमेवर गेला होता. साहजिकच दोन मित्रांची आता फारकत झाली होती. अशा वेळी ज्या दक्षिणी [१७५८] आणि हबशी मंडळींना केवळ महमूद गावानच्याच शिफारशीवरून उच्चाधिकारपदी चढविण्यात आले होते त्यांनी आपल्या उपकारकर्त्याविरुद्ध निजाम-उल्मुल्क याच्याबरोबर संगनमत करून कट केला. युसुफ आदिलखानाच्या गैरहजेरीचा फायदा घेऊन महमूद गावानचा नाश करावा अशी योजना त्यांनी ठरवून पक्की केली.

(२४५) हा कट सिद्धिस नेण्यासाठी त्यांनी जरीफउल्मुल्क दक्कनी आणि मिफ्ता नावाचा हबशी अशा दोघांची निवड केली. ही गोष्ट करण्याचे त्यांनी पूर्णपणे मनावर घेतल्यानंतर महमूद गावानच्या नावाचा शिक्का ज्या हबशी गुलामाजवळ असे

त्याचबरोबर त्यानी सलगीचे संबंध जोडले. त्याच्याबरोबर ते मद्याचे सेवन [ २ ] (५०६) देखील करू लागले. एका प्रसंगी तो गुलाम दारूच्या सेवनाने बेहोष झाला असताना त्यांनी एका कागदावर त्याला गावानच्या सहीचा शिक्का उमटविण्यास सांगितले. ते त्याला असे म्हणाले की या कागदावर आमच्या एका मित्राच्या हिशेबासंबंधी हकीकत आहे. या कागदावर अनेक खात्यांच्या शिक्क्यांचे मोर्तब अगोदरच झालेले असून, आता त्यावर मुख्य वजिराच्या सहीच्या शिक्क्याचे मोर्तब होण्याचे राहिलेले आहे. तो गुलाम दारूच्या धुंदीत होता. त्याने ही विनंती मान्य केली आणि तो कागद उलगडून देखील न पाहता त्या दाखविलेल्या कागदाच्या भागावर सहीचा शिक्का उमटविला. त्या दोघा दुष्कर्म्यांना आपल्याला मिळालेल्या यशाचा अतिशय आनंद झाला आणि त्याच दिवशी रात्री ते निजामउल्मुल्क याजकडे गेले. त्याने जणू काही ख्वाजा महमूदने ओरिसाच्या रायाला पत्र लिहिले आहे असा भास निर्माण करणारा मजकूर त्या कागदावर लिहून काढला. तो असा : "महमदशहाचा बदफैलीपणा आणि क्रौर्य याला मी कंटाळून गेलो आहे. आता दक्षिण देश जिंकून घ्यावयाचा असेल तर ते अतिशय सोपे आहे. राजमहेंद्रीच्या बाजूकडील सरहद्दीवर कोणी नावाजलेला असा एकही अधिकारी नाही. तुमच्या राज्यातून स्वारी करण्यासाठी तो भाग अतिशय खुला आहे. बहुतेक अधिकारी आणि सैनिक हे माझ्याशी एकनिष्ठ असल्यामुळे मी तुम्हाला सामर्थ्यशाली असे सैन्य घेऊन येऊन मिळेन. जेव्हा आपण दोघेजण मिळून सारे राज्य आपल्या ताब्यात आणू तेव्हा सर्व राज्याची आपण आपल्या दोघांमध्ये समसमान वाटणी करून घेऊ." निजामउल्मुल्क हजर असताना ते पत्र सुलतानाला नेऊन देण्याबद्दल जरीफउल्मुल्क आणि मिफ्ता हबशी या दोघांना आदेश देण्यात आला. महमदशहाने जेव्हा वजिराच्या सहीचा शिक्का बघितला तेव्हा त्याच्या संतापाने भयंकर उचल खाल्ली. वजिराच्याबद्दल आणखी खोटेनाटे आरोप करून त्याला आणखी गोवण्याचा प्रयत्न निजामउल्मुल्क याने या संधीचा फायदा घेऊन केला. यावेळी सुलतानाची सारासार विचार करण्याची बुद्धी लोप पावली आणि असे होण्याची शक्यता आहे किंवा नाही याचा विचार न करता त्याने ख्वाजा महमूदला घेऊन येण्याचा हुकूम दिला. या निरोप्याला हे पत्र घेऊन जाताना हटकण्यात [ २ ] (५०७) आले होते असा कटवाल्यांनी भास निर्माण केला होता. त्याला एकदा नजरेखालून घालण्याची गरज देखील सुलतानाला वाटली नाही. वजिराच्या मित्रांनी सुलतानाकडे हजर होण्यात धोका असल्याची सूचना त्याला दिली आणि त्याला असे सांगितले की सुलतानाच्या रागाचा पारा खाली उतरेपर्यंत सुलतानाची आज्ञा त्या दिवसापुरती न मानण्याची काही तरी सबब तुम्ही शोधून काढावी. इतका वेळ मध्ये गेला म्हणजे ज्यांनी ही खोटी सही केली आहे त्यांचा शोध लावता येईल आणि त्यांना शिक्षा करण्यात येईल. ख्वाजा महमूद याने मात्र संकटाला तोंड देण्याचा निश्चय केला. उत्तरादाखल त्याने पुढील अर्थाच्या काही कविता म्हटल्या त्या अशा : आपले कर्तव्य पार पाडण्यात पूर्णपणे गर्क असताना ज्याला मृत्यू येऊन शहीद होण्याचा प्रसंग येतो

त्याला इथे आणि परलोकी त्याची फलप्राप्ती मिळते. अशा तऱ्हेचा हेवा वाटणाऱ्या भवितव्याला हसतमुखाने तोंड देणे हे माझ्या दृष्टीने इष्ट नाही काय ?

( २४६ ) ‘ ( सुलतानाच्या ) वडिलांच्या चाकरीत माझ्या दाढीचे केस काळ्याचे पांढरे झाले. आता मुलाच्या चाकरीत ते ( रक्ताने ) रंगवून तांबडे १७३ब झाले तर ते खरोखरच अभिमानास्पद नाही काय ? ’

( २४७ ) ख्वाजा महमूद गावानशी एकनिष्ठ असलेल्या अनेक अमिरांनी त्याच्याकडे निरोप्ये पाठवून त्याला कळविले की आमच्या कानावर भयप्रद अशा बातम्या येऊन थडकल्या आहेत. परंतु आम्हा प्रत्येकाजवळ एकहजार घोडे तयार आहेत. आपली इच्छा गुजरातेत पळून जाण्याची असेल तर आम्ही तुमच्याबरोबर येऊ आणि तुमच्यासाठी आमच्या प्राणांचे बलिदान करू. १७३ अ * गावानने त्यावर उत्तर पाठविले की माझ्या धन्याच्या चाकरीत गेली अनेक वर्षे मी सन्माननीय अशा पदांचा उपभोग घेतला आहे. त्या कालावधीत एकाही गुन्ह्याचा दोषारोप माझ्यावर झालेला नाही. सुलतानाच्या न्यायीपणावर पूर्ण विश्वासाने मी विसंबून राहात आहे आणि मला खात्री आहे की शत्रूंनी माझ्यावर जे खोटेनाटे आरोप केले आहेत त्यावर विसंबून सुलतान माझ्यासारख्या विश्वासू चाकराला निश्चितच शिक्षा लावणार नाही परंतु परमेश्वराच्या मनात तसेच जर व्हावयाचे असेल तर परमेश्वरी इच्छेला मान तुकविणे हेच माझ्या दृष्टीने योग्य आहे. आपल्या उत्तराच्या समारोपात महमूद गावानने असे प्रतिपादले की तुम्ही सर्वजण जो उपाय सुचवीत आहा तो तुम्हाला माझ्याबद्दल वाटणाऱ्या निष्ठा आणि मैत्री यांचे निदर्शक असला तरी [ २ ] ( ५०८ ) माझ्या दृष्टीने विचार करता ( मी तसे वागणे म्हणजे ) कृतघ्नता आणि बंडखोरीच ठरेल.

( २४८ ) यातून अगदी वाईट अशी गोष्ट निष्पन्न होणार याबाबत गावानने आपल्या मनाची तयारी केली आणि तो दरबारात येऊन दाखल झाला. महमदशहाने अतिशय कडक शब्दांत त्याला विचारले “ जेव्हा एखादी व्यक्ती आपल्या सार्वभौमाशी बेईमान होते आणि त्या व्यक्तीचा गुन्हा सिद्ध होतो तेव्हा त्या व्यक्तीला कोणती शिक्षा द्यावी ? ” सुलतानाच्या धमकावणीला न विचलित होता ख्वाजा गावानने उत्तर दिले, “ ज्याला कोणी त्राता उरला नाही असा हलकट मनुष्य आपल्या सुलतानाबरोबर जर बेईमानीपणाची वर्तणूक करील तर त्याला कोणतीही दया दाखवता कामा नये. ” यावर सुलतानाने त्याला उपरिनिर्दिष्ट पत्र दाखविले; ते पत्र पाहिल्यानंतर ख्वाजा महमूदने “ हे परवरदिगर हा तर निःसंशय महाभयंकर बनवाबनवीचा प्रकार आहे, ” या अर्थाची कुराणातील एक उक्ती म्हटली आणि त्याने उत्तर दिले “ शिक्का तर माझा आहे पण पत्र मात्र माझे नाही. त्याविषयी मला कसलीच माहिती नाही. ” आपल्या उत्तराचा समारोप करताना त्याने कुराणातील पुढील ओळ आणखी एकदा म्हटली ती अशी, “ ज्यांच्या आज्ञांचे पालन न्यायी व्यक्तींकडून प्रसंगी आपल्या रक्ताचे बलिदान देऊनही नेहमीच होत असते त्या परमेश्वराची शपथ घेऊन मी सांगतो की युसूफ

आणि लांडगा यांच्याबद्दलची गोष्ट जितकी खोटी आहे तितकाच माझ्या शत्रूंनी १७७ब माझ्याविरुद्ध घडवून आणलेला हा बनाव खोटा आहे." त्यावेळी सुलतान दारूच्या सेवनामुळे बेहोष झाला होता. क्रोधामुळे त्याची विचारशक्ती त्याला सोडून गेली होती. बहमनी घराण्याला उतरती कळा लागण्याचा कालावधीही आता अगदी जवळ येऊन ठेपला होता म्हणून की काय या घटनेची आणखी चौकशी करण्याच्या भानगडीत तो पडला नाही. तो आपल्या सिंहासनावरून उठला आणि आपला हबशी गुलाम जोहर याला त्याने ख्वाजा महमूदला तत्क्षणीच ठार मारण्याची आज्ञा दिली. सुलतानाला उद्देशून ख्वाजा महमूद म्हणाला, "माझ्यासारख्या वृद्ध माणसाचा मृत्यू ही काही खरोखरी फारशी महत्त्वाची बाब नाही. परंतु तुमच्या दृष्टीने त्याकडे पाहिले असताना तुमच्या साम्राज्याचा ऱ्हास आणि तुमच्या नीतिमत्त्वाचा संपूर्ण नाश या दोन्ही गोष्टी सामावलेल्या मला त्यामध्ये दिसून येत आहेत." ख्वाजा महमूद गावानकडे यत्किंचितही लक्ष न देता सुलतान एकाएकी अंतःपुरात निघून गेला. यावर त्या हबशी गुलामाने आपले शस्त्र उपसले आणि तो ख्वाजाच्या रोखाने येऊ लागला. ख्वाजा महमूद [ २ ] ( ५०९ ) गावान किल्ल्याच्या दिशेने तोंड करून गुडघे टेकून बसला. त्याच्या तोंडून उद्गार निघाले "या जगात परमेश्वराशिवाय दुसरे कोणीही नाही आणि महमद त्या परमेश्वराचा प्रणेता आहे." जोहरच्या तलवारीचा घाव त्याच्या मानेवर पडत असताना तो उद्गारला "धन्य त्या परमेश्वराची" आणि एवढे बोलून त्या परमेश्वराच्या अखंड कृपाप्रसादाच्या छत्राखाली त्याने आत्मसमर्पण केले. ही घटना घडली त्यावेळी असदखान गिलानी हा एक उच्चपदस्थ अधिकारी आणि महमूद गावानचा मित्र हजर होता. त्यालाही जोहरने कोणत्याही प्रकारचा हुकूम नसताना ठार मारले. वयाची ७८ वर्षे पुरी होत आलेली असताना ख्वाजा महमूद गावान हा मरण पावला. आपल्या मृत्यूपूर्वी काही काळच त्याने आपला धनी महमद शहा याच्या स्तुतिपर एक कवन रचले होते.

| | |
|---|---|
| ( २४९ ) सफर ५<br>हिजरी ८८६<br>एप्रिल ५<br>इ. स. १४८१ | महमूद गावानचा मृत्यू ५ सफर ८८६ हिजरी या दिवशी झाला. ख्वाजा महमूद गावानच्या सेवक गणांपैकी एक आणि तारिखी महमूद शाही या ग्रंथाचा कर्ता |

मुल्ला अबदुल करीम सिंदी याने महमूद गावानच्या मृत्यूवर एक कवन रचले ते असे- "ज्याची पूजा खरोखरी करावी अशा योग्यतेच्या असलेल्या आणि त्याच्या उदार स्वभावामुळे सर्व जगाचे हृदय आनंदाने भरून येत असे त्या निष्पाप धर्मवीराचा मृत्यू कोणत्या तारखेला झाला हे जर तुम्हास जाणून घ्यावयाचे असेल तर ते तुम्हाला पुढील ओळीत नोंदलेले आढळेल."

"अन्याय्य देहांत शिक्षा" १७८ब १७८ अ★

दुसऱ्या एका दोहऱ्यात करीम सिंदी म्हणतो "तुम्हाला जर त्याच्या मृत्यूची तारीख विचारली तर म्हणा, "निरपराध महमूद गावानाला हौतात्म्य प्राप्त झाले."

(२५०) या थोर व्यक्तीच्या दानशूरपणाचे अनेक अवशेष [२](५१०) आज दक्षिणेत आहेत. त्यात विशेष उल्लेखिण्याजोगे म्हणजे आपल्या मृत्यूपूर्वी दोन वर्षे त्याने बांधलेले अहमदाबाद बिदर येथील महाविद्यालय. या महाविद्यालयाच्या आवारात एक मशीद आणि मोठा चौक या दोन गोष्टी आहेत आणि हा इतिहास मी लिहीत असतानाच्या क्षणी जणू काही आताच त्यांचे बांधकाम संपलेले आहे अशा अवस्थेत ही बांधकामे होती तशी उभी आहेत. १७९८ ख्वाजा महमूद गावानचे ठायी अपार विद्वत्ता होती. गद्य आणि पद्य लिहिण्याची त्याला अतिशय आवड असून त्या विषयात त्याला अतिशय स्वारस्य होते. अंकगणित आणि बीजगणित या विषयात त्याची बरोबरी करणारे फारच थोडे होते. दक्षिणेमधील काही ग्रंथालयात त्याने स्वतः लिहिलेल्या रोजत उल इन्शा आणि इतर काही कविता अजून उपलब्ध आहेत. दरवर्षी खुरासान आणि इराक येथील अनेक विद्वान मंडळींना मौल्यवान भेटी पाठविण्याची त्याची पद्धत होती. त्या भागातील राजेरजवाडे त्याच्यावर मानमरातबांचा वर्षाव करीत. मौलाना जामी अब्दुल रहमान याचा महमूद गावान- [२](५११) बरोबर पत्रव्यवहार होत असे आणि त्याने लिहिलेली काही पत्रे त्याच्या ग्रंथात दिसून येतात. मौलानाच्या काव्यांपैकी एक हे महमूद गावानच्या स्तुतीपर लिहिलेले आहे. मुल्ला अब्दुल करीम सिंदी याने ख्वाजा महमूदचे एक उत्कृष्ट चरित्र लिहिले आहे त्यापैकी काही भाग मी या ठिकाणी उद्धृत करीत आहे.

(२५१) ख्वाजा महमूदच्या वाडवडिलांनी अनेक पिढ्या वंशपरंपरेने पर्शियामधील जीलानच्या राजपुत्रांचे वजिरीच्या अधिकाराचे पद भूषविले होते. या पुरुषांपैकी एक रुद या प्रांताचा अधिपती झाला. हाजी महमद कन्दहारी या लेखकाच्या वृत्तान्ताप्रमाणे हा प्रदेश या घराण्याकडे शहा तहमास्प सफवी याच्या कारकीर्दीपर्यंत अमलाखाली होता. ख्वाजा महमूद याचा जन्म राजघराण्यात झाला होता तरी शहा तहमास्प याच्या मनातील मत्सराची त्याला अतिशय भिती वाटली आणि त्याने आपल्या आईचे मन आपल्या जन्माचे ठिकाण सोडून जाण्याविषयी वळविले. इराक आणि खुरासान या देशांच्या सुलतानांनी जरी त्याला वजिरीच्या पदाचा अंगीकार करण्याबद्दल विनंती केली तरी धोका देणाऱ्या त्या वजिरीच्या अधिकाराचा स्वीकार करण्यास त्याने नकार दिला आणि त्याऐवजी व्यापारपेशा धारण करण्याचे त्याने ठरविले. व्यापारी म्हणून त्याने अनेक देशांतून प्रवास केला आणि प्रत्येक देशातील नामवंत आणि विद्वान व्यक्तींबरोबर त्याने आपला परिचय करून घेतला. तो ४३ वर्षांचा झाला तेव्हा थोडा फार व्यापार करण्याच्या हेतूने आणि काही अंशी दक्षिणेतील विद्वान मंडळींना भेटण्याच्या उद्देशाने तो समुद्रमार्गाने दाभोळच्या बंदरात उतरला. तेथून त्याने अहमदाबाद बिदरपर्यंत प्रवास केला. बहमनींच्या राजधानीच्या शहराहून दिल्लीला जाण्याचा त्याचा बेत होता. दुसऱ्या अल्लाउद्दीन शहाला त्याच्या अंगातील थोर गुणांची ओळख पटली आणि आपल्या सरदारमंडळीत त्याने दाखल

व्हावे यासाठी त्याचे मन वळविले. हुमायूनशहा जालीमच्या कारकिर्दीत त्याला मलिक उत्तुज्जार हा किताब मिळाला आणि राज्यातील प्रथम श्रेणीच्या अधिकारावर त्याची नियुक्ती झाली. महमदशहाने इतर अनेक किताबांची या पदव्यात भर टाकली त्यामध्येच ख्वाजा जहान हा एक किताब होता. या सुलतानाच्या कारकिर्दीत त्याच्या स्वतःच्या चाकरीत २००० मोगल सैनिक होते आणि त्याशिवाय [ २ ] ( ५१२ ) सुलतानाच्या १०००० घोडेस्वारांचे अधिपत्यही त्याच्याकडे होते. त्याला गावान म्हणत त्याबद्दल पुढील कारणमीमांसा दिली जाते. एकदा सुलतानाच्या संगतीत तो राजवाड्याच्या गच्चीवर बसलेला असताना खालून जात असलेली एक गाय हंबरली. तेव्हा तिथे असलेल्या मंडळींपैकी एकजण थट्टेखोरपणे म्हणाला, " कदाचित आमचे विद्वान मंत्रिमहाशय सुलतानसाहेबांना या गायीचे काय म्हणणे आहे ते सांगतील " यावर ख्वाजा महमूदने भाष्य केले. " तिचे म्हणणे असे आहे की मी तिच्याच जातभाईपैकी एक आहे आणि म्हणून गाढवांच्या संगतीत मी राहू नये." त्याला जेव्हा ख्वाजा जहान हा किताब मिळाला तेव्हा जणू काही भविष्यात घडणाऱ्या गोष्टीकडेच लक्ष देऊन तो म्हणाला, " की ही गोष्ट अपशकुनी आहे अशी मला भीती वाटते कारण ज्यांनी ज्यांनी ही पदवी भूषविली त्या त्या सर्वांचा अकाली अंत झालेला आहे. तो धर्माने अतिशय कडक सुन्नीपंथी होता. महमद शहाबरोबरील त्याच्या एकनिष्ठेविषयी शंका घेण्यास कोणतीही जागा नव्हती. त्याच्या दानशूरपणाची ख्याती साऱ्या आशियाखंडात पसरली कारण आशियाखंडात असे एकही शहर अथवा गाव नव्हते की जेथल्या विद्वानाने त्याच्या उदारपणाचा फायदा घेतला नव्हता. त्याची वागणूक सर्वांना आपलेसे करणारी होती आणि त्याचा न्यायीपणा संशयातीत होता.

( २५२ ) महमदशहाच्या कानावर ख्वाजा महमूद गावानकडे अफाट संपत्ती असल्याच्या बातम्या वारंवार आल्या होत्या. त्याने खजिनदार निजामुद्दीन हसन गिलानी याला बोलावू पाठविले आणि ख्वाजा महमूदजवळील संपत्ती, हिरे आणि सोन्याची ताटे कुठे ठेवली आहेत याबद्दल त्याला दरडावून विचारले. खजिनदाराने घाबरत घाबरतच उत्तर दिले की जर बादशहा मला जीवदान देतील तर मी सर्व संपत्तीचा शोध लावीन. यावर आपल्या पदरी खूपशी लूट पडेल या आशेने सुलतानाने त्याला शपथेवर सांगितले की तू जर कसलीही लपवाछपवी केली नाहीस तर मी तुला भरपूर बक्षिसी देईन. यावर हसन गिलानी याने उत्तर दिले, " बादशहा सलामत माझ्या मालकांचे दोन खजिने होते. त्यापैकी एकाला ते बादशहाचा खजिना असे म्हणत आणि त्यामधून त्यांची फौज, तबेला आणि घरादाराचा खर्च खर्ची पडे. त्यामध्ये आता १०००० लारी आणि ३००० होन एवढी शिल्लक आहे. [ २ ] ( ५१३ ) दुसऱ्याला ते गरिबांचा खजिना असे म्हणत. त्यात बंद केलेली एक थैली असून थैलीत ३०० लारी आहेत." १८०□ यावर सुलतान म्हणाला, " ख्वाजा महमूदचे उत्पन्न

हे अनेक सुलतानांच्या बरोबरीचे असताना त्याच्या खजिन्यात इतकी छोटी रकम ही घटना कशी काय संभवते ? " यावर खजिनदाराने उत्तर दिले, " जेव्हा जेव्हा त्यांच्या जहागिरींमधून वसुलीचे उत्पन्न येत असे तेव्हा तेव्हा ते आपली फौज आणि तबेल्याच्या खर्चाएवढी रकम बादशहाच्या खजिन्यासाठी काढून घेत आणि उरलेली रकम बादशहा सलामत खुद्द आपल्या नावाने स्वतःच्या उपयोगासाठी एक कवडीही [१८१] शिल्लक न ठेवता गरिबगुरीबांना ती देऊन टाकीत. त्यांनी आपल्याबरोबर पर्शियामधून दक्षिणेत ४०००० लारी एवढी रक्कम आणली होती ती त्यांनी व्यापारात गुंतवली. तेवढे भांडवल आपल्याजवळ कायम ठेवून जो काही फायदा होत असे त्यातून दोन लारी ते आपली पाकशाळा आणि पोषाख यावर खर्च करीत. उरलेला नफा गरिबांच्या खजिन्यात सामील केला जाई. त्यातून त्यांची आई, नातेवाईक आणि व्यापाराच्या निमित्ताने त्यांच्याशी परिचय झालेल्या आणि हिंदुस्थानात येण्यास ज्या कबूल नव्हत्या अशा विद्वान आणि योग्य व्यक्तींच्या नावे नक्त रक्कमा पाठविल्या जात.

( २५३ ) ख्वाजा महमूद गावानच्या शत्रूंना या निवेदनाने एकच गोंधळात टाकले. तरीदेखील मत्सरग्रस्त बुद्धीने त्यांनी उद्गार काढले की ख्वाजा महमूद गावान हा अतिशय हुशार माणूस होता आणि आपण जो खर्च करतो त्यामुळे आपली श्रीमान सांपत्तिक स्थिती उत्रडकीस तर येणार नाही ना यामुळे संशयग्रस्त होऊन त्याने आपली संपत्ती राजधानीतच कुठेतरी गुप्तपणे लपवून ठेवली असली पाहिजे. या उद्गारावर खजिनदार हसन गिलानीने उत्तर दिले की मी नमूद केलेल्या रकमेव्यतिरिक्त ख्वाजा महमूद गावानांच्या मालकीची एक लारीएवढी रकम जरी त्यांच्या [२] (५१४) खजिन्यात वा अन्यत्र सापडली तर कोणतीही दुर्घट शिक्षा भोगण्यास मी तयार आहे. यावर सुलतानाने आपल्या मृत वजिराच्या नोकरांना एकत्र जमविले. सर्वप्रथम त्याने मुख्य फराश [१८२] याच्याकडे विचारणा केली. त्याने उत्तर दिले की शहरातील मशिदी आणि पाठशाला यांच्या जमिनीवर असलेल्या काही चटया वगळल्यास माझ्या मालकाकडील सर्व तंबू आणि गालिचे आता छावणीत आहेत. तो पुढे म्हणाला की ख्वाजा महमूद गावान हे केवळ एका नुसत्या चटईवर झोपत असत. यानंतर मुदपाकखान्याच्या व्यवस्थापकाला बोलावण्यात आले. तो म्हणाला सर्व पात्रे आणि भांडीकुंडी माझ्यापाशी आहेत परंतु ख्वाजा महमूद गावान यांच्यासाठी लागणारे पदार्थ हे नेहमी मातीच्या भांड्यात तयार करण्यात येत असत. सर्वांअखेर ग्रंथालयाचा ग्रंथपाल उभा राहिला आणि त्याने ग्रंथालयात ३००० ग्रंथ असल्याची कबुली दिली. पण तो असे म्हणाला की हे सर्व ग्रंथ विद्यालयातील विद्यार्थ्यांच्या उपयोगी पडतील असेच होते. हे ऐकून सुलतान खिन्न झाला. तेव्हा खजिनदार धीर करून म्हणाला, " बादशहा सलामत आपण सुरक्षित रहावेत म्हणून महमूद गावान-सारख्या हजारोंचा बळी गेला तर त्याची तमा नाही परंतु आपण ख्वाजा महमूद आपल्याला जीव तोडून जे सांगत होते त्याची दखल का घेतली नाही आणि

ओरिसाच्या रायाकडे पत्र घेऊन जाणारा दूत कोण होता याची शहानिशा का बरे केली नाही. आपण जर असे केले असते तर ख्वाजा महमूद यांनी जर का देशद्रोह केलेला असता तर तो आपणा सर्वांसमोर नाही तर साऱ्या मानवजाती-समोर उघडपणे दिसून आला असता.'' त्याचे हे बोलणे महमदशहाच्या काळजाला भिडले आणि कसल्यातरी धुंदीच्या तंद्रीतून जणू काही जागा झाल्यासारखा त्याने दुर्दैवी महमूद गावानावर ज्यांनी आरोप केले होते त्यांना उपरिनिर्दिष्ट पत्र घेऊन जाणाऱ्या दूताला आपल्या समोर हजर करण्याची आज्ञा केली. त्यांना असा कोणीच मनुष्य पुढे करता येईना आणि खरी गोष्ट काय झाली असावी याची कल्पना सुलतानाच्या मनात लख्खदिशी येऊन गेली. त्याच्या हातून जे कृत्य घडले होते त्याची भयानकता ध्यानात येऊन त्याचा थरकाप उडाला. पश्चात्तापदग्ध मनःस्थितीत व स्वतःच्या अविचारी भोळसरपणाबद्दल दुःख करीत आणि आपल्या अतिशय विश्वासू चाकरावर आणि मित्राप्रमाणे असलेल्या वजिरावर अन्यायीपणे जी कठोर शिक्षा लादली गेली त्याबद्दल स्वतःला दोष देत महमदशहा आपल्या अंतःपुरात [२] (५१५) निघून गेला. मृत महमूद गावानचे शव दफन करण्यासाठी छावणीतून अहमदाबाद बिदरकडे सुतकी वातावरणात रवाना करण्यात आले. दफन विधीचा समारंभ उरकल्यावर तीन दिवसांनी राजपुत्र महमूदखान आणि इतर अनेक अमीर यांना दफनभूमीला भेट देण्यासाठी जाण्याचा आदेश देण्यात आला.

( २५४ ) सुलतानाने आता कूच करण्याचा हुकूम दिला. पण त्याच दिवशी रात्री इमादउल्मुल्क आणि खुदावंदखान हे दोघेजण वऱ्हाड आणि माहूरच्या सेना-विभागांना बरोबर घेऊन छावणीपासून दूर झाले आणि चार मैल दूरवर जाऊन त्यांनी तळ दिला. त्यांच्या वर्तनाने महमदशहा स्तिमित झाला आणि त्याने आपल्या कूचीचा बेत पुढे ढकलून अशा तऱ्हेची कारवाई त्या दोघांनी का केली हे जाणून घेण्यासाठी चौकशीकरता दूत रवाना केले. त्यावर त्यांनी उत्तर पाठविले की ख्वाजा महमूद गावान-सारख्या वजिराचा तुमच्या मर्जीतील चाकरांनी जर गुप्तपणे कारस्थाने करून नाश केला आहे तर साहजिकच दरबारामध्ये राहिल्यास आमच्या सुरक्षिततेला धोका आहे अशी भीती आम्हाला न वाटली तरच नवल आहे. यावर सुलतानाने त्या दोघांना गुप्तपणे निरोप पाठविला आणि कळविले की तुम्ही माझ्या समक्ष यावे अशी माझी इच्छा आहे. तुम्ही आल्यास तुमच्या मदतीने माझ्या विश्वासाचा गैरफायदा घेणाऱ्या विश्वासघातक्यांना मी शासन करीन. यावर त्यांनी उत्तर पाठविले की जेव्हा युसुफ आदिलखान परत येईल तेव्हा त्याच्याबरोबर आम्ही येऊ आणि आपल्या पायावर लोळण घेऊ. सुलतानाने जेव्हा बघितले की अशा परिस्थितीत धिम्मेपणा आणि सलोखा ही आता आपल्या उपयोगी पडणार आहेत तेव्हा त्याने युसुफ आदिलखानाकडे निघून येण्याविषयी हुकूम रवाना केला. युसुफ आदिलखान अतिशय त्वरेने कोंडापल्ली येथे येऊन पोहोचला आणि त्याने आपले तंबू नाराज झालेल्या उपरिनिर्दिष्ट दोघा

प्रमुखांच्या छावणीशेजारीच ठोकले. यानंतर काही कालावधितच त्या सर्वांनी आपल्याला पाहिजे होते ते सर्व प्राप्त करून घेतले. मृत वजिर ख्वाजा महमूद गावान याची विजापूरची जहागिरी युसुफ आदिलखानाला बहाल करण्यात आली आणि त्याला विजापूरचा तरफदार नेमण्यात आले. आदिलखानाच्या हाताखालील दर्याखान, [ २ ] ( ५१६ ) फखउलमुल्क, मल्लूखान आणि इतर बहुतेक सर्व मोगल अधिकाऱ्यांना त्याच विभागात जहागिरी नियुक्त करण्यात आल्या. फतेउल्ला इमादउल्मुल्क आणि खुदावंदखान यांना त्यांच्या तेव्हाच्या सरकारावर कायम करण्यात आले. त्यांनी पुढे केलेल्या इतर मागण्याही पुऱ्या करण्यात आल्या. सुलतानाबरोबर अहमदाबाद बिदरपर्यंत स्वारीत हजर राहिल्यावर वरील तिघे अमीर शहराबाहेरच मुक्काम करून राहिले आणि त्यांनी शहरात प्रवेश करण्यास साफ नकार दिला. सुलतानाला आता दिसून आले की आपल्या सत्तेला अशा परिस्थितीत अपेक्षिल्याप्रमाणे आता सामर्थ्याचा पाठिंबा उरलेला नाही तेव्हा निष्कारण भावनेच्या आहारी न जाता त्याने शांत परिस्थितीत त्यांच्या वागणुकीशी जुळते घेतले आणि त्यांचा योग्य तो सन्मान करून त्यांना आपापल्या जहागिरीवर परत निघून जाण्याची परवानगी दिली. तो अशी निरर्थक आशा मनाशी बाळगून राहिला की वजिराच्या जागी नव्याने नेमणूक झालेला निजामउल्मुल्क बहरी हा ख्वाजा महमूद गावानची जागा भरून काढील. आपल्या नवीन वजिराचे आसन बळकट करण्यासाठी त्याने दररोज त्याच्यावर सन्मानाची खैरखैरात आणि खाजगीरित्या प्रलोभनांचा वर्षाव करण्यास सुरवात केली. परंतु त्याने योजलेल्या या उपायांचा परिणाम असा झाला की दिवसेंदिवस तो अधिकाधिक मत्सर, द्वेष आणि तिरस्कार यांचे लक्ष्य बनला.

( २५५ ) यानंतर काही महिन्यांनी युसुफ आदिलखान, इमादउल्मुल्क आणि खुदावंदखान हे आपल्याला त्यांच्या सैन्यासह येऊन मिळतील अशी आशा मनाशी बाळगून सुलतानाने राजधानीतून कूच केले. परंतु जरी वरील तिघा उमरावांनी त्याच्या सहवर्तमान कूच केले तरी ते आपली छावणी त्याच्या तळापासून दूर ठेवीत. कूच करीत असताना आपल्या आघाडीवरूनच ते त्याला वंदना देत. अशा वेळी ते त्याच्यापासून अतिशय दूरवर उभे राहात आणि त्यांच्याभोवती त्यांचे रक्षक संरक्षक साखळीचे कडे करीत. क्षणाक्षणाला घटकेमधून हजारो वेळा महमदशहाला ख्वाजा महमूदचा त्याने जो नाश केला होता त्याबद्दल खंत वाटे. परंतु आता झाल्या गोष्टीला काहीच उपाय नव्हता. झाल्या गोष्टीबद्दल तक्रार करणे त्याला अपमानास्पद वाटत होते. परंतु तरी देखील आतल्या आत भयंकर मनस्तापाने त्याचे मन पिचून गेले होते. जेव्हा सैन्य बेळगावला पोहोचले तेव्हा सुलतानाने शहर आणि भोवतालच्या तटबंदीची पाहणी केली. यानंतर त्याच्या अधिकाऱ्यांनी वारंवार प्रयत्न करून देखील त्याने [ २ ] ( ५१७ ) गोवा आणि कोकण देश यांना भेट देण्यास नकार दिला व तो राजधानीकडे परत फिरला. त्याच वेळी बातमी आली की विजयनगरचा राजा शिवराय याने मोठी फौज

गोव्याविरुद्ध रवाना केली आहे. यावर सुलतानाने युसुफ आदिलखानाला विजापूरच्या सेनाविभागाला घेऊन त्याच्या प्रतिकारार्थ जाण्याचा आदेश दिला. तो स्वतः मजल दरमजल करीत फिरोजाबाद येथे परतला. तेव्हा वाटेतच सुलतानाची परवानगी न घेता सैन्याला सोडून फतेउल्ला इमादउल्मुल्क आणि खुदावंदखान हे वऱ्हाडमधील आपापल्या सरकाराकडे रवाना झाले.

( ७५६ ) महमदशहाला आता जाणीव झाली की या वेळी आपली सत्ता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करणे म्हणजे यादवी युद्ध ओढवून घेण्यासारखे आहे; त्यामुळे वरील दोघा अमिरांच्या वर्तणुकीकडे लक्ष न देण्याचे त्याने ठरविले. त्याने फिरोजाबाद येथे ३ महिने मुक्काम केला आणि मनाची करमणूक करीत सुखाने वेळ घालविण्याचा प्रयत्न केला. परंतु अंतर्यामी तो अतिशय दुःखी आणि पश्चात्तापदग्ध राहिला. त्यामुळे दिवसेंदिवस त्याची शक्ती कमी कमी होऊ लागली. त्याने आता आपला मुलगा राजपुत्र महमूद याला वारस म्हणून नेमले आणि आपला मृत्यू झाल्यास राजप्रतिनिधी म्हणून निजामउल्मुल्काची नियुक्ती केली. अशा तऱ्हेची नेमणूक करणारा एक लेखी कागद तयार करण्यात आला आणि त्यावर दरबारातील विद्वान आणि सद्धर्मी व्यक्तींनी आपल्या सह्यांचे शिक्कामोर्तब केले. हा कागद तयार होत असताना सुलतान वारंवार असे उद्गार काढी की, " इतकी वर्षे मी अतिशय वैभवाने राज्य केले असताना आणि खड्गाच्या जोरावर राज्ये जिंकून घेतली असताना ते जर माझे आज्ञापालन करीत नाहीत तर एकाद्या पोरापुढे ते कसेबरे मान तुकवितील. " सुलतानाचा अशक्तपणा दिवसेंदिवस वाढतच गेला; परंतु अहमदाबाद बिदर येथे परतल्यावर त्याची प्रकृती सुधारली. आता आपण बरे झालो या समजुतीखाली त्याने व्यसनांचा अतिरेक केला आणि पुन्हा त्याच्या प्रकृतीने पलट खाल्ली. त्याच्या अंगातून ताप पूर्णपणे निघाला नसताना त्याने एक दिवस दारूने भरलेला मोठा प्याला सेवन केला आणि तो आपल्या जनान्यात निघून गेला. तेथे त्याला जोराचा झटका आला. दरबारातील वैद्यांनी त्याला ताबडतोब औषधे देऊन त्याच्यावर उपचार केले आणि तो थोडासा शुद्धिवर आला आहेसे पाहिल्यानंतर ते परतले. त्यांच्या गैरहजेरीत [ २ ] ( ५१८ ) त्याच्या बेशरमपणाने पुन्हा उचल खाल्ली आणि त्याने असा विचार की केला की दारूच्या धुंदीमुळे आलेले शैथिल्य घालविण्यासाठी ताज्या मद्यासारखा दुसरा चांगला उपाय नाही. म्हणून त्याने पुन्हा आणखी मद्याचे सेवन केले. परिणामी त्याला अतिशय जोराचे आचके येऊ लागले. त्या स्थितीत तो मोठमोठ्याने ओरडू लागला की ख्वाजा महमूद गावान माझ्या फाडून फाडून चिंधड्या करीत आहे. अखेर सरतेशेवटी तो मृत्युपंथाला लागून १ सफर ८८७ हिजरी या दिवशी मरण पावला. त्याची कारकीर्द एकंदर २० वर्षे एवढी झाली. पुढील काव्यात त्याच्या मृत्यूची तारीख गुंफलेली आहे. १८२ अ □

सफर १ हिजरी ८८७ मार्च २४ इ. स. १४८२

राजांचा राजा सुलतान महमूदशहा
जेव्हा त्याच्यावर अखेरचा श्वास टाकण्यासाठी
एकाएकी हाक आली
तेव्हा त्याने दक्षिणेच्या देशाचा आणि ऐहिक
वास्तूंचा त्याग केला
आणि ' दक्षिण देशाचा विध्वंस ' या शब्दांत
त्याच्या मृत्यूची नोंद झाली.[१८३*]

## [१८४*] महमूदशहा बहमनी दुसरा [१८५*] [ २ ] ( ५१९ )

( २५७ ) वयाच्या बाराव्या वर्षी महमूदशहा हा दक्षिणच्या सिंहासनावर आरूढ झाला. १८५ अ* दरबारात त्यावेळी हजर असलेल्या निजामउल्‌ मुल्क बहरी, किवाम-उल्‌मुल्क, कासिम बरीदतुर्क आणि इतर अधिकाऱ्यांनी रूढीप्रमाणे राजनिष्ठेच्या शपथा घेतल्या. राज्याभिषेकाचा समारंभ मोठ्या थाटामाटाने पार पाडण्यात आला. दरबाराच्या भव्य दालनात तख्त फिरोजा सिंहासन ठेवण्यात आले. सिंहासनाच्या दोन्ही बाजूला चांदीची एक एक खुर्ची ठेवण्यात आली. त्या काळातील [ २ ] ( ५२० ) अतिशय धार्मिक म्हणून प्रसिद्ध पावलेल्या शहा मुहिबउल्ला आणि अबदुल हनीफ या दोघांनी सुलतानाची भरभराट व्हावी म्हणून परमेश्वराची प्रार्थना केली आणि त्याच्या मस्तकावर राजमुकुट ठेवला. नंतर दोघांनीही सुलतानाचा एक एक हात धरला आणि त्याला सिंहासनावर चढून बसण्यासाठी मदत केली. सौंदर्य आणि अंतर्गत मूल्य या दृष्टीने विचार करता जगातील इतर कोणत्याही सिंहासनापेक्षा तख्त फिरोजा हे वरचढ ठरले असते. यानंतर ते दोघेजण धर्मनिष्ठ मौलवी त्यांच्यासाठी तयार करण्यात आलेल्या सिंहासनाच्या दोन्ही बाजूला असलेल्या चांदीच्या खुर्चीवर विराजमान झाले. हे झाल्यावर निजामउल्‌मुल्क बहरी आणि कासिम बरीद हे दोघेजण सिंहासनापुढे चालत गेले आणि त्यांनी सुचिन्ह निदर्शक भेटी सुलतानाला अर्पण केल्या. त्यावेळी हजर असलेल्या सर्व अमिरांनी आणि अधिकाऱ्यांनी त्या दोघांचे अनुकरण केले. राज्याभिषेकाच्या अगोदर एका अमिराने असे उद्गार काढले की युसुफ आदिलखान तुर्क, फखउल्‌मुल्क, दर्याखान, आणि मल्लूखान यांसारखे काही प्रमुख हजर नसल्याने राज्याभिषेक अपुरा राहिला. याला उत्तरादाखल निजामउल्‌मुल्क बहरी म्हणाला की सिंहासन रिकामे ठेवल्यास त्यापासून वाईट परिणाम होण्याची शक्यता असते; परंतु तशीच जरूर आहे असा विचार पडल्यास जे अमीरउमराव आता कोकणच्या मोहिमेवर गेलेले आहेत ते जेव्हा परततील त्यावेळी राज्याभिषेकाचा समारंभ पुन्हा करता येईल. त्याचप्रमाणे ज्या प्रमुखांना पदव्या आणि किताब देण्यात आलेले आहेत ते कायम करण्यात येतील अथवा त्यांच्यावर अधिक मानसन्मानाची खैरखैरात करता येईल. यावेळी मुल्ला अब्दुल करीम सिंदी हा हजर होता. तो असे सांगतो की त्यावेळी मतभेदाचे जे मुद्दे

उपस्थित केले गेले त्यानंतर लगेच ज्या दुर्घटना घडून आल्या त्यांचे जणू काही ते अरिष्ट सूचकच होते अशी मते सर्वसाधारण लोकांनी प्रकट केली. कारण जरी महमूदशहाची कारकीर्द फार कालपर्यंत रेंगाळली तरी त्या कारकिर्दीचा कालावधी असंतोष आणि यादवी युद्धे यांनीच व्यापला आणि तिचा शेवट बहमनी [ २ ] ( ५२१ ) घराण्याचा विध्वंस होण्यात झाला.

( २५८ ) जेव्हा मरहूम महमदशहा सिंहासनावर बसला तेव्हा तो अगदी पोरसवदा होता. अनेक अमिरांनी स्वतंत्र होण्याची महत्त्वाकांक्षा मनाशी बाळगली. परंतु राजमाता आणि महमूद गावान यांनी आपल्या कणखर वागणुकीने त्यांचे बेत हाणून पाडले. ज्यावेळी सुलतान हा वयात आला तेव्हा राज्याचा कारभार करण्याचे बाबतीत त्याने आपल्याला स्वतःसिद्ध करून घेतले. त्याने आपल्या सरदारांच्या सत्तेचे बळ हळूहळू योग्य त्या मर्यादेच्या कक्षेत आणून रोखले. आपल्या खाजगी रक्षकदलात जॉर्जियन, सिरकॅशियन, कॅलमक्स, आणि इतर तातर आदिकरून परकीयांचा भरणा करण्याचे त्याचे धोरण होते. त्याशिवाय त्याच्या रक्षकात २००० हबशी आणि हिंदी लोकांचा एक खास विभाग होता. ह्या विभागातून राज्यकारभारासाठी अधिकाऱ्यांची निवड होई. हे अधिकारी हळूहळू सामर्थ्यशाली बनले. निजामउल्मुल्क बहरी हा धर्मांतरीत हिंदू होता. त्याला दक्षिणी आणि हबशी आपला पुढारी मानत असत. युसुफ आदिलखान हा मुळचा तुर्की गुलाम होता.[१८६□] परदेशी मुसलमानांची त्याच्याकडे अधिक निष्ठा होती. वजीर ख्वाजा महमूद गावान हा स्वतः परदेशी मुसलमान होता. त्याची परदेशी मुसलमानांवर मेहेर नजर होती म्हणून युसुफ आदिलखानाला दरबारात निजामउल्मुल्क बहरी पेक्षा अधिक मानाचे स्थानावर उभे राहण्याची परवानगी होती. त्यामुळे त्या अमिराला आपली मानखंडना झाली आहे असे वाटे. परिणामी पूर्वी सांगितल्याप्रमाणे या घटनेचा शेवट त्या कर्तृत्ववान वजिराचा नाश होण्यात झाला. युसुफ आदिलखानाने याप्रसंगी कसे वागावयाचे हे अगोदरच ठरवून ठेवल्यामुळे त्याच्या नाशासाठी तयार करण्यात आलेल्या सापळ्यातून तो निसटला. त्याची नियुक्ती विजापूरच्या तरफदारीवर करण्यात आल्यामुळे दिवसेंदिवस त्याचे [ २ ] ( ५२२ ) सामर्थ्य अधिकाधिक वाढत गेले.

( २५९ ) महमदशहाचा मृत्यू झाल्यावर आणि महमूदशहा दुसरा गादीवर आल्यावर युसुफ आदिलखान आणि त्याच्यासमवेत असलेल्या इतर परकीय अधिकाऱ्यांनी परस्परांना पाठिंबा देण्याचे करारमदार केले आणि मोठे सैन्य घेऊन कोकणातून ते राजधानीला येऊन दाखल झाले. त्यांचा उद्देश तरुण सुलतानाचे राज्यारोहणाबद्दल अभिनंदन करण्याचा होता. त्यांनी शहराच्या तटबंदीच्या बाहेर आपली छावणी दिली. यानंतर युसुफ आदिलखान, दर्याखान, फख्रउल्मुल्क, मल्लूखान, अजदादखान आणि गजनफरखान यांनी सुलतानाला आपले मुजरे सादर करण्यासाठी म्हणून १००० परदेशी घोडेस्वार घेऊन शहरात प्रवेश केला. ते राजवाड्याजवळ येऊन

पोहोचले. दरबारात सेवकांना बरोबर घेऊन प्रवेश करणे हे जरी रीतीरिवाजांच्याविरुद्ध होते तरी निजामउल्मुल्काकडून दगाफटका होईल ह्या भीतीने त्यांनी २०० सशस्त्र सैनिकांसह राजवाड्यात प्रवेश केला. निजामउल्मुल्क हा त्यांना ५०० निवडक सैनिकांसमवेत सामोरा गेला आणि त्यांचे मोठ्या थाटामाटाने स्वागत करून त्यांची सुलतानाबरोबर ओळख करून दिली. युसुफ आदिल्खानाने रिवाजाप्रमाणे सुलतानाला कुर्निसात केला आणि नेहमीच्या पद्धतीप्रमाणे दरबारात निजामउल्मुल्क आणि इतर सर्व अमीर यांच्यापेक्षा वरिष्ठ जागी तो स्थानापन्न झाला. दर्याखान हा निजामउल्मुल्कानंतर परंतु त्याचा मुलगा मलिक अहमद याच्यापेक्षा वरच्या जागेवर स्थानापन्न झाला. कारण दगाफटक्याची वेळ जर आली असती तर या दोघा परदेशी अमिरांना सहज त्याच्या शेजारी बसलेल्या दोघा वजिरांवर हल्ला करता आला असता. [१८७D] मलिक अहमद बहरीने आपल्या बापाच्या बाजूकडील जागेवर सरकण्याचा प्रयत्न केला. पण निजामउल्मुल्काने त्याला तसे करण्यापासून परावृत्त केले. त्याच्या प्रतिस्पर्ध्यांनी [ २ ] ( ५२३ ) जी तयारी केली होती त्यामधून जर काही बाचाबाची निर्माण झाली असती तर त्यात त्याच्याच जिवाला धोका अधिक होता हे जाणून त्याने सुलतानाकडून मानाचे पोशाख बहाल करण्याचा आणि उपस्थितांना निरोप देण्याचा असे दोन्ही समारंभ घाईघाईने आटोपते घेतले. बाहेर आल्यावर युसुफ आदिलखानाने संभाषण करण्याच्या मिषाने निजामउल्मुल्काचा हात धरला आणि त्याला किल्ल्याच्या बाहेरच्या दरवाजाकडे नेले. तेथे त्याला त्याचे सर्व संरक्षकदल येऊन मिळाले. त्यानंतर दोघा अमिरांनी परस्परांच्या बहुमानाची आणि मित्रत्व निदर्शक अशी आश्वासने दिली आणि एकमेकांचा निरोप घेतला. [१८८D] यानंतर युसुफ आदिल्खान हा शहरातील त्याच्या स्वतःच्या वाड्यात राहाण्यासाठी बरोबर आपल्या संरक्षणाकरता म्हणून, १००० निवडक रक्षक घेऊन गेला. त्याचवेळी त्याने दर्याखान आणि आपले इतर स्नेही यांना छावणीकडे जाण्याचा आणि सावध राहण्याचा हुकूम दिला.

( २६० ) दुसऱ्या दिवशी निजामउल्मुल्काने युसुफ आदिल्खानाची भेट घेतली. आदिल्खानाचा हरप्रकारे मानसन्मान करून त्याला अशी विनंती केली की दरबारामध्ये माझ्याबरोबर हजर राहण्यासाठी आणि राज्यकारभार चालविण्याच्या कामात मला मदत करण्यासाठी तुम्ही आणि सर्व परदेशी अधिकाऱ्यांनी शहरामध्येच वास्तव्य करावे. युसुफ आदिल्खानाने उत्तर दिले की तुम्ही प्रकट केलेला जो विचार आहे त्या पाठीमागची भावना मी पूर्णपणे समजू शकतो आणि मला आपल्याबद्दल जे वाटते त्या भावनेशी ह्या विचाराचा निश्चितच एकोपा आहे. परंतु मी दररोज दरबारात हजर राहावे असे जे आपण म्हणता त्याची काही जरुरी आहे असे मला वाटत नाही कारण मी आणि माझे सहकारी हे शिपाईगडी आहोत. सरकारी यंत्रणा कशी चालते ती आम्हाला समजण्याचा आव आम्ही आणत नाही. आमची सर्वांची अशी इच्छा आहे की त्या यंत्रणेवर तुमचाच कोणत्याही बंधनाशिवाय अधिकार चालावा. आमचे [ २ ] ( ५२४ )

म्हणणे एवढेच की राज्याचा कारभार मरहूम सुलतान महमदशहा यांनी प्रकट केलेल्या इच्छेनुसार चालावा आणि सुलतानाचे लष्करी कारवायाबाबत जे काही हुकूम असतील त्यांची अंमलबजावणी करण्याचे काम आमच्या हाती सोपविण्यात यावे. युसुफ आदिल-खान पुढे असे म्हणाला की माझे सहकारी हे धसमुसळ्या स्वभावाचे असल्यामुळे ते शहराबाहेर छावणी करून आहेत हेच अधिक चांगले आहे नाहीतर निष्कारण शहरात त्यांच्यात आणि हबशी व दक्षिणी यांच्यामध्ये बाचाबाची निर्माण व्हावयाची. सरते-शेवटी असा करार झाला की निजामउल्मुल्काकडे फक्त वकील उस् सलतनत[१८९□] ही अधिकाराची जागा रहावी आणि त्याची मरहूम सुलतान महमदशहा यांच्या कारकिर्दीत ज्या ज्या मोठ्या अधिकारपदांवर नियुक्ती झाली होती ती सर्व त्याने सोडून द्यावी. या व्यवस्थेप्रमाणे वजिराच्या पदावर किवामउल्मुल्क वरिष्ठ यांची नियुक्ती करण्यात आली. किवामउल्मुल्क कनिष्ठ याच्याकडे वरंगळचे सरकार सोप-विण्यात आले. राजमहेंद्रीच्या सरकारावर दिलावरखान हबशी याला नेमण्यात आले. अशा तऱ्हेने राज्यातील प्रमुख अधिकाऱ्यांच्या जागांची दोन्ही पक्षांनी समसमान वाटणी करून घेतली.[१९०□] त्यानंतर ते दोघेजण जोडीने दरबारात दाखल झाले. तेथे त्यांनी वरील व्यवस्थेला सुलतानाची संमती मिळविली. त्याप्रमाणे अधिकारपदाचे पोशाख प्रत्येकाला नजर करण्यात आले. हे झाल्यावर युसुफ आदिल्खान हा आपल्या निवासस्थानाकडे परतला. राज्याच्या अंतर्गत बाबीमध्ये यानंतर त्याने कधीही स्वतःला गुंतवून घेतले नाही.

( २६१ ) काही काळपर्यंत परदेशी मुसलमान हे दक्षिणी आणि हबशी मुसलमानां-बरोबर गोडीगुलाबीने राहिले. परंतु निजामउल्मुल्क आणि किवामउल्मुल्क, वरिष्ठ यांनी पूर्वी ठरलेल्या व्यवस्थेच्याविरुद्ध वर्तन करण्याचे ठरवून विजापूरच्या सरकारा-वरून युसुफ आदिल्खानाला दूर करण्याचा -आणि त्याचा वरंगळचा [ २ ] ( ५२५ ) नायब सुभेदार आदिल्खान दक्कनी याला त्याच्या जागी नेमण्याचा बेत केला. हा हेतू मनात धरून त्यांनी आदिल्खान दक्कनी याला फतेउल्ला इमादउल्मुल्क यासहवर्तमान सुलतानाचे राज्यारोहणाबद्दल त्यांच्याकडून अभिनंदन करविण्याचे मिषाने दरबाराकडे येण्याचा आदेश दिला. या आदेशानुसार ते आपली फौज घेऊन दाखल झाले. त्यांनी शहराबाहेर छावणी केली आणि सुलतानाला मुजरा करण्यासाठी आणि त्याला नजर देण्यासाठी म्हणून फक्त काही सेवकांसह शहरात प्रवेश केला. सुलतानाने कृपादृष्टीने त्यांची भेट घेतली आणि रिवाजाप्रमाणे त्यांना मानाचे पोषाख बहाल केले.

( २६२ ) ही घटना घडल्यानंतर तीन आठवड्यांनी निजामउल्मुल्काच्या नजरेस आले की आपल्या पक्षियांबरोबर किवामउलमुल्कतुर्क याचे भांडण झाले आहे. तेव्हा त्याने किवामउल्मुल्काची मनधरणी केली आणि असा प्रस्ताव मांडला की दक्षिणी अमिरांची मदत घेऊन आपण युसुफ आदिल्खानाचा नाश करू आणि त्याच्या

पक्षपात्यांना त्यांच्या त्यांच्या अधिकाराच्या जागी पाठवून देऊ. तो असेही म्हणाला की परदेशी मुसलमानांच्या भयामुळे दक्षिणी मुसलमानांची आपण आपल्या घराबाहेर देखील पडू शकत नाही अशी धारणा झालेली आहे. अशा परिस्थितीत माझे असे म्हणणे आहे की आपल्या बेतांची पक्की तयारी झाल्यावर तुम्ही ( किवामउल्मुल्क ) तुमच्या हाताखाली जे परदेशी सैनिक आहेत त्यांना त्यांच्या बराकीतून बाहेर पडण्यास प्रतिबंध करा. ह्या कटात किवामउल्मुल्क सामील झाला. दुसऱ्या दिवशी निजामउल्मुल्काने सुलतानाला किल्ल्याच्या एका बुरुजावर बसविले. नंतर त्याने आदिलखान दक्कनी[१९१०] आणि फतेउल्ला खान इमादउल्मुल्क यांना असे हुकूम [२] ( ५२६ ) पाठविले की सुलतानाला भेटून त्याचेकडून तुमच्या सरकारावर जाण्यासाठी त्याचा निरोप घेण्याचे अगोदर तुम्ही आपापल्या फौजा घेऊन पहाणीसाठी त्यांना सुलतानासमोर हजर करावे. शहराचा कोतवाल फरहाद उल्मुल्क याच्या कानी कोणत्या तरी निमित्ताने कटाची बातमी गेली. त्याने किवामउल्मुल्क याला असे सांगितले की निजामउल्मुल्काने परदेशीयांच्या विरुद्ध रचलेल्या कटात एकही परदेशी व्यक्ती न वगळता अगदी झाडून सारे परदेशी आहे आणि युसुफ आदिलखानाच्या खुनाचा कट म्हणजे साऱ्या परदेशीयांचा नाश करण्याच्या योजनेची नुसती नांदी आहे. तेव्हा अशावेळी परदेशीयांनी आपल्या घरात काही न करता स्वस्थ बसून रहाणे म्हणजे शुद्ध वेडेपणाचा कळस आहे. किवामउल्मुल्काची इच्छा युसुफ आदिलखानाचा नाश व्हावा अशी होती. त्याने निजामउल्मुल्काच्या त्याच्याबरोबरील मैत्रीच्या प्रामाणिकपणावर विसंबून राहून फरहादउल्मुल्क याने दिलेल्या बातमीकडे काहीही लक्ष दिले नाही.

( २६३ ) आदिलखान दक्कनी आणि इमादउल्मुल्क हे दोघेजण आपल्या अनुक्रमे तेलंगण आणि वऱ्हाड या सरकारांच्या सैन्यातील तुकड्या घेऊन शहरात दाखल झाले. त्यांनी राजवाड्यासमोर आपल्या सैन्याची मांडणी केली. महमूदशहा हा वजिराच्या हातातील बाहुले बनून राहिला होता. त्याने निजामउल्मुल्काच्या चिथावणीवरून उपरिनिर्दिष्ट प्रमुखांना उद्देशून भाषण केले की परदेशी सैनिक हे बंडखोरीने वागत आहेत आणि त्यांनी शहरात भयंकर अत्याचार चालविले आहेत तेव्हा परदेशीयांच्या विरुद्ध तुमच्या सैन्याचा उपयोग करणे जरुरीचे आहे असे मला वाटते. इमादउल्मुल्क याला युसुफ आदिलखानाबद्दल नितान्त आदर वाटत असे. त्याने त्याला बंदोबस्तात ठेवले आणि आदिलखान दक्कनीच्या हाताखाली आपल्या सैनिकांना इतर परदेशीयांविरुद्ध चालून जाण्यास परवानगी दिली. त्यांच्या माऱ्यापुढे पहिला बळी पडला तो खुद्द किवामउल्मुल्क याचाच. शहराचे दरवाजे हे बंद करून ठेवण्यात आल्यामुळे दक्षिणी सैनिकांनी परदेशी फौजांची भयंकर कत्तल केली, कारण अशा तऱ्हेच्या अचानक हल्ल्याला तोंड देण्याची त्यांची तयारी नव्हती. युरीशखान, खुशकदमखान आदि [२] ( ५२७ ) युसुफ आदिलखानाच्या अनुयायांनी लढत लढत दरवाजा गाठला आणि तो फोडून शहराबाहेर असलेल्या छावणीतून दर्याखान आणि परदेशी सैनिकाच्या एका तुकडीला आत

घेतले. असे म्हणतात की शहराच्या रस्त्यारस्त्यात ही धुमश्चक्री सतत २० दिवस-पर्यंत चालली. ह्या कालावधीत दोन्ही बाजूंकडील कमीतकमी ४००० माणसे तरी ठार मारली गेली. सरतेशेवटी काही धर्मनिष्ठ मंडळींनी मध्यस्थ म्हणून हस्तक्षेप केला. झालेल्या कत्तलीत अनेक उच्चपदस्थ परदेशी अधिकारी ठार झाले होते. अशा परि-स्थितीत युसुफ आदिलखानाने आपल्या आश्रितासहित शांतपणे शहर सोडून जाण्याचे आणि विजापूरकडे परतण्याचे कबूल केले.

( २६४ ) निजामउल्मुल्क याच्या हाती आता राज्यातील एकमेव सत्ता आली. त्याने बीड, धामोर आणि इतर अनेक जिल्हे आपला मुलगा मलिक अहमद आणि फखउल्मुल्क दख्खनी यांजकडे सोपविले. फखउल्मुल्क दख्खनी हा मरहूम ख्वाजा महमूद गावान याच्या गुलामाचा मुलगा. हा शिपाईगडी असून अतिशय विद्वान होता. त्याची एक हजार स्वारांच्या मनसबदारीवर बढती करण्यात आली. त्याच्या मुलाला ख्वाजा जहान ही पदवी देण्यात आली. इमादउल्मुल्क याचा सन्मान त्याला वजिराच्या अधिकारावर नेमण्यात येऊन करण्यात आला. त्याचा मुलगा शेख अल्लाउद्दीन याला त्याच्या बापाचा नायब म्हणून वऱ्हाडात नेमण्यात आले. कासिम बरीद याने परदेशीयांविरुद्ध बरीच कारवाई करण्यात भाग घेतला होता. त्याला शहराचा कोतवाल[१९२] आणि मिर नोबत या [१९३] अधिकारावर नेमण्यात आले. किवामउल्मुल्क, कनिष्ठ याची तेलंगणाकडे नियुक्ती करण्यात आली. निजामउल्मुल्क आणि इमादउलमुल्क यांनी चार वर्षेपर्यंत महमूदशहाच्या आईच्या [२] (५२८) सल्लामसलतीने वागून राज्याचा कारभार चालविला.

( २६५ ) सरतेशेवटी दिलावरखान हबशी याला त्यांच्या हातात असलेल्या सामर्थ्यामुळे असूया निर्माण झाली आणि त्याने सुलतानाकडे निवेदन केले की तुमचे वजीर तुमच्या सत्तेला काडीमात्र किंमत देत नाहीत. त्यांनी राजमातेबरोबर संगनमत करून राज्याच्या सर्व अधिकारांचे अपहरण केलेले आहे आणि तुम्हाला ते अजून देखील एखाद्या पोरासारखे वागवीत आहेत. दिलावरखानाच्या निवेदनाने महमूदशहाला डिवचले आणि त्याने दिलावरखानाला वजिरांना ठार करण्याचे सर्वाधिकार दिले. याप्रमाणे एके रात्री ते दोघेजण राजमातेच्या दिवाणखान्यात गेले असताना दिलावर-खान दुसऱ्या एका माणसाला बरोबर घेऊन वाटेत लपून राहिला आणि दोन्ही वजीर दिवाणखान्यातून बाहेर आल्यावर हातात तलवार घेऊन त्याने त्यांच्यावर घसरा केला. निजामउल्मुल्काला जखम झाली पण तो आणि इमादउल्मुल्क हे दोघेजण शस्त्र चालविण्यात वाकबगार असल्याने त्यांनी दोघांनी स्वतःचे संरक्षण केले आणि लढाई देत मागे हटत हटत त्यांनी राजवाड्यातून बाहेर पडण्यात यश मिळविले. त्यांनी आता कासीम बरीद याजकडे निरोप पाठविला की तुम्हाला देखील ठार करण्याचा सुलतानाचा हेतू आहे. हा निरोप पाठविल्यानंतर ते आपल्या अनुयायांसहित शहराबाहेर पळून गेले. कासीम बरीद याने राजवाड्याच्या दरवाजावर कबजा केला आणि सुलतानाच्या

बाहेर पडण्याच्या सर्व वाटा रोखल्या. सुलतानाची परिस्थिती इतकी अगतिक झाली की त्याने आपल्या वजिरांना लिहून आपल्या वर्तनाची माफी मागितली आणि त्यांना परत येण्यासाठी कळविले. यावर त्यांनी अशी अट घातली की आम्ही परत यावे अशी तुमची जर इच्छा असेल तर अगोदर दिलावरखानाचा वध केला गेला पाहिजे. ही बातमी दिलावरखानाच्या कानावर जाताच तो आपल्या जनान्यासहित बुरहाणपूरकडे पळून गेला. निजामउल्मुल्क आपला मुलगा मलिक महमद याच्यासह राजधानीला परतला. इमादउल्मुल्क मात्र आपल्या वऱ्हाडातील सरकाराकडे निघून गेला.

( २६६ ) आपला पक्ष मजबूत करण्याच्या हेतूने निजामउल्मुल्क [ २ ] ( ५२९ ) याने मलिक वुजी आणि मलिक अश्राफ या दोघांना मोठी अधिकारपदे दिली. हे दोघेजण पूर्वी ख्वाजा महमूद गावानचे आश्रित होते. मोठ्या भावाला त्याने दौलताबादच्या सुभेदारीवर नेमले आणि धाकट्याची त्याचा नायब म्हणून नियुक्ती केली. त्याचवेळी त्याने त्या दोघांकडून तुमच्या मुलाशी ( मलिक अहमद ) आम्ही एकनिष्ठ राहू आणि त्याच्याशी इमानीपणे राहू अशा शपथा घेवविल्या. त्यानंतर त्याने मकदूमखान[१९४] □ ऊर्फ ख्वाजा जहान दक्कनी याजकडे परंडा आणि सोलापूर या किल्ल्यांचे अधिकार सोपविले आणि त्यालाही वरीलप्रमाणेच शपथेने बांधून घेतले. ही गोष्ट झाल्याला तीन महिने होऊन गेल्यावर त्याने सुलतानाची परवानगी घेतली आणि आपला मुलगा मलिक अहमद याची आपला नायब म्हणून जुन्नरकडे रवानगी केली.

( २६७ ) हिजरी ८९१ / इ. स. १४८६ } हिजरी ८९१ या वर्षी वरंगळचा सुभेदार आदिलखान दक्कनी हा मरण पावला. तेव्हा किवामउल्मुल्क, कनिष्ठ हा झपाट्याने कूच करीत राजमहेंद्रीहून वरंगळ येथे आला आणि त्याने तेलंगणावर आपला ताबा बसविला. सुलतानाला बरोबर घेऊन निजामउल्मुल्क याने वरंगळकडे कूच केले. यावर किवामउल्मुल्क याने राजमहेंद्रीकडे माघार घेतली. त्याने गुप्तपणे सुलतानाला पत्र लिहिले आणि निजामउल्मुल्काविरुद्ध त्याला इशारा दिला. सुलतानाचे मन आता दुबळे झाले होते. त्याने आपल्या नशिबातच आहे असे समजून दैवावर हवाला ठेवला आणि पत्राला उत्तर पाठविले नाही. इतकेच नव्हे तर त्याने ते पत्र ताबडतोब निजामउल्मुल्काच्या हवाली केले. सुलतान वरंगळला पोहोचल्यावर मलिक अहमद बहरी याच्याकडून त्याला पुढीलप्रमाणे खलिता आला. "मरहूम सुलतान महमदशहा यांच्या कारकिर्दीत गोव्याचे बंदर किश्वरखानाला देण्यात आलेले होते. त्याने त्याचा ताबा नजमुद्दीन गिलानी याजकडे सोपविला होता. [ २ ] ( ५३० ) त्याच्या मृत्यूनंतर त्याचाच एक अधिकारी बहादूर गिलानी याने गोव्याचा जबरीने ताबा घेतलेला आहे. त्याचप्रमाणे त्याने दाभोळ, कोल्हापूर, पन्हाळा, शिराळा आणि बेळगाव यावर कबजा केला आहे. त्याचप्रमाणे युसुफ आदिलखानाच्या चिथावणीवरून त्याची बंडखोरी दिवसेंदिवस वाढत आहे आणि चौलचे बंदर आणि

समुद्रकिनाऱ्यावरील इतर स्थळांवरही त्यांच्या हल्ल्यांचे प्रमाण वाढले आहे." या खलित्यात मलिक अहमदने असेही निवेदन केले होते की चाकणचा जहागिरदार जैनउद्दीन अली यानेही उघड उघड बंडाचा पुकारा केला आहे.

( २६ ) निजामउल्मुल्काने आपल्या मुलाला प्रथम जैनउद्दीनचा पाडाव करण्याची आज्ञा दिली आणि परंड्याचा सुभेदार ख्वाजा जहान दक्कनी आणि दौलताबादचा सुभेदार मलिक बुर्जी या दोघांना मलिक अहमदला पाठिंबा देण्यासाठी चाल करून जाण्याचा हुकूम पाठविला. याप्रमाणे परिस्थिती असताना जैनउद्दीन याने विजापूरच्या युसुफ आदिलखानाकडे मदतीची याचना केली. त्याने त्याला जाऊन मिळण्यासाठी ६००० घोडेस्वार रवाना केले. इंदापूरच्या[१५५] किल्ल्याजवळ छावणी करून राहण्याचा आणि तेथून मलिक अहमदच्या हालचालींवर नजर ठेवण्याचा व जर कदाचित तो कोकणच्या बाजूने वळल्यास जलद त्या बाजूला जाऊन त्याला प्रतिकार करण्याचा त्याने आपल्या स्वारांना हुकूम दिला.

( २६९ ) ही बातमी जेव्हा वरंगळ येथे पोहोचली तेव्हा निजामउल्मुल्काच्या प्रतिष्ठेला बराच मोठा धक्का बसला. सुलतानाने त्याला अपमानास्पद रीतीने वागविले आणि कासिम बरीद, दस्तूर दिनार आणि हबशी अधिकारी यांची त्याजवरील निष्ठा ढळली. त्याचा नाश व्हावा अशी मनोमन इच्छा सुलतानाच्या मनात उद्भवली आणि त्याने निजामउल्मुल्काच्या वर्तनाविरुद्ध तक्रारी करून त्याचा पक्ष सोडून जाण्यासाठी म्हणून अनेक अधिकाऱ्यांना चिथावणी दिली. इतकेच नव्हे तर [ २ ] ( ५३१ ) पहिली संधी मिळताक्षणीच त्याला ठार करण्याचे अधिकार त्याने त्यांना दिले. निजामउल्मुल्काला जेव्हा ह्या परिस्थितीची माहिती देण्यात आली तेव्हा रातोरात तो छावणी सोडून पळून गेला. परंतु जुन्नर येथे आपल्या मुलाला जाऊन मिळण्याच्या ऐवजी सुलतानाचा खजिना ताब्यात घेता येण्याच्या आशेने त्याने अहमदाबाद बिदरकडे कूच केले. पसंदखान दक्कनी हा अहमदाबाद बिदरचा आता सुभेदार होता. गरिबीच्या खोल गर्तेतून अमिरीच्या पदावर त्याला निजामउल्मुल्काने चढविले होते. त्याने निष्ठेची वचने देऊन निजामउल्मुल्काला शहरात घेतले. आता आपण सुरक्षित आहोत असे वाटून त्याने आपला मुलगा मलिक अहमद याला कळविले की तू विलंब न लावता मला जुन्नरहून येऊन सामील हो. नंतर त्याने बादशाही खजिना खोलला आणि सैन्याची भरती करण्यासाठी सढळ हाताने द्रव्याची खैरात केली.

( २७० ) या घडामोडींची हकीकत जेव्हा महमूदशहाच्या कानावर गेली तेव्हा त्याने कुतुबउल्मुल्क याला तेलंगणाच्या सुभेदारीवर नेमले आणि फौजेसहित तो त्वरेने बिदरकडे निघाला. शहरामधील आपले वजन कमी होत आहे हे जेव्हा निजामउल्मुल्काला आढळून आले तेव्हा मिळेल तेवढ्या सरकारी खजिन्यावर हात मारण्याचा आणि आपल्या मुलाला जाऊन मिळण्याचा त्याने बेत केला. परंतु मोठ्या हिकमती करून पसंदखानाने त्याचे निघून जाणे लांबणीवर पडेल अशी व्यवस्था केली आणि

खाजगीरीत्या त्याने सुलतानाला लिहून कळविले की तुम्ही विलंब न लावता त्वरित कूच करून या. मी बंडखोराला आपल्या स्वाधीन करतो. महमूदशहाने यावर उत्तर पाठविले की तुम्ही जर राजनिष्ठ असाल तर तुमच्या निष्ठेचे प्रतीक म्हणून तुम्ही त्या देशद्रोह्याचे मुंडके माझ्याकडे पाठवा. त्यानुसार पसंदखान ५०० अनुयायी बरोबर घेऊन राजवाड्यात निजामउल्‌मुल्काकडे गेला आणि तुमच्याशी मला [ २ ] ( ५३२ ) महत्त्वाच्या बाबींवर एकांतात संभाषण करण्याची इच्छा आहे असे त्याने त्याला बनवून सांगितले. निजामउल्‌मुल्क अगदी निःशंक होता. त्याने पसंदखानाच्या विनंतीला आपला होकार दर्शविला आणि तो पसंदखानाबरोबर त्याच्या खाजगी दालनात गेला. पसंदखान हा तरुण आणि बलिष्ठ होता. त्याने निःशस्त्रावस्थेत असलेल्या वृद्ध वजिराचा गळा धरला आणि त्याला वुकलून काढले. नंतर त्याने त्याची मान छाटली आणि त्याचे मस्तक बाहेर आणले. सर्वासमक्ष त्या मस्तकाचे प्रदर्शन करून त्याने अशी दवंडी पिटविली की सर्व देशद्रोह्यांच्या नशिबी असा शेवट येतो. यानंतर त्याने वजिराचे मस्तक मोठ्या जलद गतीने दूतांकरवी बादशाही छावणीकडे रवाना केले.

( २७१ ) महमूदशहा यानंतर शहराकडे परतला. सार्वजनिक बाबींचा कारभार पाहण्याचे काम त्याने आपल्या इतर वजिरांवर सोपविले. परंतु तारुण्याच्या धुंदीत त्याची सारासार विचारबुद्धी नाहीशी झाल्यामुळे आणि सुखासीनतेची चटक लागल्यामुळे राज्यकारभाराच्या व्यवस्थेकडे यत्किंचितही लक्ष न देता त्याने आपला सर्व वेळ तऱ्हतऱ्हेच्या अतिरेकी व्यसनात बेहोष होण्यात घालविला. त्याच्या मूर्खपणाच्या अनेक उदाहरणांपैकी एक सांगावयाचे म्हटल्यास तख्त फिरोजामधून हिरे काढून त्याने त्यांचा उपयोग तबके, पुष्पपात्रे, दारू पिण्याने चषक यात जडविण्यासाठी केला ह्या घटनेने देता येईल.

( २७२ ) हिजरी ८९६ / इ. स. १४९० } हिजरी ८९६ या वर्षी दक्षिणी आणि हबशी अधिकाऱ्यांनी सुलतानापाशी अजून परदेशी मुसलमानांचे जे वर्चस्व होते त्याचे निर्मूलन करण्यासाठी पुन्हा एकदा एकजूट केली. पसंदखानाने अखेर दक्षिण्यांशी हातमिळवणी करून महमूदशहाला ठार मारण्याचे आणि त्याच्या जागी राजघराण्यातील दुसऱ्या एखाद्या राजपुत्राला सिंहासनावर बसविण्याचे कबूल केले. राजवाड्यावर पहारा देत असलेले परदेशी सैनिक सुलतानाच्या मदतीला येतील अशी शंका वाटून कटवाले राजवाड्याकडे जाण्यासाठी सशस्त्र होऊन निघाले. रात्रीचे बरेच प्रहर उलटून गेले होते आणि सुलतान रंगढंग करण्यात मशगूल होऊन गेलेला असताना सर्व कटवाले सुलतानाच्या अंतर्गृहाकडे झपाट्याने घुसले. यामुळे थोडासा आवाज झाला. या आवाजाचे कारण काय असावे याची खातर जमा सुलतानाने करून घेण्याचे अगोदर वरील कटात हात असलेल्या [ २ ] ( ५३३ ) द्वारपालांनी आत घेतलेल्या अनेक दक्षिण्यांनी सुलतानाच्या अंतर्गृहात प्रवेश केला. सुलतानाच्या रक्षकामध्ये चार सैनिकांसमवेत अजीजखान तुर्क हा होता. त्याशिवाय

हसनअली सबजावरी आणि सय्यद मिर्जा मुशिदी हे दोघेजण निःशस्त्र असे होते. त्यांनी खुनी मारेकरी आणि सुलतान यांच्यामध्ये आपल्याला घालून घेतले आणि सुलतानाच्या सुरक्षिततेसाठी कसलीही तमा न बाळगता आपल्या प्राणांचे बलिदान केले. यामुळे राजवाड्याच्या गच्चीवर जाण्यास सुलतानाला वेळ मिळाला. सुलतानाचे अंतर्गृह सोडल्यास राजवाड्याचा एवढाच भाग कटवाल्यांच्या ताब्यात नव्हता परंतु सुलतानाबरोबर जल्लोषात भाग घेणाऱ्या त्याच्या काही परदेशी सवंगड्यांनी मोठ्या कणखरपणे दगड, बाण आणि मातीच्या ढेकळांचा वर्षाव करून कटवाल्यांना प्रतिकार केला. सुलतानाचे नशीब थोर म्हणून ओढवून आलेल्या परिस्थितीची जाणीव त्याला त्याच्या परदेशी सैनिकांकडे पोहोचविता आली. सुलतानाला मदत करण्यासाठी कासिम बरीद तुर्क हा आणखी काही अधिकाऱ्यांसह बरोबर ५०० माणसे घेऊन ताबडतोब राजवाड्यापाशी जाऊन पोहोचला. परंतु त्यांना दरवाजे बंद असल्याचे दिसून आले. मोठ्या कष्टाने त्यांच्यातील ८ जण भिंती चढून वर गेले आणि त्यांनी जवळील तुताऱ्या वाजविल्या. दक्षिणी आणि हबशांपैकी अनेकांना वाटले की सर्वच्या सर्व मोगल चाल करून आले आहेत. तेव्हा त्यांनी पळून जाण्यासाठी दरवाजे खोलले. तेव्हा त्यांच्यावर सब्जावरच्या २८ मोगल स्वारांनी बाणांचा एकच वर्षाव केला आणि त्यांना पाठीमागे हाकलले. त्यांनी आता दरवाजे बंद करून घेण्याचा प्रयत्न केला परंतु परदेशीयांनी त्यांच्यावर घसरा करून त्यांना प्रतिरोध केला. सुलतान राजवाड्याच्या ज्या बुरुजावर होता त्याच्या पायाशी किश्वरखान येऊन पोहोचला होता. त्याने दरवाजा उघडला गेला आहे असे कानावर पडल्यावर विलंब न लावता आत प्रवेश केला. कटवाल्यांनी आता गोमेदकच्या दगडांनी बांधलेल्या राजवाड्याचा आश्रय घेतला आणि तेथून त्यांनी स्वतःचे रक्षण करण्यासाठी प्रतिकार करण्यास सुरुवात केली. या वेळेपर्यंत सर्व शहरात लोकांची एकच त्रेधातिरपीट उडालेली होती. कोणालाही याचे कारण काय त्याचा काहीच पत्ता लागत नव्हता. परंतु सर्वसामान्य [ २ ] ( ५३४ ) नागरिकांनी मात्र बाहेर पडून परदेशीयांच्या घरावर हल्ले करण्यास आणि त्यातील चीजवस्तू लुटण्यास सुरुवात केली. अखेर जेव्हा चन्द्र अस्मानात वर आला तेव्हा शत्रू कोण आणि मित्र कोण हे ओळखता येऊ लागले. राजवाड्यामधील ज्या द्वारपालांनी प्रथम कटवाल्यांना आत घेतले तेच आता त्यांच्याविरुद्ध उलटले. गवती छपराखाली अनेक कटवाले छपून राहिले होते त्या छपराला त्यांनी आग लावून दिली. ते जसे जीव बचावण्यासाठी बाहेर आले त्याबरोबर त्यांना त्यांनी कंठस्नान घातले. त्याचप्रमाणे जवळ जवळ ३०० कटवाले एका दालनात जमा झाले होते आणि दिवस उजाडल्याबरोबर एकदम बाहेर पडून राजवाड्याबाहेर पडण्याच्या संधीची ते वाट पहात होते. आता सुलतान जहांगीरखान तुर्क याने राजवाड्याच्या दरवाजांचा ताबा घेतला आणि खान जहान याला शहर आणि बाजारपेठ यांच्या रक्षणासाठी रवाना केले. त्याचबरोबर शाही तबेल्यातील घोडे बाहेर काढण्यात आले आणि सुलतानाच्या

हितचिंतकांमध्ये त्यांची वाटणी करण्यात आली. सूर्योदयाबरोबर महमूदशहा हा सिंहासनावर आरूढ झाला आणि त्याने दगाबाज दक्षिणी आणि हबशी यांच्या घरात शिरण्याची आणि कसलाही भेदाभेद न करता त्यांची कत्तल करण्याची परदेशीयांना आज्ञा दिली. त्यांची मालमत्तादेखील जप्त करण्याचे त्याने त्यांना अधिकार दिले. एकंदर तीन दिवसपर्यंत सतत या हुकमांची अंमलबजावणी करण्यात येत होती. साऱ्या शहरभर नाशरूपी भस्मासुराचे थैमान चालू होते आणि कोणालाही सुलतानापाशी क्षमेसाठी याचना करण्याची मध्यस्थी करण्याचे धाडस झाले नाही. सरतेशेवटी शहा मुहीबउल्लाच्या एका मुलाने कत्तल थांबविण्यात यावी अशी विनंती केली. त्याने केलेल्या विनंती अर्जाला मात्र यश आले.

( २७३ ) आपली या भयंकर संकटातून मुक्तता झाली त्याबद्दल उत्सव साजरा करण्याच्या हेतूने महमूदशहाने चाळीस दिवसपर्यंत मोठ्या भपकेदार समारंभाचा जल्लोष उडवून दिला. नंतर मोठ्या विधिपूर्वक आपली सर्व शहरातून मिरवणूक काढली. या मिरवणुकीच्या प्रसंगी शहरातील रस्ते मोठ्या भव्यपणे सुशोभित [ २ ] ( ५३५ ) करण्यात आले होते. ज्या बुरुजावर सुलतानाने आश्रय घेतला होता तो अतिशय शुभसूचक आहे असे त्याने मानले आणि त्याठिकाणी त्याने एक अतिशय सुंदर इमारत बांधून काढविली. याठिकाणी तो यानंतर आपला बहुतेक वेळ अतिरेकी व्यसनांच्या मदात सातत्याने धुंद होत घालवू लागला. त्याने राज्याच्या कारभाराकडे पूर्णपणे दुर्लक्ष केले आणि कारभाराची जबाबदारी त्याने आपल्या मर्जीतल्या सवंगड्यावर सोपविली. लाहोर, दिल्ली, पर्शिया आणि खुरासाण येथून गायक आणि नर्तक यांच्या झुंडीच्या झुंडी त्याच्या दरबारी हजर होऊ लागल्या. त्याचप्रमाणे कथावेल्हाळ, शहानामापाठक आणि रसिकतेची अंगे असलेल्या अनेकजणांनी त्याच्या दरबारी एकच गर्दी केली. आपल्या सुलतानाचेच अनुकरण त्याच्या प्रजाजनांनी केले आणि चैनबाजी आणि ख्यालीखुशालीखेरीज इतर सर्व गोष्टींकडे त्यांनीही पूर्णपणे दुर्लक्ष केले. साधुपुरुष म्हणून गाजलेल्या व्यक्तींनी दारूच्या कोठारवाड्याकडे आपली वस्त्रे गहाण टाकली आणि धर्मनिष्ठ शिक्षक आपापली विद्यालये सोडून दारूच्या गुत्त्यांत गेले आणि तेथे त्यांनी दारूच्या चषकात आपली बुद्धिमत्ता बुडविली. दरबारामध्ये कोणी कोणाच्या कह्यात नाही अशी परिस्थिती निर्माण झाल्यावर प्रांतिक सुभेदारांनी स्वतंत्रपणे वागण्यास सुरुवात केली. त्याचा परिणाम असा झाला की जे बादशाही अधिकारी त्यांच्या मताशी सहमत झाले त्यांनाच फक्त त्यांच्या अधिकाराच्या जागेवर ठेवण्यात आले. परंतु प्रांतिक सुभेदारांनी बादशाही सत्तेवर चालविलेल्या आक्रमणाला पाठिंबा देण्याचे ज्यांनी नाकारले त्यांची हकालपट्टी करण्यात आली. या परिस्थितीचे परिणाम अगदी थोडक्या कालावधितच दिसून आले. कारण तेलंगणाचा प्रांत आणि अहमदाबाद बिरदला लागून असलेले जिल्हे वगळल्यास राज्याचा दुसरा कोणताच प्रदेश प्रत्यक्षात सुलतानाच्या ताब्यात राहिला नाही. परंतु मलिक अहमद बहरीचा एक अपवाद

सोडल्यास इतर सर्व तरफदार आपण सुलतानाबरोबर एकनिष्ठ आहोत असे वरवर तरी दाखवू लागले. त्यांची एकनिष्ठेची ग्वाही मात्र अगदी नाममात्र होती. जर का आपला वजीर कासिम बरीद याच्या इच्छेप्रीत्यर्थ सुलतान मोहिमेवर निघाला आणि प्रांतिक सुभेदारांना या मोहिमेत आपल्याला काही तरी लभ्यांश आहे असे वाटले तर ते सुलतानाबरोबर अशा मोहिमेत सामील होत. परंतु आपल्याबरोबर ते एवढा लवाजमा आणीत की सुलतान त्यासमोर अगदी कवडीमोलासमान होई. मोहिमेवरून तो जेव्हा राजधानीत जाण्यासाठी परत फिरे तेव्हा त्याचा निरोप घेण्याच्या समारंभाच्या भानगडीत देखील न पडता ते तसेच निघून जात. सुलताना [ २ ] ( ५३६ ) समक्ष उभे राहणे किंवा त्याला रीतीरिवाजाप्रमाणे खडी ताजीम देणे हे त्यांना अपमानास्पद वाटू लागले. हे टाळण्यासाठी प्रांतिक सुभेदारांनी दरबारात हजर राहण्याचेच सोडून दिले. आपल्या बापाच्या मृत्यूला कारणीभूत झाल्याबद्दल मलिक अहमद बहरीने सुलतानाला कधीच क्षमा केली नव्हती. त्याने सुलतानाबरोबर स्वारीवर जाण्याचे नाकारले. इतकेच नव्हे तर ताबडतोब आपले स्वातंत्र्य जाहीर करून अहमद-नगर शहराची स्थापना केली. त्याने राजचिन्हांचा स्वीकार केला आणि युसुफ आदिल-खान, फतेऊल्ला इमादउल्मुल्क यांनी आपलेच अनुकरण करावे आणि खुत्बा स्वतःच्या नावे वाचावा यासाठी त्यांचे मन वळविण्याबद्दल आपल्यातर्फे त्यांच्याकडे वकील रवाना केले. याप्रमाणे या तिघा प्रांतिक सुभेदारांनी लवकरांत लवकर स्वातंत्र्य जाहीर करण्याचे ठरविले.

( २७४ ) कासिम बरीद याने अहमदाबाद बिदर आणि आजूबाजूच्या प्रदेशावर तरफदारी शाबीत करण्याचे ठरविले होते. त्यामुळे आपल्या सरकारातील किल्ल्यांचा ताबा आपल्या आश्रितांकडे असावा असे त्याला वाटले. परंतु त्या ठिकाणी असलेल्या शाही शिबंदीने किल्ले त्याच्या हवाली करण्यास साफ नकार दिला. १९३० आपल्याला त्यांनी दिलेला नकार हा सुलतानाने खाजगीरित्या दिलेल्या हुकमांचा परिपाक असावा असे वाटून कासिम बरीद यानेही आपली राजनिष्ठा झुगारून दिली आणि ते किल्ले बळाच्या जोरावर घेण्याच्या प्रयत्नाला तो लागला. दोन वेळा त्याने सुलतानाच्या फौजांचा पराभव केला आणि सुलतानाची त्याच्या राजधानीमधून त्याने जवळ जवळ हकालपट्टीही केली. तेव्हा निजामउल्मुल्काच्या इतराजीमुळे बऱ्हाणपूर येथे आश्रयार्थ गेलेला दिलावरखान हबशी हा सैन्य घेऊन [ २ ] ( ५३७ ) झपाट्याने आपल्या सुलतानाच्या सोडवणुकीकरता धावून आला. कासिम बरीदचा पराजय होऊन त्याने गोवळकोंड्याकडे पळ काढला. दिलावरखान हा त्याच्या पाठलागावर निघाला परंतु परमेश्वराची तशी इच्छा होती की काय म्हणून दैवाचे पारडे अचानक फिरले. पाठलागाच्या घाईगर्दीत असताना कौलास येथे दिलावरखानाच्या सैन्यातील एक पिसाळलेला हत्ती आपल्या माहुताच्या आदेशाला न जुमानता आपल्याच सैन्यावर धावून गेला आणि त्याने अनेक इसमांना पायदळी तुडवून ठार मारले. अशा

तऱ्हेची परिस्थिती उद्भवलेली पाहून दिलावरखानाने एक भाला हातात घेतला आणि आपल्या काही अनुयायांच्या मदतीने हत्तीला परतविण्याचा प्रयत्न केला पण त्याला यश आले नाही. तो हत्ती तसाच पुढे घुसला. शिपायांनी त्याला वाट दिली. तोच त्या पिसाळलेल्या हत्तीने आपल्या सोंडेने दिलावरखानाला पकडले आणि तुडवून त्याला ठार मारले. या घटनेची हकीकत कानावर पडल्यावर कासिम बरीद पूर्वी विजय पावलेल्या दिलावरखानाच्या सैन्यावर तुटून पडला. आपल्या पुढाऱ्याचा नाश झाल्यामुळे दिलावरखानाचे नाउमेद झालेले सैन्य पळून गेले. त्यांचे सर्व सामानसुमान कासिम बरीदच्या हाती पडले. त्याच्या सामर्थ्याला तोंड देणे शक्य न झाल्याने सुलतानाने त्याला राजधानीत प्रवेश करू दिला. दोघांमध्ये पोकळ दिलजमाई झाली. कासिम बरीदचे आसन राजकारभारात आता निर्वेध झाले होते. त्याने सुलतानाच्या हाती केवळ नाममात्र सत्ता ठेवली. बरीदशाही घराण्याचे इतिहासकार या काळापासून बरीदशाहीची स्थापना झाली असे सांगतात.

(२७५) विजापूर येथे दिवसेंदिवस युसुफ आदिलखानाच्या सामर्थ्यात वाढ होत होती. त्याबद्दल मत्सर वाटून त्याने विजयनगरच्या रायाला लिहून कळविले की युसुफ आदिलखानाने सुलतानाविरुद्ध बंड करून राजचिन्हे धारण केलेली आहेत. त्याने रायाला असे वचन दिले की जर तुम्ही विजापूरवर स्वारी कराल तर बक्षीस म्हणून तुमच्याकडे मुद्गल आणि रायचूर हे किल्ले पुन्हा सोपविण्यात येतील. विजय-नगरचा राजा अजून पोरसवदा असल्याने त्याने आपला वजीर तीमराज [२] (५३८) याला बरोबर सुसज्ज अशी फौज देऊन युसुफ आदिलखानाविरुद्ध रवाना केले. त्याने मुलुखाची भयंकर नासाडी करून दोन्ही किल्ल्यांवर आपला ताबा प्रस्थापित केला. युसुफ आदिलखानाने मात्र तीमराजाबरोबर तह केला आणि कासिम बरीदचा सूड घेण्यासाठी म्हणून कूच केले. बरीदने मरहूम निजामउल्मुल्काचा मुलगा मलिक अहमद बहरी याच्याकडे मदतीची याचना केली. त्याच वेळी त्याने त्याला असे वचन दिले की तुम्ही माझ्या शत्रूचा हल्ला परतवून लावल्यास मी तुम्हाला सुलतानाच्या १९७* वजनाचा उपयोग कोकणातील गोवा ह्या बंदराचा आणि पन्हाळा आणि मुखेड या ठिकाणांचा ताबा बहादूर गिलानीच्या हातातून घेण्यास मदत करीन इतकेच नव्हे तर ही ठिकाणे कायमची तुमच्या ताब्यात दिली जातील अशी व्यवस्था करीन. या बेताला मलिक अहमद याने आपली अनुमती दर्शविली आणि या स्वारीत आपल्याबरोबर येण्यासाठी म्हणून परंड्याचा फखरउल्मुल्क ऊर्फ ख्वाजा जहान आणि त्याचा भाऊ जैनखान यांना प्रोत्साहन दिले. त्याप्रमाणे त्याने अहमदाबाद बिदरच्या रोखाने कूच केले. तेथे त्याला थोड्याच अवधीनंतर कासिम बरीद तुर्क हा येऊन मिळाला. त्याने आपल्याबरोबर सुलतानाला आणले होते (अर्थात् तो सुलतानाबरोबर याबाबत सल्ला-मसलत करीत नसे ही गोष्ट वेगळी.) त्यानंतर ह्या सर्व मंडळींनी शत्रुविरुद्ध चाल केली. कासिन बरीदने सुलतानाला फौजेच्या मध्यभागी ठेवले आणि आपण स्वतः

आघाडीवर मोर्चे लावून उभा राहिला. ख्वाजा जहानने डाव्या फळीचे नेतृत्व स्वीकारले आणि उजव्या फळीचे पुढारीपण अहमद निजामउलमुल्क याने आपल्याकडे घेतले. युसुफ आदिलखानाने आपल्या फौजेची रचना कशी केली त्याची हकीकत यानंतर सांगण्यात येईल. दोन्ही फौजांत झालेले युद्ध अतिशय तुंबळ झाले. सरतेशेवटी फौजेचा मध्यभाग आणि ख्वाजा जहानच्या हाताखालील डावी फळी मोडली आणि सुलतानाच्या फौजेचा पराभव झाला. इकडे अहमद निजामउल्मुल्क आणि युसुफ आदिलखान यांनी आपापल्या भूमिकांचे स्पष्टीकरण केले आणि त्यानंतर दोघेजण आपापल्या प्रदेशाकडे निघून गेले.

( २७६ ) हिजरी ८९९ } इ. स. १४९३ } हिजरी ८९९ या वर्षी महमूदशहा गुजरातीने सुलतानाकडे वकील पाठवून तक्रार केली की समुद्र-[२](५३९) किनाऱ्यावर हुकमत गाजविणाऱ्या बहादुर गिलानीने गुजराती व्यापाऱ्यांच्या मालकीची असलेली संपत्तीने भरलेली गलबते पकडली आहेत. एवढी दंडेली करूनही समाधान न झाल्यामुळे की काय त्याने आपला गुलाम याकूत हबशी याला २० लढाऊ गलबते देऊन माहिमकडे रवाना केले. तो भाग याकूबने पूर्णपणे उद्ध्वस्त केला आणि दयामाया न दाखविता लोकांना बंदिस्त केले. त्याचप्रमाणे त्याने मशिदी व इतर इमारतींना आगी लावल्या. एवढेच नव्हे तर सुरतेविरुद्ध चाल करून जाण्याचीही धमकावणी त्याने दिली. या वकिलाने पुढे असे निवेदन केले की गुजरातचे सैन्य बहादुर गिलानीच्या विरुद्ध चालून जावयाचे झाल्यास दक्षिण देशातून कूच करून गेल्याशिवाय त्यांना तिकडे जाता यावयाचे नाही. समुद्रमार्गाने त्याचा बंदोबस्त करता येईल एवढ्या मोठ्या संख्येने सैन्य रवाना करता येणे शक्य नाही. साहजिकच तुम्ही अशा तऱ्हेच्या दंडेलीला आळा घालून त्याला शासन करणे भाग आहे. परंतु अशा तऱ्हेने त्याला शासन लावण्यास आपण पुरे पडणार नाही असे जर तुम्ही कबूल करीत असल्यास गुजरातमधून सैन्य पाठवून त्याच्याविरुद्ध योग्य ती कारवाई करणे हेच सयुक्तिक होईल.

( २७७ ) या निरोपामुळे महमूदशहा खवळून उठला आणि त्याने बहादूर गिलानीचे बंड मोडण्याचा निश्चय केला. त्यासाठी त्याने आपल्या ताबेदार प्रांतिक सुभेदारांकडे मदतीसाठी याचना केली. आपल्यावर गुजरातच्या सुलतानाचा रोष ओढवेल या भीतीमुळे आणि बंडखोराच्या लुटीतील वाटा आपल्याला मिळेल या आशेने महमूदशहाच्या आज्ञांचे पालन करण्याचे प्रांतिक सुभेदारांनी ठरविले. आपला सेनापती कमालखान याजबरोबर ५००० घोडेस्वार देऊन युसुफ आदिलखानाने त्याला सुलतानाला जाऊन मिळण्यासाठी रवाना केले; मलिक अहमद बहरी याने तितकेच स्वार आपला सेनापती मोतबरखान याच्या हाताखाली रवाना केले. [ २ ] ( ५४० ) त्याचप्रमाणे आपल्या एका ज्येष्ठ अधिकाऱ्याच्या हाताखाली एक सेनाविभाग इमादउलमुल्क याने पाठविला.

( २७८ ) दरम्यान महमूदशहाने बहादूर गिलानीकडे एक खलिता पाठवून

त्यात आपला मित्र गुजरातचा सुलतान याने त्याच्या विरुद्ध केलेल्या तक्रारीची हकीकत कळवून त्याला हुकूम केला की गुजरात राज्याची जी ठिकाणे, जहाजे, मालमत्ता आणि युद्धकैदी त्याने जबरदस्तीने ताब्यात घेतली असतील ती ताबडतोब त्याच्या स्वाधीन करावीत. बहादूरखानाला जेव्हा कळले की हा खलिता घेऊन एक गुप्त हेर त्याच्याकडे पाठविण्यात आला आहे तेव्हा त्याने त्या हेराला रस्त्यातच मिरज येथे अटकावून ठेवण्याची आज्ञा दिली आणि सुलतानाच्या सत्तेची आपण यत्किंचितही पर्वा करीत नाही असे आपल्या वागणुकीने दर्शविले. हे पाहिल्यावर महमूदशहाने कूच केले आणि वेळ न दवडता तो झपाट्याने निघाला. जमखिंडीच्या किल्ल्यासमोर आल्यावर त्याने तेलंगणाचा तरफदार कुतुबउल्मुल्क याला किल्ल्याला वेढा घालण्याचा हुकूम दिला. परंतु देखभाल करण्याच्या कामात गुंतलेला असताना किल्ल्यावरून सोडण्यात आलेला एक बाण लागून कुतुबउल्मुल्क ठार झाला. तेव्हा सुलतानाने सुलतान कुलीला १९८□ कुतुबउल्मुल्काचे अधिकारपद आणि पदव्या बहाल केल्या आणि अधिकारपदाचा भार सांभाळणे शक्य व्हावे म्हणून भोंगिर, दुर्गा आणि १९९□ तेलंगणातील इतर जिल्हे त्याला जहागिरीदाखल बहाल केले. जमखिंडीचा पाडाव झाला आणि शहराचा ताबा युसुफ आदिलखानाच्या सैन्याकडे दिल्यावर सुलतानाच्या फौजेने संकेश्वराच्या दिशेने कूच केले होते. या ठिकाणी बहादुरखानाने आपले निवासस्थान मुकर केले होते. परंतु सुलतानाची फौज तिथे पोहोचावयाचे अगोदर बहादुरखान ते ठिकाण सोडून निघून गेला होता. त्याच्या शिबंदीपासून तीन दिवसांत संकेश्वर काबीज करण्यात आले. तेथील कामे अजून बांधून पुरी देखील झाली नव्हती. यानंतर कासिम बरीदच्या सल्ल्यावरून महमूदशहाने मिरजेविरुद्ध कूच केले. [२] (५४१) बहादुरखानाच्या फौजेची त्याच्याबरोबर रणांगणात गाठ पडली. प्रचंड संहार होऊन बहादुरखानाचा पराभव झाला. लढाईतून वाचलेल्यांनी किल्ल्याचा आश्रय घेतला. वेढा बराच काळ चालल्यानंतर किल्ल्याच्या सुभेदाराने पाहिले की आता मदत येण्याची काही आशा नाही. तेव्हा त्याने दयेची याचना केली. कासीम बरीदने संमती दिल्यावर दयेची विनंती मान्य करण्यात आली. कासिम बरीद याला भेट म्हणून बहादुरखानाचे २५ घोडे मिळाले. त्याच वेळी बहादुरखानाच्या अनुयायांना असे आश्वासन देण्यात आले की ज्यांना त्याच्या चाकरीत शिरावयाची इच्छा आहे त्यांना भरती करून घेण्यात येईल. इतरांना निघून जाण्याची मुभा आहे. परंतु त्यांना आपले घोडे अगर शस्त्रास्त्रे मात्र बरोबर घेऊन जाता येणार नाहीत. यावर शिबंदीने उत्तर दिले की किल्ला आणि त्याबरोबरच आमचे घोडे व शस्त्रास्त्रे यांची आम्ही शरणागती दिल्यावर आमच्या प्रमुखाकडे जावयाला आम्हाला तोंड नाही आणि त्याऐवजी सुखाने मरण भोगण्याची आमची तयारी आहे. त्यांचा इमानीपणा आणि एकनिष्ठता याचे सुलतानाने मोठे कौतुक केले. त्याने त्यांची विनंती मान्य केली आणि बहादुरखानाला जाऊन मिळण्याची त्यांना परवानगी दिली.

( २७९ ) मिरजेचा पाडाव झाल्यानंतर महमूदशहाने माळव्याकडे कूच केले. दरम्यान बहादूर गिलानीने आपल्या हितचिंतकांनी दिलेला सल्ला ऐकून आपल्यातर्फे ख्वाजा नियतउल्ला गिलानी याला शरणागतीचा अर्ज देऊन सुलतानाकडे रवाना केले. १९९अ* सुलतानाने कासिम बरीदच्या संमतीने बहादूर गिलानीला क्षमा करण्याचे, जिंकलेल्यापैकी काही ठिकाणे त्याला परत करण्याचे आणि त्याच्या ताब्यातील उर्वरित प्रदेशावर त्याला कायम करण्याचे कबूल केले. याबद्दल सुलतानाने अशी अट मात्र घातली की त्याने क्षमायाचना समक्ष येऊन करावी, काही रकम आदा करावी आणि दोन हत्ती नजर म्हणून द्यावे. आपल्या वकिलातीची याप्रमाणे झालेली फलश्रुती नियतउल्ला याने बहादूर गिलानी याला लिहून कळविली आणि यत्किंचितही विलंब न लावता त्याला सुलतानाच्या छावणीकडे निघून येण्याचा सल्ला दिला. सुलतानाने आपल्याबरोबर वागताना जी उदारपणाची भूमिका घेतली तिचा उगम दौर्बल्यातून झाला आहे अशी समजूत बहादुरखानाने करून घेतली आणि तहाच्या अटी झिड-कारल्या. थोड्याच कालावधीनंतर त्याने सुलतानाच्या सामानसुमानावर [ २ ] ( ५४२ ) हल्ला केला आणि त्या वर्षी अहमदाबाद बिदर येथे आणि पुढील वर्षी गुजरात येथे खुत्बा आपण स्वतःच्या नावे वाचणार हा आपला इरादा जाहीर केला. या उद्धट-पणाचा महमूदशहाला अतिशय संताप आला. त्याने माळव्याहून कऱ्हाडवर चाल केली आणि कऱ्हाडचा पाडाव केला. या यशाबरोबरच बहादुरखानाची सद्दी दिवसेंदिवस कमी होत गेली. अखेर त्याने पन्हाळा किल्ल्याकडे पळ काढला. त्याच्या ताब्यातील अत्यंत मजबूत असा हा किल्ला होता. त्या किल्ल्यासमोर वेढा घालून बसण्याची सुलतानाची इच्छा नव्हती. तेव्हा त्याने कोल्हापूर येथे मुक्काम केला. तेथून त्याचा बेत दाभोळकडे कूच करून जाण्याचा आणि समुद्रकाठावर रमण्याचा होता. यावर बहादुरखानाने सुलतानाच्या जाण्याच्या वाटेवर दबा धरून वाटेत त्याच्यावर हल्ला करावा असा मनसुबा रचून पन्हाळा किल्ला सोडला. परंतु आयत्या वेळी मात्र आपली योजना कृतीत उतरविण्याचे धाडस त्याला झाले नाही आणि त्याने पळ काढला. त्याच्या अनेक अनुयायांनी त्याचा त्याग केला. काही सुलतानाला जाऊन मिळाले आणि काही युसुफ आदिलखानाकडे गेले. कासिम बरीदच्या सल्ल्यावरून आता महमूद-शहाने परंडा किल्ल्याचा सुभेदार ख्वाजा जहान याच्याकडे बहादुरखानाने पन्हाळ्यात प्रवेश करू नये म्हणून त्याला प्रतिबंध करण्याची कामगिरी सोपविली. कोल्हापूर येथे आल्यावर पावसाळा सुरू झाल्यामुळे त्याने तेथेच काही काळपर्यंत मुक्काम करण्याचा निश्चय केला.

( २८० ) बहादुरखान आता नरम आला होता. त्याने पुन्हा ख्वाजा नियतउल्ला आणि मुईजउद्दीन यांना दरबाराकडे अर्जी देऊन पाठविले आणि असे कळविले की जर का सुलतानाच्या हस्ताक्षरातले आणि कासिम बरीद आणि इतर प्रमुख अमीर यांचा सहीशिक्का असलेले असे क्षमेचे अभिवचन जर आपल्याकडे पाठविण्यात आले तर

आपण समक्ष दरबारात हजर होऊ आणि उर्वरित आयुष्यात कधीही कर्तव्य आणि निष्ठा यांच्या मार्गापासून च्युत होणार नाही. सुलतानाने त्याची विनंती मान्य केली आणि त्याच्या मनातील भीतीचे निराकरण करावे म्हणून दरबारातील काही प्रतिष्ठित मंडळींना त्याने बहादुरखानाला दरबारात आणण्यासाठी रवाना केले. ही मंडळी बहादुरखानाच्या छावणीत येऊन पोहोचली. परंतु त्याच्या नशिबातल्या दुष्ट ग्रहांनी त्याला सुलतानाला शरण जाण्याच्या विचारापासून परावृत्त केले आणि [२] ( ५४३ ) परिणामी त्याने अडचणी उपस्थित करण्यास सुरुवात केली. यावर सुलतानाने पन्हाळ्याच्या वेढ्यावरून ख्वाजा जहानला परत बोलविले आणि आणखी काही अधिकाऱ्यांसह त्यांची शत्रूविरुद्ध रवानगी केली. बहादुरखानाने सुलतानाच्या फौजेशी सामना देण्यासाठी म्हणून आगेकूच केले. त्याच्याबरोबर २००० घोडेस्वार आणि १५०० पायदळ होते. दोन्ही फौजांत घनघोर युद्ध झाले. एक बाण लागून बहादुरखान ठार झाला. त्याच्या सैन्याने पळ काढला. बंडखोर बहादुरखानाचे मस्तक ख्वाजा जहानने धडावेगळे केले आणि ते घेऊन तो सुलतानाच्या छावणीत हजर झाला. सुलतानाने आपल्या स्वतःच्या कपड्यांचा एक पोशाख देऊन त्याचा सन्मान केला आणि लढाईत जिंकलेले हत्ती आणि घोडे त्याला बक्षिसादाखल दिले.

( २८१ ) या विजयानंतर दोन अथवा तीन दिवसांनी सुलतान पन्हाळा किल्ला पाहण्यासाठी म्हणून गेला. तेथून त्याने मलिक ऐन उल्मुल्क गिलानी याला त्याचा भाऊ मलिक सय्यद याचे सांत्वन करण्यासाठी आणि त्याला आपल्याकडे आणण्यासाठी म्हणून गोव्याला पाठविले. कासिम बरीदच्या सूचनेवरून बहादुरखानाची जहागीर मलिक ऐन उल्मुल्क गिलानी याच्याकडे लावून देण्यात आली. यानंतर सुलतान आपल्या काही प्रमुख उमरावांबरोबर दाभोळ येथे गेला आणि तेथून जहाजात बसून त्याने मनाची करमणूक करण्यासाठी म्हणून किनाऱ्याकिनाऱ्याने प्रवास केला. त्यानंतर तो त्याच्या राजधानीच्या दिशेने जाण्यासाठी परत फिरला. वाटेत जाताना त्याने महमूद ख्वाजा महमूद गावान याने लावलेल्या विजापूर जवळील कलबाग नावाच्या बागेत काही काळ घालविला. अहमदाबाद बिदर येथे आल्यानंतर त्याने बहुमोल भेटी देऊन आपले वकील गुजरातच्या महमूदशहाकडे रवाना केले. त्या काळच्या इतिहासकारांच्या सांगण्याप्रमाणे त्याने पाठविलेल्या इतर अनेक वस्तूंखेरीज ५ मण मोती ( दिल्लीच्या चालू वजनाप्रमाणे ), ५ हत्ती आणि हिरे जडविलेला एक सुंदरसा खंजीर अशा गोष्टीही गुजरातच्या सुलतानाकडे पाठविल्या. त्याशिवाय त्याने बहादुरखान गिलानीने पकडलेले कमालखान, सफ्दरखान आणि इतर नामवंत कैदी तसेच त्याने काबीज केलेली २० जहाजे आणि इतर माल यांची [ २ ] ( ५४४ ) सुटका केली.

( २८२ ) हिजरी ९०१ } हिजरी ९०१ या वर्षी सुलतान कुली कुतुबउल्मुल्क
इ. स. १४९५ } हमदानी याची तेलंणाचा तरफदार म्हणून नेमणूक

करण्यात आली आणि गोवळकोंडा व वरंगळ आणि त्यांच्या आजूबाजूच्या प्रदेशांची त्याच्या जहागिरीत भर घालण्यात आली. त्याचप्रमाणे दस्तुर दिनार याची सागर आणि अहसनाबाद कुलबर्गा यावर सुभेदार म्हणून नियुक्ती करण्यात आली. या सुमारास सुलतानाची अशी समजूत करून देण्यात आली की राज्याचे मनसबदार [२००] हे त्यांच्या बरोबर जे इतर मोठे अधिकारी देण्यात आलेले असतात त्यासहवर्तमान त्यांची सत्ता वाढविणाऱ्या ज्या काही उपाययोजना अमलात आणल्या जातात त्यांना आपला मनःपूर्वक पाठिंबा देतात. यामुळे सुलतानाने दस्तुरदिनारबरोबर असलेले सर्व अधिकारी काढून घेतले आणि त्यांना दरबारात त्यांच्या कामावर हजर होण्याचा हुकूम दिला. दस्तुरदिनारला या कारवाईमुळे आपली मानखंडना झाली आहे असे वाटले आणि म्हणून त्याने अजीजउल्मुल्क दक्कनीशी संगनमत करून बंडाचे निशाण उभारले. त्याने सात ते आठ हजार हबशी आणि दक्षिणी मंडळींना गोळा करून सुलतानाच्या कुलबर्ग्याजवळील काही जिल्ह्यांचा जबरदस्तीने कबजा मिळविला. महमूदशहाने यावर युसुफ आदिलखानाकडे मदतीची मागणी केली. युसुफ आदिल त्याला सैन्यासहवर्तमान येऊन मिळाला. दोन्ही सैन्यांची गाठ मुंदर्गी [२०१] या गावाजवळ पडली आणि झालेल्या लढाईत बंडखोरांचा पराभव झाला. दस्तुरदिनार ह्याला कैद करण्यात आले. सुलतानाच्या मनातून त्याला ठार मारावयाचे होते परंतु युसुफ आदिलखानाच्या मध्यस्थीने सुलतानाचे मन त्याला क्षमा करण्याबाबत एवढेच नव्हे तर त्याला त्याच्या सरकारावर पुन्हा नेमण्याबाबत वळविण्यात आले. बंडखोरांपैकी काहींनी सागरच्या किल्ल्याचा आश्रय घेतला होता त्यामुळे सुलतानाने किल्ल्याला वेढा घातला. किल्ल्याचा पाडाव झाल्यावर किल्ला सुलतानाने युसुफ आदिलखानाच्या [ २ ] ( ५४५ ) हवाली केला आणि नंतर तो आपल्या राजधानीला परतला. [२०२]

( २८३ ) हिजरी ९०२ }
इ. स. १४९६ } हिजरी ९०२ यावर्षी युसुफ दक्कनी, युरीषखान, मिर्जा शम्सउद्दीन आणि इतर काही सुलतानांच्या खास विश्वासातील व्यक्तींनी दरबारातील काही तुर्की अधिकाऱ्यांबरोबर संगनमत करून कासिम बरीदचा नाश करण्यासाठी कट रचला परंतु कासिम बरीदला त्यांच्या बेताची बातमी लागली. त्याने त्या सर्वांना त्यांच्या सर्व साथीदारांसह ठार मारले. कासिम बरीदच्या या आगाऊ कृत्याबद्दल सुलतानाला संताप आला आणि त्याने पूर्णपणे महिनाभर त्याला आपली गाठभेट घेण्यास परवानगी दिली नाही. अखेर शहा मुहिबउल्ला याने मध्यस्थी केल्यानंतर मोठ्या कष्टाने सुलतानाचे मन त्याला क्षमा करण्याबद्दल आणि त्याला पुन्हा आपल्या मर्जीत घेण्याबद्दल वळविण्यात आले. यानंतर सुलतान पुन्हा आपल्या ऐदीपणाच्या आणि विषयासक्तीच्या जीवनाचा मार्ग आक्रमिण्यात मशगूल झाला.

( २८४ ) हिजरी ९०३ }
इ. स. १४९७ } हिजरी ९०३ या वर्षी महमूदशहाने युसुफ आदिलखानाच्या बालवयी मुलीची आपला मुलगा अहमद

याच्याबरोबर विवाहासाठी मागणी केली. तिचे वय त्यावेळी ४ वर्षांचे होते. बऱ्याच वाटाघाटीनंतर असे ठरले की लग्न समारंभाचा सोहाळा कुलबर्गा येथे उरकण्यात यावा. यानुसार सुलतान कुलबर्ग्याकडे गेला. तेथे युसुफ आदिलखानाने मोठ्या थाटामाटाने त्याची सरबराई केली. सुलतानाच्या छावणीतील काजी अबदुससमद याने विवाह-बंधनाची गाठ बांधली. तेव्हा असे ठरले की नववधूला १० वे वर्ष लागल्यानंतर तिला राजपुत्राच्या हवाली करण्यात यावे. विवाहाचा समारंभ चालू असतानाच दस्तुर-दिनार आणि युसुफ आदिलखान या दोघांमध्ये कुलबर्ग्याचे [ २ ] ( ५४६ ) सरकाराबाबत कलह निर्माण झाला. युसुफ आदिलखानाने कुलबर्ग्यावरच नव्हे तर आलंद, गुंजोटी आणि कल्याणी यावरही आपला हक्क सांगितला. त्याचे म्हणणे असे पडले की हा भाग आपल्या ताब्यात आल्यास आपले सरकार बिदरबरोबर सलगपणे जोडले जाईल. याउलट दस्तुरदिनारने असा दावा मांडला की भीमा नदी हीच विजापूर प्रांताची हद्द समजण्यात यावी आणि कुलबर्गा, सागर आणि एटगीर ही आपल्याला देण्यात यावी. सुलतानाने या भांडणात हस्तक्षेप करण्यास नकार दिला. तेव्हा दस्तुरदिनार हा परंड्याला निघून गेला. आदिलखान आणि कासिम बरीद यांच्या मधील वैमनस्य वाढतच चालले. कारण कासिम बरीद याने आदिलखानाने मांडलेल्या दाव्याला आपला सक्त विरोध दर्शविला. कुतुबउल्मुल्क याने युसुफ आदिल-खानाची बाजू घेतली. या घटनेने कासिम बरीद भयभीत झाला आणि आपला मोठा मुलगा आणि आपले अनुचर यासहित तो जालंद येथे निघून गेला. यावर युसुफ आदिलखानाने उत्सव समारंभ तसाच अर्धवट टाकला आणि सुलतानाला बरोबर घेऊन कुतुबउल्मुल्क, मलिक इलिआस आणि ऐनउल्मुल्क यासहवर्तमान कासिम बरीदच्या विरुद्ध चाल केली. कासिम बरीदचा पराभव झाला आणि तो परंडा येथे पळून गेला. या प्रसंगामुळे आदिलखानाचे सामर्थ्य इतके वाढले की त्याच्या समक्ष सुलतान सिंहासनावर बसण्यास का कू करू लागला. यानंतर युसुफ आदिलखानाच्या वजनामुळे राज्यातील सर्व वजिरांनी आपापल्या मागण्या पदरात पाडून घेतल्या आणि ते आपापल्या जिल्ह्यांकडे परतले.

( २८५ ) हिजरी ९०४ ⎫ हिजरी ९०४ या वर्षी युसुफ आदिलखानाने सैन्य
इ. स. १४९८ ⎭ घेऊन दस्तुरदिनारच्या विरुद्ध चाल केली. दस्तुर-दिनार कुलबर्ग्याहून पळून गेला. कासिम बरीदने त्याचे मन अहमदनगर येथे मलिक अहमद निजामउल्मुल्क याच्या जवळ आश्रय घेण्याबाबत वळविले [ २ ] ( ५४७ ). अहमदने दस्तुरदिनारला भरभक्कम पाठिंबा दिला त्यामुळे त्याला विरोध करणे युसुफ आदिलखानाला शक्य झाले नाही. तेव्हा युसुफ आदिलखान हा अहमदाबाद बिदर येथे गेला. त्याच्या सांगण्यावरून सुलतानाने मलिक अहमद याला त्याबाबतीत हस्तक्षेप न करण्याविषयी लिहून कळविले.

( २८६ ) हिजरी ९१० } हिजरी ९१० या वर्षी कासिम बरीद मरण पावला
इ. स. १५०४ } आणि त्याचा मुलगा अमीर बरीद हा त्याच्या जागी अधिकारावर आला. त्याने आपल्या बापापेक्षा आपल्या अधिकार कक्षेची मर्यादा वाढविली आणि महमूदशहाचे राहिलेले होते नव्हते ते अधिकारही काढून घेतले. या घटनेनंतर लगोलग युसुफ आदिलखानाने कासिम बरीदच्या मृत्यूमुळे उद्‌भवलेल्या परिस्थितीचा फायदा घेऊन दस्तुरदिनारवर हल्ला केला. दस्तुरदिनार त्याच्याविरुद्ध युद्धासाठी उभा ठाकला. परंतु तो मारला गेला आणि त्याच्या ताब्यातले सर्व जिल्हे युसुफ आदिलखानाच्या अंमलाखाली आले. यानंतर लवकरच युसुफने शहा ही पदवी धारण केली आणि शिया पंथीयांच्या मूलतत्त्वांच्या अनुषंगाने विजापूरमध्ये खुत्ब्याचे आपल्या नावाने वाचन करविले. हिंदुस्थानच्या कोणत्याही भागात शिया पंथाच्या तत्त्वानुसार खुत्ब्याचे वाचन झालेले नव्हते. त्यामुळे साहजिकच सर्व दक्षिण्यांच्या मनात त्याच्याविरुद्ध संतापाची एकच लाट उसळली. परिणामी अमीर बरीद याने महमूदशहाला कुतुबउल्मुल्क, इमादउल्मुल्क आणि खुदावंदखान यांना पुढील मजकुराचे पत्र लिहिण्यास प्रवृत्त केले. "युसुफ आदिलखानाने राजनिष्ठा झुगारून देऊन बंडाचे निशाण उघड उघड उभारले आहे. एवढेच नव्हे तर इस्लामी राज्यात त्याने पाखंडयांच्या मतप्रणालीचा शिरकाव करून दिला आहे. तेव्हा माझी तुम्हाला अशी आज्ञा आहे की सनातन इस्लाम धर्माचे पालन करणाऱ्या तुम्ही सर्वांनी माझ्या निशाणाखाली एकत्र येऊन युसुफ आदिलखानाचा मोड करण्यास मला सहाय्य करावे". प्रत्येक पत्राच्या समासामध्ये सुलतानाने पुढील काव्याच्या ओळी लिहिल्या; [२] (५४८) "आपल्या संपत्तीच्या मुबलकपणामुळे त्याचा गर्विष्ठपणा इतका वाढला आहे की त्याच्या डोळ्यातील सूर्य हा जणू एकाद्या अणुप्रमाणे दिसत आहे."

( २८७ ) यावर कुतुबउल्मुल्क हा तेलंगणामधील अधिकाऱ्यासह विलंब न लावता दरबारात हजर झाला. परंतु इमादउल्मुल्क आणि खुदावंदखान यांनी मात्र सबबी सांगून येण्याचे टाळले. त्यामुळे अमीर बरीद यानेमलिक अहमद बहरी याच्याकडे सहाय्य देण्याबद्दल याचना केली. मलिक अहमदने ख्वाजाजहान समवेत अहमदाबाद बिदरकडे कूच केले आणि तो सुलतानाला येऊन मिळाला. इतक्या प्रबळ अशा युतीला समरांगणात तोंड देणे शहाणपणाचे ठरणार नाही असा विचार युसुफ आदिलखानाने केला. त्याने कुलबर्गा आणि आलंद यांच्या संरक्षणाची जबाबदारी दर्याखान आणि फखउल्मुल्क तुर्क यांजवर सोपविली. आपला तान्हा मुलगा इस्माईलखान, त्याची आई आणि आपली धनदौलत विजापूर येथे ठेवून त्यांचा ताबा कमालखान दक्कनी याजकडे दिला आणि तो स्वतः ५००० निवडक घोडेस्वार घेऊन वऱ्हाडाकडे निघून गेला. महमूदशहाने अतिशय जलद गतीने त्याचा पाठलाग केला. इमादउल्मुल्काच्या छावणीत आल्यावर युसुफ आदिलखानाला असे दिसून आले की आपल्याला संरक्षण दिल्यास सुलतानाची सर्व फौज आपल्यावर घसरा करील याचा

धोका वाटत असल्यामुळे इमादउल्मुल्क तसे करण्यास राजी नाही त्यामुळे त्याने बुरहाणपुरकडे प्रयाण केले.

( २८८ ) तथापि इमादउल्मुल्क याने मलिक अहमदचे मन वळविण्यासाठी त्याला खाजगीरित्या असे कळविले की विजापूरचा ताबा आपल्याला मिळावा यासाठीच केवळ युसुफ आदिलखानाचा नाश व्हावा अशी अमीर बरीदची इच्छा आहे. यात तो यशस्वी झाला आणि त्यानंतरदेखील सुलतानाला तो आपल्या काबूत ठेवू शकला तर तो इतरांचा नाश घडवून आणील, म्हणून तुम्ही दोस्तमंडळींनी आपापल्या देशाकडे निघून जावे आणि अमीर बरीदबरोबर कसे वागावयाचे त्याची जबाबदारी माझ्यावर सोपवावी हाच मार्ग माझ्या दृष्टीने अधिक [ २ ] ( ५४९ ) चांगला वाटतो. मलिक अहमद आणि कुतुबउल्मुल्क हे दोघे इमादउल्मुल्क याने या विषयावर प्रकट केलेल्या विचाराशी सहमत झाले आणि अचानक त्यांनी आपापल्या देशाकडे जाण्यासाठी माघार घेतली. सुलतानाचा निरोपही त्यांनी घेतला नाही. दुसऱ्या दिवशी सकाळी इमादउल्मुल्क याने सुलतानाकडे अर्जी पाठवून त्यात युसुफ आदिलखानाला क्षमा करण्याविषयी आणि राजधानीकडे परत फिरण्याविषयी त्याची याचना केली.

( २८९ ) अमीर बरीद याच्या चिथावणीवरून वरील अर्जाला संमती देण्याचे सुलतानाने नाकारले. परंतु जेव्हा युसुफ आदिलखानाला समजले की अमीर बरीदच्या दोन बलवान प्रमुख दोस्तानी छावणी सोडून माघार घेतली आहे तेव्हा इमादउल्मुल्क याला पुन्हा येऊन मिळण्याचा त्याला धीर आला. इमादउल्मुल्क याने आदिलखाना-बरोबर संगनमताने सुलतानाच्या फौजेवर हल्ला करण्यासाठी चाल केली. आपल्या छावणीचे संरक्षण करण्यास आपण पुरे पडणार नाही असे वाटून अमीर बरीद याने छावणी तशीच सोडली आणि सुलतानाला बरोबर घेऊन अहमदाबाद बिदरकडे पळ काढला. सुलतानाच्या छावणीत पाठीमागे राहिलेली लूट आदिलखान आणि इमाद-उल्मुल्क यांनी आपापसात विभागून घेतली आणि ते परस्परांच्या राजधान्यांकडे परत फिरले.

( २९० ) हिजरी ९१६ } हिजरी ९१६ या वर्षी युसुफ आदिलखान मरण
इ.स. १५१० } पावला तेव्हा विजापूरचा पाडाव करण्यासाठी म्हणून अमीर बरीद याने चाल केली. परंतु त्याचे सर्व प्रयत्न व्यर्थ गेले आणि विजापूरच्या सिंहासनावरील घराण्याच्या सामर्थ्यात दिवसेंदिवस वाढच होत गेली.

हिजरी ९१८ } हिजरी ९१८ या वर्षी कुतुबउल्मुल्काने आपले स्वातंत्र्य जाहीर
इ. स. १५१२ } केले आणि खुत्ब्यातून सुलतानाच्या नावाची हाकालपट्टी केली. इतके झाले तरी देखील त्याने महमूदशहाकडे प्रतिवर्षी द्रव्याच्या स्वरूपात भेट पाठविण्याची प्रथा चालू ठेवली.

हिजरी ९२० } हिजरी ९२० या वर्षी अमीर बरीद याने सुलतानाच्या खजिन्यातील
इ. स. १५१४ } पैशाच्या जोरावर मोठी सैन्य भरती केली. नंतर सुलतानाला घेऊन त्याने कूच केले आणि इस्माईल आदिलशहाच्या शिबंदीपासून कुलबर्गा जिंकून घेतले. कुलबर्गा त्याने मरहूम दस्तुरदिनारचा मुलगा जहांगीर खान याला जहागिरीदाखल बहाल केले आणि सुलतानाकडून त्याला दस्तुरउलमुल्क हा किताब [ २ ] ( ५५० ) देवविला. दस्तुरउलमुल्काने सैन्य जमा करून त्याच्या बापाच्या ताब्यात असलेले सागरपासून नळदुर्गपर्यंतचे भीमा नदीच्या पूर्व बाजूकडील सर्व किल्ले जिंकून घेतले. अमीर बरीद याला मलिक अहमद बहरी आणि कुतुबउलमुल्क यांच्याकडून रसदीची मदत आल्यामुळे त्याने २०,००० सैनिकांसह नदी ओलांडली आणि मजल दरमजल करीत तो विजापूरच्या दिशेने निघाला. इस्माईल आदिलशहाने शहरानजीक त्याच्याजवळ लढाई दिली आणि त्याचा पूर्णपणे पराजय केला. त्याच्या फौजेची धूळदाण उडाली आणि मोठ्या गोंधळात त्याला रणांगण सोडून पळ काढावा लागला. या लढाईत महमूदशहा हा घोड्यावरून खाली पडला आणि त्याला भयंकर जखम झाली. रणांगणावर तो आणि त्याचा मुलगा अहमदखान हे अगतिक अशा अवस्थेत सापडले. त्यांना कैद करण्यात आले. तख्तनशीन राज्यप्रमुखांना ज्या मानाने वागविणे जरूर आहे तीच वागणूक इस्माईल आदिलशहाने सुलतानाबरोबर ठेवली. त्याने त्याचा योग्य तो आदरसत्कार केला आणि त्याच्या उच्चाधिकारपदाला साजेलशा सर्व प्रकारच्या सोयी-सवलती त्याने त्याला उपलब्ध करून दिल्या.[२०३]

( २९१ ) यानंतर थोड्याच काळाने महमूदशहा हा इस्माईल आदिलखानाबरोबर कुलबर्गा येथे गेला. तेथे इस्माईल आदिलशहाची बहिण बिबी मसिती आणि राजपुत्र अहमद यांच्यामधील विवाहाचा सोहाळा मोठ्या थाटामाटाने साजरा करण्यात आला. सुलतानाने आपल्याबरोबर सोबत आणि संरक्षण यासाठी ५००० परदेशी घोडेस्वार आदिलशहाकडून मागून घेतले आणि त्याने अहमदाबाद बिदरकडे कूच केले. तो शहराच्या नजीक येतो आहेसे पाहिल्यानंतर अमीर बरीद याने शहर खाली केले आणि औशाच्या किल्ल्याच्या आश्रयार्थ तो गेला. महमूदशहाने आता राजधानीचा ताबा घेतला. परंतु लवकरच इस्माईल आदिलशहाच्या अधिकाऱ्यांच्या कानावर आले की अमीर बरीद याला मरहूम मलिक अहमद याचा मुलगा बुरहाण निजामउल्मुल्क याच्याकडून मदत येऊन पोहोचली आहे. तेव्हा ते सुलतानाला सोडून निघून गेले. त्यावर अमीर बरीद राजधानीला परत आला आणि सुलतानावर त्याने पूर्वीपेक्षाही अधिक कडक बंधने लादली. या परिस्थितीला अतिशय कंटाळून [ २ ] ( ५५१ ) त्या दुर्दैवी महमूदशहाने वऱ्हाडात गावील येथे पळून जाण्याचा मार्ग स्वीकारून आपली सुटका करून घेण्याचा प्रयत्न केला. त्यात तो यशस्वी झाला. तेथे गेल्यावर त्याने इमादउल्मुल्क याच्याकडून साहाय्य मिळविले. इमादउल्मुल्क याने त्याला घेऊन राजधानीच्या दिशेने कूच केले. अमीर बरीद याने आपल्याला अहमदाबाद बिदरच्या

किल्ल्यात कोंडून घेतले आणि बुरहाण निजामउल्मुल्क याच्याकडे मदतीची यांचना केली. त्याला जाऊन मिळण्यासाठी म्हणून बुरहाण निजामउल्मुल्काने ख्वाजा जहानची बरीच मोठी फौज देऊन रवानगी केली.

( २९२ ) अमीर बरीद आणि त्याचा दोस्त आता इमादउल्मुल्काच्या सैन्यावर हल्ला चढविण्यासाठी किल्ल्याबाहेर पडले. त्यांच्याबरोबर युद्ध करण्याची इमादउल्मुल्काने तयारी केली आणि लढाईसाठी आपल्या फौजेला सज्ज करून रणांगणात उभे केले. हे चालले असताना सुलतान स्नान करीत होता. शत्रू आपल्यावर चाल करून येत आहे ही बातमी देण्यासाठी इमादउल्मुल्क याने आपला दूत सुलतानाकडे रवाना केला. सुलतानाला ऐकू जावे अशा आवाजात त्या दूताने असे उर्मटपणे उद्गार काढले की अशा कठीण प्रसंगी जो सुलतान आंघोळ करण्यात दंग आहे तो आपल्या अमीर-उमरावांच्या उपहासाचे लक्ष बनावा यात आश्चर्य करण्याजोगे काहीच नाही. दूताकडून अवहेलनापूर्वक उच्चारले गेलेले हे शब्द सुलतानाच्या हृदयाला जाऊन भिडले. त्याच्या मनाची अशी समजूत झाली की या सगळ्या प्रकाराच्या मुळाशी इमाद-उल्मुल्काचा उद्दामपणा आहे. या समजुतीमुळे तो भयंकर संतापला आणि शक्य तेवढ्या जलद तो सैन्याच्या फळीला जाऊन मिळाला. परंतु एकाएकी त्याने आपल्या घोड्याला टाच मारली आणि अमीर बरीदच्या सैन्याच्या दिशेने आपला घोडा पिटाळला. यावर इमादउल्मुल्काने अतिशय उताविळपणे त्वरा करून आपल्या राज्याकडे माघार घेतली. इकडे अमीर बरीदने मोठ्या विजयोन्मादाने शहरात सुलतानासमवेत प्रवेश केला.

( २९३ ) अमीर बरीदने आता सुलतानाला इतके कडक कैदेत ठेवले की तो पुन्हा पळून जाण्याची शक्यता उरली नाही. महमूदशहा निराशेने अगदी अगतिक झाला. त्याला वार्धक्य आले आणि त्याची बुद्धी दुर्बल झाली. अशा परिस्थितीत कोणताही प्रतिकार न करता त्याने आपल्या हातातील सत्तेचा त्याग केला आणि दारू आणि स्त्रीसंगापासून मिळणारे सुख आणि बादशाहीपणाच्या नुसत्या बाह्यांग बडेजावाच्या भपक्यावर मनाचे समाधान करून घेतले. हिजरी ९२३ [ २ ] ( ५५२ )

हिजरी ९२३ } या वर्षी त्याला बरोबर घेऊन बशीरखानाविरुद्ध माहूरवर चाल
इ. स. १५१७ } करून जाण्याची अमीर बरीदला निकड वाटली. झालेल्या लढाईत बशीरखान आणि त्याचा मुलगा हे ठार झाले. माहूरचा ताबा जहागिरीदाखल घालीब

जिल्हज ४ } खानाकडे सोपविण्यात आला. यानंतर महमूदशहा राजधानीकडे
हिजरी ९२४ } परतला. तेथे जिल्हज महिन्याच्या ४ तारखेला सतत स्थित्यंतर
ऑक्टोबर २१ } होत असलेल्या आणि अतिशय कष्टमय अशा ३७ वर्षे आणि २०
इ. स. १५१८ } दिवसांच्या कारकिर्दीनंतर तो मरण पावला. २०४* ते २१०* व २१०* अ

## अहमदशहा बहमनी दुसरा [२] (५५३)

(२९४) अमीर बरीद याच्या ताब्यात फारच थोडा मुलख होता. आपण जर आपले स्वातंत्र्य जाहीर केले तर राज्यातील भोवतालच्या प्रदेशातील इतर सत्ताधीश (ज्यांनी यापूर्वीच आपले स्वातंत्र्य जाहीर केले होते) आपल्यावर हल्ला करतील या भीतीने त्याने महमूदशहाचा मुलगा राजपुत्र अहमद याला तख्तावर बसविले. त्याच्या ताब्यात त्याने राजवाडा आणि वापर करण्यासाठी म्हणून शाही जडजवाहिर दिले. उदरनिर्वाह करण्यासाठी रोजचा तनखा म्हणून द्रव्याची नेमणूकही त्याच्यासाठी करून दिली. परंतु रोजच्या खर्चासाठी हा तनखा अपुरा पडल्यामुळे त्याने बहमनी घराण्यातील सुलतान वापर करीत असलेला मुकुट मोडला आणि गुप्तपणे त्यातील हिऱ्यांची विल्हेवाट लावली. या मुकुटाची किंमत ४ लक्ष होन एवढी होती. अमीर बरीद याला जेव्हा या परिस्थितीची जाणीव झाली तेव्हा त्याने या हिऱ्यांच्या विक्रीच्या भानगडीत असलेल्या अनेक गायक, नर्तक आणि इतर मंडळींना ठार मारले. परंतु या विकल्या गेलेल्या हिऱ्यांचा शोध लागून ते त्याच्या हाती कधीच लागले नाहीत. कारण हिरे खरेदी करणारे हिऱ्यांबरोबर केव्हाच विजयनगरकडे पळून गेले होते. अहमदशहाने गुप्तपणे आपले अनुचर इस्माईल आदिलशहा याजकडे पाठवून त्याच्याजवळ आपल्याला अमीर बरीद देत असलेल्या वाईट [२] (५५४) वागणुकीबद्दल तक्रार केली. इस्माईल आदिलशहाने आपले वकील नजराणा आणि भेटीच्या वस्तू देऊन बिदरच्या दरबाराकडे पाठविले. परंतु ते येऊन पोहोचण्याच्या आत अहमदशहा दुसरा मरण पावला. (हिजरी ९२७ / इ. स. १५२०) सिंहासनावर आल्यानंतर दोनच वर्षांनी हिजरी ९२७ यावर्षी त्याचा मृत्यू झाला.

## अल्लाउद्दीनशहा बहमनी दुसरा [२] (५५५)

(२९५) अहमदशहाच्या मृत्यूनंतर १४ दिवसपर्यंत अमीर बरीद याने तख्तावर कोणाला बसविले नाही. परंतु त्यानंतर स्वतः तख्तावर बसण्याच्या ऐवजी बहमनी घराण्यातील एखाद्याच्या मस्तकावर राजमुकुट ठेवणे शहाणपणाचे आहे असे त्याने ठरविले. याप्रमाणे अल्लाउद्दीन दुसरा याची त्याने सुलतानपदासाठी निवड केली.

(२९६) अल्लाउद्दीनच हा स्वभावतःच अतिशय समजूतदार होता. आपल्या अगोदर गादीवर आलेल्या सुलतानांचा लंपटपणा आणि बदफैलीपणा याचे झालेले घोर परिणाम त्याने स्वतः बघितले होते. तेव्हा त्याने कोणत्याही बाबतीत अतिरेकीपणाचे वर्तन टाळले आणि अमीर बरीद याची सत्ता नामशेष करण्याचा त्याने विचार केला. अमीर बरीदबरोबर त्याने इतके सख्य जोडले की अमीर बरीद देखील काही काळ बेसावध झाला. अल्लाउद्दीनने त्यानंतर गुप्तपणे आपल्या निवासस्थानाजवळ सशस्त्र लोक विखरून ठेवले. दुसऱ्या चान्द्रमासाच्या दिवशी अमीर बरीद त्याला भेटण्यासाठी येणार होता तेव्हा त्याने त्याला कैद करण्याचा निश्चय केला. तत्कालीन रूढ असलेल्या प्रथेला

अनुसरून अमीर बरीद हा आपल्या मुलांसहवर्तमान सुलतानाचे अभिनंदन करण्यासाठी आला. अमीर बरीद हा जेव्हा अल्लाउद्दीनच्या निवासस्थानाच्या नजीक येऊन पोहोचला तेव्हा लपवून ठेवलेल्या लोकांपैकी एकाला शिंक आली.²¹¹ अमीर बरीदला भीती वाटून तो साशंक झाला आणि पाठीमागे फिरून त्याने आपले रक्षक [२] (५५६) वाटेत कोणी लपून बसले आहे किंवा काय हे शोधण्यासाठी पाठविले. अल्लाउद्दीनचा कट उघडकीस आला आणि त्यात सामील असलेल्या सर्वांची कत्तल करण्यात आली. अल्लाउद्दीनची सुलतानपदावरून उचलबांगडी करण्यात आली आणि त्याला बंदिवासात ठेवण्यात आले. बंदिवासात असतानाच काही कालावधीनंतर त्याचा खून करण्यात आला. अल्लाउद्दीनची कारकीर्द जेमतेम २ वर्षे आणि ३ महिने एवढी झाली.

## वलीउल्ला शहा बहमनी [२] (५५७)

(२९७) अल्लाउद्दीन शहा याला सिंहासनावरून पदच्युत केल्यावर अमीर बरीद याने महमूदशहा बहमनी याचा आणखी एक मुलगा वलीउल्ला याला सिंहासनावर बसविले. वलीउल्ला याला अमीर बरीद याने जो तनखा नेमून दिला त्यावर त्याने समाधान मानले आणि राज्यकारभाराच्या कोणत्याही बाबतीत ढवळाढवळ करण्याच्या भानगडीत तो पडला नाही. परंतु अखेर त्याच्यावर लादण्यात आलेल्या बंधनांमुळे त्याची वृत्तीही विचलित झाली आणि त्याने आपल्याला अधिक स्वातंत्र्य मिळावे यासाठी जारीने प्रयत्न सुरू केले. यावर अमीर बरीदने त्याला राजवाड्याच्या परिसरातच बंदिस्त करून ठेवले. वलीउल्लाला तख्तावर बसविल्यानंतर तीनच वर्षांनी त्याच्या राणीबद्दल अमीर बरीदच्या मनात पापवासना निर्माण झाली. अमीर बरीदने त्याला विषप्रयोग करविला आणि त्याच्या राणीशी विवाह केला.

## कलिमउल्ला शहा बहमनी [२] (५५८)

(२९८) वलीउल्लाच्या मृत्यूनंतर कलीमउल्ला शहा याला सुलतान म्हणून जाहीर करण्यात आले. कलीमउल्ला हा अहमदशहाला युसुफ आदिलशहाच्या मुलीपासून झालेला मुलगा. केवळ सुलतानाच्या नुसत्या नावाखेरीज कलीमउल्लाकडे दुसरे कोणतेही अधिकार नव्हते. आणि राजवाड्याच्या बाहेर पडण्याची परवानगी त्याला कधीही देण्यात येत नसे. हिजरी ९३३ यावर्षी बाबर बादशहाने दिल्ली शहर जिंकून घेतले. यावर इस्माईल आदिलशहा, बुरहाण निजामशहा आणि कुतुबशहा यांनी त्याच्या दरबारात आपले वकील पाठविले.

हिजरी ९३३
इ. स. १५२६

कलीमउल्ला याने देखील आपला एक अनुचर वेष पालटून देऊन बाबराच्या दरबारी एक अर्जी देऊन पाठविला. त्यात त्याने असे कळविले की आपले राज्य बळकाविले गेले आहे आणि बंडखोर नोकरदारांनी आपल्याला बंदिस्त करून ठेवले आहे. अशा या विपन्न परिस्थितीतून दिल्लीचे बादशहा जर आपली सुटका करतील तर त्यास आपण दौलताबाद आणि वऱ्हाडचा प्रांत तोडून देऊ. बाबरने जिंकलेल्या प्रांतात अजून स्थिरस्थावर झाली

नव्हतो. माळवा आणि गुजरातच्या सुलतानांचा अजून मोड व्हावयाचा होता. त्यामुळे बाबराने कलीमउल्लाच्या विनंतीकडे दुर्लक्ष केले. परंतु कलीमउल्लाने बाबर [२] (५५९) बादशहाला वरीलप्रमाणे अर्जी पाठविल्याचे अमीर बरीद याला कळले. तेव्हा त्याने कलीमउल्लाचा अधिकाधिक छळ करण्यास सुरुवात केली. तेव्हा कलीमउल्ला आपला चुलता विजापूरचा इस्माईल आदिलशहा याच्याकडे पळून गेला. त्याचे आदिलशहाने योग्य प्रकारे आदरातिथ्य केले. परंतु इस्माईल आदिलशहाच्या त्याच्याबरोबरील वागणुकीची त्याला चीड आली तेव्हा कलीमउल्ला हा अहमदनगरच्या बुरहाण निजामशहाच्या आश्रयाला गेला. पहिल्या प्रथम बुरहाण निजामशहाने त्याची इतकी बडदास्त राखली की कलीमउल्लाच्या पुढ्यात बुरहाण निजामशहा उभा राहात असे. परंतु त्याला जेव्हा असे सांगण्यात आले की त्याने जर असे केले तर त्याच्या शाही इतमामाला ते निश्चितपणे कमीपणा आणणारे आहे. यावर बुरहाण निजामशहाने वरील प्रथा बंद केली. कलीमउल्लाशहा स्वतःच्या मृत्यूपर्यंत अहमदनगरच्या आश्रयाला राहिला. त्याच्या मृत्यूबरोबर बहमनी घराणे संपुष्टात आले. परंतु खरी वस्तुस्थिती सांगायची झाली तर कलीमउल्लाच्या मृत्यूपूर्वीच दक्षिणेची विभागणी पाच राज्यांमध्ये झाली होती. ती राज्ये म्हणजे आदिलशाही अथवा विजापूरची सलतनत, कुतुबशाही अथवा गोवळकोंड्याची सलतनत, इमादशाही अथवा वऱ्हाडची सलतनत, निजामशाही अथवा अहमदनगरची सलतनत आणि बरीदशाही अथवा अहमदाबाद बिदरची सलतनत. या शाहयांचा इतिहास पुढील खंडात देण्यात येईल. [२१२★]

## पुस्तक तिसरे

# प्रकरण तिसरे ( चालू )

## अहमदनगरच्या निजामशाही घराण्याचा इतिहास

### मलिक अहमद निजामशहा

( १ ) अहमद [२१३□] निजामशहा हा [२१४□] मलिक नायब निजाम उलमुल्क बहरी याचा मुलगा. मलिक नायब हा मूळचा विजयनगरचा [ ३ ] ( १८९ ) ब्राह्मण होता. त्याचे खरे नाव तिमाप्पा असे होते. त्याच्या बापाचे नाव भैरव.